# लोकलेखा समिती

(२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१५- २०१६ च्या आर्थिक क्षेत्र अहवालामधील ग्रामविकास व जलसंधारण (जलसंधारण) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. २.१), कृषी व पदुम (कृषी) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.१ व ३.९), सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.२, ३.७ व ३.८) यावरील**

# एकोणचाळीसावा अहवाल

सत्यमेव जयते

**( हा अहवाल विधानसभा / विधानपरिषद सभागृहास**
**दिनांक जुलै, २०१८ रोजी सादर करण्यात आला )**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई/नागपूर.
जुलै, २०१८

# लोकलेखा समिती

(२०१७-२०१८)

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१५- २०१६ च्या आर्थिक क्षेत्र अहवालामधील
ग्रामविकास व जलसंधारण (जलसंधारण) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. २.१),
कृषी व पदुम (कृषी)विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.१ व ३.९),
सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.२, ३.७ व ३.८) यावरील

# एकोणचाळीसावा अहवाल

# लोकलेखा समिती

२०१७-२०१८

**समिती प्रमुख**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(४) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(५) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.

(६) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(७) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(८) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(९) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.

(१०) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

(११) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(१२) श्री. सुरेश ऊर्फ बाळुभाऊ धानोरकर, वि.स.स.

(१३) श्री. अजय चौधरी, वि.स.स.

(१४) श्री. शंभुराज देसाई, वि.स.स.

(१५) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.

(१६) श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.

(१७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१८) श्री. दिलीप वळसे-पाटील, वि.स.स.

(१९) श्री. जयंत पाटील, वि.स.स.

(२०) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

(२१) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(२२) श्री. रविंद्र फाटक, वि.प.स.

* (२३) श्री. हेमंत टकले, वि.प.स.

(२३अ) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(२४) श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स.

(२५) श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

**निमंत्रित**

(२६) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

**सदरहू समिती दिनांक २४ ऑगस्ट, २०१७ रोजी विधानसभा व दिनांक ६ सप्टेंबर, २०१७ रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठीत करण्यात आली.**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.

(२) श्री. यु. के. चव्हाण, सचिव (एम.).

(३) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.

(४) श्री. अ. चां. कोल्हे, उप सचिव तथा नि. अ.

(५) श्री. सो. न. सानप, अवर सचिव.

(६) श्री. विनोद राठोड, कक्ष अधिकारी.

(७) श्री. रविंद्र मेस्त्री, कक्ष अधिकारी.

*** श्री. हेमंत टकले, वि.प.स. यांनी आपल्या समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

## प्रस्तावना

मी, लोकलेखा समितीचा समिती प्रमुख, समितीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरुन भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१५- २०१६ च्या आर्थिक क्षेत्र अहवालामधील जलसंधारण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. २.१), कृषी व पदुम (कृषी) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.१ व ३.९), सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.२, ३.७ व ३.८) यावर विचार करून लोकलेखा समितीचा एकोणचाळीसावा अहवाल सादर करीत आहे.

समितीने दिनांक ३, ४, १२ व ३१ ऑक्टोबर, २०१७, दिनांक ७, २७ नोव्हेंबर, २०१७ रोजी प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम व कृषी व पदुम (कृषी) विभाग तसेच सचिव, ग्रामविकास व जलसंधारण (जलसंधारण) विभाग व इतर विभागीय प्रतिनिधी यांची साक्ष विधानभवन, मुंबई येथे घेण्यात आली.

प्रधान महालेखाकार, लेखापरीक्षा-एक महाराष्ट्र, मुंबई तसेच महालेखाकार, लेखापरीक्षा-दोन महाराष्ट्र नागपूर हे समितीच्या निमंत्रणावरुन बैठकींना उपस्थित होते. त्यांनी समितीला केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांची अत्यंत आभारी आहे.

तसेच प्रधान सचिव, वित्त विभाग (लेखा व कोषागारे) यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला दिलेल्या सहकार्याबद्दल आणि संबंधित विभागाच्या सचिवांनी समितीसमोर साक्ष देऊन समितीला सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांचे देखील आभारी आहे.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे कार्यवृत्त स्वतंत्ररित्या ठेवण्यात आले असून तो अहवालाचा भाग आहे. बैठकीच्या कामकाजाच्या अनुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेली आश्वासित माहिती व परिपत्रके परिशिष्ट 'अ' मध्ये देण्यात आलेली आहेत. समितीच्या झालेल्या बैठकांचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट 'ब' मध्ये देण्यात आलेले आहे.

समितीने दिनांक १६ मे व ७ जून, २०१८ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेतला व त्यातील शिफारशीवर सुधारणा सुचवून प्रारुप अहवालाला मान्यता दिली.

| | |
|---|---|
| विधान भवन, | **गोपालदास अग्रवाल,** |
| मुंबई/नागपूर. | समिती प्रमुख, |
| दिनांक : ७ जून, २०१८. | लोकलेखा समिती. |

**अनुक्रमणिका**



| अ. क्र. (१) | विभाग व तपशील (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|
| | प्रस्तावना . . . . . . . . | (पाच) |
| (१) | ग्रामविकास व जलसंधारण (जलसंधारण) विभाग . . . . . . | १ |
| | (परिच्छेद क्र. २.१) | |
| (२) | कृषी व पदुम (कृषी) विभाग . . . . . . . . | ८० |
| | ( परिच्छेद क्र. ३.१) | |
| | (परिच्छेद क्र. ३.९) | |
| (३) | सार्वजनिक बांधकाम विभाग . . . . . . . . | १६५ |
| | (परिच्छेद क्र. ३.२) | |
| | (परिच्छेद क्र. ३.७) | |
| | (परिच्छेद क्र. ३.८) | |

# ग्रामविकास व जलसंधारण (जलसंधारण) विभाग

**१.** भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१५-१६ या वर्षाच्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. २.१ **"जलसंधारण विभागाद्वारे लघु सिंचन प्रकल्पांचे व्यवस्थापन"** यासंदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय दिले आहेत.

**कार्यकारी सारांश**

मोठया किंवा मध्यम सिंचन प्रकल्पाद्वारे सिंचित करता येऊ शकत नाही, अशा जमिनीच्या लहान तुकडयांच्या सिंचनासाठी लघुसिंचन प्रकल्पांची (SSI) भूमिका महत्वाची असते. २५० हेक्टर पर्यंत सिंचन क्षमता असलेले प्रकल्प लघु सिंचन प्रकल्पांतर्गत घेता येऊ शकतात आणि त्यांचे कार्यान्वयन आणि व्यवस्थापन महाराष्ट्र शासनाच्या जल संधारण विभागाद्वारे (WCD) करण्यात येते.

२०११-१६ या कालावधीत "जल संधारण विभागाद्वारे लघु सिंचन प्रकल्पाचे व्यवस्थापन" यावरील कार्यसिध्दी लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की कोणतेही दीर्घकालीन नियोजन आणि प्राधान्यक्रमाशिवाय जल संधारण विभाग/महाराष्ट्र जल संधारण महामंडळ/ विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम यांच्या द्वारे SSI प्रकल्प घेण्यात आले.

मागणी केलेल्या निधीपेक्षा प्रदान केलेला निधी खूप कमी होता.भूमी संपादन न केल्यामुळे,कामांचा आराखडा/व्याप्ती यातील बदल,निधीची कमी किंवा निधी विलंबाने मिळणे या कारणामुळे प्रकल्पाच्या निष्पादनात विलंब झाला. देखभाल व दुरुस्तीसाठीही अल्प प्रमाणात निधी मिळाला. परिणामी निर्माण केलेल्या सिंचन क्षमतेचा योग्य उपयोग करता आला नाही. ब-याच प्रकरणांत नियमावलीतील तरतूद आणि करार अटींचा भंग झाला, परिणामी कंत्राटदाराला गैरवाजवी लाभ देण्यात आले आणि निरर्थक खर्च झाले.

अभियंत्याद्वारे प्रकल्पांचे संनियंत्रण कमकुवत होते कारण प्रकल्पांचे विविध स्तरावर नियमित परिणामकारक रितीने व कार्यक्षमता पूर्वक संनियंत्रण करण्यात आले नव्हते. विभागीय तपासणी अभावी आणि पाणी वापर संस्थेद्वारे सार्वजनिक मालकी हक्क नसल्यामुळे प्रकल्प स्थळावरच्या साठवणूक क्षेत्रांतून पाणी कोणतीही पाणीपट्टी न भरता चोरी करण्यात येत होते.

**प्रस्तावना**

महाराष्ट्र राज्य हे देशातील तिस-या क्रमांकाचे मोठे राज्य आहे. जेथे ५८ टक्के जनता त्यांच्या उपजीविके करिता शेतीवर अवलंबून आहे. महाराष्ट्र राज्याच्या २०१५-१६ च्या आर्थिक सर्वेक्षणानुसार राज्यातील संपूर्ण जमीन वापराच्या स्वरुपावरुन असे दिसते की जवळपास १७ टक्के जमीन जंगल व्याप्त आहे. राज्यात २३४ लक्ष हेक्टर जमीन शेतीयोग्य आहे, जी एकूण भौगोलिक क्षेत्राच्या ७६ टक्के आहे. महाराष्ट्राच्या २०१५-१६ च्या आर्थिक सर्वेक्षणात असे ही दिसते की राज्यातील शेतीयोग्य जमिनीच्या फक्त २७.७३ टक्के जमीन ओलिताखाली आहे आणि उर्वरित १६९.०९ लक्ष हेक्टर जमीन पावसावर अवलंबून आहे.

मोठया किंवा मध्यम सिंचन प्रकल्पाद्वारे सिंचित करता येऊ शकत नाही, अशा जमिनीच्या लहान तुकडयांच्या सिंचनासाठी लघु सिंचन प्रकल्पाची (SSI) भूमिका महत्वाची असते. २५० हेक्टर पर्यंत सिंचन क्षमता असलेले प्रकल्प लघु सिंचन प्रकल्पांतर्गत घेता येऊ शकतात आणि त्यांचे कार्यान्वयन आणि व्यवस्थापन महाराष्ट्र शासनाच्या जल संधारण विभागाद्वारे (WCD) करण्यात येते.

राज्यातील सामाजिक वनीकरण आणि सिंचन प्रकल्पांसह पाणलोट आणि जल संधारण कामांचे प्रचालन,कार्यचालन आणि शीघ्र विकास व विनियमन करण्यासाठी राज्य शासनाने औरंगाबाद येथे महाराष्ट्र जल संधारण महामंडळ (MWCC) प्रस्थापित केले (जानेवारी २००१).

तसेच,विदर्भ क्षेत्रात पर्जन्याश्रयी कापसाच्या शेतीचे उत्पादन वाढविण्याकरिता आणि विद्यमान लघु सिंचन स्त्रोतांचे आवर्धन करण्याकरिता राज्य शासन विदर्भातील ११ जिल्ह्यांत २०१२ पासून २०१७ पर्यंत विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम (VIIDP) राबवित आहे.

MWCC आणि VIIDP द्वारे मंजुरी व निधी देण्यात आलेल्या २५० हेक्टर पर्यंतच्या सर्व SSI प्रकल्पांना WCD द्वारे निष्पादित करण्यात येत आहे.

**संस्थात्मक संरचना**

सचिव हे WCD चे प्रशासकीय प्रमुख आहेत.मुख्य अभियंता (CE) SSI, पुणे हे WCD चे तांत्रिक प्रमुख आहेत आणि त्यांना अमरावती,औरंगाबाद,नाशिक,नागपूर,पूणे आणि ठाणे या सहा मंडळ कार्यालयांचे सहा अधीक्षक अभियंते सहाय्य करतात.

MWCC मध्ये जल संधारणाचे मंत्री महामंडळाचे पदसिध्द प्रमुख आहेत. त्याखेरीज,कृषी आणि सिंचन मंत्री,वित्त,नियोजन,वन,कृषी,सिंचन,जल संधारण आणि ग्रामीण विकास विभागाचे सचिव पदसिध्द सभासद म्हणून कार्य करतात. MWCC द्वारे मंजूर आणि अनुदानित SSI प्रकल्प WCD द्वारे मुख्य अभियंता, SSI, पुणे मार्फत निष्पादित करण्यात आले.

CE, VIIDP नागपूर यांच्या एकूण देखरेखी खाली WCD द्वारे त्यांच्या सहा पैकी नागपूर आणि अमरावती येथील दोन SE मार्फत VIIDP राबविण्यात येत आहे.

राज्यातील सर्व SSI प्रकल्प (WCD/MWCC/VIIDP) विभागीय स्तरावर WCD च्या २५ कार्यकारी अभियंत्यांद्वारे निष्पादित करण्यात येत आहेत.

**लेखापरीक्षा उद्दिष्ट्ये**

खालील बाबींची खातरजमा करणे ही कार्यसिध्दी लेखापरीक्षेची उद्दिष्ट्ये होती.

- SSI प्रकल्पांचे नियोजन मागणीनुसार होते आणि ते सुसाध्य आहे याबाबतचा सखोल अभ्यास केल्यानंतर हाती घेण्यात आले;
- निधीचे प्रदान आणि वापर यासाठी योग्य वित्तीय व्यवस्थापन व्यवहारांचे पालन करण्यात आले;
- SSI प्रकल्पांचे निष्पादन समायोचित,मितव्ययी,कार्यक्षम आणि परिणामकारक पध्दतीने करण्यात आले होते; आणि
- SSI प्रकल्पाद्वारे निर्मित सिंचन क्षमता पर्याप्त होती आणि ती योग्य प्रकारे वापरण्यात आली.

**लेखापरीक्षा निकष**

खालील दस्तावेजांवरुन लेखापरीक्षा निकष ठरविण्यात आले.

- राज्य शासनाद्वारे वेळोवेळी निर्गमीत करण्यात आलेले शासन निर्णय आणि आदेश;
- WCD, MWCC आणि VIIDP द्वारे निर्गमित SSI प्रकल्पांच्या निधी स्वरुपा बाबतच्या मार्गदर्शक सूचना;
- महाराष्ट्र लघु सिंचन नियमपुस्तिका, १९८३ ; आणि महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका,१९८४
- महाराष्ट्र जल संधारण महामंडळ अधिनियम,२०००

**परिच्छेद क्र. २.१.५**

**लेखापरीक्षेची व्याप्ती आणि कार्यपध्दती**

२०११-१२ ते २०१५-१६ या पाच वर्षाच्या कालावधीसाठी "जल संधारण विभागाद्वारे लघु सिंचन प्रकल्पांच्या व्यवस्थापनाचे" कार्यसिध्दी लेखापरीक्षण फेब्रुवारी ते जुलै २०१६ दरम्यान करण्यात आले. यामध्ये WCD च्या २५ पैकी आठ विभागामध्ये निष्पादित १८७ पैकी ६६ SSI प्रकल्प, ज्यांची सिंचन क्षमता १०१ ते २५० हेक्टर होती, अशा प्रकल्पांची तपासणी करण्यात आली. यासाठी मंत्रालय; CE, SSI पुणे CE VIIDP नागपूर; व्यवस्थापन संचालक MWCC औरंगाबाद; सर्व सहा अधीक्षक अभियंते; आणि आठ कार्यकारी अभियंते यांच्या कार्यालयांतील अभिलेख्यांची पडताळणी करण्यात आली. याशिवाय, निर्माण केलेल्या सिंचन प्रकल्पांच्या वास्तविक स्थितीची खात्री करण्याकरिता लेखापरीक्षेने ६६ पैकी ४७ प्रकल्पांचे विभागीय अभियंत्यांसोबत संयुक्त प्रत्यक्ष निरीक्षण केले.

सविव, WCD यांचे सोबत ०५ नोव्हेंबर २०१६ ला लेखापरीक्षणोत्तर बैठक घेण्यात आली, ज्यात लेखापरीक्षा निष्कर्ष आणि लेखापरीक्षेने केलेल्या शिफारसींवर चर्चा करण्यात आली. ही बाब राज्य शासनास सप्टेंबर २०१६ मध्ये कळविण्यात आली; डिसेंबर २०१६ पर्यंत त्यांचे उत्तर प्रतीक्षित होते.

**ज्ञापन :-**

**महालेखाकारांनी दिलेल्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.**

मुख्य अभियंता, लघु सिंचन जलसंधारण पुणे यांच्या दि. ३०/११/२०१६ च्या पत्रान्वये लेखा परिक्षा अहवालातील परिच्छेदांचे अनुपालन महालेखापाल कार्यालयास सादर करण्यात आलेले आहे.

**परिच्छेद क्र. २.१.६**

**लेखापरीक्षा निष्कर्ष नियोजन**

पाणी एक मौल्यवान नैसर्गिक स्त्रोत असल्यामुळे त्याचा कार्यक्षम आणि प्रभावी विनियोग करण्याकरिता राज्यासाठी एक एकात्मिक दीर्घकालीन योजना असण्याची निकड महाराष्ट्र जल आणि सिंचन आयोगाने योग्य प्रकारे ओळखली (सप्टेंबर १९९९) अशा प्रकारची एकात्मिक योजना राज्याच्या समतोल विकासाची खात्री देते आणि पाण्याच्या विविध वापरकर्त्यांच्या गरजा सुध्दा पूर्ण करते.

**परिच्छेद क्र. २.१.६.१**

**लघुसिंचन प्रकल्पांचे नियोजन**

**WCD द्वारे प्रकल्पांचे नियोजन**

महाराष्ट्र लघु सिंचन नियमपुस्तिका,१९८३ च्या परिच्छेद २.८ अनुसार विभागांच्या प्रभारी कार्यकारी अभियंत्यांची जिल्हा बृहत आराखडे तयार करावयास पाहिजे, ज्यात जिल्ह्याची विशेष वैशिष्टये सामान्यतः लागवड करण्यात येणारे पीक, सिंचन पध्दती,सिंचन साध्यतेचे विविध स्वरुप, शक्यता, मर्यादा, लक्ष्य इत्यादिंची माहिती तक्ते,नकाशे आणि विवरण स्वरुपात दर्शविलेली असावी. या बृहत आराखडयामध्ये पुढील १५ वर्षाकरिता प्रकल्पाचे शेल्फ (Shelf) दर्शविणे अपेक्षित आहे.जे की SSI प्रकल्पांचे नियोजन आणि निधी पुरवठा करण्याकरिता एक महत्वाचे साधन असेल. तथापि, लेखापरीक्षेस असे निदर्शनास आले की १३ जिल्ह्यांतील २५ विभागांमधून निवडलेल्या आठ विभागांपैकी एकाही विभागाने जिल्हा बृहत आराखडा तयार केला नव्हता. परिणामी,२०११-१६ दरम्यान आठ पैकी सात कार्यान्वयन विभागांद्वारे सर्व १९ WCD प्रकल्प (निवडलेल्या ६६ प्रकल्पांपैकी) केवळ स्थानिक प्रतिनिधी/शेतक-यांच्या व स्थानिक लोकांनी केलेल्या मागण्यांच्या आधारावर घेण्यात आले.

लेखापरीक्षणोत्तर बैठकीत सचिव,WCD ने वस्तुस्थिती मान्य केली आणि नमूद केले की जल संपदा विभागाच्या सिंचन प्रकल्प मंडळांद्वारे १५ वर्षीय बृहत आराखडे तयार करावयास पाहिजे होते आणि WCD द्वारे घेण्यात येणा-या प्रकल्पाची माहिती त्यात समाविष्ट करावयास पाहिजे होती.

**ज्ञापन :-**

**महालेखाकारांनी दिलेल्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.**

यानुषंगाने सादर करण्यात येते की, SSI प्रकल्पांची व्याप्ती, स्वरुप व मर्यादा अत्यंत लहान स्वरुपाची असते. तसेच हे प्रकल्प दूरवरच्या क्षेत्रातील (Remote area) असतात. अशा लहान स्वरुपांच्या प्रकल्पांच्या पुढील १५ वर्षातील यादी करण्याबाबत विभाग स्तरावरून कार्यवाही करण्यात येईल. तथापि स्थानिक परिस्थिती, लोकप्रतिनिधी व स्थानिक शेतक-यांकडून प्राप्त मागणीनुसार ब-याच वेळेस SSI प्रकल्प हाती घेण्यात येतात. त्यामुळे अशा प्रकारचे नियोजन करणे अडचणीचे ठरते.

**जिल्हा बृहत आराखडा :-**

लघु सिंचन विभागामार्फत हाती घेण्यात येणारी कामे ही छोटया स्वरुपातील व विखुरलेली असतात. ० - १०० हे. मधील (५ द.ल.घ.फू.पर्यंत) कामे ही संख्येने मोठया प्रमाणात असून त्याची वर्गवारी करणे व प्राधान्यक्रम ठरविणे अडचणीचे ठरते. तथापि एकत्रित खोरेनिहाय जल आराखडा तयार करण्याचे काम जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडून सुरु आहे.

जलसंधारण विभागाकडील २५० हेक्टर सिंचन क्षमतेपर्यंतच्या योजनांच्या संख्येचा जल आराखडयामध्ये समावेश करण्यात येत आहे.

लघु पाटबंधारे प्रकल्पांना पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्रस्ताव मुख्य अभियंता, जलविज्ञान प्रकल्प, नाशिक यांचे कडे सादर केले जातात. त्यांचे पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर योजनेचे अन्वेषण हाती घेण्यात येते.

लघु सिंचन योजना हाती घेतांना अवर्षणप्रवण भागातील योजनांना निधीच्या उपलब्धतेनुसार प्राधान्य देण्यात येते. प्रगतीपथावरील योजनांच्या बाबतीत कामांच्या सद्यःस्थितीनुसार कमी निधीत लवकरात लवकर पूर्ण होतील अशा योजनांना प्राधान्य देण्यात येते.

**MWCC द्वारे प्रकल्पाचे नियोजन**

महाराष्ट्र जल संधारण महामंडळ अधिनियम,२००० नुसार MWCC ने राज्यात मत्स्य व्यवसाय, मत्स्य संवर्धन, पुष्प संवर्धन, उद्यानविद्या,रेशीम उत्पादन इत्यादी सारख्या सिंचनाशी निगडीत कार्यांना चालना देण्याकरिता वार्षिक आराखडे आणि पंचवार्षिक कार्य विकास आराखडे तयार करावयास पाहिजे होते. लेखापरीक्षेस असे निदर्शनास आले की २०११-१६ दरम्यान MWCC ने पंचवार्षिक कार्य विकास आराखडे तयार केले आणि पंचवार्षिक कार्य विकास आराखडे तयार केले नाहीत.तसेच शासनाकडून निधीच्या उपलब्धतेची खात्री केल्याशिवाय वार्षिक आराखडे MWCC द्वारे मंजूर करण्यात आले. परिणामी,४४४ मंजूर प्रकल्पांपैकी (राज्य स्थिती) १५९५५ हेक्टर अंदाजित सिंचन क्षमता असलेले ९७ प्रकल्प रु.४.८६ कोटी खर्च केल्यावर निधीच्या कमतरतेमुळे २०११-१६ दरम्यान रद्द करण्यात आले. जर MWCC ने पंचवार्षिक कार्य विकास आराखडे तयार केले असते तर मंजूर प्रकल्पाच्या निष्पादनात अडचण न येता वित्तीय स्त्रोत टप्प्या-टप्प्यांमध्ये व शाश्वतीने देता आले असते.

**ज्ञापन :-**

**महालेखाकारांनी दिलेल्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.**

महाराष्ट्र जल संधारण महामंडळ अधिनियम,२००० मधील कलम-१८ नुसार MWCC मार्फत राबविण्याच्या योजनाचा आराखडा दरवर्षी तयार करण्यात येतो. तथापि महामंडळास त्यानुसार संपुर्ण अंशदान उपलब्ध होत नसल्यामुळे वार्षिक आराखडयातील योजना पूर्ण होण्याकरीता २ वर्षे किंवा अधिकचा कालावधी लागतो. त्यामुळे पंचवार्षिक कार्यकारी विकास योजना /आराखडे तयार केलेले नाहीत.

महाराष्ट्र जल संधारण महामंडळामार्फत १०१ ते २५० हे. सिंचन क्षमतेच्या ९६ योजना निधी अभावी स्थगित करण्यात आल्या असून त्यापैकी ६१ योजना सद्यस्थितीत रद्द करण्यात आल्या आहेत. रद्द केलेल्या योजनांवर कोणताही खर्च करण्यात आलेला नाही. उर्वरीत ३५ योजनांवर रू. ९९.६८ लक्ष खर्च करण्यात आलेला आहे स्थगित केलेल्या योजना निधीच्या उपलब्धतेनुसार पुर्ण करण्यात येतील.

**VIIDP अंतर्गत प्रकल्पांचे नियोजन**

VIIDP (२०१२) च्या कार्यान्वयन मार्गदर्शक तत्वांनुसार CE, VIIDP नागपूर यांनी VIIDP अंतर्गत अभिप्रेत इन्टरवेन्शन्सना (Interventions) प्राधान्यक्रम देण्याकरिता व्यापक जिल्हा कृषि योजना आणि राज्य कृषी योजनांमधून उद्भवणारी परिप्रक्ष्य/कार्यतंत्र योजना तयार केली नव्हती. CE, VIIDP यांनी नमूद केले (फेब्रुवारी २०१६) की VIIDP अंतर्गत प्रस्तावित विविध कामे सविस्तर प्रकल्प अहवालात (DPR) अंतर्भूत आहेत आणि ती कामे जानेवारी २०१३ ते फेब्रुवारी २०१४ दरम्यान राज्य शासनाद्वारे मंजूर केली आहेत.

तथापि, लेखापरिक्षेस असे निदर्शनास आले की मार्च २०१७ पर्यंत मंजूर DPR मधील पूर्ण करावयाच्या असलेल्या रु.९२९.५५ कोटी रक्कमेच्या ५,९६२ इन्टरवेन्शन्स पैकी ( १०१ ते २५० हेक्टर सिंचन क्षमता असलेल्या ५९ SSI प्रकल्पांसहित) सप्टेंबर २०१६ पर्यंत फक्त १,७२४ इन्टरवेन्शन्स ( २९ टक्के) पूर्ण करण्यात आले होते आणि ७७६ इन्टरवेन्शन्स ची कामे सुरु होती, ज्यावर रु.२३३.७२ कोटी ( २५ टक्के) खर्च झाला होता.

**ज्ञापन :-**

**महालेखाकारांनी दिलेल्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.**

राष्ट्रीय कृषी विकास योजने अंतर्गत विदर्भ विभागाकरीता रु.३२५० कोटींचा कार्यक्रम मंजूर करण्यात आलेला होता.रु.३२५० कोटी पैकी रु.१४५९ कोटी हा लघु सिंचन योजनांकरीता मंजूर करण्यात आलेला होता. हा कार्यक्रम सन २०१२-१३ ते २०१६-१७ असा ५ वर्ष कालावधीचा होता.

सदर योजनेवर विदर्भातील ११ जिल्ह्याकरीता आतापर्यंत रु.२३३.७२ कोटी खर्च झालेला आहे.

केंद्र शासनाकडुन मंजुर आराखड्यातील नियोजनाप्रमाणे अपेक्षित निधी व प्रत्यक्ष प्राप्त निधी याची माहिती खालील प्रमाणे आहे. विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम अंतर्गत ५८९८योजनांचा रु. ९१२.५४ कोटी एवढ्या रकमेचा निधी शासनाकडुन मंजूर झालेला आहे. त्यापैकी ३२८५ योजना रक्कम रु. ५९५.३६ कोटी एवढ्या रकमेत प्रशासकिय मान्यता प्राप्त झालेली आहे. त्यापैकी २५०० योजना किंमत रु. ३३१.९५ कोटी निविदा प्रक्रीया पुर्ण करण्यात आलेली असुन कार्चारंभ आदेश देण्यात आलेले आहे. त्यापैकी १७२४ योजना पूर्ण झालेल्या आहेत. त्यावर आतापर्यंत २३३.७२ कोटी रूपये खर्च झालेला आहे. सदर योजने अंतर्गत सन २०१६-१७ पासून निधी उपलब्ध झालेला नाही.

सदर योजनेचा कालावधी दिनांक ३१ मार्च २०१७ रोजी संपला असल्यामुळे सदर कामांना इतर लेखा निधी प्राप्त करणे करीता प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. शासन निर्णय क्र.विविका-२०१४७/प्रक्र.१११/जल-१, मंत्रालय मुंबई, दि. १३ सप्टेंबर २०१७ अन्वये सदर योजना विविध लेखाशिर्षाखाली वर्ग करण्यात आलेल्या आहेत. सदर चालू ६९८ योजनांना रू. १७०.३७ कोटी इतका निधी आवश्यक असून निधी उपलब्धतेनुसार योजना पुर्ण करण्यात येतील.

| यंत्रणा | DPR मंजुरी २०१२-१३ रू. कोटीत | | DPR मंजुरी २०१३-१४ रू. कोटीत | | एकुण मंजुर |
|---|---|---|---|---|---|
| लघुसिंचन (जलसंधारण) | दिनांक | रक्कम | दिनांक | रक्कम | |
| | २४-०१-१३ व ३०-०३-१३ | ३९३.११ २३८५ कामे | २०-०२-१४ | ५०४.०४ ३३५५ कामे | ८९७.१५ |

| लघु सिंचन (जलसंधारण) रू. कोटीत | |
|---|---|
| वर्ष | प्राप्त निधी |
| २०१२-१३ | ४८.०० |
| २०१३-१४ | ४०.०० |
| २०१४-१५ | १०८.२२ |
| २०१५-१६ | ३७.५० |
| एकुण . . | २३३.७२ |

वरीलप्रमाणे प्राप्त निधी संपुर्णपणे खर्च झालेला आहे तथापि मागणीनूसार प्रत्यक्ष निधी कमी प्राप्त झाल्यामुळे नियोजित कामे पुर्ण होवु शकले नाहीत.

**परिच्छेद क्र. २.१.६.२**

**प्रकल्पांना प्राधान्यक्रम न देणे :—**

लेखापरीक्षेस असे निदर्शनास आले की,निवडलेल्या आठ विभागांमधील १८७ प्रकल्पांपैकी ४४ प्रकल्प पूर्ण झाले होते आणि १२२ प्रकल्प सुरु होते ( सप्टेंबर २०१६) १६ प्रकल्प अजून सुरु व्हावयाचे होते ( सप्टेंबर २०१६) , चार प्रकल्प जानेवारी २०१६ मध्ये रद्द झाले होते आणि एका प्रकल्पाची स्थिती लेखापरीक्षेस सादर करण्यात आली नाही.

एप्रिल २०११ पूर्वी मंजूर केलेल्या १२२ प्रकल्पांपैकी ९१ प्रकल्प सप्टेंबर २०१६ पर्यंत अपूर्ण होते ही वस्तुस्थिती असतांनाही या तीनही संस्थानी (WCD/MWCC/VIIDP) २०११-१६ दरम्यान रु.२९८.९१ कोटी अंदाजित किंमतीचे ४५ नवीन प्रकल्प हाती घेतले. नवीन प्रकल्पांना प्राथमिकता दिल्याने सुरु असलेल्या ९१ प्रकल्पांच्या प्रगतीवर प्रतिकूल परिणाम झाला कारण ४५ नवीन प्रकल्पांवर रु.१२६.३२ कोटी खर्च केल्यामुळे आधीच्या प्रगतिपथावर असलेल्या प्रकल्पांच्या पूर्णतेसाठी लागणारी उर्वरित कामाची किंमत मार्च २०१६ अखेर रु.२०४.१० कोटी एवढी जास्त होती, जेव्हा की ही किंमत नवीन प्रकल्प हाती घेतले नसते तर रु.७७.७८ कोटी इतकी कमी करता येऊ शकली असती.

सचिव,WCD यांनी नमूद केले की नवीन प्रकल्प स्थानीय मागण्यांमुळे घेण्यात आले आणि प्रगती पथावर असलेले प्रकल्प कोर्ट केस,भूमि संपादनातील अडचणी, शेतक-यांचा विरोध आणि पुरेसा निधी उपलब्ध नसणे या कारणांमुळे प्रलंबित झाले.

**ज्ञापन :-**

**महालेखाकारांनी दिलेल्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.**

लघुसिंचन विभागाकडील प्रकल्प हे लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार व स्थानिक ठिकाणची पाण्याची/सिंचनाची आवश्यकता पाहून नव्याने प्रस्तावित करण्यात येतात.

दुष्काळग्रस्त व पाणी टंचाई असलेल्या क्षेत्रातील योजनांना व आग्रही मागणी असलेल्या योजनांना प्राधान्याने निधी देण्यात येतो. याप्रमाणे निधी उपलब्धतेनुसार योजना पूर्ण करणे याबाबीस निश्चितच प्राधान्य देण्यात येते.

मंजूर झालेले प्रकल्प भूसंपादनातील अडचणी, स्थानिक शेतक-यांचा विरोध व पुरेसानिधी वेळेत उपलब्ध न झाल्यामुळे प्रलंबित आहेत. प्रलंबित न्यायालयीन प्रकरणांमुळेही कामांच्या प्रगतीवर विपरीत परिणाम झालेला आहे.

उपरोक्त परिस्थितीत ९१ प्रकल्प विहीत मुदतीत १००ऽ पुर्ण करणे शक्य झाले नाही. तथापि, त्यामुळे प्रलंबित राहणारा निधी खर्च होण्याच्या दृष्टीने ४५ नविन प्रकल्प हाती घेण्यात आले. या नविन प्रकल्पामुळे जुन्या प्रकल्पांच्या प्रगतीवर केवळ निधी अभावी कोणताही प्रतिकुल परिणाम झालेला नाही.

राज्याच्या सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पिय तरतुदीच्या विनियोगासाठी मा. राज्यपाल यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे चालु प्रकल्पांचे दायित्व उपलब्ध निधीमधुन पुर्ण होईपर्यंत नविन प्रकल्प हाती घेणे टाळावे अशा सुचना प्राप्त असल्यामुळे विभागाकडुन त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

**परिच्छेद क्र. २.१.६.३**

**नियोजन करते वेळी कार्यस्थळांचे अपूरे सर्वेक्षण :—**

महाराष्ट्र लघु सिंचन पुस्तिका, १९८३ च्या प्रकरण ३ आणि ४ नुसार सिंचन योजना तयार करताना प्रकल्पाचा अंदाज बांधणे,प्रकल्पासाठी जागा नेमणे,कार्यस्थळाचे प्रदेशज्ञान,जलस्त्रोत,ऋतुनुसार पाण्याचे निस्सारण आणि इतर पर्यावरण बाबींची पूर्व तपासणी करुनच तयार करावयास पाहिजे. पूर्व तपासणी झाल्यानंतर, WCD सिंचनाच्या साठवणूक क्षमतेनुसार मातीकाम, चिरेबंदी काम इत्यादींचे प्रमाण निर्धारित करण्यासाठी सर्वेक्षण करते आणि प्रकल्पाचा DPR तयार करते. या DPR मध्ये विस्तृत अंदाजित खर्च, लाभव्यय गुणोत्तर आणि इतर आर्थिक मापदंड जसे सिंचन योग्य लाभक्षेत्र, वर्षभरात सिंचित करावयाचे असलेले अपेक्षित क्षेत्र, सिंचनाची गरज इत्यादि दर्शवायचे असते.

आठ सिंचन विभागातील निवडलेल्या ६६ प्रकल्पांच्या दस्तावेजांच्या तपासणीत तसेच काही सिंचन प्रकल्पांच्या संयुक्त प्रत्यक्ष पाहणीत लेखापरीक्षेस खालील त्रुटी आढळल्या

(i) WCD ने केलेल्या कंत्राटदारांनी निष्पादित केलेल्या निविदा परिमाणाच्या १२५ टक्क्यांपर्यतच्या परिमाणासाठी भुगतान निविदा दरानेच करावयाचे होते आणि १२५ टक्क्यांपेक्षा अधिकच्या परिमाणासाठी भुगतान प्रचलित दर अनुसूची (CSR) प्रमाणे करावयाचे होते. निवडलेल्या ६६ पैकी १५ प्रकल्पांमध्ये कंत्राटदारांनी खंड ३८ चा अवलंब केला कारण प्रत्येक प्रकल्पाखाली विविध घटकांचे प्रत्यक्ष परिमाण निविदा परिमाणाच्या १२५ टक्क्यांपेक्षा (एक ते १४,९८४ टक्के) खूप जास्त होते. ज्याची कारणे होती (अ) अंदाजपत्रके तयार करतांना कठीण खडकात पाया तयार करण्यासाठी ट्रायल पीट्स (Trial pits)विचारात घेण्यात आले नाही, (ब) खोदकामातुन निघालेले साहित्य पुनःवापरास योग्य आहे अथवा नाही याचे निर्धारण करण्यात आले नाही,(क) नेमूण दिलेल्या खाणीमधून बंधा-याच्या कामांसाठी आणण्यात आलेल्या साहित्याचे चुकीचे निर्धारण ,(ड) प्रकल्प स्थळांच्या आजूबाजूस देऊळ / उच्च दाबाच्या इलेक्ट्रिक लाईन्स असणे,(इ) प्रकल्पांचे महत्वपूर्ण घटक जसे उर्जा अपव्यय न होण्यासाठी व्यवस्था (याद्वारे धरणातील अतिरिक्त पाणी बाहेर काढण्याची प्रक्रिया नियमित करता येऊ शकते), संरक्षण भिंती (नदी काठांची हानि रोखण्यासाठी) यांचा समावेश न करणे, (फ) धरणाच्या पायामध्ये पाणी गळती रोखण्यासाठी सिमेंट ग्राऊटिंग (Grouting) वाढविणे इत्यादि. वरील असंगति सर्वेक्षणातील अपर्याप्तता दर्शवितात. या असंगतिमुळे सिंचन विभागाद्वारे त्रुटीपूर्ण अंदाजपत्रके तयार करण्यात आले,ज्यामुळे रु.९.६४ कोटी अतिरिक्त खर्च झाला.

सचिव, WCD यांनी नमूद केले की,लघु सिंचन प्रकल्पांची व्याप्ती कमी असल्यामुळे बरीचशी प्रारंभिक अंदाजपत्रके पूर्ण पाहणीच्या आधारावर तयार करण्यात आली आहेत. प्रत्येक प्रकल्पासाठी विस्तृत पाहणी आणि समन्वेषण करणे शक्य होऊ शकत नाही आणि म्हणूनच कार्य निष्पादनाचे वेळी प्रत्यक्ष परिस्थितींमध्ये फरक असू शकतो.

असे असले तरीही महाराष्ट्र लघु सिंचन नियमपुस्तिका,१९८३ च्या तरतुदींचे पालन करण्यात आले नाही ही वस्तुस्थिती आहे आणि यामुळे तुटीची अंदाजपत्रके तयार करण्यात आलीत आणि जादा खर्च झाला.

प्रारंभिक सर्वेक्षणातील त्रुटीमुळे ज्या प्रकल्पांच्या किंमतीत मोठी वाढ झाली असे १५ पैकी तीन प्रकल्प खाली चर्चिले आहेत.

**ज्ञापन :-**

**महालेखाकारांनी दिलेल्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.**

प्रकल्पाच्या सविस्तर सर्वेक्षण व अन्वेषणानंतर प्रत्यक्ष प्रकल्पाचे काम करतांना काही वेळा क्षेत्रिय परिस्थितीनुसार बदल होतो. त्यानुसार प्रकल्पाच्या काही बाबींच्या परिमाणामध्ये वाढ होते व पर्यायाने प्रकल्पाच्या किमतीत वाढ होते.

**नेचल लघु सिचंन तलाव प्रकल्प :-**

सातारा जिल्ह्यात नेचल लघु सिंचन तलावाचे प्रकल्पाचे काम कालव्यांच्या कामांसह रु.३.१६ कोटी किंमतीस फेब्रुवारी २०११ पर्यंत पूर्ण करावयाच्या अटीवर फेब्रुवारी २००९ मध्ये बहाल करण्यात आले. काम करते वेळी डोंगराळ भूप्रदेश असल्यामुळे कालव्यांचे बांधकाम करणे उचित नसल्याचे जाणवले. त्यामुळे कालव्यांच्या ऐवजी रु.१.०२ कोटि अंदाजित किंमतीवर कोल्हापूर पध्दतीचा बंधारा (KT बंधारा) बांधण्याचे ठरविण्यात आले (मार्च २०१०) तथापि, लघु सिंचन तलावाच्या बांधकामावर आधीच रु.३.२४ कोटी खर्च करण्यात आले होते आणि आता त्यांना सिंचनाच्या उद्देशाने KT बंधा-यासोबत जोडावयाचे प्रस्तावित करण्यात आले होते. सप्टेंबर २०१६ पर्यंत सुधारित मान्यतेसाठी (रु.६.८४ कोटी) KT बंधा-याचे तसेच लघु सिंचन तलावाचे (उर्वरित कामे) काम सुरु झाले नव्हते.

**ज्ञापन :-**

**महालेखाकारांनी दिलेल्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.**

नेचल लघुसिंचन प्रकल्प सातारा-ल.पा.तलाव नेचल या योजनेस महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद यांचा निर्णय क्र.सात/४२४/११३७/दि.१४.११.२००८ नुसार रु. ३२६.६० लक्ष इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. सदर योजनेचे काम दिनांक २७/२/२००९ पासून सुरु झाले आहे. स्विकृत निविदेची किंमत रु.३१६.४१ लक्ष असून योजनेवर आज अखेर रु. ३२३.६७ लक्ष इतका खर्च झालेला आहे.

सदर योजनेच्या प्र. मा. प्राप्त अंदाजपत्रकात वितरण प्रणाली उपशिर्षाखाली कालवे, त्यावरील बांधकामे व चारी कामासाठी रु.८.४८ लक्ष इतकी ढोबळ तरतूद करण्यात आलेली आहे. सदरची योजना पश्चिम घाट माथ्यावर असून हे ठिकाण अति पर्जन्यमानाचे तसेच दुर्गम व डोंगराळ भागात आहे. योजनेच्या १५३ हे. लाभक्षेत्रास सिंचनाचा लाभ देणेसाठी कालव्याचे सर्वेक्षण केले असता कालवा तलांकानुसार संरेखा नेचल गावठाणामधून जाते. गावठाणातील घरे, व नागरी वस्ती हलविणे खूपच खर्चिक व अव्यवहार्य आहे. कालव्याची संरेखावरील बाजूने घ्याववयाची झाल्या सखोल खंदकातून कालवा खोदाई करावी लागते. त्यामुळे कालवा खोदाई चा खर्च वाढून कालवा माती काम व बांधकाम तसेच कालव्याच्या भूसंपादनाचा खर्च यामध्ये लक्षणीय वाढ होत आहे. योजना अतिपर्जन्यमानाच्या डोंगराळ भागातील असलेमुळे कालवा खोदकाम, भरावा व त्यावरील बांधकामे करणे, देखभाल दुरुस्ती करणे इत्यादी खूपच खर्चिक होणार आहे. ल. पा. तलावाची व्याप्ती पाहता या ठिकाणी कालवा करणे तांत्रिकदृष्या योग्य नाही. प्रत्यक्ष कार्यक्षेत्राची परिस्थिती पाहता तसेच सदर भागातील ग्रामस्थांचा भूसंपादनासाठी होणारा वाढता विरोध लक्षात घेता या योजनेसाठी कालव्या ऐवजी नाल्यामध्ये पाणी सोडून व तीन को. प. बंधारे बांधून उपसा सिंचन निर्मीती करणे योग्य होईल. कालव्या ऐवजी को.प. बंधारे व्दारे सिंचनाचा लाभदेण्यामुळे खर्चात बचत होवून भविष्यात को. प. बंधा-यांच्या खर्च कालव्याच्या प्रमाणात फारच कमी होणार आहे.

कार्यक्षेत्रावरील प्रत्यक्ष परिस्थिती विचारात घेता तसेच भूसंपादनासाठी शेतक-यांचा विरोध लक्षात घेता कालव्या ऐवजी तीन को.प.बंधारे बांधणे संयुक्तिक होणार आहे. एकूणच सदरच्या बदलामुळे योजनेच्या खर्चात बचत होणार असल्याने योजना किफायतशीर होणार आहे याशिवाय योजनेचे प्रगतीत असणारे काम विनाव्यत्यय लवकर पूर्ण करणे शक्य होणार आहे.

**ऐनारी लघु सिंचन तलाव प्रकल्प :-**

रत्नागिरी जिल्ह्यात ऐनारी लघु सिंचन तलाव प्रकल्पाचे काम रु.१०.१२ कोटी किंमतीवर बहाल करण्यात आले (फेब्रुवारी २००९) हे काम फेब्रुवारी २०१३ पर्यंत पूर्ण करावयाचे होते. तथापि, हे काम भूमि संपादनात झालेल्या विलंबामुळे मार्च २०११ मध्येच सुरु होऊ शकते. निष्पादनाचे वेळी गावक-यांनी दोन देवळांपासून जात असलेल्या धरणाच्या संरेखेवर तीव्र विरोध दर्शविल्यामुळे धरण संरेखा २०० मीटरने वरच्या बाजूस (Upstream) सरकविण्यात आली. परिणामी, बंधा-याच्या बांधकामासाठी लागणा-या साहित्याच्या (काळी माती,मुरुम इत्यादि) वाहासाठी कंत्राटदारास रु.३.७७ कोटी अतिरिक्त वहन खर्च द्यावा लागला. प्रकल्प किंमतीत एकूण वाढ रु.२२.२६ कोटी होती. (मार्च २०१६) सचिव, WCD यांनी वस्तुस्थिती मान्य केली आणि नमूद केले की धरण संरेखा बदलल्यामुळे धरणाची उंची पाच मीटरने वाढवावी लागली, ज्यामुळे प्रकल्प किंमतीत वाढ झाली.

धरणाची संरेखा २०० मी. वर सरकवल्यामुळे धरणाची उंची ४ मीटरने वाढली व पाणीसाठा २८२४ सघमी ऐवजी ३७०० सघमी एवढा वाढून योजनेचे सिंचन क्षेत्र १९३ हेक्टर वरून २३८ हेक्टर एवढे झाले. त्यामुळे धरणाचे विविध बाबीचे परिमाण वाढले आणि त्यामुळे किंमतीत वाढ झाली आहे. माती व मुरुम बुडीत क्षेत्रात उपलब्ध न झाल्यामुळे अनुक्रमे ८ व ६ कि.मी. अंतरावरून आणण्यात आले. त्यामुळे वहन अंतरात वाढ झालेली आहे.

उपरोक्त सर्व वाढींचा समावेश करून सदर योजनेस रू. ५५.६६ कोटी रकमेस सुधारीत प्रशासकीय मान्यता घेण्यात आली आहे. यानुसार योजनेची प्रति सघमी किंमत रू. १,५०,४१२/- येत असुन लाभ व्यय गुणोत्तर १.०२ एवढे येत आहे. सदर योजना प्रचलित मापदंडात सफल होत आहे.

**इंदवटी लघु सिंचन तलाव प्रकल्प :-**

रत्नागिरी जिल्ह्यात इंदवटी लघु सिंचन तलाव प्रकल्पाचे काम रु.३.६८ कोटी किंमतीवर फेब्रुवारी २००९ पर्यंत पूर्ण करण्याच्या अटीवर मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना (CDO), नाशिक द्वारे संकल्पचित्रास मंजूरी न घेता बहाल करण्यात आले (ऑगस्ट २०१५) , परिणामी, निष्पादनाचे वेळी (CDO) नाशिकच्या शिफारसींनुसार धरणाची उंची,रुंदी, बाजूचे उतार, सांडव्याची लांबी वाढवावी लागली. याखेरीज स्थानिक शेतक-यांनी कालव्यांच्या ऐवजी कोल्हापूर पध्दतीचे बंधारे बांधण्याचा प्रस्ताव मांडला (जानेवारी २०१३) मार्च २०१६ पर्यंत या प्रकल्पाचे ९० टक्के बांधकाम पूर्ण करण्यात आले आणि रु.२४.८३ कोटी प्रकल्पाची सुधारित अंदाजित किंमत MWCC कडे मंजुरी साठी पाठविण्यात आली ( मे २०१६)

(ii) याशिवाय दोन प्रकल्पांमध्ये सर्वेक्षणातील उणीवांमुळे WCD ला मूळ अंदाजपत्रकात प्रस्तावित केलेल्या कालव्यांच्या ऐवजी कोल्हापूर पध्दतीचे बंधारे बांधावे लागले. ज्याची कारणे होती (अ) कालवा संरेखेत वन जमीन येत होती आणि उच्च दाबाच्या लाईन्स दुसरीकडे हलविण्यात येऊ शकल्या नाही, आणि (ब) स्थानिक शेतक-यांचा विरोध. सप्टेंबर २०१६ पर्यंत कोल्हापूर पध्दतीच्या बंधा-यांच्या कामास मंजुरी मिळायची होती,जरी लघु सिंचन तलावांच्या बांधकामावर आधीच रु.१७.७७ कोटी खर्च करण्यात आले होते.

**ज्ञापन :-**

मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेने दिलेल्या सांडवा व धरण काटछेदामुळे योजनेच्या किंमतीत वाढ झालेली आहे. सदर योजनेस रू. २८.८० कोटी रक्कमेस सुधारीत प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे. त्यानुसार योजनेची प्रती सघमी किंमत रू. १,३८,९४८/- इतकी येत असुन लाभव्यय गुणोत्तर १.०७ इतके येत आहे. सदर योजना प्रचलित मापदंडात सफल होत आहे.

जानवली धरणासाठी लागणारी जमीन खाजगी वाटाघाटीने संपादित करून धरणाचे काम दि. ९/०५/१९९७ रोजी सुरू करण्यात आले. भूसंपादन प्रस्ताव दि. ३/०९/१९९७ रोजी जिल्हाधिकारी सिंधुदूर्ग यांना सादर करण्याता आला. उपवन संरक्षक, उप विभाग सांवतवाडी यांनी त्यांच्या पत्रानुसार १७/०९/१९९८ नुसार जमीन वन संज्ञा अथवा वन खात्यामध्ये येत नाही असे कळविले. त्यानंतर धरणाची घळभरणी सन २००० मध्ये पुर्ण करण्यात आली.

कालव्यासाठी जमीन देण्यास शेतक-यांचा विरोध असल्यामुळे नदीत को.प. बंधारे, अथवा बंदिस्त नलिकेद्वारे सिंचन वितरण व्यवस्था यापैकी जे किफायतशीर असेल व शेतक-यांना मान्य असेल त्याप्रमाणे प्रस्ताव सक्षम स्तरावर मंजूर करून पुढील कार्यवाही करण्यात येईल. को.प. बंधारा-यांचे काम अद्याप सुरू केलेले नाही. तसेच मुळ सिंचन तलावाच्या बांधकामावर झालेला रू. १७.७७ कोटी खर्च वाया गेलेला नाही.

जामगे विसापुर योजनेत भूसंपादनासाठी शेतक-यांचा विरोध होता तो आता मावळला असुन काम प्रगतीपथावर आहे.

**परिच्छेद क्र.२.१.६.४**

**प्रकल्पांची आर्थिक सुसाध्यता**

**लाभ-व्यय गुणोत्तर :**

महाराष्ट्र लघु सिंचन नियमपुस्तिका १९८३ नुसार सिंचनापासून प्राप्त झालेले वार्षिक अतिरिक्त लाभ आणि ते लाभ पुरविण्यासाठी लागणारा वार्षिक खर्च यांचे गुणोत्तर म्हणजेच लाभ-व्यय गुणोत्तर होय. अतिरिक्त लाभ म्हणजे सिंचन सुविधा पुरविल्यानंतर आणि पुरविण्याआधि कृषि उत्पादनाच्या किंमतीतील फरक होय. वार्षिक खर्च म्हणजे एखाद्या योजनेस चालविण्याचा खर्च, ज्यात सिंचित जमीनीच्या प्रति हेक्टर प्रमाणे काढलेला निश्चित आणि चालू खर्च अधिक प्रशासकीय खर्च समाविष्ट आहेत. लाभ-व्यय गुणोतराची परिगणना प्रकल्प अहवालात समाविष्ट करण्यात येते कारण SSI प्रकल्पांची आर्थिक सुसाध्यता निर्धारित करण्यासाठी ही परिगणना आवश्यक असते. एखादे सिंचन प्रकल्प आर्थिकरित्या सुसाध्य असण्यासाठी लाभ-व्यय गुणोत्तर एक पेक्षा कमी असावयास नको.

निवडलेल्या ६६ प्रकल्पांच्या DPRs च्या पडताळणीत असे आढळले की १७ प्रकल्पांमध्ये (अ) वार्षिक अतिरिक्त लाभ जसे कृषि उत्पादन,गल्फर (Galphar) जमीन,कृषि क्षेत्रांपासून झालेले उत्पन्न, आणि (ब) वार्षिक खर्च जसे प्रशासकीय खर्चाचे जुने दर,घसारा आणि व्याजाचे कमी दर,हे चुकीचे घेऊन/फुगवून लाभ-व्यय गुणोत्तर काढण्यात आले.याशिवाय, लाभ-व्यय गुणोत्तर परिगणित करतांना मत्स्य व्यवसायापासून झालेले उत्पन्नही विचारात घेण्यात आले होते, जे ग्राह्य नव्हते.

सचिव,WCD यांनी नमूद केले की समोर उद्भवणा-या गरजा जसे कृषि पर्यटन,कृषि आधारित उद्योग, पशु संवर्धन, मत्स्य व्यवसाय इत्यादि बाबी विचारात घेऊन, लाभ-व्यय गुणोत्तर परिगणित करतांना अतिरिक्त लाभ विचारात घेणे गरजेचे आहे.

वरील वस्तुस्थिती कायम आहे की महाराष्ट्र लघु सिंचन नियमपुस्तिकेनुसार हे ग्राह्य नव्हते. यामुळे SSI प्रकल्पांचे लाभ-व्यय गुणोत्तर कार्यान्वयन विभागांनी योग्यरित्या परिगणित केले आहे आणि हे प्रकल्प आर्थिकदृष्ट्या सुसाध्य होते याबाबत लेखापरीक्षेस खात्री करता आली नाही.

**ज्ञापन :-**

**महालेखाकारांनी दिलेल्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.—**

लाभ-व्यय गुणोत्तर ठरवितांना M.I. Manual (4:8:5) Page No. १४६-१४७ प्रमाणे परिगणना केली जाते. यामध्ये पुढील फायद्यांबाबत विचार होणे आवश्यक आहे. (१) मत्स्योत्पादन (२) गाळपेरउत्पादन(३) पशुपालन (४) भूजलपुनर्भरण (५) कृषि निगडित उद्योग (६) शेती पर्यटन यावयासारख्या इतर सर्वबाबींचा लाभव्यय गुणोत्तर काढताना विचार होणे आवश्यक आहे.

**प्रकल्पांची आर्थिक वर्धनक्षमता :-**

राज्याच्या विविध भागांत निष्पादित करावयाच्या असलेल्या विविध प्रकल्पांची आर्थिक वर्धनक्षमता निर्धारित करण्यासाठी राज्य शासनाने वेळोवेळी आर्थिक मापदंड विनिर्दिष्ट केले आहेत जे जल साठ्याच्या प्रती सहस्त्र घन मीटर (TCM) च्या किंमतीनुसार मोजावयाचे आहे. ही किंमत ज्या वर्षी ही अंदाजपत्रके तयार करण्यात आलीत , त्या वर्षीच्या जिल्हा दर अनुसूची वर आधारित असेल. प्रकल्प अंदाजपत्रके आर्थिकदृष्ट्या वर्धनक्षम आहेत याबाबत खात्री करण्यासाठी ही अंदाजपत्रके आर्थिक मापदंडानुसार असावयास पाहिजे.

लेखापरीक्षा पडताळणीत असे आढळले की निवडलेल्या ६६ पैकी सहा प्रकल्पांमध्ये विभागाद्वारे काढण्यात आलली प्रती TCM किंमत रक्कम राज्य शासनाद्वारे विनिर्दिष्ट आर्थिक मापदंडापेक्षा रु.६.१९ कोटीने जास्त आहे, ज्यामुळे हे प्रकल्प आर्थिकदृष्ट्या अवर्धनक्षम आहे.

**ज्ञापन :-**

**महालेखाकारांनी दिलेल्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.—**

१. **सारस्ते ल.पा योजना :** सारस्ते ल. पा. तलावास शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभागाचा शासन निर्णय क्र. लपात-१३०९/५८३/प्र.क्र.१३४अ/जल-१, दि. ११.०५.२०११ च्या निर्णयान्वये रू. ७,१६,७८,०१५/- रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. त्यावेळेस शासनाचे प्रचलित आर्थिक मापदंड रू. ७४२५२/- प्रती TCM याप्रमाणे होते. प्रशासकीय मान्यतेनुसार सारस्ते ल.पा. योजनेची प्रती सघमी किंमत रू. ३५५७२/- इतकी येते. यावरून सदर योजना ही प्रचलित मापदंडात बसत असल्याने योजनेस शासनाकडून प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे.

२. **वळण योजना पळसविहीर :** या योजनेस शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभागाचा शासन निर्णय क्र. लपायो-वळण योजना -१००४/३९७/प्र.क्र.२२०/जल-१, दि. १२.०१.२००६ च्या निर्णयान्वये रू. १,४६,२८,१९३/-रक्कमेस मुळ प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. महाराष्ट्र जलसंधारण महामंडळास निर्णय क्र. लपा/व.यो.सुप्रमा.प्र.क्र.४२८८/२१२०, दि. १९/०८/२०१४ च्या निर्णयान्वये रू. ३०७.५८ लक्ष रकमेस प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. सदर योजना ही वळण योजना असून अद्यापावेतो शासनाने वळण योजनांसाठी आर्थिक मापदंड निश्चित केलेले नसल्याने यायोजनेस आर्थिक मापदंड लावण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

३. **वळण योजना हरणटेकडी :** या योजनेस ग्राम विकास व जलसंधारण विभागाचा शासन निर्णय क्र. वळण योजना/१०/२०००/प्र.क्र.१८३/ जल-१, दि.२१.०६.२००१ च्या निर्णयान्वये रू. ३०७.५८ लक्ष रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. सदर योजना ही वळण योजना असून अघा पावेतो शासनाने वळण योजेनांसाठी आर्थिक मापंदड निश्चित केलेले नसल्याने सदर योजना आर्थिक मापदंडात बसत नाही.

४. **अमरावती विभागांतर्गत अंगोला (टाकळी) :** को.प. बंधारा खारपाण पट्ट्यातील असल्यामुळे शासन निर्णय जलसंपदा विभाग दि. २३/०१/२००८ नुसार खारपाण पट्ट्यातील प्रकल्पांना ३ पट मापदंड लागु आहेत. प्रकल्पाचे प्रती सघमी रू. ९३,९७१ असुन ३ पटप्रमाणे मापदंड रू. १,९०,५२४/- एवढे असल्याने प्रकल्प मापदंडात सफल आहे.

५. **लिंगा सिंचन तलाव ता. वरूड, जि. अमरावती** मध्ये प्र.मा मंजुरीच्या वेळी मापदंड रू. ३६, २७९ प्रती सघमी एवढे असुन प्रकल्पाची किंमती नुसार रू. ३३,७५४/- एवढे असल्यामुळे प्रकल्प मापदंडात सफल आहे.

६. **ल.पा. योजना जामगे विसापूर या** योजनेसाठी शासन निर्णय दि. ३/०१/२००८ चे मापदंड वापरण्यात आले असुन सदर योजना सिंचन अनुशेष क्षेत्रात असल्यामुळे रू. ३६,२७९/- प्रति सघमी इतका घेण्यात आलेला आहे. त्यामुळे योजनेचा खर्च रू. ३६,२३१/- प्रति सघमी मापदंडात आहे.

राज्याच्या सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पिय तरतुदीच्या विनियोगासाठी मा. राज्यपाल यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे चालु प्रकल्पांचे दायित्व उपलब्ध निधीमधुन पुर्ण होईपर्यंत नविन प्रकल्प हाती घेवु नये, अशा सुचना प्राप्त असल्यामुळे विभागाकडून त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

शिफारस १ : राज्य शासनाने लघु सिंचनप्रकल्पांसाठी एका विशिष्ट कालावधीत आणि किंमतीत साध्य करावयाचे असलेले भौतिक लक्ष्य स्पष्टपणे दर्शविलेले असणारी दीर्घकालीन व्यापक योजना तयार करण्याची खात्री करावयास पाहिजे. यामुळे प्रकल्पांसाठी कायमस्वरुपी निधी उपलब्धता शक्य होईल, सुरु असलेले प्रकल्प पूर्ण होण्यापूर्वी विवेकहीनतेने नविन प्रकल्प हाती घेणे टाळता येईल आणि प्रकल्प वेळेवर पूर्ण करता येईल. प्रकल्पांचे सर्वेक्षण शक्यतोवर व्यापक आणि अचूक असावयास पाहिजे जेणे करुन प्रकल्पांची तांत्रिक आणि आर्थिक सुसाध्यता अचूकपणे ठरविता येईल.

**परिच्छेद क्र. २.१.७**

**आर्थिक व्यवस्थापन**

२०११-१६ दरम्यान राज्यात ७२८ SSI प्रकल्पांच्या निष्पादनासाठी रु.७६४.६१ कोटी खर्च करण्यात आले, ज्यात WCD चे २२५ प्रकल्प (रु.१७३.८२ कोटी) MWCC चे ४४४ प्रकल्प ( रु.५७१.०४ कोटी) आणि VIIDP चे ५९ प्रकल्प (रु.१९.७५ कोटी) समाविष्ट आहेत तपशिल तक्ता २.१.१ मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता २.१.१:२०११-१६ दरम्यान राज्यात SSI प्रकल्पावर करण्यात आलेल्या भांडवली खर्चाचे तपशील**

| संस्थेचे नांव | १०१ ते २५० हेक्टर सिंचन क्षमता असलेल्या प्रकल्पांची संख्या | करण्यात आलेला भांडवली खर्च (रु.कोटीत) |
|---|---|---|
| WCD | २२५ | १७३.८२ |
| MWCC | ४४४ | ५७१.०४ |
| VIIDP | ५९ | १९.७५ |
| एकूण | ७२८ | ७६४.६१ |

स्त्रोत : WCD, MWCC आणि VIIDP द्वारे सादर करण्यात आलेली माहिती.

**परिच्छेद क्र. २.१.७.१**

**WCD अंतर्गत प्रकल्पांसाठी निधी पुरविणे**

२०११-१६दरम्यान WCD द्वारे २२५ प्रकल्पांच्या (तक्ता २.१.१) निष्पादनासाठी रु.४१५.८१ कोटी अर्थसंकल्पीय मागणीच्या विरुध्द राज्य शासनाने रु.३४९.१२ कोटी निधी पुरविला,ज्यापैकी रु.१७३.८२ कोटी खर्च करण्यात आले आणि उर्वरित रु.१७५.३० कोटी परत करण्यात आले. लेखापरीक्षा पडताळणीत असे आढळले की राज्य शासनाद्वारे निधी संवितरित करण्यात विलंब झाला होता, निधीची मोठी रक्कम सामान्यतः अंतिम तिमाहीत प्राप्त होत होती,ज्यामुळे एकतर खर्च करण्याची घाई झाली होती अथवा निधी परत करावा लागला होता. २०११-१६ दरम्यान परत केलेल्या रु.१७५.३० कोटी पैकी रु.१२९.३३ कोटी (७४ टक्के) २०१५-१६ मध्येच प्रत्यर्पित करण्यात आले होते.

२०१५-१६ मध्ये प्रत्यर्पित केलेल्या रु.१२९.३३ कोटी रक्कमेपैकी WCD ने भांडवली जमा शीर्षातून रु.१०९.३२ कोटी MWCC ला वितरित करण्यासाठी राखून ठेवले, ज्यावेळी MWCC ला पुढे सुरु ठेवण्यासाठी वैधानिक मंजुरी प्रदान करण्याची प्रक्रिया सुरु होती.तथापि ,मार्च २०१६ पर्यंत MWCC ला वैधानिक मंजुरी प्रदान करण्यात येऊ शकली नाही, त्यामुळे संपूर्ण रु.१२९.३३ कोटी रक्कम (MWCC साठी राखलेल्या रु.१०९.३२ कोटी सह) प्रत्यर्पित करावी लागली.

**ज्ञापन :-**

**महालेखाकारांनी दिलेल्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.**

निधी वितरणाच्या कार्यपध्दतीमध्ये सुधारणा करण्यात येवुन क्षेत्रिय यंत्रणेस विहीत वेळेत निधी उपलब्ध होईल याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन असुन त्यावर त्वरीत निर्णय घेण्यात येईल. महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ अधिनियमाच्या कलम २५ मधील तरतुदीमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता असल्याने सन २०१५-१६ यावर्षी महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाकरीता आवश्यक असलेली रू. १०९.३२ कोटी इतकी तरतुद महामंडळाच्या लेखाशिर्षाऐवजी विभागातील अन्य लेखाशिर्षाखाली करण्यात आलेली होती. अधिनियमात सुधारणा केल्यानंतर पुनर्विनीयोजनाद्वारे सदर तरतुद महामंडळाच्या लेखाशिर्षाखाली वर्ग करण्याचे प्रस्तावित होते तथापि महामंडळाच्या अधिनियमातील सुधारणा दि.१ एप्रिल, २०१६ रोजी मंजुर झाल्याने सदर तरतुद व्यपगत झाली.

**परिच्छेद क्र.२.१.७.२**

**MWCC अंतर्गत प्रकल्पांसाठी निधी पुरविणे**

राज्यातील पाणलोट आणि जल संधारण प्रकल्पांचा गतिमान विकास नियमन करण्याच्या उद्देशाने जानेवारी २००१ मध्ये MWCC ची स्थापना करण्यात आली आणि पाच वर्षाच्या (२००१-०६) कालावधीसाठी राज्य शासनाद्वारे निधीही पुरविण्यात आला. तथापि, एप्रिल २००६ ते मार्च २०१६ या कालावधीत (१० वर्षे) राज्य शासनाने MWCC ला वैधानिक मंजुरी नसतांनाही निधी संवितरित केला. एप्रिल २०१६ मध्ये MWCC ला २५ वर्षासाठी २००१ पासून २०२६ पर्यंत निरंतर निधी पुरविण्यासाठी वैधानिक मंजुरी प्रदान करण्यात आली.

२०११-१६ दरम्यान MWCC ने ४,४९१ प्रकल्पांसाठी (१०१ ते २५० हेक्टर सिंचन क्षमता असलेल्या ४४४ प्रकल्पांसह) केलेल्या रु.५०३० कोटी अर्थसंकल्पीय मागणी विरुध्द राज्य शासनाने फक्त रु.८०५.२४ कोटी संवितरित केले जेव्हा की रु.८८०.७४ कोटी खर्च करण्यात आला होता. राज्य शासनाद्वारे कमी निधी दिल्यामुळे MWCC ला २,३३० प्रकल्प (१०१ ते २५० हेक्टर सिंचन क्षमता असलेल्या ९७ प्रकल्पांसह) एप्रिल २०१४ ते मार्च २०१६ दरम्यान रद्द करावे लागले.

**ज्ञापन :-**

**महालेखाकारांनी दिलेल्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.**

महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ अधिनियम कलम २५ मध्ये महामंडळाला आपली कामे पार पाडण्यासाठी आवश्यक असलेल्या भांडवलातील राज्य शासनाचा हिस्सा म्हणून, महामंडळाच्या निधीमध्ये रू. २००० कोटी एवढया एकुण रक्कमेची तरतुद करील आणि असे अंशदान महामंडळाच्या स्थापनेच्या तारखेपासुन ५ वर्षाच्या कालावधीमध्ये योग्य हप्त्यामध्ये विभागुन देण्यात येईल, अशा प्रकारची तरतुद आहे.

महामंडळाला अधिनियमामध्ये कालावधीची मर्यादा नसुन शासनामार्फत महामंडळाला देण्यात येणा-या अंशदानाला ५ वर्षाच्या कालावधीची व रू. २००० कोटीच्या आर्थिक मर्यादेची तरतुद विहीत करण्यात आलेली होती. त्यामुळे महामंडळाला वैधानीक मंजुरी नाही असे म्हणता येणार नाही.

**परिच्छेद क्र.२.१.७.३**

**VIIDP अंतर्गत निधी पुरविणे.**

राज्य शासनाने VIIDP अंतर्गत रु.९२९.५५ कोटी किंमतीची ५,९६२ कामे(१०१ ते २५० हेक्टर सिंचन क्षमता असलेल्या ५९ SSI प्रकल्पांसह)जी २०१२ ते २०१७ दरम्यान निष्पादित करावयाची होती मंजुर केली (जानेवारी २०१३ ते फेब्रुवारी २०१४

दरम्यान) लेखापरीक्षेस असे निदर्शनास आले की CE, VIIDP नागपूर यांनी डिसेंबर २०१२ ते सप्टेंबर २०१६ या कालावधीत फक्त रु.२४६.१२ कोटी (२६ टक्के) ची मागणी केली, ज्यापैकी रु.२३३.७२ कोटी प्राप्त झाले आणि सप्टेंबर २०१६ पर्यंत २५०० कामांवर ते खर्च करण्यात आले. उर्वरीत ३,४६२ कामे सप्टेंबर २०१६ पर्यंत सुरु करण्यात आली नाहीत.

५९ SSI प्रकल्पांपैकी, VIIDP ने रु.४६.६१ कोटी किंमतीचे ३६ प्रकल्प (६१ टक्के) २०१२ ते २०१६ दरम्यान निष्पादनासाठी हाती घेतले, ज्यावर सप्टेंबर २०१६ पर्यंत रु.१९.७५ कोटी खर्च झाला होता. तथापि ३६ प्रकल्पांपैकी केवळ एक प्रकल्प सप्टेंबर २०१६ पर्यंत पूर्ण करण्यात आला.

CE, VIIDP यांच्याकडून फेब्रुवारी व सप्टेंबर २०१६ मध्ये,(अ) कार्यक्रमाच्या पहिल्या चार वर्षात मंजूर किंमतीच्या फक्त २६ टक्के रक्कमेची मागणी करयात आली आणि (ब) ५९ SSI प्रकल्पांपैकी फक्त ३६ प्रकल्प हाती घेण्यात आले, याबाबतची कारणे मागविण्यात आली. परंतु ऑक्टोबर २०१६ पर्यंत कोणतेही उत्तर प्राप्त झाले नाही.

**ज्ञापन :-**

**महालेखाकारांनी दिलेल्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.**

VIIDP अंतर्गत एकुण ३२८५ योजनांना रू. ५९५.३९ कोटी एवढया रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्राप्त करण्यात आली. त्यापैकी २५०० योजना किंमत रू. ३३१.९५ कोटी एवढया कामास निवीदा प्रक्रीया पुर्ण करून कार्यारंभ आदेश देण्यात आले. त्यापैकी १७२४ एवढया योजना पूर्ण करण्यात आल्या.

५९ SSI प्रकल्पांपैकी ३६ योजनांची निविदा प्रक्रीया पुर्ण करण्यात आलेली आहे. यापैकी एक योजना पुर्ण झालेली असुन उर्वरीत ३५ योजना ग्राम विकास व जलसंधारण विभागाच्या दि. १३ सप्टेंबर, २०१७ च्या शासन निर्णयानुसार विविध लेखाशिर्षातंर्गत वर्ग करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे आता सदर योजनेस निधी उपलब्ध होवुन या योजना पुर्ण करण्यात येतील.

**परिच्छेद क्र.२.१.७.४**

**देखभाल व दुरुस्ती निधीचे कमी वाटप**

सामान्य रखरखाव आणि समायोचित देखभालीद्वारे सिंचन प्रकल्प योग्य प्रकारे राखण्यात येऊ शकतात आणि त्यामुळे त्याची आयु वाढू शकते. म्हणूनच, निर्माण केलेल्या सिंचन क्षमतेचा योग्य प्रकारे वापर करण्यात येत आहे याची शहानिशा करण्यासाठी पूर्ण झालेल्या प्रकल्पांची देखभाल व दुरुस्ती करणे अत्यावश्यक आहे.

२०११-१६ दरम्यान WCD ने राज्यातील पुर्ण झालेल्या SSI प्रकल्पांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी रु.३०.४५ कोटीची मागणी केली. परंतु राज्य शासनाने फक्त रु.८.८० कोटी निधी दिला, ज्यापैकी WCD ने तक्ता २.२.२ मध्ये दर्शविल्याप्रमाणे रु.४.९१ कोटी खर्च केले.

**तक्ता २.१.२:२०११-१६ दरम्यान राज्यात देखभाल व दुरुस्तीसाठी वापरण्यात आलेल्या निधीची स्थिती**

(रु.कोटीत)

| वर्ष | देखभाल दुरुस्तीची गरज असणा-या प्रकल्पांची संख्या | निधीची मागणी | अर्थसंकल्पीय व तरतूद | झालेला खर्च | परत केलेला निधी |
|---|---|---|---|---|---|
| २०११-१२ | ३७ | ३.११ | ०.२७ | ०.१३ | ०.१४ |
| २०१२-१३ | ५० | ४.४० | २.५६ | २.५२ | ०.०४ |
| २०१३-१४ | ६४ | ५.५३ | २.५६ | १.९८ | ०.५८ |
| २०१४-१५ | ७५ | ९.८६ | १.६२ | ०.२८ | १.३४ |
| २०१५-१६ | ११८ | ७.५५ | १.७९ | ० | ०.७६ |
| | एकूण | | ३०.४५ | ८.८० | ४.९१ |

स्त्रोत : WCD ने सादर केलेली माहिती

तक्ता २.१.२ वरुन असे दिसून येते की २०११-१६ दरम्यान देखभाल व दुरुस्ती साठी जरी रु.२१.६५ कोटी (७१ टक्के) इतका निधी देण्यात आला होता तरी केलेला खर्च (५६ टक्के) हा निधी वाटपा इतपत पोहचू शकला नव्हता. याशिवाय,२०१५-१६ मध्ये देण्यात आलेल्या रु.१.७९ कोटी निधी पैकी WCD ने नियमबाह्य पध्दतीने रु.१.०३ कोटी वाहनांच्या खरेदीसाठी वहती केले आणि उर्वरित रु.०.७६ कोटी परत करण्यात आले. अशा प्रकारे प्रकल्पांच्या M & R वर प्रतिकूल परिणाम झाला. लेखापरीक्षेस असे निदर्शनास आले की पूर्ण झालेल्या १८ पैकी (निवडलेल्या ६६ प्रकल्पांपैकी) सात प्रकल्पांत निर्माण केलेल्या सिंचन क्षमतेचा,प्रकल्प पूर्ण झाल्यापासून,योग्यप्रकारे उपयोग करण्यात आला नाही.

MWCC आणि VIIDP प्रकल्पांच्या देखभाल व दुरुस्ती संदर्भात, राज्य शासनाद्वारे MWCC च्या १२८ पूर्ण झालेल्या प्रकल्पांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी निधी देण्यात आला नव्हता आणि २०१२-१७ दरम्यान हाती घेतलेल्या ५९ प्रकल्पांपैकी सप्टेंबर २०१६ पर्यंत फक्त एक VIIDP प्रकल्प पूर्ण करण्यात आला होता आणि म्हणूनच,त्या प्रकल्पाला देखभाल व दुरुस्तीची गरज नव्हती. लेखापरीक्षणोत्तर बैठकीत सचिव, WCD यांनी सांगितले (नोव्हेंबर २०१६) की सिंचन प्रकल्पांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी काही विशिष्ट मापदंड विनिर्दिष्ट नाहीत. पूर्ण झालेल्या प्रकल्पांची देखभाल करण्याबाबत एकत्रीकृत प्रस्ताव शासनास नोव्हेंबर २०१६ मध्ये मंजुरीसाठी पाठविला आहे.

उत्तर समर्थनीय नाही कारण राज्य शासनाने आधीच (जुलै २००२ आणि ऑगस्ट २०१३ ) प्रति हेक्टर वापरण्यात येणा-या सिंचन क्षमतेनुसार SSI प्रकल्पांच्या देखभाल व दुरुस्ती साठी मापदंड विनिर्दिष्ट केले आहेत.

वरील बाब विचारात घेवुन महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ अधिनियमाच्या कलम २५ मध्ये सुधारणा करण्यात येवुन यापुर्वी ५ वर्षात रू. २००० कोटी इतका निधी शासनाकडुन महामंडळास उपलब्ध करून देण्यात येईल, या तरतुदीमध्ये बदल करण्यात येवुन २५ वर्षात रू. १०,००० कोटी इतका निधी शासनाकडुन उपलब्ध करून देण्यात येईल अशी सुधारणा करण्यात आलेली आहे.

तसेच प्रकल्पाच्या देखभाल व दुरूस्तीकरीता आवश्यक निधीची माहिती संकलीत करून प्रस्तावावर स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात येत आहे.

**परिच्छेद क्र.२.१.७.५**

**सेन्टेज शुल्काची (Centage Charges) वसुली न करणे**

महाराष्ट्र लघु सिंचन नियमपुस्तिका,१९८३ नुसार राज्य शासनाने वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेल्या दराप्रमाणे कार्यान्वयन संस्थानी (WCD चे विभाग) त्यांच्या वतीने करण्यात आलेल्या कामासाठी सेन्टेज शुल्काची वसुली इतर संस्थाकडून ( महामंडळ,स्वायत्त संस्था,खाजगी संस्था इत्यादि) करावयास पाहिजे आणि ती रक्कम शासन खाती जमा करावयास पाहिजे.

MWCC च्या दस्तावेजांच्या पडताळणीत असे आढळले की २०११-१६ दरम्यान WCD द्वारे निष्पादित करण्यात येणा-या MWCC च्या ४४४ SSI प्रकल्पांपैकी २३४ प्रकल्पांवर MWCC ने रु. ५७१.०४ कोटी खर्च केले. परंतु, WCD ने MWCC कडून रु.५७.१० कोटी रक्कमेच्या सेन्टेज शुल्काची वसुली केली नाही, जेव्हा की WCD ने यासाठी अंदाजपत्रकात तरतूद केली होती आणि ते MWCC तेच मंजूर केले होते. सचिव WCD यांनी नमूद केले की MWCC व CE चे उत्तर समर्थनीय नाही कारण जर सेन्टंज शुल्क देय नव्हते तर MWCC ने त्याची प्रकल्प अंदाजपत्रकांतील तरतूद सुरुवातीलाच मान्य करावयाची नव्हती.

**शिफारस २ : लघु सिंचन प्रकल्पांचे सिंचन क्षमता निर्मिती आणि वापरात असलेले महत्व लक्षात घेता राज्य शासनाने लघु सिंचन प्रकल्पांच्या निष्पादन आणि देखभालीसाठी पुरविलेला निधी त्या प्रकल्पांसाठी पुरेसा आणि समयोचित आहे व त्याचा वापर प्रभावीपणे कार्यक्षमतापूर्वक करण्यात येत आहे याबाबत खात्री करावयास पाहिजे.**

**ज्ञापन :-**

**महालेखाकारांनी दिलेल्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.**

पूर्ण झालेल्या योजनांसाठी च्या देखभाल व दुरुस्ती साठी कमी प्रमाणात निधी उपलब्ध होतो. त्यामुळे प्रति वर्षी देखभाल व दुरुस्तीची सर्व कामे हाती घेणे शक्य होत नाही. योजनांच्या विशेष दुरुस्तीच्या अनुषंगाने निधी पुरविणे बाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

सन २०१५-१६ मध्ये देखभाल व दुरुस्ती साठी उपलब्ध झालेल्या निधीतुन पुर्नविनीयोजनाद्वारे निधी वाहन खरेदी करण्याकरीता कार्यालयीन खर्चाच्या लेखाशिर्षामध्ये वर्ग करण्यात आलेला आहे. सदर कार्यवाही ही नियमानुसार झालेली आहे.महाराष्ट्र जलसंधारण महामंडळामार्फत योजनांच्या दुरूस्तीकरीता निधी अनुज्ञेय नाही.

निधी उपलब्धतेनुसार दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आले आहेत.

परिच्छेदात नमुद केलेल्या ७ योजनांपैकी महेबुबखेडा को.प.बंधारा, दहिंद्री लपा योजना व कु-हा को.प. बंधारा या ३ योजनांची देखभाल दुरूस्ती करण्यात आलेली असुन निर्माण केलेल्या सिंचन क्षमतेचा योग्य प्रकारे उपयोग करण्यात आलेला आहे.

**ज्ञापन :-**

**महालेखाकारांनी दिलेल्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.**

महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ ही महाराष्ट्र शासनाचीच यंत्रणा आहे व या महामंडळात जलसंधारण विभागातील अभियंता व कर्मचा-यांची सेवा घेतली जाते. व त्यांच्या मार्फतच महामंडळाचे कामकाज पाहिलेजाते. त्यामुळे महामंडळास स्वतंत्र निधीची आवश्यकता नसते. त्यामुळे त्यांच्या मार्फत सेन्टेज शुल्काची वसुली केली जात नाही.

शासन निर्णय क्रमांक सं-१००८/(३४/२००८)लपा-१ मंत्रालय, मुंबई दिनांक २०.०८.२००८ नुसार लघुपाट बंधारे योजनांच्या अंदाजपत्रकात भूसंपादन रक्कम वगळून कामाच्या एकूण किंमतीत १०% अनुषंगिक खर्चाची तरतूद करण्यात येते. यामध्ये सेन्टेज शुल्काचा अंतर्भाव नाही.

लघु सिंचन प्रकल्पाच्या निष्पादन आणि देखभालीसाठी निधी पुरविण्याच्या कार्यपध्दतीमध्ये आवश्यक तो बदल करण्यात येईल. तसेच पुरविण्यात आलेल्या निधीचा वापर प्रभावीपणे व कार्यक्षमतापुर्वक करण्यात येत असल्याबाबत खात्री करण्यात येईल.

**परिच्छेद क्र.२.१.८**

**प्रकल्पांचे निष्पादन**

निवडलेल्या ६६ SSI प्रकल्पांची सप्टेंबर २०१६ पर्यंतची स्थिती खाली तक्ता २.१.३ मध्ये संक्षेपात दिली आहे.

तक्ता २.१.३ निवडलेल्या ६६ SSI प्रकल्पांची स्थिती

| संस्थेचे नांव | निवडलेल्या प्रकल्पांची संख्या | मूळ मंजूर किंमत (रु कोटीत) | मार्च २०१६ पर्यंत पर्यंत झालेला खर्च (रु कोटीत) | निवडलेल्या प्रकल्पांची स्थिती | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सुरु असलेले | पूर्ण झालेले | रद्द झालेले प्रकल्पांची संख्या | सुरु न झालेल्या |
| WCD | १९ | ३५.१९ | १०२.२४ | १० | ०८ | ०० | ०१ |
| MWCC | ४४ | १६६.५२ | २५३.७९ | २९ | १० | ०२ | ०३ |
| VIIDP | ०३ | ११.०२ | १.५२ | ०२ | ०० | ०० | ०१ |
| एकूण | ६६ | २१२.७३ | ३५७.५५ | ४१ | १८ | ०२ | ०५ |

**स्त्रोत :** WCD, MWCC आणि VIIDP द्वारे सादर केलेली माहिती.

SSI पुणे आणि त्यांच्या अखत्यारीतील सर्व कार्यालये, ही WCD च्या प्रशासकीय नियंत्रणाखाली आहेत आणि म्हणून MWCC त्याद्वारे सेन्टंज शुल्क देय नाही.

तक्ता २.१.३ वरुन असे निदर्शनास येते की मार्च २०१६ पर्यंत WCD/MWCC/VIIDP द्वारे करण्यात आलेला खर्च मंजूर रक्कमेपेक्षा रु. १४४.८२ कोटी (६८ टक्के) ने जास्त आहे. तसेच MWCC अंतर्गत असलेले दोन प्रकल्प निधीच्या कमतरतेमुळे

रद्द करण्यात आले आणि पाच प्रकल्प (WCD आणि VIIDP अंतर्गत प्रत्येकी एक आणि MWCC अंतर्गत तीन) जमीन संपादित न करणे प्रकल्पामुळे बाधित व्यक्तीकडून प्रतिकार आणि निविदांना अंतिम स्वरुप न देणे इत्यादि कारणांमुळे सप्टेंबर २०१६ पर्यंत सुरु करण्यात येऊ शकले नाही. प्रासंगिकपणे, पाच पैकी एका सुरु न झालेल्या प्रकल्पांकरिता अमरावती विभागाने भूसंपादन अधिका-याकडे रु. १.२९ कोटी रक्कम जमा केली ( ऑक्टोबर २०१२) जी सप्टेंबर २०१६ पर्यंत वायफळ पडून आहे.

**ज्ञापन :-**

**महालेखाकारांनी दिलेल्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.**

(१) MWCC अंतर्गत असलेले अंजनडोन साठवण तलाव, जि. औरंगाबाद व देवके ल. पा. तलाव, जि. रत्नागिरी हे प्रकल्प निधीच्या कमतरतेमुळे रद्द करण्यात आले व डोणवडा साठवण तलाव, जि. औरंगाबाद हा प्रकल्प शेतक-याचा विरोध असल्यामुळे सुरू झाला नाही.

(२) WCD अंतर्गत जांबतांडा साठवण तलाव, जि. जालना हा प्रकल्प लेखा परिक्षणाच्या वेळेस जमिन संपादित न करणे व प्रकल्पबाधित व्यक्तीकडुन प्रतिकार यामुळे सुरू झालेला नव्हता. सद्यस्थितीत विरोध मावळला असुन काम सुरू आहे.

(३) अमरावती विभागातील भानखेडा साठवण तलावास प्रशासकीय मान्यता रू. ६०२.८८ लक्ष दि. २९/०३/२०१२ नुसार प्राप्त आहे. प्रकल्पाच्या भुसंपादनाकरीता आगाऊ रक्कम रू. ११९.०० लक्ष भुसंपादन अधिका-याकडे जमा करण्यात आलेली आहे. सदर प्रकल्पास शेतक-यांनी विरोध दर्शविल्यामुळे प्रकल्प रद्द करण्याची कार्यवाही सुरू आहे. भूसंपादन अधिका-याकडे जमा असलेली रक्कम परत घेवुन इतर प्रकल्पांकरीता वापरण्याचे प्रस्तावित आहे.

**परिच्छेद क्र. २.१.८.१**

**वेळेत झालेली वाढ**

राज्याच्या ग्रामीण विकास आणि जल संधारण विभागाद्वारे वेळोवेळी प्रसिध्द करण्यात आलेल्या माहिती पुस्तिके प्रमाणे,ठराविक SSI प्रकल्प, बांधण्यात येणा-या सिंचन संरचनेच्या प्रकारानुसार सहा महिने ते तीन वर्षाच्या कालावधीत पूर्ण करावयास पाहिजे.

निवडलेल्या ६६ प्रकल्पांच्या अभिलेख्यांच्या पडताळणीत असे निदर्शनास आले की WCD अंतर्गत असलेले १९ पैकी १६ प्रकल्पांना भूसंपादन न करणे,संकल्पचित्र /कामाच्या व्याप्तितील बदल,निधीची कमतरता, वनजमीनीच्या मंजुरी बाबत विलंब इत्यादि कारणांमुळे १९ वर्षापर्यंत (सप्टेंबर २०१६) विलंब झाला. तसेच , MWCC अंतर्गत असलेले ४४ पैकी ३५ प्रकल्पांना आणि VIIDP अंतर्गत असलेले तीन पैकी एका प्रकल्पाला क्रमशः १८ वर्षापर्यंत आणि एक वर्षापर्यंत इतका विलंब झाला. विलंबाची कारणे खालील तक्ता २.१.४ मध्ये संक्षेपात दिली आहेत.

**तक्ता २.१.४ : निवडलेल्या प्रकल्पांमधील किंमतीत झालेली वाढ**

| संस्थेचे नांव | निवडलेल्या | विलंबाची कारणे | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | जमीन संपादित न करणे | | संकल्पचित्र/कामाच व्याप्तीत बदल | | निधीची कमतरता | | वनजमीनीची मंजुरी | |
| | प्रकल्पाची संख्या | प्रकल्पाची संख्या | विलंब कालावधी वर्षे | प्रकल्पाची संख्या | विलंब कालावधी | प्रकल्पाची संख्या | विलंब कालावधी वर्षे | प्रकल्पाची संख्या | विलंब कालावधी वर्षे |
| WCD | १९ | ०८ | ०४ ते १९ | ०७ | ०४ ते १९ | १२ | ०१ ते १९ | ०१ | ०७ |
| MWCC | ४४ | २५ | ०२ ते १८ | २२ | ०१ ते १८ | २२ | ०१ ते १८ | ०३ | ०४ ते १८ |
| VIIDP | ०३ | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| एकुण | ६६ | ३४ | | २९ | | ३४ | | ०४ | |

स्त्रोत : WCD,MWCC आणि VIIDP द्वारे सादर केलेली माहिती.

लेखा परीक्षणोत्तर बैठकीत सचिव, WCD यांनी वस्तुस्थिती मान्य केली (नोव्हेंबर २०१६)

**महालेखाकारांनी दिलेल्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.**

कामांची निविदा तयार करतांना, कामाच्या किंमती नुसार व व्याप्ती नुसार प्रकल्पांच्या कामाचा कालावधी ६ महिने ते ५ वर्षापर्यंत निश्चित करण्यात येतो व त्याप्रमाणे कार्यारंभ आदेश देण्यात येतात.

शेतक-यांचा भूसंपादनास विरोध, प्रलंबित न्यायालयीन प्रकरण, संकल्प चित्र वेळेत उपलब्ध न होणे, वन जमीनीचे हस्तांतरण, निधीची कमतरता यामुळे काही प्रकरणांत विहित कालावधीत प्रकल्प पूर्ण होत नाहीत.

**परिच्छेद क्र.२.१.८.२**

**किंमतीत झालेली वाढ**

अभिलेख्यांच्या पडताळणीत असे निदर्शनास आले की खालील तक्ता २.१.५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे मुख्यत्वे भूसंपादनातील विलंब,आराखडा/कामाच्या व्याप्तितील बदल, निधीची कमतरता इत्यादिंमुळे मार्च २०१६ पर्यंत निवडलेल्या ६६ प्रकल्पांपैकी ४४ प्रकल्पांच्या मूळ मंजूर किंमतीच्या वर रु.२०८.४६ कोटीने (१९७ टक्के) किंमतवाढ झाली.

**तक्ता २.१.५ : निवडलेल्या प्रकल्पांमधील किंमतीत झालेली वाढ**

| संस्थेचे नांव | निवडलेल्या प्रकल्पांची संख्या | किंमतवाढ झालेल्या प्रकल्पांची संख्या | निवडलेल्या प्रकल्पांमध्ये किंमत वाढीचे प्रमाण | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मूळ मंजूर किंमत | सुधारित किंमत | मार्च २०१६ पर्यंत पर्यंत झालेला खर्च | मूळ मंजूर किंमतीच्या संदर्भात किमान वाढ (टक्क्यांमध्ये) |
| WCD | १९ | १७ | २९.९९ | १०३.१९ | १०२.०० | ७२.०१ (२४%) |
| MWCC | ४४ | २७ | ७५.९१ | २४१.२४ | २१२.३६ | १३६.४५ (१८०%) |
| VIIDP | ०३ | ०० | ०० | ०० | ०० | ०० (०%) |
| एकूण | ६६ | ४४ | १०५.९० | ३४४.४३ | ३१४.३६ | २०८.४६ (१९७%) |

**स्त्रोत : WCD, MWCC आणि VIIDP द्वारे सादर केलेली माहिती.**

**लेखापरीक्षणोत्तर बैठकीत सचिव, WCD यांनी वस्तुस्थिती मान्य केली (नोव्हें.)**

**ज्ञापन :-**

**महालेखाकारांनी दिलेल्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.**

प्रकल्पाच्या भूसंपादनातील विलंब, भूसंपादनाच्या दरा मध्ये होणारी वाढ, गौणखनिज शुल्कामध्ये वेळोवेळी झालेली वाढ, कामाच्या व्याप्तीतील बदल व निधीच्या कमतरतेमुळे प्रकल्पांच्या पूर्ण करण्याच्या कालावधी मध्ये वाढ होत आहे. त्या अनुषंगाने भाववाढ निर्देशांक वाढल्यामुळे प्रकल्पांचे किंमतीत वाढ होत आहे. तसेच स्थानिक विरोध, न्यायालयीन प्रकरणे इत्यादि मुळेही प्रकल्प पूर्णत्वास विलंब होतो.

**परिच्छेद क्र.२.१.८.३**

**प्रकल्पांचे अपूर्ण/निकृष्ट निष्पादन**

महाराष्ट्र लघु सिंचन नियमपुस्तिका,१९८३ नुसार लाभ क्षेत्राच्या ३३ टक्के भाग व्यापणा-या कालव्यांचे आणि वितरिकांचे काम, काट जलनिःसारणाच्या कामासहित,सर्व बाबतीत पूर्ण झाल्यावरच लघू सिंचन तलावाच्या गाभा भरावयाचे काम सुरु करावयास पाहिजे.तसेच, निविदा शर्तीनूसार बांधकामाकरिता वापरण्यात येणा-या साहित्याची गुणवत्ता कंत्राटाद्वारे शासन मान्य प्रयोगशाळेतून तपासावयाची होती आणि शासकीय प्रयोगशाळेद्वारे निर्गमित करण्यात आलेले गुणवत्ता प्रमाणपत्र कंत्राटदाराच्या चालू लेखा देयकांसोबत जोडावयाचे होते.

अभिलेख्यांची पडताळणी आणि निवडलेल्या ६६ पैकी ४७ प्रकल्पांच्या स्थळांच्या संयुक्त प्रत्यक्ष पाहणीत अपूर्ण प्रकल्प आणि कमकुवत कारागिरीची प्रकरणे निदर्शनास आली,ज्यावरुन निकृष्ट प्रतीचे काम झाल्याचे दिसून आले. निवडलेल्या ६६ पैकी ६५ प्रकल्पांमध्ये (औरंगाबाद येथील सिरसगावच्या कोल्हापूर पध्दती बंधा-या व्यतिरिक्त) कंत्राटदाराने वापरलेले साहित्य योग्य गुणवत्तेचे होते याबाबतची तपासणी लेखापरीक्षा करु शकली नाही. काही लक्ष वेधून घेणारी प्रकरणे खाली चर्चिली आहेत.

**ज्ञापन :-**

**महालेखाकारांनी दिलेल्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.**

M.I. Manual १९८३ नुसार लघु पाटबंधारे योजनेच्या लाभक्षेत्राच्या ३३% भाग व्यापणा-या कालव्यांचे व वितरीकांचे काम पूर्ण झाल्यावरच घळभरणीचे काम करावे अशा मार्गदर्शक सूचना आहेत.

कालव्याचे व वितरीकाचे भूसंपादनास होणारा अडथळा, तसेच अवर्षणप्रवण क्षेत्रातील लोकप्रतिनिधींची धरणात पिण्यासाठी/जनावरांसाठी पाणी साठा करावाया बाबतची मागणी, पावसाची अनियमितता यामुळेकाही वेळा कालव्याचे व वितरीकाचे काम करण्यापूर्वी घळभरणीचे काम करुन घेणेत येते.

निविदा शर्तीनुसार साहित्याचे गुणवत्ता प्रमाणपत्र देयकासोबत जोडणे अनिवार्य आहे. गुणवत्ता प्रमाणपत्र सोबत न जोडल्यास, ठेकेदाराचे चालू देयकातून ठरावीक रक्कम वजावट करुन ठेवण्यात येते. ज्यावेळी गुणवत्ता प्रमाणपत्र सादर करण्यात येते त्यानंतर सदर वजा करुन ठेवलेली रक्कम ठेकेदारास मुक्त (Release) करण्यात येते.

**गणेशपूर वाढोणा लघु सिंचन तलाव प्रकल्प**

अमरावती जिल्ह्यातील गणेशपूर वाढोणा लघु सिंचन तलाव प्रकल्पाच्या (MWCC अंतर्गत) धरणाचे काम रू ४.६० कोटी किंमतीत सप्टेंबर २०१० पर्यंत पूर्ण करावयाचे होते. धरणाचे काम जून २०१२ मध्ये पूर्ण झाले. अपेक्षित पाणीसाठा जून २०१३ मध्ये झाला. मार्च २०१६ पर्यंत धरणाच्या कामावर रु ८.६८ कोटी खर्च करण्यात आला. तथापि,जमीन (९.४६ हेक्टर) संपादित न केल्यामुळे सप्टेंबर २०१६ पर्यंत कालव्याचे काम (३.९ कि.मी) सुरु करता आले नाही.

अभिलेख्यांच्या पडताळणीत असे निदर्शनास आले की कंत्राटदाराने माती धरणावर दगडी अस्तरीकरणाचे काम (६,४४१.४७ घनमी अंदाजित परिमाणाच्या ऐवजी २,४०९.०६ घनमी) अंशतः निष्पादित केले. धरण पूर्ण झाल्यापासून म्हणजेच जून २०१२ पासून धरणामध्ये पाणीसाठा निरंतर असल्यामूळे उर्वरित परिमाण (४,०३२.४१ घनमी ) कंत्राटद्वारे निष्पादित करण्यात आले नाही. परिणामी,धरण मातीकामाचे निघर्षण झाले. जर WCD ने धरणामध्ये पाणी साठविण्यापूर्वी (कोरड्या स्थितीत) दगडी अस्तरीकरणाचे काम पूर्ण झाल्याची खात्री केली असती आणि धरणाच्या कामासोबतच कालव्याचे काम सुध्दा बहाल केले असते तर प्रकल्प वेळेवर पूर्ण झाला असता आणि १९० हेक्टर सिंचन क्षमतेचे लक्ष्य प्रस्थापित झाले असते. सचिव, WCD यांनी नमूद केले की दगडी अस्तरीकरणाचे उर्वरित काम आता पूर्ण झाले आहे. तथापि, सचिवांनी कालव्याच्या कामाच्या स्थितीबाबत कोणतेही उत्तर दिले नाही.

**ज्ञापन :-**

**महालेखाकारांनी दिलेल्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.**

गणेशपूर वाढोणा लपा प्रकल्पास रु. १२२३.७४ लक्ष करीता सुप्रमा दि. २८/०३/२०१३ नुसार प्राप्त आहे. या प्रकल्पाची घळभरणी जुन, २०१२ मध्ये झाली. पावसाळा लवकर सुरू झाल्यामुळे पिंचीगचे काम सोबत करता आलेले नव्हते. तथापि

धरणातील पाणीसाठा कमी झाल्यानंतर २०१६ मध्ये पिंचीगचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे. या प्रकल्पाच्या कालव्याचे भूसंपादनास शेतक-यांचा विरोध असल्याने बंद पाईपलाईनचा प्रस्ताव तयार करण्यात येत आहे. सन २०१५-१६ व सन २०१६-१७ मध्ये धरणाच्या उपलब्ध साठ्यातून उपसा सिंचनाद्वारे अनुक्रमे १४७ व १५० हे. सिंचन झालेले आहे.

**शिरवळ लघु सिंचन तलाव प्रकल्प**

१४५ हेक्टर शेत जमीन ओलिताखाली आणण्यासाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शिरवळ लघु सिंचन तलाव प्रकल्पाचे (WCD अंतर्गत ) काम कालव्यांसमवेत रु ३.३२ कोटी किंमतीवर मंजूर करण्यात आले (मार्च १९९७).धरणाचे काम सप्टेंबर २००० पर्यंत पूर्ण करण्याकरिता रु २.१६ कोटी किंमतीत बहाल करण्यात आले (सप्टेंबर १९९८). तथापि, जमीन मालकांचा विरोध,निधीची कमतरता इत्यादी कारणांमुळे धरणाचे काम जून २०१२ मध्ये (अंशतः दगडी अस्तरीकरण कामासोबत ) पूर्ण करण्यात आले. प्रकल्पाची किंमत रू १४.८३ कोटी सुधारित करण्यात आली (मार्च २०१५) आणि सप्टेंबर २०१६ पर्यंत रु ११.६४ कोटी खर्च करण्यात आले. खाजगी जमीन ( २० हेक्टर ) संपादित न झाल्यामुळे सप्टेंबर २०१६ पर्यंत कालव्याचे काम सुरु करण्यात आले नव्हते.

कालव्याचे बांधकाम न केल्यामुळे आणि दगडी अस्तरीकरणाच्या अपूर्ण कामामूळे जून २०१२ मध्ये पूर्ण झालेल्या धरणाचा कोणताही प्रभावी उपयोग करता आला नाही, परिणामी १४५ हेक्टर सिंचन क्षमतेचे लक्ष्य साध्य झाले नाही आणि प्रकल्पाच्या एकंदरीत दिर्घायुषीपणा आदि उपयोगिता यावर प्रतिकूल परिणाम झाला.

सचिव, WCD यांनी नमूद केले की दगडी अस्तरीकरणाचे उर्वरित काम आता पूर्ण झाले आहे. तथापि, सचिवांनी कालव्याच्या कामाच्या स्थितीबाबत कोणतेही उत्तर दिले नाही.

**ज्ञापन :-**

**महालेखाकारांनी दिलेल्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.**

शिरवळ लपा योजनेत घळभरणी झाली असून पाणीसाठा निर्माण झालेला आहे. शासनाच्या प्रचलित धोरणानुसार कालव्याऐवजी बदीस्त पाईपलाईनद्वारे सिंचनाचे नियोजन आहे.

**देवळे लघु सिंचन तलाव प्रकल्प**

रायगड जिल्ह्यातील देवळे लघु सिंचन तलाव आणि कालव्याचे काम ( WCD अंतर्गत ) जानेवारी १९९७ मध्ये रु १.१५ कोटी किंमतीत बहाल करण्यात आले, जे जानेवारी १९९९ पर्यंत पूर्ण करावयाचे होते. तथापि, मे २००३ पर्यंत कंत्राटदाराने रु ४.३५ कोटी किंमतीत फक्त धरणाचे काम पूर्ण केले, जे पहिल्याच पाणी साठवणीत मोठ्या प्रमाणात गळतांना आढळले. परिणामी, प्रत्येक वर्षी मार्च महिन्याच्या शेवटीच धरण कोरडे होत होते. तथापि, विभागाने कंत्राट कलमानुसार क्षति पोचलेल्या कामास कंत्राटदाराकडून त्याच्या स्वखर्चाने सुधारण्याऐवजी धरणातील गळती थांबविण्यासाठी रु. १.३३ कोटीचे नवीन अंदाजपत्रक प्रस्तावित केले ( डिसेंबर २००७ ) जे MWCC ने मंजूर केले नाही. (सप्टेंबर २०१६). खाजगी जमीन (३.७८ हेक्टर) संपादित न केल्यामुळे कालव्याचे काम सुरु करण्यात आले नाही (सप्टेंबर २०१६). अशाप्रकारे, धरणाच्या कामावर रु ४.३५ कोटी खर्च करुनही हा प्रकल्प लाभार्थ्यांकरिता १०१ हेक्टर उदिष्टीत सिंचन क्षमता निर्माण करू शकला नाही.

सचिव, WCD यांनी नमूद केले की दुरुस्ती किंमत वसूल करण्याकरिता कंत्राटदाराविरुध्द दंडनीय कारवाई करण्यात येत आहे आणि नियोजित लाभ संपादित करण्याकरिता काम लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल.ही वस्तुस्थिती कायम आहे की जो प्रकल्प जानेवारी १९९९ पर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष्य होते तो प्रकल्प १८ वर्षानंतरही पूर्ण होऊ शकला नाही. निकृष्ट कामासाठी कंत्राटदाराविरुध्द दंडात्मक कारवाई सुध्दा कंत्राटदाराने काम थांबवल्याच्या (मे २००३) १० वर्षानंतर सुरु करण्यात आली (एप्रिल २०१३).

**ज्ञापन :-**

**महालेखाकारांनी दिलेल्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.**

देवळे लघु पाटबंधारे योजना ता. पोलादपूर जि.रायगड या योजनाच्या धरणाचे काम मे-२००३ मध्ये पूर्ण करण्यांत आले होते. सन-२००३ च्या पावसाळी हंगामामध्ये धरणामध्ये पूर्ण संचय पातळीपर्यत पाणीसाठा करण्यात आला होता. परंतु पूर्ण संचय पातळीला सांडवा व मातीधरण यांना जोडणा-या भागातून पाण्याची गळती निदर्शनास आली. त्यानंतर सदर गळतीबाबत अधीक्षक अभियंता, धरण सुरक्षितता संघटना, नाशिक यांचा अहवाल घेण्यांत आला. सदर अहवालाच्या अनुषंगाने गळती प्रतिबंधक उपाय योजनेचे अंदाजपत्रक विभागाच्या वतीने सादर करण्यांत आले. या अंदाजपत्रकात मुख्य अंभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) पुणे यांचेमार्फत सदर दुरुस्तीचा खर्च कंत्राटदाराकडून वसूल करण्याच्या अटीचे अधीन राहून सर्वसाधारण मान्यता घेण्यांत आली. त्या संदर्भात सदर रक्कम कंत्राटदाराकडून वसूल करण्यासाठी या विभागामार्फत जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखाली कंत्राटदाराची सुरक्षा अनामत आहे किंवा नाही याबाबत जलसंपदा विभागाशी पत्रव्यवहार करण्यांत आलेला आहे. तसेच संबंधित अधिका-यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेल्या आहेत. सदर धरणाच्या दुरुस्तीचे कामापोटी आवश्यक रक्कम विशेष दुरुस्तीसाठी शासनाकडून प्राप्त करुन सदर दुरस्तीचे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे. व यानंतर शासनाच्या नवीन धोरणाप्रमाणे बंदनलिकेद्वारे सिंचनक्षेत्र निर्माण करण्यांत येईल.

**लावारी लघु सिंचन तलाव प्रकल्प**

चंद्रपूर जिल्ह्यातील लावारी लघु सिंचन तलाव प्रकल्प आणि कालव्याचे काम ( MWCC अंतर्गत) रु. १.४७ कोटी किंमतीत मार्च २००० मध्ये बहाल करण्यात आले, जे सप्टेंबर २००१ पर्यंत पूर्ण करावयाचे होते. स्थानिक लोकांच्या विरोधामुळे धरण बांधकामाला खूप विलंब झाला आणि ऑगस्ट २००८ पर्यंत हे काम अंशतः पूर्ण झाले (७५ टक्के) तथापि, सांडव्यातील गळती, निकृष्ट प्रतीचे दगडी अस्तरीकरणाचे काम आणि मार्गदर्शक बांधांना झालेल्या नुकसानामुळे धरणामध्ये पाणी साठू शकले नाही. जून २००८ पर्यंत कालव्याचे काम अंशतः पूर्ण झाले ( ३० टक्के ) आणि त्यानंतर कालव्याकरिता उर्वरित जमीन ( ३.९२) हेक्टर संपादित न झाल्यामुळे काम बंद करण्यात आले. प्रकल्पापासून अभिप्रेत असलेली १४४ हेक्टर उदिष्टीत सिंचित क्षमता निर्मित न झाल्यामुळे प्रकल्पावर मार्च २०१२ पर्यंत करण्यात आलेला रु. ३.०१ कोटींचा खर्च मोठ्या प्रमाणात निष्फळ ठरला.

लेखा परीक्षेद्वारे प्रकल्प स्थानकाच्या संयुक्त प्रत्यक्ष पाहणीत, खालील छायाचित्रात दर्शविल्याप्रमाणे तुटलेला सांडवा आणि कालव्याच्या सुरुवातीस गवत व तण यांची अतिरिक्त वाढ दिसून आली.

सचिव, WCD यांनी वस्तुस्थिती मान्य केली आणि नमूद केले की सांडव्याची दुरुस्ती, मुख्य विमोचक आणि मातीकाम यांची अंदाजपत्रके तयार करुन मंजुरीसाठी वरीष्ठ अधिका-यांकडे सादर केली आहेत.

**ज्ञापन :-**

**महालेखाकारांनी दिलेल्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.**

लावारी ल.पा.तलावाला २२/९/१९९९ रोजी रु.१९०.४० लक्ष प्र.मा. प्राप्त झाली. त्यानुसार सदर प्रकल्पाच्या मुख्य कामाला तांत्रिक मान्यता प्राप्त करुन ब-१ निविदा द्वारे बी-१/४९/डीएल/१९९९-२००० अन्वये मे.महेन्द्र कन्स्ट्रक्शन अमरावती यांना काम सोपविण्यात आले. त्यानुसार मार्च २००७ पर्यंत या योजनेवर रु.१५६.७१ लक्ष खर्च करण्यात आले.तसेच सांडवा व विमोचकाचे बांधकाम पुर्वीचे संकल्पनेनुसार दगडी बांधकामात मंजूर होते व त्याप्रमाणे बांधकाम करण्यात आले. सदर बांधकामाची घळभरणी झाले नंतर सांडवा व विमोचकामधुन मोठ्या प्रमाणावर गळती होत असल्याचे आढळुन आले. याबाबत कंत्राटदाराला दंडात्मक

कारवाई का करण्यात येवू नये याबाबत नोटीस बजाविण्यात आली आहे. तसेच तत्कालीन जबाबदार अधिकरी यांना कारणे दाखवा नोटीस बजविण्यात आलेली आहे.

स्थानिक लोक कालव्याचे कामाकरीता जमीन देण्यास विरोध दर्शवित होते. परंतू आपसी वाटाघाटी अंती जमीन अधिगृहीत करुन कालव्याचे ७५ टक्के काम सुरू करण्यात आले, परंतू उजवा कालवा सा.क्र. २७० मी. ते ५७० मी. पर्यंत जमीन प्राप्त न झाल्यामुळे काम प्रलंबित राहीले.

वरील कारणमीमांसेनुसार सदर प्रकल्पातून उद्दीष्ट सिंचन क्षमता साध्य करता आले नाही. आता सांडवा व विमोचकाचे दुरूस्ती कामाचे अंदाजपत्रकास मंजूरी घेऊन विशेष दुरूस्ती साठी शासनाकडुन निधी प्राप्त करुन घेण्याचे प्रस्तावित आहे. त्याप्रमाणे कालव्याचे उर्वरीत भागाचे भूसंपादनाचा विरोध मावळल्यामुळे उर्वरीत भुसंपादन प्रक्रीया पूर्ण करुन उर्वरीत कामाचे अंदाजपत्रकास मंजूरी प्राप्त होताच काम पूर्णत्वास नेण्यात येईल.

**परिच्छेद क्र.२.१.८.४**

**शासकीय निर्देश आणि कंत्राट अटींचे अनुपालन न करणे**

अभिलेख्यांच्या पडताळणीत खालील प्रकरणे जसे नियम पुस्तिका प्रावधान, कंत्राट अटी आणि वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय/परिपत्रके इत्यादींचे अनुपालन न करणे, निर्दशनास आली.

**प्रकल्प संपत्तीकरिता विमा क्षतितारण न घेणे.**

ऑगस्ट १९९८ चा शासन निर्णय आणि विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य द्वारे निर्गमित (एप्रिल २००५ ) निर्देशांनुसार कंत्राटदारांनी सक्तीने फक्त विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कडून एकुण कंत्राट मूल्य आणि संपूर्ण कंत्राट कालावधीकरिता, दिलेल्या कंत्राट कामांच्या निष्पादनासाठी पुरेशी विमा क्षतितारण क्षमता पुरविण्याकरिता, आवश्यक विमा पॉलिसी काढायला पाहिजे. ज्या प्रकरणात कंत्राटदार पॉलिसी काढणार नाही अशा प्रकरणांत त्यांच्या कडून (विम्याची रक्कम म्हणून ) कंत्राट किंमतीच्या एक टक्का इतकी रक्कम वसूल करून विमा संचालनालयाकडे पाठविली पाहिजे. निवडलेल्या ६६ पैकी १२ प्रकरणांमध्ये कंत्राटदाराने कोणतीही विमा पॉलीसी काढली नाही तसेच संबंधित विभागाने सुध्दा कंत्राट किंमतीच्या (रु. ६५ लक्ष ) एक टक्का इतकी रक्कम कंत्राटदाराला देय असलेल्या देयकामधून वसूल केली नाही.

सचिव, WCD यांनी नमूद केले की १२ पैकी सात प्रकल्पांमध्ये विमा पॉलिसी आता काढण्यात आल्या आणि उरलेल्या पाच प्रकल्पांमध्ये एक टक्का रक्कम वसूल करण्यात आली असून ती विमा संचालनालयाकडे जमा करण्यात आली.

**ज्ञापन :-**

**महालेखाकारांनी दिलेल्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.**

कोल्हापुर पध्दती बंधा-याच्या कामाकरीता कंत्राटदाराकडून खालीलप्रमाणे विमा पॉलीसीकरीता १% रक्कम कंत्राटदाराकडून देयकातून वसूल करण्यात आलेली आहे.

१. सिरसगांव को.प.बंधारा, ता.गंगापुर - रु.४१४१३३/-

२. भालगांव को.प.बंधारा, ता.गंगापुर - विमा पॉलिसी काढण्यात आलेली आहे.

३. नाचनवेल को.प.बंधारा, ता.कन्नड - रु.१५७७८१/-

४. पिरगैबवाडी साठवण तलाव. ऑगस्ट १९९८चा शासन निर्णय आणि विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य द्वारे निर्गमित (एप्रिल २००५) नुसार विमा पॉलिसी विषयी निर्देश प्राप्त झालेले होते. परंतू सदरील निर्देश प्रारुप निविदा तयार करताना त्यामध्ये समाविष्ट केले गेले नाहीत, त्यामुळे एक टक्का रक्कम कंत्राटदाराच्या देयकामधून वसूल करण्यात आलेली नाही.

सदरील काम हे काम मार्च २०१२ मध्ये पूर्ण झालेले असल्यामुळे संबंधित कंत्राटदाराच्या या विभागातंर्गत प्रगतीपथावर असलेल्या दुस-या योजनेच्या कामाच्या देयकातून एक टक्का विमा रक्कम रु. १,२२,३११/- दि. १६/११/२०१६ रोजी वसूल करण्यात आलेली आहे.

५. आरडा तोलाजीद साठवण तलाव संबंधित कामाच्या कंत्राटदाराने विमा पॉलिसी काढलेली असल्यामुळे, एक टक्का रक्कम कंत्राटदाराच्या देयकातून कपात केलेली नाही. विमा पॉलिसीची छायांकित प्रत यासोबत जोडण्यात येत आहे.

६. ऐनारी - विमा पॉलिसी उपलब्ध आहे.

७. पावनल - १ टक्का विमा रक्कम वजा करण्यात आली आहे.

८. करुळ - विमा पॉलिसी उपलब्ध आहे.

९. जामगे विसापूर -उपरोक्त performance audit झाल्यानंतर सदर योजनेचे देयक अदा करण्यात आलेले नाही. तथापि कंत्राटदाराच्या होणा-या देयकामधून १ टक्के विमा रक्कम वसूल करण्यात येईल.

१०. कुरंग -विमा पॉलिसी उपलब्ध आहे.

११. गणेशपूर वाढोणा- सदर योजनेच्या निविदा करारनाम्यामध्ये बांधकाम पूर्ण करण्याचा कालवधी २४ महिने व दोष निवारण कालावधी १२ असा एकूण ३६ महिनेच्या कालावधी करीता कंत्राटदाराने रु. १,४७,७४३/- विमा पॉलिसी काढून विभागीय कार्यालयास सादर केलेली होती. करारनामा कालावधीत काम पूर्ण न झाल्याने कंत्राटदारास मुदतवाढ देण्यात आली. वाढीव मुदतवाढ कालावधीत कंत्राटदाराने विमा पॉलिसी सादर न केल्याने त्यांच्या देयकातून ५०,०००/- रुपयाची कपात करण्यात आलेली आहे.

**सुधारित प्रशासकीय मान्यता न घेता केलेला खर्च**

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका, १९८४ नुसार जर खर्च प्रशासकीय मान्यतेपेक्षा १० टक्क्याने किंवा रु. १ कोटीने, यापैकी जे कमी असेल, जास्त झाला असेल तर, अशा प्रकरणात सुधारित प्रशासकीय मान्यता (RAA) घेण्यात यावी आणि RAA पेक्षा अधिक रक्कम सक्षम अधिका-यांच्या संमती शिवाय मान्य करण्यात येऊ नये. लेखापरीक्षा पडताळणीत असे निदर्शनास आले की निवडलेल्या ६६ पैकी १० प्रकल्पांमध्ये कार्यकारी विभागाव्दारे प्रशासकीय मान्यता प्राप्त रक्कम (रु. १०९.९९कोटी) अधिक १० टक्के याउपर रु. ४.९० कोटी सक्षम अधिका-यांच्या मान्यतेशिवाय खर्च करण्यात आले.

सचिव, WCD यांनी वस्तुस्थिती मान्य केली आणि नमूद केले की RAA प्राप्त करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या सदर्भात मुख्य अभियंता, लघु सिंचन, जलसंधारण पूणे यांना चौकशी करून संबंधितांचे खुलासा प्राप्त करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

**ज्ञापन :-**

**महालेखाकारांनी दिलेल्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.**

**स्वामित्व धनावर गैरवाजवी वाढ**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील करूळ जामदारवाडी लघु सिंचन तलाव प्रकल्प ( MWCC अंतर्गत) ४८ महिन्यांच्या कालावधीत (फेब्रुवारी २०१७ ) पूर्ण करण्याकरिता रु. १४.६९ कोटी किंमतीत बहाल करण्यात आला (फेब्रुवारी २०१३).

CE, SSI, पुणेद्वारे तयार करण्यात आलेल्या प्रारूप निविदेच्या कलम ३६ जो राज्यात सामाईकपणे लागू होता. मध्ये कंत्राटाद्वारे राज्य शासनाला देय असलेल्या स्वामित्वधनाच्या रक्कमेवर वाढ करण्याची तरतूद नाही. तथापि, लेखापरीक्षेस असे निदर्शनास आले की निविदा अंतिम करण्यासाठी ऑक्टोबर, २०१२ मध्ये घेण्यात आलेल्या बोली-पूर्व बैठकीत कंत्राटदारांच्या अटींमध्ये अंतर्भूत करण्यात आली. परिणामी , ज्या कंत्राटदारास लघु सिंचन तलाव प्रकल्प बहाल करण्यात आला होता त्या कंत्राटदारास रु. ३२.७७ लक्षाचा गैरवाजवी लाभ झाला.

सचिव, WCD यांनी वस्तुस्थिती मान्य केली आणि नमूद केले की रु. ३२.७७ लक्ष ही संपूर्ण रक्कम कंत्राटदाराच्या पुढील चालू लेखा देयकामधून वसूल करण्यात येईल.

**ज्ञापन :-**

**महालेखाकारांनी दिलेल्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.**

लेखा परिक्षण (Performance Audit) झाल्यानंतर करूळ जामदारवाडी लघु सिंचन योजनेचे देयक अदा करण्यात आलेले नाही. तथापि कंत्राटदाराच्या पुढील देयकामधून सदर रक्कम वसूल करण्यात येईल.

**परिच्छेद क्र.२.१.८.५**

**निरर्थक खर्च**

निवडलेल्या ६६ पैकी दोन प्रकल्पांध्ये बांधकामातील उणीवांमुळे आणि अनावश्यक बाबींच्या निष्पादनामुळे विभागांनी खाली चर्चिल्याप्रमाणे रु. ४.४७ कोटीचा निरर्थक खर्च केला.

**मोढा कोल्हापूर पध्दती बंधारा क्र. २ प्रकल्प**

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या ३१ मार्च २००९ (नागरी) ला संपलेल्या वर्षाच्या महाराष्ट्र शासनाच्या अहवालात ( परिच्छेद क्र. २.४ ), जानेवारी २००९ पर्यंत रु. २.६० कोटी खर्च करुन निर्माण केलेल्या औरंगाबाद जिल्ह्यातील मोढा के.टी. बंधारा प्रकल्पाच्या ( WCD अंतर्गत ) अवर्धनक्षमतेबाबत उल्लेख केला आहे. राज्य शासनाने नमूद केले (फेब्रुवारी २०१२ ) की या प्रकल्पासाठी रु. ४.४६ कोटीची सुधारित मान्यता देण्यात आली आणि हा प्रकल्प भौतिकदृष्टया पूर्ण झाला असून (जानेवारी २००८) याद्वारे २३७ हेक्टर सिंचन क्षमतेची निर्मिती झाली व २००९-११ दरम्यान त्याचा वापर करण्यात आला.

लेखापरीक्षेद्वारे कार्यस्थळाच्या संयुक्त प्रत्यक्ष पहाणीत (जुलै २०१६ ) असे निदर्शनास आले की रु. ४.१९ कोटी रक्कम (सुधारित मंजूर रक्कम रु. ४.४६ कोटी मधून) खर्च करुन २००८ मध्ये प्रकल्प पूर्ण झाल्यावरही बाजूच्या भिंती ( नदी किना-यांवरील दोन्ही बाजुचे मातीकाम संरक्षित करण्याकरिता) नसल्यामुळे, खालच्या बाजुकडे दोन्ही बाजुनी क्षतिग्रस्त मातीकाम, क्षतिग्रस्त नीडल्स आणि स्तभ, यांमुळे २०११-१२ ते २०१५-१६ दरम्यान के.टी. बंधा-यामध्ये पाण्याचा साठा करता आला नाही. पुढे असे ही निदर्शनास आले की कार्यकारी अभियंता यांनी निरिक्षण टिप्पणीत (ऑगस्ट २०१४) मातीकाम संरक्षण काम, दगडी अस्तरीकरण आणि काँक्रिट काम यांची शिफारस केली. तसेच १३८ नवीन नीडल्स ची उभारणी या कामांची अंदाजपत्रके तयार करण्याची शिफारस केली. CE, SSI पूणे यांनी राज्य शासनाकडे रु. ८८.८१ लक्ष किंमतीची दुरूस्ती अंदाजपत्रके सादर केली होती (मे २०१६ ) तरी डिसेंबर २०१६ पर्यंत ती मंजूर करण्यात आली नव्हती.

**ज्ञापन :-**

**महालेखाकारांनी दिलेल्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.**

सदरचा बंधारा हा औरंगाबाद जिल्ह्यातील सिल्लोड तालुक्यात पूर्णा नदीवर आहे. बंधारा साठवण क्षमता १.९३१ दलघमी असून बंधा-यावर २३७ हे. सिंचन क्षेत्र सन २००८ मध्ये निर्माण झाले आहे. सन २०११ पर्यंत पाणीसाठा होवून सिंचन करण्यात

आले. सन २०१४ मध्ये बंधा-यांच्या दोन्ही बाजूकडील भागाचे अतिवृष्टीमुळे out flanking झाले. कार्यकारी अभियंता यांनी सन २०१४ मध्ये बंधा-याचे निरीक्षण करून दुरूस्ती अंदाजपत्रक सादर केले. दुरूस्तीच्या प्रापण सुचीस मान्यता न मिळाल्यामुळे दुरुस्ती होवू शकली नाही. बंधा-याचे माती काम दगडी अस्तरीकरण, रबरसील दुरूस्ती आणि संधानक दुरूस्ती आवश्यक आहे. दुरूस्ती कामाची किंमत सन २०१३-१४ च्या दरसुची नुसार १०१ लक्ष एवढी आहे. बंधा-यावर महालक्ष्मी पाणी वापर संस्था, मोढा ही संस्था स्थापन करण्यात आली आहे. निधी मिळताच दुरूस्ती काम पुर्ण करण्यात येईल. विभागाच्या अभिलेख्यांच्या पडताळणीत असे निदर्शनास आले की मंजूर केलेल्या अंदाजपत्रकात पाणी साठविण्याकरिता माईल्ड स्टील ( MS ) नीडल्स चा समावेश करण्यात आला होता. तथापि माईल्ड स्टील नीडल्स.

**भालगाव कोल्हापूर पध्दतीचे बंधारा प्रकल्प**

औरंगाबाद जिल्हयातील भालगाव के.टी. बंधारा प्रकल्प एप्रिल २०१० मध्ये रु. २.१३ कोटी किंमतीत मंजूर करण्यात आला आणि मे २०१२ मध्ये रु. १.४९ कोटी किंमतीत हे काम बहाल करण्यात आले. कामाच्या व्याप्तीतील बदलामुळे मंजूर किंमत रु. ४.७० कोटी वर वाढविण्यात आली. हे काम रू३.७६ कोटी किमंतीत पूर्ण करण्यात (जानेवारी २०१३ ) आले.

विभागाच्या अभिलेख्यांच्या पडताळनीत असे निदर्शनास आले की, मंजूर केलेल्या अंदाजपत्रकात पाणी साठविण्याकरिता माईल्ड स्टील (MS) नीडल्स चा समावेश करण्यात आला होता. तथापी, माईल्ड स्टील नीडल्स मोठया प्रमाणात गंजतात आणि त्या बसवितांना व काढतांना त्रासदायक ठरतात म्हणुन CE,SSI पुणे यांनी राज्यातील सर्व के.टी. बंधारे प्रकल्पांच्या निषादनाकरिता माईल्ड स्टील नीडल्स ऐवजी फाइबर रिईन्फोर्सड प्लास्टिक नीडल्स वापरण्याच्या सूचना (सप्टेंबर २०११) सर्व परिमंडळांना दिल्या.त्याप्रमाणे SE, औरंगाबाद परिमंडळाने ह्या प्रकल्पाकरिता रू. २७.७० लक्ष किंमतीच्या फाइबर रिईन्फोर्सड प्लास्टिक नीडल्स वापरण्याची मंजुरी दिली (जुलै २०१२) जानेवारी २०१३ मध्ये काम पूर्ण झाल्यावर विभागाच्या लक्षात आले (डिसेंबर २०१३ ) की प्लावकाते. (Buoyancy) मुळे FRP नीडल्स वर उचलल्या जात होत्या.त्यामूळे SE ने माईल्ड स्टील नीडल्स वापरुन काम पूनःनिष्पादित करण्याच्या सूचना दिल्या (डिसेंबर २०१३). अशाप्रकारे, K.T. बंधा-याकरिता FRP नीडल्स च्या तांत्रिक योग्यतेची खात्री न करता आणि त्यांचा या प्रकल्पाकरिता वापर केल्यामुळे रु २७.७० लक्ष चा निरर्थक खर्च झाला.

**शिफारस ३: वेळ आणि किंमतीतील वाढ आणि निरर्थक खर्च रोखण्याकरीता राज्य शासनाने-**

१. सक्षम अधिका-याद्वारे पर्याप्त सर्वेक्षण झाल्यानंतर आणि संकल्पचित्रास मंजूरी मिळाल्यानंतर प्रकल्पाची व्याप्ती गोठवावी, आणि

२. भुमी संपादन/वन मंजुरी प्राप्त झाल्यानंतरच कामे सूरु करावी. कंत्राट व्यवस्थापनाची प्रणाली सुध्दा भक्कम असावयास पाहिजे आणि कामाचे निष्पादन नियम पुस्तिका आणि कंत्राट अटीनुसार करावयास पाहिजे.

**ज्ञापन :-**

**महालेखाकारांनी दिलेल्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.**

भालगाव कोप. बंधारा हा औरंगाबाद जिल्हयातील गंगापूर तालुक्यात शिवना नदीवर आहे. बंधा-यांची साठवण क्षमता १.२४ दलघमी. असुन सिंचन क्षेत्र २३२ हे. आहे. बंधा-यांच्या प्रकल्प अहवालामध्ये स्टिल निडलची तरतुद होती. तथापि स्टिल निडल या वेळोवेळी चोरी जाण्याचे प्रकार होत असल्यामुळे व काढणे व घालणेकरीता अवघड प्रक्रीया असल्यामुळे मा. मुख्य अभियंता यांनी सन २०११ मध्ये याऐवजी Fibre Reinforced Plastic (FRP) निडल्सचा वापर करण्याच्या सूचना दिल्या त्याप्रमाणे जुलै, २०१२ मध्ये मान्यता मिळाल्यानंतर वापर सुरू केला. प्रत्यक्ष पाहणी दरम्यान Buoyancy effect मुळे निडल्स वर उचलल्या जात होत्या त्यामुळे अधिक्षक अभियंता यांनी डिसेंबर, २०१३ मध्ये परत स्टिल निडल्सचा वापर करण्याच्या सूचना दिल्या. विभागामार्फत अदायगी करण्यात आलेली (FRP) निडल्सची किमंत (रू. २७.७० लक्ष) कंत्राटदाराकडुन वसुल करण्यात आली आहे. त्यामुळे कुठलाही अतिरीक्त खर्च झालेला नाही.

याबाबत शासन निर्णय जलसंधारण विभाग, दि. ५/०८/२०१७ नुसार जिल्हा नियोजन समितीमार्फत राबविण्यात येणा-या ० ते २५० हे. सिंचन क्षमतेच्या योजनांकरीता सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. यामध्ये शिफारशीमध्ये नमुद केलेल्या बाबी समाविष्ट आहेत.

या सुचना जलसंधारण विभागाच्या इतर योजनांमार्फत घेण्यात येणा-या प्रकल्पांना देखील लागु करण्याच्या सुचना दि. १५/०९/२०१७ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

**परिच्छेद क्र. २.१.९**

**प्रकल्पांचे कार्य चालन आणि देखभाल**

जल संधारण विभागाच्या विद्यमान मार्गदर्शक सूचनांनुसार (जुलै २०००) पूर्ण झालेले सर्व SSI प्रकल्प कार्यचालन आणि देखभाल (operation & maintenance -O&M) करिता पाणी वापर संस्थे (Water User's Associations-WUAs) कडे सोपविण्यात आले पाहिजे. तथापि,प्रकल्प WUAs ला हस्तांतरीत करे पर्यंत प्रकल्पांच्या O & M करित संबंधित विभाग जबाबदार असेल.

लेखापरीक्षेस असे निदर्शनास आले की निवडलेल्या ६६ प्रकल्पांपैकी १८ प्रकल्प सप्टेंबर २०१६ पर्यंत पूर्ण झाले. तथापि पूर्ण झालेल्या १८ प्रकल्पांपैकी १८ प्रकल्प सप्टेंबर २०१६ पर्यंत पूर्ण झाले तथापि पूर्ण झालेल्या १८ प्रकल्पांपैकी फक्त आठ प्रकल्पांमध्ये WUAs ची स्थापना झालेली आहे. WUAs नी आठ पैकी फक्त दोनच प्रकल्प हाती घेतले आणि धरण आणि कालवा संरचनेमधील गळती /हानी के.टी. बंधा-यांची पाणी साठवून ठेवण्यात अक्षमता इत्यादि कारणांमुळे उर्वरित सहा प्रकल्प हाती घेण्यात आले नाही. उर्वरित १० पूर्ण झालेल्या प्रकल्पांमध्ये संबंधित विभाग सप्टेंबर २०१६ पर्यंत WUAs स्थापित करु शकले नाही. WUAs द्वारे स्वीकारण्यात न आलेल्या पूर्ण झालेल्या १६ प्रकल्पांच्या O&M ची जबाबदारी संबंधित विभागाकडे होती तथापि परिच्छेद २.१.७.४ मध्ये आधीच नमुद केल्याप्रमाणे राज्य शासनाद्वारे M &R करिता मिळणा-या निधीचा उपयोग न केल्यामुळे विभाग या सिंचन प्रकल्पांची योग्य प्रकारे निगा राखू शकले नाही. परिणामी, पूर्ण झालेल्या १६ प्रकल्पांपैकी सात प्रकल्पांमध्ये निर्माण केलेल्या सिंचन क्षमतेचा त्याच्या पूर्णत्वापासून जानेवारी १९९५ ते ऑक्टोबर २०१२ या कालावधीत योग्यरित्या उपयोग करण्यात आला नाही.

**ज्ञापन :-**

**महालेखाकारांनी दिलेल्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.**

जलसंधारण विभागाकडे सिंचन व्यवस्थापनासाठी स्वतंत्रयंत्रणा नाही. त्यामुळे प्रकल्पांचे कार्यपालन आणि देखभाल व दुरुस्ती कामात अडचणी आहेत. सद्यःस्थितीत पूर्ण झालेल्या योजनांबाबत शासन निर्णय दि.०२/०२/२०१२ नुसार कार्यवाही करण्यात येते.

१८ पैकी ८ प्रकल्पामध्ये पाणीवापर संस्था स्थापन झालेली आहे. या पाणीवापर संस्थांना प्रकल्प हस्तांतरण करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

पुर्ण झालेल्या प्रकल्पांच्या देखभाल व दुरूस्तीकरीता निधी उपलब्धतेनुसार कामे हाती घेण्यात आली आहेत.

१. महेबुबखेडा को.प.बं.उपलब्ध निधी रु.९.८६ लक्ष झालेला खर्च रु.९.८६ लक्ष (सन २००९-१०)

२. मोढा को.प.बं. क्र.२ - निधी प्राप्त नाही.

३. माळुंजा को.प. बं. - निधी प्राप्त नाही.

४. खातखेडा को.प.बं. - निधी प्राप्त नाही.

M & R साठी उपलब्ध झालेला निधी रु.९.८६ लक्ष पुर्ण खर्च झाला असून निर्मित सिंचनक्षमता त्या-त्या वर्षी उपलब्ध असलेल्या पाणी साठ्यानुसार वापरण्यात आली आहे. उर्वरीत M & Rच्या कामासाठी निधी उपलब्ध होऊ न शकल्यामुळे पुर्णक्षमतेने पाणी साठा करणे शक्य झाले नाही. त्यामुळे निर्मित सिंचन क्षमता प्रत्यक्षात सिंचीत होऊ शकली नाही.

५. दहिंद्री लपा योजना ता. चिखलदरा, जि. अमरावती मध्ये सन २०१४-१५ ते २०१६-१७ या तीन वर्षात प्रत्यक्ष सिंचन सरासरी ७० हे. एवढे झालेले आहे. सदर प्रकल्पाच्या कालव्याची दुरूस्ती महात्मा फुले जल व भुमी अभियान अंतर्गत करण्यात आलेली आहे.

६. कोप बंधारा कु-हा ता.तिवसा जि. अमरावती मध्ये सन २०१३-१४ ते सन २०१६-१७ मध्ये सरासरी ३५ हे. सिंचन होत आहे. सिंचन क्षमता १०७ हे. इतकी आहे.

**परिच्छेद क्र.२.१.१०**

**प्रकल्पांचे संनियंत्रण :**

जुलै २००० च्या शासन निर्णयाप्रमाणे पूर्ण झालेल्या कामांचे EE/ ने मानसूनपूर्व आणि मानसूनोत्तर निरीक्षण करणे बंधनकारक आहे. तसेच सुरु असलेल्या प्रकल्पांच्या गुणवत्तेची आणि समयोचिततेची खात्री करण्याकरिता शासन परिपत्रकात (ऑगस्ट २००२) CEs (प्रति माह आठ निरीक्षणे) SEs (प्रति माह १० निरीक्षणे) आणि EEs (प्रति माह १५ निरीक्षणे) यांच्या द्वारे करण्यात येणा-या प्रकल्पांच्या निरीक्षणाचे मानदंड सुध्दा विर्निदिष्ट केले आहेत. निष्पादित करण्यात येणा-या कामांची गुणवत्ता विलंब झाला असल्यास त्याची कारणे आणि आवश्यक मानण्यात आलेल्या इतर बाबी दर्शविणारी निरीक्षण टिप्पणी सुध्दा CEs/ SEs/EEs यांनी त्यांच्या शिफारसींसहित तयार करावयाची असते. लेखापरीक्षणाच्या असे निदर्शनास आले की  पूर्ण झालेल्या १८ प्रकल्पांपैकी फक्त चार प्रकल्पांचे मानसूनपूर्व आणि मानसूनोत्तर निरीक्षण केले. चार पैकी एका प्रकल्पांमध्ये (शेल्डी) लघु सिंचन तलाव प्रकल्प, जि. रत्नागिरी मुख्य कालव्याच्या बंधा-याचे क्षतीग्रस्त असल्यावरही EE द्वारे त्याची नोंद निरीक्षण टिप्पणीत घेण्यात आलेली नाही. सचिव, WCD यांनी सांगितले की, WCD  मधील सुधारणेचा प्रस्ताव राज्य शासनाच्या विधाराधीन आहे. ज्यात स्वतंत्र प्रकल्प व्यवस्थापन शाखा स्थापनेचा प्रस्ताव केला आहे.

**ज्ञापन :-**

**महालेखाकारांनी दिलेल्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.**

ऑगस्ट, २००२ च्या शासन परिपत्रकानुसार मुख्य अभियंता, अधिक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता वेळोवेळी प्रकल्पांच्या कार्यक्षेत्रावर भेटी देवुन निरीक्षणे नोंदवली जातात. तसेच पुर्ण झालेल्या प्रकल्पांचे  मानसूनपूर्व व मानसूनोत्तर निरीक्षणे धरण सुरक्षितता संघटना यांच्या मानकानुसार दरवर्षी भेटी देवुन सादर केली जातात.

**परिच्छेद क्र.२.१.११ प्रभाव निर्धारण**

**परिच्छेद क्र. २.१.११.१**

**सिंचन क्षमतेच्या** (IP)**निर्मितीतील तूट**

निवडलेल्या ६६ प्रकल्पापैकी ३३ प्रकल्पांमध्ये (१८ पूर्ण झालेली आणि १५ सुरु असलेली) सिंचन क्षमता निर्मित झाली. तथापि, अभिप्रेत असलेल्या सिंचन क्षमता निर्मितीच्या तुलनेत प्रत्यक्ष निर्मित सिंचन क्षमतेत ४६ ते ६८ टक्के तूट होती. संक्षिप्त स्थिती **तक्ता २.१.६** मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता २.१.६ :** निवडलेल्या ६६ प्रकल्पापैकी ३३ प्रकल्पांमध्ये २०११-१६ दरम्यान सिंचन क्षमतेच्या निर्मितीतील तूट

| वर्ष | सिंचन क्षमतेची अभिप्रेत निर्मिति (६६ प्रकल्प) | प्रत्यक्ष निर्मिती सिंचन क्षमता (३३ प्रकल्प) | तूट टक्केवारी मध्ये |
|---|---|---|---|
| २०११-१२ | ६३२२ | २४१३ | ६२ |
| २०१२-१३ | ७७१८ | २४७५ | ६८ |
| २०१३-१४ | ८२८५ | ३३२२ | ६० |
| २०१४-१५ | ८९९१ | ४५७७ | ४९ |
| २०१५-१६ | ८९९१ | ४८७१ | ४६ |

**स्त्रोत- विभागांद्वारे सादर केलेली माहिती**

**ज्ञापन :-**

**महालेखाकारांनी दिलेल्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.—**

जलसंधारण विभागाची सिंचन व्यवस्थापनासाठी स्वतंत्र आस्थापना नाही. पाणी वापर संस्था स्थापन करून लोक सहभागाच्या माध्यमातुन सदरची तूट भरून काढणेसाठीचे प्रयत्न सुरू आहे.

**परिच्छेद क्र. २.१.११.२**

**निर्मित सिंचन क्षमतेचा कमी वापर**

निवडलेल्या ६६ प्रकल्पांमध्ये २०११-१६ दरम्यान निर्मित सिंचन क्षमतेचा (३३ प्रकल्प) तुलनेत वापरण्यात आलेली सिंचन क्षमता (२०) प्रकल्प खूपच कमी म्हणजे १९ ते २८ टक्क्या दरम्यान होती. संक्षिप्त स्थिती तक्ता २.१.७ मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता २.१.७ :निवडलेल्या ३३ प्रकल्पांमध्ये २०११-१६ दरम्यान निर्मिती केलेल्या सिंचन क्षमतेचा कमी वापर**

(IP हेक्टरमध्ये)

| वर्ष | निर्मिती केलेली सिंचन क्षमता (३३ प्रकल्प) | वापरण्यात आलेली सिंचन (२० प्रकल्प) | सिंचन क्षमतेचा वापर (टक्केवारीमध्ये) |
|---|---|---|---|
| २०११-१२ | २४१३ | ४६५ | १९ |
| २०१२-१३ | २४७५ | ५५८ | २३ |
| २०१३-१४ | ३३२२ | ९१६ | २८ |
| २०१४-१५ | ४५७७ | १२४३ | २७ |
| २०१५-१६ | ४८७१ | ९६१ | २० |

सचिव, WCD यांनी सांगितले की ब-याच योजना ह्या अप्रत्यक्ष सिंचन योजना आहेत ज्यांच्या वापराचे मूल्यांकन करता येऊ शकत नाही. तसेच, मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे प्रत्यक्ष वापरण्यात आलेल्या सिंचन क्षमतेची मोजणी करता आली नाही.

उत्तर समर्थनीय नाही कारण निवडलेल्या ६६ पैकी ६३ प्रकल्पांमध्ये (९५ टक्के) उत्पन्न होणारी अभिप्रेत सिंचन क्षमता मोजता येऊ शकत होती (हेक्टर मध्ये) आणि म्हणूनच त्याद्वारे लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ पुरविणे अपेक्षित होते.उर्वरित तीन प्रकल्पांपैकी दोन रद्द करण्यात आले (तक्ता २.१.३) आणि पाझर तलावाच्या फक्त एका प्रकल्पाद्वारे (रत्नागिरी जिल्हातील कुरंग) भूजल पातळीमध्ये पुनर्भरण करुन लाभार्थ्यांना अप्रत्यक्ष लाभ पुरविणे अपेक्षित होते.

**ज्ञापन :-**

**महालेखाकारांनी दिलेल्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.**

जलसंधारण विभागाकडे सिंचन व्यवस्थापनासाठी स्वतंत्र यंत्रणा नाही. त्यामुळे अशा प्रकल्पावर पाणी वापर संस्था स्थापन करून देखभालीसाठी त्यांच्याकडे हस्तांतरीत करण्यात येतील. सद्यःस्थितीतपूर्णझालेल्यायोजनांबाबतशासननिर्णयदि.०२/०२/२०१२नुसारकार्यवाहीकरण्यातयेते.

**परिच्छेद क्र.२.१.११.३**

**पाणी पट्टीची वसुली**

पाणी पट्टी आकारणी आणि वसुली महाराष्ट्र सिंचन अधिनियम (MIA) १९७५, आणि महाराष्ट्रजलसंदा नियमन प्राधिकरण (MWRRA) अधिनियम,२००५ द्वारे करण्यात येते. सिंचन प्रयोजनाकरिता प्रति हेक्टर पाणी पट्टी ही, WUAs यांना पुरविण्यात येणा-या परिणामावर आधारित पाण्याव्यतिरिक्त,हंगामी पिकांच्या स्वरूपाच्या आधारावर वेळोवेळी आकारण्यात येते.

मागील परिच्छेदात आधीच नमूद केल्याप्रमाणे,२०११-१६ दरम्यान ३३ पैकी २० प्रकल्पांमध्ये निर्मित झालेल्या सिंचन क्षमतेच्या फक्त १९ ते २८ टक्के इतकीच सिंचन क्षमता वापरात आणल्या गेली (तक्ता २.१.७) तथापि, २० पैकी फक्त १० प्रकल्पांमध्येच पाणी पट्टी आकारण्यात आली (रू. १३.२५ लक्ष ),परंतु त्यांची वसुली अत्यल्प होती (रू. १.७५ लक्ष ). विभागाद्वारे उर्वरित १० प्रकल्पांमध्ये पाणी पट्टीच्या वसुलीची मागणी करण्यात आली नाही.

लेखापरीक्षेस असेही निदर्शनास आले की, विभागीय तपासणी अभावी आणि WUAs मार्फत सामुहिक मालकी नसल्यामुळे कोणतीही पाणी पट्टी न भरता,पाणी साठविलेल्या क्षेत्रांमधून पाण्याची चोरी होत होती. नऊ प्रकल्प स्थळांच्या संयुक्त प्रत्यक्ष पाहणीत बेकायदेशीर पध्दतीने (पाईप्स,पंप्स,पाणी टँकर्स इत्यादी ) पाण्याची निर्गति होत असल्याने आढळले. दोन प्रकल्पांचे छायाचित्र,ज्यात पाण्याचे सायफनिंग होत असल्याने दिसते, खाली जोडले आहे.

सचिव,WCD यांनी सांगितले की , WCD मध्ये सुधारणांचा प्रस्ताव, ज्यात सिंचन व्यवस्थापनाकरिता वेगळी शाखा स्थापित करण्याबाबत प्रस्तावित केले होते. राज्य शासनाच्या विचाराधीन होता.

**शिफारस ४ : राज्य शासनाने खात्री करावी की —**

१. प्रकल्प बांधकाम करते वेळीच पाणी वापर संस्था गठित करण्यात आल्या आहेत,जेणे करून पूर्ण झालेले प्रकल्प नियमित कार्यचालन आणि देखभालीकरिता त्यांच्या कडे हस्तांतरित करता येतील,

२. अभियंत्याद्वारे प्रकल्पांचे संनियंत्रण समयोचित आणि विहित मापदंडाप्रमाणे होत आहे,जेणे करुन विभागाला यथायोग्य सूधारात्मक उपाययोजना करता येतील, आणि

३. प्रकल्पांच्या लाभ क्षेत्रातील कालव्यांचे आणि वितरिकांचे काम लवकर पूर्ण करून आणि निर्मित मालमत्तेचे नियमित परिरक्षण करून निर्माण केलेल्या आणि वापरण्यात आलेल्या सिंचन क्षमतेमधील अंतर भरून निघेल.

**ज्ञापन :-**

**महालेखाकारांनी दिलेल्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.—**

जलसंधारण विभागाकडे सिंचन व्यवस्थापनासाठी स्वतंत्र यंत्रणा नाही. त्यामुळे अशा प्रकल्पावर पाणी वापर संस्था स्थापन करून देखभालीसाठी त्यांच्याकडे हस्तांतरीत करण्यात येतील. सद्यःस्थितीत पूर्ण झालेल्या योजनांबाबत शासन निर्णय दि.०२/०२/२०१२ नुसार कार्यवाही करण्यात येते.

पाणीपट्टीची आकारणी करून वसुली वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील.

(१) प्रकल्प बांधकाम करतेवेळी पाणी वापर संस्था गठित करणे, पुर्ण झालेले प्रकल्प नियमीत कार्यचालन आणि देखभाल व दुरूस्ती करीता प्रकल्प पाणी वापर संस्था यांच्याकडे हस्तांतरीत करणे व याकरीता महाराष्ट्र सिंचन पध्दतीचे शेतक-याकडून व्यवस्थापन कायदा, २००५ नुसार कार्यवाही करण्याबाबत क्षेत्रिय स्तरावर प्रशिक्षण घेवून, सुचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच दि. १५/०९/२०१७ च्या पत्रान्वये पुन्हा कळविण्यात आले आहे.

(२) व (३) प्रकल्पांचे संनियंत्रण समयोचित आणि विहित मापदंडाप्रमाणे करण्याबाबत तसेच प्रकल्पांच्या लाभ क्षेत्रातील कालव्यांचे आणि वितरिकांचे काम लवकर पूर्ण करण्याबाबत उचित सुचना क्षेत्रिय अधिका-यांना देण्यात आलेल्या आहेत.

**परिच्छेद क्र.२.१.१२**

**निष्कर्ष :**

जल संधारण विभाग/महाराष्ट्र जल संधारण महामंडळ / विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम यांच्याद्वारे कोणतेही दीर्घकालीन नियोजन आणि प्राधान्यक्रमाशिवाय लघु सिंचन प्रकल्प हाती घेण्यात आले. तसेच, संकल्पचित्र /कामाच्या व्याप्तितील बदल, निधीची कमतरता, जमीन संपादित न करणे इत्यादिंमुळे प्रकल्प किंमतीत अवाढव्य वाढ झाली आणि प्रकल्प

पूर्ण होण्यास विलंब झाला. नियमपुस्तिकांचे प्रावधान आणि कंत्राट अटींचे उल्लंघन झाल्याची बरीच प्रकरणे होती, ज्यामूळे कंत्राटदारांना गैरवाजवी लाभ देण्यात आला आणि निरर्थक खर्च झाला. प्रकल्पाच्या निष्पादन आणि देखभालीकरिता राज्य शासनाद्वारे अपर्याप्त  निधी पुरविण्यात आला.

अभियंत्या द्वारे प्रकल्पाचे संनियंत्रण कमकुवत होते. विभागीय तपासणी अभावी आणि पाणी वापर संस्थांची सामुहिक मालकी नसल्यामुळे कोणतीही पाणीपट्टी न भरता प्रकल्प स्थळावरील पाणी साठयामधून पाण्याची चोरी होत होती. मार्च २०१६ पर्यंत निर्मित ४,८७१ हेक्टर सिंचन क्षमतेच्या तुलनेत उपयोग आणलेली सिंचन क्षमता खुप कमी होती. २०१४-१५ दरम्यान उपयोगात आलेली कमाल सिंचन क्षमता १,२४३ हेक्टर (२६ टक्के) होती. कालव्यांचे काम पूर्ण करणे आणि लाभ क्षेत्रात वितरिकांचे जाळे पसरविणे यातील विलंब आणि निर्मित मालमत्तेची अपूरी देखभाल यामुळे सिंचन क्षमतेचा वापर कमी झाला.

**ज्ञापन :**

**महालेखाकारांनी दिलेल्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.—**

जल संधारण विभाग/महाराष्ट्र जल संधारण महामंडळ यांच्याद्वारे योजनांचे दीर्घकालीन नियोजन करण्यात येईल. तसेच प्राधान्यक्रम ठरवून लघु सिंचन प्रकल्प हाती घेण्यात येतील. संकल्पचित्र /कामाच्या व्याप्तितील बदल, निधीची कमतरता, जमीन संपादित न करणे इत्यादिंमुळे प्रकल्प किंमतीत वाढ होवू नये याकरीता शासन निर्णय जलसंधारण विभाग, दि. ५/०८/२०१७ नुसार जिल्हा नियोजन  समितीमार्फत राबविण्यात येणा-या ० ते २५० हे. सिंचन क्षमतेच्या योजनांकरीता सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. या सुचना जलसंधारण विभागाच्या इतर योजनांमार्फत घेण्यात येणा-या प्रकल्पांना देखील लागु करण्याच्या सुचना दि. १५/०९/२०१७ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. नियमपुस्तिकांचे प्रावधान आणि कंत्राट अटींचे पालन करण्याकरीता क्षेत्रिय स्तरावर सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. प्रकल्पाच्या निष्पादन आणि देखभालीकरिता राज्य शासनाद्वारे आवश्यक निधी पुरविण्यात येईल.

प्रकल्प बांधकाम करतेवेळी पाणी वापर संस्था गठित करणे, पुर्ण झालेले प्रकल्प नियमीत कार्यचालन आणि देखभाल व दुरूस्ती करीता पाणी वापर संस्था यांच्याकडे हस्तांतरीत करणे व याकरीता महाराष्ट्र सिंचन पध्दतीचे शेतक-याकडून व्यवस्थापन कायदा, २००५ नुसार कार्यवाही करण्यात येईल. यामुळे पाणी वापर संस्थांची सामुहिक मालकी निर्माण होईल. वेळेवर पाणी पट्टी भरणे, पाण्याची चोरी रोखणे, सिंचन क्षमतेत वाढ करणे, नियमीत देखभाल दुरूस्ती करणे याबाबी साध्य होतील व प्रकल्पाची कार्यक्षमता वाढेल.

**साक्ष :**

**परिच्छेद क्र. २.१.६.११ लघु सिंचन प्रकल्पांचे नियोजन**

**१.१** महालेखापालांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक ३ ऑक्टोबर, २०१७ रोजी, ग्रामविकास व जलसंधारण (जलसंधारण) विभागाच्या  सचिवांची तसेच विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी परिच्छेद क्रमांक २.१.६.१ या परिच्छेदाबाबत थोडक्यात समितीला माहिती देण्याबाबत समितीने सूचित केले असता, जलसंधारण विभागाच्या अंतर्गत ८ विभागांचे परफॉर्मन्स ऑडीट झालेले आहे. त्या अनुषंगाने साक्षीमध्ये काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत. दिनांक ३१ मे, २०१७ रोजीच्या शासनाच्या निर्णयानुसार सदर विभागाची दिनांक ३१ मे, २०१७ रोजी पुनर्रचना झालेली आहे. त्यानुसार मृद व जलसंधारण विभाग अशी रचना करण्यात आलेली आहे. सन १९९२ पासून जलसंपदा विभागामध्ये जे अधिकारी प्रतिनियुक्तीवर होते ती पदसंख्या जलसंधारण विभागामध्ये वर्ग करण्यात आलेली आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

विभागाची आता पुनर्रचना झालेली आहे. विभागाचे काम अनेक वर्षांपासून सुरु आहे. विभागाने कोटयवधी रुपये खर्च केलेले आहेत. या सर्व झालेल्या कामांचे ऑडीट करण्यात आलेले आहे. सदर परिच्छेदाबाबतच्या ज्ञापनातील शेवटच्या परिच्छेदामध्ये

म्हटलेले आहे की, जलसंधारण विभाग, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ आणि विदर्भ सिंचन प्रकल्प विकास कार्यक्रम यांच्याद्वारे कोणतेही दिर्घकालीन नियोजन आणि प्राधान्यक्रमाशिवाय लघुसिंचन प्रकल्प हाती घेण्यात आलेले आहेत. तसेच, संकल्पचित्र, कामाच्या व्याप्तीमधील बदल, निधीची कमतरता, जमिन संपादन न करणे इ. मुळे प्रकल्प किंमतीमध्ये अवाढव्य वाढ झाली आणि प्रकल्प पूर्ण होण्यासाठी विलंब लागलेला आहे. नियम पुस्तीकांचे प्रावधन व कंत्राट अटींचे उल्लंघन झाल्याची बरीच प्रकरणे होती. त्यामुळे कंत्राटदारांना गैरवाजवी लाभ देण्यात आला. प्रकल्पाच्या उत्पादन आणि देखभालीसाठी राज्य शासनाद्वारे अपर्याप्त निधी पुरविण्यात आलेला आहे. अभियंत्यांद्वारे प्रकल्पाचे नियंत्रण कमकूवत होते. विभागाच्या तपासणी अभावी कोणतीही पाणीपट्टी न भरता, प्रकल्प वितरणावर पाणी साठयामध्ये मोठया प्रमाणावर पाण्याची चोरी होत होती. मार्च २०१६ पर्यंत ४८७१ हेक्टर सिंचन क्षमतेच्या तुलनेमध्ये उपयोगात आणलेली सिंचन क्षमता ही २६ टक्क्यांपर्यंत कमी झालेली होती. कालव्याचे काम पूर्ण करणे, लाभक्षेत्रामध्ये जाळे पसरविण्यास मोठया प्रमाणात विलंब झालेला आहे. निर्मित मालमत्तेची अपूरी देखभाल, त्यासाठी निधीची कमतरता, यामुळे सिंचन क्षमतेचा वापर नियोजनाप्रमाणे झालेला नाही. हा या परिच्छेदाचा आक्षेप आहे. सदर आक्षेप विभागाने स्विकारलेला आहे. परंतु जे अधिकारी यासाठी दोषी असतील त्यांच्यावर अद्यापपर्यंत कारवाई करण्यात आलेली नाही. या बाबी समितीने निदर्शनास आणून दिल्या, तसेच सदर प्रकरणे २००३ ची आहेत. आतापर्यंत विभागाने चौकशी का केलेली नाही ? जर अशा प्रकरणांवर चौकशीसाठी विलंब लागत असेल तर महालेखापालांनी काढलेल्या आक्षेपाला काहीच अर्थ राहणार नाही. सदर प्रकल्पाचे सन २००० मध्ये भूमिपूजन करण्यात आले. त्यासाठी अर्थसंकल्पामध्ये तरतूद करण्यात आली, १५ कोटी रुपयांमध्ये योजना पूर्ण होईल, असे सांगण्यात आले. सध्या सन २०१७ वर्ष चालू आहे, अद्यापपर्यंत याबाबत काहीच कारवाई केलेली नाही. सदर १५ कोटी रुपयांमध्ये प्रकल्पाचे पाणी नांदवड पर्यंत आणवयाचे होते. सदर प्रकल्पाच्या कामामध्ये कोणत्याही प्रकारचे नियोजन करण्यात आलेले नाही. यामध्ये विभाग पूर्णपणे अयशस्वी ठरलेला आहे. असे मत व्यक्त करुन या प्रकल्पाचे काम अपेक्षेप्रमाणे झालेले आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, या योजनेच्या संदर्भात निधीच्या उपलब्धतेचा विचार केला तर, या योजनेची स्थानिक मागणी ही जास्त प्रमाणात येते आणि त्या सर्व गोष्टींचा विचार करुन योजना घेतल्या जातात.

निधीची उपलब्धता हा विभागाचा विषय नाही. परंतु विभागाने जिल्हा आराखडे तयार केलेले नाहीत.तसेच विभागाने दिलेल्या उत्तरामध्ये असे नमूद केलेले आहे की,'त्यामुळे अशा प्रकारचे नियोजन करणे अडचणीचे ठरते, ही देखील वस्तुस्थिती नमूद करण्यात येत आहे. स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार प्रकल्प तयार करावे लागतात. त्यामुळे प्रस्पेक्टीव्ह प्लॅन प्रमाणे काम करणे अडचणीचे ठरते.' जल आराखडा करणे नियमानुसार बंधनकारक होते. तशाच प्रकारे जिल्हा आराखडा करणे नियमानुसार बंधनकारक आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, यामध्ये जे म्यॅनुअल आहे त्यानुसार शासनाच्या काही तरतुदी आहेत. त्यानुसार जलसंपदा विभागाच्या मार्फत आराखडे तयार करण्यात येतात. त्यामध्ये जलसंपदा विभाग हा आराखडा तयार करतो. यामध्ये चालू असलेल्या योजना प्रगतीपथावर नेणे आणि त्या पूर्ण करणे, असे काम असते. परंतु मुळ मुद्दा यामध्ये असा आहे की, १५ वर्षाचे प्रस्पेक्टीव्ह प्लॅनिंग करावयाचे असेल तर त्यासाठी निधीचा सुध्दा विचार करणे आवश्यक असते. जिल्हानिहाय आराखडे प्रकल्पासाठी करावेत या मुद्यावर महालेखापालांनी आक्षेप घेतलेला आहे. १५ वर्षाचा आराखडा तयार करतेवेळेस निधीच्या उपलब्धतेबाबत काय परिस्थिती आहे, याचा देखील विचार केला पाहिजे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

निधीचा विषय हा वेगळा आहे. विभागाने सांगितलेले आहे की, १५ वर्षाचा आराखडा तयार करण्यात येईल. आराखड्यांशिवाय प्रकल्पांचे काम करावे, असे विभागाच्या सचिवांचे मत आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता आराखडा तयार करण्यात येत असतो.सदर आराखडा वार्षिक आहे. तो १५ वर्षाचा नाही. १५ वर्षाचा आराखडा तयार करण्यात आलेला नाही. सध्या गोदावरीचा आराखडा तयार झालेला आहे. त्या आराखडयामध्ये या सर्व बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

१५ वर्षाचा आराखडा तयार केला तर त्यामध्ये निधीचा विषय येतो, असे सचिवांनी मत व्यक्त केलेले आहे. मागील १५ वर्षामध्ये लोकप्रतिनिधी आणि स्थानिक लोकांच्या मागण्यावरुन जी काही कामे केलेली आहेत, त्यासाठी निधी कुठून प्राप्त झाला ? सदर कामे ही अनपेक्षित झालेली असतात. जर १५ वर्षाच्या आराखडा तयार करण्यासाठी निधीची साशंकता वाटत असेल तर याचा अर्थ असा आहे की, जो निधी विभागाला मिळत असतो, तो आरखडयाप्रमाणे मिळत नाही. स्थानिक लोकांच्या आणि लोकप्रतिनिधींच्या मागण्याप्रमाणे खर्च करणे योग्य आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, अशी बाब नसल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

१५ वर्षाचा जो आराखडा तयार करावयास पाहिजे होता, तो केलेला नाही, यासाठी निधीची साशंकता असेल तर, मागील कालावधीत स्थानिक लोकांच्या आणि जनप्रतिनिधींच्या मागण्याप्रमाणे खर्चासाठी निधी कशा प्रकारे प्राप्त झाला? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाच्या सांगण्यामध्ये गफलत झालेली आहे. सदर आराखडा हा एक वर्षाचा आहे, जो जलसंपदा विभागाने तयार करावयाचा आहे असे विभागीय सचिवांनी विदित केले.

विभागाने दिलेल्या अभिप्रायामध्ये असे म्हटलेले आहे की, त्यामुळे अशा प्रकारचे नियोजन करणे अडचणीचे ठरते, ही देखील वस्तुस्थिती नमूद करण्यात येत आहे. याचा अर्थ काय ? आराखडा तयार करणा-या अधिका-यांना असे वाटत असेल की, आराखडा करणे चुकीचे आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता,त्यामध्ये १५ वर्षाचा आराखडा तयार करण्याचे काम हाती घेण्यात येईल असे म्हटलेले होते, असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

विभागाचे सचिव दोन्ही बाजूंनी बोलत आहेत. आराखडा तयार झाल्यानंतर कोणते काम हाती घ्यावयाचे, हे ठरविण्यासाठी डी.पी.डी.सी., आमदार शिफारस करु शकतात. आराखडयामध्ये जर १० कामे असतील तर त्यापैकी कोणती कामे घ्यावयाची हे खात्याचे मंत्री, विधानमंडळ ठरवेल.त्यामध्ये विभागाचा अधिकार नाही. सदर आराखडा हा जलसंपदाचाच आहे, आणि तो योग्य झालेला नाही, किंवा जलसंपदा विभागाने सदर आराखडा करणे योग्य आहे, किंवा जलसंपदा विभागाला शिफारस करण्यात येईल, असे उत्तर विभागांच्या सचिवांकडून समितीला अपेक्षित आहे. परिच्छेदामध्ये म्हटलेले आहे की, जिल्हा आराखडे तयार झालेले नाहीत. परंतु आता सचिवांनी जिल्हा आराखडे तयार करण्यात आलेले आहे, असे सांगितलेले आहे. महालेखाकार यांनी आक्षेप काढलेला आहे की, एकाही ठिकाणी जिल्हा आराखडा तयार नव्हता ही बाब समितीने निदर्शनास आणली असता, प्रत्येक जिल्ह्याचा जो आराखडा असतो तो तयार झालेला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने दिलेल्या उत्तरामध्ये सांगितलेले आहे की, १५ वर्षाचा आराखडा तयार करण्यात येईल. महालेखाकारांचा मूळ आक्षेप असा आहे की, आराखडे तयार झालेले नाहीत. परंतु विभागाने सांगितलेले आहे की, आराखडे तयार करण्यात येतील. समितीला विभागाचे उत्तर समर्पक वाटत नाही. जर आता आराखडे तयार करण्यात येत असतील तर आतापर्यंत झालेली कामे आराखड्याशिवाय झालेली आहेत काय ? तसेच, यासाठी जे कोणी जबाबदार अधिकारी असतील त्यांच्यावर काय कारवाई करण्यात येणार ? आराखडा तयार केला नसल्याचे विभागाने मान्य केले आहे. जल आराखडा तयार केला नसल्याप्रकरणी मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठ येथे पीआयएल याचिका दाखल करण्यात आली आहे. त्यानंतर गोदावरीच्या खो-यातील जल आराखडा तयार करण्यात आला आहे. परंतु तापी खो-यातील जल आराखडा अद्याप तयार करण्यात आला नाही. ज्या जिल्ह्यामध्ये सर्वाधिक आत्महत्या होतात तेथील प्रकल्पांचे काम थांबलेले आहे. माननीय उच्च न्यायालयाने निर्णय दिला आहे की, जोपर्यंत जल आराखडा तयार होणार नाही तोपर्यंत कोणतेही काम करण्यात येऊ नये. त्यासंदर्भात समिती गठीत करण्यात आली आहे. तापी खो-यातील जल आराखडा तयार करावयाचा आहे. अनुशेषग्रस्त जिल्ह्यातील सर्व प्रकल्प तापी खो-यात आहे. जल आराखडे तयार केलेले नसल्यामुळे सर्व कामे थांबविण्याचे निर्देश माननीय उच्च न्यायालयाने दिलेले आहेत. त्यामुळे हे प्रकरण किती महत्वपूर्ण आहे, हे विभाग समजू शकते. मागील दीड ते दोन महिन्यातील तापी खो-यातील जल आराखड्यांची परिस्थिती काय आहे, याच्या माहितीबाबत समितीने विचारणा केली असता, गोदावरी खो-यातील जल आराखडा तयार करण्यात आला आहे. तापी खो-याचा जल आराखडा तयार करण्याचे काम सुरु आहे. त्यासंदर्भात मागील महिन्यात एक बैठक घेण्यात आली होती, त्यावेळी जल आराखड्यासंदर्भात चर्चा झाली होती असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

विभागाने निधीची उपलब्धता नसल्याबाबत माहिती समितीला दिली आहे. परंतु प्रकल्पाच्या कामांसाठी निधी उपलब्ध असताना जल आराखडे नसल्यामुळे त्यावरील निधी खर्च करता येऊ शकत नाही. त्यामुळे राज्यातील सिंचन व शेतकरी यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. राज्यात शेतक-यांचे आत्महत्या करण्याचे प्रमाण वाढलेले आहे. त्याचे प्रमुख कारण आराखडा तयार न करता जलसंधारण विभागाने कामे केली आहेत.त्यामुळे शासनाने ७० ते ८० हजारकोटी रुपये खर्च करुनही सिंचन क्षमता ०.०१ टक्के इतकीच वाढलेली आहे. यासंदर्भातील आकडेवारी महालेखापालांनी दर्शविलेली आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात खर्च करुनही राज्यातील सिंचन क्षमता १७ ते १८ टक्क्यांपर्यंत जाऊ शकली नाही. या भोंगळ कारभाराचा परिणाम राज्यातील सिंचन क्षेत्राला व शेतक-यांना भोगावा लागत आहे. सदरहू प्रकरणी कोण जबाबदार आहे ? निधी उपलब्ध असताना देखील आराखडे नसल्यामुळे अनेक ठिकाणची सिंचनाची कामे हाती घेता आलेली नाहीत. यास जबाबदार कोण ? याप्रकरणी केवळ प्रश्न विचारुन चालणार नाही, सदरहू प्रकरणी जबाबदारी निश्चित करावी लागेल. आराखडे तयार नसताना कशाच्या आधारे खर्च करण्यात आला ? मागील १०-१५ वर्षामध्ये ७० ते ८० हजार कोटी रुपये निधी खर्च करुनही सिंचन क्षमता का

निर्माण होऊ शकली नाही, करण्यात आलेल्या कामांपैकी कोणतीही कामे पूर्ण करण्यात आलेली नाहीत ? उदाहणार्थ , गोसीखुर्द प्रकल्प ३७२ कोटी रुपयांचा होता तो आता १६ हजार कोटी रुपयांवर गेला आहे. जलसंधारण विभागाचे काही अपूर्ण प्रकल्प आराखड्यासाठी नव्हे तर निधी अभावी थांबलेले आहेत. देखभाल दुरुस्ती प्रकरणी विभागाला निधीची कमतरता असल्याने कालव्यांची किंवा भूसंपादनाची कामे झालेली नाही. विभागाच्या साक्षी दरम्यान एक बाब लक्षात घेतली पाहिजे की, विभागाला निधीची कमतरता असल्याने सर्व प्रकल्पांची कामे अर्धवट झालेली आहेत. परंतु आराखडा करण्याची आवश्यकता असेल तर त्याची निश्चित कालमर्यादा ठरविणे आवश्यक आहे. एका बाजूला विभागाचे अधिकारी सांगत आहेत की, निधी उपलब्ध नाही. दुस-या बाजूला कामांसाठी निधी उपलब्ध असताना तो खर्च करण्यात येत नाही. विदर्भातील ११ जिल्ह्यातील कामांवर विभागाने केवळ २३२ कोटी रुपये निधी खर्च केला आहे.विभागाने व्हीआयडीपीचा प्रोग्राम हाती घेतला होता व त्यासाठी ते निधी मिळवू शकले नाही व त्यामुळे त्यांना खर्च करता आला नाही, असे मत समितीने व्यक्त केले.

सन २००० मध्ये सरकारने पंचवार्षिक विकास आराखडा तयार करण्यासंदर्भात कायदा केला आहे. त्यानुसार जलसंधारण विभागाने पंचवार्षिक विकास आराखडा तयार करताना त्यावर आधारित रेशीम उद्योग, मत्स्यव्यवसाय, उद्यान संदर्भातील लहान प्रकल्प तयार करुन ते पूर्ण करण्यासाठी वित्त विभागाकडे पाठपुरावा केला पाहिजे. अशा प्रकारे विकास आराखडा तयार करण्यात येत नसल्यामुळे सदर कायदा तयार करण्यात आला व उक्त बाबी त्यामध्ये बंधनकारक करण्यात आल्या. त्या कायद्यास विभागाने जुमानले नाही. अधिकारी विषय टाळून वेगळी उत्तरे देत असतात त्याप्रमाणे विभागाच्या अधिका-यांनी उत्तर दिले आहे. विभागाने केलेल्या वार्षिक नियोजनाच्या कामांसाठी देखील पूर्ण निधी मिळालेला नाही. विभागाला पंचवार्षिक योजनेकरिता निधी प्राप्त होईल की नाही, याबाबत मनामध्ये शंका होती. विभागाने वार्षिक नियोजनाची जी कामे केली आहेत त्याचा निधी देखील पूर्ण प्राप्त झालेला नाही. ते प्रकल्प अर्धवट अवस्थेत आहेत. अधिकारी ३ वर्षासाठी एका विभागामध्ये काम करतात त्यानंतर त्यांची बदली होते. पंचवार्षिक योजनेकरिता निधी मिळविण्याकरिता नियोजन विभाग व वित्त विभागाकडे पाठपुरावा करावा लागतो. ही सर्व कार्यवाही सुरु असताना अधिका-याचा दीड ते दोन वर्षाचा कालावधी निघून गेलेला असतो. त्यामुळे एक-एक वर्षाचा वार्षिक आराखडा तयार करुन मिळेल तेवढा निधी प्राप्त करुन घेण्यात येतो. कामे अर्धवट झाली तरी हरकत नाही, पुढील वर्षी दुसरी कामे घेण्यात येतील, अशी अधिका-यांची भावना असते. या भावनेने सन २००० ते सन २०१५ पर्यंत वार्षिक नियोजनाची कामे हाती घेण्यात आली व ती अपूर्ण ठेवली. विभागाने एमडब्ल्यूसीसी द्वारे प्रकल्पाचे नियोजन या मुद्याबाबत माहिती दिली आहे. विभागाला पंचवार्षिक योजनेचा निधी प्राप्त करुन घेता आला नाही व वार्षिक नियोजनाचाही निधी प्राप्त करुन घेता आला नाही. त्यास कायद्याचा आधार नाही, नियम नाही, अटी व शर्ती नाहीत, त्यास कोणाची मंजूरी नाही. एक-एक वर्षाचे नियोजन करण्यासाठी कोणाची मंजूरी घेण्यात आली होती, शासनाची मंजूरी घेण्यात आली होती काय, कोणत्या स्तरावरुन मंजूरी देण्यात आली होती ? अशी विचारणा समितीने केली असता, जलसंधारण महामंडळाचे अध्यक्ष माननीय जलसंधारण मंत्री आहेत व उपाध्यक्ष माननीय जलसंधारण राज्यमंत्री आहेत असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

महामंडळाचे अध्यक्ष कोण आहेत, या माहितीशी समितीचा काही संबंध नाही. सन २००० मध्ये कायदा मंजूर करण्यात आला आहे.मंत्री महोदयांचे विभागाने आदेश घेतले असतील तर कायद्यापेक्षा अधिक अधिकार मंत्री महोदयांना असतात का ? अशी विचारणा समितीने केली असता, महामंडळ स्तरावरुन योजनांना मंजूरी देण्यात येते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

५ वर्षांच्या नियोजना संदर्भात विभाग साशंक आहे. एक-एक वर्षाच्या वार्षिक योजना केल्या त्यापैकी किती योजना पूर्ण झालेल्या आहेत, त्या क्षमतेने लोकांना पाणी उपलब्ध झाले नाही, अशा किती योजना आहेत, त्यासाठी किती खर्च झाला, याबाबतची माहिती विभागाच्या अधिका-यांकडे नसेल तर त्यांनी समितीला ती नंतर सादर करावी. विभागाने केलेले नियोजन सफल झाले नाही परंतु खर्च झाला आहे. त्यामुळे ही नियोजित व संघटीत गुन्हेगारी आहे असे मत समितीने व्यक्त करुन, ४४४ मंजूर प्रकल्पापैकी ९७ प्रकल्पावर एकूण रक्कम रूपये ४.९६ कोटी खर्च करण्यात आली आहे व निधीच्या कमतरतेमुळे प्रकल्प बंद करण्यात आले. त्यामुळे झालेला खर्च वायफळ गेला. याप्रकरणी दोषी कोण आहे ? प्रकल्पांची संख्या ९७ आहे की ९६ आहे ? अशी विचारणा समितीने व्यक्त केली असता प्रकल्पांची संख्या ९६ आहे असे विभागीय सचिवांनी विदित केले.

९६ पैकी ६१ प्रकल्प रद्द करण्यात आले. उर्वरित ३५ प्रकल्प प्रगतीपथावर आहेत की रद्द करण्यात आले आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता, ६१ प्रकल्प रद्द करण्यात आले आहेत. ३५ प्रकल्पांवर एकूण रक्कम रूपये ४.५ कोटी खर्च करण्यात आली असून ते प्रगतीपथावर आहेत, प्रलंबित आहेत. १४ प्रकल्पांवर ९९ लाख रुपये रक्कम खर्च करण्यात आली आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

एकूण ३५ प्रकल्पांवर ४ कोटी ८६ लक्ष रुपये रक्कम खर्च करण्यात आली आहे व १४ प्रकल्पांवर ९९ लक्ष रुपये खर्च करण्यात आला आहे. सदर १४ प्रकल्पांची ३५ प्रकल्पांतून विभागणी का करण्यात आली ? अशी विचारणा समितीने केली असता, या प्रकल्पावर झालेल्या खर्चाच्या उदाहरणादाखल सांगतांना सोम फायनान्स योजनेंतर्गत नांदेड जिल्ह्यातील भूसंपादनासाठी ३७ लक्ष रुपये खर्च झाला आहे असे विभागीय सचिवांनी विदित केले.

उक्त ३५ प्रकल्पांचे काम अद्याप सुरु आहे काय, ते रद्द करण्यात येणार आहेत काय ? सदरहू प्रकल्प पूर्ण करण्यासाठी विभागाकडून निधीची मागणी करण्यात येणार आहे काय, सदरहू योजना रद्द करण्यात येणार आहेत काय, असाल तर त्यावर ४.८६ लक्ष रुपये खर्च केले आहेत त्यास जबाबदार कोण? अशी विचारणा समितीने केली असता, सद्यःस्थितीमध्ये उक्त प्रकल्प रद्द करण्यात आले नसून स्थगित ठेवण्यात आले आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

छानन्नी योजना निधी अभावी स्थगित करणार असून त्यापैकी ६१ योजना सद्यःस्थितीत रद्द करण्यात आल्या, अशी माहिती विभागाने स्पष्टीकरणामध्ये नमूद केली आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, ९१ प्रकल्पांपैकी ६१ प्रकल्प रद्द केले असून ३५ प्रकल्प सुरु आहेत असे विभागीय सचिवांनी विदित केले.

सुरुवातीला विभागाच्या सचिवांना प्रश्न विचारला असता त्यांनी सर्व प्रकल्प स्थगित केले आहेत, अशी माहिती समितीला दिली आहे. ६१ प्रकल्प रद्द करण्यात आले, त्यावर किती खर्च झालेला आहे ? विभागाने जे ६१ प्रकल्प रद्द केले ते कोणत्या स्तरावर होते, त्यासंदर्भात निविदा काढण्यात आली होती काय ? अशी विचारणा समितीने केली असता, त्यावर काहीही खर्च करण्यात आला नाही.सदरहू ६१ प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता दिली होती व ३८ प्रकल्पापैकी काही प्रकल्प निविदा स्तरावर होते. अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

प्रकल्पांची व्यवहार्यता नसताना त्यास प्रशासकीय मान्यता कोणत्या आधारावर देण्यात आला? नवीन योजनेकरिता निधी उपलब्ध नसताना योजना हाती घेण्याचे कारण काय ? अशी विचारणा समितीने केली असता, प्रकल्पांच्या व्यवहार्यतेचा प्रश्न नाही. योजनेकरिता निधी उपलब्धतेबाबत अडचण आहे.जलसंधारण महामंडळाने निधी उपलब्ध होऊ शकणार नाही याचा विचार करुन २,३०० योजना रद्द केल्या आहेत असे विभागीय सचिवांनी विदित केले.

सदरहू योजनांमध्ये अनुशेषग्रस्त भागातील योजना आहेत काय ? अशी विचारणा समितीने केली असता, जलसंधारण महामंडळाने आज रोजी एकूण १,२९० प्रकल्प हाती घेतलेले असून त्याचे दायित्व १,४७६ कोटी रुपये आहे. यावर्षी शासनाकडून केवळ १९१ कोटी रुपये निधी प्राप्त झाला आहे. हा दायित्व एकूण निधीच्या केवळ १० ते १२ टक्के एवढाच आहे. पुरेसा निधी मिळत नसल्याने मागील २ वर्षापूर्वी २,३०० योजना रद्द करण्यात आल्या असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

जलसंधारण हा विषय राज्यभराच्या संदर्भातील आहे, त्यामध्ये सर्व सन्माननीय सदस्यांच्या मतदार संघातील प्रकल्पांचा समावेश आहे. जलसंधारण विभागास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत समितीने शासनास शिफारस करणे आवश्यक आहे. विभागाकडे एकूण तीन ते साडेतीन हजार कोटी रुपयांचे प्रकल्प असून ते सर्व सन्माननीय सदस्यांच्या मतदार संघातील आहेत. विभागाला दरवर्षी प्राप्त होणा-या १०० ते २०० कोटी रुपये निधीतून राज्यातील प्रकल्पांना प्रसाद वाटल्या प्रमाणे निधी वाटप करावे लागते. विभागाने प्रशासकीय आराखडा तयार करताना किंवा प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देताना व्याप्ती लक्षात घेऊन मान्यता द्यावी. राजकीय दबावामुळे किंवा प्रशासकीय दबावामुळे विभागाकडून प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देण्यात येते. सदरहू प्रकल्प पूर्ण करण्यासाठी निधी उपलब्ध होत नाही असे मत समितीने व्यक्त केले व एकूण ३५ प्रकल्पांना देण्यात आलेली प्रशासकीय मान्यता किती रुपयांची आहे, ३५ पैकी १४ प्रकल्पांना देण्यात आलेली प्रशासकीय मान्यता किती रुपयांची आहे, उर्वरित २१ प्रकल्पांची प्रशासकीय मान्यता किती रुपयांची आहे, या योजनेच्या संदर्भात विभागाचे पुढील नियोजन काय आहे, सदर प्रकल्पावरील खर्च निष्फळ होणार की प्रलंबित प्रकल्प हाती घेण्यात येणार आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, निधीच्या उपलब्धतेअभावी योजना स्थगित ठेवण्यात आल्या आहेत. ६१ योजना रद्द करण्यापूर्वी २,३०० योजना रद्द करण्यात आलेल्या आहेत असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

विभागासाठी २०० कोटी रुपये तरतूद असताना १,४०० कोटी रुपयांच्या प्रकल्पांना कशी मान्यता दिली ? यासंदर्भात महालेखाकारांचा आक्षेप आहे. निधीची तरतूद नसताना २०० कोटी रुपयांच्या प्रकल्पांना ज्यांनी मान्यता दिली त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात येणार आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, सन २००० मध्ये स्थापन झालेल्या महामंडळ स्तरावर प्रकल्पांना मंजूरी देण्यात आली आहे. महामंडळाचे अध्यक्ष मंत्री महोदय आहेत. महामंडळाच्या संचालक मंडळाने सदरहू प्रकल्पांना मंजूरी दिली आहे असे विभागीय सचिवांनी विदित केले.

शासनाने अर्थसंकल्पीय तरतूदी संदर्भात धोरणात्मक निर्णय घेतला आहे. लघुसिंचनाच्या प्रकल्पांना निधी देताना सरकारने काही निकष लावला आहे काय ? लघुसिंचनाच्या प्रकल्पांना निधीच्या उपलब्धतेचा विचार न करता एका पाठोपाठ मंजूरी दिली गेली. जे प्रकल्प पूर्णत्वाच्या स्टेजला आहेत, अशा प्रकल्पांसाठी निधी देऊन ते पूर्ण करुन घ्यावेत, असा निर्णय झालेला आहे. त्याच धर्तीवर जे छोटे छोटे सिंचन प्रकल्प आहेत त्याबाबत या शासनाने काही निर्णय घेतला आहे का ? या समितीच्या प्रश्नाबाबत,तशा प्रकारचा धोरणात्मक निर्णय झाला नसला तरी निधी वितरणाची एक कार्यपध्दती आहे व त्यामध्ये असाच प्रयत्न केला जात असतो. निधी वितरित करीत असताना सर्वप्रथम भूसंपादनाला प्राधान्य दिले जाते, त्यानंतर ज्या प्रकल्पाचे काम ७५ टक्क्यांपेक्षा अधिक झाले आहे त्यांना प्राधान्य दिले जाते अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

विभागीय सचिवांचे असे मत आहे की,जे प्रकल्प मंजूर झाले आहेत ते महामंडळाच्या स्तरावर झाले असून या महामंडळाचे अध्यक्ष संबंधित विभागाचे मंत्री महोदय आहेत. हे निर्णय बोर्डाने घेतलेले आहेत. बोर्डाने निर्णय घेतले असल्यामुळे त्याबाबत विभाग आक्षेप घेऊ शकत नाही. फक्त अडचण ही आहे की, मंजूर झालेल्या प्रकल्पांना शासनाकडून निधी उपलब्ध होत नाही.बोर्डाचे अध्यक्ष या नात्याने संबंधित मंत्री महोदयांनी हे निर्णय घेतले आहेत. परंतु, मंत्री महोदयांकडे नस्ती जाण्यापूर्वी सचिवांनी त्या नस्तीमध्ये प्रस्तावाबाबत आपले अभिप्राय व्यक्त केले असतील. त्यामुळे सचिवांनी या प्रस्तावाबाबत सकारात्मक शेरे नमूद केले होते की, नकारात्मक केले होते, याचाही खुलासा होणे आवश्यक आहे. त्यांनी जर हा प्रस्ताव नियमात बसणारा नाही, असा शेरा नमूद केला असेल तर समितीला वेगळी चर्चा करता येईल असे मत समितीने व्यक्त केले असता,महामंडळाच्या नस्त्या सचिवांमार्फत सादर केल्या जात नाहीत. महामंडळाच्या पातळीवर महामंडळाचे कार्यकारी संचालक यांच्यामार्फत त्या बोर्डाला सादर होत असतात. जलसंधारण विभागाच्या माध्यमातून ज्या कामांना प्रशासकीय मान्यता दिली जाते त्या कामांच्या नस्त्या सचिवांना सादर होत असतात. विभागाच्या माध्यमातून नस्त्या सादर होत असताना निधीची उपलब्धता व आतापर्यंतचे अन्य प्रकल्पांचे दायित्त्व याबाबतचे अभिप्राय स्पष्टपणे नस्तीमध्ये नमूद केले जातात असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

महामंडळ हे कंपनी कायद्यानुसार नोंदणीकृत झाले आहे. महामंडळाने त्यांच्या पातळीवर निर्णय घेतल्यानंतर अंमलबजावणी करण्याची जबाबदारी प्रशासकीय अधिका-यांची आहे. त्यामुळे या प्रकल्पांना मान्यता देत असताना प्रशासकीय अधिकारी किंवा अंमलबजावणी यंत्रणा म्हणून कार्यकारी संचालक यांनी कोणते अभिप्राय व्यक्त केले होते ? अशी विचारणा समितीने केली असता, कार्यकारी संचालकांनी निश्चितपणे त्यांचे योग्य अभिप्राय नमूद केले असतील असे विभागीय सचिवांनी सांगितले.

या प्रकरणाबाबत कार्यकारी संचालक यांनी कोणते मत मांडले होते ? महामंडळाने सुमारे १४०० कोटी रुपयांचे प्रकल्प मंजूर करीत असताना निधीची अनुपलब्धता आणि अन्य बाबी महामंडळाच्या निदर्शनास आणून दिल्या होत्या का ? जरी प्रशासकीय अधिका-यांनी नकारात्मक शेरे नमूद केले तरीही राजकीय अपरिहार्यता म्हणून लोकप्रतिनिधी स्वतः प्रकल्प मंजुरीसाठी आग्रह धरीत असतात. शहरी आणि ग्रामीण भागातील परिस्थिती वेगळी आहे. त्यामुळे ही बाब लक्षात घेऊन प्रशासकीय अधिका-यांनी नकारात्मक अभिप्राय नमूद केले तरी मंत्री महोदय खास बाब म्हणून मंजुरी देत असतात. एखाद-दुसरा प्रकल्प खास बाब म्हणून मंजूर केला तर समजणे शक्य आहे. परंतु, १४०० कोटी रुपयांचे प्रकल्प मंजूर केले आहेत आणि त्यासाठी निधी उपलब्ध नाही. काही प्रकल्प अर्धवट स्थितीत आहेत आणि त्यावर केलेला खर्च निष्फळ ठरण्याची शक्यता आहे. लोकप्रतिनिधी म्हणून जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आपण प्रकल्प मंजूर करण्याचा आग्रह धरीत असतो.मंत्री महोदय महामंडळाचे अध्यक्ष आहेत. त्यांनी एखादा प्रकल्प मंजूर केल्यानंतर कार्यकारी संचालक किंवा सचिव काय करणार? मंत्री महोदयांनी निर्णय घेतला असेल तर समितीची काही हरकत नाही. परंतु, प्रकल्प मंजूर करीत असताना निधीची अनुपलब्धता आणि अन्य बाबी प्रशासकीय अधिकारी म्हणून कार्यकारी संचालक यांनी मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिल्या होत्या किंवा नाही, याबाबतचा खुलासा व्हावा एवढीच समितीची अपेक्षा आहे. निश्चितपणे लोकप्रतिनिधी आग्रह धरीत असतात आणि मंत्री महोदय खास बाब म्हणून प्रकल्प मंजूर करीत असतात. परंतु, या सर्व प्रकल्पांना शासनाकडून निधी मिळाला पाहिजे, अशी समितीची भूमिका आहे.

महालेखाकार यांच्या लेखापरीक्षण अहवालातील आक्षेपार्ह परिच्छेदांवर चर्चा व्हावी, काही चुकीचे घडले असेल तर ते शासनाच्या निदर्शनास आणून दिले जावे, संबंधित दोषी अधिका-यांवर कारवाई व्हावी आणि पुढील काळात या चुका घडू नयेत, हे या समितीचे मुख्य काम आहे. राज्याचे अर्थसंकल्प २ लाख कोटी रुपयांचे असेल आणि १० लाख कोटी रुपयांची कामे यंत्रणेने सुरु केली तर चालेल का ? या महामंडळाने मंजूर केलेल्या प्रकल्पांबाबत हीच परिस्थिती निर्माण झाली आहे. कायदा, नियम, शासकीय आदेश या बाहेरील काही कृती घडली असेल तर त्याची शहानिशा करणे, हेच लोकलेखा समितीचे काम आहे.

मंत्री महोदयांनी महामंडळाचे अध्यक्ष या नात्याने निर्णय घेतलेला आहे म्हणून जर समितीने अशा प्रकरणांवर चर्चा करायची नाही, असे ठरविले तर मग असे लेखापरीच्छेद चर्चेलाच येणार नाहीत. कार्यपध्दतीमध्ये सुधारणा करण्यासाठी समिती आहे.

जलसंपदा विभागाच्या ५०० हजार कोटी रुपयांच्या प्रकल्पांना मान्यता दिलेली आहे परंतु, केवळ १० हजार कोटी रुपयांचा निधी उपलब्ध आहे. अकोला जिल्हयातील कारंजा मतदारसंघात अनेक रस्त्यांची कामे मंजूर असताना १५ टक्के निधी देखील त्या कामांसाठी उपलब्ध होत नाही. ५ वर्षे लोकप्रतिनिधी काम करीत असतात. प्रकल्प मंजूर करुन घेण्यासाठी प्रयत्न करतात आणि ते मंजूर झाल्यानंतर निधी मिळेल, अशी अपेक्षा असते. परंतु, निधीच नाही म्हणून प्रकल्प मंजुरीसाठी प्रयत्न करावयाचे नाहीत किंवा ते मंजूर करावयाचे नाहीत, असे होत नाही. कोणतेही सरकार असले तरी प्रशासकीय कारभार अशाच प्रकारे होत असतो. पूर्वीची मंजूर झालेली कामे पूर्ण होत नाही तोपर्यंत कोणत्याही नवीन कामांना मंजुरी देऊ नये, असे केले तर मतदारसंघातील एकही काम होणार नाही आणि ती वस्तुस्थिती आहे. त्यामुळे या विषयावर चर्चा होण्याऐवजी राज्य शासनाने प्रकल्प पूर्ण करण्यासाठी निधी वाढवून द्यावा, अशा प्रकारची शिफारस समितीने शासनाला करावी लागेल.महामंडळाचे अध्यक्ष त्या विभागाचे मंत्री महोदय असतात आणि त्यांना अधिकार देखील आहेत. अधिका-यांनी अभिप्राय दिल्याशिवाय कामांना मंजुरी मिळत नाही. त्यामुळे सर्व जबाबदारी मंत्री महोदयांवर टाकून चालणार नाही. जर निर्णय चुकीचा असेल तर त्यास प्रशासकीय अधिका-यांना देखील जबाबदार धरले पाहिजे. असे मत व्यक्त करून ३५ प्रकल्पांना दिलेली प्रशासकीय मान्यता, मंजूर झालेला निधी, याबाबतची माहिती देण्यास समितीने सूचित केले असता, या ३५ प्रकल्पांना सन २००५-२००६ या वर्षात १६० कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. काही प्रकल्पांना सन २००८-२००९ ते सन २०१३-२०१४ या कालावधीतही मान्यता देण्यात आली आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

प्रकल्पाची किंमत प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आलेल्या वर्षातील आहे. सद्यःस्थितीत या प्रकल्पांची किंमत किती आहे ? या समितीच्या प्रश्नाबाबत आज रोजी या प्रकल्पांचे दायित्त्व २०० कोटी रुपये एवढे आहे. म्हणजे, हे प्रकल्प आज पूर्ण करावयाचे असतील तर २०० कोटी रुपये लागतील असे विभागीय सचिवांनी सांगितले.

२०० कोटी रुपयांमधील ४ कोटी ८६ लक्ष रुपये विभागाने आतापर्यंत खर्च केले आहेत? अशी विचारणा समितीने केली असता, खरे तर ९९.६८ लक्ष रुपये खर्च झालेला आहे. परंतु, महालेखाकारांच्या म्हणण्यानुसार ४ कोटी ८६ लक्ष रुपये खर्च झाला आहे. ही बाब तपासण्यात येईल असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

३५ प्रकल्पांपैकी केवळ १४ प्रकल्पांवर खर्च झाला असून तो ४ कोटी ८६ लक्ष रुपये नसून ९९.६८ लक्ष रुपये एवढा आहे असे मत समितीने व्यक्त केले असता,या आकडेवारीची पडताळणी करुन समितीला सादर करण्यात येईल, विभागाच्या म्हणण्यानुसार आतापर्यंत ९९.६८ लक्ष रुपये खर्च झाले आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

महालेखाकार यांच्या म्हणण्यानुसार ४.८६ लक्ष रुपये खर्च झाले आहेत. या संदर्भात विभागाने पूर्ण तपासणी करावी आणि वस्तुस्थिती समितीला सादर करावी असे समितीने सूचित केले व आतापर्यंत जेवढा खर्च झाला तेवढ्या खर्चात किती क्षेत्राला पाणी उपलब्ध झाले आहे ? अशी विचारणा समितीने केली असता,साधारणपणे १४०० हेक्टर क्षेत्राला पाणी मिळाले आहे. जलसंधारणाच्या कामांमुळे अप्रत्यक्ष सिंचन देखील होत आहे. पाझर तलाव, गाव तलाव या माध्यमातून १७ लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झालेली आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

यामध्ये ४८०० हेक्टर क्षमता निर्माण झाल्याचे दिसून येत आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, १८ प्रकल्प पूर्ण झाले असून त्यामधून ४८०० हेक्टर क्षमता निर्माण झाली आहे असे विभागीय सचिवांनी विदित केले.

अनेक ठिकाणी कोल्हापूर बंधा-यांना दरवाजे नाहीत, असे चित्र आहे. विभागाने या बंधा-यांसाठी खर्च केलेला आहे. परंतु, दरवाजे नसल्यामुळे पाणी साठा करता येत नाही. या संदर्भात विभागाने काही नियोजन केले आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता, राज्यात के.टी.वेअरची जवळपास १० हजार स्ट्रक्चर्स आहेत. परंतु, दरवाजे चोरीला जाणे, वेळेवर दरवाजे न लावणे, अशी सर्वसामान्य कारणे आहेत. एका गेटसाठी ५० ते ६० हजार रुपये खर्च येतो. हा खर्च कसा भागवावा, याबाबत विचारविनिमय सुरु आहे. आता ३१७ कोटी रुपयांचा दुरुस्तीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. हा निधी उपलब्ध झाल्यास एकदा दुरुस्ती करुन देण्याचा प्रयत्न करण्याचे प्रस्तावित आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

पाणी वापर संस्था तयार आहेत का? प्रकल्प हाती घेण्यापूर्वी पाणी वापर संस्था स्थापन झाल्या पाहिजेत. प्रकल्प पूर्ण करण्यात विभागाला स्वारस्य असते. ज्यावेळी प्रकल्प हाती घेण्यात येतो त्यावेळीच संस्था स्थापन झाल्या पाहिजेत. परंतु, संस्था स्थापन होत नाहीत व त्यामुळे प्रकल्पाचा उद्देश पूर्ण होत नाही असे मत समितीने व्यक्त केले असता, माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये या संदर्भातील कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे. प्रकल्प हाती घेण्यापूर्वी पाणी वापर संस्था स्थापन करणे अनिवार्य ठरविण्यात आले आहे. या संदर्भातील मार्गदर्शक सूचना ऑगस्ट, २०१७ मध्ये निर्गमित करण्यात आल्या आहेत असे विभागीय सचिवांनी विदित केले.

० ते २५० हेक्टरपर्यंतच्या प्रकल्पांचे नियोजन डी.पी.सी.ने करावयाचे आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता, ० ते २५० हेक्टरपर्यंतच्या प्रकल्पांना राज्य स्तरावरुन मंजुरी दिली जाते व निधी उपलब्ध करुन दिला जातो असे विभागीय सचिवांनी सांगितले.

डी.पी.सी.मध्ये २५ टक्के निधी जलसंपदासाठी आरक्षित केला जातो व त्यामध्ये जलसंधारणाच्या कामांचा देखील समावेश आहे. असे मत व्यक्त करुन ३५ प्रकल्पांसंबंधातील आकडेवारी समितीला टॅली करून द्यावी असे समितीने सूचित केले असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली.

**परिच्छेद क्र.२.१.६.२ - VIIDP अंतर्गत प्रकल्पांचे नियोजन**

विदर्भ सिंचन कार्यक्रमासाठी विभागास रूपये ३२५०.०० कोटी इतका निधी देण्यात आला होता. या निधीचे विभागाने नियोजन देखील केलेले नाही ही बाब समितीने निदर्शनास आणली असता, हा जो पूर्ण प्रकल्प होता त्यास जलसंधारण विभागाने मान्यता दिली होती. एकूण रूपये ३२५० कोटी रूपयांचा कार्यक्रम मंजूर करण्यात आला होता. त्यापैकी रूपये १४५९ कोटी इतका निधी हा लघु सिंचन योजनेकरिता मंजूर करण्यात आला होता. हा आरकेवाय मधील निधी होता. हा निधी केंद्र शासनाकडून येत होता. सदर कार्यक्रम हा सन २०१२ मध्ये सुरू झाला. सन २०१२ ते २०१७ असा हा ५ वर्षाचा हा कार्यक्रम होता. या कार्यक्रमाचे डीपीआर शासनाकडून मंजूर झाले आहेत. यासाठी माननीय मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली स्टेट लेव्हल सॅक्शनिंग कमिटी नेमण्यात आली होती. ही समिती डीपीआरला मान्यता देत होती. असे विभागाने ९१२ कोटी रूपयांचे ३ डीपीआर मंजूर केले आहेत. त्यात ५८९८ योजना आहेत. रूपये ९५२ कोटी रूपयांपैकी रूपये ५९५ कोटी इतक्या निधीला प्रत्यक्षात मान्यता देण्यात आलेली आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

विभागास रूपये ९१२ कोटी ऐवजी रूपये ५९५ कोटी इतका निधी मिळालेला आहे. याचा अर्थ आपणास निधी कमी मिळालेला आहे. एवढा कमी निधी देण्याचे कारण काय आहे, विभागाने प्रकल्प कमी केला आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, सदर निधी हा केंद्र शासनाकडून येत होता. निधी न आल्यामुळे नंतरच्या कालावधीत प्रकल्प कमी करण्यात आले. आता विभागाने रूपये ९१२ कोटीच्या अगेन्स्ट रूपये ५९५ कोटी रूपयाला मान्यता दिलेली आहे. प्रत्यक्षात विभागाने रूपये ३३१ कोटी रूपयांच्या निविदा काढलेल्या आहेत. तसेच रूपये २३३ कोटी १७२४ योजनांवर खर्च केले असून त्या योजना पूर्ण झालेल्या आहेत. सन २०१५-२०१६ मध्ये विभागाला निधी उपलब्ध झालेला आहे. त्यानंतर सन १३ सप्टेंबर २०१७ मध्ये असा निर्णय घेण्यात आला की, निविदा झालेले प्रकल्प आहेत परंतु, निधी अभावी पूर्ण होऊ शकत नाही असे सर्व प्रकल्प विभागाने राज्य स्तरावर, महामंडळाकडे व राज्य शासनाकडे वर्ग करावेत अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली. **(विवरण क्र.१)**

३१ मार्च २०१७ ची आकडेवारी पाहिली असता त्यावरून असे दिसून येते की, जलसंधारण विभागाचे पैसे सरेंडर करण्यात आले आहेत ही वस्तुस्थिती आहे काय ? हे कोणाचे अपयश आहे. एका बाजूला निधी कमी मिळाला असता जास्त निधीची अपेक्षा करण्यात येते आणि दुस-या बाजूला आपल्याकडे निधी असताना तो खर्च करू शकलो नाही, यात कोणाचे अपयश आहे? अशी विचारणा समितीने केली असता, आता विभागाला निधी वितरणामध्ये काही बाबी करावयाच्या आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

जलसंधारण विभागाचा फार अजब कारभार आहे. राज्य सरकार हे विभागवार चालते. विभागाकडून प्रशासकीय मान्यता देण्यात आणि बिल मंजूर केल्यानंतर ते पुन्हा मान्यतेसाठी मंत्रालयामध्ये येते. प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर कार्यादेश काढल्यानंतर निधी का उपलब्ध करून दिला जात नाही. ते बिल मंजुरीसाठी पुन्हा मंत्रालयात का पाठविण्यात येते ? मंत्रालयात बिले न आल्यामुळे तो निधी व्यपगत झाला आहे ही बाब समितीने निदर्शनास आणली असता, या कार्यपद्धतीमध्ये बदल करण्याच्या प्रयत्नात विभाग आहे. वर्षाच्या सुरूवातीलाच विभागाने क्षेत्रिय स्तरावर अधिका-यांना किती निधी उपलब्ध होणार आहे हे सांगून त्यांच्यावर जबाबदारी निश्चित केली तर त्या अधिका-यांना जबाबदार धरता येईल. तसा बदल या वर्षापासून करण्याचा विभागाचा प्रयत्न आहे. निधी हा वर्षाच्या सुरूवातीला किंवा फार तर एक-दोन महिन्यांमध्ये मंडल निहाय किती निधी उपलब्ध होईल याची माहिती क्षेत्रिय स्तरावर दिली तर हा प्रश्न उद्‌भवणार नाही असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

VIIDP अंतर्गत रूपये ३२५० कोटी रूपयांचा प्रकल्प मंजूर झाला होता. त्यानंतर आपण ९०० कोटी रूपयांचे प्रस्ताव सादर केले यासाठी केंद्र शासनाने ५०० कोटी रूपये मान्य केले. आपण ३०० कोटी रूपयांचे टेंडर काढले. तो निधी देखील विभाग पूर्ण आणू शकलेला नाही. सन २०१५-१६, २०१६-१७ मध्ये निधी आलेला नाही. यास कोण जबाबदार आहे.यासाठी कोणती कारणे होती ? अशी विचारणा समितीने केली असता, ज्याप्रमाणे विभागाकडून मागणी करण्यात येत होती त्याप्रमाणे केंद्र शासनाकडून निधी उपलब्ध होत होता असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

विभागाने ३०० कोटी रूपयांची निविदा काढली, कार्यादेश काढला. काम सुरू करण्यात आले. ते काम अर्धवट आहे. त्यामुळे आता यात शासनाची जबाबदारी आली. विभागाने सन २०१५-१६, २०१६-१७ मध्ये एक रूपया देखील आणलेला नाही. ही बाब समितीने निदर्शनास आणून, निधी मागण्यामध्ये विभाग अपयशी ठरला असे वाटत नाही काय ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाने निधीची मागणी वेळोवेळी केली होती.सन २०१६-१७ मध्ये काहीच निधी मिळालेला नाही. सन २०१५-१६ मध्ये विभागाला ३७ कोटी रूपये निधी मिळालेला आहे. विभागाला जास्तीत जास्त निधी हा सन २०१४-१५ मध्ये मिळालेला आहे. त्या वर्षी रूपये १०८ कोटी इतका निधी मिळालेला आहे असे विभागीय सचिवांनी विदित केले.

विभागाला रूपये ३२५० कोटींचा मोठा कार्यक्रम मिळाला होता. त्यासाठी विभागाने निधी देखील मंजूर करून घेतलेला नाही. तसेच जो कार्यक्रम मंजूर करून घेतला त्यासाठी निधी देखील आणलेला नाही. त्यामुळे यात जलसंधारण विभागाचे पूर्णपणे अपयश आहे. अनेक राज्यांना केंद्र शासनाकडून निधी येतो. तो निधी प्राप्त करून घेण्यासाठी राज्यांनी अधिका-याची नियुक्ती केली आहे. जलसंधारण विभागाने केंद्र शासनाकडून निधी प्राप्त करून घेण्यासाठी अधिका-याची नियुक्ती केली आहे काय किंवा एखाद्या अधिका-यावर केंद्र शासनाकडून निधी आणण्यासाठी जबाबदारी टाकली आहे काय ? या समितीच्या प्रश्नाबाबत, हा निधी राष्ट्रीय कृषी विकास योजने अंतर्गत येत होता. याचे नोडल डिपार्टमेंट हे कृषी विभाग आहे. ३२०० रूपयांचा जो प्रकल्प आहे त्यात मृद संधारण, ठिबक आणि लघुसिंचन असे तीन घटक होते. लघुसिंचनाचा घटक हा १४५९ कोटी रूपयांचा होता. ठिबकचा घटक हा ४७२ कोटी रूपयांचा होता. मृद संधारणाचा घटक १३११ कोटी रूपयांचा होता असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

लघुसिंचनाचा घटक हा १४०० कोटी रूपयांचा आहे. त्यापैकी ५०० कोटी रूपयांचे प्रकल्प मंजूर झाले आणि ३०० कोटी रूपयांच्या निविदा निघाल्या. राष्ट्रीय कृषी विकास योजने अंतर्गत हा निधी आला आहे. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली जी समिती नेमली होती त्यांनी यास मान्यता दिली आहे व ते केंद्र शासनाने मान्य केले आहे. त्याप्रमाणे जी काही सर्व प्रकिया झाली आहे ती सर्वांना माहीत आहे. परंतु विभाग निधी आणण्यास अपयशी का ठरला अशी विचारणा समितीने केली असता, याला अपयश म्हणता येणार नाही. राज्याला अन डाईड फंड येत होता. त्यातून हा निधी येत होता असे विभागीय सचिवांनी विदित केले.

आता जे शिल्लक काम आहे त्याची सद्यःस्थिती काय आहे ? आज किती कामे प्रलंबित आहेत व त्यासाठी किती निधी लागणार आहे ? अशी विचारणा समितीने केली असता,दिनांक १३ सप्टेंबर २०१७ रोजी शासन निर्णय निर्गमित झाला आहे. ६९८ कामे आहेत. यासाठी १७० कोटी रूपये लागणार आहेत. हा प्रश्न विभागाने सोडविला आहे. सन २०१६-१७ मध्ये निधी न आल्यामुळे मागच्या दोन महिन्यांमध्ये विभागाने निर्णय घेतलेला आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

या कामासाठी राज्य सरकार निधी देणार आहे की, महामंडळ निधी देणार आहे? या समितीच्या प्रश्नाबाबत क्षेत्रिय स्तरावरून माहिती घेण्यात आली होती की, कोणती कामे महामंडळाकडे वर्ग करावयाची, कोणती कामे राज्य शासनाकडे वर्ग करायची. त्यानुसार ती कामे वर्ग करण्यात आली आहेत. त्याप्रमाणे तपशीलवार शासन निर्णय देखील निर्गमित करण्यात आला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाला जो निधी लागणार आहे त्यात ही सर्व कामे पूर्ण होणार आहेत काय ? या कामांना प्राधान्य कशाच्या आधारे देण्यात येणार आहे, त्यासाठी काय निकष आहेत ? पर्सेन्टेज ऑफ वर्क जास्त झाले त्या आधारावर निधी देतात की, अनुशेषाचे क्षेत्र आहे म्हणून त्या आधारावर निधी देतात काय ? विभागाकडून कुठल्या आधारावर निधी देण्यात येतो ? अशी विचारणा समितीने केली असता,महामंडळाची १४०० कोटी रूपयांची व स्टेटची ३०० कोटी रूपयांची लायबिलिटी आहे. त्यात १७० कोटी रूपयांची भर पडली आहे.

या कामाला विभागाकडून कशाच्या आधारे प्राधान्य देण्यात येते? अशी विचारणा समितीने केली असता,मा. राज्यपाल महोदयांचे विभागवार निधी देण्याचे सूत्र आहे. ते याला देखील लागू आहे असे विभागीय सचिवांनी विदित केले.

जलसंधारणाच्या कामाला प्रशासकीय मान्यता देण्यात येते त्याच वेळी निधी रिलिज झाला पाहिजे असे धोरण विभाग स्वीकारणार आहे काय, असल्यास किती दिवसात धोरण स्वीकारण्यात येणार आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाकडून पुढच्या वर्षीपासून धोरण प्रस्तावित करण्यात येणार आहे. निधीचे वितरण हे वर्षाच्या सुरूवातीलाच क्षेत्रिय स्तरावर करण्याचा विभागाचा प्रयत्न आहे. तसे प्रस्तावित केले आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

हा महत्त्वाचा विषय आहे. विभागाने जे प्रस्तावित केले आहे ते कोणत्या स्तरावर आहे ? विभागाने नेमके काय प्रस्तावित केले आहे ? यासंबंधातील अंतिम निर्णय कोण घेणार आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता,आताच समितीने सूचविल्याप्रमाणे एकूणच निधी उपलब्धतेसंबंधातील काम आठवड्यामध्ये सादर करण्यात येणार आहे. याबाबत अंतिम निर्णय माननीय मंत्रीच घेतील.एक-दोन लेखाशीर्षाचा प्रस्ताव विभागाने तयार केलेला आहे. उर्वरित लेखाशिर्षाचा प्रस्ताव एका आठवड्यात तयार करून सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले. त्यावर हा विषय शिफारशीमध्ये घेतला पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले.

**परिच्छेद.क्र.२.१.६.२: प्रकल्पांना प्राधान्यक्रम न देणे.**

विभागाने ४५ प्रकल्प हाती घेतले आहेत.तमहालेखापाल यांच्या आक्षेपानुसार ९१ प्रकल्पांना निधी दिला असता तर हे प्रकल्प पूर्ण झाले असते. त्या ऐवजी विभागाने नवीन ४५ प्रकल्प हाती घेतले आहेत. त्यासंबंधी विभागाचे काय मत आहे ? हे प्रकल्प सुरू करण्यास काही अडीअडचणी आहेत काय ? अशी विचारणा समितीने केली असता, महालेखापाल यांचा मुद्दा विचारात घेतला तरी हे प्रकल्प केवळ निधीमुळे राहिलेले नव्हते. त्यास वेगवेगळी कारणे होती असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

निधीमुळे प्रकल्प प्रलंबित आहेत काय ? नवीन प्रकल्प न घेता जुने प्रकल्प पूर्ण केले पाहिजे असे महालेखापालांचे मत आहे. बाकी काही अडचण असेल आणि विभागाने नवीन प्रकल्प घेतला असेल तर काही अडचण नाही असे मत समितीने व्यक्त केले असता,९१ प्रकल्प १०० टक्के पूर्ण न होण्यामागची कारणे म्हणजे भूसंपादनातील अडचणी, स्थानिक शेतक-यांचा विरोध, न्यायालयीन प्रकरणे अशी आहेत. निधीचा विचार करून त्यात अतिरिक्त ४५ प्रकरणे यात समाविष्ट केलेली आहेत असे विभागीय सचिवांनी विदित केले.

आता विभाग याबाबतचा प्रस्ताव प्रस्तावित करणार आहे. पुढील साक्ष होईल तेव्हा यासंबंधातील अंतिम निर्णय झाला किंवा नाही हे समितीला अवगत करावे. अंतिम निर्णय झाला नसेल तर तो का झाला नाही याची देखील माहिती समितील द्यावी असे समितीने सूचित केले असता विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली.

**परिच्छेद .क्र.२.१.६.३: नियोजन करतेवेळी कार्यस्थळाचे अपूरे सर्वेक्षण**

प्रकल्पाच्या किंमतीमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली आहे. विभागाने नमूद केले आहे की, काही बाबींच्या परिमाणामध्ये वाढ झालेली आहे. यासंबंधात विभागाने कारवाई केली पाहिजे. या सर्व जुन्या केसेस आहेत.महालेखापाल यांच्या परिच्छेदामध्ये तथ्य असेल तर विभागाने ताबडतोब कारवाई केली पाहिजे. या प्रकरणी चौकशी करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत असे मत समितीने व्यक्त केले असता,त्रुटीपूर्ण खर्च हा रूपये ९.६७ लाख इतका आहे. परंतु, येथे increase of one to 14984 per-cent नमूद केलेला आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

१२५ टक्क्यांपेक्षा जास्त वाढ आहे हे मान्य आहे काय ? सुप्रमा घेतल्याशिवाय विभागाला २५ टक्क्यांपर्यंत वर जाता येते. त्याच बरोबर १२५ टक्क्यांपेक्षा अधिकच्या परिमाणासाठी सीएसआर प्रमाणे भुगतान केले असेल तर काही अडचण नाही. पण पूर्ण नियोजनच वाढत असेल तर त्याला जबाबदार कोण ? अशी विचारणा समितीने केली असता, ६६ प्रकल्प आहेत.त त्यापैकी १५ प्रकल्पांमध्ये सेक्शन ३८ चा वापर करण्यात आलेला आहे. १२५ टक्क्यांच्या वर क्वांटीटी गेली तर ती डीएसआर प्रमाणे देण्याचा निर्णय झालेला आहे. १४९८४ टक्क्यांचा मुद्दा महालेखापाल यांनी काढलेला आहे. त्याची चौकशी करण्यात येणार आहे. या १५ प्रकल्पांच्या प्रकरणी नेमकी कोणाकडून, कोणत्या स्तरावरून चूक झाली याची चौकशी मुख्य अभियंत्यांच्या मार्फत करण्यात येणार आहे. साधारणतः एका महिन्याभरात चौकशी करावी असे मुख्य अभियंत्यांना सांगण्यात येईल अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

१५ दिवसांमध्ये चौकशी पूर्ण करून पुढील बैठकीमध्ये त्यासंबंधीचा अहवाल समितीला सादर करावा तसेच या प्रकरणी जे जबाबदार अधिकारी आहेत त्यांची नावे कारवाईसहीत अपेक्षित आहेत असे मत समितीने व्यक्त केले असता, रूपये ९.६८ कोटी वाढ झाली आहे. ही वाढ सर्वेक्षणाच्या चुकीमुळे झाली आहे असा महालेखापालांचा आक्षेप आहे. परंतु, काही ठिकाणी बदल होऊ शकतो. त्यामुळे एकूण ५० पट वाढ झाली आहे ती नेमकी कोणत्या प्रकल्पामध्ये झाली, आयटेममध्ये झाली व त्यात कोण दोषी आहे त्याबाबत पडताळणी करण्यात येणार असल्याचे विभागीय सचिवांनी अवगत केले.

यासंबंधातील सर्व माहिती विभागाने महालेखापाल यांच्याकडून घेतली पाहिजे. त्यांच्याकडे सगळी आकडेवारी आहे. त्यांच्याकडे १५ प्रकल्पांची यादी आहे.या प्रकल्पांमध्ये जादा निधी खर्च झाला आहे. २७ पासून ७७ पर्यंत ,२३ पासून ४५९४ पर्यंत क्वांटीटी वाढलेली आहे. यासंबंधात महालेखापाल यांनी सॅम्पल सर्व्हे केलेला आहे. तेव्हा यासंबंधात विभागाला निर्णय घ्यावा लागेल. हा ग्रामीण भागाशी निगडित असा विषय आहे. ग्रामीण भागामध्ये सर्व्हे करण्याची पद्धत अत्यंत मोघम आहे. काही ठिकाणी बोअर न मारता बिले काढली जातात. अशा प्रकारे प्रचंड प्रमाणात घोटाळा झालेला आहे. ६६ प्रकल्पांपैकी १५ प्रकल्पांसंबंधातील माहिती देण्यात आलेली आहे. हा परिच्छेद फार महत्त्वाचा आहे. यात जे अधिकारी दोषी असतील त्यांना जबाबदार धरले पाहिजे व कालबद्ध मर्यादेत त्यांची चौकशी पूर्ण करून त्यांच्या विरूद्ध कारवाई केली पाहिजे. त्याप्रमाणे संबंधित दोषी अधिका-यांवर किती दिवसात कारवाई करण्यात येईल ? हा विषय अतिशय गंभीर आहे. जलसंधारण विभागामध्ये जे घडले तसेच जलसंपदा विभागामध्ये घडले होते. जलसंपदा विभागाच्या प्रकल्पांच्या बाबतीत पीआयएल दाखल झाल्या आणि अनेक अधिका-यांना शिक्षा होऊन त्यांना कारागृहात जावे लागले. जर विभागाने या प्रकारांवर आळा घातला नाही तर जलसंधारण विभागाचे अधिकारी सुध्दा कारागृहात जातील असे मत समितीने व्यक्त केले असता,१५ प्रकल्पांची यादी विभागाकडे देखील आहे. समितीचे म्हणणे विभागाला मान्य आहे. त्यामुळेच विभाग या प्रकरणी विभागाकडून चौकशी करण्यात येत आहे. वास्तविक पाहता यामध्ये ५ किंवा १० टक्के वाढ होऊ शकते, परंतु १४१४९ पट एवढ्या मोठ्या प्रमाणात वाढ कशी झाली याची तपासणी करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी विदित केले.

विभागाने १५ दिवसांत ही संपूर्ण चौकशी पूर्ण करावी आणि दोषींवर कोणती कारवाई प्रस्तावित केली याबाबत समितीला माहिती द्यावी असे समितीने सूचित केले. **(विवरण क्र.२)**

जलसंपदा विभागाच्या प्रकल्पाच्या किंमतीमध्ये अनैसर्गिक वाढ झाली आणि त्या बाबतीत पीआयएल दाखल करण्यात आली. चौकशीअंती जलसंपदा विभागातील अनेक अधिका-यांना कारागृहात जावे लागले. समितीची एवढीच अपेक्षा आहे की, विभागाने तातडीने या संपूर्ण प्रकरणाची गांभीर्याने दखल घ्यावी. जलसंधारण विभागात सुध्दा जलसंपदा विभागात घडलेल्या प्रकाराची पुनरावृत्ती अपेक्षित आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, अशा प्रकाराची पुनरावृत्ती अपेक्षित नसल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

या परिच्छेदाच्या बाबतीत महालेखापाल यांनी परिपूर्ण सर्वेक्षण न करता अंदाजपत्रक करण्यात येणे असा जो आक्षेप काढलेला आहे तो अतिशय योग्य आहे. अनेक प्रकल्पांच्या बाबतीत ठेकेदार सर्वेक्षण करुन घेतात व नंतर तेच संपूर्ण इस्टीमेट बनवितात आणि विभागाला सादर करतात. त्यामुळे प्रकल्पाच्या किंमतीत वाढ होते. खाजगी यंत्रणांकडून प्रकल्पाचे सर्वेक्षण करुन घेण्याची पध्दत जलसंधारण विभागात आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता,या प्रकल्पाचे सर्वेक्षण झालेले आहे.विहित प्रक्रियेनुसार सर्वेक्षण करण्यासाठी टेंडर काढण्यात येते. जर विभागाकडे पुरेसे मनुष्यबळ नसेल तर टेंडर काढून सर्वेक्षणाबाबतची पुढील कार्यवाही केली जाते अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

ठेकेदार, विभागाचे अधिकारी, सर्वेक्षण करणारी यंत्रणा यांचे परस्परसंबंध असतात. मुळात ठेकेदाराकडून काम करुन घेणे हे शासनाला मान्य आहे. परंतु सुपरव्हीजन, इस्टीमेट आणि सर्वेक्षणासह इतर सर्व कामे ठेकेदार करु लागले तर ही बाब विभाग आणि सरकारसाठी अत्यंत घातक आहे.प्रकल्पाचे सर्वेक्षण करण्याची विशिष्ट प्रक्रिया असते. सर्वेक्षणासाठी जो खर्च येतो तो अदा करण्यात येतो. असे असताना विभागाचे उप अभियंता किंवा कनिष्ठ अभियंता हे ठेकेदाराच्या गाडीत बसून सर्वेक्षण करतात. बोअर टेस्टींग अगोदर द्वघेऊन त्यानंतर देयके द्वकाढली जातात. विभागाने टेंडर काढूनच सर्वेक्षण करावयास पाहिजे. जर विभागास सर्वेक्षणाच्या कामासाठी शासनाकडून निधी येत नसेल तर समितीकडून या बाबतीत शासनला शिफारस करता येईल. परंतु विभागाकडे पुरेसा निधी असताना सुध्दा विभागातील अधिका-यांनी अशा प्रकारचा लाचारीपणा का पत्करावा ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाकडून सर्वेक्षणासाठी निधीची उपलब्धता करुन देण्यात येते. शिवाय विभागाच्या माध्यमातून टेंडर काढूनच सर्वेक्षण करण्यात येते असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

टेंडर काढून सर्वेक्षण केले जात असले तरी सर्वेक्षण करणा-या सर्वांचे एकमेकांशी परस्परसंबंध असतात.विभागाची सर्वेक्षणासंदर्भात टेंडर काढण्याची प्रोसीजर केवळ ऑन रेकॉर्ड आहे. परंतु ऑफ रेकॉर्ड अनेक गोष्टी होतात. अगोदर बोअर घेऊन त्यानंतर त्याची देयके काढली जातात.हा अत्यंत गंभीर विषय आहे. विभागाच्या सचिवांनी स्थानिक स्तरावर काम केलेले आहे. त्यांना सर्व माहिती आहे. सचिवांनी जिल्हा परिषदेमध्ये चांगले काम केलेले आहे. जलसंधारण विभागात ज्या गोष्टी सुरु आहेत त्या कुठे तरी थांबविल्या पाहिजेत असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागाकडून या संदर्भात नोंद घेण्यात येईल आणि या विषयी चौकशी करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी विदित केले.

मागच्या कालावधीच्या तुलनेत आता कोणत्याही प्रकल्पासाठी लागणा-या जमिनीचा मोबदला रेडी रेकनरच्या चार-पाच पट देण्याचा निर्णय शासनाकडून घेण्यात आलेला आहे. परंतु जलसंधारण विभागाचे प्रकल्प हे विभागाच्या नॉर्म्सनुसार व्हायबल होत नाहीत. त्यामुळे विभाग जमिनीची किंमत सोडून, प्रकल्प किंमत धरुन व्हायबल करण्यात येणार आहेत की अन्य कशाप्रकारे करण्यात येणार आहेत ? अन्यथा भविष्यात जलसंधारण विभागाचे प्रकल्प व्हायबल होणार नाहीत. कारण पूर्वीच्या तुलनेत आता भूसंपादनाचा मोबदला मोठ्या प्रमाणात द्यावा लागत आहे. सामितीने उपस्थित केलेल्या विषयाच्या अनुषंगाने विभागाचे भविष्यातील काय धोरण आहे ? या समितीच्या प्रश्नाबाबत,सध्या जे कॉस्ट नॉर्म्स आहेत ते जलसंपदा विभागाने २०१६ मध्ये निर्गमित केलेले असून त्यामध्ये सर्व बाबींचा समावेश असलेले कॉस्ट नॉर्म्स आहेत. जलसंधारण विभागासाठी वेगळे नॉर्म्स करता येणार नाही. जर या विषयी धोरणात्मक निर्णय घ्यावयाचा झाल्यास तो वित्त व नियोजन विभागाच्या मान्यतेने घ्यावा लागेल. जलसंधारण विभागाची सध्या जी कार्यपध्दती आहे तीच कार्यपध्दती विभाग राबवित आहे. त्यामुळे पर टीसीएम मध्ये भूसंपादनासह सर्व बाबींचा खर्च त्यामध्ये अंतर्भूत असतो अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

जलसंधारण विभागाने ज्या प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता दिलेली आहे ते प्रकल्प जेव्हा सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी विभागाकडे येतील तेव्हा त्या प्रकल्पांची किंमत भूसंपादनाच्या खर्चासह २०० ते ४०० पट वाढलेली असेल. कारण पूर्वी भूसंपादनाचा मोबदला रेडी रेकनरच्या चार-पाच पट देण्याचे धोरण नव्हते. पूर्वीच्या प्रकल्प किंमतीचा विचार केल्यास विभागाचा एकही प्रकल्प सुधारित प्रशासकीय मान्यतेमध्ये व्हायबल होणार नाही. त्यामुळे जे प्रकल्प मंजूर करुन ठेवलेले आहेत, ज्या प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता दिलेल्या आहेत असे प्रकल्प पूर्ण करण्याच्या अनुषंगाने विभागाचे भविष्यातील नेमके काय धोरण आहे ? अशी विचारणा समितीने केली असता सध्या या संदर्भात जलसंपदा विभागाची जी भूमिका आहे तीच भूमिका जलसंधारण विभागाची राहील. परंतु कॉस्ट नॉर्म्समध्ये किंवा बी.सी. रेशिओमध्ये जे प्रकल्प बसत नाहीत ते प्रकल्प अग्रव्यय समितीसमोर नेता येतील असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

जलसंपदा विभागाचे प्रकल्प मोठे आहेत. जलसंपदा विभागाने एखाद्या नदीवर भिंत बांधल्यास त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पाणी साठते. जलसंपदा विभागाच्या प्रकल्पांशी जलसंधारण विभागाच्या प्रकल्पांची तुलना केल्यास जलसंधारण विभागाचे प्रकल्प व्हायबल होणार नाहीत. कारण जलसंपदा विभागाच्या प्रकल्पांच्या निकषात जलसंधारण विभागाचे प्रकल्पच बसणार नाहीत. जलसंपदा विभागाच्या धर्तीवर जलसंधारण विभागाने काम केल्यास जलसंधारण विभागाचे १०० हेक्टरपर्यंतचे जे लहान प्रकल्प आहेत ते भविष्यात उभेच राहणार नाहीत. जलसंधारण विभागाच्या मोठ्या प्रकल्पांसाठी जलसंपदा विभागाचे धोरण स्वीकारणे हे मान्य होऊ शकते. परंतु जलसंधारण विभागाचे लहान प्रकल्प व्हायबल होण्यासाठी विभागाने अभ्यास करुन हा विषय मंत्रिमंडळासमोर सादर करुन, जलसंधारण विभागाचे विशेष धोरण मंजूर करुन घेतले पाहिजे. अन्यथा जलसंधारण विभागाचे नवीन प्रकल्पच होणार नाहीत. समितीने सूचविल्यानुसार विभाग कार्यवाही करणार काय ? अशी विचारणा समितीने केली असता,या बाबतीत मला आताच काही ठोस आश्वासन देता येणार नाही. समितीने सुचविलेल्या विषयाच्या बाबतीत विभागाला अभ्यास करावा लागेल असे विभागीय सचिवांनी विदित केले.

**नेचल, ऐनारी व इंदवनी लघु सिंचन तलाव प्रकल्प**

या परिच्छेदासंदर्भात नेचल लघु सिंचन तलाव प्रकल्पाचे पूर्वी सर्वेक्षण केले नाही. तसेच कालव्याचे बांधकाम करणे प्रस्तावित असताना त्या ठिकाणी कोल्हापूर टाईप बंधारा करण्याचा निर्णय घेतला. एकंदरीत या प्रकल्पाच्या बाबतीत विभागाकडून नियोजनाचा अभाव असल्याचे दिसून येते. तसेच ऐनारी लघु सिंचन तलावाची सुध्दा हीच परिस्थिती आहे. नेचल लघु सिंचन तलाव प्रकल्पाच्या ठिकाणी कालव्याऐवजी कोल्हापूर टाईप बंधारा केल्यामुळे प्रकल्पाची किंमत किती रकमेने वाढली ? अशी विचारणा समितीने केली असता,नेचल लघु सिंचन तलाव प्रकल्पाची मूळ किंमत ३.६८ कोटी रुपये होती. आता सुधारित प्रशासकीय मान्यतेनुसार प्रकल्पाची किंमत २४ कोटी रुपये झालेली आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

महालेखापाल आणि समितीचा हाच आक्षेप आहे की, ज्या प्रकल्पाला ३.६८ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता होती त्या प्रकल्पाची किंमत २४ कोटी रुपयांवर गेली. कारण विभागाला कालव्याच्या ऐवजी कोल्हापूर टाईपचा बंधारा बांधावा लागला. यावरुन दिसून येते की, यामध्ये विभागाचे कसल्याही प्रकारचे नियोजन नव्हते. लोकांनी सांगितले की, साईटच्या ठिकाणी प्रकल्प केल्यामुळे त्यांना अमुक अडचण आहे, प्रकल्पाच्या ठिकाणी उच्च दाबाच्या इलेक्ट्रीक लाईन्स किंवा जवळपास देऊळ आहे म्हणून काम करु नये. वास्तविक पाहता प्रकल्पाच्या ठिकाणी अशा प्रकारच्या अडचणी असतील तर प्रकल्प सुरु करण्यापूर्वीच

विभागाने या सर्व बाबींचा अभ्यास करुन नियोजन करावयास पाहिजे होते. ज्यावेळी प्रकल्पासाठी विभागाने सर्वेक्षण केले त्यावेळी त्या भागात मंदिर अस्तित्वात होते. सर्वेक्षणाच्या वेळी विभागाने मंदिर वा उच्च दाबाच्या इलेक्ट्रीक लाईन्स बधितल्या नाहीत काय? नेचल प्रकल्पाच्या ठिकाणी कालव्याऐवजी कोल्हापूर टाईप बंधारा करण्यात आला. तसेच ऐनारी प्रकल्प नियोजित जागेऐवजी बाजूला केल्यामुळे माती आणि मुरुमचा वाहतूक खर्च अदा करावा लागला. या सर्व बाबींच्या अनुषंगाने महालेखापाल यांनी आक्षेप काढला आहे की, मूळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत या प्रकल्पाचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे. महालेखापाल यांनी नेचल, ऐनारी आणि इंदवटी या तीन लघु सिंचन तलावांचे सॅम्पल म्हणून परीक्षण केले. या तिन्ही प्रकल्पांमध्ये विभागाने साईटमध्ये बदल केले, परिणामी प्रकल्पावरील खर्च वाढला. प्रकल्प भागातील बी.सी. रेशिओ १ च्या वर असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

यामध्ये नियोजनाचा अभाव असल्याचे विभागाला वाटत नाही काय ? जर प्रकल्पामध्ये बदल केल्यामुळे एवढ्या मोठ्या प्रमाणात प्रकल्पाची किंमत वाढत असेल तर पूर्वीच्या प्रशासकीय मान्यतेला काय अर्थ आहे ? एखाद्या प्रकल्पावर खर्च केल्यानंतर तो अर्धवट राहिल्यास तो पूर्ण करण्याकरिता त्या प्रकल्पाची किंमत कितीही वाढली तरी तो खर्च करुन प्रकल्प पूर्ण करावाच लागतो. जर त्या प्रकल्पावर खर्च केला नाही तर तो प्रकल्प अर्धवट राहील आणि त्यावर केलेला खर्च निष्फळ ठरेल असे मत समितीने व्यक्त केले असता,हे तिन्ही प्रकल्प सद्यःस्थितीच्या कॉस्ट नॉर्म्सप्रमाणे बरोबर आहेत. या प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता मिळालेली असल्यामुळे हे प्रकल्प पूर्ण होतील. हे प्रकल्प प्रगतीत आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

या परिच्छेदामध्ये मुख्य आक्षेप असा आहे की, १४ हजार पर्यंत क्वॉंटीटी वाढलेली आहे. ऐनारी प्रकल्पाच्या बाबतीत नमूद केले आहे की, माती आणि मुरुम बुडित क्षेत्रात उपलब्ध न झाल्यामुळे अनुक्रमे ८ व ६ कि.मी. अंतरावरुन आणण्यात आले. त्यामुळे वहन अंतरात वाढ झालेली आहे. प्रकल्पाचे अंदाजपत्रक बनविताना प्रकल्पाच्या ठिकाणी ज्यावेळी पीट्स घेण्यात येतात त्यावेळी त्या ठिकाणी माती वा मुरुम आहे की नाही याचा स्थानिक पातळीवरुन आढावा घेतला जात नाही काय ? अशी विचारणा समितीने केली असता, प्रकल्पाच्या धरणाची संरेखा २०० मीटरवर आहे त्यामुळेच हा खर्च झाला आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

त्या ठिकाणी खडक लागेल असे विभागाने गृहीत धरले होते काय ? जलसंधारण विभागाच्या प्रकल्पांना ८ कि.मी. चे लीड असू शकते काय ? जलसंपदा विभागाच्या मोठ्या किंवा मध्यम प्रकल्पाच्या बाबतीत हे समजणे शक्य आहे. अंदाजपत्रक तयार केल्यानंतर केलेले हे सर्व मॅनीप्युलेशन आहे. जलसंधारण विभागाचे १०० हेक्टरपर्यंतचे लहान प्रकल्प असताना त्याला ८ कि.मी.ची लीड कशी असू शकते ? याबाबत सचिवांनी ऐनारी प्रकल्पाच्या बाबतीत स्पेसिफिक उत्तर द्यावे असे समितीने सूचित केले असता, ऐनारी हा प्रकल्प कोकणातील असून त्या ठिकाणी काळ्या मातीच्या उपलब्धतेची अडचण येते. परंतु मुरुमाच्या बाबतीत विभागाकडून चौकशी करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी आश्वासित केले.

प्रकल्पाच्या ठिकाणी मुरुम उपलब्ध होणार नाही म्हणून विभागाने ८ कि.मी.चा लीड दिला. ही बाब बेसिक इस्टीमेट तयार करताना विभागाच्या लक्षात का आली नाही ? या संपूर्ण प्रकरणी संबंधितांवर जबाबदारी निश्चित केली पाहिजे. या प्रकल्पांच्या बाबतीत जे काही घडलेले आहे ते विचार करण्यापलीकडे आहे. या प्रकल्पांवरील खर्चाच्या बाबतीत मॅनीप्युलेशन झाल्याचे दिसते असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागाकडे एकच मुख्य अभियंता आहेत. या संदर्भात एक महिन्यात वरिष्ठ स्तरावरुन चौकशी करण्यात येईल. ही चौकशी अधीक्षक अभियंता यांच्याकडून नव्हे तर मुख्य अभियंता यांच्याकडून करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

एकंदरीत या तिन्ही प्रकल्पांच्या किंमतीत मोठ्या प्रमाणात वाढ होण्याचे प्रथमदर्शनी एकमेव कारण हे सर्वेक्षणाचा अभाव असल्याचे दिसते असे मत समितीने व्यक्त केले असता, प्रकल्पांचे सर्वेक्षण करण्यात आलेले आहे. परंतु ब-याच वेळी प्रकल्पाचा पाया करण्यात थोडीशी अडचण येते. ज्यावेळी सीओटी घेतला जातो त्यावेळी काही ठिकाणी मातीचे काम आणि खडक यामध्ये थोडेसे व्हेरिएशन होते. परंतु क्वॉंटीटीत १४ हजार टक्क्यापर्यंतची वाढ होणे हे स्वीकारार्ह नाही. त्यामुळेच विभागाने चौकशी करण्याचे मान्य केले आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

इंदवटी प्रकल्पाची मूळ किंमत २००९ मध्ये ३.६८ कोटी रुपये होती आणि सद्यःस्थितीत ती २४ कोटी रुपयांवर गेली आहे. २००९ ते २०१६ या कालावधीत ही रक्कम २४ कोटी रुपयांवर पोहचली. या वाढीव किंमतीमध्ये भूसंपादानापोटी किती रक्कम वाढली आणि प्रकल्पाच्या कामावर किती रक्कम वाढली ? डीएसआरमध्ये झालेली वाढ सोडून इतर बाबींवर किती वाढ झाली ? अशी विचारणा समितीने केली असता, २००९ मध्ये प्रकल्पाची मूळ किंमत ३.६८ कोटी रुपये होती. दरसूचीत वाढ झाल्यामुळे १५ लाख रुपये वाढले, विभागाकडे असलेल्या विवरणावरुन भूसंपादनाची वाढ ११३ लाख रुपये झाली आहे. संकल्पचित्रातील बदलामुळे ६ कोटी ८५ लाख रुपये वाढ झाली आहे. सांडव्यासाठी जे कॉंक्रीट लागले त्यावरील हा खर्च आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

स्थानिक स्तरावरील प्रकल्पाच्या किंमतीत मूळ किंमतीच्या तुलनेत सात पट वाढ होणे कितपत योग्य आहे ? १०० हेक्टरचे धरण असताना त्याच्या सांडव्याच्या कॉंक्रीटीकरणासाठी ७ कोटी रुपये अतिरिक्त खर्च करणे हे योग्य नाही असे मत समितीने व्यक्त केले असता, कोकणात लॅटराईट सॉईल असल्यामुळे तेथील सांडवा कॉंक्रीटमध्येच करावा लागतो. अन्यथा ती माती वाहून जाते. कारण कोकणातील माती ठिसूळ असते. त्यामुळे कोकणातील प्रकल्पामध्ये ब-याच ठिकाणी इनव्हॅरीबली असल्याचे निदर्शनास आले आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

ज्यावेळी अंदाजपत्रक तयार केले जाते त्यावेळी विभागातील संबंधितांनी लक्षात घ्यावयास पाहिजे की, ते विदर्भ वा मराठवाड्यात नव्हे तर कोकणातील प्रकल्पाचे अंदाजपत्रक तयार करीत आहेत. तत्कालीन अधिका-यांना कोकणातील भौगोलिक परिस्थितीची माहिती असावयास पाहिजे होती. ज्या भागात प्रकल्प करावयाचा असतो त्या भागाचे सविस्तर रेकॉर्ड उपलब्ध असते. वेस्टवेअरची साईट चुकीची असल्यामुळे द्वविभागाने नंतर ती साईट बदलली. कोणाच्या चुकीमुळे प्रकल्पाची साईट चुकीची निश्‍चित केली ? ज्या कार्यकारी अधिका-याने अशी चुकीची साईट निवडली त्याच्यावर विभागाने काहीही कारवाई केली नाही. संकल्पचित्रात बदल केल्यामुळे ६ कोटी ८५ लाख रुपयांची वाढ झाली. पहिल्या संकल्पचित्राला सीडीओची मान्यता घेतली नव्हती काय ? अशी विचारणा समितीने केली असता, पहिल्या संकल्पचित्राला सीडीओची मान्यता घेतली नव्हती असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सीडीओची व्यवस्था असताना विभागाने त्यांच्याकडून तपासणी करणे अपेक्षित होते. सीडीओची मान्यता घेतली नसल्यास धरणाला धोका निर्माण होऊ शकतो. सीडीओची मान्यता न घेता काम सुरु करण्याची सध्या पद्धत प्रचलित झालेली आहे. यामुळे सीडीओची मान्यता घेतली नाही. या प्रकल्पाशी संबंध नाही मात्र सध्या अशीच पद्धत सुरु आहे. सध्या किती प्रकल्पांना सीडीओची मान्यता घेण्यात आलेली नाही ? अशी विचारणा समितीने केली असता, ६६ प्रकल्पांपैकी एका प्रकरणामध्ये सीडीओची मान्यता घेतली नसल्याचे आढळून आले असून इतर ठिकाणी मान्यता घेतली आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

६६ पैकी केवळ एका प्रकरणात सीडीओची मान्यता घेण्यात आली नाही असे समितीने गृहीत धरावे काय ? विभागाने हे तपासून घ्यावे असे समितीने सूचित केले असता, हि बाब तपासण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाकडे बरेच अधिकारी डेप्युटेशनवर आहेत. त्यामुळे विभागीय सचिवांना त्यांच्यावर कारवाई करण्याचा अधिकार आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांना कारवाई करण्याचा अधिकार नाही, या संबंधी चौकशी करण्यात येईल. आयडेंटीफिकेशन झाल्यानंतरर त्यांच्याकडून लेखी खुलासा घ्यावा लागेल, त्यामुळे या कार्यवाहीस थोडासा वेळ लागेल असे विभागीय सचिवांनी विदित केले.

जलसंपदा विभागाच्या अधिका-यांवर कारवाई प्रस्तावित करण्याचा जलसंपदा विभागाच्या सचिवांना पूर्णपणे अधिकार आहे. कारण ते अधिकारी जलसंपदा विभागात डेप्युटेशनवर आहेत असे समितीने सूचित केले.

विभागीय सचिवांना जानवली प्रकल्पाच्या संदर्भात खुलासा करण्यास समितीने सूचित केले तसेच, सन १९९५ पासून काम सुरु आहे. सक्षम स्तरावर मंजूर करुन पुढील कारवाई करण्यात येईल, कोल्हापूर बंधा-याचे काम अद्याप सुरु केलेले नाही. मूळ कामावर १७ कोटी ७७ लाख रुपये वाया गेलेले नाहीत. असे विभागाने स्पष्टीकरण केलेले आहे. याचे विभाग कशाप्रकारे समर्थन करु शकतो ? अशी विचारणा समितीने केली असता, जानवली प्रकल्पाचे ९० टक्के बांधकाम पूर्ण झालेले आहे.

घळभरणी झालेली आहे. पाणी लिफ्ट करुन वापरले जाते. केटीवेअर मधून फ्लो इरिगेशन होऊ शकणार नाही. जोपर्यंत डायव्हर्जनचे हेड मिळत नाही तोपर्यंत फ्लो होत नाही. नदीपात्रातून लोकांनी पाणी उचलणे अपेक्षित आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

पाणी लिफ्ट करावयाचे असेल तरर कोल्हापुरी बंधा-याचा काय उपयोग आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, पाणी साठवलेले आहे. वरच्या भागातील सर्व शेतकरी तेथून पाणी घेऊ शकत नाही. खालच्या भागात जर कालवे बांधले तर तेथील शेतक-यांचा पाणी उचलण्यासाठी होणारा खर्च कमी होईल. घळभरणी झालेली असल्यामुळे खर्च वाया गेलेला नाही. केटीवेअर करणे आवश्यक आहे. अन्यथा शेतक-यांना भुर्दंड पडेल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सन १९९७ पासून हा प्रकल्प सुरु आहे. २० वर्षे झालेली आहेत. हे काम कधी पूर्ण होणार आहे, केटी वेअरचे काम कधी पूर्ण होणार आहे ? इरिगेशनकरिता प्रोजेक्ट रिपोर्ट तयार केला जातो. पूर्वी तेथे कालवा काढला जाणार असेल. आता लिफ्टने पाणी उचलावे लागणार आहे. कालव्याचे इरिगेशन मायनस होत असल्यामुळे कॉस्ट-बेनिफिट रेशियोमध्ये कसे बसू शकते ? आता आपण कॅनॉल्स रद्द करुन केटीवेअर करीत आहोत. अशा वेळी केटीवेअरचे काम तरी झाले पाहिजे, जेणे करुन इरिगेशन वाढेल असे मत समितीने व्यक्त केले असता, हे काम प्राधान्याने पूर्ण केले जाईल.केटीवेअर झाले पाहिजेत अन्यथा अपेक्षित सिंचन होऊ शकणार नाही. केटी वेअरच्या कामाचा प्रस्ताव सध्या विचाराधीन् असून त्या संबंधी प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

कॅनॉल्स ड्रॉप करण्याचे कारण काय आहे ? या समितीच्या प्रश्नाबाबत कोकणातील हा प्रकल्प असून लोकांचा विरोध असल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे असे विभागीय सचिवांनी विदित केले.

**परिच्छेद क्र. २.१.६.४- प्रकल्पाची आर्थिक सुसाध्यता, लाभ-व्यय गुणोत्तर**

मच्छीपालनाच्या व्यवसायाबाबत विभागाने गणना केली आहे, मात्र त्याला कोणताही आधार नाही असे महालेखापालांचे मत आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, मॅन्युअल मधील तरतुदी ४५ वर्षापूर्वीच्या आहेत. सेंट्रल वॉटर कमिशन मार्फत सन २०१० मध्ये मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. मात्र शासन स्तरावर त्या संबंधी आदेश दिलेले नाहीत त्यामुळे महालेखापालांचा मुद्दा योग्य आहे. ते ग्राह्य धरावे असे विभागाचे म्हणणे आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सेंट्रल वॉटर कमिशनने दिलेल्या गाईडलाईन्स महालेखापालांच्या निदर्शनास आणण्यात आल्या नाहीत. मासेपालन व्यवसाय करता येत असेल तर त्या संबंधी दिलेल्या मार्गदर्शक सूचनानुसार विभागाने दुरुस्ती केली पाहिजे. विभागाने दुरस्ती केल्यास महालेखापालांना मान्य आहे असे समितीने सूचित केले असता, जलसंपदा विभागाचे मॅन्युअल असून ते महालेखापालांना देण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.त्यावर सीडब्ल्यूसी गाईडलाईन्सची कॉपी देखील महालेखाकापालांना देण्यात यावी असे समितीने सूचित केले.

**सारस्ते लघुपाटबंधारे योजना.**

सदर परिच्छेदामध्ये प्रति टीसीएमच्या दरासंबंधी आक्षेप घेण्यात आला आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, महालेखाकारांनी घेतलेल्या आक्षेपामध्ये सन २००८ मधील रु २२,३८० प्रति टीसीएम दर दिलेला आहे. सारस्ते ल.पा प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता दि. ११ मे २०११ मध्ये मिळाली आहे. दि. ३० एप्रिल २०११ रोजी नवीन मापदंड लागू करण्यात आले होते. नवीन मापदंडानुसार, डोंगरी भाग असल्यामुळे त्या नुसार दर लागू झालेले आहेत. एक्झिट कॉन्फरन्सच्यावेळी हा मुद्दा निकाली काढावयास हवा होता असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सध्या कोणता मापदंड वापरला जात आहे ? या समितीच्या प्रश्नाबाबत सध्या सन २०१६-१७ मधील मापदंड वापरले जात आहेत असे विभागीय सचिवांनी विदित केले.

विभागीय सचिव मापदंड बता रहे हैं वे कब के हैं ? अशी विचारणा महालेखापालांनी केली असता, ये मापदंड दिनांक ११ मई, २०११ के है असे विभागीय सचिवांनी सांगितले.

हमने ६ प्रोजेक्ट्स की लिस्ट दी है. यह सब उसके पहले के है असे महालेखापालांनी निदर्शनास आणले असता, सारस्ते प्रकल्पाची प्रशासकीय मान्यता दि. ११ मे २०११ मध्ये देण्यात आली आहे. त्यामुळे ते नियमानुसार आहे. दूसरे दो प्रकल्प बेसिकली डायव्हर्जन डॅम है असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

आप सारस्ते प्रकल्प के बारे में क्या कहना है ? दि. ११ मे, २०११ ची विभागाची सुप्रमा असेल. सदर प्रकल्पाला दर ५० हजार ॲप्लिकेबल असताना लेखी उत्तरात ७४ हजार रुपये सुरुवातीला सांगण्यात आले. ३५ हजार रुपये दर योग्य आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, नॉर्म्समध्ये बसत नाही, असा महालेखापालांचा आक्षेप असून तो योग्य नाही. ३५ हजार रुपये दर योग्य आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

**पळसविहीर व हरणटेकडी वळण योजना -**

समितीने या योजनांसंबंधी खुलासा करण्यास सूचित केले असता, पहिली वळणयोजना गोदावरी खो-यात पाणी वळवण्याकरिता असून दुसरी योजना गिरनार खो-यात पाणी वळवण्याबाबत आहे. मॅन्युअलमध्ये पर हेक्टर दर दिलेला आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

डायव्हर्जनकरता हा दर लागू होत नाही असे महालेखापालांचे मत आहे असे मत समितीने निदर्शनास आणले असता, पीसीएमचे नॉर्म्स त्याकरिता लागू होत नाहीत. महालेखापालांनी पीसीएमचा मुद्दा काढला आहे असे विभागीय सचिवांनी विदित केले.

पळसविहीर व हरणटेकडीचा मुद्दा आहे ही बाब समितीने निदर्शनास आणली असता, डायव्हर्जनचा दर हेक्टरकरिता असून टीसीएम नाही. दोन्ही प्रकल्पांना वित्त विभागाची मान्यता घेण्यात आलेली आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

वित्त विभागाने मान्यता दिलेली असेल तरी देखील मॅन्युअल, नॉर्म्स योग्य प्रकारे मेन्टेन केले पाहिजे. त्याचे पालन केले पाहिजे असे समितीने सूचित केले असता, टीसीएम लागू होत नाही. टीसीएम असते तर अग्र व व्यय समितीकडे हे प्रकरण गेले असते. या करिता हेक्टरचे नॉर्म्स आहेत असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

अमरावती विभागात किंमती बदलल्या आहेत काय ? या समितीच्या प्रश्नाबाबत, सन २००१ मध्ये शहरी भागात उच्चाधिकार समितीने काही गावे आयडेंटीफाय केलेली आहेत. त्यात अंगोला (टाकळी) हे गाव आहे. दि. ३० एप्रिल २०११ चे मापदंड लागू होतात. दि. ३ जानेवारी २००८ मध्ये शासनाने असा निर्णय घेतला की, खारपाणपट्टयात जे नॉर्मस असतील त्याच्या ३ पट लागू होतील. मापदंडनुसार ६६ हजार ३९१ रुपये खर्च येत होता. त्याच्या तिप्पट रक्कम १लाख ९० हजार असून तेवढी रक्कम लागू होते. सदर कामास ९३ हजार रुपये खर्च आला यामुळे हे काम मापदंडात सफल होत आहे. असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

४-५ प्रकल्पांचे सर्व स्पष्टीकरण महालेखाकारांना सादर करावे. शासन निर्णय, सुधारित मापदंडाची माहिती देऊन तपासणी करुन घेण्यात यावे. उत्तराच्या वेळी विभागाने खुलासा करुन अनुपालन केलेले नाही असे समितीने निदर्शनास आणले असता, महालेखाकार कार्यालयाला उत्तर दिलेले होते, त्यावेळी तसे लेखी नमूदही केलेले होते. दुस-या परिच्छेदामध्ये नमूद केलेले आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

संबंधित कागदपत्रे सादर करावी व संपूर्ण प्रकल्पाची तपासणी करुन घ्यावी व समितीला प्रत सादर करावी असे समितीने सूचित केले.

समितीने दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१७ रोजी पुन्हा जलसंधारण विभागाचे सचिव व विभागीय प्रतिनिधी यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विभागाने प्रकल्पाबाबत सादर केलेला गोषवारा विचारात घेतला वनविभागाने समितीला ३२ प्रकल्पांच्या गोषवा-या बाबत माहिती द्यावी असे सूचित केले असता, समितीने व्हेरिफिकेशन करण्याच्या दिलेल्या सूचनेनुसार पुढील कार्यवाही केलेली आहे. त्यानुसार सद्यःस्थिती काय आहे वगैरे माहिती समितीला लिखित स्वरुपात दिलेली आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

लिखित माहितीमध्ये १४ प्रकल्पांची वेगळी माहिती दिलेली आहे काय ? या समितीच्या प्रश्नाबाबत, एकूण ३७ प्रकल्प आहेत. त्यामधील दोन योजना या DPDC कडे वर्ग केलेल्या आहेत. त्यानुसार ३५ प्रकल्प आहेत. समितीने दिलेल्या निर्देशानुसार महालेखापाल कार्यालयासमवेत एकत्रित बैठक आयोजित करुन टॅली करुन घेतले आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले. **(विवरण क्रमांक - ३)**

समितीला ३२ प्रकल्पांच्या गोषवा-याबाबत माहिती देण्यात यावी. विभागाकडून ३७ प्रकल्पांचा गोषवारा लिखित स्वरुपात दिलेला आहे. ९६ प्रकल्पांपैकी ६१ प्रकल्प रद्द केल्याची माहिती यापूर्वी दिली होती. आता ३७ प्रकल्पांबाबत माहिती दिलेली आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, माहितीमधील अनुक्रमांक १० आणि १३ वगळून उर्वरित प्रकल्पांचा गोषवारा लिखित स्वरुपात दिलेला आहे. अनुक्रमांक १० वरील प्रकल्प DPDC कडे वर्ग केलेला आहे. अनुक्रमांक १० वरील योजना रद्द केलेली नसून ती योजना नजरचुकीने प्रगतीपथावर आहे असे नमूद केलेले आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने दिलेल्या लिखित माहितीमध्ये योजना रद्द केली नाही, प्रगतीपथावर आहे, नजरचुकीने योजना प्रगतीपथावर आहे असे नमूद करण्याऐवजी रद्द करावी असा शेरा लिहीला असे नमूद केलेले आहे. विभागाने ३५ प्रकल्पांचा गोषवारा दिलेला आहे, तो समजलेला नाही असे मत समितीने व्यक्त केले असता, महोदय, एकूण ३७ प्रकल्प आहेत. त्यामधील दोन योजना या DPDC कडे वर्ग केलेल्या आहेत. आता ३५ प्रकल्प आहेत. समितीने दिलेल्या निर्देशानुसार महालेखापाल कार्यालयासमवेत एकत्रित बैठक आयोजित करुन टॅली करुन घेतले आहे. ३५ योजनांपैकी १३ योजनांवर खर्च केलेला आहे. युवती योजना रद्द झालेली असली तरी त्यावर फक्त १.२७ लक्ष रुपयांचा खर्च झालेला आहे. १३ योजनांवर ७७ लक्ष रुपयांचा खर्च झालेला आहे असे विभागीय सचिवांनी विदित केले.

३५-३६ प्रकल्प हे रद्द केले आहेत काय ? या समितीच्या प्रश्नाबाबत, स्थगितीमध्ये तसे म्हटले आहे. रद्द झालेल्या योजना या वेगळ्या आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

स्थगित ठेवले असले तरी ते प्रस्तावित करण्यासाठी ठेवले आहेत. योजना रद्द झाली म्हणून त्यासंदर्भातील प्रस्ताव दिला जात असेल तर ज्या योजना प्रस्तावित केलेल्या आहेत, त्यासंदर्भात शून्य रक्कम खर्च झालेली आहे असे विभागीय सचिवांनी विदित केले.

३६ प्रकल्पांवर शून्य रक्कम खर्च झाल्याचे दर्शविले आहे काय ? समितीला १४ प्रकल्पांच्या सद्यःस्थितीबाबत माहिती देण्यात यावी असे समितीने सूचित केले असता, २२ प्रकल्पांवरील खर्चाची रक्कम शून्य दर्शविलेली आहे. १४ प्रकल्पामधील एक योजना रद्द करण्यात आलेली आहे. १३ योजनांवर ७७ लक्ष रुपयांचा खर्च झालेला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सदरहू परिच्छेद मागील बैठकीत प्रलंबित ठेवला होता. त्यावेळी योजनानिहाय, काही ठिकाणी साईट फिजिबल नव्हत्या, संबंधित अधिका-यांवर कारवाई करणे यासंदर्भातील ब्रेकअप दिला नव्हता, आता माहिती दिलेली आहे. ७७ लाख रुपयांचा खर्च झालेला आहे, अशी परिस्थिती आहे. १४ योजनेमध्ये ७७ लक्ष रुपयांचा खर्च झालेला आहे. २२ योजनांवर कोणताही खर्च केलेला नाही. महालेखाकार यांचा आक्षेप आहे की, ४.८६ लक्ष रुपयांचा खर्च झालेला आहे असे मत समितीने व्यक्त केले असता,निधीची उपलब्धता हे एक मुख्य कारण आहे. हे मागील बैठकीत सांगितले होते असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

निधी उपलब्ध होऊ शकणार नाही, असे शासनाने सांगितले होते काय ? अशी विचारणा समितीने केली असता, सद्यःस्थितीत निधी उपलब्ध नाही. लायबिलीटी जास्त झाल्यामुळे आज तरी निधी उपलब्ध नाही. आज रोजी १९१ कोटी महामंडळास उपलब्ध झाले आहेत.

लायबिलिटी म्हणजे काय ? रद्द झालेल्या योजना पूर्णपणे रद्द झालेल्या आहेत काय ? अशी विचारणा समितीने केली असता, ज्या योजनांची प्रशासकीय मान्यता झालेली आहे आणि कामे सुरु आहेत. महामंडळामध्ये अध्यक्ष माननीय मंत्री आणि राज्यमंत्री असतात. सद्यःस्थितीत तरी योजना पूर्ण झालेल्या आहेत.

कागदपत्रानुसार ४.८६ लक्ष रुपयांचा खर्च झाल्याचे दिसून येत आहे. सचिवांनी ७७ लक्ष रुपयांचा खर्च झाला अशी माहिती दिलेली आहे. तर त्यावेळी आकडेवारी मध्ये तफावत कशी झाली ? अशी विचारणा महालेखापालांनी केली.

त्यावर मागील बैठकीत ३५ प्रकल्पांवर ४.५ कोटी रुपये खर्च करण्यात आला असून, सद्यःस्थितीत ते प्रकल्प प्रगतिपथावर आहेत. १४ प्रकल्पांवर ९९ लक्ष रुपयांचा खर्च करण्यात आलेला आहे. तसेच पुढे असे म्हटले आहे की, या प्रकल्पावर झालेल्या खर्चाचे उदाहरण देताना, नांदेड जिल्ह्यातील भूसंपादनासाठी ३७ लक्ष रुपये खर्च झाले आहेत. उक्त ३५ प्रकल्पांची कामे सद्यःस्थितीत सुरु आहेत काय, अशी समितीने विचारणा केली असता सचिवांनी सदरहू प्रकल्प स्थगित ठेवले आहेत. परंतु ते रद्द केले नाहीत असे उत्तर मागील बैठकीत दिले होते. ३५ प्रकल्पांवर ४.५ कोटी रुपयांचा खर्च झालेला आहे हे सचिवांनी मान्य केलेले आहे. हे सचिवांनी पूर्वीच्या बैठकीत दिलेले उत्तर आहे. १४ प्रकल्पांवर ९९ लक्ष रुपयांचा खर्च झालेला आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, समितीने पडताळणी करण्याची सूचना दिली होती, त्यानुसार सद्यःस्थितीत काय आहे वगैरे माहिती विचारल्यानुसार ती समितीला लिखित स्वरुपात दिलेली आहे असे विभागीय सचिवांनी विदित केले.

व्हेरिफिकेशन केले जात असताना १४ प्रकल्प आणि ३५ प्रकल्प कोणकोणते आहेत असा प्रश्न विचारला होता. याच कारणास्तव समितीने गोषवारा मागितला होता. पूर्वीच्या बैठकीत ३५ प्रकल्पांवर ४.५ कोटी रुपयांचा खर्च झालेला आहे हे सचिवांनी मान्य केलेले आहे. १४ प्रकल्पांवर ९९ लक्ष रुपयांचा खर्च झालेला आहे. मागील बैठकीत दिलेली आकडेवारी चुकीची आहे. What is the fact of the Case? अशी विचारणा समितीने केली असता, महालेखापाल यांच्या कार्यालयाकडून स्थगितीची यादी मिळाली होती. विभागाने ४४४ प्रकल्पांची यादी दिली होती. महामंडळाच्या अधिनस्त असलेल्या १०१ ते २५० यापैकी एकूण योजनेच्या ४४४ प्रकल्पांची यादी होती. महालेखापाल कार्यालयाने एक्स्टार्ट केल्यानंतर रॉयल्टीचा कमी अधिक खर्च अशा प्रकारे याद्या तयार केल्या होत्या असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

९६ प्रकल्पांचा आढावा घेतला होता, यामध्ये ६१ प्रकल्प रद्द केले असे सचिवांनी पूर्वी उत्तर दिलेले आहे. ३५ प्रकल्पांवर ४.८६ कोटी खर्च झाला असे महालेखापाल यांच्या कार्यालयाचे निरिक्षण होते. सद्यःस्थितीत हे प्रकल्प रद्द करण्यात आले नाहीत. यासंदर्भात समितीने गोषवारा मागितला होता.

३५ प्रकल्पांवर ४ कोटी ८६ लक्ष रुपयांचा खर्च झालेला आहे. १४ प्रकल्पांवर ९९ लक्ष रुपयांचा खर्च करण्यात आलेला असून, ते खरे आहे काय असा प्रश्न विचारला असता सचिवांनी होय असे उत्तर दिले होते. त्यावेळी ३५ प्रकल्पांची विभागणी का केली अशी विचारणा सचिवांकडे केली असता त्यांनी या प्रकल्पावर झालेल्या खर्चाचे उदाहरण देताना विभागीय सचिवांनी सांगितले होते की, नांदेड जिल्ह्यात भूसंपादनासाठी ३७ लक्ष रुपये खर्च झाले आहेत. ३५ प्रकल्पांवर ४.५ कोटी रुपये खर्च करण्यात आला असून, ते प्रगतीपथावर आहेत, असे देखील सचिवांनी उत्तर दिले होते.सचिवांना मागिल बैठकीत दिलेली माहिती या बैठकीत दुरुस्त करता येत नाही असे समितीने सूचित केले असता, महालेखापाल यांच्या कार्यालयाने स्थगितीवर नसलेल्या योजनेमधील काही खर्च गृहीत धरलेला आहे. त्यामधील ४ योजना आहेत, यापैकी अमरावती मधील युवती योजना आहे. सदरहू योजनेवर २ कोटी ५३ लक्ष रुपयांचा खर्च झालेला आहे अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

विभागीय प्रतिनिधी जी माहिती देत आहेत, ती इतिवृत्तामध्ये नमूद केलेली आहे. आता पुन्हा त्यामध्ये दुरुस्त करणे हे उचित होणार नाही आणि तशा प्रकारे दुरुस्ती करता येत नाही असे समितीने सूचित केले असता, ४ कोटी ८७ लक्ष ८३ हजार रुपयांचा खर्च झालेला आहे. परंतु, या स्थगितीमधील योजना नाहीत. स्थगितीमधील योजनांवरील खर्च हा ७७ लक्ष रुपयांचा आहे. या योजना प्रगतिपथावर आहेत. रद्द किंवा स्थगितीमध्ये नाहीत असा खर्च महालेखापाल कार्यालयाने गृहित धरला होता. अमरावतीमधील योजना आहे. सदरहू योजनेवर २ कोटी ५३ लक्ष रुपयांचा खर्च केलेला आहे. भूसंपादनावर खर्च झालेला आहे. महालेखापाल कार्यालयाने सदरहू योजना रद्द झाली असे गृहीत धरले होते. निविदा प्रक्रिया पूर्वीची होती. भूसंपादन झाल्यानंतर ती करण्यात यावी. महामंडळाने निविदा प्रक्रिया रद्द करावी, असे म्हटले होते. त्यांनी योजना रद्द झाली असे गृहीत धरले होते. दुसरी खुपसुंगी योजना आहे. महालेखाकार यांनी त्यांनी शेरा काय लिहीला आहे तो कृपया वाचावा. निविदा रद्द करावी असे नमूद केले होते, योजना रद्द करावी असे लिहीले नाही. खर्च वाया जाऊ नये असा निर्णय महानगरपालिकेने घेतला होता. २३ योजनांवर शून्य खर्च आहे. १४ योजनांवरील खर्च नमूद केलेला आहे. ४ योजना या प्रगतीपथावर आहेत. त्यामुळे ४ कोटी ८७ लक्ष रुपयांची आकडेवारी दिसून येत आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

१४ प्रकल्पांमधील कोणत्या ४ योजना प्रगतीपथावर आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता,त्याच योजना आहेत. म्हणून त्या योजनांवर खर्च झालेला असल्यामुळे त्या योजना रद्द करावयाच्या नाहीत. यामध्ये पुणे जिल्ह्यातील मुरडी नावाची एक योजना सुरु आहे. त्यानंतर आप्पाजीवाडी नावाची एक योजना असून, सदर योजनेवर २ लाख रुपयांचा खर्च झालेला आहे. खुपसुंगी नावाची एक योजना आहे. सदरहू योजनेवर १ कोटी रुपयांचा खर्च केलेला आहे. खुपसूंगीची जी योजना क्रमांक २ आहे, तिचा खर्च शून्य आहे असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

माहितीमध्ये एक कोटी रुपये असे लिहिलेले आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, खुपसूंगी योजना क्रमांक १ किंवा २ याबाबत साशंकता आहे. खुपसूंगी योजना क्रमांक ०२ वरील खर्च शून्य आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

एक कोटी रुपये कमी करुन दिलेले आहेत, त्याची एकूण संख्या ४८७ ची आहे. ती ७७ लाख रुपये होणार आहे.ही त्याची विगतवारी दिलेली आहे. महालेखापाल यांनी जी संख्या गृहित धरलेली आहे, ती येथे दिलेली आहे.त्यानंतर त्यांनी ती संख्या मान्य केलेली आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता, बोर्डीमध्ये ४१.८७ टक्के योजना रिजेक्ट केल्या नाहीत. एकूण २५३ योजना रिजेक्टेड नाहीत असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

खुपसूंगीचे एक कोटी रुपयेही रिजेक्टेड नाहीत का ? अशी विचारणा समितीने केली असता, ते एक कोटी रुपये रिजेक्टेड नाहीत. खुपसूंगी २ चा खर्च यामध्ये गृहित धरता येत नाही. खूपसूंगी योजनेवरील खर्च एकूण ३ कोटी रुपये आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

४८७ पैकी खुपसूंगीमध्ये किती खर्च झाले? या समितीच्या प्रश्नाबाबत महालेखापालांनी यातून एक कोटी रुपये कमी केले तर विभागाची ४८७ ची टोटल कशी टॅली होणार ? महालेखापालांनी त्या योजना रद्द नसताना रद्द गृहित धरलेल्या आहेत, यामध्ये फिगर्स ४८७ चा ब्रेक अप दिलेला आहे, खूपसंगीचा जो १ कोटी रुपये गृहित धरलेला आहे, तो यामध्ये दिलेला आहे, खूपसुंगीवरील खर्च शून्य आहे. खूपसुंगी २ वरचा एक कोटी रुपये खर्च नजरचूकीने यामध्ये घेतलेला आहे, तसे गृहित धरल्यास याची टोटल टॅली होते. ती टोटल टॅली करण्यासाठी हा हिशोब ॲज इट इज धरलेला आहे असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

चार योजनेमध्ये जे काही पकडलेले आहे, ते चुकीचे असेल यावरील खर्च ७७ लाख रुपये असून तो निष्फळ झाला का ? अशी विचारणा समितीने केली असता, अजून ती योजना कायमस्वरुपी रद्द नाही, ती स्थगित आहे असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

एका बाजूला विभागाकडून स्थगितीचा प्रस्ताव तयार करण्यात येतो, विभागाची भूमिका काय आहे, या योजनेवरील हा अल्टीमेटली खर्च निष्फळ होईल अशी विचारणा समितीने केली असता, निधी उपलब्ध झाला तर भविष्यात योजना चालू होईल असे सांगितले.

योजना सुरु करायची आहे, निधी आज नाही तर उद्या मिळेल, निधी अभावी योजना रद्द करण्यासाठी प्रस्तावित केलेले आहे. योजना रद्द झाली नाही. त्या दृष्टीने पावले उचला कार्यवाही करा असे समितीने सूचित केले असता, योजना रद्द केली तर झालेला खर्च निष्फळ आहे, रद्द केली नाही तर झालेला खर्च उपयोगी आणता येतो असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

७७ लाख रुपयांच्या लेखापरिक्षण मुद्दयाकरिता अवाजवी तरतूद करू नये योजना उपयोगी नसेल तर रद्द करावी, उपयोगी असेल तर रद्द करु नये. काम करायचे नसेल तर काही उपयोग नाही. यासंदर्भात ठाम भूमिका घेणे आवश्यक आहे. काहीतरी योग्य निर्णय घेणे आवश्यक आहे. यामध्ये भूमिका अशी होती की योजनांवर खर्च शून्य झालेला आहे, अशा सर्व योजना रद्द केलेल्या आहेत. ज्याच्यावर थोडाफार खर्च झालेला आहे, अशा मोजक्या ३०-३५ योजना आहेत, त्या स्थगितीमध्ये आहेत व्हेरिफाय केल्या जात आहेत. जेथे लोकप्रतिनिधींची मागणी असेल, भविष्यात ती योजना पूर्ण करणे शक्य असेल ती योजना असा मिळून एक प्रस्ताव महामंडळासमोर ठेवण्यात येणार आहे. ज्या योजना रद्द करावयाच्या आहेत, त्यांचा फिजिबिलिटीनुसार नेमका क्रम सांगण्यात यावा. ज्या योजनांची त्या भागामध्ये पाण्यासाठी गरज नाही, त्यापैकी काही योजना कमांडमध्ये येतात, अशा योजनांची माहिती सांगून त्या का रद्द करावयाच्या याची कारणे सांगण्यात यावी. निधीच्या एकूण उपलब्धततेच्या अनुषंगाने तो निर्णय झालेला आहे. लोकमागणी व आवश्यकतेनुसार ज्या योजना आहेत, त्या सर्वप्रथम हाती घेण्यात याव्यात असे समितीने सूचित केले असता, या संदर्भातील प्रस्ताव नियामक मंडळासमोर ठेवण्यात येईल. जेथे पाणी आहे, तेथील योजना रद्द करण्यास महामंडळाने मंजूरी दिलेली आहे, सर्व्हेचे पैसे खर्च झालेले असतील, निधी नसूनही प्राधान्य असेल, यासंदर्भात मागील महिन्यामध्ये नियामक मंडळाची बैठक झाली, त्यामध्ये हा मुद्दा आला होता. नियामक मंडळात माननीय मंत्री व माननीय राज्यमंत्री अध्यक्ष व उपाध्यक्ष आहेत, सचिव आहे, एमडी महोदय सदस्य सचिव आहेत. जलसंपदाचे सचिव आहेत, वित्त विभागाचे सचिव आहेत. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

ज्या योजनांवर जास्तीचा खर्च झाला, त्याबाबत कारवाई प्रस्तावित करणार होते. त्यामध्ये दोन भाग आहेत, एक तर कलमम ३८ अंतर्गत जे अतिरिक्त १२५ टक्क्याच्या वर दिलेले आहे, ते आयडेंटिफाय केलेले आहेत, त्यासंदर्भातील जवळ जवळ

१५ केसेस सांगितलेल्या आहेत.अतिरिक्त परिमाण झालेले आहे, महालेखापाल यांनी आक्षेप घेतलेला आहे. येथे सर्वेक्षण बरोबर झालेले नाही, सर्वेक्षणाच्या त्रुटी यामध्ये आलेल्या आहेत, त्याच्या संदर्भामध्ये काही लोकांना शो कॉज नोटीसेस दिलेल्या आहेत. वस्तुस्थिती अशी आहे की, एका ठिकाणी वाढ झालेली आहे, जेथे वाढ झालेली आहे, स्ट्राटामध्ये बदल झालेला आहे, सर्वेक्षण ज्यावेळी करण्यात येते, साठ मीटर च्या अंतरावर एक-एक पोल घेण्यात येतो, सीओटी घ्यावयाचा असेल तर मध्ये जे अंतर (लांबी) असते, ते फार काही मोठे राहत नाही. जास्तीत जास्त ६००-७०० मीटरमध्ये साठ मीटरच्या पोअरमध्ये काही व्हेरिएशन झालेले असेल. कॉंक्रीटीकरणाच्या अनुषंगाने सांडव्यामध्ये नेमके दोन-चार ठिकाणी असे झाले असेल तर अशा लोकांकरिता शो कॉज नोटीस पाठविण्यात आलेल्या आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

त्यांचे खुलासे आल्यावर यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्यात यावी.हे सर्व चौकशीचे काम पुढील दोन महिन्याच्या आत पूर्ण करुन ज्या ज्या लोकांवर या विषयासंदर्भातील जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे, त्यांच्याविरुध्द दोन महिन्यांच्या आत कारवाई करण्यात यावी.विभागीय चौकशी सुरु करुन संपविण्याचा कालावधी सहा महिन्यांचा आहे. दोन महिन्यांच्या आत चौकशी व खुलासे तपासणीची कारवाई पूर्ण करण्यात यावी असे समितीने सूचित केले असता, एकूण १५ प्रकल्पांमध्ये लोक आयडेंटिफाय केलेले आहेत, सविस्तर माहितीची तपासणी करणे आवश्यक आहे.त्यांचे म्हणणे ऐकून घेऊन त्यावेळी नेमकी काय परिस्थिती होती, त्यानंतर त्यांचे खुलासे अमान्य असतील तर प्रपत्र १ ते ४ भरुन चौकशी सुरु करण्यात येईल.उर्वरित तीन प्रकल्प ऑनगोईंग आहेत, रद्द करणार नाही, या प्रकारची महालेखापालांकडून तपासणी करुन ७७ लाख रुपयांचे विभागाचे यामध्ये पैसे गुंतलेले आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

**परिच्छेद क्र. २.१.६.४- प्रकल्पाची आर्थिक सुसाध्यता, लाभ-व्यय गुणोत्तर**

या परिच्छेदाबाबत शासनाने उत्तर दिलेले आहे. कॉस्ट बेनिफिट रेशिओ अंतर्गत फिशरीज ॲक्सेप्ट केलेले नाही, मागील साक्षीच्या वेळेस समितीने नवीन मापदंडानुसार याबाबत विचार केला होता. हे केंद्र शासनाचे डॉक्यूमेंट आहे, ते समितीने त्यांना दिले होते. १९८३ चे हे जे विवरण होते, त्यामध्ये फिशरीज नाही. वॉटर रिसोर्सेसचे २०१० चे जे मॅन्युअल आहे, त्यामध्ये जलसंधारण विभागाच्या कॉस्ट बेसिस ॲनॅलिसिसमध्ये दुरुस्ती करावी लागेल, असे महालेखापाल यांनी सांगितलेले आहे असे समितीने निदर्शनास आणले असता,जलसंधारण विभाग म्हणून त्या अनुषंगाने त्यामध्ये कॉस्ट बेसिस ॲनॅलिसिसमध्ये काय काय पॅटर्न घ्यावेत, वित्त विभागाच्या मान्यतेने त्याचे स्वतंत्र मॅन्युअल आहे, विभागाचे प्रकल्प फार छोटे छोटे आहेत.त तोच जर रेशिओ मोठया प्रकल्पाला लागू करावयाचा म्हटला तर ते शक्य नाही असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

कोल्हापूरी बंधारा पाच-दहा लाख रुपयांचा असेल आणि त्याचा जर २५० हेक्टरचा प्रकल्प असेल तर त्यामध्ये फिशरीजचा कंपोनंट निश्चितपणे येणार. महालेखापाल यांनी माहिती तपासून विभागाने याबाबत स्वतंत्र सुधारित सूचना काढाव्यात असे सूचित केले आहे. वित्त विभागाच्या मान्यतेने या संदर्भात काय काय सुधारित सूचना काढता येतील त्या एका महिन्याच्या आत काढण्यात याव्यात असे समितीने सूचित केले असता, विभागीय प्रतिनिधींनी त्यास सहमती दर्शविली.

**परिच्छेद क्र.२.१.७.१- WCD अंतर्गत प्रकल्पासाठी निधी पूरविणे**

महामंडळाने उशिर झाला म्हणून ०९ कोटी रुपये परत केले, हे जर चार दिवस अगोदर केले असते तर पैसे परत गेले नसते. अगोदर विशेषण नीट झालेले नाही, म्हणून पैसे सरेंडर झाले, त्याच बरोबर बाकीचे पैसे खर्च न करता सरेंडर झाले, निधीची कमतरता सांगण्यात येते आणि पैसे खर्च न करता सरेंडर करण्यात येते, हे योग्य नाही. सन २०१५-१६ मध्ये जर बघितले तर ३१ मार्च रोजी १६ कोटी रुपये रिलीज झालेले आहे, एका बाजूला इतक्या मोठया प्रमाणात विभागाचा बॅकलॉग आहे, निधी या विभागाला जास्त मिळत नाही. नेहमी निधीची कमतरता असते, पैसे अगोदर प्राप्त करुन घेण्याचा प्रयत्न झाला असता एमएनआरच्या प्रलंबित कामांकरिता निधी मिळाला असता असे मत समितीने व्यक्त केले असता, दिनांक ०१ एप्रिल आणि मार्च अखेरच्या मध्ये हे करुन घेतले असते तर १०९ च्या आत महामंडळामार्फत निधी त्यांना देण्यात येणार होता. विधेयकाच्या सुधारणेस ०१ एप्रिल रोजी मान्यता मिळाली. मागील वेळी समितीने जलसंपदाच्या जशा प्रायोरिटीज आहेत, त्याप्रमाणे विभाग काही करीत आहे का ? असे विचारले होते. त्या अनुषंगाने विभागाने एक प्रस्ताव सादर केलेला आहे. भूसंपादनाला फर्स्ट प्रायोरिटी त्यानंतर त्या प्रकल्पाला प्रायोरिटी आहे. ज्या प्रकल्पांची कामे ५० ते ७५ टक्के पूर्ण झालेली आहेत, त्यांच्या कामांनाही

प्रायोरिटी देण्यात येणार आहे, या माध्यमातून जुन्या प्रकल्पांच्या दायित्त्वाला प्राधान्य दिलेले आहे, ही कार्यपध्दती विभागाने विचाराधीन ठेवलेली आहे, तसा प्रस्ताव सादर केलेला आहे. निधी वितरणाच्या संदर्भात आणखी सुसुत्रता आणण्याचा विभागाचा विचार आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

**परिच्छेद क्र. २.१.७.२ - MWCC अंतर्गत प्रकल्पासाठी निधी पुरविणे.**

सदर परिच्छेदाबाबत माहिती देताना, महामंडळाचे १८८५ कोटी रुपये मिळालेले आहेत, १९१ कोटी रुपये या वर्षीचे पकडून आतापर्यंत महामंडळाला १८८५ कोटी रुपये मिळालेले आहेत. सद्यःस्थिती अशी आहे की, सन २०१५-२०१६ पर्यंत एकूण योजना २७१७ योजना एकूण होत्या. त्याची किंमत आहे २१५९ कोटी रुपये त्यापैकी १७७७ कोटी रुपये खर्च झालेला आहे. १४०० कोटी रुपये बॅलन्स आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

एकूण प्रकल्पाच्या प्रशासकीय मान्यतेची रक्कम ३१५९ कोटी रुपये आहे. १७७७ कोटी रुपये खर्च झालेला आहे. १४०० कोटी रुपये बॅलन्स आहेत. हा निधी प्रकल्प पूर्ण करण्यासाठी लागणारा निधी आहे. २३३० प्रकल्प रद्द केले त्याचे निकष काय आहेत ? कोणत्या दरावर ते प्रकल्प रद्द केलेले आहेत, बाकीचे प्रकल्प रद्द केलेले आहेत, त्यांचे निकष काय आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता, नियामक मंडळाने सुचविल्याप्रमाणे चीफ इंजिनियरच्या अध्यक्षतेखाली तीन मुख्य अभियंत्यांची एक समिती स्थापन केली होती. सर्व प्रकल्पांची सविस्तर तांत्रिक छाननी केली, जो प्रकल्प सुरु झालेला नाही, ज्यावर एकही पैसा खर्च झालेला नाही, असे प्रकल्प निवडून त्यासंबंधीच्या निविदाही रद्द करण्यात आलेल्या आहेत. ज्या प्रकल्पावर थोडा खर्च झालेला आहे, ते प्रकल्प विभागाने डायरेक्ट रद्द न करता स्थगित ठेवलेले आहेत. प्रत्येक प्रकरण तपासून मागणीप्रमाणे नियामक मंडळासमोर ठेवण्यात येणार आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

एखाद्या प्रकल्पावर केवळ १५ टक्के खर्च झालेला असेल आणि तेथील नेता प्रभावी असला तरी तेथील प्रकल्प कमी पैसे खर्च झालेले असलेले तरीही ते प्रकल्प स्थगित केलेले नाही. याकरिता कोणता निकष आहे ? प्रकल्प रद्द केले तर सिंचन क्षमता कशी वाढणार ? किती प्रकल्प पूर्ण झाले, त्यातून किती सिंचन क्षमता वाढलेली आहे ? यातून सिंचनाचे मूळ उद्देशाचे उल्लंघन होत आहे, एवढा पैसा खर्च करुन उपयोग काय आहे ? ज्या भागाचे सिंचन क्षेत्र वाढवायचे आहे, तेथील सिंचन क्षेत्र वाढलेच नाही. आता या २३३० प्रकल्पांचे भवितव्य काय आहे, २३३० प्रकल्प २००६ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते, २३३० प्रकल्प रद्द केलेले आहेत, त्यांची एस्टीमेटेड कॉस्ट काय होती ? २३३० योजना रद्द केल्या आहेत, ही चुकीची आकडेवारी समितीला देण्यात येत आहे. १४ प्रकल्पासाठी १७७७ कोटी रुपये खर्च झाला. जे प्रकल्प रद्द झालेले आहेत, त्यावर काहीच रक्कम खर्च केलेली नाही का? अशी विचारणा समितीने केली असता, यावर विभागाने सर्व्हेक्षण केलेले आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

योजना तयार करताना एस्टिमेटस आणि सर्व्हेक्षण करावेच लागते असे मत समितीने व्यक्त केले असता,सर्व्हेक्षणासाठी वेगळी निविदा काढली जाते. एखादा व्हिजीटर मॅप तयार करुन त्यांचे पेमेंट केले जाते. खात्याच्या अभियंत्याकडून सर्व्हेक्षण करुन घेण्यात येते.

**परिच्छेद २.१.७.३- VIIDP अंतर्गत निधी पुरविणे**

सन २०१२ ते २०१४ पर्यंत डीपीआर तयार केला असून त्यासाठी एकूण ९१२ कोटी रुपये मंजूर झालेले आहेत. ५९९८ कामे होते त्यापैकी शासनाकडून ३२८५ योजनेच्या कामांना मंजुरी मिळाली.

शासन स्तरावर डीपीआर कमी मंजूर होण्याचे कारण काय आहे? अशी विचारणा केली असता, काही डीपीआरमध्ये तात्पुरते प्रोजेक्ट घेतलेले आहेत. यात एस्टिमेटस आणि सर्व्हेक्षण याचा समावेश आहे. सन २०१२-२०१३ ला प्रोजेक्ट सुरु झालेला आहे. १८७० योजना मंजूर झाल्या आणि २३३ कोटी रुपयांची कामे अपूर्ण राहिली आहेत. दिनांक १३ सप्टेंबर २०१७ मध्ये या सर्व योजनांना शासन स्तरावर मंजुरी मिळाली आहे. चंद्रपूर जिल्ह्यात बोरजाम प्रकल्प झालेला आहे.

त्यापैकी २५०० कामांचे टेंडर काढले. या प्रकल्पांसाठी केंद्र सरकारकडून पैसे उपलब्ध करुन घेण्यासाठी विभाग कमी पडला असे विभागीय प्रतिनिधींना वाटत नाही का? ७८५ योजना सुरु झाल्या होत्या, त्यापैकी ५९ कोटी रुपयांच्या ३६ योजना आणि उर्वरित ३५ योजना ग्रामविकास आणि जलसंधारण विभागाच्या आहेत. या ३५ योजनांची यादी विभागाकडे आहे का? विचारणा समितीने केली असता ६९८ च्या योजनांची शासन निर्णयाची यादी विभागाकडे आहे. यात ३४ योजना असून त्यातील

एक योजना पूर्ण झालेली आहे. काही योजना महामंडळाकडे वर्ग केल्या आणि काही जलसंधारण विभागाकडे वर्ग केल्या आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले. २५०० योजनांपैकी १८०० योजना पूर्ण झाल्या आणि ६९८ ची यादी विभागाकडे आहे.

विभागाने व्ही.आय.डी.सी. प्रकल्प सुरु केला, परंतु हा प्रकल्प निधीसाठी अडकला. बाकी सर्व प्रकल्प विभाग हाती घेऊ शकला असता, परंतु यासाठी प्रशासकीय यंत्रणा कमी पडली असे वाटत नाही काय? अशी विचारणा केली असता महामंडळांकडे जास्त योजना दिलेल्या आहेत. जलसंधारण आणि ठिबक सिंचन या योजनांचा त्यामध्ये समावेश होता. यामध्ये ४७२ योजना ठिबकच्या होत्या असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

विभागाने ९३५ कोटी रुपयांची मागणी केंद्राकडे केली आणि केंद्राकडून २३५ कोटी रुपये मिळाले. यामध्ये विभाग कोठेतरी कमी पडले असे वाटत नाही का? अशी विचारणा समितीने केली असता, केंद्र सरकारचे सन २०१५-२०१६ पर्यंत पैसे आले आणि सन २०१६-२०१७ मध्ये पैसे आले नाहीत. सन २०१५-२०१६ मध्ये १४० कोटी रुपयांची मागणी केली असता विभागाला ३७ कोटी रुपये मिळालेले आहेत. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने डीपीआर मंजूर केलेला असून एक तृत्यांश कामासाठी केंद्र सरकारकडून पैसे आणणे शक्य झाले नाही. विभाग पाठपुरावा करण्यामध्ये कोठेतरी कमी पडला, ही वस्तुस्थिती विभागाला नाकारता येणार नाही. सातत्याने चार वर्षे ही अशीच परिस्थिती होती असे मत व्यक्त करुन सन २०१२ ते सन २०१५ या कालावधीत ज्या प्रकल्पाचे टेंडर काढले होते, त्या कामास सुरुवात केली होती का? अशी विचारणा समितीने केली असता तो गॅप १७० कोटी रुपयांचा होता असे विभागीय सचिवांनी विदित केले.

राज्य सरकार खर्च करीलच, परंतु केंद्र सरकारचे जास्तीत जास्त पैसे आणून ही कामे पूर्ण झाली पाहिजेत, यासाठी विभागाने प्रयत्न करणे आवश्यक होते.

व्ही.आय.डी.सी. चा प्रकल्प पूर्ण झाला. ३२८५ प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता दिली, त्यापैकी २५०० प्रकल्पांची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन घेतली. ७८५ पैकी ३५ योजना पूर्ण करण्यात येणार आहेत. ७५० योजनांची जी यादी आहे त्यातील एका प्रकल्पासाठी एक लाख रुपये, २० लाख रुपये, ५० लाख रुपये, ७५ लाख रुपये खर्च झालेले आहेत. जे प्रकल्प पूर्ण झालेले आहेत त्यामुळे सिंचन क्षमता निर्माण झालेली आहे. अपूर्ण प्रकल्प शासनाच्या वेगवेगळ्या प्रकल्पांमधून किती दिवसात पूर्ण करण्यात येत आहेत अशी विचारणा समितीने केली असता माननीय राज्यपाल महोदयांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार मागील वर्षी विदर्भाच्या प्रकल्पाची अशीच परिस्थिती होती असे विभागीय सचिवांनी सांगितले.

प्रशासकीय मान्यता दिली आणि निविदा काढल्या व रक्कम खर्चही केली. जे प्रकल्प अपूर्ण आहेत ते किती दिवसात पूर्ण करण्यात येणार आहेत. सदरचे प्रकल्प मार्च २०१९ पर्यंत पूर्ण करणार आहात, असे आश्वासन आपण समितीला देणार आहात का? अशी विचारणा समितीने केली असता दोन आर्थिक वर्षात ४०० कोटी रुपये महामंडळाला मिळाले. सदरचे प्रकल्प दोन वर्षात प्रकल्प पूर्ण करण्यात येतील असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

५ वर्षाच्या कालावधीमध्ये जर प्रकल्प झाला नाही तर शेतक-यांना त्या जमिनी परत दिल्या जातील काय ? केंद्राच्या भू-संपादन कायद्यामध्ये क्षेत्र १८ खाली वाढीव मोबदला देता येईल. भू-संपादनाची नेमकी प्रक्रिया काय आहे ? म्हणजे फक्त त्याला प्रत्येक एकर मागे पैसे दिल्याने भू-संपादन झाले की त्यावर त्याला काही अनुदान दिले म्हणजे भू-संपादन होते.

भू-संपादनाच्या प्रक्रियेमध्ये त्याचा अवार्ड रितसर जाहीर होतो. त्यामध्ये त्याच्या आजुबाजूच्या जमिनीच्या किमतीनुसार त्याची किंमत निश्चित होते. एखाद्या प्रकल्पासाठी तुमची जमीन संपादित करायची झाल्यास जमिनीचा मोबदला आणि एक वेगळे अनुदान या दोन प्रक्रिया जर पूर्ण झाल्या तरच जमीन भू-संपादनाची प्रक्रिया पूर्ण होते अन्यथा ती पूर्ण होत नाही. जमिनीच्या व्यतिरिक्त एखादे वेगळे अनुदान दिले जाते. जलसंधारण विभागाचे सध्यातरी असे काही धोरण नाही.

**परिच्छेद क्र. २.१.८.३ : प्रकल्पाचे अपूर्ण/निकृष्ट निष्पादन**

धरण बांधायचे की कालवे बांधायचे या संदर्भात विभागाचे काय धोरण आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, कालव्यांच्या भू-संपादनाला ज्या ठिकाणी विरोध आहे तिथे विभागाने जानेवारी, २०१७ मध्ये जे धोरण निश्चित केलेले आहे. त्या धोरणानुसारच कार्यवाही करण्यात येणार आहे.

कालवा सुरु करण्याचे विभागाचे धोरण आहे. पण शक्यतो अवर्षण प्रवण क्षेत्रात धरण बांधणे गरजेचे आहे कारण तिथे जनावरांसाठी पाण्याची आवश्यकता असते. पण बाकीच्या ठिकाणी कालवा न बांधता, भूमी अधिग्रहण न करता एवढे मोठे नियोजन करुन घेण्यात येते आणि नंतर विभागाकडून सांगण्यात येते की, विभाग उपसा सिंचन करतो. पण ते ही उद्दिष्ट पूर्ण होत नाही.

कुठल्याही प्रकल्पाचा एक टाईम पाहिजे, कारण ती प्रक्रिया खूप मोठी होते आणि लोक संपादनाचे पैसे घेऊन घेतात आणि मग १० ते १५ वर्षानंतर तो प्रकल्प पूर्ण होऊ देण्याची त्यांची मानसिकता राहत नाही. एका वर्षाच्या आत कोणत्याही प्रकल्पाचे सेक्शन लागले पाहिजेत आणि त्याची सुरुवात झाली पाहिजे. शासनाने फक्त जमिनी घेऊन ठेवल्या आणि पैसे दिल्यानंतर काही लोक जमा होतात आणि त्यामुळे परत भांडणे होतात. असे मत समितीने व्यक्त केले असता, २ फेब्रुवारी, २०१७ रोजी जलसंपदा विभागाने एक परिपत्रक काढलेले आहे. जानेवारी, २०१७ रोजी कालव्याऐवजी पाईपलाईनचा निर्णय मंत्रीमंडळाने घेतलेला आहे. याचे सूत्र असे आहे की, ज्या ठिकाणी पाण्याची स्पीड आहे तिथे १ मीटर पर सेकंद पाण्याचा स्पीड मिळाला तर त्या ठिकाणी हे फिजीबल आहे हे जलसंपदा विभाग म्हणू शकतो.

या प्रकल्पासाठीची सर्व पाईपलाईन विभागाकडून कधी पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. याच्या नियोजनासाठी काही टेंडर विभागाकडून काढलेले आहेत काय ? महालेखाकारांनी म्हटले होते की, ६४४४ घनमीटर अंदाजित परिणामाच्या ऐवजी २४०९ घनमीटर असे गणेशपूर प्रकल्पाबद्दल सांगितले होते. यामध्ये उर्वरित पिचिंग खणनी केव्हा केली आणि नेमकी किती परिणामाची केली ? अशी विचारणा समितीने केली असता, पिचिंगचे काम हे सन २०१६ मध्ये पूर्ण झालेले आहे. प्रस्तावित व्हॅल्युम ६४४१ घनमीटर होता. प्रत्यक्षात ५५९२ क्युबिक मीटरचे काम झालेले आहे. असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

२०१५-१६ आणि सन २०१६-१७ मध्ये धरणाच्या उपलब्ध साठ्यामध्ये १४७ आणि १५० हेक्टर सिंचन झाले असे ३.९ किलोमीटर जे विभागाला सुरु करता आले नाही तर तिथपर्यंत कालवा झाला आहे की कालव्याचे कामच सुरु झालेले नाही. तर या कालव्याच्या ऐवजी विभाग बंदिस्त पाईपलाईनने काम करीत आहे. एका बाजूला पाईपलाईनचे काम हाती घेऊ असे विभागाकडून सांगण्यात येते आणि दुस-या बाजूला वेलॉसिटीची फिजीबिलीटी बघून घेऊ असे सांगण्यात आले. या केसमध्ये आपण हे सर्व चेक केले आहे काय ? असे समितीने निदर्शनास आणले असता यामध्ये सर्व फिजिबिलीटी विभागाकडून चेक करण्यात येते असे अवगत केले.

फिजिबिलीटी होती म्हणूनच विभागाने प्रकल्प मंजूर केला आहे. कालव्याचे जमिनीसाठी लागणारे भू-संपादन आणि पाईपलाईनचा लागणारा खर्च हा प्रचंड आहे. जर ३ फुटाच्या खालून विभागाने पाईपलाईन टाकली तर लोकांचा अडथळाही येणार नाही. त्यासाठी काय कालबद्ध कार्यक्रम आहे अशी विचारणा समितीने केली असता याबाबत २ महिन्यामध्ये याची फिजिबिलीटी स्टडी करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

फिजिबिलीटी चेक केल्यानंतर प्रत्यक्षात काम किती दिवसात होईल ? आणि सुप्रमा आहे काय ? या प्रकल्पाचा मूळ उद्देश उपसा सिंचनचा नव्हता. तर आता समितीला ही सिंचन क्षमता दाखवण्यात येत आहे आणि कालव्याचा विकल्प हा पाईपलाईनचा काढलेला आहे. सध्या तरी जमीन संपादनाच्या तुलनेत पाईपलाईनचे काम सोपे आहे. हे सर्व बघून सुप्रमा आणि या कामाला पूर्ण करण्याचा दृष्टीने किती दिवसात निर्णय देण्यात येणार आहे? अशी विचारणा समितीने केली असता विभागाकडून ३ महिन्यात हे सर्व करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

दुसरा मुद्दा असा आहे की, यामध्ये विभागाची पिचिंग कधी झालेली आहे? महालेखाकारांचे म्हणणे आहे की, पिचिंग झालेलीच नाही असे मत समितीने व्यक्त केले असता असे पिचिंग मे, २०१६ मध्ये झालेली आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

त्या ठिकाणी साईटवर कार्यकारी अभियंता आहेत काय ? कारण महालेखाकारांनी सांगितले की, पिचिंग झाले असेल तर तेथे पहाणीसाठी जाता येईल. पण आता तेथील आमदारांचे म्हणणे आहे की, दगड कुठून आणला तर आता हा विषय खूप गंभीर आहे. या ठिकाणचे ए.सी. कोण आहेत त्यांनी अहवाल बघून समितीला १५ दिवसात सादर करावा. नाहीतर नागपूर अधिवेशनात समिती स्वतः पहाणी करेल असे समितीने सूचित केले असता १५ दिवसात आम्ही हा अहवाल देतो असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

चंद्रपूर जिल्ह्यात उन्हाळ्यामध्ये पाण्याचा प्रचंड त्रास होतो. या जिल्ह्यात वर्धा नदीवर बरेचसे प्रकल्प आहेत. तसेच २१ प्रकल्प एस.एस.सी, एल.एन.टी. अशा सिमेंट फॅक्ट-यांमध्ये वर्धा नदीचे पाणी वापरले जाते आणि विभाग त्यांच्याकडून पाण्याचे पैसे सुद्धा वसूल करण्यात येतात. विभागाने प्रत्येक प्रकल्पाला जवळ छोटे छोटे बंधारे बांधले तर उन्हाळ्यातील जनतेचा त्रास कमी होईल. कारण यावेळी सरासरीमध्ये फक्त ३३ टक्केच पाणी झालेले आहे आणि समोर कंपन्या तसेच उद्योगधंदे तेच पाणी घेतात. त्यासाठी त्यांच्याकडुन विभागाने पैसे न घेता बंधारे जर बांधता आले तर पाणी तिथल्या तिथे अडेल, त्यामुळे शेतक-यांची जमीन ओलीताखाली येईल आणि तोच पैसा विभागाला बंधा-याच्या कामामार्फत वसूल करता येईल. या संदर्भात विभागाला काही निर्णय घेता येईल काय ? अशी विचारणा समितीने केली असता, सी.एस.आर.च्या अंतर्गत कंपन्या/उद्योगधंदे यांच्याकडून विभागाने बंधारे बांधून घेण्याचा प्रस्ताव दिला तर मोठ्या प्रमाणात आपल्याला पाणी अडवता येईल असे समितीने सूचित केले असता जलयुक्त शिवार अभियानामध्ये विभागाने सी.एस.आर.चा प्रस्ताव मोठ्या प्रमाणावर दिलेला आहे. चंद्रपूरमध्ये वेकोली, एन.टी.पी.सी. या ज्या कंपन्या आहेत त्यांच्या माध्यमातून अंबूजा सिमेंटने नाला खोलीकरणासाठी एक प्रस्ताव दिला होता.असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

हे सर्व सी.एस.आर. फंडातून करावे.डब्लू.सी.एल.चा सी.एस.आर. फंड तिकडे यु.पी.मध्ये वापरला जातो. तर मग कुठला सी.एस.आर. फंड आपण म्हणता ? ते पैसे तुम्ही घेऊ नका असे काही करता येणार नाही, तो वेगळा विषय आहे. पण सी.एस.आर. फंडातून बंधारा बांधता येईल म्हणजे याचा फायदा कंपनीला आणि तेथील लोकांना पण होईल. असे समितीने सूचित केले असता अंबूजा सिमेंटने एक प्रस्ताव दिलेला आहे आणि त्यांच्या ३ ते ४ कोटी रुपयाच्या प्रस्तावाला मान्यता देखील दिलेली आहे. असे विभागीय सचिवांनी विदित केले.

विदर्भातील वर्धा पौराणी आणि जी.एम.आर. या दोन कंपन्यांनी एक बंधारा बांधला. अशाच प्रकारे एकत्रितपणे १०-१० किलोमीटरवर बंधारे झाले तर विदर्भातील पाण्याचा प्रश्न मिटून जाईल. आजच्या परिस्थितीत भद्रावती नगरपालिकेमध्ये देखील पाणी नाही. महाराष्ट्रात ही दुस-या क्रमांकाची अशी नगरपालिका आहे जिथे २४ तास पाणी राहते. परंतु आज नदीमध्येच पाणी नाही तर लोकांना कुठून पाणी उपलब्ध करायचे असे मत समितीने व्यक्त केले.

क्वालीटी कंट्रोलचे सर्टिफिकेट साक्षीच्यावेळी देऊ असे विभागाने सांगितले तर ते सर्टिफिकेट महालेखाकारांना दाखवले काय ? अशी विचारणा केली असता, हे सर्टिफिकेट काही ठिकाणी नाहीत. यामध्ये ६६ तपासले होते त्यापैकी ४२ मध्ये प्राप्त आहेत. बाकीचे जे २० आहेत त्यापैकी ४ विभागाने प्रलंबित केले आहेत आणि उरलेले १४ सध्या प्रगती पथावर आहेत. पुढच्या देयकातून काढण्यात येतील आणि काही ठिकाणी ज्याचे सेक्युरिटि डिपॉझिट थांबलेले आहे त्याचे पैसे दिल्याशिवाय विभाग हे करणार नाही. असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

सर्व क्वालीटी कंट्रोलची कॉपी आली पाहिजे. ४२ ची आली आहे आणि ६६ पैकी ६ आपण रद्द केले आहेत. आता आपले १८ राहिले आहेत आणि त्यापैकी १४ तुम्ही घेऊ असे म्हणता आणि ४ ऑन गोईंग आहेत. पण क्वालीटी कंट्रोलची कॉपी आल्याशिवाय विभाग पैसे देतो कसे ?

केसिनचा मुरुम, काळी माती आणि पिचिंग हे तीन तुमचे मुख्य विषय आहेत. मग याच्या क्वालीटी कंट्रोलचे टेस्ट रिपोर्ट आल्याशिवाय विभाग काय काम करु शकतो. पिचिंगच्या कामात क्वालीटी कंट्रोलचा रिपोर्ट आल्याशिवाय तो दगड योग्य आहे की नाही हे तुम्ही कसे ठरवू शकता. त्यामुळे आधी क्वालीटी कंट्रोल आणि मातीचा टेस्ट रिपोर्ट घ्यावा लागेल. मग मातीचा टेस्ट रिपोर्ट कोणत्या तारखेला आहे आणि बिल कोणत्या तारखेला दिलेले आहे हे तपासण्यात येते का? हे तपासणारी यंत्रणा कोणती आहे ? वाढोणा गणेशपूरच्या तलावामध्ये टेस्ट रिपोर्ट न घेताच पिचिंग लावून टाकले आहे.

६६ पैकी जर १८ अपयशी झाले तर विभागाकडून तर बराच मोठा व्याप आहे त्यामुळे किती अपयशी झाले असतील. आता विभागाची २५ टक्के क्वालीटी कंट्रोल सर्टिफिकेट नाहीत तर या दृष्टीने आम्ही काय समजावे ? आपले काही सिस्टिम किंवा मॅन्युएल आहे की नाही ? विभागाने ६६ पैकी १८ काढले तर २५०० किंवा ५००० पैकी किती असतील ? या सिस्टिमला कुठेतरी इम्लीमेंटेशन होत नाही हे करावेच लागणार आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, आता विभागाने नवीन विभागात क्वालीटी कंट्रोलची विंग सेप्रेट ठेवलेली आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

धरणाच्या गाभ्यात माती भरण्यासाठी ती योग्य आहे की नाही, केसिनसाठी तो मुरुमम योग्य आहे की नाही, तो दगड पिचिंगसाठी योग्य आहे की नाही, हे सर्व टेस्ट रिपोर्ट आधी येऊन नंतर त्याचे युटिलायझेशन व्हायला पाहिजे का आधी युटिलायझेशन आणि नंतर टेस्ट रिपोर्ट हे समितीला स्पष्ट करुन सांगा असे समितीने सूचित केले असता यामध्ये विभागाकडून काळजी घेण्यात येते असे विभागीय सचिवांनी अवगत केले. वाढोणा गणेशपूर तलावामध्ये जो दगड लावला तो टेस्ट रिपोर्ट न घेताच लावला आहे. टेस्टींगसाठी तो दगड पाठवलेल्या तारखा यांना दाखवाव्या. त्या जिल्ह्यात खदानच नाही. यवतमाळ जिल्ह्याच्या कलेक्टरला याबाबत लोकप्रतिनिधींनी विनंती केली होती की, त्यामुळे आम्ही दगड आणू शकत नाही म्हणून अमरावती जिल्ह्यात देखील खदान असावी. तीन जिल्ह्याच्या सीमेवर हा तलाव आहे. तिथे दगड कुठून आणला किंवा काय केले हे माहिती नाही. तसेच त्यांनी विदाऊट क्वालीटी कंट्रोल रिपोर्ट लावून टाकला आणि बिल काढून टाकली ही वस्तुस्थिती आहे असे समितीने निदर्शनास आणले.

क्वॉलीटी कंट्रोलचे प्रमाणपत्र घेतल्याशिवाय विभाग देयके कशी अदा करतो. या १८ अधिका-यांच्या बाबतीतच नाही तर आपल्याकडे एवढा मोठा व्याप असल्यामुळे कुठे तरी विभागाला वचक असला पाहिजे. अशा प्रकारे क्वॉलीटी कंट्रोलच्या प्रमाणपत्राशिवाय निधी दिला जात असेल तर संबंधित अकाऊंटंटवर दंडात्मक कारवाई झाली पाहिजे. आधीच्या १८ अधिका-यांवर सुध्दा अशी दंडात्मक कारवाई झाली पाहिजे. या प्रकरणामध्ये अकाऊंटंटला नुसते शो कॉज नोटीस देऊन चालणार नाही.

जे लेखाधिकारी आहेत किंवा जे अधिकारी उपयोगिता प्रमाणपत्र प्रमाणित करुन देतात त्यांच्यावर कार्यवाही करावी. असे समितीने सूचित केले असता, यासंदर्भात विभागाकडून करण्यात येत आहे की, क्वॉलिटी कंट्रोलचे प्रमाणपत्र असल्याशिवाय संबंधित ठेकेदाराची देयके देण्यात येऊ नयेत. असे एक परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले. विभागाने परिपत्रक काढून काय उपयोग आहे. कारण शासनाचे तर तसे स्थायी आदेश आहेत. मॅन्यूअलमध्येच ते लिहिले आहे. त्या १८ अधिका-यांवर कोणती कार्यवाही करणार आहात ते समितीला सांगावे. त्यांना फक्त शो कॉज नोटीस विभाग देईल का ? अशी विचारणा समितीने केली असता, त्यांच्याकडून रिकव्हरी करणार आहोत. त्यामध्ये सुरक्षा ठेव असते. असे विभागीय सचिवांनी अवगत केले. विभागाचे चार्जेस हे अगदी नगण्य असतील.

Recovery of the Certificate नको तर Recovery of the Project Work. उपयोगिता प्रमाणपत्राच्या अभावी प्रकल्पाचे काम चुकीचे झाले असेल तर त्या ठेकेदाराला दंडीत कसे करता येईल. मूळात विभागाचे अधिकारी त्या ठेकेदाराला पेमेन्ट कसे करतात. असे प्रमाणपत्र न देण्यामध्ये जे जे अधिकारी संबंधित असतील त्या सर्वांवर कारवाई केली पाहिजे.

अकाऊंटंटचा संबंध शेवटी येतो. येथे तर विभागाची संपूर्ण यंत्रणा मोडकळीस झाल्यासारखी दिसते. या प्रकरणी शो कॉज नोटीस व्यतिरिक्त काही तरी दंडात्मक कारवाई झाली पाहिजे. कारण शो कॉजमध्ये नंतर हे अधिकारी सुटतात.

या लोकांवर दंडात्मक कार्यवाही झाली पाहिजे. परंतु त्या व्यतिरिक्त ज्या अधिका-यांनी या प्रकरणाला नजर अंदाज करुन मान्यता दिली, त्या अधिका-यांवर सुध्दा कार्यवाही होणे आवश्यक आहे.

या ठिकाणी सकृतदर्शनी असे दिसते की, क्वॉलीटी कंट्रोल प्रमाणपत्राशिवाय पेमेंट कसे करण्यात येते. या ठिकाणी ज्या दगडाच्या बाबतीत उदाहरण दिले आहे त्या ठिकाणी दगडच दिसत नाही. क्वॉलीटी कंट्रोलचे प्रमाणपत्र आले तर विभागाकडे तसा ठोस पुरावा राहतो की, काम पूर्ण झाले आहे. असे समितीने निदर्शनास आणले असता या बाबतचे संपूर्ण रेकॉर्ड पुन्हा एकदा तपासण्यात येतील असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने त्या १८ अधिका-यांशिवाय इतर कामातही शिस्त आणावी आणि या दृष्टीने विभागाने कार्यवाही करावी.

सचिव म्हणतात की, विभागीय पुन्हा रेकॉर्ड तपासतात तर रेकॉर्डमध्ये ते नसेल असे कसे होईल. कारण आता विभागीय सूचित या ठिकाणी साक्षीला ही माहिती देत आहेत. जे प्रकल्प सध्या सुरू आहेत त्यांचे सर्वच क्वॉलीटी संबंधी प्रमाणपत्रे इश्यू केलेले आहेत आणि जर तसे नसेल तर त्याबद्दल संबंधितांवर कोणती कारवाई होईल ते सांगण्याची आवश्यकता आहे असे समितीने सूचित केले असता, त्याबद्दल आता स्ट्रीक्टली लक्ष ठेवण्यात येईल व क्वॉलीटी कंट्रोलच्या प्रमाणपत्राशिवाय संबंधित ठेकेदाराला पेमेंट होणार नाही, १८ अधिका-यांच्या बाबतीत माहिती घेण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

त्या अधिका-यांना क्वॉलीटी कंट्रोलचे प्रमाणपत्र नसेल आणि त्यांनी जर पेमेंट केले असेल तर सर्व संबंधित जबाबदार अधिका-यांवर त्वरीत कारवाई करावी आणि केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला १ महिन्यात देण्यात यावा.

शिरवळ येथे आपण ११ कोटी ६४ लाख रुपये खर्च केले आहेत. मात्र अद्यापही त्या कामाची प्रगती दिसत नाही. असे समितीने निदर्शनास आणले असता, शिरवळच्या बाबतीत आता घळभरणी झालेली आहे. सन २०१६ मध्ये पिचिंग केलेले आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

सन २०१२ मध्ये गळभरणी झाली होती. त्याबाबत समितीने सद्यःस्थितीची विचारणा केली असता त्याचे पिचिंग आता सन २०१६ मध्ये झाले आहे. पुढे आता कॅनॉलचा विषय आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

या कामावर इतका मोठा निधी खर्च झाल्यावरही त्याचा कॅनॉलचा प्रत्यक्षात वापर होत नसेल तर यासंबंधीचा निर्णय कधी होईल ? या प्रकल्पाच्या बाबतीत आपण ३ महिन्यात तपासणी करुन समितीला अहवाल द्यावा. असे विभागाने सूचित केले असता, देवळेच्या प्रकल्पाच्या बाबतीत कंत्राटदारावर कार्यवाही सुरू असल्याचे विभागाने नमूद केले आहे. संबंधित कंत्राटदारावर कोणती कार्यवाही केली आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, या कंत्राटदाराच्या बाबतीत राज्यातील सर्व कार्यकारी अभियंता यांना लिहिले आहे की, या कामाच्या दुरुस्तीच्या कम्पोनन्टच्या बाबतीत कंत्राटदाराचे जेथे कोठे काम सुरू असेल ते विभागाला कळविण्यात यावे. असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

सन १९९९ मध्ये हा प्रकल्प पूर्ण केला आहे. त्यानंतर आज १७-१८ वर्षे झालेले असताना त्या कंत्राटदाराने कामही केले नाही किंवा प्रकल्पाच्या दुरुस्तीचे कामही करणे शक्य झाले नाही. तसेच त्या कंत्राटदारावर आपण कार्यवाही सुध्दा केली नाही. या संपूर्ण प्रकरणी कोण जबाबदार आहे ? आता तो कंत्राटदार हयात आहे किंवा नाही ? अशी विचारणा समितीने केली असता, संबंधित कंत्राटदार आयडेन्टीफाय केलेला आहे. त्याचे नाव एस. पी. रेड्डी आहे. समितीच्या यापूर्वीच्या बैठकीनंतर विभागाने असे ठरविले आहे की, संपूर्ण राज्यामध्ये या कंत्राटदाराचे अशा प्रकारचे काम झाले असून दुरुस्तीच्या संदर्भात त्यांची अंदाजित रक्कम अमुक इतकी झाली आहे. त्याच्याकडून सदर रक्कम वसूल करावयाची आहे. या बाबतीत कोणाकडून जर ही रक्कम त्यास देय असेल तर ती विभागाला कळविण्यात यावी असे विभागीय सचिवांनी विदीत केले. असे जर देयक शिल्लक नसेल तर आपण काय करणार आहात ? त्या बाबतीत दुसरी कोणती दंडात्मक कार्यवाही करता येईल काय त्याबाबत विचार करावा लागेल असा खुलासा विभागीय सचिवांनी केली.

तो कंत्राटदार हयात असावा आणि जर त्याचे काम जलसंधारण विभागामार्फत सुरू असेल तर त्याकडून रिकव्हरी करता येईल किंवा त्या व्यतिरिक्त आणखी काही मार्ग आहेत काय ? उदाहरणार्थ त्याला नोटीसेस दिल्या असतील तरी सुध्दा त्याने काम पूर्ण केले नसेल तर त्याच्यावर फौजदारी कार्यवाही करता येईल काय ? त्याने जर बँक गॅरन्टी दिली असेल तर तो एक मार्ग असू शकेल असे मत समितीने व्यक्त केले.बँक गॅरन्टी वर्ष ते दोन वर्षाची असते.

हे काम सन २००३ मध्ये पूर्ण झाले आहे.हे काम सन २००३ मध्ये पूर्ण झाले असताना प्रकल्प कार्यान्वीत होऊ न शकल्याने निरुपयोगी आहे. प्रकल्पाची सिंचन क्षमता शून्य असून कालव्याचेही काम केलेले नाही. त्या प्रकल्पातून पाणी गळती सुरूच आहे. असे समितीने निदर्शनास आणले असता या बाबतीत जबाबदार असणा-या तीन अधिका-यांवर विभागीय चौकशी प्रस्तावित केली आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

या विभागीय चौकशीतून काय निष्पन्न होईल, कारण १५-१५ वर्षानंतर समिती साक्ष घेत आहे. विभागीय चौकशीच्या निर्णयातून संबंधितांवर कार्यवाही करणे अपेक्षित होते. हा विषय सन २००३ पासून प्रलंबित आहे. समितीला साक्षीदरम्यान सन २०१७ मध्ये चौकशी करणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

संबंधितांवर ठोस कार्यवाही करुनच बैठकीला यायला हवे होते. हे प्रकरण गंभीरच आहे. कारण प्रकल्प सन १९९९ मध्ये सुरू झाला आणि २००३ मध्ये प्रकल्प पूर्ण झाला. त्यावेळी प्रकल्पावर ४ कोटी ३५ लाख रुपये खर्च झाले आणि आजच्या दिवशी तो प्रकल्प पूर्णपणे निरुपयोगी आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, तो प्रकल्प लिकेज आहे. मात्र मार्च महिन्यापर्यंत त्यामध्ये पाणीसाठा असतो. असे विभागीय अवगत केले.

प्रकल्प निरुपयोगी आहे हे जर समितीचे म्हणणे अधिका-यांना कळले नसेल तर ज्या उद्दिष्टासाठी प्रकल्पाची निर्मिती झाली आणि त्यातून किती उद्दिष्ट साध्य झाले, किती सिंचन झाले, किती हेक्टर जमीन ओलीताखाली आली आणि कोणकोणत्या गावांना त्या पाण्याचा उपयोग झाला हे सांगता येईल काय ? याबाबत संबंधितांवर कारवाई केली पाहिजे. विभागाने कोणतीही कार्यवाही न करता या ठिकाणी उत्तरामध्ये असे दिले आहे की, संबंधित कंत्राटदारावर दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे. What action have you taken. You have given only notice. त्या पलिकडे काहीच केले नाही. तो कुठे आहे, त्याचे काम कोणत्या विभागात सुरू आहे. तो महाराष्ट्रात आहे किंवा अन्य कोठे आहे याबद्दल आपण काहीही चौकशी केलेली नाही.

हे प्रकरण विभाग स्वतःवर कशाला घेता. त्यापेक्षा आपण संबंधितांवर कारवाई करावी. या बाबतीत ठाम निर्णय घेतला पाहिजे. कारण या प्रकल्पावर ४ कोटी ३५ लाख रुपये खर्च झाला असून त्यामध्ये अधिका-यांची सुध्दा चूक आहे.

कार्यवाही केली आहे तर कोणती कार्यवाही केली आहे आणि आतापर्यंत किती पत्रे त्या कंत्राटदाराला दिली आहेत समितीला अशा प्रकारचे उत्तर अपेक्षित नाही. संबंधित कंत्राटदारावर दंडात्मक कार्यवाही सुरू केली आहे. विभागाची ही कार्यवाही कधी संपणार आहे. कार्यवाही सुरू करण्यात आली आहे, असे कसे शक्य आहे असे मत समितीने व्यक्त केले असता त्या कंत्राटदाराला ब्लॅकलिस्टमध्ये टाकण्यासंदर्भात नोंदणी करणा-या विभागाला कळविले आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले. ब्लॅकलिस्टींग ही दंडात्मक कार्यवाहीचाच भाग आहे.

परंतु कंत्राटदारास ब्लॅकलिस्टेड करण्यापूर्वी इतरही गोष्टी करण्यासारख्या आहेत. ब्लॅकलिस्टेड झालाच पाहिजे. असे मत समितीने व्यक्त केले असता त्याचे शासनाकडे ५ लाख रुपये सिक्युरिटी डिपॉझिट आहेत ते वसूल होतील. त्याने आता कोर्टात एक रिट दाखल केले आहे. असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

विभाग ४ कोटी ३५ लाख रुपये कसे वसूल करणार आहे किंवा विभाग त्या प्रकल्पाचा उपयोग कसा करणार आहे? कारण १५ वर्षापूर्वी काम केले असताना अद्यापही त्या कंत्राटदारावर कार्यवाही केली नाही. त्या कामाची दुरुस्ती पाहणा-या अधिका-यांवर सुध्दा कोणतीच कार्यवाही केली नाही. ही एक बाजू असून या प्रकल्पाचा सदुपयोग कसा करता येईल हा विभागासमोर मोठा प्रश्न आहे. यासंबंधी विभागाने काही उपाययोजना निश्चित केल्या आहेत किंवा कसे ? अशी विचारणा समितीने केली असता, गळती आणि दुरुस्तीचे जे अंदाजपत्रक तयार केले होते त्याला मुख्य अभियंता यांनी कंन्डीशनल अप्रुव्हल देताना हे काम कंत्राटदाराकडून करण्यात यावे असे म्हटले आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

कंत्राटदार हयात आहे का त्याच्याकडून पैसे वसूल होत नाहीत. त्यामुळे शेवटी त्या प्रकल्पाला तयार करुन शेवटच्या टप्प्यात आणले आहे. असे असताना त्या प्रकल्पाचा उपयोग करायचा आहे किंवा नाही आणि नसेल तर करण्यात येऊ नये असे मत समितीने नाराजीने व्यक्त केले असता, प्रकल्पाचा वापर तर करणे आवश्यक आहे. त्याबद्दल कोणताही वाद नाही असे विभागीय सचिवांनी विदित केले.

यामध्ये असे होते की, आता आपण नवीन नवीन प्रकल्प करायला तयार आहोत. मात्र जुन्या प्रकल्पांना कमी निधी लागणार असताना तो देण्यास विभाग तयार नाहीत. त्या कंत्राटदाराचे नाव काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, तो रेड्डी नावाचा कंत्राटदार होता. आपण नुसते आडनाव सांगून चालणार नाही. त्याचे पूर्ण नाव सांगावे. श्री. एस. पी. रेड्डी भागिदार मे. एस. पी. इंटरप्राईजेस, पुणे असे नाव आहे. ते मेसर्स आहे की पार्टनशीप आहे. मेसर्स आहे.

आपण भागिदार असे म्हटले आहे. या कंपनीचे आपल्या विभागात सध्या कोठेच काम सुरू नाही. असे समितीने निदर्शनास आणले असता, ते मेसर्स आहे या कंपनीबद्दल राज्यभर सर्व म्हणजे जलसंपदा आणि इतर कार्यकारी अभियंता या सर्वांना कळविले आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

त्यांना किती तारखेच्या पत्रान्वये कळविले आहे. अशी विचारणा समितीने केली असता मागच्या बैठकीमध्ये सूचना दिल्या होत्या की, पीडब्ल्यूडी असो, जलसंपदा असो किंवा राज्यातील कोणताही कंत्राटदार असो त्यासंबंधी एक जनरल ब्लॅक लिस्टची यादी तयार करुन त्यामध्ये त्याला टाकण्यात येते असे मत समितीने व्यक्त केले असता, यासंबंधी एक परिपत्रक काढले आहे. यामध्ये देवळे, लघु पाटबंधारे योजना, ता. पोलादपूर या प्रकल्पांतर्गत कंत्राटदाराकडून जी रक्कम घेणे आहे. त्यामुळे त्यासंबंधी उपरोक्त कंत्राटदाराची विभागाच्या प्रदेश मंडळात / विभागात जर काही कामे सुरू असतील तर त्यांच्याकडून अग्रीमाची रक्कम एकरकमी वसूल करुन या विभागास पाठविण्यात यावी. अशा प्रकारचे परिपत्रक विभागाने दिनांक २४-८-२०१७ रोजी निर्गमित केल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली.

याचा अर्थ १५ वर्षानंतर विभागाने मागच्या महिन्यामध्ये ते परिपत्रक काढले आहे.  पण हे अशासाठी काढण्यात आले की, समितीकडे हा विषय साक्षीमध्ये आला होता म्हणून.  माझा मुद्दा असा आहे की, मागील १४-१५ वर्षामध्ये कंत्राटदाराकडून या प्रकल्पासंबंधी कोणतीही वसुली करण्यात आली नाही.  या गळतीसंबंधी तत्कालीन कोणत्याही अधिका-यांवर जबाबदारी निश्चित करण्यात आली नाही.  शेवटी जेव्हा दुरुस्तीचा मुद्दा आला व तो कोणाच्या अंगावर येईल असे वाटले तेव्हा कंत्राटदाराकडून ते पैसे वसूल करुन घ्यावेत असे विभागाच्या मुख्य अभियंता यांनी प्रशासकीय मान्यता दिली.  मात्र मागच्या १४ वर्षामध्ये विभागाने दुरुस्तीचे काम हाती घेतले नाही.  मग विभाग हे काम हाती घेणार की नाही.  कंत्राटदाराकडील पैसे वसूल होतील तेव्हा होतील, त्याची कार्यवाही वेगळी करा.  मात्र त्याचबरोबर या कामाला प्राधान्य देऊन हे काम किती दिवसात पूर्ण करण्यासाठी विभाग निर्णय घेईल. याचबरोबर कंत्राटदाराकडून करावयाची वसुली सुध्दा विभागाने समांतरपणे वसूल करावी.  ज्या अधिका-यांनी दुर्लक्ष केले त्यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी. असे समितीने सूचित केले असता, यासंबंधी विभागीय चौकशी करण्याचे प्रस्तावित केले आहे. याबाबत १ ते ४ प्रपत्र काढली असून त्या ३ लोकांची विभागीय चौकशी करण्याचे ठरविले आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

कारण आता समिती फक्त शिफारशी करणार नाही तर सर्व साक्षींबद्दल ॲक्शन टेकन रिपोर्ट मागविणार आहे असे समितीने सूचित केले असता, या लोकांच्या बाबतीत नुसत्या नोटीसेस नाही तर १ ते ४ प्रपत्रे बजाविण्याची कार्यवाही झाली आहे. असे विभागीय सचिवांनी अवगत केले. लावारीचा छोटा प्रश्न आहे.  लावारीचे काम १ लाखाचे आहे.  तेथे छोट्या प्रमाणात गळती होते. कंत्राटदार म्हणाले ते सांडव्यामधील काम करुन देतो. असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

पण हे कधी होणार आहे.  कारण आपले काम सन १९९९ मध्ये सुरू झाले. या कंत्राटदाराकडून पैसे वसूल करण्याची कार्यवाही करावी.  परंतु त्याचबरोबर समांतर प्रमाणात राज्य शासनाकडून हे दुरुस्तीचे काम करुन घ्यावे.  जेणेकरुन तेथील लोकांच्या सिंचनाची सोय करता येईल.  त्याचबरोबर लावारी प्रकल्पाचाही प्रश्न आहे.  या ठिकाणी सांडव्याचे काम करायचे आहे.

It is due to substandard work and improper planning; the project is yet to be completed. असे मत समितीने व्यक्त केले असता, तेथील ठिकाणचे फोटो एस.ई. आणि सी.ई. यांनी मोबाईलमध्ये आणले आहेत.  त्या ५० मिटर्सच्या सांडव्यातील साधारणपणे १५ मिटर्सचा तो पॅच आहे.  त्यामध्ये डब्ल्यूआर म्हणजे पीएसआर मशिनरीचे काम डॅमेज झाले होते.  ते काम आम्ही करुन घेतो.  धरणामध्ये थोडेसे पाणी असल्यामुळे काही वेळ लागेल. असा खुलासा विभागीय सचिवांनी केला. हे काम आपण किती दिवसात पूर्ण करणार आहात आणि यासाठी निधी कोण देईल ? अशी विचारणा समितीने व्यक्त केले असता आता धरणामध्ये पाणी असल्यामुळे ते नंतर करावे लागेल आणि ते काम कंत्राटदाराकडून करुन घेण्यात येईल असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

**परिच्छेद क्रमांक : २.१.८.४ "शासकीय निर्देश आणि कंत्राटी अटींचे अनुपालन न करणे" :-**

या परिच्छेदाबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, याची पॉलिसी काढलेली आहे आणि समितीने सांगितल्यानुसार महालेखाकारांकडून तपासणी झालेली आहे. त्यामध्ये महालेखाकारांनी अभिप्राय नाही असे म्हटले आहे.

विमा पॉलिसीचा विषय विभागाने सोडून कसा चालणार. कारण विमा कामगारांच्या सुरक्षिततेसाठी काढतो.  कामगारांची सुरक्षा विचारात घेता त्या कामगाराला अपघात झाल्यानंतर कोणाचा हात तुटतो, कुणाचा पाय तुटतो किंवा त्या कामगाराचा मृत्यू होऊ शकतो. कारण त्या प्रकल्पाच्या ठिकाणी जेसीबी किंवा इतर मोठमोठ्या मशिनरी काम करीत असतात. त्यामुळे कामगारांच्या सुरक्षिततेची हमी म्हणून आपण कामगारांचा विमा काढतो.  त्या दृष्टीने आपण सन २००८ साली बांधकाम कामगार विमा योजना पुन्हा सुरू केली.  असे असताना कंत्राटदार सुरूवातीलाच कामगारांचा विमा काढत नाहीत. त्यानंतर काम पूर्ण झाले म्हणजे आपले समाधान झाले असे आपण समजतो. परंतु त्या कामगारांच्या सुरक्षितेची हमी शासनाने घेतलेली असते त्यांचे काय ?

जर कामगारांचा विमा काढला गेला नसेल आणि अपघातामध्ये तो मयत झाला तर विभाग काय करणार आहे? अशी विचारणा समितीने केली असता यामध्ये पाहिले तर आलगावची पॉलिसी काढली होती असे विभागीय सचिवांनी सांगितले.

मुद्दा एकदम परफेक्ट आणि प्रॉपर आहे. कारण जर विम्याचे पैसे वसूल केले. पण विभागाने विमाच काढला नाही आणि त्या कालावधीमध्ये कामगार दगावला तर मग काय ? अशी विचारणा समितीने केली असता समितीचे म्हणणे बरोबर आहे. ज्या विषयावर चर्चा सुरू आहे तो एक टक्के विमा हा प्रकल्पासाठी काढावयाचा असतो आणि त्याचा उद्देश वेगळा आहे. समिती मुद्दा मांडत आहे तो कामगारांचा आहे. हा धरणाच्या सुरक्षिततेचा विमा आहे. एखाद्या वेळी धरण वाहून गेले तर किंवा आणखी तत्सम काही घडले तर त्यासाठी हा विमा आहे. शासनाला त्याची सुरक्षितता मिळावी त्या उद्देशाने हा एक टक्के विमा वसूल करण्याची जबाबदारी असते. समिती जो कामगारांचा विमा नमूद करीत आहे त्यासाठी कामगार विभागाकडून वेगळी कार्यवाही होत असते असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

कामगारांच्या सुरक्षिततेचा व धरणाच्या सुरक्षेचा विमा काढला आहे किंवा नाही, हे तपासण्याची जबाबदारी विभागाची आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता ही जबाबदारी विभागाचीच आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विहीत कालावधीमध्ये विमा काढण्याची काळजी घेण्यात यावी असे समितीने सुचित केले असता विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली.

गणेशपूर वाढोणा योजनेची विमा पॉलिसी कंत्राटदाराने सादर न केल्याने ५० हजार रुपये रक्कम कपात वाढीव मुदतीनंतर करण्यात आली आहे, एवढीच रक्कम कपात करावयाची होती का ? अशी विचारणा समितीने केली असता सुरुवातीच्या कामासाठी कंत्राटदाराने विमा काढला होता. वाढीव मुदत दिल्यानंतरच्या कालावधीकरिता ५० हजार रुपयांची रक्कम वसूल करण्यात आली आहे असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

सुधारित प्रशासकीय मान्यता संदर्भात कोणती कार्यवाही केली ? अशी विचारणा समितीने केली असता सदरहू लेखापरिच्छेद दोन प्रकल्पांच्या संदर्भातील आहे. सदरहू प्रकरणी ४ अधिका-यांना नोटीस देण्यात आली आहे. ३८ नुसार चौकशी करण्यात आली होती त्याच वेळी सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे. महालेखाकार यांनी १० प्रकल्पांवरील खर्च सक्षम अधिका-यांच्या मान्यतेशिवाय करण्यात आला आहे, असा आक्षेप काढला आहे. उक्त प्रकरणी ज्यावेळी चौकशी करण्यात आली त्यावेळी ४ ठिकाणी सदरहू बाब आढळून आली आहे असे विभागीय सचिवांनी विदित केले.

स्वामित्व धनावर गैरवाजवी वाढ या लेखापरिच्छेदातील Undue escalation on Royalty ची ३२.७७ लक्ष रुपये रक्कम कधी वसूल करण्यात येणार आहे ? अशी विचारणा समितीने केली असता वैभववाडी तलावाच्या मूळ निविदेमध्ये ३६ क्रमांकाचे कलम आहे की, “quarries, royalties, octroi, dues etc shall be paid by the contractor”. मुख्य अभियंता यांनी सदरहू कलमामध्ये बदल केला. त्यामध्ये नमूद केले की,...however, the amount of royalty will neither be considered under price variation clause nor for the percentage below/ above rate adjustment quoted by the contractor. शासनाच्या मूळ निविदेमध्ये रॉयल्टीचे व्हेरिएशन संदर्भात तरतूद नसताना मुख्य अभियंता यांनी ती का समाविष्ट केली, असा आक्षेप कंत्राटदारांनी घेतला होता. २३ ऑक्टोबर रोजी प्री-बिड झाले त्यावेळी सेट ऑफ डेव्हिएशन मधील अट काढून टाकण्यात आली. त्यामुळे कंत्राटदाराकडून वसूलीची ३२.७७ लाख रुपयांची रक्कम देय होत नाही असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

आपल्या विभागाने सदरहू वसूलीची बाब मान्य केली आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता शासनाच्या मूळ निविदेनुसार स्वामित्वधनाचे सर्व आयटेम रॉयल्टी इन्क्लूसिव्ह होते. मुख्य अभियंता कार्यालयाने निविदा काढताना शासनाच्या निविदेमध्ये एक वाक्य समाविष्ट केले. त्यामध्ये नमूद केले की, “However, the amount of royalty will neither be considered underprice variation clause nor for the percentage below/above rate adjustment quoted by the tenderer.” असे डॉक्युमेंट पब्लिश करण्यात आले. त्याबाबत कंत्राटदारांनी आक्षेप घेताना नमूद केले की, सदरहू अट चुकीची आहे व ती मूळ निविदेमध्ये उक्त तरतूद समाविष्ट नाही. त्यानंतर मुख्य अभियंता यांनी दिनांक ३ ऑक्टोबर, २०१२ रोजी प्री-बिड बैठक घेतली व सदरहू अट वगळण्याचा निर्णय घेण्यात आला तसेच, शासनाची मूळ निविदा प्रारुप मान्य करण्यात आले असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

शासनाच्या मूळ निविदा प्रारुपानुसार कंत्राटदाराला रॉयल्टी देय नाही का ? कंत्राटदार रॉयल्टी का देत नाही ? अशी विचारणा समितीने केली असता कंत्राटदाराला रॉयल्टी द्यावी लागणार आहे. महालेखाकार यांचा लेखा आक्षेप आहे की,

एस्कलेटेड अमाऊंट रिकव्हर करण्यात यावी असे विभागीय सचिवांनी सांगितले.

रॉयल्टी दिली नाही, असे महालेखाकार यांचे म्हणणे आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता "Royalty is to be paid by Contractor," यामध्ये काही बदल नाही. त्यावर कंत्राटदाराने टक्केवारी कोट केलेली असते ती लागू करावयाची की नाही, हा मुद्दा आहे. मूळ निविदेमधील अटीनुसार एकूण रकमेसाठी सदरहू टक्केवारी लागू राहणार आहे. त्यामुळे सदरहू रक्कम वसूल करण्याची आवश्यकता नाही असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

विभागाने सदरहू रक्कम वसूल करण्याचे मान्य केले आहे. सदरहू प्रकरणी वसूली करण्याची बाब विभागाने मान्य केली आहे. आता स्पष्टीकरणामध्ये वेगळी बाब नमूद केली आहे. असे समितीने निदर्शनास आणले असता सदरहू कार्यवाही सुरु करण्यात येईल त्यापूर्वी विधि व न्याय विभागाचा सल्ला घेण्यात येईल. लेखापरिच्छेदांच्या स्पष्टीकरणासंबंधीचे बुकलेट प्रसिध्द केल्यानंतर मुख्य अभियंता यांना चौकशी करण्याचे निदेश देण्यात आले आहेत. सदरहू रक्कम वसूल करणे योग्य होईल किंवा नाही, याबाबत विधि व न्याय विभागाचे अभिप्राय घेण्यात येतील. उक्त प्रकरणी नोटीस दिलेली असून ती प्रोसेसमध्ये आहे. परंतु उक्त प्रकरणी लिटीगेशनचा भाग होईल. त्यामुळे सदरहू प्रकरणी अभिप्राय घेण्यात येतील असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

सदरहू वसुली प्रकरणी विभागाची भूमिका काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता मुख्य अभियंता यांनी उक्त प्रकरणी जी चौकशी केली त्या कागदपत्रांवरुन सदरहू रक्कम वसूल करु नये, असे दिसून येते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाची भूमिका सदरहू रक्कम वसूल न करण्याची असल्याने विधि व न्याय विभागाकडून कोणते अभिप्राय घेण्यात येणार आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता, वस्तुस्थिती निदर्शनास आणून देण्यात येईल. सदरहू रक्कम वसूल करावी किंवा करु नये, याबाबत विभागाचे काहीही मत नाही असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

उक्त प्रकरणाची कागदपत्रे महालेखाकार कार्यालयास सादर करण्यात यावीत. अगोदर विभागाने वसूली करण्याचे मान्य केले व आता स्पष्टीकरण देताना सदरहू वसूली मान्य नाही, असे सांगण्यात येत आहे. त्याबाबत महालेखाकार कार्यालयास सपोर्टींग कागदपत्रे सादर केली पाहिजे. असे मत महालेखापालांनी व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली.

सदरहू रक्कम कंत्राटदाराकडून वसूल करण्यात येईल, असे विभागाने लेखी स्पष्टीकरणामध्ये नमूद केले आहे. आता सांगण्यात येत आहे , की मुख्य अभियंता चौकशी करतील. उक्त प्रकरणी चौकशी करुन त्यांनी विभागाला कळविले आहे. उक्त प्रकरणी विभागाकडून आता कोणती कार्यवाही करण्यात येणार आहे ? अशी विचारणा समितीने केली असता सदरहू प्रकरणी बुकलेटमध्ये स्पष्टीकरण दिल्यानंतर मुख्य अभियंता यांना चौकशी करण्यास कळविण्यात आले होते. सदरहू प्रकरणी वसूली करावी किंवा नाही, याबाबत विधि व न्याय विभागाचे अभिप्राय घेण्यात येतील असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

सदरहू प्रकरणी महालेखाकार यांनी आक्षेप घेतला आहे. त्यामुळे त्यांना कागदपत्रे सादर करण्यात यावीत. महालेखाकारांचा आक्षेप आहे म्हणून त्यावर समितीने साक्ष बोलावली आहे. महालेखाकार यांचे समाधान झाले तर समितीची काही हरकत नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता महालेखाकार यांना उक्त प्रकरणीचे कागदपत्रे सादर करण्यात येतील. त्यांना सदरहू बाब मान्य झाली नाही तर वसुली संदर्भात विधि व न्याय विभागाचे अभिप्राय घेण्यात येतील असे विभागीय सचिवांनी सांगितले.

याचाच अर्थ विभागाने महालेखाकार कार्यालयास उक्त लेखापरिच्छेद प्रकरणी सर्व कागदपत्रे दिली नाहीत. ऑडीटच्या वेळी सर्व कागदपत्रे का देण्यात आली नाही ? अशी विचारणा महालेखापालांनी केली असता ही बाब मान्य असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

त्यावेळी सदरहू बाब महालेखाकार यांच्या लक्षात आली नाही, असे विभागाचे सचिव सांगत आहेत. एस्कलेशन कॉस्टच्या संदर्भातील सर्व कागदपत्रे महालेखाकार कार्यालयाने तपासावीत. सदरहू रक्कम वसूल केली पाहिजे, असे महालेखाकार यांना वाटले तर ते वसूल करण्यात यावेत. पुढील १० दिवसांमध्ये सदरहू प्रकरणी कार्यवाही करुन समितीला कळविण्यात यावे असे समितीने सुचित केले असता विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली.

**परिच्छेद क्रमांक २.१.८.५-मोढा कोल्हापूर पध्दती बंधारा क्रमांक २**

सदरहू लेखा आक्षेप सन २००८-०९ मध्ये व आताही आलेला आहे. अद्यापही विभागाकडून सदरहू प्रकरणी कार्यवाही करण्यात आलेली नाही असे मत समितीने व्यक्त केले असता बंधा-यांच्या दुरुस्तीसाठी ३५७ कोटी रुपये निधीची आवश्यकता असून १७ कोटी रुपये निधी प्राप्त झाला आहे. निधी उपलब्ध झाल्यास तो उक्त बंधा-यांच्या दुरुस्तीसाठी प्राधान्याने उपलब्ध करुन देण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

भालगाव कोल्हापूर पध्दतीच्या बंधारा प्रकल्पामध्ये एफआरपी निडल्स वापरण्याकरिता २७.७० लाख रुपये निधी मंजूर करण्यात आला तो खर्च झाला नाही का ? प्रकल्पाच्या एफआरपी निडल्स काढून माईल्ड स्टील निडल्स कंत्राटदारानेच टाकल्या का ? अशी विचारणा समितीने केली असता निडल्स वापरण्यासाठीचा खर्च झाला नाही. प्रकल्पाच्या एफआरपी निडल्स काढून माईल स्टील निडल्स कंत्राटदारानेच टाकल्या. सदरहू काम पूर्ण झाल्यानंतर लक्षात आले की, एफआरपी निडल्स प्लावकते. त्यामुळे त्या बदलण्यात आल्या. अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

अशा प्रकारे किती प्रकल्पामधील एफआरपी निडल्स बदलण्यात आल्या आहेत ? एफआरपी व्हाएबल आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता औरंगाबाद जिल्ह्यातील अथकवाड येथील प्रकल्पामध्ये एफआरपी निडल्स टाकण्यात आल्या आहेत. राज्यातील इतर कोणत्याही प्रकल्पामध्ये एफआरपी निडल्सचा वापर करण्यात आला नाही, त्यासंदर्भात माहिती घेतली आहे. नवीन टेक्नॉलॉजी एफआरपी निडल्स म्हणून विचारात घेण्यास हरकत नाही परंतु ते थोडे महाग आहे. चोरी होऊ नये म्हणून त्याचा वापर केला जातो. ज्या ठिकाणी उंची जास्त आहे तेथे १३२.३० जॉइन्सीचा प्रश्न निर्माण होतो असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

**परिच्छेद क्रमांक २.१.९ - प्रकल्पाचे कार्य चालन आणि देखभालः-**

जलसंधारण विभागाने १८ पैकी केवळ ८ प्रकल्प पूर्ण केले आहेत. WUAs ने त्यापैकी केवळ २ प्रकल्प कार्यान्वित केले आहेत, ६ प्रकल्प कार्यान्वित नाहीत. त्यामुळे प्रकल्पाची दुरुस्ती देखभाल व पाणी वापर वसुलीची कार्यवाही कशी करण्यात येणार आहे ? अशी विचारणा समितीने केली असता सदरहू कार्यवाही एक शाखा अभियंता प्रकल्पावर असतो त्याच्यामार्फत सद्यःस्थितीत सुरु आहे. सर्व प्रकल्प पाणी वापर संस्थांना हस्तांतरीत करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

मोढा, माळुंजा व खातखेडा कोल्हापूर पध्दतीच्या बंधा-यांच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध नाही, त्यामुळे पूर्ण क्षमतेने पाणी साठा करणे शक्य झाले नाही, असे विभागाने स्पष्टीकरणामध्ये नमूद केले आहे. दहिंद्री लपा योजनेच्या माध्यमातून केवळ ७० हेक्टर सिंचन झाले आहे. कोप बंधारा कु-हा या प्रकल्पाच्या माध्यमातून १०७ हेक्टर सिंचन क्षमतेचा असताना केवळ ३५ हेक्टर सिंचन होत आहे. कोप बंधारा कोणत्या नदीवर बांधण्यात आला आहे ? अशी विचारणा समितीने केली असता जलयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून दुरुस्तीचे काम करण्यास सुरुवात करण्यात आली आहे. कोप बंधारा धोम नदीवर बांधलेला आहे. धोम नदी खूप लहान असून लहान प्रकल्प आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

**लेखापरिच्छेद क्रमांक २.१.१०- प्रकल्पाचे संनियंत्रण**

मुख्य अभियंता, अधिक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता प्रकल्पाचे नियंत्रण करीत नाही असे मत समितीने व्यक्त केले असता मुख्य अभियंता यांनी भेट दिली नाही. अधिक्षक अभियंता यांनी प्रकल्पांना २४३ भेटी दिलेल्या आहेत. तसेच, कार्यकारी अभियंता नियमानुसार प्रकल्पांना प्रत्येक महिन्यात भेटी देतात असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

कार्यकारी अभियंता यांच्यावर प्रकल्पाच्या निरिक्षणाची १०० टक्के जबाबदारी आहे. कार्यकारी अभियंता, अधिक्षक अभियंता व मुख्य अभियंता प्रकल्पांना वेळोवेळी भेटी दिल्यानंतर भेटीची नोंदवहीमध्ये नोंद करतात का ? उक्त अधिकारी प्रकल्पांना भेटी दिल्यानंतर भेट नोंदवहीमध्ये नोंद करीत नाहीत, त्यावेळी केवळ तोंडी सूचना देतात. त्यानंतर ते भेटीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार संबंधितांशी करीत नाहीत. त्यांच्या दौरा वहीमध्ये व लॉगबुकमध्ये सर्व नमूद करण्यात आलेले

असते. ते वापरत असलेल्या वाहनाचे लॉगबुक व भेट नोंदवहीमधील नोंदी तपासल्या तर त्यामध्ये तफावत दिसून येते. याबाबत एखाद्या अधिका-यांची माहिती तपासून पहाणे आवश्यक आहे. मुंबई येथील समितीच्या एका दौ-याच्या वेळी राज्य उत्पादन शुल्क कार्यालयाच्या निरिक्षकांचे लॉगबुक व भेट नोंदवहीची समितीने तपासणी केली होती त्यावेळी समितीला दोन्हीमध्ये तफावत आढळून आली होती.

रत्नागिरी येथील एक कालवा प्रकल्प चांगल्या स्थितीत असल्याचे सांगण्यात आले परंतु प्रत्यक्षात तो कालवा क्षतीग्रस्त होता. प्रकल्पाचे पूर्ण निरीक्षण करण्यात येत नाही. या ठिकाणी कुठेही शेरा लिहिलेला नाही. जर कालवा क्षतीग्रस्त असेल तर इन्स्पेक्शनचा काय उपयोग, मुख्यालयामध्ये बसून हे इन्स्पेक्शन करण्यात येते का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी असे होत नसल्याचे सांगून संबंधित अधिकारी प्रॅक्टीकली भेटी देतात.जर छोटी-छोटी कामे असतील तर असे घडतही असेल. जलसंधारणाची कामे २० लाखांची, ५० लाखांची अशी असतात असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

छोटे काम असेल तर पाहता येते तसे मोठ्या कामांना लगेच पाहता येत नाही. या ठिकाणी परिस्थिती वेगळी आहे असे समितीने निदर्शनास आणले असता याबाबत समरी इन्स्पेक्शन टाईपचा एक फॉरमॅट बनवायचे ठरविले आहे. जेणेकरुन, फार टाईप न करता केवळ काही कॉलम भरावे लागतील व ठराविक काही कॉलममध्येच रिमार्क्स लिहावे लागतील. याला संक्षिप्त तपासणी अहवाल म्हणता येईल. या पध्दतीच्या सुधारणा विभाग करीत आहे. तसे पाहिले तर, एका-एका जिल्हयामध्ये ४०० कामे सुरु असतील व तेथे एका कार्यकारी अभियंत्याला भेट द्यायची म्हटले तर ते शक्य होत नाही असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

बरोबर, शक्य होत नाही म्हणूनच पी.आर.सी.मध्ये कार्यकारी अभियंत्यांचे ५ टक्के सुपरव्हिजन आहे. आपली ४०० कामे सुरु असतील तर ४० कामांवर कार्यकारी अभियंता, ४ कामांवर अधिक्षक अभियंता व ४ कामांवर मुख्य अभियंता यांनी भेट दिली पाहिजे. भेट दिल्यानंतर चुकीचे अहवाल तयार करण्यात येऊ नये. भेट दिल्यानंतर देखील चुकीचे अहवाल दिलेले आहेत असे समितीने निदर्शनास आणले असता याचा एक स्टॅण्डर्ड फॉरमॅट तयार करुन केवळ योग्य ते रकाने भरण्यासाठी जागा सोडण्याचा विभागाचा विचार आहे. ब-याच वेळी भेटी देण्यासाठी अधिका-यांना गाड्या नसतात किंवा इतर काही अडचणीही आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

जर मुख्य अभियंता प्रकल्प पाहणीसाठी गेले तर अधिक्षक अभियंता जातीलच व अधिक्षक अभियंता गेले तर कार्यकारी अभियंता देखील जातील. याबाबतची चेक लिस्टदेखील तयार करण्यात यावी असे सूचित केले असता हे स्टॅण्डर्डाईज करुन घेण्यात येईल तसेच चेक लिस्टही तयार करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

आपण परिच्छेद क्रमांक २.१.११.१, २ व ३ बाबत चर्चा करु. यामध्ये पाणी पट्टीची वसुली व निर्मित सिंचन क्षमतेचा वापर अतिशय कमी आहे. याबाबत विभागाने नवीन प्रकल्पासाठी पाणीवापर स्वस्त करणार असल्याचे धोरण ठरविले. त्याचबरोबर जलसंधारण विभागासाठी केवळ पदे वर्ग करण्यात आली आहेत परंतु भरण्यात आली नाहीत. असे समितीने निदर्शनास आणले असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शवून नवीन आकृतिबंधामध्ये फार काही वाढ करण्यात आलेली नाही. पूर्वी प्रतिनियुक्तीवर जेवढी पदे होती तेवढीच आहेत असे अवगत केले.

विभागाची १६ पदे वर्ग करण्यात आली आहेत, परंतु फिल्डवर कर्मचारी नाहीत. जोपर्यंत विभागाचे दुरुस्तीचे काम व नियंत्रण योग्य राहणार नाही तोपर्यंत सिंचन क्षमतेचा पूर्ण वापर होणार नाही तसेच पाणीपट्टी वसूल होणार नाही. या विषयाबाबत महालेखाकारांनी जे आक्षेप काढले आहेत त्याबाबत विभागाने लक्ष देणे गरजेचे आहे. जलसंधारण विभाग आता वेगळा झाला आहे असे समितीने सुचित केले असता विभाग जरी वेगळा झाला असला तरी मेन्टेनन्सचा भाग आणखी जलसंधारण विभागामध्ये आलेला नाही. केवळ तिकडची पदे इकडे वर्ग झाली आहेत. जलसंपदा विभागामध्ये जशी वेगळी व्यवस्था आहे तशी या विभागामध्ये नाही.

२०११-१६ पर्यंतची आकडेवारी समितीसमोर सादर केलेली आहे. यामध्ये पाहिले तर, एकाही वर्षामधील तूट ५० टक्क्यांपेक्षा खाली नाही. म्हणजे २०१५-१६ साली ६२ टक्क्यांवरुन ती ४६ टक्क्यांवर आली आहे. यामध्ये ती सुमारे अर्धी झाली आहे. हे चांगले नाही. प्रकल्पाला लागणारे पैसे १०० टक्के खर्च होतात परंतु उद्दिष्ट २० किंवा ३० टक्के साध्य होत असेल तर गंभीर आहे. जलसंधारण विभागाच्या कामांचा दर्जा खूप खालावला आहे. याबाबत गोंदिया जिल्हयातील देखील तक्रार केली होती. विभागाचे अहवाल अत्यंत चांगले असतात, परंतु काम तसे झालेले नसते. याचा अनुभव घेतला आहे व याबाबत

आश्चर्य वाटते. तसेच क्वालिटी सर्टिफिकेट शिवाय पेमेंट होता कामा नये अशा प्रकारचे नियम करणे आवश्यक आहे असे मत समितीने व्यक्त केले असता याबाबत पत्र काढण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

जलसंपदा विभागामध्ये क्वालिटी कंट्रोलबाबत खूप दक्षता घेतली जाते. जलसंधारण विभागामध्ये या विषयाबाबत दुर्लक्ष होते. १० ते २० लाख रुपयांची लहान कामे असतात. यामध्ये शासनाचा व जनतेचा पैसा असून त्याचा योग्य उपयोग झाला पाहिजे असे समितीने सूचित केले असता जलसंपदा विभागाला स्वतःची क्वालिटी कंट्रोलची यंत्रणा आहे, नवीन आकृतीबंधानुसार ती जलसंधारण विभागाकडे आहे परंतु त्यासाठी आवश्यक पदे भरलेली नाहीत. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये तसेच पॉलिटक्निक् मध्ये याबाबतच्या व्यवस्था आहेत. भविष्यात जलसंधारण विभागाला उक्त महाविद्यालये (तसेच पॉलिटेक्नीकल यांच्या) कडून कामे करुन घेण्याबाबत प्रयत्न करण्यात येईल. जलसंपदा विभागाकडे जर हे काम दिले तर त्यांचीच कामे जास्त असल्यामुळे जलसंधारण विभागास अहवाल लवकर प्राप्त होत नाहीत असे विभागीय सचिवांनी विदित केले.

(तशा आशयाचे परिपत्रक काढण्यात यावे. तसेच या विषयावर लक्षवेधी सूचना लावून या विषयाकडे लक्ष देता येईल. शासनाचा हा पॉलिसी निर्णय व्हावा.)

रिपेअरींगसाठी कमीत कमी १५ ते २० टक्के निधीची तरतूद करावी असे समितीने सूचित केले असता याबाबत समितीने शिफारस करावी असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समितीमार्फत शिफारस करण्यात येईल. परंतु कोणत्याही प्रकल्पाची दुरुस्ती करण्याची वेळ लगेच येवू नये अशी अपेक्षा आहे. (ज्या गोष्टीसाठी मिळणारे पैसे मिळत नाहीत म्हणून आपण भांडण करतो व ते मिळवतो. त्यानंतर) शासनाकडून प्रकल्पासाठी पैसे मिळूनही त्यातून उद्दिष्ट साध्य होत नाही, हे चित्र कुठे तरी बदलले पाहिजे. म्हणजे ज्या प्रकल्यासाठी हजारो कोटी खर्च करण्यात येतो त्यातून केवळ २० किंवा ४० टक्के उद्दिष्ट साध्य होते (असेल तर यामध्येच खरी मेख आहे.) जलसंधारण हा एक वेगळा विभाग निर्माण झाला आहे व त्याचे प्रमुख म्हणून विभागीय सचिवांकडून अपेक्षा आहेत असे मत समितीने व्यक्त केले असता गुणवत्तेबद्दल नक्कीच दक्षता घेण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

गुणवत्तेबरोबरच आउटकमवर देखील लक्ष द्यावे. रिक्त पदांबाबत शासनाचे काही धोरण आहे का ? अमरावती विभागामध्ये कनिष्ट अभियंत्यांची ७ पदे होती, परंतु आता केवळ २ आहेत. असे समितीने निदर्शनास आणले असता यासाठी विभागाला भरती प्रक्रिया करावी लागेल व त्यासाठी वेळ लागेल. कर्मचा-यांनी दिलेल्या ऑप्शन्सप्रमाणे १५-२० दिवसांमध्ये ऑर्डर काढून घेण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

१०० टक्के सुपरव्हिजन उप अभियंता, कनिष्ट अभियंता यांनी करावे असे निर्देश दिलेले आहेत. परंतु पदे भरलेली नसतील तर जलयुक्त शिवारच्या एवढ्या कामांचे सुपरव्हिजन कसे करणार ? अशी विचारणा समितीने केली असता यासाठी जिल्हा परिषदेची यंत्रणा जलसंधारण विभागाकडे आली आहे. यामध्ये सेवानिवृत्त कर्मचा-यांना कामावर घेण्यासाठी जिल्हाधिकारी यांना सांगून प्रशिक्षण घेतले आहेत. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सेवानिवृत्त कर्मचारी घेण्यात येतील, परंतु एम.बी. वर त्यांची स्वाक्षरी घेवू नका. असे समितीने सूचित केले असता परंतु एम.बी. वर तर कायम कर्मचा-याचीच स्वाक्षरी होईल असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

**अभिप्राय व शिफारशी :-**

**परिच्छेद क्र. २.१ "जलसंधारण विभागाद्वारे लघुसिंचन प्रकल्पांचे व्यवस्थापन "**

**१.२** महाराष्ट्र राज्य हे देशातील तिस-या क्रमांकाचे मोठे राज्य आहे, जेथे ५८ टक्के जनता त्यांच्या उपजीविके करिता शेती वर अवलंबून आहे. आर्थिक सर्वेक्षणानुसार राज्यातील संपूर्ण जमीन वापराच्या स्वरुपानुसार राज्यात जवळजवळ २३४ लक्ष हेक्टर जमीन शेती योग्य आहे,जी एकूण भौगोलिक क्षेत्राच्या ७६ टक्के आहे. तरीही राज्यातील शेतीयोग्य जमिनीच्या फक्त २७.७३ टक्के जमीन ओलिताखाली आहे आणि उर्वरित १६९.०९ लक्ष हेक्टर जमीन पावसावर अवलंबून आहे. अशा परिस्थितीत मोठया किंवा मध्यम सिंचन प्रकल्पाद्वारे सिंचित करता येऊ शकत नाही, अशा जमिनीच्या लहान तुकड्यांच्या सिंचनासाठी लघुसिंचन प्रकल्पाची भूमिका महत्वाची असते. २५० हेक्टरपर्यंत सिंचन क्षमता असलेले प्रकल्प लघुसिंचन प्रकल्पांतर्गत घेण्यात येतात व त्यांचे कार्यान्वयन आणि व्यवस्थापन महाराष्ट्र शासनाच्या जलसंधारण विभागाद्वारे करण्यात येते. पाणी एक मौल्यवान नैसर्गिक स्त्रोत असल्यामुळे त्याचा कार्यक्षम आणि प्रभावी विनियोग करण्याकरिता राज्यासाठी एक एकात्मिक दीर्घकालीन योजना असण्याची निकड महाराष्ट्र जल आणि सिंचन आयोगाने योग्य प्रकारे ओळखली (सप्टेंबर १९९९) अशा प्रकारची एकात्मिक योजना राज्याच्या समतोल विकासाची खात्री देते आणि पाण्याच्या विविध वापरकर्त्यांच्या गरजा सुध्दा पूर्ण करते. अशा परिस्थितीत लघुसिंचन प्रकल्पांचे नियोजन मागणीनुसार होते आणि ते सुसाध्य आहे काय, याबाबतचा सखोल अभ्यास केल्यानंतर ते हाती घेण्यात आले किंवा कसे,निधीचे प्रदान आणि वापर यासाठी योग्य वित्तीय व्यवस्थापन व्यवहारांचे पालन करण्यात आले किंवा कसे, लघुसिंचन प्रकल्पांचे निष्पादन समायोचित,मितव्ययी,कार्यक्षम आणि परिणामकारक पध्दतीने करण्यात आले होते किंवा कसे,लघुसिंचन प्रकल्पाद्वारे निर्मित सिंचन क्षमता पर्याप्त होती आणि ती योग्य प्रकारे वापरण्यात आली किंवा कशी या सर्व बाबींची छाननी, तपासणी व अंमलबजावणी करण्याची जबाबदारी प्रामुख्याने जलसंधारण विभागाची आहे.

**परिच्छेद क्र. २.१.६.१ "लघुसिंचन प्रकल्पांचे नियोजन "**

**अभिप्राय**

**१.३** लघुसिंचन प्रकल्पांचे नियोजन जलसंधारण विभाग, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ व विदर्भ सघन सिंचन प्रकल्प विकास कार्यक्रम यांचेमार्फत होत असते. त्याअनुषंगाने जलसंधारण विभागाद्वारे प्रकल्पांचे नियोजन करतेवेळी महाराष्ट्र लघु सिंचन नियमपुस्तिका, १९८३ च्या परिच्छेद २.८ अनुसार विभागांच्या प्रभारी कार्यकारी अभियंत्यांनी जिल्हा बृहत आराखडे तयार करावयास पाहिजे, ज्यात जिल्ह्याची विशेष वैशिष्टये सामान्यतः लागवड करण्यात येणारे पीक, सिंचन पध्दत, सिंचन साध्यतेचे विविध स्वरुप, शक्यता, मर्यादा, लक्ष्य इत्यादिंची माहिती तक्ते, नकाशे आदि विवरण स्वरुपात दर्शविलेली असावी. या बृहत आराखडयामध्ये पुढील १५ वर्षाकरिता प्रकल्पाचे शेल्फ (Shelf)दर्शविणे अपेक्षित आहे.जे लघुसिंचनप्रकल्पांचे नियोजन आणि निधी पुरवठा करण्याकरिता एक महत्वाचे साधन असेल. तथापि, काही विभागाने जिल्हा बृहत आराखडा तयार केला नव्हता व केवळ स्थानिक प्रतिनिधी/शेतक-यांच्या व स्थानिक लोकांनी केलेल्या मागण्यांच्या आधारावर प्रकल्प निवडण्यात आले होते. त्याचप्रमाणे महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाद्वारे प्रकल्पांचे नियोजन करतेवेळी महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ अधिनियम, २००० नुसार राज्यात मत्स्य व्यवसाय, मत्स्य संवर्धन, पुष्प संवर्धन, उद्यानविद्या, रेशीम उत्पादन इत्यादी सारख्या सिंचनाशी निगडीत कार्यांना चालना देण्याकरिता वार्षिक आराखडे आणि पंचवार्षिक कार्य विकास आराखडे तयार करावयास पाहिजे होते. मात्र महामंडळाने वार्षिक कार्य विकास आराखडे तयार केले परंतु पंचवार्षिक कार्य विकास आराखडे तयार केले नाहीत. तसेच शासनाकडून निधीच्या उपलब्धतेची खात्री केल्याशिवाय वार्षिक आराखडे मंजूर करण्यात आले. परिणामी, १५९५५ हेक्टर अंदाजित सिंचन क्षमता असलेले ९७ प्रकल्प रु. ४.८६ कोटी खर्च केल्यावर निधीच्या कमतरतेमुळे रद्द करण्यात आले.

**१.४** त्याचप्रमाणे विदर्भ सघन सिंचन प्रकल्प विकास कार्यक्रम (VIIDP) अंतर्गत प्रकल्पांचे नियोजन करते वेळी कार्यान्वयन मार्गदर्शक तत्वांनुसार या कार्यक्रमांतर्गत अभिप्रेत इन्टरवेन्शन्सना(Interventions) प्राधान्यक्रम देण्याकरिता व्यापक जिल्हा कृषि योजना आणि राज्य कृषी योजनांमधून उद्‌भवणारी परिप्रेक्ष्य/कार्यतंत्र योजना तयार केली नव्हती. या कार्यक्रमांतर्गत प्रस्तावित विविध कामे सविस्तर प्रकल्प अहवालात (DPR) अंतर्भूत आहेत आणि ती कामे राज्य शासनाद्वारे मंजूर केली आहेत. तथापि, मंजूर DPR मधील पूर्ण करावयाच्या असलेल्या रु.९२९.५५ कोटी रक्कमेच्या ५,९६२ इन्टरवेन्शन्स पैकी फक्त १,७२४ इन्टरवेन्शन्स पूर्ण करण्यात आले होते आणि ७७६ इन्टरवेन्शन्सची कामे सुरु होती, ज्यावर रु. २३३.७२ कोटी खर्च झाला होता असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांच्या परिच्छेदात नमूद केले आहेत.

**१.५** लघुसिंचन प्रकल्पांची व्याप्ती, स्वरुप व मर्यादा अत्यंत लहान व विखुरलेल्या स्वरुपाची असून ती दूरवरच्या क्षेत्रातील (Remote area) असतात. तथापि, स्थानिक परिस्थिती, लोकप्रतिनिधी व स्थानिक शेतक-यांकडून प्राप्त मागणीनुसार ब-याच वेळेस लघुसिंचन प्रकल्प हाती घेण्यात येतात. त्यामुळे अशा प्रकारचे नियोजन करुन त्याची वर्गवारी व प्राधान्यक्रम ठरविणे अडचणीचे ठरते. तसेच महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ अधिनियम, २००० मधील कलम-१८ नुसार महाराष्ट्र

जलसंधारण महामंडळामार्फत राबविण्याच्या योजनाचा आराखडा दरवर्षी तयार करण्यात येतो तथापि महामंडळास त्यानुसार संपुर्ण अंशदान उपलब्ध होत नसल्यामुळे वार्षिक आराखडयातील योजना पूर्ण होण्याकरीता २ वर्षे किंवा अधिकचा कालावधी लागतो. त्यामुळे पंचवार्षिक कार्यकारी विकास योजना /आराखडे तयार केलेले नाहीत. तसेच महाराष्ट्र जलसंधारण महामंडळामार्फत १०१ ते २५० हेक्टर सिंचन क्षमतेच्या ९६ योजना निधी अभावी स्थगित करण्यात आल्या असून त्यापैकी ६१ योजना सद्यस्थितीत रद्द करण्यात आल्या आहेत. रद्द वा स्थगित केलेल्या योजनांवर कोणताही खर्च करण्यात आलेला नाही. उर्वरीत ३५ योजनांवर रु.९९.६८ लक्ष खर्च करण्यात आलेला असून स्थगित केलेल्या योजना निधीच्या उपलब्धतेनुसार पुर्ण करण्यात येतील असे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर विदित केले. याबाबत समितीने नापसंती दर्शविली.

**१.६** कोणतेही दिर्घकालीन नियोजन आणि प्राधान्यक्रमाशिवाय लघुसिंचन प्रकल्प हाती घेण्यात आले. तसेच, संकल्पचित्र, कामाच्या व्याप्तीमधील बदल, निधीची कमतरता, जमिन संपादन न करणे इत्यादीमुळे प्रकल्प किंमतीमध्ये अवाढव्य वाढ झाली आणि प्रकल्प पूर्ण होण्यासाठी विलंब लागलेला आहे. नियम पुस्तिकांचे प्रावधन व कंत्राट अटींचे उल्लंघन झाल्याच्या प्रकरणांमुळे कंत्राटदारांना गैरवाजवी लाभ देण्यात आला. प्रकल्पाच्या उत्पादन आणि देखभालीसाठी राज्य शासनाद्वारे अपर्याप्त निधी पुरविण्यात येणे. अभियंत्यांद्वारे प्रकल्पाचे नियंत्रण कमकुवत असणे. विभागाच्या तपासणी अभावी कोणतीही पाणीपट्टी न भरता, पाणी साठ्यामध्ये मोठ्या प्रमाणावर पाण्याची चोरी होणे, ४८७१ हेक्टर सिंचन क्षमतेच्या तुलनेमध्ये उपयोगात आणलेली सिंचन क्षमता ही २६ टक्क्यांपर्यंत कमी झालेली असणे, कालव्याचे काम पूर्ण करणे, परंतु लाभक्षेत्रामध्ये जाळे पसरविण्यास मोठ्या प्रमाणात विलंब होणे, निर्मित मालमत्तेची अपूरी देखभाल, त्या साठी निधीची कमतरता, यामुळे सिंचन क्षमतेचा वापर नियोजनाप्रमाणे न होणे अशा अनेक गंभीर बाबी समितीच्या निदर्शनास आल्या असून हे सर्व आक्षेप विभागीय सचिवांनी समितीसमोर मान्यच केले.

**१.७** जल आराखडा करणे नियमानुसार बंधनकारक होते. त्यामध्ये जलसंपदा विभागामार्फत आराखडा तयार करुन यामध्ये चालू असलेल्या योजना प्रगतीपथावर नेणे आणि त्या पूर्ण करणे अपेक्षित असते. परंतु जर पुढील १५ वर्षाचे दिर्घकालीन नियोजन करावयाचे असेल तर त्यासाठी निधीचा सुद्धा विचार करणे आवश्यक असते. विभागाकडून आराखडा तयार करण्यात येत असून सदर आराखडा वार्षिक असून १५ वर्षाचा दिर्घकालीन आराखडा तयार करण्यात आलेला नाही. तसेच विभागाला वार्षिक नियोजनाच्या कामांसाठी देखील पुर्ण निधी मिळत नाही. अशा परिस्थतीत पंचवार्षिक योजनांसाठी निधी प्राप्त होणेबाबत अडचणी येतात. त्यामुळे दिर्घकालीन नियोजन करता येत नाही असे विभागीय सचिवांनी समितीसमोर सांगितले असता या प्रकल्पांच्या कामांचे कोणत्याही प्रकारचे नियोजन करण्यास विभाग अपयशी ठरलेला आहे असे समितीची स्पष्ट मत आहे. विभागाने हे दिर्घकालीन आराखडे तयार करणे हे ऐच्छीक नसून विभागावर बंधनकारक आहे. विभागाने जिल्हा आराखडे तयार न करण्यामागे कोणतेही कारण समर्थनीय ठरु शकत नाही. निधीचा विषय स्वतंत्र आहे. परंतु दिर्घकालीन आराखड्याशिवाय ही कामे करणे निश्चितच अभिप्रेत नाही.

**१.८** समितीने या सर्व बाबींसंदर्भात आक्षेप नोंदवित जल आराखडे तयार केलेले नसल्यामुळे सर्व कामे थांबविण्याचे निर्देश माननीय उच्च न्यायालयाने दिलेले आहेत. त्यामुळे हे आराखडे तयार करण्याचे काम किती महत्त्वपूर्ण व बंधनकारक आहे, हे विभागाला समितीने वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. ९६ प्रकल्पांपैकी ६१ प्रकल्प तुर्त स्थगित ठेवण्यात आले आहेत. विभाग एकीकडे पुरेसा निधी मिळत नसल्यामुळे या योजनांचे काम स्थगित वा अपुर्ण असल्याचे सांगते. परंतु दुसरीकडे उपलब्ध निधीचे पुरेपूर व योग्य नियोजन विभागाकडून झाल्याचे दिसून येत नाही असे समितीचे स्पष्ट मत आहे. वास्तविकतः विभागाकडे कामांसाठी २०० कोटी रुपये तरतूद असताना १,४०० कोटी रुपयांच्या प्रकल्पांना विभाग मान्यता कशी काय देते, यासंदर्भात समितीने विचारणा केली असता महामंडळाचे अध्यक्ष मंत्री महोदय असून महामंडळ स्तरावर प्रकल्पांना मंजूरी देण्यात आली आहे असे विभागीय सचिवांनी समितीसमोर विदित केले.

**१.९** या प्रकल्पांची किंमत प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आलेल्या वर्षातील आहे. सद्यःस्थितीत या प्रकल्पांचे दायित्व २०० कोटी रुपये एवढे आहे. अशा परिस्थितीत हे लघुसिंचन प्रकल्प विभाग कसे पुर्ण करणार याची देखील शाश्वती समितीला दिसून येत नाही. त्याचप्रमाणे महालेखाकार यांच्या आकडेवारीनुसार या प्रकल्पांच्या कामासाठी रु.४.८६ कोटी खर्च झाले आहेत. परंतु विभागाकडील आकडेवारीनुसार केवळ रु. ९९.६८ लक्ष खर्च झाले आहेत. यासंदर्भात खर्चाच्या रकमेच्या तफावतीबाबत विभागाने पूर्ण तपासणी करावी आणि वस्तुस्थिती समितीला सादर करावी असे निदेश समितीने विभागीय प्रतिनिधींलना दिले. एवढेच नव्हेतर विदर्भ सिंचन कार्यक्रमासाठी केंद्र शासनाकडून विभागास मंजूर रु.३२५० कोटी इतक्या निधीचे देखील विभागाने कोणतेही नियोजन केले नाही ज्याचा थेट परिणाम योजनांच्या अंमलबजावणीमध्ये झाला. एकीकडे विभाग या योजनांकरिता निधी मंजूर नाही असे सांगते तर दुसरीकडे विभागाला निधी प्रत्यार्पित करावा लागला. याचाच अर्थ विभागाने योजनांच्या अंमलबजावणीसाठी प्राप्त निधीचे कोणतेही नियोजन केले नाही असे समितीचे स्पष्ट मत आहे.

शिफारस

१.१० जलसंधारण विभागामार्फत राबविण्यात येणारे लघुसिंचन प्रकल्प तसेच महाराष्ट्र जलसंधारण महामंडळामार्फत राबविण्यात येणारे प्रकल्प तसेच विदर्भ सघन सिंचन प्रकल्प विकास कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणा-या लघुसिंचन प्रकल्पांचे नियोजन व व्यवस्थापन योग्यप्रकारे न केल्याबाबत सदरहु आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेले आहेत. कोणतेही दिर्घकालीन नियोजन व प्राधान्य क्रमाशिवाय हे प्रकल्प घेण्यात आले. त्यातही प्रकल्पांसाठी अपुरा निधी प्राप्त होणे, अधिक निधी मिळविण्यासाठी विभागाद्वारे कोणतेही विशेष प्रयत्न न होणे, मंजूर निधीपेक्षा कित्येक जास्त निधीची कामे मंजूर करणे, प्राप्त निधीमधून कामांचे प्राधान्य, निधी वितरणाचे निकष, वेळोवेळी प्रकल्पाच्या आराखडा/व्याप्तीमधील बदल इत्यादी अनेक कारणांमुळे या प्रकल्पांच्या निष्पादनास विलंब झाला. प्रकल्पांचे संनियंत्रण कमकुवत असून ते परिणामकारकरितीने व कार्यक्षमतापूर्वक करण्यात आले नव्हते. दिर्घकालीन बृहत आराखडे तयार न करणे, ऐनवेळी येणा-या मागण्यांच्या आधारावर प्राधान्यक्रम बदलून प्रकल्पांची कामे हाती घेण्यात येणे, पंचवार्षिक कार्य विकास आराखडे तयार न करता वार्षिक आराखड्यांवर कामे करणे या कार्यपध्दतीमुळे अनेक प्रकल्प विभागाला कोट्यवधी रुपये खर्च केल्यानंतर स्थगित ठेवावे लागले वा रद्द करावे लागले. तसेच काही प्रकल्प निधी खर्च होऊनही अपुर्णावस्थेत असल्यामुळे नियोजीत प्रकल्प सिंचन क्षमता निर्माण होऊ शकली नाही तसेच कित्येक प्रकल्प पूर्ण होऊनसुध्दा दुरुस्तीसाठी वेळेवर निधी उपलब्ध न झाल्यामुळे ७५ टक्के च्या जवळपास कोल्हापूर बंधारे दुरुस्त होऊ शकले नाहीत. त्यामुळे निधी खर्च होऊन सुध्दा प्रकल्पाचा उपयोग लाभार्थ्यांना होऊ शकला नाही. व त्याचा पुर्ण क्षमतेने वापरही करता येऊ शकला नाही. या सर्व बाबी गंभीर स्वरुपाच्या असून विभागाच्या एकंदरीत कार्यपध्दतीवर प्रश्नचिन्ह उभे करणा-या आहेत. साक्षीदरम्यान विभागीय प्रतिनिधींनी हे सर्व आक्षेप मान्यही केले. परंतु यासंदर्भात कोणतीही उपाययोजना केली नाही अथवा यास दोषी असणा-या कोणत्याही अधिका-यांवर अद्यापही विभागाने कारवाई केली नाही ही देखील गंभीर बाब आहे. वास्तविक महालेखाकारांनी हे आक्षेप नोंदविल्यानंतर समितीसमोर साक्षीसाठी येणे अगोदर विभागाने यासंबंधी उपाययोजना व जबाबदार अधिका-यांवर कारवाई करुनच समितीसमोर येणे आवश्यक होते. परंतु विभागीय प्रतिनिधींनी यासंदर्भात कोणतीही कारवाई केली नाही, ही बाब गंभीर असून समिती याबाबत तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. अतः याप्रकरणी जबाबदार असणा-या अधिकारी/कर्मचा-यांवर कारवाई करण्यात यावी. तसेच विभागाने भविष्यात लघुसिंचन प्रकल्पाचे नियोजन करतेवेळी जिल्हा बृहत आराखडे व पंचवार्षिक कार्य विकास आराखडे तयार करुन ही कामे करावी व आराखड्या संदर्भातील विहित तरतूदींची प्रभावी अंमलबजावणी करावी. तसेच या प्रकल्पांसाठी अधिकाधीक निधी प्राप्त करुन घेण्यासाठी विशेष प्रयत्न व पाठपुरावा करण्यात यावा. प्रशासकीय मान्यता देताना निधीची उपलब्धता, कामांची व्याप्ती, कामांचे प्राधान्यक्रम, निधी वितरणाचे निकष व त्यातून साध्य होणारी प्रकल्पांची उपयुक्तताव सिंचन क्षमता लक्षात घेऊनच प्रकल्पाची मान्यता घ्यावी व अंमलबजावणी करावी. शासनाने देखील या जलसंधारणाच्या कामांसाठी अधिकाधीक निधी विभागास उपलब्ध करुन द्यावा. तसेच जे प्रकल्प आता स्थगित वा अपुर्णावस्थेत आहेत त्यांचा विभागाने फेरआढावा घेऊन कामाची व्याप्ती, प्रकल्पांची उपयुक्तता व त्यातून निर्माण होणारे सिंचन क्षेत्र लक्षात घेऊन जे प्रकल्प पुर्ण करणे शक्य आहे ते पुर्ण करावे व त्यासाठी आवश्यक निधी देखील देण्यात यावा व जे प्रकल्प पुर्ण करण्यासारखे नाही ते रद्द करावेत. तसेच जलसंधारणाच्या कामाला प्रशासकीय मान्यता दिली जाते त्याचवेळेस त्या प्रकल्पासाठी केलेली तरतूद विभागास उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. सन २०१७ रोजी काम पूर्ण झाल्यानंतर देयके अदा करण्यासाठी निधी मंजूरीसाठी मंत्रालयापर्यंत प्रस्ताव येतात. त्यामुळे कामाचा गतीला खिळ बसते व वेळेचा अपव्यय होतो म्हणून प्रशासकीय मान्यता देते वेळेसच इतर शासनाने जे निविदा धोरण अवलंबिले त्यानुसार आजपर्यंत १०० ते २०० हेक्टरपर्यंतचे तलाव जलसंधारण विभाग बांधत होते. आता ही मर्यादा १०० ते ६०० हेक्टर पर्यंत करण्यात आली आहे. त्यामुळे प्रकल्पांची संख्या वाढणार असून विभागाला मोठ्या प्रमाणावर निधीची गरज आहे. मात्र विभागास मिळणारा निधी तुलनेने अत्यल्प आहे. सबब शासनाने पुन्हा जुना निर्णयबाबत ठेवावा अथवा नविन धोरणाप्रमाणे २५० ते ६०० हेक्टर क्षमतेच्या प्रकल्पासाठी वाढीव तरतूद करण्यात यावी. अन्यथा सिंचन क्षमतेवर परिणाम होईल. विभागाप्रमाणे निधी सुध्दा प्रकल्पनिहास वितरीत करण्यात यावा. राज्यात लघुसिंचन प्रकल्पांच्या माध्यामातून मोठ्या प्रमाणात सिंचीत क्षेत्रात वाढ करावी व या सर्व बाबतीत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

**परिच्छेद क्रमांक २.१.६.२ 'प्रकल्पांना प्राधान्यक्रम न देणे'**

**अभिप्राय :**

**१.११** विभागामार्फत १८७ प्रकल्पांपैकी ४४ प्रकल्प पुर्ण झाले होते, १२२ प्रकल्प सुरू होते, १६ प्रकल्प सुरू व्हावयाचे होते व ४ प्रकल्प रद्द झाले व एका प्रकल्पाची स्थिती लेखापरिक्षेस सादर करण्यात आली नाही. पूर्वी मंजूर केलेल्या १२२ प्रकल्पांपैकी ९१ प्रकल्प सप्टेंबर २०१६ पर्यंत अपूर्ण होते असे असतांनाही रु.२९८.९१ कोटी अंदाजित किंमतीचे ४५ नवीन प्रकल्प हाती घेण्यात आले. नवीन प्रकल्पांना प्राथमिकता दिल्याने सुरू/अपूर्ण असलेल्या ९१ प्रकल्पांच्या प्रगतीवर प्रतिकूल परिणाम झाला. कारण ४५ नवीन प्रकल्पांवर रु.१२६.३२ कोटी खर्च केल्यामुळे आधीच्या प्रगतिपथावर असलेल्या प्रकल्पांच्या पूर्णतेसाठी लागणारी उर्वरित कामाची किंमत रु.२०४.१० कोटी एवढी जास्त होती, जेव्हा की ही किंमत नवीन प्रकल्प हाती घेतले नसते तर रु.७७.७८ कोटी इतकी कमी करता येऊ शकली असती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

**१.१२** यावर विभागीय प्रतिनिधींनी उपरोक्त प्रकल्प केवळ निधीअभावी अपुर्ण राहिले नसून त्यात भूसंपादनातील अडचणी, स्थानिक शेतक-यांचा विरोध व पुरेसा निधी वेळेत उपलब्ध न झाल्यामुळे प्रलंबित आहेत. तसेच प्रलंबित न्यायालयीन प्रकरणांमुळेही कामांच्या प्रगतीवर विपरीत परिणाम झालेला आहे. अतः उपरोक्त परिस्थितीत ९१ प्रकल्प विहीत मुदतीत १००% पुर्ण करणे शक्य झाले नाही. तथापि, त्यामुळे शिल्लक राहणारा निधी खर्च होण्याच्या दृष्टीने ४५ नवीन प्रकल्प हाती घेण्यात आले. या नवीन प्रकल्पामुळे जुन्या प्रकल्पांच्या प्रगतीवर केवळ निधी अभावी कोणताही प्रतिकुल परिणाम झालेला नाही असे समितीसमोर सांगण्यात आले.

**शिफारस :**

**१.१३ महालेखाकारांनी सदरहु परिच्छेदात नोंदविलेले आक्षेप हे गंभीर असून पुर्वी मंजूर केलेले प्रकल्प निधी खर्च करुनही अपुर्णावस्थेत असताना कोट्यावधी रुपयांचे नवीन प्रकल्प हाती घेतले. परिणामी प्रगतीपथावर असलेल्या प्रकल्पांच्या पुर्णतेसाठी विलंब तर झालाच शिवाय प्रकल्पांच्या किंमतीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली व अद्यापही हे प्रकल्प पूर्ण झालेले नाहीत ही वस्तुस्थिती आहे. अतः विभागाने मा.राज्यपाल महोदयांनी दिलेल्या निर्देशांच्या अधीन राहून चालू प्रकल्पांचे दायित्व उपलब्ध निधीतून पूर्ण होईपर्यंत नवीन प्रकल्प हाती घेणे टाळावे व प्रकल्प पुर्णत्वासाठी विशेष प्रयत्न करुन व आवश्यकता असल्यास त्यासाठी निधी प्राप्त करुन ते पुर्ण करावेत व याप्रकरणी योग्य नियोजन करुन आवश्यक कार्यवाही करावी. तसेच राज्य शासनाने लघु सिंचन प्रकल्पांसाठी एका विशिष्ट कालावधीत आणि किंमतीत साध्य करावयाचे भौतिक लक्ष्य स्पष्टपणे दर्शविणारी दीर्घकालीन व्यापक योजना तयार करावी. यामुळे प्रकल्पांसाठी कायमस्वरुपी निधी उपलब्धता शक्य होईल तसेच सुरू असलेले प्रकल्प वेळेवर पूर्ण करावे व प्रकल्पांना प्राधान्यक्रम देऊनच प्रकल्प हाती घ्यावेत व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक २.१.६.३ 'नियोजन करते वेळी कार्यस्थळांचे अपुरे सर्वेक्षण'**

**अभिप्राय :**

**१.१४** काही सिंचन प्रकल्पांच्या संयुक्त प्रत्यक्ष पाहणीत जलसंधारण विभागाने केलेल्या कंत्राटाच्या खंड ३८ प्रमाणे कंत्राटदारांनी निष्पादित केलेल्या निविदा परिमाणाच्या १२५ टक्क्यांपर्यंतच्या परिमाणासाठी भुगतान निविदा दरानेच करावयाचे होते आणि १२५ टक्क्यांपेक्षा अधिकच्या परिमाणासाठी भुगतान प्रचलित दर अनुसूची (CSR) प्रमाणे करावयाचे होते. परंतु काही निवडक प्रकल्पांमध्ये कंत्राटदारांनी खंड ३८ चा अवलंब केला कारण प्रत्येक प्रकल्पाखाली विविध घटकांचे प्रत्यक्ष परिमाण निविदा परिमाणाच्या १२५ टक्क्यांपेक्षा खूप जास्त होते. कारण अंदाजपत्रके तयार करतांना कठीण खडकात पाया तयार करण्यासाठी ट्रायल पीट्स (Trial pits) विचारात घेण्यात आले नाही, खोदकामातून निघालेले साहित्य पुनःवापरास योग्य आहे अथवा नाही याचे निर्धारण करण्यात आले नाही, नेमून दिलेल्या खाणीमधून बंधा-याच्या कामांसाठी आणण्यात आलेल्या साहित्याचे चुकीचे निर्धारण करणे,प्रकल्प स्थळांच्या आजूबाजूस देऊळ / उच्च दाबाच्या इलेक्ट्रिक लाईन्स असणे, प्रकल्पांचे महत्वपूर्ण घटक जसे उर्जा अपव्यय न होण्यासाठी व्यवस्था (याद्वारे धरणातील अतिरिक्त पाणी बाहेर काढण्याची प्रक्रिया नियमित करता येऊ शकते), संरक्षण भिंती (नदी काठांची हानि रोखण्यासाठी) यांचा समावेश न करणे, धरणाच्या पायामध्ये पाणी गळती रोखण्यासाठी सिमेंट ग्राऊटिंग (Grounting) वाढविणे इत्यादी असंगतिमुळे सिंचन विभागाद्वारे त्रुटीपूर्ण अंदाजपत्रके तयार करण्यात आली. ज्यामुळे रु.९.६४ कोटी अतिरिक्त खर्च झाला. प्रारंभिक सर्वेक्षणातील त्रुटीमुळे ज्या प्रकल्पांच्या किंमतीत मोठी वाढ झाली असे नेचल, ऐनारी व इंदवती लघुसिंचन तलाव प्रकल्प याबाबत महालेखाकारांनी विशेष आक्षेप नोंदविलेले आहेत. ज्याचा विस्तृत समावेश महालेखापालांच्या आक्षेपात नमूद करण्यात आला आहे.

**१.१५** सातारा जिल्ह्यात नेचल लघु सिंचन तलावाच्या प्रकल्पाचे काम कालव्यांच्या कामांसह रु.३.१६ कोटी किंमतीस फेब्रुवारी २०११ पर्यंत पूर्ण करावयाच्या अटीवर फेब्रुवारी २००९ मध्ये बहाल करण्यात आले. काम करते वेळी डोंगराळ भूप्रदेश असल्यामुळे कालव्यांचे बांधकाम करणे उचित नसल्याचे जाणवले. त्यामुळे कालव्यांच्या ऐवजी रु.१.०२ कोटी अंदाजित किंमतीवर कोल्हापूर पध्दतीचा बंधारा बांधण्याचे ठरविण्यात आले. तसेच रत्नागिरी जिल्ह्यात ऐनारी लघु सिंचन तलाव प्रकल्पाचे काम रु.१०.१२ कोटी किंमतीवर बहाल करण्यात आले. परंतु हे काम भूमि संपादनात झालेल्या विलंबामुळे उशीराने सुरू झाले. जमीन निष्पादनाचेवेळी गावक-यांनी दोन देवळांपासून जात असलेल्या धरणाच्या संरेखेवर तीव्र विरोध दर्शविल्यामुळे धरण संरेखा २०० मीटरने वरच्या बाजूस (Upstream) सरकविण्यात आली. धरण संरेखा बदलल्यामुळे धरणाची उंची पाच मीटरने वाढवावी लागली, ज्यामुळे प्रकल्प किंमतीत वाढ झाली. तसेच रत्नागिरी जिल्ह्यात इंदवती लघु सिंचन तलाव प्रकल्पाचे काम रु.३.६८ कोटी किंमतीवर फेब्रुवारी २००९ पर्यंत पूर्ण करण्याच्या अटीवर मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेद्वारे संकल्पचित्रास मंजुरी न घेता बहाल करण्यात आले. परिणामी धरणाची उंची,रुंदी, बाजूचे उतार, सांडव्याची लांबी वाढवावी लागली. त्यामुळे रु.२४.८३ कोटी प्रकल्पाची सुधारित अंदाजित किंमत महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आली. याशिवाय दोन प्रकल्पांमध्ये कालवा संरेखेत वन जमीन येत होती आणि उच्च दाबाच्या लाईन्स दुसरीकडे हलविण्यात येऊ शकल्या नाही, तसेच स्थानिक शेतक-यांचा विरोध या कारणांस्तव व सर्वेक्षणातील उणीवांमुळे विभागाला मूळ अंदाजपत्रकात प्रस्तावित केलेल्या कालव्यांच्या ऐवजी कोल्हापूर पध्दतीचे बंधारे बांधावे लागले.

**१.१६** महालेखाकारांनी नोंदविलेल्या आक्षेपावर समितीने विस्तृत चर्चा केली असता सदरहु आक्षेप विभागाने मान्य केले. वास्तविकतः सुधारीत प्रशासकीय मान्यता घेतल्याशिवाय विभागाला २५ टक्क्यांच्या वर जाता येत नाही. परंतु ही वाढ १ टक्का ते १४९८४ टक्क्यांपर्यंत म्हणजेच खूप जास्त असल्याचे आक्षेप महालेखाकारांनी नोंदविले आहेत. याबाबत चौकशी करण्यात येणार असून १५ प्रकल्पांप्रकरणी नेमकी कोणाकडून, कोणत्या स्तरावरुन चूक झाली याची चौकशी मुख्य अभियंत्यांच्या मार्फत एका महिन्यात करण्यात येणार असल्याची व संबंधित जबाबदार अधिका-यांवर कारवाई करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीसमोर आश्वासित केले. परंतु अद्यापही समितीस माहिती प्राप्त झाली नाही. परिपूर्ण सर्वेक्षण न करता अंदाजपत्रक करण्यात आल्यामुळे निश्चितच प्रकल्पाच्या किंमतीत वाढ झाल्याचे दिसून येते. विभाग कंत्राटदारांकडून अनेक प्रकारची कामे करुन घेते. परंतु प्रकल्पाचे अंदाजपत्रक, सर्वेक्षण व संनियंत्रण करण्याचे काम विभागानेच करणे अभिप्रेत व आवश्यक असताना ही कामे देखील विभागाकडून न करता कंत्राटदारांकडून करण्यात येतात व ही बाब अत्यंत घातक असून विभागाचे कमकुवत संनियंत्रण दर्शविणारी आहे. विभागांतर्गत कामे करताना सर्वेक्षणासाठी अवलंबिण्यात येणारी प्रक्रियाच अत्यंत दोषपुर्ण आहे. परस्पर हितसंबंधांमुळे ही कामे गुणवत्तेवर होत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. नेचल, ऐनारी, इंदवती या प्रकल्पांमध्ये पुर्णपणे सर्वेक्षणाचा अभाव दिसून येतो. परिणामी प्रकल्पाच्या किंमतीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली व प्रशासकीय मान्यतेला कोणताही अर्थ शिल्लक राहिला नाही व प्रकल्प पुर्ण करण्यासाठी सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेशिवाय कोणताही अन्य पर्याय शिल्लक राहीला नाही. सदरहु परिच्छेदांमध्ये नमूद लघुसिंचन प्रकल्पांबाबत महालेखाकारांनी नमूद केलेले आक्षेप हे अत्यंत गंभीर स्वरुपाचे असून ते विभागाने मान्य करुन या प्रकरणी चौकशी करुन कारवाई करणेबाबत समितीला आश्वासित केले.

**शिफारस :**

**१.१७ महाराष्ट्र लघु सिंचन पुस्तिका, १९८३ च्या प्रकरण ३ आणि ४ नुसार सिंचन योजना तयार करताना प्रकल्पाचा अंदाज बांधणे,प्रकल्पासाठी जागा नेमणे,कार्यस्थळाचे प्रदेशज्ञान,जलस्त्रोत,ऋतुनुसार पाण्याचे निस्साःरण आणि इतर पर्यावरण बाबींची पूर्व तपासणी करुनच योजना तयार करावयास पाहिजे. पूर्व तपासणी झाल्यानंतर, सिंचनाच्या साठवणूक क्षमतेनुसार मातीकाम, चिरेबंदी काम इत्यादींचे प्रमाण निर्धारित करण्यासाठी सर्वेक्षण करुन प्रकल्पाचा DPR तयार होतो. या DPR मध्ये विस्तृत अंदाजित खर्च, लाभव्यय गुणोत्तर आणि इतर आर्थिक मापदंड जसे सिंचन योग्य लाभक्षेत्र, वर्षभरात सिंचित करावयाचे असलेले अपेक्षित क्षेत्र, सिंचनाची गरज इत्यादी दर्शवायचे असते. परंतु विभागाने याचे पालन व पुर्तता न केल्यामुळे त्रुटीपुर्ण अंदाजपत्रके तयार करण्यात आली व मोठ्या प्रमाणात अतिरिक्त खर्च झाला. याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.**

**या परिच्छेदांतर्गत नेचल लघु सिंचन तलाव, ऐनारी लघुसिंचन तलाव आणि इंदवती लघुसिंचन तलाव तसेच अन्य दोन प्रकल्पांबाबत महालेखाकारांनी नोंदविलेले आक्षेप हे अत्यंत गंभीर स्वरुपाचे असून याची सखोल चौकशी विभागाने करावी.**

**तसेच प्रकल्प किंमतीत ५ ते १० टक्के वाढ होऊ शकते परंतु महालेखाकारांनी नोंदविलेल्या १ ते १४९८४ टक्क्यांपर्यंतच्या वाढीबाबत देखील चौकशी करण्यात यावी व यातील दोषी अधिका-यांवर कारवाई करुन या संपूर्ण प्रकरणाची महालेखाकारांमार्फत पुन्हा तपासणी करुन समितीस २ महिन्यांत कळविण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक २.१.६.४ 'प्रकल्पांची आर्थिक सुसाध्यता' (लाभ-व्यय गुणोत्तर तसेच प्रकल्पांची आर्थिक वर्धनक्षमता)**

**अभिप्राय :**

**१.१८** महाराष्ट्र लघुसिंचन नियमपुस्तिका १९८३ नुसार सिंचनापासून प्राप्त झालेले वार्षिक अतिरिक्त लाभ आणि हे लाभ पुरविण्यासाठी लागणारा वार्षिक खर्च यांचे गुणोत्तर म्हणजेच लाभ-व्यय गुणोत्तर असून लाभ-व्यय गुणोत्तराची परिगणना प्रकल्प अहवालात समाविष्ट करण्यात येते कारण लघुसिंचनप्रकल्पांची आर्थिक सुसाध्यता निर्धारित करण्यासाठी ही परिगणना आवश्यक असते. एखादे सिंचन प्रकल्प आर्थिकरित्या सुसाध्य असण्यासाठी लाभ-व्यय गुणोत्तर एक पेक्षा कमी असावयास नको. परंतु १७ प्रकल्पांमध्ये वार्षिक अतिरिक्त लाभ जसे कृषि उत्पादन, गल्फर (Galphar) जमीन,कृषि क्षेत्रांपासून झालेले उत्पन्न, आणि वार्षिक खर्च जसे प्रशासकीय खर्चाचे जुने दर,घसारा आणि व्याजाचे कमी दर,हे चुकीचे घेऊन/फुगवून लाभ-व्यय गुणोत्तर काढण्यात आले.याशिवाय, लाभ-व्यय गुणोत्तर परिगणित करतांना मत्स्यव्यवसायापासून झालेले उत्पन्नही विचारात घेण्यात आले होते, जे ग्राह्य नव्हते. तसेच राज्याच्या विविध भागांत निष्पादित करावयाच्या विविध प्रकल्पांची आर्थिक वर्धनक्षमता निर्धारित करण्यासाठी राज्य शासनाने वेळोवेळी आर्थिक मापदंड विनिर्दिष्ट केले आहेत जे जलसाठ्याच्या प्रती सहस्त्र घन मीटर (TCM) च्या किंमतीनुसार मोजावयाचे आहे. ही किंमत ज्या वर्षी ही अंदाजपत्रके तयार करण्यात आलीत, त्या वर्षीच्या जिल्हा दर अनुसूची वर आधारित असेल. प्रकल्प अंदाजपत्रके आर्थिकदृष्ट्या वर्धनक्षम आहेत, याबाबत खात्री करण्यासाठी ही अंदाजपत्रके आर्थिक मापदंडानुसार असावयास पाहिजे. परंतु सहा प्रकल्पांमध्ये विभागाद्वारे काढण्यात आलेली प्रती (TCM) किंमत रक्कम राज्य शासनाद्वारे विनिर्दिष्ट आर्थिक मापदंडापेक्षा रु.६.१९ कोटीने जास्त आहे. ज्यामुळे हे प्रकल्प आर्थिकदृष्ट्या अवर्धनक्षम आहे असे गंभीर आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

**१.१९** सदरहू विषयावर समितीने साक्ष घेतली असता लाभ-व्यय गुणोत्तराची परिगणना करणेसंदर्भातील मॅन्युअलमधील तरतुदी ४५ वर्षांपूर्वीच्या आहेत. सेंट्रल वॉटर कमिशन मार्फत सन २०१० मध्ये मागदर्शक सूचना दिलेल्या आहेत. मात्र शासनस्तरावर त्या संबंधी आदेश निर्गमित करण्यात आलेले नाहीत त्यामुळे महालेखापालांचा मुद्दा योग्य असून ते ग्राह्य धरावे असे विभागाने समितीसमोर मान्य केले. तसेच प्रकल्पांची आर्थिक वर्धनक्षमता संदर्भात प्रती सहस्त्र घनमीटर (TCM) च्या दरासंबंधी आक्षेप घेण्यात आला असून सारस्ते लघुपाटबंधारे योजनेमध्ये सन २००८ मधील रु.२२,३८०/- प्रती टीसीएम दर दिलेला आहे. सारस्तेला प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता दिनांक ११ मे, २०११ मध्ये मिळाली आहे. दिनांक ३० एप्रिल, २०११ रोजी नवीन मापदंड लागू करण्यात आले होते. नवीन मापदंडानुसार, डोंगरी भाग असल्यामुळे त्या नुसार दर लागू झालेले असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले व केलेली गणना योग्य असल्याचे समितीसमोर सांगितले. यावर समितीने नापसंती नोंदवित महालेखाकारांसमवेत होणा-या निर्गमन परिषदेत या बाबी विभागाने स्पष्ट केल्या असत्या तर हे आक्षेप टाळता आले असते, असे सांगितले.

**१.२०** पळसविहीर व हरणटेकडी योजनांसंबंधी पहिली वळण योजना गोदावरी खो-यात पाणी वळवण्याकरिता असून दुसरी योजना गिरनार खो-यात पाणी वळवण्याबाबत आहे. मॅन्युअलमध्ये प्रतिहेक्टर दर दिलेला आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले. पळसविहीर व हरणटेकडीचा मुद्दा आहे ही बाब समितीने निदर्शनास आणली असता, डायव्हर्जनचा दर हेक्टरकरिता असून टीसीएमकरिता नाही व या दोन्ही प्रकल्पांना वित्त विभागाची मान्यता घेण्यात आलेली आहे असे विभागीय सचिवांनी समितीसमोर सांगितले.

**शिफारस :**

**१.२१ सदरहू परिच्छेदांतर्गत आक्षेपित प्रकल्पांची समितीने छाननी केली असता लाभ-व्यय गुणोत्तराची परिगणना करणेसंदर्भातील मॅन्युअलमधील तरतुदी सेंट्रल वॉटर कमिशनने दिलेल्या सुधारीत मार्गदर्शक सूचनांच्याआधारे अद्ययावत**

**करण्यात आल्यामुळे व सदरहू वस्तुस्थिती महालेखाकारांच्या निदर्शनास निर्गमन परिषदेदरम्यान आणून न दिल्यामुळे हे आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत. याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत असून विभागाची ही कृती समितीच्या मौल्यवान वेळेचा अपव्यय करणारी आहे. महालेखाकारांनी नोंदविलेल्या आक्षेपांना विभागाने गांभीर्याने हाताळणे आवश्यक आहे. तसेच प्रकल्पांची आर्थिक वर्धनक्षमते अंतर्गत अपेक्षित सर्व प्रकल्पांची तपासणी, शासन निर्णय व मापदंडाच्या आधारे पुन्हा करुन घेण्यात यावी व याबाबत स्वतंत्र सुधारीत सूचना विभागाने निर्गमित कराव्यात व यासंदर्भातील अहवाल समितीस २ महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक २.१.७.१ 'जलसंधारण विभागांतर्गत (WCD) प्रकल्पांसाठी निधी पुरविणे'**

**अभिप्राय :**

**१.२२** जलसंधारण विभागाद्वारे २२५ प्रकल्पांच्या निष्पादनासाठी रु. ४१५.८१ कोटी अर्थसंकल्पीय मागणीच्या विरुध्द राज्य शासनाने रु.३४९.१२ कोटी निधी पुरविला, ज्या पैकी रु. १७३.८२ कोटी खर्च करण्यात आले आणि उर्वरित रु.१७५.३० कोटी परत करण्यात आले. राज्य शासनाद्वारे निधी संवितरित करण्यात विलंब झाला होता, निधीची मोठी रक्कम सामान्यतः अंतिम तिमाहीत प्राप्त होत होती,ज्यामुळे एकतर खर्च करण्याची घाई झाली होती अथवा निधी परत करावा लागला होता. सन २०११-१६ दरम्यान परत केलेल्या रु.१७५.३० कोटी पैकी रु.१२९.३३ कोटी रक्कम सन २०१५-१६ मध्येच प्रत्यर्पित करण्यात आले होते.

**१.२३** २०१५-१६ मध्ये प्रत्यर्पित केलेल्या रु.१२९.३३ कोटी रक्कमेपैकी जलसंधारण विभागाने भांडवली जमा शीर्षातून रु.१०९.३२ कोटी महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाला वितरित करण्यासाठी राखून ठेवले, जेव्हा ही या महामंडळाला पुढे सुरु ठेवण्यासाठी वैधानिक मंजुरी प्रदान करण्याची प्रक्रिया सुरु होती. तथापि, मार्च २०१६ पर्यंत ही वैधानिक मंजुरी प्रदान करण्यात येऊ शकली नाही, त्यामुळे संपूर्ण रु.१२९.३३ कोटी रक्कम प्रत्यर्पित करावी लागली असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहे.

**१.२४** यासंदर्भात समितीसमोर सांगण्यात आले की, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ अधिनियमाच्या कलम २५ मधील तरतुदीमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता असल्याने सन २०१५-१६ यावर्षी महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाकरीता आवश्यक असलेली रू. १०९.३२ कोटी इतकी तरतुद महामंडळाच्या लेखाशिर्षाऐवजी विभागातील अन्य लेखाशिर्षाखाली करण्यात आलेली होती. अधिनियमात सुधारणा केल्यानंतर पुनर्विनियोजनाद्वारे सदर तरतुद महामंडळाच्या लेखाशिर्षाखाली वर्ग करण्याचे प्रस्तावित होते तथापि, महामंडळाच्या अधिनियमातील सुधारणा ३१ मार्चपूर्वी न होता दि.१ एप्रिल, २०१६ रोजी मंजुर झाल्याने सदर तरतुद व्यपगत झाली.

**शिफारस :**

**१.२५ महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाला पुढे सुरु ठेवण्यासाठी वैधानिक मंजूरी प्रदान करण्याची प्रक्रिया सुरु होती. परंतु मार्च, २०१६ पर्यंत ही वैधानिक मंजूरी मिळू शकली नाही. त्यामुळे रु.१२९.३३ कोटी इतका निधी प्रत्यार्पित करावा लागला, ही बाब अत्यंत गंभीर असून विभागांतर्गत नियोजनाचा अभाव दर्शविणारी तर आहेच परंतु त्यामुळे विभागाला या लघुसिंचन प्रकल्पांसाठी प्राप्त झालेल्या मोठ्या निधीला मुकावे लागले. एकीकडे या प्रकल्पांच्या कामांसाठी विभागाला मुळातच कमी व अपुरा निधी प्राप्त होतो त्यामुळे मोठ्या प्रमाणात कामे स्थगित अथवा रद्द करावी लागली तर दुसरीकडे विभागाला प्राप्त झालेला निधी व्यपगत होतो ही अत्यंत गंभीर बाब आहे. सभागृहाने या विधेयकास दि. १ एप्रिल रोजी मान्यता दिल्यामुळे हा निधी व्यपगत झाला ही जरी वस्तुस्थिती असली तरी अशाप्रकारचे महत्वाचे विधेयक सभागृहासमोर आवश्यक त्या विहित मुदतीत आणण्याची व त्याअनुषंगाने वेळेचे नियोजन करण्याची जबाबदारी विभागाचीच व अंतिमतः शासनाचीच असते. सभागृहाने विधेयकास संमती कधी द्यावी हा सर्वस्वी सभागृहाचा अधिकार आहे. परंतु अशाप्रकारे इतक्या मोठ्या प्रमाणात निधी व्यपगत होत असेल तर हे विधेयक ऐनवेळी सभागृहासमोर आणणे योग्य नाही अथवा सभागृहाला या विधेयकाची तातडी व महत्व लक्षात आणून देऊन त्यास मंजूरी मिळवून घेणे शक्य असताना त्याची पुर्तता न झाल्यामुळे हा निधी व्यपगत झाला ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही व यास सर्वस्वी विभागच जबाबदार आहे. समिती याबाबत तीव्र नापसंती व्यक्त करीत असून शासनाने याची योग्य ती दखल घ्यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक २.१.७.२ 'महाराष्ट्र जलसंधारण महामंडळांतर्गत (MWCC) प्रकल्पांसाठी निधी पुरविणे'**

**अभिप्राय :**

**१.२६** राज्यातील पाणलोट आणि जल संधारण प्रकल्पांचा गतिमान विकास नियमन करण्याच्या उद्देशाने या महामंडळाची स्थापना करण्यात आली आणि राज्य शासनाद्वारे निधीही पुरविण्यात आला. तथापि, गत १० वर्षाच्या कालावधीत राज्य शासनाने

महामंडळाला वैधानिक मंजुरी नसतांनाही निधी संवितरित केला. एप्रिल २०१६ मध्ये या महामंडळाला २५ वर्षासाठी २००१पासून २०२६ पर्यंत निरंतर निधी पुरविण्यासाठी वैधानिक मंजुरी प्रदान करण्यात आली. महामंडळाने ४,४४९ प्रकल्पांसाठी केलेल्या रु.५०३० कोटी अर्थसंकल्पीय मागणी विरुध्द राज्य शासनाने फक्त रु.८०५.२४ कोटी संवितरित केले.राज्य शासनाद्वारे कमी निधी दिल्यामुळे २,३३० प्रकल्प महामंडळाला रद्द करावे लागले असा आक्षेप महालेखापालांनी नोंदविला आहे.

**१.२७** याबाबत विभागीय सचिवांच्या साक्षीदरम्यान समितीसमोर सांगण्यात आले की, नियामक मंडळाने सुचविल्याप्रमाणे, मुख्य अभियंत्याच्या अध्यक्षतेखाली तीन मुख्य अभियंत्यांची एक समिती स्थापन करण्यात आली होती. सर्व प्रकल्पांची सविस्तर तांत्रिक छाननी केली, जो प्रकल्प सुरू झालेला नाही, ज्यावर एकही पैसा खर्च झालेला नाही, असे प्रकल्प निवडून त्यासंबंधीच्या निविदाही रद्द करण्यात आलेल्या आहेत ज्या प्रकल्पावर थोडा खर्च झालेला आहे, ते प्रकल्प विभागाने थेट रद्द न करता स्थगित ठेवलेले आहेत. प्रत्येक प्रकरण तपासून मागणीप्रमाणे नियामक मंडळासमोर ठेवण्यात येणार असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले.

**शिफारस :**

**१.२८ महामंडळाने ४४९१ प्रकल्पांसाठी केलेल्या रु.५०३० कोटी अर्थसंकल्पीय मागणी विरुध्द राज्य शासनाने फक्त रु.८०५ कोटी एवढा निधी दिला. राज्य शासनाद्वारे कमी निधी दिल्यामुळे महामंडळाला २३३० प्रकल्प रद्द करावे लागले. विभागाने कोणतेही नियोजन न करता अथवा अपु-या नियोजनाच्याआधारे प्रकल्प हाती घेणे उचित नाही. विभागास दरवर्षी जेवढा नियत व्यय प्राप्त होईल त्यातून मागील वर्षाचे दायित्व वजा जाऊन शिल्लक निधीच्या दिडपट प्रकल्प हाती घेण्यात यावे व त्यासाठी प्रकल्पांचे प्राधान्यक्रम निश्चित करण्यात यावे, निधी वितरणाचे निकष ठरविण्यात यावे व तरीही निधी कमी पडल्यास प्रकल्पांसाठी वाढीव निधी प्राप्त करुन घेण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करुन प्रकल्प पुर्ण करण्यासाठी योग्य ते नियोजन करण्यात यावे व जास्तीत जास्त सिंचन क्षमता वाढविण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक २.१.७.३ 'विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम (VIIDP) अंतर्गत निधी पुरविणे'**

**अभिप्राय :**

**१.२९** राज्य शासनाने VIIDP अंतर्गत रु.९२९.५५ कोटी किंमतीची ५९६२ कामेनिष्पादित करावयाची होती. परंतु यासाठी फक्त रु.२४६.१२ कोटी ची मागणी केली, ज्यापैकी रु.२३३.७२ कोटी प्राप्त झाले आणि २५०० कामांवर ते खर्च करण्यात आले. उर्वरीत ३,४६२ कामे सुरु करण्यात आली नाहीत. तसेच ५९लघुसिंचन प्रकल्पांपैकी रु.४६.६१ कोटी किंमतीचे ३६ प्रकल्प निष्पादनासाठी हाती घेतले, ज्यावर सप्टेंबर २०१६ पर्यंत रु.१९.७५ कोटी खर्च झाला होता. तथापि, ३६ प्रकल्पांपैकी केवळ एक प्रकल्प सप्टेंबर २०१६ पर्यंत पूर्ण करण्यात आला असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नोंदविलेले आहेत. यासंदर्भात समितीसमोर सांगण्यात आले की, एकुण ३२८५ योजनांसाठी रू. ५९५.३९ कोटी एवढ्या रकमेस प्रशासकीय मान्यता प्राप्त करण्यात आली. त्यापैकी २५०० योजना किंमत रू. ३३१.९५ कोटी एवढ्या कामास निवीदा प्रक्रीया पूर्ण करून कार्यारंभ आदेश देण्यात आले. त्यापैकी १७२४ एवढ्या योजना पूर्ण करण्यात आल्या.

**१.३०** ५९ लघुसिंचन प्रकल्पांपैकी ३६ योजनांची निविदा प्रक्रीया पुर्ण करण्यात आली असून यापैकी एक योजना पुर्ण झालेली असुन उर्वरीत ३५ योजना ग्राम विकास व जलसंधारण विभागाच्या दि. १३ सप्टेंबर, २०१७ च्या शासन निर्णयानुसार विविध लेखाशिर्षातंर्गत वर्ग करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे आता सदर योजनेस निधी उपलब्ध होवुन या योजना पुर्ण करण्यात येतील व ५९ लघुसिंचनयोजनांपैकी ३६ योजना हाती घेण्यात आल्या, उर्वरीत योजना निधी अभावी हाती घेण्यात आलेल्या नाहीत. परंतु मागणी केल्याप्रमाणे अपेक्षित निधी प्राप्त न झाल्यामुळे ३५ कामे पुर्ण होवु शकली नाही. तसेच सदर प्रकल्प आता अन्य लेखाशिर्षाखाली वर्ग करण्यात आलेले आहेत. मंजूर केलेले बाकी सर्व प्रकल्प विभाग हाती घेऊ शकला असता, परंतु यासाठी प्रशासकीय यंत्रणा व विभागाचे नियोजन कमी पडले असे समितीचे मत आहे.

**१.३१** विभागाने ९३५ कोटी रुपयांची मागणी केंद्राकडे केली आणि केंद्राकडून २३५ कोटी रुपये मिळाले. निधी मागणी व पाठपुरावा यामध्ये विभाग कमी पडला. केंद्र सरकारचे सन २०१५-२०१६ पर्यंत पैसे आले आणि सन २०१६-२०१७ मध्ये पैसे आले नाहीत. सन २०१५-२०१६ मध्ये १४० कोटी रुपयांची मागणी केली असता विभागाला ३७ कोटी रुपये मिळालेले आहेत. अशाप्रकारे निधी वितरणाचे व कामाचे नियोजन असेल तर हे प्रकल्प कधीही पुर्ण होऊ शकणार नाहीत असे समितीचे स्पष्ट मत आहे.

**शिफारस :**

**१.३२ मंजूर प्रकल्पांच्या तुलनेत कमी निधी प्राप्त झाल्यामुळे अनेक कामे स्थगित ठेवण्यात आली अथवा रद्द करण्यात आली वा सुरु होऊ शकली नाहीत. विभागाने प्रकल्पांच्या कामांचे डीपीआर मंजूर केले.परंतु या कामांसाठी केंद्र सरकारकडून जास्तीत जास्त निधी प्राप्त करुन घेण्यास विभाग अपयशी ठरला. विभाग पाठपुरावा करण्यामध्ये कमी पडला ही वस्तुस्थिती विभागाला नाकारता येणार नाही. राज्य सरकार यासाठी लागणारा अतिरिक्त निधी खर्च करीलच, परंतु (VIDP) अंतर्गत अर्धवट राहिलेल्या प्रकल्पांना उर्वरित निधी केंद्र शासनाकडून प्राप्त करुन घेता येईल किंवा कसे, याबाबत शासनाने प्रयत्न करावेत व हा निधी प्राप्त करुन ही कामे पुर्ण करावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक २.१.७.४ "देखभाल व दुरुस्ती निधीचे कमी वाटप"**

**अभिप्राय :**

**१.३३** जलसंधारण विभागाने राज्यातील पुर्ण झालेल्या लघुसिंचन प्रकल्पांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी रु.३०.४५ कोटीची मागणी केली. परंतु राज्य शासनाने फक्त रु.८.८० कोटी निधी दिला, ज्यापैकी विभागाने फक्त रु.४.९१ कोटी खर्च केले. देखभाल व दुरुस्ती साठी जरी रु.२१.६५कोटी इतका कमी निधी देण्यात आला होता तरी केलेला खर्च हा निधी वाटपा इतपत देखील पोहचू शकला नव्हता. याशिवाय सन २०१५-१६ मध्ये देण्यात आलेल्या रु.१.७९ कोटी निधी पैकी जलसंधारण विभागाने नियमबाह्य पध्दतीने रु.१.०३ कोटी वाहनांच्या खरेदीसाठी वळती केले आणि उर्वरित रु.०.७६ कोटी परत करण्यात आले. अशाप्रकारे प्रकल्पांच्या देखभाल व दुरुस्तीवर प्रतिकूल परिणाम झाला. परिणामी पूर्ण झालेल्या १८ पैकी सात प्रकल्पांत निर्माण केलेल्या सिंचन क्षमतेचा,प्रकल्प पूर्ण झाल्यापासून,योग्यप्रकारे उपयोग करण्यात आला नाही असे आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेले आहेत. यासंदर्भात पूर्ण झालेल्या योजनांसाठीच्या देखभाल व दुरुस्तीसाठी कमी प्रमाणात निधी उपलब्ध होतो. त्यामुळे प्रतिवर्षी देखभाल व दुरुस्तीची सर्व कामे हाती घेणे शक्य होत नाही. योजनांच्या विशेष दुरुस्तीच्या अनुषंगाने निधी पुरविणे बाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे. तसेच सन २०१५-१६ मध्ये देखभाल व दुरुस्तीसाठी उपलब्ध झालेल्या निधीतुन पुर्नविनीयोजनाद्वारे निधी वाहन खरेदी करण्याकरीता कार्यालयीन खर्चाच्या लेखाशिर्षामध्ये वर्ग करण्यात आलेला आहे. सदर कार्यवाही ही नियमानुसार झालेली आहे.वित्त विभागाच्या मान्यतेने पुर्नविनियोजनाद्वारे वाहन खरेदी करीता निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला होता असे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले.

**शिफारस :**

**१.३४ सामान्य रखरखाव आणि समायोचित देखभालीद्वारे सिंचन प्रकल्प योग्य प्रकारे राखण्यात येऊ शकतात आणि त्यामुळे त्यांचे आयुष्य वाढू शकते. म्हणूनच, निर्माण केलेल्या सिंचन क्षमतेचा योग्य प्रकारे वापर करण्यात येत आहे याची शहानिशा करण्यासाठी पूर्ण झालेल्या प्रकल्पांची देखभाल व दुरुस्ती करणे अत्यावश्यक असते. लघु सिंचन प्रकल्पांचे सिंचन क्षमता निर्मिती आणि वापरात असलेले महत्व लक्षात घेता राज्य शासनाने लघु सिंचन प्रकल्पांच्या निष्पादन आणि देखभालीसाठी पुरविलेला निधी त्या प्रकल्पांसाठी पुरेसा आणि समयोचित आहे व त्याचा वापर प्रभावीपणे कार्यक्षमतापूर्वक करण्यात येत आहे याबाबत खात्री करुन तातडीने योग्य ती कार्यवाही करावी. तसेच विभागाला दिलेला निधी विभागांतर्गत कामांसाठी वापरताना कामांचे महत्व, तातडी, प्राधान्य, व्याप्ती व उपयोगिता लक्षात घेऊनच त्याचे वितरण करावे व वित्तीय नियमांचे उल्लंघन होणार नाही याची भविष्यात विभागाने पूर्ण दक्षता घ्यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यात द्यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक २.१.७.५"सेन्टेज शुल्काची (Centage Charges) वसुली न करणे" - निरंक**

**परिच्छेद क्रमांक २.१.८ "प्रकल्पांचे निष्पादन"**

**अभिप्राय**

**१.३५** जलसंधारण विभाग, जलसंधारण महामंडळ व विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रमाद्वारे करण्यात आलेला खर्च मंजूर रक्कमेपेक्षा रु. १४४.८२ कोटीने जास्त आहे. तसेच महामंडळाअंतर्गत असलेले दोन प्रकल्प निधीच्या कमतरतेमुळे रद्द

करण्यात आले आणि पाच प्रकल्प जमीन संपादित न करणे, प्रकल्पामुळे बाधित व्यक्तीकडून प्रतिकार आणि निविदांना अंतिम स्वरुप न देणे इत्यादि कारणांमुळे सुरु करण्यात येऊ शकले नाही. प्रासंगिकपणे,पाच पैकी एका सुरु न झालेल्या प्रकल्पाकरिता अमरावती विभागाने भूसंपादन अधिका-याकडे रु. १.२९ कोटी रक्कम जमा केली जी सप्टेंबर २०१६ पर्यंत वायफळ पडून आहे. जलसंधारण महामंडळाअंतर्गत असलेले अंजनडोह साठवण तलाव, जि. औरंगाबाद व देवके ल.पा. तलाव, जि. रत्नागिरी हे प्रकल्प निधीच्या कमतरतेमुळे रद्द करण्यात आले व डोणवडा साठवण तलाव, जि. औरंगाबाद हा प्रकल्प शेतक-याचा विरोध असल्यामुळे सुरू झाला नाही. जलसंधारण विभागाअंतर्गत जांबतांडा साठवण तलाव, जि. जालना हा प्रकल्प लेखा परिक्षणाच्या वेळेस जमिन संपादित न करणे व प्रकल्पबाधित व्यक्तीकडून प्रतिकार यामुळे सुरू झालेला नव्हता. अमरावती विभागातील भानखेडा साठवण तलावास प्रशासकीय मान्यता रू. ६०२.८८ लक्ष दि.२९/०३/२०१२ नुसार प्राप्त आहे. प्रकल्पाच्या भुसंपादनाकरीता आगाऊ रक्कम रू. ११९.०० लक्ष भुसंपादन अधिका-याकडे जमा करण्यात आलेली आहे. सदर प्रकल्पास शेतक-यांनी विरोध दर्शविल्यामुळे प्रकल्प रद्द करण्याची कार्यवाही सुरू आहे. भूसंपादन अधिका-याकडे जमा असलेली रक्कम परत घेवून इतर प्रकल्पांकरीता वापरण्याचे प्रस्तावित असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले. प्रकल्पांची उपरोक्त वस्तुस्थिती पाहता प्रकल्पासंदर्भात कोणतेही नियोजन न केल्यामुळे या बाबी उद्‌भवलेल्या आहेत. प्रकल्पांना येणा-या सदरहु अडचणी या नियमित स्वरुपाच्या असून या सर्व बाबींचे नियोजन करुन त्यातून मार्ग काढण्याची पुर्णतः जबाबदारी विभागाची असतानाही हे प्रकल्प अमर्याद कालावधीकरिता प्रलंबित राहिले. कोणत्याही प्रकल्पांची अंमलबजावणी अशापध्दतीने होत असेल तर भविष्यात कोणतेही प्रकल्प विहित मुदतीत पुर्ण करणे विभागाला शक्य होणार नाही असे समितीचे स्पष्ट मत आहे.

**शिफारस :**

**१.३६ विभागाने प्रकल्पांना मंजूरी देतानाच प्रकल्प विहीत वेळेत पूर्ण होतील यासाठी नियोजन करावे व निधीच्या मर्यादेतच प्रकल्पांना मंजूरी द्यावी तसेच प्रकल्पासंदर्भातील सर्व परवानग्या तसेच भूसंपादन यासंदर्भातील मुलभूत कार्यवाही संदर्भात योग्य ते नियोजन करुनच प्रकल्प अंमलबजावणी संदर्भातील पुढील कार्यवाही करावी तसेच भूसंपादनाची कार्यवाही पुर्ण झाल्याशिवाय व प्रकल्पांसाठी आवश्यक जमीन ताब्यात आल्याशिवाय प्रकल्पाच्या निविदा काढल्या तरी कार्यारंभ आदेश देण्यात येऊ नये, जेणेकरुन भविष्यात अशा बाबींची पुनरावृत्ती टाळता येईल अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक २.१.८.१ "वेळेत झालेली वाढ"**

**अभिप्राय :**

**१.३७** राज्याच्या ग्रामविकास आणि जलसंधारण विभागाद्वारे वेळोवेळी प्रसिध्द करण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेप्रमाणे ठराविक लघुसिंचन प्रकल्प, बांधण्यात येणा-या सिंचन संरचनेच्या प्रकारानुसार सहा महिने ते तीन वर्षाच्या कालावधीत पूर्ण करावयास पाहिजे. परंतु जलसंधारण विभागाअंतर्गत असलेले १९ पैकी १६ प्रकल्पांना भूसंपादन न करणे,संकल्पचित्र /कामाच्या व्याप्तितील बदल,निधीची कमतरता, वनजमीनीच्या मंजुरी बाबत विलंब इत्यादि कारणांमुळे १९ वर्षापर्यंत विलंब झाला. तसेच महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाअंतर्गत असलेले ४४ पैकी ३५ प्रकल्पांना आणि विदर्भ सधन सिंचन विकास कार्यक्रमाअंतर्गत असलेले तीन पैकी एका प्रकल्पाला क्रमशः १८ वर्षापर्यंत आणि एक वर्षापर्यंत इतका विलंब झाला असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

**१.३८** या संदर्भात कामांची निविदा तयार करतांना, कामाच्या किंमतीनुसार व व्याप्तीनुसार प्रकल्पांच्या कामाचा कालावधी ६ महिने ते ५ वर्षापर्यंत निश्चित करण्यात येतो व त्याप्रमाणे कार्यारंभ आदेश देण्यात येतात. शेतक-यांचा भूसंपादनास विरोध, प्रलंबित न्यायालयीन प्रकरण, संकल्पचित्र वेळेत उपलब्ध न होणे, वनजमीनीचे हस्तांतरण, निधीची कमतरता यामुळे काही प्रकरणांत विहित कालावधीत प्रकल्प पूर्ण होत नाहीत असे विभागीय प्रतिनिधींनी समितीला सांगितले. या बाबींशी समिती सहमत होऊ शकत नाही. कारण प्रकल्प यशस्वीरित्या राबविणे म्हणजेच या सर्व बाबी व अडचणींचे यशस्वी नियोजन करणे हे होय. या सर्व बाबी म्हणजे प्रकल्पांच्या अंमलबजावणी अगोदर पुर्वतयारीचा भाग असतात. प्रकल्प सुरु झाल्यानंतर उपरोक्त नियमित स्वरुपाच्या अडचणींमुळे प्रकल्प अमर्याद कालावधीकरिता प्रलंबित राहणे याचाच अर्थ विभागाने या सर्व बाबींचे कोणतेही पुर्व नियोजन न करता राबविले असाच होतो.

**शिफारस :**

**१.३९ सदरहू परिच्छेदान्वये आक्षेपित बाबींसंदर्भात शेतक-यांचा भूसंपादनास विरोध, प्रलंबित न्यायालयीन प्रकरण, संकल्पचित्र वेळेत उपलब्ध न होणे, वनजमिनीचे हस्तांतरण, निधीची कमतरता अशा अनेक कारणांमुळे प्रकल्प विहित कालावधीत पुर्ण होत नाहीत हा विभागाचा खुलासा निश्चितच समर्थनिय नाही व त्याद्वारे विभाग प्रकल्पांचे सर्वेक्षण, नियोजन व अंमलबजावणी या सर्व आघाड्यांवर अपयशी ठरल्याचे दिसून येते. प्रकल्प यशस्वीरित्या हाताळण्यासाठी याच सर्व बाबींचे नियोजन योग्यरित्या करणे आवश्यक असताना त्यातच विभागाला अडचणी येत असतील तर यात निश्चितच नियोजनाचाच अभाव दिसून येतो. अतः विभागाने हाती घेतलेले प्रकल्प कालबध्द कार्यक्रम आखून पूर्ण करावेत व त्यासाठी आवश्यक असणा-या सर्व मुलभूत बाबींची पुर्तता व नियोजन करुनच त्याची अंमलबजावणी करावी व त्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक २.१.८.२ "किंमतीत झालेली वाढ"**

**अभिप्राय :**

**१.४०** भूसंपादनातील विलंब, आराखडा/कामाच्या व्याप्तितील बदल, निधीची कमतरता इत्यादींमुळे६६ प्रकल्पांपैकी ४४ प्रकल्पांच्या मूळ मंजूर किंमतीच्या वर रु.२०८.४६ कोटीने किंमतवाढ झाली असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहे. महालेखाकारांसमवेत निर्गमन परिषदेत विभागीय सचिवांनी ही वस्तुस्थिती मान्य केली व उपरोक्त कारणांस्तव भाववाढ निर्देशांक वाढल्यामुळे प्रकल्पांचे किंमतीत वाढ होत आहे. तसेच स्थानिक विरोध, न्यायालयीन प्रकरणे इत्यादिमुळेही प्रकल्प पूर्णत्वास विलंब होतो असे विभागाने समितीसमोर मान्य केले.

**शिफारस :**

**१.४१ प्रकल्पाचे नियोजन, अंमलबजावणी व निधी याचा ताळमेळ चुकला की प्रकल्पांच्या किंमतीमध्ये निश्चितच मोठ्या प्रमाणात वाढ होते. यासाठी वेळ, किंमतीतील वाढ आणि निरर्थक खर्च रोखण्याकरिता राज्य शासनाने सक्षम अधिका-याद्वारे पर्याप्त पर्यवेक्षण झाल्यानंतर आणि संकल्पचित्रास मंजूरी मिळाल्यानंतर प्रकल्पाची व्याप्ती आणि भुमीसंपादन/वनमंजूरी प्राप्त झाल्यानंतरच कामे सुरु करावीत, प्रकल्पांचे जास्तीत जास्त प्रमाणात शाश्वत नियोजन करावे तसेच यासाठी कंत्राट व्यवस्थापनप्रणाली सुध्दा भक्कम व पारदर्शक करण्यात यावी आणि कामाचे निष्पादन नियमपुस्तिका आणि कंत्राट अटीनुसार करावी व प्रकल्प विहित वेळेत पुर्ण करण्याचा प्रयत्न करुन प्रकल्पातील भाववाढ टाळावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक २.१.८.३ "प्रकल्पांचे अपूर्ण/निकृष्ट निष्पादन"**

**अभिप्राय :**

**१.४२** महाराष्ट्र लघु सिंचन नियमपुस्तिका,१९८३ नुसार लाभ क्षेत्राच्या ३३ टक्के भाग व्यापणा-या कालव्यांचे आणि वितरिकांचे काम,काट जलनिःसारणाच्या (cross drainage) कामासहित,सर्व बाबतीत पूर्ण झाल्यावरच लघू सिंचन तलावाचा गाभा भरावयाचे काम सुरु करावयास पाहिजे.तसेच निविदा शर्तीनूसार बांधकामाकरिता वापरण्यात येणा-या साहित्याची गुणवत्त्ता कंत्राटदाराद्वारे शासनमान्य प्रयोगशाळेतून तपासावयाची होती आणि शासकीय प्रयोगशाळेद्वारे निर्गमित करण्यात आलेले गुणवत्ता प्रमाणपत्र कंत्राटदाराच्या चालू लेखा देयकांसोबत जोडावयाचे होते.

**१.४३** परंतु निवडलेल्या ६६ पैकी ४७ प्रकल्पांच्या स्थळांच्या संयुक्त प्रत्यक्ष पाहणीत अपूर्ण प्रकल्प आणि कमकुवत कारागिरीची प्रकरणे निदर्शनास आली,ज्यावरुन निकृष्ट प्रतीचे काम झाल्याचे दिसून आले. ६६ पैकी ६५ प्रकल्पांमध्ये कंत्राटदाराने वापरलेले साहित्य योग्य गुणवत्तेचे होते याबाबतची तपासणी लेखापरीक्षा करु शकली नाही. याअनुषंगाने नमून्यादाखल गणेशपूर वाढोणा लघुसिंचन तलाव प्रकल्प, शिरवळ लघुसिंचन तलाव प्रकल्प, देवळे लघुसिंचन प्रकल्प, लावारी लघुसिंचन तलाव प्रकल्प इ. लक्ष वेधून घेणारी प्रकरणे महालेखाकारांनी चर्चीली असून यासंदर्भातील विस्तृत आक्षेप महालेखाकारांच्या अहवालात नमूद करण्यात आलेले आहेत. यात विशेषतः स्थानिकांचा विरोध व जमीन संपादीत न केल्यामुळे धरणाचे व कालव्याचे काम सुरु करण्यास विलंब होणे, विहित वेळेत कामाच्या पुर्णत्वाची खात्री करुन न घेणे, निधीची कमतरता, कामाच्या विलंबामुळे प्रकल्प किंमतीत झालेली वाढ, धरणाच्या कामांचा निकृष्ट दर्जा इत्यादी अनेक गंभीर आक्षेप महालेखाकारांनी या

प्रकल्पाबाबत नोंदविलेले आहे. कालव्याचे बांधकाम न केल्यामुळे आणि दगडी अस्तरीकरणाच्या अपूर्ण कामामूळे पूर्ण झालेल्या धरणाचा कोणताही प्रभावी उपयोग करता आला नाही, परिणामी सिंचन क्षमतेचे लक्ष्य साध्य झाले नाही आणि प्रकल्पाच्या एकंदरीत दिर्घायुषीपणा आणि उपयोगिता यावर प्रतिकूल परिणाम झाला. तथापि, कोट्यावधी रुपयांचा खर्च करुनही हे प्रकल्प लाभार्थ्यांकरिता १०१ हेक्टर उद्दिष्टीत सिंचन क्षमता निर्माण करु शकला नाही व खर्च निष्फळ ठरला. विभागाने कंत्राट कलमानुसार क्षति पोचलेल्या कामास कंत्राटदाराकडून त्याच्या स्वखर्चाने सुधारण्याऐवजी धरणातील गळती थांबविण्यासाठी कोट्यावधी रुपयांचे नवीन अंदाजपत्रक प्रस्तावित केले जे जलसंधारण महामंडळाने मंजूर न करणे.

**१.४४** देवळे लघु पाटबंधारे योजना ता. पोलादपूर जि. रायगड या योजनेसंदर्भातील गळतीबाबत अधीक्षक अभियंता, धरण सुरक्षितता संघटना, नाशिक यांच्या अहवालानुसार गळती प्रतिबंधक उपाययोजनेचे अंदाजपत्रक विभागाच्या वतीने सादर करण्यांत आले. या अंदाजपत्रकात मुख्यअंभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) पुणे यांचेमार्फत सदर दुरुस्तीचा खर्च कंत्राटदाराकडून वसुल करण्याच्या अटीचे अधीन राहून सर्वसाधारण मान्यता घेण्यांत आली. त्यासंदर्भात सदर रक्कम कंत्राटदाराकडून वसुल करण्यासाठी या विभागामार्फत जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखाली कंत्राटदाराची सुरक्षा अनामत आहे किंवा नाही याबाबत जलसंपदा विभागाशी पत्र व्यवहार करण्यांत आलेला आहे. तसेच संबधित अधिका-यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेल्या आहेत. सदर धरणाच्या दुरुस्तीचे कामापोटी आवश्यक रक्कम विशेष दुरूस्तीसाठी शासनाकडून प्राप्त करुन सदर दुरूस्तीचे काम पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले.

**१.४५** तसेच लावारी प्रकल्पाच्या बांधकामाची घळभरणी झालेनंतर सांडवा व विमोचकामधुन मोठया प्रमाणावर गळती होत असल्याचे आढळुन आल्यानंतर कंत्राटदाराला दंडात्मक कारवाईबाबत नोटीस बजाविण्यात आली आहे. तसेच तत्कालीन जबाबदार अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आलेली आहे. सांडवा व विमोचकाचे दुरुस्ती कामाचे अंदाजपत्रकास मंजूरी घेऊन विशेष दुरूस्तीसाठी शासनाकडून निधी प्राप्त करून घेण्याचे प्रस्तावित आहे त्याचप्रमाणे कालव्याचे उर्वरीत भागाचे भुसंपादनाचा विरोध मावळल्यामुळे उर्वरीत भुसंपादन प्रक्रीया पुर्ण करुन उर्वरीत कामाचे अंदाजपत्रकास मंजूरी प्राप्त होताच काम पुर्णत्वास नेण्यात येईल असे समितीसमोर सांगण्यात आले.

**१.४६** यासंदर्भात समितीने साक्ष घेतली असता या विभागाच्या कार्यपध्दतीबाबत समितीने गंभीर नापसंती व्यक्त केली. विभाग प्रकल्पाचे व निधीचे एवढे मोठे नियोजन करते. परंतु त्याच्या उद्दिष्टपुर्तीसाठी अनेक मुलभूत अडचणी आल्यामुळे ही कामे पुर्ण होत नाहीत. प्रकल्पाच्या अंमलबजावणीची ही सर्व प्रक्रिया अत्यंत वेळखाऊ, मोठी व किचकट आहे हे समितीला मान्यच आहे. परंतु त्याप्रमाणेच विभागाचे नियोजन असणे आवश्यक असताना त्याचा मात्र अभाव मोठ्या प्रमाणात दिसून येतो. कंत्राटदारांनी केलेल्या कामांमध्ये कामांची गुणवत्ता ठेवण्यात न येणे, कंत्राटदारांनी गुणवत्ता नियंत्रण प्रमाणपत्रे सादर न करणे, चाचणी प्रमाणपत्र न घेता व कामांची गुणवत्ता न तपासता धरणाचा वापर करण्यात येणे व गुणवत्ता नियंत्रण प्रमाणपत्राशिवाय कंत्राटदारांची देयके प्रदान करण्यात येणे, उपयोगीता प्रमाणपत्र सादर न करणे इत्यादी अनेक गंभीर अनियमिततेबाबत महालेखाकारांनी आक्षेप नोंदविलेले आहेत. वास्तविकतः ही कामे कित्येक वर्षाअगोदर पुर्ण होणे अपेक्षित असताना इतक्या अमर्याद विलंबाने देखील प्रकल्प पुर्ण क्षमतेने कार्यान्वीत न होऊ शकल्यामुळे खर्च व प्रकल्प निरुपयोगी व निष्फळ ठरला आहे. त्यातच कालव्यांचीही कामे न झाल्यामुळे सिंचन क्षमता नगण्य आहे. या सर्व बाबी अत्यंत आक्षेपार्ह असून यास पुर्णपणे विभागाच्या अधिका-यांचा निष्काळजीपणा व बेजबाबदारपणा कारणीभूत आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे.

**शिफारस :**

**१.४७ सदरहु परिच्छेदांतर्गत नोंदविलेले आक्षेप हे अत्यंत गंभीर स्वरुपाचे असून प्रकल्पाचे अपुर्ण व निकृष्ट निष्पादन दर्शविणारे आहे. यास पुर्णपणे विभागाचा निष्काळजीपणा व बेजबाबदारपणा कारणीभूत असल्याचे समितीचे स्पष्ट मत आहे. प्रकल्पाच्या कामावर अधिका-यांचे कोणतेही नियंत्रण व देखरेख नसल्यामुळे कंत्राटदाराकडून कामांची गुणवत्ता राखली गेली नाही. परिणामी निष्कृष्ट दर्जाची कामे होऊन त्या धरणांना व कालव्यांना मोठ्या प्रमाणात गळती सुरु झाली. ही कामे पुर्ण होऊन कित्येक वर्षे झालेली असताना आजतागायत हे प्रकल्प कार्यान्वित न होऊ शकल्यामुळे केलेली कामे निरुपयोगी ठरली व झालेला खर्चही निष्फळ ठरला व प्रकल्पाची सिंचन क्षमता नगण्य राहिली व जास्तीत जास्त जमीन ओलीताखाली आणण्याचे उद्दिष्ट विभागाला गाठता आले नाही व शेतक-यांना या प्रकल्पांचा लाभ घेता आला नाही. या सर्व बाबी अत्यंत आक्षेपार्ह व गंभीर असून यासाठी झालेला खर्च आता निष्फळ तर ठरलाच आहे परंतु ही सर्व दुरुस्तीची कामे करण्यासाठी मोठ्या प्रमाणात अधिकच्या निधीची आवश्यकता भासणार आहे. वास्तविकतः महालेखाकारांनी इतके गंभीर आक्षेप नोंदविल्यानंतर विभागाने**

**स्वतःहून या सर्व प्रकरणी कंत्राटदारावर व अधिका-यांवर कारवाई करुन समितीसमोर येणे अभिप्रेत, अपेक्षित व आवश्यक असताना विभागीय प्रतिनिधींनी संबंधितांना केवळ नोटीस देण्यापलिकडे कोणतीही कारवाई केली नाही ही देखील गंभीर व आक्षेपार्ह बाब आहे. विभाग या प्रकरणी संबंधितांवर कारवाई करण्यास तत्पर वा इच्छूक नाही असे समितीला वाटते. अतः या संपुर्ण प्रकरणी जबाबदार असणा-या अधिका-यांवर विभागाने कारवाई करावी. तसेच कंत्राटदारांवरदेखील कारवाई करावी. कंत्राटदारांकडून घेणे आवश्यक असलेली सर्व प्रमाणपत्रे प्राप्त करुन घ्यावी. निकृष्ट वा गळतीच्या कामांची पुर्तता कंत्राटदारांकडून त्याच्या खर्चाने करुन घेण्यात यावी व या कंत्राटदारांवर दंडात्मक कारवाई करुन त्यांचा समावेश कंपनीच्या व संचालकांच्या नावासह काळ्या यादीत समाविष्ट करण्यात यावा. त्याचप्रमाणे या सर्व लघुसिंचन प्रकल्पांच्या दुरुस्तीची व गळतीची कामे तात्काळ पुर्ण करुन घेऊन त्याचा पुर्ण क्षमतेने वापर करण्यात यावा. कालव्याच्या भूसंपादनाला ज्याठिकाणी विरोध आहे तिथे विभागाने आता जमीनीखालून पाईपद्वारे पाणी पुरवठा करण्याचे जे नविन धोरण स्वीकारलेले आहे. त्याअनुषंगाने आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यात यावी व या सर्व प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक २.१.८.४ "शासकीय निर्देश आणि कंत्राट अटींचे अनुपालन न करणे"**

**अभिप्राय :**

**१.४८** सदरहु परिच्छेदान्वये प्रकल्प संपत्तीकरिता विमा क्षतितारण न घेणे, सुधारीत प्रशासकीय मान्यता न घेता खर्च करणे, स्वामित्व धनावर गैरवाजवी वाढ करणे तसेच नियम पुस्तिका प्रावधान, कंत्राट अटी आणि वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय/परिपत्रके इत्यादींचे अनुपालन न करणे असे अनेक आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नोंदविलेले आहेत.

**१.४९** कंत्राटदारांनी सक्तीने फक्त विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कडून एकूण कंत्राट मुल्य आणि संपूर्ण कंत्राट कालावधीकरिता, दिलेल्या कंत्राट कामांच्या निष्पादनासाठी पुरेशी विमा क्षतितारण क्षमता पुरविण्याकरिता, आवश्यक विमा पॉलिसी काढायला पाहिजे. ज्या प्रकरणात कंत्राटदार पॉलिसी काढणार नाही अशा प्रकरणांत त्यांच्या कडून (विम्याची रक्कम म्हणून ) कंत्राट किंमतीच्या एक टक्का इतकी रक्कम वसूल करून विमा संचालनालयाकडे पाठविली पाहिजे. परंतु अनेक प्रकरणांमध्ये कंत्राटदाराने कोणतीही विमा पॉलीसी काढली नाही तसेच संबंधित विभागाने सुध्दा कंत्राट किंमतीच्या (रु. ६५ लक्ष ) एक टक्का इतकी रक्कम कंत्राटदाराला देय असलेल्या देयकामधून वसूल केली नाही. तसेच महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका,१९८४ नुसार जर खर्च प्रशासकीय मान्यतेपेक्षा, १० टक्क्याने किंवा रु.१ कोटीने, यापैकी जे कमी असेल, जास्त झाला असेल तर, अशा प्रकरणात सुधारित प्रशासकीय मान्यता घेण्यात यावी आणि त्यापेक्षा अधिक रक्कम सक्षम अधिका-यांच्या संमती शिवाय मान्य करण्यात येऊ नये. तरीही १० प्रकल्पांमध्ये कार्यकारी विभागाद्वारे प्रशासकीय मान्यता प्राप्त रक्कम (रु. १०९.९९ कोटी ) अधिक १० टक्के याउपर रु ४.९० कोटी सक्षम अधिका-यांच्या मान्यतेशिवाय खर्च करण्यात आले. तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यातील करूळ जामदारवाडी लघु सिंचन तलाव प्रकल्प ४८ महिन्यांच्या कालावधीत पूर्ण करण्याकरिता रु. १४.६९ कोटी किंमतीत बहाल करण्यात आला.

**१.५०** मुख्य अभियंता, लघुसिंचन प्रकल्प,पुणे याद्वारे तयार करण्यात आलेल्या प्रारुप निविदेच्या कलम ३६ (जो राज्यात सामाईकपणे लागू होता.) मध्ये कंत्राटाद्वारे राज्य शासनाला देय असलेल्या स्वामित्वधनाच्या रक्कमेवर वाढ करण्याची तरतूद नाही. तथापि, निविदा अंतिम करण्यासाठी घेण्यात आलेल्या बोली-पूर्व बैठकीत कंत्राटदारांच्या अटींमध्ये अंतर्भूत करण्यात आली. परिणामी, ज्या कंत्राटदारास लघु सिंचन तलाव प्रकल्प बहाल करण्यात आला होता त्या कंत्राटदारास रु.३२.७७ लक्षाचा गैरवाजवी लाभ झाला असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

**१.५१** यासंदर्भात साक्षीदरम्यान सदरहु विषय हा धरणाच्या सुरक्षिततेसंदर्भातील असून प्रकल्पाचा विमा काढणे आवश्यक असताना त्याची अंमलबजावणी झाली नाही. धरणास काही अपरिहार्य वा नैसर्गिक आपत्तीकालात काही अपघात झाल्यास शासनाला त्याची सुरक्षितता मिळावी म्हणून हा विमा करण्याची अथवा त्याअनुषंगाने रक्कम वसूल करण्याची जबाबदारी विभागाची असते.

**१.५२** तरीही हा विमा काढण्याकडे विभागाचे दुर्लक्ष झाले आहे. विहीत कालावधीमध्ये विम्याचे पैसे विमा कंपनीकडे भरुन विमा काढण्याची काळजी घेण्यात यावी असे समितीने सुचित केले असता विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली. तसेच विमा पॉलिसी सादर न केलेल्या कंत्राटदाराकडून १% रक्कम वसूल करण्यात आलेली आहे.सुधारित प्रशासकीय

मान्यतासंदर्भात ४ अधिका-यांना नोटीस देण्यात आली असून ३८ नुसार चौकशी करण्यात आली होती त्याच वेळी सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे. फलनिष्पत्ती लेखा परिक्षण (Performance Audit) झाल्यानंतर करूळ जमादारवाडी लघु सिंचन योजनेचे देयक अदा करण्यात आलेले नाही. तथापि कंत्राटदाराच्या पुढील देयकामधून सदर रक्कम वसूल करण्यात येईल. महालेखाकार यांनी १० प्रकल्पांवरील खर्च सक्षम अधिका-यांच्या मान्यतेशिवाय करण्यात आला आहे, उक्त प्रकरणी ज्यावेळी चौकशी करण्यात आली त्यावेळी ४ ठिकाणी सदरहू बाब आढळून आली आहे असे विभागीय सचिवांनी समितीसमोर सांगितले.

**१.५३** त्याचप्रमाणे स्वामित्व धनावर गैरवाजवी वाढीसंदर्भात ३२.७७ लक्ष रुपये रक्कम कधी वसूल करण्यात येणार आहे अशी विचारणा समितीने केली असता वैभववाडी तलावाच्या मूळ निविदेमध्ये असलेल्या ३६ क्रमांकाच्या कलमान्वये कंत्राटदाराकडून वसुलीची ३२.७७ लाख रुपयांची रक्कम देय होत नाही असा खुलासा विभागीय सचिवांनी समितीसमोर केला.

**१.५४** यावर समितीने आक्षेप नोंदवित सदरहु आक्षेपाबाबत महालेखाकारांसमवेत झालेल्या निर्गमन परिषदेत विभागाच्या सचिवांनी हे आक्षेप मान्य केले व ही संपुर्ण रक्कम कंत्राटदाराच्या पुढील चालु लेखा देयकामधून वसूल करण्याचेही मान्य केले. परंतु आता साक्षीदरम्यान मात्र विभागीय प्रतिनिधींनी आपली परस्पर विपरित भूमिका मांडली असे आक्षेप समितीने घेतले असता या प्रकरणी विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेण्यात येतील असे समितीसमोर सांगण्यात आले.

**शिफारस :**

**१.५५ शासकीय निर्देश आणि कंत्राट अटींचे अनुपालन न करणे तसेच नियम पुस्तिका प्रावधान, वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय इत्यादींचे अनुपालन न करणे, प्रकल्प संपत्तीकरिता विमा क्षतितारण न करणे, प्रकल्पांची सुधारीत प्रशासकीय मान्यता न घेता अधिकचा खर्च करणे, स्वामित्व धनावर गैरवाजवी वाढ असे अनेक गंभीर आक्षेप सदरहु परिच्छेदान्वये महालेखाकारांनी नोंदविलेले आहेत. विभागाने प्रकल्प संपत्तीकरिता विमा काढणे अथवा १ टक्का रक्कम वसूल करणे या तरतूदीची तंतोतंत अंमलबजावणी करावी. तसेच यास जबाबदार असणा-या अधिका-यांवर कारवाई करण्यात यावी व भविष्यात अशा आक्षेपांची पुनरावृत्ती टाळावी. तसेच सुधारीत प्रशासकीय मान्यता न घेता खर्च करणे संदर्भातील वस्तुस्थिती विभागाने मान्य केली व संबंधित अधिका-यांना नोटीस देण्यात आल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. या प्रकरणी संबधितांवर विभागाने तात्काळ कारवाई करावी व भविष्यात अशा बाबींची पुनरावृत्ती टाळावी. तसेच स्वामित्व धनावर गैरवाजवी वाढ यासंदर्भातील आक्षेप महालेखाकार यांच्या समवेत झालेल्या निर्गमन परिषदेत विभागीय सचिवांनी मान्य केले व ही रक्कम कंत्राटदाराकडून वसूल करण्यास सहमती दर्शविली. परंतु साक्षीदरम्यान मात्र विभागीय प्रतिनिधी याचे समर्थन करीत असून कंत्राटादाराकडून वसुलीची रक्कम देय नाही अशी विपरीत भूमिका समितीसमोर मांडतात. विभागाच्या प्रतिनिधींची भूमिका ही परस्परविरोधी व विसंगत आहे. त्यामुळे सदरहु आक्षेपासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घ्यावेत व त्यानंतर यासंदर्भात महालेखाकारांसमवेत समन्वय साधून याप्रकरणी सहमतीने निष्कर्षाप्रत यावे व समितीस याबाबत माहिती देण्यात यावी व वसुलीसंदर्भात आवश्यक ती पुढील कारवाई करण्यात यावी व या सर्व प्रकरणी विभागाने केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक २.१.८.५ 'निरर्थक खर्च'**

**अभिप्राय :**

**१.५६** मोढा कोल्हापूर पध्दती बंधारा क्र.२ प्रकल्प व भालगाव कोल्हापूर पध्दतीचे बंधारा प्रकल्प या दोन प्रकल्पांमध्ये बांधकामातील उणीवांमुळे आणि अनावश्यक बाबींच्या निष्पादनामुळे विभागाने रु.४.४७ कोटीचा निरर्थक खर्च केला.रु.२.६० कोटी खर्च करुन निर्माण केलेल्या औरंगाबाद जिल्ह्यातील मोढा के.टी बंधारा प्रकल्पाच्या अवर्धनक्षमतेबाबत उल्लेख केला आहे.या प्रकल्पासाठी रु.४.४६ कोटीची सुधारीत मान्यता देण्यात आली आणि हा प्रकल्प भौतिकदृष्ट्या पूर्ण झाला असून याद्वारे २३७ हेक्टर सिंचन क्षमतेची निर्मिती झाली व त्याचा वापर करण्यात आला. तरीही प्रकल्पाच्या बाजूच्या भिंती ( नदी किना-यांवरील दोन्ही बाजूंचे मातीकाम संरक्षित करण्याकरिता) नसल्यामुळे, खालच्या बाजूकडे दोन्ही बाजूंनी क्षतिग्रस्त मातीकाम, क्षतिग्रस्त नीडल्स आणि स्तंभ, यामुळे के.टी. बंधा-यामध्ये पाण्याचा साठा करता आला नाही असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहे.

**१.५७** तसेच औरंगाबाद जिल्ह्यातील भालगाव के.टी. बंधारा प्रकल्प रु.२.१३ कोटी किंमतीत मंजूर करण्यात आला आणि रु.१.४९ कोटी किंमतीत हे काम बहाल करण्यात आले. कामाच्या व्याप्तीतील बदलामुळे मंजूर किंमत रु.४.७० कोटी वर वाढविण्यात आली व हे काम रु.३.७६ कोटी किंमतीत पूर्ण करण्यात आले. यासाठी मंजूर केलेल्या अंदाजपत्रकात पाणी

साठविण्याकरिता माईल्ड स्टील (MS) नीडल्स चा समावेश करण्यात आला होता. तथापि माईल्ड स्टील नीडल्स मोठ्या प्रमाणात गंजतात आणि त्या बसवितांना व काढतांना त्रासदायक ठरतात म्हणुन राज्यातील सर्व के.टी. बंधारे प्रकल्पांच्या निष्पादनाकरिता माईल्ड स्टील नीडल्स ऐवजी फाइबर रिईन्फोर्सड प्लास्टिक नीडल्स वापरण्याच्या सूचना सर्व परिमंडळांना दिल्या.त्याप्रमाणे औरंगाबाद परिमंडळाने ह्या प्रकल्पाकरिता रु.२७.७० लक्ष किंमतीच्या फाइबर रिईन्फोर्सड प्लास्टिक नीडल्स वापरण्याची मंजूरी दिली. काम पूर्ण झाल्यावर विभागाच्या लक्षात आले की प्लावकातेमुळे (Buoyancy) FRP नीडल्स वर उचलल्या जात होत्या. त्यामुळे माईल्ड स्टील नीडल्स वापरुन काम पूनःनिष्पादित करण्याच्या सूचना दिल्या. अशाप्रकारे, K.T. बंधा-याकरिता FRP नीडल्स च्या तांत्रिक योग्यतेची खात्री न करता आणि त्यांचा या प्रकल्पाकरिता वापर केल्यामुळे रु.२७.७० लक्ष निरर्थक खर्च झाला असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहे.

मोढा कोल्हापूर बंधा-याबाबत लेखा आक्षेप याअगोदर सन २००८ मध्ये व आताही आलेला आहे.तरीही विभागाकडून सदरहू प्रकरणी कार्यवाही करण्यात आलेली नाही असे मत समितीने व्यक्त केले तसेच बंधा-यांच्या दुरुस्तीसाठी ३५७ कोटी रुपये निधीची आवश्यकता असून १७ कोटी रुपये निधी प्राप्त झाला आहे. निधी उपलब्ध झाल्यास तो उक्त बंधा-यांच्या दुरूस्तीसाठी प्राधान्याने उपलब्ध करुन देण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

**शिफारस :**

**१.५८ मोढा कोल्हापूर पध्दती बंधारा व औरंगाबाद येथील भालगाव के.टी.बंधारा प्रकल्पासंदर्भात प्रकल्पांमध्ये बांधकामातील उणिवांमुळे आणि अनावश्यक बाबींच्या निष्पादनामुळे तसेच बंधा-याची दुरुस्ती न केल्यामुळे कोट्यवधी रुपयांचा खर्च निरर्थक ठरला व हे बंधारे पुर्ण क्षमतेने वापरणे शक्य झाले नाही व स्थानिक शेतकरी सिंचनापासून वंचित राहिले. के.टी.बंधा-यांसाठी मान्यता देताना कोणत्याही तांत्रिक बाबींची शहानिशा न करता प्रकल्प मंजूर करुन काम देखील पूर्ण करणे परंतु काम पुर्ण झाल्यानंतर कामाची फलनिष्पत्ती न झाल्याचे निदर्शनास येणे. परिणामी लाखो रुपयांचा खर्च निष्फळ ठरणे या बाबी अतिशय गंभीर स्वरुपाच्या असून विभागाच्या एकूण कार्यपध्दतीवर प्रश्नचिन्ह उभे करणा-या आहेत. अशा अनियोजनबध्द कामामुळे व प्रकल्प पुर्ण झाल्यावर त्यात बदल केल्यामुळे खर्च केलेला निधी तर निरर्थक ठरतोच परंतु शेतकरी प्रकल्पाच्या सिंचित लाभापासून देखील वंचित राहतात. तसेच विभागाने प्रकल्पासाठी लागणा-या तांत्रिक बाबीचा पुर्ण अभ्यास करुनच हे प्रकल्प राबविणे आवश्यक होते. अतः या प्रकरणी विभागाने जबाबदारी निश्चित करुन संबंधितांवर आवश्यक ती कारवाई ३ महिन्यात करावी. तसेच भविष्यात प्रकल्पाचे काम विहीत वेळेत व नियोजित खर्चात पुर्ण होण्यासाठी विभागाने उद्दिष्ट ठरवून काम करावे. अन्यथा हाती घेतलेले काम व प्रत्यक्ष पुर्ण झालेले काम याचा मेळ कधीही लागणार नाही. एकीकडे बंधा-याच्या कामांसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी देऊन कामे करणे, परंतु दुरुस्ती कामांसाठी प्राधान्याने निधी न दिल्यामुळे बंधा-याचा उपयोग पुर्ण क्षमतेने करता येत नाही. अतः पंचवार्षिक /वार्षिक आराखडे तयार करुन आराखड्यातील कामे विहीत वेळेत पूर्ण होण्याचे उद्दिष्ट्ये विभागाने क्षेत्रीय कार्यालयास ठरवून द्यावीत व उद्दिष्टाप्रमाणे कार्यवाही होत असल्याबाबत खात्री करावी. तसेच उपरोक्त कोल्हापूरी बंधा-यांच्या दुरुस्तीसाठी आवश्यक तो निधी तातडीने व प्राधान्याने उपलब्ध करुन द्यावा व दुरुस्तीची कामे पुर्ण करुन बंधा-याचा वापर पुर्ण क्षमतेने करावा व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक २.१.९ 'प्रकल्पांचे कार्यचालन आणि देखभाल'**

**अभिप्राय :**

**१.५९** जलसंधारण विभागाच्या विद्यमान मार्गदर्शक सूचनांनुसार पूर्ण झालेले सर्व लघुसिंचनप्रकल्प कार्यचालन आणि देखभालीकरिता पाणी वापर संस्थेकडे सोपविण्यात आले पाहिजे. प्रकल्प हस्तांतरीत करेपर्यंत प्रकल्पांच्या कार्यचलन व देखभालीकरिता संबंधित विभाग जबाबदार असेल. परंतु पूर्ण झालेल्या १८ प्रकल्पांपैकी फक्त आठ प्रकल्पांमध्ये पाणी वापर संस्थेची स्थापना झालेली आहे. पाणी वापर संस्थेने धरण आणि कालवा संरचनेमधील गळती /हानी के.टी. बंधा-यांची पाणी साठवून ठेवण्यात अक्षमता इत्यादि कारणांमुळे उर्वरित सहा प्रकल्प हाती घेण्यात आले नाही. उर्वरित १० पूर्ण झालेल्या प्रकल्पांमध्ये संबंधित विभाग पाणी वापर संस्था स्थापित करु शकले नाही. संस्थेद्वारे स्वीकारण्यात न आलेल्या पूर्ण झालेल्या १६ प्रकल्पांच्या कार्यचालन व देखभालीची जबाबदारी संबंधित विभागाकडे होती. तथापि राज्य शासनाद्वारे कार्यचालन व देखभालीकरिता मिळणा-या निधीचा उपयोग न केल्यामुळे विभाग या सिंचन प्रकल्पांची योग्य प्रकारे निगा राखू शकले नाही. परिणामी, पूर्ण झालेल्या १६ प्रकल्पांपैकी सात प्रकल्पांमध्ये निर्माण केलेल्या सिंचन क्षमतेचा त्याच्या पूर्णत्वापासून योग्यरित्या उपयोग करण्यात आला नाही असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहे.

**१.६०** यासंदर्भात विभागाकडून सांगण्यात आले की, जलसंधारण विभागाकडे सिंचन व्यवस्थापनासाठी स्वतंत्र यंत्रणा नाही. त्यामुळे प्रकल्पांचे कार्य चालन आणि देखभाल व दुरुस्ती कामात अडचणी आहेत. सद्यःस्थितीत जलसंधारण विभागाने १८ पैकी केवळ ८ प्रकल्प पूर्ण केले आहेत व पाणी वापर संस्थेने केवळ २ प्रकल्प कार्यान्वित केले आहेत, ६ प्रकल्प कार्यान्वित नाहीत. त्यामुळे प्रकल्पाची दुरुस्ती देखभाल व पाणी वापर वसुलीची कार्यवाही विभागाला करता आली नाही. सद्यःस्थितीत असे सर्व प्रकल्प पाणी वापर संस्थांना हस्तांतरीत करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत असे विभागीय सचिवांनी समितीला अवगत केले.

**शिफारस :**

**१.६१ प्रकल्प तयार करण्यापासून तर कामाच्या पूर्णत्वापर्यंत तसेच त्याची देखभाल व दुरुस्तीसाठी विभागाने व्यवस्था निर्माण केलेली आहे. परंतु त्याची अंमलबजावणी विहित पध्दतीने न झाल्यामुळे प्रकल्पाचा वापर पूर्ण क्षमतेने करता आला नाही. तोपर्यंत ही जबाबदारी विभागाला पार पाडणे आवश्यक ठरते. अशा परिस्थीतीत यासाठी आवश्यक त्या विहित पध्दतीचे अनुपालन विभागाने न केल्यामुळे प्रकल्पाची देखभाल दुरुस्ती प्रलंबित राहिली. अतः याबाबत आढावा घेऊन प्रलंबित प्रकल्पांची प्रकल्प हस्तांतरणाची कार्यवाही आवश्यक दुरुस्ती करुन लवकरात लवकर करावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक २.१.१० 'प्रकल्पांचे संनियंत्रण'**

**अभिप्राय :**

**१.६२** शासन निर्णयाप्रमाणे पूर्ण झालेल्या कामांचे पावसाळ्यापुर्वी व पावसाळ्यानंतर निरीक्षण करणे बंधनकारक आहे. तसेच सुरु असलेल्या प्रकल्पांच्या गुणवत्तेची आणि समयोचिततेची खात्री करण्याकरिता प्रकल्पांच्या निरीक्षणाचे मानदंड सुध्दा विर्निदिष्ट केले आहेत. निष्पादित करण्यात येणा-या कामांची गुणवत्ता, विलंब झाला असल्यास त्याची कारणे आणि आवश्यक मानण्यात आलेल्या इतर बाबी दर्शविणारी निरीक्षण टिप्पणी सुध्दा शिफारसींसहित तयार करावयाची असते. तरीही विभागाने याची अंमलबजावणी केली नाही. त्यामुळे प्रकल्पांचे विविध स्तरावर नियमीतपणे परिणामकारकरितीने आणि कार्यक्षमतापुर्वक संनियत्रण करण्यात आले नाही असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहे.

**शिफारस :**

**१.६३ प्रकल्पांचे संनियंत्रण करण्यासाठी विहित मानके व मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी ज्या अधिका-यांनी केली नाही त्यांचेवर योग्य ती कारवाई करण्यात यावी. प्रकल्पाचे संनियंत्रण समयोचित आणि विहीत मापदंडाप्रमाणे होण्यासाठी अथवा त्याचा तपशिल योग्यरित्या नमूद करण्यासाठी कार्यपध्दती निश्चित करण्यात यावी. तसेच हे अहवाल व निरिक्षणे चुकीच्या पध्दतीने होऊ नये अथवा ते अधिक पारदर्शक व वस्तुस्थितीदर्शक असावे यासाठी असे अहवाल तयार करण्याचे सोपे, सुटसुटीत व सर्वसमावेशक नमुने तयार करण्यात यावेत. चेकलिस्ट तयार करुन प्रकल्पाची अंमलबजावणी करावी व भविष्यात अशा बाबींची पुनरावृत्ती टाळून प्रकल्पांचे संनियंत्रण अधिक प्रभावी पध्दतीने करावे व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात सादर करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक २.१.११ 'प्रभाव निर्धारण'**

**परिच्छेद क्रमांक २.१.११.१ 'सिंचन क्षमतेच्या निर्मितीतील तूट'**

**अभिप्राय :**

**१.६४** प्रकल्पांमध्ये सिंचन क्षमता निर्मित झाली. परंतु सिंचन क्षमतेच्या (IP) निर्मितीतील तूट अभिप्रेत असलेल्या सिंचन क्षमता निर्मितीच्या तुलनेत प्रत्यक्ष निर्मित सिंचन क्षमतेत ४६ ते ६८ टक्के तूट होती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहे.

**१.६५** जलसंधारण विभागाची सिंचन व्यवस्थापनासाठी स्वतंत्र आस्थापना नाही. पाणी वापर संस्था स्थापन करून लोकसहभागाच्या माध्यमातून सदरची तूट भरून काढणेसाठीचे प्रयत्न सुरू आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले.

**शिफारस :**

**१.६६ विभागाने केलेल्या प्रकल्पांमध्ये प्रभाव निर्धारण करताना सिंचन क्षमतेच्या निर्मितीत मोठ्या प्रमाणात तूट असल्याचे आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेले असून अपेक्षित सिंचन क्षमता निर्मित झाली नाही ही वस्तुस्थिती आहे. यासाठी अपुरा कर्मचारी वर्ग, निधी व संनियंत्रणाचा अभाव, उपलब्ध निधीचे योग्य नियोजन न करणे या सर्व मुलभूत बाबी कारणीभूत आहेत, या सर्व बाबींसाठी अद्यापही जलसंधारण विभाग जलसंपदा विभागावर अवलंबून आहे. लघुसिंचन प्रकल्पांसाठी जलसंधारण विभागाला स्वतंत्र यंत्रणा व व्यवस्था उपलब्ध करुन देण्यात यावी. प्रकल्पाला देण्यात आलेला निधी संपूर्णतः खर्च होतो मात्र सिंचत क्षमता पूर्णपणे निर्मित होत नाही ही बाब निश्चितच गंभीर आहे. त्याचप्रमाणे कामांची गुणवत्ता व दर्जा देखील सुधारण्याची आवश्यकता आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे. आता विभागाने जलशिवार योजनेची कामेदेखील सुरु केली आहे. त्या माध्यमातून देखील या प्रकल्पांचे काम होणे शक्य आहे काय, या पर्यायांचा देखील विभागाने विचार करुन त्याची अंमलबजावणी करावी. विभागाने उद्दिष्टाप्रमाणे सिंचनक्षमता निर्मितीसाठी कालबध्द कार्यक्रम आखून योग्य नियोजन करावे व त्याप्रमाणे अंमलबजावणी करावी. तसेच प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण होण्यापूर्वीच पाणीवापर संस्था गठीत करण्याची कार्यवाही करावी जेणेकरुन पूर्ण झालेला प्रकल्प नियमित कार्यचलन आणि देखभालीकरिता या संस्थांकडे हस्तांतरित करण्यात येतील व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात द्यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक २.१.११.२ 'निर्मित सिंचन क्षमतेचा कमी वापर'**

**अभिप्राय :**

**१.६७** निर्मित सिंचन क्षमतेच्या तुलनेत वापरण्यात आलेली सिंचन क्षमता खूपच कमी म्हणजे १९ ते २८ टक्क्या दरम्यान होती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहे. यासंदर्भात ब-याच योजना ह्या अप्रत्यक्ष सिंचन योजना आहेत ज्यांच्या वापराचे मूल्यांकन करता येऊ शकत नाही. तसेच, मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे प्रत्यक्ष वापरण्यात आलेल्या सिंचन क्षमतेची मोजणी करता आली नाही. जलसंधारण विभागाकडे सिंचन व्यवस्थापनासाठी स्वतंत्र यंत्रणा नाही. त्यामुळे अशा प्रकल्पावर पाणी वापर संस्था स्थापन करून देखभालीसाठी त्यांच्याकडे हस्तांतरीत करण्यात येतील. सद्यःस्थितीत पूर्ण झालेल्या योजनांबाबत शासन निर्णय दि. २/२/२०१२ नुसार कार्यवाही करण्यात येते असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

**शिफारस :**

**१.६८ विभागाने केलेल्या प्रकल्पामध्ये निर्मित सिंचन क्षमतेचा कमी वापर झाला असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहे. या आक्षेपाबाबत विभागाने नमूद केलेली कारणमिमांसा काही अंशी वस्तुस्थितीदर्शक असली तरी निश्चितच समर्थनीय नाही. कारण उत्पन्न होणारी अभिप्रेत सिंचन क्षमता मोजता येऊ शकत होती (हेक्टरमध्ये) आणि म्हणूनच त्याद्वारे लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ पुरविणे अपेक्षित होते. तीन प्रकल्पांपैकी दोन रद्द करण्यात आले आणि पाझर तलावाच्या फक्त एका प्रकल्पाद्वारे (रत्नागिरी जिल्हातील कुरंग) भूजल पातळीमध्ये पुनर्भरण करुन लाभार्थ्यांना अप्रत्यक्ष लाभ पुरविणे अपेक्षित होते. विभागाने त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही. अतः विभागाने भविष्यात निर्मित सिंचन क्षमतेचा अधिकाधिक व प्रभावी वापर करावा व यासाठी आवश्यक ती व्यवस्था व यंत्रणा निर्माण करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक २.१.११.३ 'पाणी पट्टीची वसुली '**

**अभिप्राय :**

**१.६९** विभागाने ३३ पैकी २० प्रकल्पांमध्ये निर्मित झालेल्या सिंचन क्षमतेच्या फक्त १९ ते २८ टक्के इतकीच सिंचन क्षमता वापरात आणल्या गेली. तथापि, २० पैकी फक्त १० प्रकल्पांमध्येच पाणी पट्टी आकारण्यात आली (रु.१३.२५ लक्ष),परंतू त्यांची वसुली अत्यल्प (रु.१.७५ लक्ष) होती. विभागाद्वारे उर्वरित १० प्रकल्पांमध्ये पाणी पट्टीच्या वसुलीची मागणी करण्यात आली नाही.

**१.७०** विभागीय तपासणीअभावी आणि पाणी वापर संस्थांमार्फत सामुहिक मालकी नसल्यामुळे कोणतीही पाणी पट्टी न भरता, पाणी साठविलेल्या क्षेत्रांमधून पाण्याची चोरी होत होती. नऊ प्रकल्प स्थळांच्या संयुक्त प्रत्यक्ष पाहणीत बेकायदेशीर पध्दतीने (पाईप्स, पंप्स, पाणी टँकर्स इत्यादी) पाण्याची निर्गमित होत असल्याचे आढळले. दोन प्रकल्पांचे छायाचित्र,ज्यात पाण्याचे सायफनिंग होत असल्याचे दिसून आले असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले.

**१.७१** या संदर्भात जलसंधारण विभागाकडे सिंचन व्यवस्थापनासाठी स्वतंत्र यंत्रणा नाही. त्यामुळे अशा प्रकल्पावर पाणी वापर संस्था स्थापन करून देखभालीसाठी त्यांच्याकडे हस्तांतरीत करण्यात येतील, पाणीपट्टीची आकारणी करून वसुली वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील असे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले.

शिफारस :

१.७२ पाणीपट्टी आकारणी आणि वसुली महाराष्ट्र सिंचन अधिनियम (MIA) १९७६, आणि महाराष्ट्र जलसंपदा नियमन प्राधिकरण (MWRRA) अधिनियम, २००५ द्वारे करण्यात येते. सिंचन प्रयोजनाकरिता प्रति हेक्टर पाणीपट्टी ही पाणी वापर संस्थांना पुरविण्यात येणा-या परिमाणावर आधारित पाण्याव्यतिरिक्त, हंगामी पिकांच्या स्वरूपाच्या आधारावर वेळोवेळी आकारण्यात येते. राज्य शासनाने खात्री करावी की, प्रकल्प बांधकाम करते वेळीच पाणी वापर संस्था गठित करण्यात आल्या आहेत, जेणे करून पूर्ण झालेले प्रकल्प नियमित कार्यचालन आणि देखभालीकरिता त्यांच्याकडे हस्तांतरित करता येतील, अभियंत्याद्वारे प्रकल्पांचे संनियंत्रण समयोचित आणि विहित मापदंडाप्रमाणे होत आहे, जेणे करुन विभागाला यथायोग्य सूधारात्मक उपाययोजना करता येतील, प्रकल्पांच्या लाभक्षेत्रातील कालव्यांचे आणि वितरिकांचे काम लवकर पूर्ण करून आणि निर्मित मालमत्तेचे नियमित परिरक्षण करून निर्माण केलेल्या आणि वापरण्यात आलेल्या सिंचन क्षमतेमधील अंतर भरून निघेल व त्यानंतर पाणीपट्टीची आकारणी व वसुली प्रभावीपणे करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

सर्वसाधारण शिफारस :

१.७३ महाराष्ट्र राज्य हे देशातील तिस-या क्रमांकाचे मोठे राज्य आहे, जेथे ५८ टक्के जनता त्यांच्या उपजिविकेकरिता शेती वर अवलंबून आहे. आर्थिक सर्वेक्षणानुसार राज्यातील संपूर्ण जमीन वापराच्या स्वरुपानुसार राज्यात जवळजवळ २३४ लक्ष हेक्टर जमीन शेती योग्य आहे,जी एकूण भौगोलिक क्षेत्राच्या ७६ टक्के आहे. तरीही राज्यातील शेती योग्य जमिनीच्या फक्त २७.७३ टक्के जमीन ओलिताखाली आहे आणि उर्वरित १६९.०९ लक्ष हेक्टर जमीन पावसावर अवलंबून आहे. अशा परिस्थितीत मोठ्या किंवा मध्यम सिंचन प्रकल्पाद्वारे अशी जमिन सिंचित करता येऊ शकत नाही, अशा जमिनीच्या लहान तुकड्यांच्या सिंचनासाठी लघुसिंचन प्रकल्पाची भूमिका महत्वाची असते. २५० हेक्टरपर्यंत सिंचन क्षमता असलेले प्रकल्प लघुसिंचन प्रकल्पांतर्गत घेण्यात येतात व त्यांचे कार्यान्वयन आणि व्यवस्थापन महाराष्ट्र शासनाच्या जलसंधारण विभागाद्वारे करण्यात येते. पाणी एक मौल्यवान नैसर्गिक स्त्रोत असल्यामुळे त्याचा कार्यक्षम आणि प्रभावी विनियोग करण्याकरिता राज्यासाठी एक एकात्मिक दीर्घकालीन योजना असण्याची निकड महाराष्ट्र जल आणि सिंचन आयोगाने योग्य प्रकारे ओळखली (सप्टेंबर १९९९) अशा प्रकारची एकात्मिक योजना राज्याच्या समतोल विकासाची खात्री देते आणि पाण्याच्या विविध वापरकर्त्यांच्या गरजा सुध्दा पूर्ण करते. अशा परिस्थितीत लघु सिंचन प्रकल्पांचे नियोजन मागणीनुसार होते आणि ते सुसाध्य आहे काय, याबाबतचा सखोल अभ्यास केल्यानंतर ते हाती घेण्यात आले किंवा कसे, निधीचे प्रदान आणि वापर यासाठी योग्य वित्तीय व्यवस्थापन व्यवहारांचे पालन करण्यात आले किंवा कसे, लघु सिंचन प्रकल्पांचे निष्पादन समायोचित, मितव्ययी, कार्यक्षम आणि परिणामकारक पध्दतीने करण्यात आले होते किंवा कसे, लघु सिंचन प्रकल्पाद्वारे निर्मित सिंचन क्षमता पर्याप्त होती आणि ती योग्य प्रकारे वापरण्यात आली किंवा कशी? या सर्व बाबींची छाननी, तपासणी व अंमलबजावणी करण्याची जबाबदारी प्रामुख्याने जलसंधारण विभागाची आहे.

१.७४ परंतु जलसंधारण विभाग/महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ / विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम यांच्याद्वारे कोणतेही दीर्घकालीन नियोजन आणि प्राधान्यक्रमाशिवाय लघुसिंचन प्रकल्प हाती घेण्यात आले. तसेच, संकल्पचित्र /कामाच्या व्याप्तितील बदल, निधीची कमतरता, जमीन संपादित न करणे इत्यादिंमुळे प्रकल्प किंमतीत अवाढव्य वाढ झाली आणि प्रकल्प पूर्ण होण्यास विलंब झाला. नियमपुस्तिकांचे प्रावधान आणि कंत्राट अटींचे उल्लंघन झाल्याची बरीच प्रकरणे होती, ज्यामुळे कंत्राटदारांना गैरवाजवी लाभ देण्यात आला आणि निरर्थक खर्च झाला. प्रकल्पाच्या निष्पादन आणि देखभालीकरिता राज्य शासनाद्वारे अपर्याप्त निधी पुरविण्यात आला. अभियंत्याद्वारे प्रकल्पाचे संनियंत्रण कमकुवत होते. विभागीय तपासणी अभावी आणि पाणी वापर संस्थांची सामुहिक मालकी नसल्यामुळे कोणतीही पाणीपट्टी न भरता प्रकल्प स्थळावरील पाणी साठयामधून पाण्याची चोरी होत होती. मार्च २०१६ पर्यंत निर्मित ४,८७१ हेक्टर सिंचन क्षमतेच्या तुलनेत उपयोगात आणलेली सिंचन क्षमता खुपच कमी होती. २०१४-१५ दरम्यान उपयोगात आलेली कमाल सिंचन क्षमता १,२४३ हेक्टर (२६ टक्के) होती. कालव्यांचे काम पूर्ण करणे आणि लाभ क्षेत्रात वितरिकांचे जाळे पसरविणे यातील विलंब आणि निर्मित मालमत्तेची अपूरी देखभाल यामुळे सिंचन क्षमतेचा वापर कमी झाला असे आक्षेप व निष्कर्ष महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहे. महालेखाकारांनी नमूद केलेल्या सर्व आक्षेपांची विभागाने गंभीर दखल घ्यावी व जलसंधारण विभागाद्वारे लघुसिंचन प्रकल्पांचे योग्य ते व्यवस्थापन व नियोजन करुन त्यासाठी प्रभावी यंत्रणा व व्यवस्था निर्माण करुन लघुसिंचन प्रकल्पांच्या माध्यमातून जास्तीत जास्त सिंचन क्षमता राज्यात निर्माण करावी व त्याचा पुरेपुर लाभ शेतक-यांना व नागरिकांना देण्यात यावा. अपूर्ण प्रकल्प प्राधान्याने पूर्ण करण्यात यावे व प्रकल्पांची देखभाल व दुरुस्ती नियमितरित्या करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

# कृषी व पदुम (कृषी) विभाग

२. भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१५-१६ या वर्षाच्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र ३.१ **“महाराष्ट्रात कृषी पीक विमा योजनेची अंमलबजावणी ”** व परिच्छेद क्र. ३.९ **“निष्फळ खर्च ”** यासंदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय दिले आहेत.

| मार्च २०१६ रोजी संपलेले वर्षाचे परिच्छेदातील आक्षेप | अभिप्राय |
|---|---|
| **३.१.२ शासकीय स्तरावर योजनांची अंमलबजावणी**<br>कृषि पीक विमा योजनेची अंमलबजावणी भारत सरकारद्वारे विहीत केलेल्या मार्गदर्शक सुचनानुसार करावयास पाहिजे. या मार्गदर्शक सुचनामध्ये राज्य शासकीय एजेन्सींच्या ठराविक जबाबदाऱ्या मांडल्या आहेत. राज्य शासन स्तरावर योजनांच्या अंमलबजावणीवर घेतलेले लेखापरीक्षा आक्षेप खाली तपशीलवार मांडले आहेत.<br>**३.१.२.१ विमा क्षेत्र घटक म्हणून ग्राम पंचायतींचा अवलंब न करणे.**<br>NAIS मार्गदर्शक सुचनानुसार (जुलै १९९९) योजनेच्या अंमलबजावणीच्या तारखेपासून जास्तीत जास्त तीन वर्षांच्या आत या योजनेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक राज्याने योजनेचे विमा क्षेत्र घटक म्हणून ग्राम पंचायत (GP) स्तरापर्यंत पोचावयास पाहिजे. उद्येश्य हा होता की ग्रामपंचायत जर विमा क्षेत्र घटक असेल तर, राज्य एजेन्सीद्वारे काढण्यात आलेले वास्तविक उत्पन्न/TY जास्त अचूक असेल, ज्यात हानिचे, जर असेल तर, निर्धारण जास्त वास्तववादी असेल आणि त्याप्रमाणे शेतकऱ्यांचे दावे दिले जातील. दुसऱ्या शब्दात म्हणजे विमा क्षेत्र घटक जेवढे कमी असेल तेवढे वास्तविक उत्पन्न/TY आणि दाव्यांचे निर्धारण व प्रदान जास्त अचूक असेल.<br>तथापी, राज्यात योजनांच्या अंमलबजावणी नंतर( डिसेंबर १९९९) १५ वर्षांचा कालावधी लोटल्यानंतरही महाराष्ट्र शासन अजूनही ग्राम पंचायत स्तरापर्यंत पोचले नाही. महाराष्ट्रात, ग्राम पंचायतीऐवजी मंडळास क्षेत्र घटक म्हणून घेतले जात असून त्यात अनेक गावी समाविष्ट आहेत, ज्यापैकी यादृच्छिकपणे निवडलेल्या काही गावांत CCE करण्यात आले आणि नंतर हे वास्तविक उत्पन्न मंडळातील सर्व गावांसाठी अवलंबविण्यात आले. यापध्दतीमुळे एक तर योग्य गावे वगळण्यात येतात अथवा मंडळातील ती गावे जी कोणत्याही दाव्यांमध्ये बसत नाहीत, त्यांचा अंतर्भाव होतो.<br>राज्य शासनाने वस्तुस्थिती मान्य केली आणि नमूद केलि(डिसेंबर २०१६) की महाराष्ट्रात, खूप पीके घेण्यात येत असल्यामुळे, GP-स्तरावर NAIS ची अंमलबजावणी केली तर CCE ची संख्या प्रचंड वाढेल. तथापि, या बाबींचे निराकरण करण्यासाठी चार | सद्यस्थितीत पिक विमा योजना राज्यात महसुल मंडळ / मंडळगट स्तरावर राबविण्य येते. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार योजनेची अंमलबजावणी ग्रामपंचा स्तरावर करावयाची झाल्यास पिक कापणी प्रयोगांमध्ये मोठया प्रमाणावर वाढ हो भविष्यात राज्यात पिक विमा योजनेची अंमलबजावणी ग्रामपंचायत स्तरावर करणेस आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे दृष्टीने राज्यात सन २०१४-१५ व सन २०१५- मध्ये पथदर्शक प्रकल्प राबविणेत आले आहेत. त्याचा तपशील प्रपत्र १ मध्ये सो जोडलेला आहे. सदर पथदर्शक प्रकल्पातुन आलेले निष्कर्ष केंद्र शासना "महलानोबीस राष्ट्रीय पिक पुर्वानुमान केंद्र", नवी दिल्ली यांना अभिप्रायास्तव पाठविण्य आले आहेत. त्यावरील त्यांचेकडून प्राप्त होणाऱ्या अभिप्रायानुसार योजनेची अंमलबजा ग्रामपंचायतस्तरावर करणेच्या दृष्टीने कार्यवाही करणेत येईल. या संदर्भात राष्ट्र स्तरावर प्रयोग सुरु असून त्या निष्कर्षांचे आधारे विश्वासार्ह प्रक्रिया केंद्र शासना मार्गदर्शनाखाली अवलंबिण्यात येईल. |

पथदर्शक प्रकल्प अनुकूलतम CCE साठी रिमोट सेन्सिंग टेक्नोलोजी आणि सॅटेलाईट प्रतिमेच्या संभाव्य उपयोगासह राबविण्यात येत आहे. एकदा CCE ची अनुकूलता प्राप्त झाली की ग्रामपंचायतींना अधिसूचीत करण्यात येईल.

३.१.२.२ शासन अधिसुचना निर्गमित करण्यात विलंब

जुलै १९९९ च्या NAIS मार्गदर्शक सूचना आणि WBCIS घटकासाठी NCIP मार्गदर्शक सुचनांत (फेब्रुवारी २०१४) असे विहित आहे की राज्य शासनाने, प्रत्येक पीक हंगामाच्या सुरवातीला, पीक विम्यासाठी असलेल्या राज्य स्तरीय समन्वयन समिती(SLCCCI) च्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार हंगामातील पीके आणि विमा क्षेत्र घटक, अधिसूचीत करावी.

तथापी , लेखापरीक्षेस असे निदर्शनास आले की NAIS संबंधी पीके आणि विमा क्षेत्र घटक अधिसूचित करणारे रब्बी हंगाम २०११-१२, २०१२-१३ आणि खरीप हंगाम २०१४ चे शासन निर्णय पाच ते १७ दिवसांच्या विलंबाने जारी करण्यात आले. तसेच, WBCIS(फलोत्पादन) संदर्भात अंबीया बहार २०१४-१५ आणि २०१५-१६ चे शासन निर्णय १६ ते ६४ दिवसांच्या विलंबाने जारी करण्यात आले. पीक विमा धारक यामध्ये अधिसुचना जारी करणे ही पहिली पायरी असल्याने या संदर्भातील विलंबामुळे शेतकऱ्यांना विमा योजनांमध्ये सहभागी होण्यास कमी वेळ मिळतो.

राज्य शासनाने वस्तुस्थिती मान्य केली आणि नमुद केले की SLCCCI मध्ये इतर समांतर विभागांचे ( वित्त, नियोजन आणि महसूल) प्रतिनिधी असल्यामुळे SLCCI च्या बैठकी आयोजित करण्यासाठी वेळ लागला ज्यामुळे NAIS अंतर्गत शासन सुचना जारी करण्यात विलंब झाला. याशिवाय पुनःनिविदाकरण(retendering) आणि बोलीदार विमा कंपन्यासोबतच्या वाटाघाटींमुळे WBCIS अंतर्गत अधिसुचना जारी करण्यात विलंब झाला.

सदर योजनेचा शासन निर्णय राज्यस्तरीय पिक विमा समन्वय समितीच्या मान्यतेने निर्गमित करावयाचा असतो. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, सदर समितीचे अध्यक्ष हे राज्याचे मुख्य सचिव असून सदर समितीमध्ये महसुल, वित्त, नियोजन व सहकार विभागाच्या सचिवांचा तसेच राज्य अग्रणी बँक व राज्य सहकारी बँकेच्या प्रतिनिधींचा समावेश आहे. राज्यामध्ये राष्ट्रीय कृषि विमा योजना रबी हंगाम १९९९ पासून राबविणेत येत असून या योजनेबाबत शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर जागृकता असल्याचे शेतकऱ्यांचे सहभागावरुन दिसून येते. योजनेत सहभागी होण्याची अंतिम मुदत खरीप हंगामासाठी ३१ जुलै तर रबी हंगामासाठी ३१ डिसेंबर अशी आहे. प्रस्तुत मुद्यात नमुद केल्याप्रमाणे रबी २०११-१२, रबी २०१२-१३ व खरीप २०१४ हंगामाचे शासन निर्णय निर्गमित करण्यास विलंब झाला असला तरी संबंधित हंगामात गतवर्षीच्या हंगामापेक्षा शेतकऱ्यांचा सहभाग वाढल्याचे दिसून येते.

| अ.क्र. | हंगाम | शासन निर्णय निर्गमित दिनांक | योजनेत सहभागी होण्याचा अंतिम दिनांक | सहभागी शेतकरी संख्या( लाख) | क्षेत्र (लाख) |
|---|---|---|---|---|---|
| १ | रबी २०१०-११ | १२ नोव्हेंबर, २०१० | ३१ डिसेंबर, २०१० | ०.५६ | ०.६१ |
| २ | रबी २०११-१२ | १४ नोव्हेंबर, २०११ | ३१ डिसेंबर २०११ | ३.२० | ३.१६ |
| ३ | रबी २०१२-१३ | १७ नोव्हेंबर, २०१२ | ३१ डिसेंबर २०१२ | ९.९२ | ८.८३ |
| ४ | खरीप २०१३ | १४जुन, २०१३ | ३१ जुलै २०१३ | १४.८४ | १३.३२ |
| ५ | खरीप २०१४ | ०५जुलै, २०१४ | ३१ जुलै २०१४ | ४४.७९ | २८.०५ |

राष्ट्रीय कृषि विमा योजना (NAIS) केंद्र शासनामार्फत बंद करणेत आली असुन त्या ऐवजी प्रधानमंत्री पिक विमा योजना (PMFBY) खरीप हंगाम २०१६ पासून सुरु करणेत आली

| | |
|---|---|
| | आहे. खरीप व रब्बी हंगाम सुरु होण्यापूर्वी शासन निर्णय निर्गमित करणेच्यादृष्टी भविष्यामध्ये आवश्यक कार्यवाही करणेत येईल.<br>तसेच राष्ट्रीय कृषि विमा योजना (NAIS) केंद्र शासनामार्फत राबविण्यात येत होती. त्या धर्तीवर सन २०११ पासून राज्यातील निवडक फळपिकावर हवामानावर आधारित पथदर्शी फळपिक विमा योजना प्रायोगिक तत्वावर राबविण्यास सुरु करण्यात आली.<br>सन २०१६ पासून प्रधानमंत्री फसल बिमा योजनेतंर्गत मृग बहार २०१६ पासून पुनर्रचित हवामान आधारित पिक विमा योजनाराबविण्यात येत आहे.<br>मृग व आंबिया बहार सुरु होण्यापूर्वी शासन निर्णय विहित मुदतीत निर्गमित करण्याच्यादृष्टीने भविष्यामध्ये आवश्यक कार्यवाही करणेत येईल. |

### ३.१.२.३ विमा हप्ता आणि दावा अनुदान देण्यात विलंब

NAIS मार्गदर्शक सूचना(जुलै १९९९) आणि भारत सरकारच्या कृषि मंत्रालयाच्या दिनांक ०४ फेब्रुवारी २००२ च्या पत्रानुसार, विमा हप्ता रक्कम आणि विमा दावा अनुदानासंबंधी सर्व आर्थिक दायित्व केंद्र आणि राज्य शासनाद्वारे १:१ या गुणोत्तरानुसार भागले गेले पाहिजे. शेतकऱ्यांना विमा दावा रक्कमेची अदायगी वेळेवर करावयासाठी विमा हप्ता/दावा अनुदानाचा राज्याचा हिस्सा विमा कंपन्यांना देण्यात विलंब व्हावयास नको. तथापि, लेखापरीक्षेस असे निदर्शनास आले की खरीप हंगाम २०११ ते २०१५(NAIS); WBCIS(पीके) अंतर्गत रब्बी हंगाम २०१३-१४ ते खरीप हंगाम २०१५; आणि WBCIS(फलोत्पादन) अंतर्गत मृगबहार २०१४-१५ ते अंबीयाबहार २०१५-१६ साठी महाराष्ट्र शासनाने विमा कंपन्यांना विमा हप्ता रक्कम अनुदानात देण्यात मागणी तारखेच्या दिवसापासून ०८ ते ३७० दिवस घेतले. तसेच, रब्बी हंगाम २०११-१२ ते खरीप हंगाम २०१५(NAIS) संदर्भात विमा कंपन्यांनी मागणी केल्याच्या तारखेपासून दावा अनुदानाचे संवितरण १६ ते ३६६ दिवसानंतर केले. विमा हप्ता रक्कम/दावा अनुदान देण्यातील विलंबामुळे शेतकऱ्यांचा विमा दाव्यांचा निपटारा करण्यात उशीर झाला आणि त्यामुळे शेतकऱ्यांना वेळेवर आर्थीक सहाय्य पुरवण्यात येऊ शकले नाही.

राज्य शासनाने वस्तुस्थिती मान्य केली आणि नमूद केले की विमा हप्ता रक्कम /दावा अनुदान पुरवून दाव्यांचा वेळेवर निपटारा करण्यासाठी पुरेशी आर्थिक तरतूद करण्यात येत आहे.

प्रधानमंत्री पिक विमा योजनेंतर्गत केंद्र व राज्य शासनाने विमा हप्ता अनुदान संबंधित विमा कंपनीस समप्रमाणात दयावयाचे आहे.

सन २०१६-१७ मध्ये राज्य शासनामार्फत राज्य हिश्यापोटी रक्कम रु १६८८.४५ कोटी एवढी तरतुद मंजूर केली होती. त्यापैकी विमा कंपनीना संपुर्ण रक्कम म्हणजेच रु १६८८.४५कोटी माहे ऑक्टोबर २०१६, जानेवारी २०१७ व मार्च २०१७ मध्ये वितरीत केली आहे. सन २०१७-१८ मध्ये रु. १६५३.८० कोटी अर्थसंकल्पिय तरतुद करणेत आली आहे.

मृग बहार २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी रुपये १० कोटी अर्थसंकल्पिय तरतूदीद्वारे व ३६१.३३ कोटी पुरवणी मागणीद्वारे असे एकूण रुपये ३७१.३३ कोटी राज्य शासनामार्फत निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. त्यानुसार दिनांक २८ सप्टेंबर २०१६ च्या शासन निर्णयानुसार १० कोटी निधी वितरीत करण्यात आलेला आहे. तसेच ८७.२० कोटी दिनांक ३ मार्च २०१७ च्या शासन निर्णयान्वये सहभागी विमा कंपन्यांना वितरीत करण्यात आलेले आहे. तसेच दिनांक २३ मार्च २०१७ च्या शासन निर्णयान्वये राज्य हिस्सा रक्कम २३१.८४ कोटी आंबिया बहारातंर्गत सहभागी विमा कंपन्यांना वितरीत करण्यात आले आहे. हवामान आधारित फळपिक विमा योजनेतंर्गत केंद्र व राज्य शासनाने विमा हप्ता अनुदान सहभागी विमा कंपनीस सम प्रमाणात द्यावयाचे आहे. याशिवाय पुन:निविदाकरण(retendering) आणि बोलीदार विमा कंपन्यासोबतच्या वाटाघाटीमुळे विमा अनुदान वितरणास विलंब झाला. विमा कंपन्यांना विमा हप्ता अनुदान मागणी अंतिम तारखे नंतर विहीत मुदतीच्या कालावधीत सादर करणे बंधनकारक केले आहे. तरी विमा हप्ता रक्कम अनुदान देण्याची कार्यवाही आयुक्तालय व शासन स्तरावरुन तात्काळ करण्यात येईल.

**३.१.२.४ स्पर्धात्मक बोलीशिवाय विमा कंपन्यांना नियमबाह्यरित्या पुढे चालू ठेवणे.**

WBCIS घटकांसाठी असलेल्या NCIP मार्गदर्शक सूचनांच्या (फेब्रुवारी २०१४) परिच्छेद ८.३.२ नुसार राज्य शासनाने भारत सरकारद्वारे नामित केलेल्या विमा कंपन्याकडून प्रत्येक पीक हंगामासाठी बोली मागविल्या पाहिजेत. स्पर्धात्मक बोलीशिवाय कोणत्याही विशिष्ट विमा कंपनीला लागोपाठ दोन वर्षे सहभागी करण्याबाबत योजनेत कोणतेही प्रावधान नाही.

COA, पुणे कार्यालयातील दस्तावेजांच्या पडताळणीत असे आढळले की महाराष्ट्र शासनाने चार विमा कंपन्यांना(ज्यांनी खरीप हंगाम २०१४ मध्ये योजना राबविली होती) खरीप हंगाम २०१५ मध्ये सामिल करण्यासाठी MNAIS च्या परिच्छेद ७.५.३ चा अवलंब करून शासन निर्णय जारी केला(जून २०१५) जेव्हा की MNAiS २०११ नंतर महाराष्ट्रात अंमलात नव्हती. खरीप हंगाम २०१४ साठी अधिसूचित टर्म शीटस आणि ट्रिगर खरीप हंगाम २०१५ साठी वापरल्या गेले. यामुळे विमा कंपनीमधील स्पर्धा बाधित होऊन शेतक-यांचीही जास्त चांगली जोखीम संरक्षण मिळण्याची संधी मुकली.

राज्य शासनाने नमूद केले की MNAIS सुध्दा NCIP चे घटक आहे आणि म्हणूनच MNAIS च्या मार्गदर्शक सुचना WBCIS साठी अवलंबविण्यात आल्या व स्थिरता आणि निरंतरता राखण्यासाठी एकाच विमा कंपनीस लागोपाठ दोन वर्षे एकाच विमा हप्ता दराने आणि विमा संरक्षित रक्कमेवर सहभागी करण्यात आले.

उत्तर समर्थनीय नाही कारण २०११ नंतरMNAIS महाराष्ट्रात अंमलात नाही आणि NCIP च्या WBCIS घटकांच्या कार्यान्वयनासाठी स्वतंत्र प्रावधानांची तरतूद आहे.

केंद्र शासनाच्या योजनेच्या मार्गदर्शक सुचनेमधील मुददा क्र ८.३.१ (पृष्ठ क्र ३७) विमा अन्य कंपनीची निवड विमा कंपनीचा अनुभव, निश्चित केलेल्या हवामान घटकाची प्रमाणके, विमा हप्ता दर, मागील हंगामात अदा केलेली नुकसान भरपाई, जिल्हयातील कंपनीची कार्यालयी व्यवस्था व मनुष्यबळ या सर्व बाबींचा विचार करून विमा कंपनी निवडीचे अधिकार राज्य शासनास दिलेले आहेत. त्यानुसार सदरची योजना राज्यात पथदर्शक (Pilot) स्वरुपात खरीप २०१४ व २०१५ तसेच रब्बी २०१३-१४ व २०१४-१५ या हंगामात राबविणेत आली. योजनेच्या सुरुवातीस केंद्र शासनाने मान्यता दिलेल्या विमा कंपनीकडून दरपत्रके मागविण्यात आली होती. नियुक्त विमा कंपन्यांना पुढील हंगामात कायम ठेवण्यासाठी खालील बाबी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार विचारात घेण्यात आल्या.

१) खरीप व रब्बी हंगामासाठी निश्चित केलेली हवामान घटकाची प्रमाणके.
२) विमा कंपनीचा मागील हंगामातील योजना राबविण्याचा अनुभव.
३) जिल्हयातील विमा कंपनीची कार्यालयीन व्यवस्था व मनुष्यबळ.
४) मागील हंगामात विमा कंपनीकडून अदा केलेली नुकसान भरपाई.
५) शेतकऱ्यांनी भरावयाचा विमा हप्ता दर व विमा हप्ता अनुदानातील केंद्र व राज्य शासनाचे अनुदान दोन्ही हंगामात कायम ठेवले होते.

वरील बाबी विचारात घेऊन राज्यस्तरीय पिक विमा समन्वय समितीच्या मान्यतेने नियुक्त विमा कंपन्या पुढील हंगामात कायम ठेवण्यात आल्या.

तथापी, दिनांक ५ ऑक्टोबर, २०१५ रोजी मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या राज्यस्तरीय पिक विमा समन्वय समितीच्या बैठकीमध्ये अन्नधान्य व गळीत धान्य पिकासाठी हवामान आधारित पिक विमा योजना राज्यात न राबविण्याचा निर्णय घेण्यात आला.

केंद्र शासनाच्या योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनूसार, योजनेची राज्यात अंमलबजावणी सनियंत्रण करण्याचे अधिकार मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय पिक विमा समन्वय समितीस देण्यात आले असून सदर समितीमध्ये वित्त, महसुल, नियोजन व सहकार विभागाच्या सचिवांचा समावेश आहे. त्यानुसार राज्यस्तरीय पिक विमा समन्वय समितीच्या दिनांक ३०.०९.२०१४ दिनांक २५.०५.२०१५ च्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार, नियुक्त विमा कंपन्या पुढील वर्षी कायम ठेवण्यात आल्या. (बैठकीचे इतिवृत्त प्रत सोबत जोडली आहे.)

| | |
|---|---|
| | राष्ट्रीय पिक विमा कार्यक्रम (NCIP) अंतर्गत सुधारित राष्ट्रीय कृषि विमा योजना व हवामान आधारित पिक विमा योजना (MNAIS & WBCIS) या २ घटक योजना राबविणेत येत होत्या या दोन्ही योजनेंतर्गत अन्नधान्य, गळीतधान्य व फळपिके यांचा अंतर्भाव करणेत आला होता. सुधारित राष्ट्रीय कृषि विमा योजनेमध्ये विमा नुकसान भरपाई ही पिकाच्या उत्पादनात येणाऱ्या घटीवर निश्चित करण्यात येत होती. तर हवामान आधारित पिक विमा योजनेमध्ये ज्या हवामान घटकामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात घट येते ते हवामान घटकाचे धोके विचारात घेऊन त्याआधारे हवामान घटकांची प्रमाणके निश्चित करुन त्यावरुन नुकसान भरपाई निश्चित करण्यात येते.<br>राष्ट्रीय पिक विमा कार्यक्रम (NCIP) अंतर्गत २घटक योजना असल्यामुळे योजनेत समाविष्ट पिके, लाभार्थींची निवड, बँक सेवा शुल्क, विमा क्षेत्र घटक, योजनेचे वेळापत्रक, जोखीम कालावधी, शामन, बँक व विमा कंपनीच्या जबाबदाऱ्या या बाबी दोन्ही घटक योजनांसाठी समान होत्या.<br>राज्यात हवामान आधारित पिक विमा योजना पथदर्शक स्वरुपात निवडलेल्या जिल्ह्यांत निवडलेल्या पिकांसाठी राबविणेत येत होती. या योजनेचा खालील प्रमाणे अहवाल नमुद करणेत येत आहे. |

| वर्ष/हंगाम | भागघेतलेलेशेतकरी | | | | नुकसानभरपाई | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या (लाख) | क्षेत्र (लाख हेक्टर) | विमा संरक्षित रक्कम (रु.कोटी) | विमा हप्ता (रु.कोटी ) | शेतकरी संख्या (लाख) | रक्क (रु.को |
| रब्बी २०१३-१४ | ०.१४ | ०.१६ | ३९.५७ | २.८८ | ०.०८ | ३. |
| एकूण २०१३-१४ | ०.१४ | ०.१६ | ३९.५७ | २.८८ | ०.०८ | ३. |
| खरीप २०१४ | १२.८५ | ११.४२ | १९५९.६३ | १९१.४६ | ११.६८ | २७२. |
| रब्बी २०१४-१५ | ०.६७ | ०.६८ | १२६.५१ | ९.८६ | ०.५६ | १८. |
| एकूण २०१४-१५ | १३.५२ | १२.१ | २०८६.१४ | २०१.३२ | १२.२४ | २९१.| |
| खरीप २०१५ | ६.७६ | ७.४६ | १३०७.३६ | १२८.४१ | ६.६१ | २६९.| |
| एकूण रब्बी २०१३-१४ते खरीप २०१५ | २०.४२ | १९.७२ | ३४३३.०७ | ३३२.६१ | १८.९३ | ५६५.| |

उपरोक्त माहितीवरुन असे दिसून येते की, निवड केलेल्या संबंधित विमा कंपनी रब्बी हंगाम २०१३ मध्ये पहिल्या वर्षी रक्कम रु ३.९१ कोटी नुकसान भरपाई शेतकऱ्यांना अ केली. तर दुसऱ्या वर्षी रब्बी २०१४-१५ मध्ये रक्कम रु १८.९१ कोटी नुकसान भरप शेतकऱ्यांना अदा केली.

तसेच खरीप हंगाम २०१४ मध्ये निवडण्यात आलेल्या विमा कंपन्यांनी पहिल्या व रक्कम रु २७२.८१ कोटी तर दुसऱ्या वर्षी खरीप २०१५ हंगामात रक्कम रु २६९.८३ को नुकसान भरपाई शेतकऱ्यांना अदा केली.

प्रधानमंत्री पिक विमा योजना राज्यात खरीप २०१६ पासून राबविण्यात येत आहे. कें शासनाचे मार्गदर्शक सुचनेमध्ये राज्यांना विमा कंपनीची निवड सलग ३ वर्षासाठी करणे तरतुद उपलब्ध केली आहे. जेणे करुन विमा कंपनीस जिल्हयात कार्यालयाची स्थापन मनुष्यबळ निवड, प्रचार प्रसिध्दी, शेतकऱ्यांना हवामानाचे अंदाज वितरीत करणेचे दृष्टी व्यवस्था निर्माण करणे व इतर कल्याणकारी उपक्रम राबविणे शक्य होईल असे नमुद के आहे. हीच तरतुद हवामान आधारीत पिक विमा योजनेसाठी कायम ठेवण्यात आली आ

त्यामुळे राज्य शासनाने तत्कालीन राष्ट्रीय पिक विमा कार्यक्रमांतर्गत असलेल्या २ घटक योजनांचा एकत्रीत विचार करुन विमा कंपनीची नियुक्ती पुढील हंगामात सुध्दा चालु ठेवली होती.

३.१.२.५ शेतक-यांना विमा दावा रक्कमेची दुबार/अनेकदा अदायगी

एका हंगामात विमा खालील क्षेत्र हे लागवडीखाली असलेल्या क्षेत्रापेक्षा जास्त असावयास नको. तथापि, COA पुणे कार्यालयातील मुख्य सांख्यीक यांचेकडे असलेल्या दोन अहवालांचा उलट- मेळ घातला असता आणि TAOs यांच्या दस्तऐवजाच्या पडताळणीत विमा घेतलेले क्षेत्र आणि लागवडीखालील क्षेत्र यात खाली तक्ता ३.१.१ मध्ये दर्शविल्यानुसार तफावती आढळल्या.

तक्ता ३.१.१: विमा घेतलेले क्षेत्र आणि प्रत्यक्ष लागवडीखालील क्षेत्र यांच्यातील तफावती

| राज्य/तालुका | पीक हंगाम/वर्ष | पीकाचे नाव | प्रत्यक्ष विमा घेतलेले क्षेत्र(हेक्टर) | प्रत्यक्ष लागवडीखालील क्षेत्र(हेक्टर) | अतिरिक्त विमा घेतलेले क्षेत्र(हेक्टर) |
|---|---|---|---|---|---|
| राज्य स्थिती | खरीप २०१४ | मुग | ३४०००० | ३१५२०० | २८८०० |
| दर्यापूर तालुका | खरीप २०१५ | मुग | १६११६ | १६००८ | १०८ |
| परळी-वैजनाथ तालुका | खरीप २०१५ | सर्व पीक | १११६१४.७१ | ५१३९७ | ६०२१७.७१ |
| स्रोत: COA, पुणे आणि निवडलेल्या तालुक्यांनी पुरविलेली माहिती | | | | | |

येथे उघडपणे दिसत आहे की राज्य शासनाद्वारे लागवडीखालील क्षेत्राची माहिती आणि विमा कंपन्यांजवळ विमा घेतलेल्या क्षेत्राबाबत असलेली माहिती यांची उलट-तपासणी करुन मेळ घालण्यासाठी कोणतीही पध्दत नाही. परिणामी, शेतक-यांना विमा देय रक्कमेची दुबार/अनेकदा अदायगी करण्यात आली.

तीन बँकांच्या दस्तावेजांच्या उलट-तपासणीत लेखापरीक्षेस असे निदर्शनास आले की परळी-वैजनाथ तालुक्यातील सरडगाव आणि धर्मापूरी गावांतील १२९

केंद्र शासनाच्या योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनूसार, वित्तीय संस्था / बँका यांच्या जबाबदाऱ्या निश्चित केल्या असून विमा प्रस्ताव स्विकारणे, विमा प्रस्तावांची छाननी, विमा हप्ता स्विकारणे व विहित मुदतीत विमा कंपनीकडे पाठविण्याची जबाबदारी संबंधित वित्तीय संस्थेची आहे. संबंधित बँकेस दुबार / तिबार नुकसान भरपाई अदा केलेल्या प्रकरणी पुढील योग्य ती कार्यवाही करणेसंबंधी कळविण्यात आलेले आहे.

राज्यातील विविध पिकाखालील लागवडी खालील क्षेत्राची माहिती उपग्रहप्रतिमा व रिमोट सेन्सिंग तंत्रज्ञानाचा वापर करुन संकलित करण्याचे दृष्टीने केंद्र शासनाच्या महलानोबीस राष्ट्रीय पिक पुर्वानुमान नवी दिल्ली यांचे मार्फत राज्यात सन २०१३ पासून पथदर्शक प्रकल्प राबविण्यात येत आहे. सन २०१३-१४ ते सन २०१६-१७ मध्ये राबविण्यात आलेल्या प्रकल्पांतर्गत जिल्हे व पिके यांची माहिती प्रपत्र २ मध्ये सोबत जोडलेली आहे. या प्रकल्पाचे हंगामनिहाय निष्कर्ष वेळोवेळी केंद्र शासनास सादर करण्यात आले आहेत. महलानोबीस राष्ट्रीय पिक पुर्वानुमान नवी दिल्ली यांचे सुचनेनुसार याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

योजनेच्या अंमलबजावणीमध्ये पारदर्शकता येण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाने योजनेत सहभागी होणाऱ्या शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पिक विमा योजनेमध्ये शेतकऱ्यांचे बचत खाते आधारकार्ड सोबत संलग्न करणे अनिवार्य केले असुन राज्यातील व देशातील सर्व शेतकऱ्यांच्या योजनेतील सहभागाची माहिती केंद्र शासनाने विकसीत केलेल्या www.agri-insurance.gov.in वेबपोर्टलवर अद्ययावत करणे अनिवार्य केले आहे. प्रधानमंत्री पिक विमा योजनेच्या मार्गदर्शक सुचनांमध्ये संरक्षित विमा क्षेत्र व पेरणी क्षेत्रातील तफावतीबाबत करावयाच्या कार्यवाही संबंधी सुचना नमुद केल्या आहेत. त्या प्रमाणे कार्यवाही करणेत येत आहे.

| | |
|---|---|
| शेतक-यांना एकाच पीक/हंगाम/क्षेत्रासाठी दोनदा किंवा तीनदा अदायगी करण्यात आली, त्यामुळे जुलै २०१६ मध्ये र २८.८७ लक्ष जादा विमा दावा रक्कमेची अदायगी झाली. तसेच, स्टेट बँक ओफ हैंदराबाद, परळी-वैजनाथ शाखेने जिल्हाधिकारी बीडला सूचीत केले(जून२०१६) की त्यांचेकडे रु.७७.७४ लक्ष रक्कमेचे २९३ शेतक-यांचे दावे प्राप्त झाले आहे. ज्यापैकी८८ शेतक-यांना<br>विमा दावा रक्कम म्हणून रु.२७.५८ लक्ष बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँके(BDCC) द्वारे आधीच अदा करण्यात आले होते. राज्य शासनाने वस्तुस्थिती मान्य केली आणि नमूद केले की लागवडीखालील क्षेत्राचे निर्धारण दृष्टि अंदाजानुसार करण्यात आले होते आणि म्हणूनच ते विश्वसनीय नव्हते.<br>प्रस्ताव सादर करतांनाच शेतक-यांना आधार कार्डचा उपयोग करणे सक्तीचे करून दुबार/अनेकदा अदायगी होणे रोखण्यात येईल. राज्य शासनाने पुढे असेही नमूद केले की BDCC, बीड द्वारे अदा करावयाचे असलेले रु. ५७.६७ कोटीचे शेतक-यांचे दावे AIC ला परत पाठविण्यात आले. | |

<u>आर्थिक क्षेत्र अहवाल मार्च २०१६ रोजी संपलेले वर्षाचे अनुपालन</u>

प्रशासकीय विभाग- कृषि व पदुम

| मार्च <u>२०१६</u> रोजी संपलेले वर्षाचे परिच्छेदातील आक्षेप | अभिप्राय |
|---|---|
| <u>३.१.३ बँक स्तरावर योजनांची अंमलबजावणी</u><br>योजनच्या अंमलबजावणीत बँका/FI ची भूमीका महत्वाची असते. ते विमा प्रस्ताव प्रपत्रांची पडताळणी करतात आणि हे प्रस्ताव त्यांच्या संबंधीत नोडल बँकेमार्फत विमा कंपनींना( विमा हप्ता रक्कमेसह) पाठवितात. नोडल बँकेद्वारे प्राप्त दाव्याची रक्कम लाभार्थी शेतक-यांच्या खात्यात जमा करण्याठी प्रत्येक बँकेच्या शाखेत पाठविण्यात येते. | |
| <u>३.१.३.१ शेतक-यांना लाभांपासून वंचित करणे</u><br>NAIS आणि NCIP मार्गदर्शक सूचना (जुलै १९९९ आणि फेब्रुवारी २०१४) नुसार प्रस्ताव प्रपत्रे आणि विमा हप्ता अनुदान स्वीकार करते वेळी संबंधित बँक/FI ची जबाबदारी असते की त्यांनी शेतक-यांबाबत भूमि अभिलेख, एकरी क्षेत्रफळ/झाडांची संख्या, संरक्षित रक्कम इत्यादी माहिती पडताळली पाहिजे. बँकेच्या शाखेने/FI ने नंतर ही माहिती घोषणापत्र च्या स्वरुपात एकत्रीकृत करुन प्रत्येक पीक हंगाम सुरु होण्यापूर्वी राज्य शासनाद्वारे अधिसुचीत करण्यात आलेल्या निर्धारीत तारखेच्या सात दिवसांच्या आत संबंधीत नोडल बँकेस पाठवायचास पाहिजे.<br>तथापी , लेखापरीक्षेच्या असे निदर्शनास आले की तीन तालुक्यातील(दोन जिल्हे) ४८८ शेतकरी विमा लाभांपासून वंचित राहिले कारण बँकांनी/FI नी प्रस्ताव प्रपत्रांची काळजीपूर्वक पडताळणी केली नाही व त्यांच्या पडताळणीत अनेक त्रुटी/चुकी/उणीवा राहिल्या. तपशील तक्ता ३.१.२ मध्ये दर्शविला आहे. | राष्ट्रीय कृषि विमा योजना खरीप २०१४ मधील बँकेने उशिरा सादर केलेले विमा प्रस्ताव केंद्र शासनाच्या समितीने अदा न करण्याचा निर्णय घेतलेला असल्याने त्याबाबतची नुकसान भरपाई सेंट्रल बँक ऑफ इंडिया, नेर पिंगळाई बँकेने शेतकऱ्यांना अदा करणेबाबत या कार्यालयाचे पत्र क्र एचडी/स्टेट-८/एनएआयएस/३० दिनांक १०.०१.२०१७ व पिवियो/सां-८/अदावे/३१०/२०१७ दिनांक १४.०६.२०१७ व पिवियो/सां-८/प्रमपिवियो/४७७/२०१७ दि २८.०८.२०१७ अन्वये कळविण्यात आलेले आहे. त्याच प्रमाणे सेंट्रल बँक ओफ इंडिया, पुसद व यवतमाळ जिल्हा सहकारी बँकेस सदरची नुकसान भरपाई लाभार्थी शेतक-यांना बँकस्तरावरुन अदा करणे बाबत कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र. पिवियो/सां-८/प्रमपिवियो/४७८/२०१७, दिनांक २८.०८.२०१७ व पिवियो/सां-८/प्रमपिवियो/४७९/२०१७ दिनांक २८.०८.२०१७ अन्वये संबंधीत बँकाना कळविण्यात आलेले आहे.<br>प्रधानमंत्री पिक विमा योजनेच्या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे शेतकरी बँकांच्या त्रूटींमुळे लाभापासून वंचित राहु नये यासाठी बँका व वित्तीय संस्थांच्या जबाबदाऱ्या निश्चित केल्या आहेत. संबंधित बँकाच्या त्रुटीमुळे / दिरंगाईमुळे / हलगर्जीपणामुळे काही कर्जदार शेतकऱ्यांना विमा |

तक्ता ३.१.२: शेतक-यांना विमा लाभापासून वंचीत करणे.

| जिल्हा | तालुका | बँक/FI | योजना | हंगाम | बँक/FI द्वारे उणिवांचे स्वरुप | बाधित शेतक-यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| अमरावती | मोर्शी | महाराष्ट्र बँक, मोर्शी | WBCIS | मृगबहार २०१४-१५ | चूकीचे महसूली मंडळ दर्शविण्यात आले. | ३ |
| | | भारतीय स्टेट बँक, लोहगाव | WBCIS | अंबीयाबहार २०१२-१३ | | ४ |
| अमरावती | मोर्शी | सेंट्रल बँक ऑफ इंडिया, नेरपिंगळई | NAIS | खरीप २०१४ | | २४६ |
| यवतमाळ | पुसद | सेंट्रल बँक ऑफ इंडिया, पुसद | NAIS | खरीप २०१४ | घोषणापत्र निर्धारीत तारखेच्या ७५ दिवसानंतर विलंबाने सादर केले. | १५ |
| यवतमाळ | नेर | YDCC यवतमाळ | WBCIS | खरीप २०१४ | संरक्षित क्षेत्र कमी दर्शविले. | २२० |
| एकूण | | | | | | ४८८ |

सर्व बँकांनी/FI नी लेखापरीक्षा आक्षेप मान्य केले. शासनाने नमूद केले की योजनेच्या अंमलबजावणीतील अशा प्रकारच्या हयगयीसाठी संबंधीत बँका/FI जबाबदार होत्या.

संरक्षण न मिळाल्यास व त्या हंगामात नुकसान भरपाई मंजूर झाल्यास विमा संरक्षित न झालेल्या सर्व शेतकऱ्यांना मंजूर नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी सर्वस्वी त्या बँकेची / शाखेची राहील असे नमुद केले आहे.

| | |
|---|---|
| **३.१.३.२: कर्जदार शेतक-यांचा अंतर्भाव नसणे**<br>WBCIS घटकासाठी असलेल्या NCIP मार्गदर्शक सूचनांच्या (फेब्रुवारी २०१४) परिच्छेद ५.३आणि २५.३.४ अनुसार सर्व शेतकरी ज्यांनी बँक/FI कडून अधिसूचीत पीकांसाठी हंगामी शेती ऑपरेशन्स(Seasonal Agricultural Operations-SAO)/किसान क्रेडिट कार्ड(KCC) कर्ज घेतली होती, त्यांचे योजनांतर्गत अनिवार्यपणे विमा संरक्षण झाले आहे, याबाबत बँकेने/FI ने खात्री करावी.<br>लेखापरीक्षेस असे निदर्शनास आले की तीन बँका/FI नी २०१४-१६ दरम्यान ८७,४३६ शेतक-यांना रु.६९७.१० कोटी कर्ज, त्यांचे या योजनेंतर्गत पूर्णत: विमा संरक्षण झाले आहे याबाबतची खात्री न करता प्रदान केले. यामुळे न केवळ योजनेच्या मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन झाले तर अधिसूचीत पीके ज्यासाठी कर्ज देण्यात आले, त्यासाठी असलेल्या पीक विमा संरक्षण लाभांपासून देखील शेतक-यांना वंचित ठेवण्यात आले.<br>सर्व बँका/FI नी लेखापरीक्षा आक्षेप मान्य केले. राज्य शासनाने नमूद केले की संबंधीत बँक/FI च्या सक्षम प्राधिका-यांस ही बाब कळविणेत येईल जेणे करुन भविष्यात अशा प्रकारच्या घटना टाळल्या जातील. | केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे, पिक विमा योजनेत कर्जदार शेतकऱ्यांचा सहभाग करुन घेण्याची जबाबदारी ही संबंधित वितीय संस्थेची आहे.<br>प्रधानमंत्री पिक विमा योजनेच्या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे शेतकरी बँकांच्या त्रुटींमुळे लाभापासून वंचित राहु नये यासाठी बँका व वितीय संस्थांच्या जबाबदाऱ्या निश्चित केल्या आहेत. त्यामध्ये, सर्व अग्रणी बँका / नोडल बँकांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील अधिसुचित पिकांसाठी घेतलेली सर्व कर्जे व कर्जदार शेतकरी योजनेअंतर्गत विमा संरक्षित केले जातील व एकही कर्जदार शेतकरी विमा संरक्षणापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी व त्याबाबतच्या सुचना बँकांनी आपल्या अधिनस्त सर्व शाखांना देण्यात याव्यात अशी तरतुद करण्यात आलेली आहे. बँकांकडून उपयोगिता प्रमाणपत्र मागविण्यात येत आहेत. |
| **३.१.३.३ शेतक-यांच्या खात्यात विमा देय रक्कम जमा न करणे/विलंबाने जमा करणे.**<br>NAIS आणि NCIP मार्गदर्शक सूचना(जुलै १९९९ आणि फेब्रुवारी २०१४) अनुसार नोडल बँकेद्वारे प्राप्त दावे सर्व माहितीनीशी प्रत्येक बँक शाखेत/FI मध्ये सात दिवसांत पाठवावयास पाहिजे आणि बँक शाखेने/FI ने ही दाव्याची रक्कम लाभार्थी शेतक-यांच्या खात्यात सात दिवसांच्या आत जमा करावयास पाहिजे. तसेच, विमा कंपन्याद्वारे नोडल बँकेस जारी करण्यात आलेल्या संवितरण आदेशानुसार प्रत्येक बँक/FI ने त्यांच्याद्वारे देण्यात आलेली दावा रक्कम लाभार्थी शेतक-यांना संवितरीत केल्या गेली आहे याची निशाणी म्हणून यथोचितरीत्या स्वाक्षरीत उपयोगिता प्रमाणपत्र(UC) विमा कंपन्यांना पाठवावयास पाहिजे.<br>लेखापरिक्षेस असे आढळले की निवडलेल्या पाच पैकी चार जिल्हयामध्ये, नऊ बँका/FI ने NAIS/WBCIS (खरीप हंगाम २०१४-१६) अंतर्गत रु. ७२.४९ कोटी ची पीक विमा दावा रक्कम नियत तारखेनंतर ४३ ते ४५६ दिवस लोटल्यानंतरही अनेक कारणांमुळे जसे माग लागत नसलेले लेखे, शेतक-यांच्या नावातील चुका, बँकेमधील मनुष्यबळाची कमतरता, कामाचा बोझा इत्यादी कारणामुळे ऑगष्ट २०१६ पर्यंत शेतक-यांच्या खात्यात जमा केली नाही. जर संबंधीत बँकेने/FI ने शेतक-यांनी प्रस्ताव प्रपत्रात भरलेल्या माहितीची(नाव, खाते क्रमांक, बँक शाखेचे नाव, पत्ता | केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे, पिक विमा योजनेतील लाभार्थ्यांना नुकसान भरपाई अदा करण्याची जबाबदारी ही वितिय संस्थेची आहे.<br>प्रधानमंत्री पिक विमा योजनेच्या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे सर्व बँकांनी योजनेअंतर्गत संबंधित विमा कंपनीमार्फत मंजूर झालेली नुकसान भरपाई रक्कम प्राप्त झाल्यानंतर संबंधित लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर ७ दिवसांच्या आत जमा करणे आवश्यक आहे. जर एखाद्या बँकेने नुकसान भरपाईची रक्कम विहीत वेळेत शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा केली नाही तर संबंधित बँकेने व्याजासह (बचत खात्यावर देय असलेला प्रचलित व्याज दर) नुकसान भरपाईची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करणे बंधनकारक आहे. |

| | |
|---|---|
| इत्यादी) सुरवातीलाच उलट तपासणी केली असती तर ही परिस्थिती टाळता आली असती.<br>तीन जिल्हयांत NAIS/WBCIS(खरीप हंगाम २०११-१५) अंतर्गत रु.११.६० कोटी रक्कम ऑगस्ट २०१६ पर्यंत तीन ते १,४७० दिवसांच्या विलंबाने शेतक-यांच्या खात्यात जमा करण्यात आली.<br>तसेच, दोन जिल्हयात (बीड आणि यवतमाळ), चार बँकानी/FI नी रु.४१.७१ कोटीची संपूर्ण विमा दावा रक्कम लाभार्थी शेतक-यांना वाटप केल्याचे प्रमाणित करुन त्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र विमा कंपन्यांना सादर केले. तथापि, बँकेच्या अभिलेख्यांच्या लेखापरीक्षा पडताळणीत लेखापरीक्षेस असे आढळले की संवितरीत केली आहे असे प्रमाणित केल्या असलेल्या दावा रक्कमेपैकी रु. ९.१० कोटी रक्कम(रु.४१.७१ कोटीपैकी) सप्टेंबर २०१६ पर्यंत बँक/FI कडेच होती.<br>राज्य शासनाने नमूद केले की याबाबतीत आवश्यक योग्य कारवाई करण्याच्या सूचना बँकांना देण्यात येईल आणि विमा कंपन्यांनाही बँकेकडून उपयोगिता प्रमाणपत्र घेण्याच्या सूचना देण्यात येईल. | |

**आर्थिक क्षेत्र अहवाल मार्च २०१६ रोजी संपलेले वर्षाचे अनुपालन**

प्रशासकीय विभाग- कृषि व पदुम

| मार्च २०१६ रोजी संपलेले वर्षाचे परिच्छेदातील आक्षेप | अभिप्राय |
|---|---|
| **३.१.४ उत्पन्न माहितीची विश्वसनीयता**<br>परिच्छेद ३.१.१ मध्ये आधीच नमूद केल्याप्रमाणे NAIS साठी करण्यात आलेल्या CCE नुसार काढण्यात आलेले प्रत्यक्ष उत्पन्न आणि उंबरठा उत्पन्न तसेच WBCIS च्या AWS द्वारे प्राप्त हवामान माहितीच्या आधारावर विमा दावे परिगणित करण्यात येतात. लेखापरीक्षेस असे निदर्शनास आले की राज्य शासन यंत्रणा (NAIS करिता) आणि तृतीय पक्ष हवामान माहिती पुरवठा (WBCIS करिता) यांच्याद्वारे काढण्यात आलेल्या उत्पन्न माहितीची विश्वसनीयता विश्वास ठेवण्याजोगी नव्हती, जी पुढील परिच्छेदांत चर्चिली आहे. | |
| **३.१.४.१ पीक कापणी प्रयोग**<br>NAIS मार्गदर्शक सूचनांच्या (जुलै १९९९) परिच्छेद ११ मध्ये अभिप्रत असल्याप्रमाणे राज्य शासनाला पीक उत्पन्नाचे निर्धारण करण्यासाठी अधिसुचीत विमा क्षेत्र घटकातील (मंडळ) सर्व अधिसूचीत आवश्यक असलेल्या CCE च्या संख्येचे नियोजन आणि आयोजन करावे लागेल. याकरिता राज्य शासनाने प्रपत्र-१ (CCE करिता क्षेत्र चिन्हांकित करण्यासाठी) आणि प्रपत्र-२(प्रत्यक्ष उत्पन्न जसे चिन्हांकीत केलेल्या जागेतील पिकाचे वजन नोंदविण्याकरीता) विहीत केले आहे. ही प्रपत्रे अत्यंत महत्याची आहेत. कारण प्रपत्र-१ आणि प्रपत्र-२ मध्ये नोंद केलेल्या माहितीच्या आधारवर प्रत्यक्ष उत्पन्न आणि उंबरठा उत्पन्न ठरविण्यात येते, जी मंडळातील शेतक-यांना प्रदान करावयाच्या असलेल्या विमा दावा रक्कमेच परिगणनेकरिता आधारभूत माहिती असते. चाचणी तपासणी केलेल्या TAOs च्या प्रपत्र -१ आणि प्रपत्र-२ च्या लेखापरीक्षा पडताळणीत खालील विसंगती निदर्शनास आल्या.<br>- पुसद तालुक्यामध्ये (जिल्हा यवतमाळ) दोन चिन्हांकित केलेल्या क्षेत्रात (सर्वे क्र. १४६ आणि २२२) जेथे २०१४-१५ च्या दरम्यान कापसाच्या पीकाकरिता CCE आयोजित करण्यात आल्याचे दर्शविले होते, तेथे प्रपत्र-२ मध्ये वजन दर्शविले नव्हते. परंतु TAOs च्याय संगणकीय अहवालात तेथील उत्पादन प्रपत्र-२ नुसार ६.४ कि.ग्रॅ.(सर्वे क्र.१४६) आणि ६.२ कि.ग्रॅ.(सर्वे क्र.२२२ दर्शविले होते. | पुसद तालुक्यातील कापूस व श्रीरामपुर तालुक्यातील कांदा या पिकाच्या पिक कापणी प्रयोगाच्या नोंदणीबाबत प्रस्तुत प्रकरणी योग्य ती पुढील कार्यवाही करणे बाबत विभागीय कृषि सहसंचालक, अमरावती व पुणे यांना अनुक्रमे पत्र क्र.कृआ/सां-६/आउअ/५०/२०१७ दिनांक २१.०८.२०१७ व कृआ/सां-६/आउअ/५१/२०१७, दिनांक २१.०८.२०१७ अन्वये कळविण्यात आले आहे.<br>प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत हंगामनिहाय पिक कापणी प्रयोगाची सरासरी उत्पादकतेची आकडेवारी बिनचूक व पारदर्शक होणेसाठी सन २०१६-१७ पासून मोबाईल ॲपचा वापर करण्यात येत आहे. |

| | |
|---|---|
| श्रीरामपूर तालुक्यामध्ये( जिल्हा अहमदनगर) सर्वे क्र.४८० च्या चिन्हांकित केलेल्या क्षेत्रात कांद्याच्या पीकाकरीता २०१४-१५ दरम्यान CCE आयोजित केल्याचे दर्शविले होते. परंतु, प्रपत्र क्र. २ मध्ये सर्वे क्र.४४४ करिता पीक उत्पादनाची नोंद केली होती. दुस-या प्रकरणात प्रपत्र-१ मध्ये चिन्हांकित केलेल्या क्षेत्रात(सर्वे क्र.१८४,२८८ आणि ३०९/६) २०१५-१६ दरम्यान कांद्याच्या पीकाकरिता CCE आयोजित केल्याचे दर्शविले होते. परंतु, प्रपत्र-२ मध्ये उत्पादन पेन्सिलीने नोंदविले आहे जे तलाठी(ग्राम स्तरावरील महसूल पदाधिकारी) द्वारे स्वाक्षरीत केले नव्हते.<br><br>जिल्ह्यातील CCE चे कार्यान्वयन संनियंत्रित करण्याच्या दृष्टीने DSAO प्रत्येक पीक हंगामापूर्वी कृषि विभाग, महसूल विभाग आणि जिल्हा परिषदांच्या अधिका-यांद्वारे पर्यवेक्षण करावयाच्या असलेल्या CCE ची संख्या जिल्हा स्तर संनियंत्रण समिती( जिल्हाधिकारींच्या नेतृत्वाखाली) च्या संमतीने विनिर्दिष्ट करतात. तीन जिल्ह्यात, खरीप आणि रब्बी २०१५ च्या CCE च्या पर्यवेक्षणात ४२ ते ५९ टक्के तुट होती.<br><br>राज्य शासनाने प्रपत्र-१ आणि प्रपत्र-२ मधील उणीवा मान्य केल्या आणि नमूद केले की या विसंगती नजरचुकीने झाल्या आहेत आणि आता CCE अधिक अचूक आणि प्रभावी करण्याकरिता प्रयत्न करण्यात येत आहेत. CCE च्या पर्यवेक्षणातील तुटीबाबत कोणतेही उत्तर देण्यात आले नाही. | |
| **३.१.४.२ WBCIS साठी स्वयंचलित हवामान स्टेशन**<br>WBCIS घटकाकरिता असलेल्या NCIP च्या मार्गदर्शक सूचनांच्या(फेब्रुवारी २०१४) परिच्छेद २५.६ अनुसार भारतीय हवामानशास्त्र विभाग(IMD), राज्य शासन, कृषि विद्यापीठ/स्वतंत्र तृतीय पक्ष यांचेच AWS आणि स्वयंचलित पर्जन्य मापक संदर्भीय हवामान स्टेशन(Reference Weather Stations-RWS) म्हणून अधिसूचीत करावयास पाहिजे. महाराष्ट्रात राज्य शासनाने दोन स्वतंत्र तृतीय पक्षांच्या AWS ना RWS असे अधिसूचीत केले आहे.AWS ची सर्व साधनसामग्री, हवामान संवेदक इत्यादी हे जागतिक हवामानशास्त्र संघटनेच्या विनिर्देशांप्रमाणे किंवा IMD द्वारे निर्गमित मार्गदर्शक सूचनांनुसार प्रमाणभूत, व्यवस्थित उभारलेले आणि नियमितपणे कॅलिब्रेटेड(Calibrated) केले आहे याबाबत तृतीय पक्षांनी (जे विमा कंपन्यांना माहिती पुरवितात) खात्री करावयास हवी. | संदर्भ हवामान केंद्र हे केंद्र शासनाने प्राधिकृत केलेल्या (नोंदणीकृत) त्रयस्त संस्थेमार्फत स्थापित केलेले हवामान केंद्र राहिल. सहभागी विमा कंपनी देय विमा रक्कम ठरविण्यासाठी अधिसूचित केलेल्या फळपिकासाठी व त्यासाठी निवडलेला जिल्हा व तालुक्यातील महसूल मंडळात नोंदणीकृत त्रयस्त यंत्रणेमार्फत स्थापित केलेल्या संदर्भ हवामान केंद्रामध्ये नोंद झालेल्या आकडेवारीचा वापर करुन त्यावर आधारित योजनेच्या तरतूदी (फळपिकनिहाय प्रमाणके)नुसार निश्चित करण्यात आलेली नुकसान भरपाई अदा करतील.<br>नुकसान भरपाई रक्कम परस्पर बँकेद्वारे शेतकऱ्यांना अदा करतात.योजनेच्या |

| | |
|---|---|
| DSAO, औरंगाबाद द्वारे संचालक फलोत्पादन, पुणे यांना सादर केलेल्या(डिसेंबर २०१३) हवामान स्टेशनच्या निरिक्षण अहवालाच्या पडताळणीत असे निदर्शनास आले की दोन जिल्ह्यातील २२ पैकी १० AWS व्यवस्थीतपणे काम करत नव्हते.(प्रदर्शन- display करणारे घटक कार्य करत नव्हते आणि सोलर पॅनेल्स AWS सोबत उभारण्यात आले नव्हते). तसेच, DSAO, धुळे यांनी सादर केलेल्या (डिसेंबर २०१४) निरिक्षण अहवालावरुन असे निदर्शनास आले की ३९ पैकी २५ AWS योग्य जागी उभारण्यात आले नव्हते(AWS ना विद्युत लाईन्स, मोबाईल टॉवर्स, अति उंच इमारती, झाडे इत्यादी मुळे अडथळा झालेला आढळला).<br>AWS मध्ये संकलीत केलेली माहिती विश्वसनीय प्रतीत होत नव्हती कारण AWS विनिर्दिष्ट मार्गदर्शक सूचनांनुसार उभारण्यात आले नव्हते, परंतु तरीही त्या माहितीचा उपयोग WBCIS अंतर्गत दाव्यांचा निपटारा करण्यासाठी करण्यात आला.या वस्तुस्थितीला भारत सरकारच्या कृषि मंत्रालयाने सर्व राज्यांच्या प्रधान सचिवांना पाठविलेल्या फेब्रूवारी २०१४ च्या पत्राचा आधार होता, ज्यात असे नोंदविले होते की तृतीय पक्ष हवामान माहिती पुरवठादारांनी AWS ची उभारणी आणि रखरखाव विहित मार्गदर्शक सूचनांनुसार केली नव्हती.<br>राज्य शासनाने वस्तुस्थिती मान्य केली आणि नमूद केले की राज्यांच्या मालकीचे AWS उभारण्याकरीता सुरुवात करण्यात येत आहे. | संदर्भात प्राप्त होणाऱ्या तक्रारी व स्वयंचलित हवामान केंद्राच्या प्राप्त तक्रारींचे निरसन विभागस्तरावरील व उपविभाग स्तरावरील समितीमार्फत करण्यात येते.तसेच विमा कंपन्यांना महसूल मंडळनिहाय स्वयंचलित हवामान केंद्राची आकडेवारी कृषि विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे बंधनकारक आहे. तसेच संदर्भ हवामान केंद्रामार्फत काही कारणास्तव आकडेवारी प्राप्त झाली नाही तर त्या कालावधीपुरती पर्यायी राज्य शासनाच्या / कृषि विद्यापिठे, कृषि विज्ञान केंद्र, किंवा नजीकच्या मंडळातील संदर्भ हवामान केंद्राची आकडेवारी विचारात घेऊन देय विमा रक्कम निश्चित करण्यात येईल. ही आकडेवारी प्राप्त करुन घेण्याची सर्वस्वी जबाबदारी सहभागी विमा कंपन्यांची असते.<br>राज्य शासनामार्फत राज्यात प्रत्येक महसूलमंडळ स्तरावर केंद्र शासनाच्या निकषाप्रमाणे स्वयंचलित हवामान केंद्र उभारण्यासाठी महावेद प्रकल्प सन २०१७ मृग बहारापासून राबविण्यास सुरुवात केली आहे. सदर प्रकल्प प्रगतीपथावर आहे. |
| **३.१.५ तक्रार निवारण पध्दतीचा अभाव**<br>मंत्रालय/आयुक्तालय/ जिल्हास्तरीय अभिलेख आणि त्यांचेद्वारे लेखापरीक्षेस उपलब्ध करुन दिलेल्या माहितच्या पडताळणीस असे निदर्शनास आले की पीडीत शेतक-यांच्या तक्रारींचे निवारण करण्याकरीता असलेली यंत्रणा आणि कार्यप्रणाली अपर्याप्त होती.<br><br>जसे, COA , पुणे यांनी मार्च २०१४ ते मार्च २०१६ दरम्यान पीडित शेतक-यांपासून प्राप्त झालेल्या ३३८ तक्रारी फक्त विमा कंपन्यांना पुढील कारवाईकरिता अग्रेषित केल्या. तथापि, तक्रारी त्यांच्या अंतिम परिणामापर्यंत संनियंत्रितही करण्यात आल्या नाहीत. शेतकरी किंवा स्थानिक प्रतिनिधींद्वारे मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयात करण्यात आलेल्या तक्रारीही विना कार्यवाही पडून आहेत.<br><br>राज्य शासनाने नमूद केले की आपले सरकार हे तक्रार निवारण पोर्टल राज्यात कार्यरत | प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत विमा नियामक प्राधिकरणाने निश्चित केलेल्या विहित कालावधीत योजनेसंदर्भातील विविध तक्रारींचे निवारण करण्यात यावे.तसेच शेतक-यांच्या तक्रारींची नोंद घेण्यासाठी भारतीय कृषि विमा कंपनीच्या नियंत्रणाखाली डॉकेट सुविधेवर आधारित टोल फ्री नंबर उपलब्ध करुन देण्याबाबत सूचना आहेत. |

| | |
|---|---|
| आहे आणि या पोर्टल मार्फत सादर करण्यात आलेल्या सर्व तक्रारी संनियंत्रित करण्यात येत असून त्यांचे निवारण करण्यात येत आहे.<br>उत्तर समर्थनीय नाही कारण शेतक-यांनी त्यांच्या तक्रारी इलेक्ट्रॉनिक पध्दतीने नोंदविणे अपेक्षीत नाही. याशिवाय आपले सरकार हे पोर्टल राज्य शासनाने सामान्य जनतेच्या तक्रारींचे निदान करण्यासाठी तयार केले आहे. म्हणूनच, शेतक-यांच्या पीक विमा बाबतच्या अडचणींचे निदान करण्यासाठी एक समर्पित व्यासपीठ उच्च स्तरावर असण्याची गरज आहे. | |
| **३.१.६ निष्कर्ष आणि शिफारशी**<br>राज्यात कृषि पीक विमा योजना(NAIS आणि WBCIS) मागील १५ वर्षापेक्षा जास्त अवधीपासून राबविण्यात येत असल्या तरीही राज्य शासन शेतक-यांना मिळणारे विमा लाभांचे आकलन करण्यासाठी विमा क्षेत्र घटक म्हणून ग्रामपंचायत स्तरापर्यंत पोचू शकले नाही.<br>राज्य शासनाने ग्रामपंचायतींना विमा क्षेत्र घटक म्हणून अंमलता आणण्यासाठी योग्य ते पाऊल उचलावे जेणेकरून उंबरठा उत्पन्नाचे निर्धारण जास्त अचूक राहिल आणि विमा दाव्यांचे निर्धारण आणि अदायगी वास्तववादी राहिल.<br>अशा घटना आढळल्या ज्यात काही हंगामात अधिसूचना जारी करण्यात आणि विमा कंपन्यांना विमा हप्ता/विमा दावा अनुदान देण्यात विलंब झाला. राज्य शासनाद्वारे लागवडीखालील क्षेत्राची माहिती आणि विमा कंपन्याजवळ विमा घेतलेल्या क्षेत्राबाबत असलेली माहिती यांची उलट तपासणी घालून मेळ करण्यासाठी कोणतीही पध्दती नाही.परिणामी, शेतक-यांना विमा देय रक्कमेची दुबार/अनेकदा अदायगी करण्यात आली. | सद्यस्थितीत पिक विमा योजना राज्यात महसुल मंडळ / मंडळगट स्तरावर राबविण्यात येते. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार योजनेची अंमलबजावणी ग्रामपंचायत स्तरावर करावयाची झाल्यास पिक कापणी प्रयोगांमध्ये मोठया प्रमाणावर वाढ होते. भविष्यात राज्यात पिक विमा योजनेची अंमलबजावणी ग्राम पंचायत स्तरावर करणेस्तव आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे दृष्टीने राज्यात सन २०१४-१५ व सन २०१५-१६ मध्ये पथदर्शक प्रकल्प राबविणेत आले आहेत. त्याचा तपशील प्रपत्र १ मध्ये सोबत जोडलेला आहे. सदर पथदर्शक प्रकल्पातुन आलेले निष्कर्ष केंद्र शासनाच्या "महलानोबीस राष्ट्रीय पिक पुर्वानुमान केंद्र", नवी दिल्ली यांना अभिप्रायास्तव पाठविण्यात आले आहेत. त्यावरील त्यांचेकडून प्राप्त होणाऱ्या अभिप्रायानुसार योजनेची अंमलबजावणी ग्रामपंचायतस्तरावर करणेच्या दृष्टीने कार्यवाही करणेत येईल. या संदर्भात राष्ट्रीय स्तरावर प्रयोग सुरु असून त्या निष्कर्षाचे आधारे विश्वासार्ह प्रक्रिया केंद्र शासनाचे मार्गदर्शनाखाली अवलंबिण्यात येईल. |

| | |
|---|---|
| लागवडीखालील क्षेत्राची माहिती आणि विमा घेतलेले क्षेत्र यांची उलट-तपासणी करुन त्यांचा मेळ घालण्यासाठी एखाद्या पध्दतीचा अवलंब करावयास पाहिजे जेणे करुन शेतक-यांना दाव्यांची दुबार/अनेकदा अदायगी होणार नाही.यासाठी सॅटेलाईट प्रतिमा आणि रिमोट सेन्सिंग टेक्नोलॉजीचा उपयोग करावयाची पध्दती लवकरात लवकर अंमलात आणली पाहिजे.<br>कर्जदार शेतक-यांना अनिवार्यरित्या योजनेत सामिल करुन घेण्याची बँका/FI ने खात्री केली नाही. तसेच त्यांनी प्रस्ताव प्रपत्रांची सुध्दा काळजीपूर्वक पडताळणी केली नाही ज्यामुळे त्यात त्रुटी/उणीवा/चुका राहिल्या. शेतक-यांच्या खात्यात दावा रक्कम जमा करण्यात खूप विलंब होत होता आणि काही ठराविक प्रकरणात तर दावा रक्कम जमाच करण्यात आली नाही.<br>राज्य शासनाने खात्री करावी की बँका/FI नी विमा प्रस्तावांवर काळजीपूर्वक पडताळणी करावी आणि एखादी अशी पध्दती अवलंबावी ज्यद्वारे शेतक-यांच्या खात्यात दावा रक्कम जमा न करण्याची/ विलंबाने जमा करण्याची प्रकरणे न घडण्याची खात्री करता येईल.<br>दाव्यांचा निपटारा करण्यासाठी आधारभूत असलेली पीक कापणी प्रयोग/स्वयंचलित हवामान स्टेशन्सची माहिती विश्वसनीय नव्हती. तक्रार निवारण पध्दती कमकुवत होती. | राज्यातील विविध पिकाखालील लागवडी खालील क्षेत्राची माहिती उपग्रहप्रतिमा व रिमोट सेन्सिंग तंत्रज्ञानाचा वापर करुन संकलित करण्याचे दृष्टीने केंद्र शासनाच्या महलानोबीस राष्ट्रीय पिक पुर्वानुमान नवी दिल्ली यांचे मार्फत राज्यात सन २०१३ पासून पथदर्शक प्रकल्प राबविण्यात येत आहे. सन २०१३-१४ ते सन २०१६-१७ मध्ये राबविण्यात आलेल्या प्रकल्पांतर्गत जिल्हे व पिके यांची माहिती प्रपत्र २मध्ये सोबत जोडलेली आहे. या प्रकल्पाचे हंगामनिहाय निष्कर्ष वेळोवेळी केंद्र शासनास सादर करण्यात आले आहेत. महलानोबीस राष्ट्रीय पिक पुर्वानुमान नवी दिल्ली यांचे सुचनेनुसार याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.<br>योजनेच्या अंमलबजावणीमध्ये पारदर्शकता येण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाने योजनेत सहभागी होणाऱ्या शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पिक विमा योजनेमध्ये शेतकऱ्यांचे बचत खाते आधारकार्ड सोबत संलग्न करणे अनिवार्य केले असुन राज्यातील व देशातील सर्व शेतकऱ्यांच्या योजनेतील सहभागाची माहिती केंद्र शासनाने विकसीत केलेल्या www.agri-insurance.gov.in वेबपोर्टलवर अद्ययावत करणे अनिवार्य केले आहे. प्रधानमंत्री पिक विमा योजनेच्या मार्गदर्शक सुचनांमध्ये संरक्षित विमा क्षेत्र व पेरणी क्षेत्रातील तफावतीबाबत करावयाच्या कार्यवाही संबंधी सुचना नमुद केल्या आहेत. त्या प्रमाणे कार्यवाही करणेत येत आहे.<br>शेतक-यांच्या विमा प्रस्तावांची काळजी पुर्वक पडताळणी करण्याच्या दृष्टीने व शेतकयांच्या बँक खात्यात नुकसान भरपाई रक्कम जमा करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येत असून शेतकयांचे बँक खाते आधार क्रमांकाशी संलग्न करण्यात येत आहे. तसेच योजनेत सहभागी होणाया शेतक-यांचे अर्ज ऑनलाईन घेणेचे दृष्टीने राज्यात आपले सरकार सेवा केंद्रांची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. |

**OFFICE OF THE ACCOUNTANT GENERAL (AUDIT)-II, MAHARASHTRA, NAGPUR**

**No.NGP/PAC cell/UOR/3.1/2015-16/ Date -10- 2017**

Seen and returned the UOR in original received from Government of Maharashtra, Agriculture, Animal Husbandry, Dairy Development & Fisheries Department, Mantralaya, Mumbai vide dated 16-09-2017 with the following remarks:

| Para no. & Year of AR | Subject in brief | Audit Comments |
|---|---|---|
| 3.1.2.1 | Non-adoption of Gram Panchayat as Unit Area of Insurance | Reasons for delay of 15 years may be stated.<br>In order to have more accurate yield/threshold yield it is necessary to adopt Gram Panchayat as unit area of insurance. as contemplated in NAIS guidelines. Therefore, this should be achieved even if there is increase in number of crop cutting experiments. Detailed plan along with time frame for reaching up to the level of Gram Panchayat as Unit Area of Insurance may be stated.<br>Date of sharing the results of four pilot projects in the year 2014-15 and 2015-16 with Mahalanobis Crop Forecasting Centre, New Delhi and the follow-up made may be stated. |
| 3.1.2.2 | Delay in issue of Government Notification | Department has neither justified the delay in issue of notification for the period pointed out by Audit nor quoted any reasons for such delay. Though department has put forth statistics indicating increase in participation of farmers in the scheme, fact remains that notifications were not issued in time. |
| 3.1.2.3 | Delay in Release of Premium and claim subsidies | The reply that re-tendering and negotiation with bidding insurance companies resulted in delay in distribution of insurance subsidy, is not acceptable as these are to be planned in such a way that no delay is occurred.<br>Department has not submitted concrete reasons for delay in release of premium and claim subsidies during the period pointed out by Audit. Delay in release of premium / claim subsidy resulted in late settlement of insurance claim of the farmers.<br>PAC may direct the Finance Department to release the premium and claim subsidies provided in budget without any delay. |
| 3.1.2.4 | Irregular continuation of Insurance Companies without competitive Bidding | Reply is not acceptable. The guidelines given in para 8.3.1 is to be adopted among the empanelled insurance companies who has submitted the proposals in enclosed sealed envelope. In order to decide the best suited insurance companies competitive bidding is must. By allowing participation of a particular insurance company for two consecutive years without competitive bidding |

| | | |
|---|---|---|
| | | vitiated health competition among the insurance companies.<br>Reply that the guidelines are common for MNAIS and WBCIS being two components of NCIP is not acceptable as MNAIS has not been implemented after 2011, and there are separate provisions for WBCIS. |
| 3.1.2.5 | Payment of Dual/Multiple Claims to Farmers | Department has not commented upon payment of dual / multiple claims. The results of instruction issued to settle the issue in discrepancy in insured area and sowing area may be stated.<br>From which year Aadhar has been made compulsorily for the farmers. |
| 3.1.3.1 | Depriving farmers of benefits | Whether it has been ensured that the Banks has paid the claims to the beneficiaries from Banks own funds. If not, what action is taken against the concerned banks?<br>What action has been planned/taken to ensure that such incidents do not occur in future. |
| 3.1.3.2 | Non-coverage of Loanee Farmers | As per Para 21.2 of WCIS and para 19.2 of MNAIS guidelines, state govt. may review the progress of the scheme periodically and undertake impact assessment after completion of each season and send their suggestions and recommendation to the Govt. of India, Ministry of Agriculture, for making further improvement in the scheme. Action taken in this regard may p[lease be communicated to the PAC.<br>A mechanism should be devised to ensure that all the farmers are compulsorily registered and Government cross check the same. |
| 3.1.3.3 | Delayed/non-credit of Insurance Claims into Farmer's Accounts | Whether insurance claims amounting to Rs. 72.49 Crore under NAIS / WBCIS (Kharip 2014-16) has been credited to the accounts of claimant farmers?<br>Whether the Bank/FIs has paid interest for keeping the claim amount with them beyond the defined time? Have the department ensured that the Banks/FIs has paid interest for the delayed period to the eligible farmers?<br>As per Para 21.2 of WCIS and para 19.2 of MNAIS guidelines, state govt. may review the progress of the scheme periodically and undertake impact assessment after completion of each season and send their suggestions and recommendation to the Govt. of India, Ministry of Agriculture, for making further improvement in the scheme.<br>In view of above provisions action taken by State Govt. in the matter of non-credit / delayed credit of insurance claims to farmer's accounts, may be stated.<br>An effective mechanism should be evolved to ensure that instances of delayed/non-credit of Insurance claims into Farmers' accounts do not occur. Mechanism should be put in place to ensure that the particulars filled by farmers in the proposal forms are cross checked by the concerned Banks/FIs so |

| | | |
|---|---|---|
| | | that insurance claims are not rejected only because of technical lapses. |
| 3.1.4.1 | Crop Cutting Experiments | Action taken by the Joint Director of Agriculture, Amravati and Pune may be intimated to PAC. |
| 3.1.4.2 | Automatic Weather Stations for WBCIS | Reasons for delay in taking action on the inspection reports submitted in 2013 and 2014 may be stated.<br>Details viz. time frame, target prescribed etc for setting up an automatic weather station at every circle in the state planned by the department may be stated. |
| 3.1.5 | Absence of Grievance Redressal System | Follow up action taken in respect of the 338 complaints received after it was reported by the audit, may please be stated.<br>Steps taken / contemplated to establish effective GRS may be informed to PAC. |
| 3.1.6 | Conclusions and recommendations | 1. Schemes needs to be implemented at Gram Panchayat level as contemplated in the guidelines.<br>2. Responsibility needs to be fixed for non crediting / delayed crediting of insurance claim.<br>3. Accountability needs to be fixed on certain agency for timely disposal of insurance claim. In case of difault in the payment of claim, responsibility needs to be fixed. |

Sd/-
**Audit Officer/PAC Cell**

---

To,
**The Secretary,**
Agriculture, Animal Husbandry,
Dairy Development & Fisheries Department,
Mantralaya, Mantralaya,
**MUMBAI – 400 032.**

# सन २०१५-१६ या वर्षाच्या आर्थिक क्षेत्र अहवालाच्या संदर्भातील स्पष्टीकरणात्मक ज्ञापन
## विद्यापीठाचे नाव — डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

| परिच्छेद क्र.३.९ | भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या पुस्तकात घेण्यात आलेला आक्षेप | पृ.क्र. | अभिप्राय | शासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | मानव विकास मिशन अंतर्गत २०१२-१३ मध्ये खरेदी केलेल्या आठ फिरत्या माती परीक्षण प्रयोगशाळा व्हॅन त्रुटिपूर्ण नियोजनामुळे आणि कमकुवत कार्यान्वयनामुळे उद्दिष्ट साध्य करण्यात विफल ठरल्या, परिणामी रु.२.८० कोटी खर्च निष्फळ ठरला. | | | |

**स्तंभ २:**

महाराष्ट्र शासनाने सुरु केलेल्या (जून २००६) मानव विकास मिशन अंतर्गत, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवून त्यांच्या सशक्तीकरणासाठी आणि मानव विकास सूचकांक उंचावण्यासाठी राज्याच्या नियोजन विभागाने जुलै २०११ मध्ये मार्गदर्शक तत्वे निर्गमित केली होती. हया मिशन अंतर्गत एक योजना अशी होती ज्याद्वारे शेतकऱ्यांना मातीच्या स्थितीबाबत महत्वाची माहिती पुरविणे आणि शेती उत्पन्नाच्या वाढीसाठी योग्य रासायनिक खताचा वापर शिकविणे याबाबत फिरते माती परीक्षण प्रयोगशाळा व्हॅन्सची सुविधा पुरवित होती. मिशनच्या मार्गदर्शक तत्वानुसार राज्य कृषि विद्यापीठातर्गत असलेल्या कृषि विज्ञान केंद्रांनी (KVKs) या व्हॅन्सचे कामकाज, देखभाल व दुरुस्ती केवळ माती परीक्षणातून मिळालेल्या प्राप्तीतूनच करावयास पाहिजे.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी (DSAO), अकोला यांनी २०११-१२ मध्ये डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला ला त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणा खाली असलेल्या चार कृषि विज्ञान केंद्रासाठी आठ फिरत्या व्हॅन्सच्या खरेदीसाठी (प्रत्येक KVK साठी दोन व्हॅन्स) रु.२.८० कोटी वितरीत केले. या आठ ही फिरत्या व्हॅन्सची खरेदी, सुसज्जता आणि कार्यान्वयन २०१२-१३ मध्ये करण्यात आले. DSAO, अकोला हे या योजनेचे नोडल अधिकारी होते व योजनच्या संपूर्ण संनियंत्रासाठी जबाबदार होते.

विद्यापीठाच्या दस्तावेजांच्या पडताळणी (एप्रिल २०१५) असे आढळले की २०१२-१३ मध्ये व्हॅन्स कार्यान्वित झाल्यापासून ते २०१६-१७ (जून २०१६) पर्यंत चारही कृषि विज्ञान केंद्र माती नमूनयाच्या तपासणीचे वार्षिक लक्ष्य (विद्यापीठाने ठरविलेले) साध्य करण्यात खाली तक्ता ३.९.१ मध्ये दर्शविल्या प्रमाणे असमर्थ राहिले.

तक्ता ३.९.१ : माती नमून्याच्यातापसणीसाठी निश्चित केलेल्या लक्ष्याविरुध्द KVKs चे साध्य

**स्तंभ ४:**

मानव विकास अभियान या कार्यक्रमांतर्गत डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठच्या विस्तार शिक्षण संचालनालय, अकोला अंतर्गत असलेल्या खालील कृषि विज्ञान केंद्रामध्ये फिरत्या माती प्रयोगशाळेची निर्मिती झाली असून त्यासाठी संबंधीत जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय यांचे कडून प्रशासकिय मान्यता देण्यात आली. तसेच संबंधीत जिल्हयातील जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे द्वारा उपरोक्त कार्यक्रमासाठी रू. ३५ लाख प्रति वाहन या प्रमाणे ४ कृषि विज्ञान केंद्रांना प्रत्येकी दोन वाहनाकरीता (कृषि विज्ञान केंद्र, साकोली (भंडारा), हिवरा (गोंदिया), सोनापूर (गडचिरोली) आणि सिंदेवाही (चंद्रपूर)) करीता असे एकुण ०८ वाहनाकरीता या प्रमाणे रू. २८० लाख इतका निधी सन २०११-१२ मध्ये विद्यापीठामध्ये नियंत्रक, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ यांचे नावे प्राप्त झाला. त्यानुसार नियंत्रक, डॉ. पंदेकृवि यांनी संबंधीत कृषि विज्ञान केंद्रांना अनुदान वाटपाचे आदेश दिलेत. त्यानुसार संबंधीत कृषि विज्ञान केंद्रांनी वाहने खरेदी केलीत. वाहने खरेदी झाल्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यावर या संबंधीतची AUC संबंधीत जिल्हयाच्या जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेकडे सादर करण्यात आली.

| अ. क्र. | कृषि विज्ञान केंद्राचे नाव | जिल्हा | मंजुरी प्रयोग शाळांची संख्या | प्राप्त निधी (लक्ष) | नियंत्रक पं.दे.कृ.वि. आकोला यांचा आवंटन आदेश क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| १. | कृषि विज्ञान केंद्र, साकोली | भंडारा | २ | ७०.०० | ९०५, दि. २७/०६/२०१२ |
| २. | कृषि विज्ञान केंद्र, हिवरा | गोंदिया | २ | ७०.०० | ६९९, दि. ०३/०८/२०१२ |
| ३. | कृषि विज्ञान केंद्र, सोनापुर | गडचिरोली | २ | ७०.०० | ५७६, दि. १९/०७/२०१२ |
| ४. | कृषि विज्ञान केंद्र, सिंदेवाही | चंद्रपुर | २ | ७०.०० | ३३१८, दि. ०२/०७/२०१२ |

फिरत्या माती परिक्षण प्रयोगशाळा मंजुर झालेल्या केंद्रामध्ये पहिली फिरती प्रयोगशाळा कृषि विज्ञान केंद्र, गोंदिया येथे नोव्हेंबर २०१२ दरम्यान उपलब्ध झाली व शेवटची फिरती प्रयोगशाळा कृषि विज्ञान केंद्र, सिंदेवाही व गडचिरोली येथे मे २०१३ मध्ये उपलब्ध झाल्यात. त्यानंतर संबंधीत जिल्हयाच्या वाहतुक निरिक्षक कार्यालयाकडून वाहनांची नोंदणी करण्यात आली. ही सर्व वाहने संबंधीत जिल्हयाच्या जिल्हाधिकारी यांचे नावे आर.टी.ओ. कार्यालयात नोंदणी करण्यात आली आहे.

**सर्व माती परिक्षण प्रयोगशाळा वाहने कार्यान्वित होतांना आलेल्या अडचणीचा तपशिल**

१. प्रयोग शाळांकरीता वाहन चालक, कुशल तज्ञ, सहाय्यक पूर्ण वेळ कार्यरत असणे आवश्यक आहे. त्याकरीता कृषि विज्ञान केंद्राकडे मनुष्यबळ उपलब्ध नाही. सद्यस्थितीत कृषि विज्ञान केंद्रामध्ये ७५ टक्के तांत्रिक पदे रिक्त आहेत.

**स्तंभ ५:**

कोणत्याही योजनेकरिता मांडवली खर्चाचा प्रस्ताव मंजूरीस सादर करताना कृषि विद्यापीठाकडून उपलब्ध मनुष्यबळ, खेळते भांडवल, Cash Flow विचारात घेणे क्रमप्राप्त आहे. सदर प्रकरणी विद्यापीठ यांनी दिलेला खुलासा समर्पक असल्याचे दिसून येत नाही.मानव विकास कार्यक्रमा अंतर्गत सदर प्रकल्प मंजूर असल्यामुळे आयुक्त मानव विकास यांचे अभिप्राय घेणे क्रमप्राप्त आहे असे दिसून येते.

| KVK चे नाव | दोन फिरत्या व्हॅन्स साठी माती नमून्यांच्या तपासणीसाठी प्रति वर्ष निश्चित केलेले लक्ष्य | लक्ष्य साध्य संख्या | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ (जून २०१६) |
| सोनापूर | ५००० | ० | २५० | ४५० | १०२० | ३०० |
| हिवरा | १०८०० | ० | ० | ० | ० | ० |
| साकोली | ६००० | १३२ | ४३५ | ०८ | ३६७ | ७०९ |
| सिंदेवाही | ९६०० | ० | ० | ० | २०० | ० |

स्त्रोत: पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाद्वारे सादर केलेली माहिती

वरील तक्ता ३.९.१ वरुन असे स्पष्ट दिसते की २०१५-१६ मध्ये KVK, सोनापूर मध्ये सर्वात जास्त म्हणजेच २० टक्के लक्ष साध्य झाले, जेव्हा की २०१२-१७ दरम्यान KVK, हिवरा मध्ये योजनेची सुरुवात झाली नव्हती.

लेखापरीक्षा विश्लेषणात असे आढळले की मिशन मार्गदर्शक तत्वांमध्ये असे विनिर्दिष्ट केले आहे की फिरत्या व्हॅन्सचे कामकाज, देखभाल व दुरुस्ती यासाठी केवळ KVKs जबाबदार असतील आणि राज्य शासनाद्वारे या संदर्भात निधी देण्यात येणार नाही. तथापि मार्गदर्शक तत्वांमध्ये KVKs द्वारे सुरुवातीच्या काळात या फिरत्या वाहनांचे व्यवस्थापन कसे करावयाचे आहे हे विनिर्दिष्ट केलेले नाही.

या व्हॅन्स कुशल तंत्रज्ञ (मातीचे नमूने तपासण्यासाठी) वाहनचालक, वाहनांच्या दैनिक गतिविधींसाठी आणि देखभाल/दुरुस्तीसाठी निधी यांची तरतूद न करता KVKs च्या सुपूर्द करण्यात आल्या. DSAO, अकोला हे नोडल अधिकारी होते तथा योजनेच्या संनियंत्रणाची संपूर्ण जबाबदारी त्यांची होती आणि KVKs सोबत मासिक कार्यशाळा घेण्यात येत असल्याचे ही त्यांनी नमूद केले होते. परंतु तरीही २०१२-१७ दरम्यान माती नमून्यांच्या परिक्षणाचे निश्चित लक्ष्य साध्यतेचे अतिशय कमी प्रमाण यावर ते मार्ग काढू शकले नाही.

अशाप्रकारे, योजनेचे त्रुटीपूर्ण नियोजन आणि कमकुवत कार्यान्वयेन यामुळे रु.२.८० कोटीचा निष्फळ खर्च झाला आणि योजनेचे वांछित उद्दिष्ट पूर्ण झाले नाही.

विद्यापीठाने लेखापरीक्षा निरीक्षण मान्य केले (मे २०१५)

ही बाब शासनास कळविण्यात आली (मे २०१६) डिसेंबर २०१६ पर्यंत त्यांचे उत्तर प्रतिक्षित होते.

२. इंधन, रसायने, वाहन दुरुस्ती इ. करीता निधीची तरतुद नाही.
३. आदिवासी बहुल जिल्ह्यांमध्ये शेतकरी माती परिक्षणाबाबत जाणीव नाही व जास्त रुपये खर्च करण्यास तयार नाही.
४. शेतकरी परिक्षणाचे दर देण्यास तयार नाहीत कारण हे दर शासकिय दरा पेक्षा खूप जास्त आहेत व शासकिय दरामध्ये माती परिक्षण करून देणे कृषि विज्ञान केंद्रांना शक्य नाही.
५. मानव विकास मिशन अंतर्गत एका प्रयोगशाळेकरीता ५४०० नमुने (प्रति वर्ष) हे तपासून देणे शक्य नाही. कारण खरीप हंगामाच्या पूर्वी पाच महिण्यामध्ये आदर्श माती नमुणे घेणे शक्य नाही.
६. वाहनांकरीता आवंटीत केल्या गेलेला निधी पुर्णत: व्हॅन तयार होण्याकरीता खर्च झाला आहे. हयानंतर मनुश्यबळ, रसायने, इंधनाकरीता निधी उपलब्ध झाला नाही. या संबंधीचे मागणी प्रस्ताव संबंधीत जिल्हयाच्या जिल्हा नियोजन समिती/नाबार्ड/आत्मा तसेच इतर शासकीय संस्थाना सादर करण्यात आले होते.
७. दोन्ही वाहनास लागणारे इंधन, रसायने व कायम मनुश्यबळ, गॅस सिलेंडर, वाहन चालक व प्रयोगशाळेतील कर्मचाऱ्यांचे (प्रत्येकी दोन) वेतनाचा खर्च प्रती माती नमुना तपासणी दर रू. १५ /- प्राप्त मिळकतीतून हा खर्च भागविने अशक्य होते.
८. कृषि सहाय्यक व तालुका कृषि अधिकारी व त्या गावातील सरपंच, संपर्क व्यक्ती यांच्याशी प्रत्यक्ष ठरवुन सुध्दा गावपातळीवर माती परीक्षण प्रयोगशाळेचे वाहन नेल्यास शेतकऱ्यांकडून पाहिजे त्याप्रमाणे नमुने प्राप्त होत नाहीत. अशा परिस्थितीत वाहनाचा संपुर्ण खर्च संबंधीत जिल्हयाच्या कृषि विज्ञान केंद्रास सहन करावा लागतो.

वरील नमुद अडचणीमुळे वाहने जरी क्रियाशील होऊ शकली नाही परंतू सदर वाहनांमुळे शेतकरी बांधवामध्ये माती परिक्षणबाबत जागरूकता निर्माण होण्यास निश्चीतच मदत झाली आहे. त्याशिवाय वाहनाचा खालील प्रमाने पण उपयोग झाला.

**माती परिक्षणा व्यतीरिक्त फिरत्या परिक्षण प्रयोगशाळेचा उपयोग**

१. शेतकरी वर्गात माती परिक्षणाबाबत माती परिक्षणाचे महत्व व फायदे याबाबत जागृकता निर्माण करीत आहे.
२. हे वाहन निव्वळ फिरते मृद परिक्षण प्रयोगशाळा न राहता कृषि तंत्रज्ञान प्रसाराचे उत्कृष्ट मॉडेल झाले आहे.
३. माती परिक्षणचे महत्व या विषयावर ५००० हुन अधिक शेतकऱ्यांमध्ये घडीपत्रिकेचे वितरण करण्यात आले.
४. वाहनामध्ये बसविलेल्या दुरचित्रवाणी संचाच्या सहाय्याने तंत्रज्ञानाच्या चित्रफिती दाखविण्यात आल्यात.
५. संबंधीत जिल्हयांमध्ये आयोजित कृषि प्रदर्शनीध्ये वाहने प्रदर्शित करून माती परिक्षणाबाबत जागरूकता निर्माण करण्यात आली.
६. कृषि विज्ञान केंद्र, भंडारा (साकोली) कडे उपलब्ध फिरती माती परिक्षण वाहनाचे माध्यमातुन डिसेंबर, २०१२ ते मार्च २०१५ या वर्षात प्रत्यक्ष १७७ खेड्यांमध्ये जाऊन ४५६६ शेतकऱ्यांना मातीचे आरोग्यविषयी मार्गदर्शन करण्यात आले असुन ५७५ मातीचे नमुने तपासणी करून शेतकऱ्यांना मातीचे आरोग्यविषयी आरोग्य पत्रिका देण्यात आली आहे.

**माती परिक्षण प्रयोगशाळा गतिमान व क्रियाशील होण्यासाठी अपेक्षा**

१. १०० टक्के अनुदानावर माती परिक्षण करून देण्यास निधी उपलब्ध करण्याची गरज आहे.
२. मृद नमुने तपासणी शुल्क वाढविण्यात यावे. सर्वसाधारण नमुना १८०/- रू प्रती नमुना व सुक्ष्म मूल द्रव्ये तपासणी शुल्क ३००/- रुपये प्रति नमुना याप्रमाणे करणे आवश्यक आहे.
३. प्रयोगशाळांकरीता वाहन चालक, कुशल तंज्ञ, तांत्रिक सहाय्यक पूर्ण वेळ कार्यरत असने आवश्यक आहे. सोबतच रसायने, इंधन इ. आकस्मीक खर्च करीता अतिरिक्त निधी उपलब्ध करण्याची आवश्यकता आहे.
४. कृषि विज्ञान केंद्रामध्ये मंजूर १६ पदे ही भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांनी ठरवुन दिलेल्या उद्दीश्ठ पुर्तीकरीता असून आज रोजी रिक्त पदे भरल्यानंतरही ती वाहने क्रियाशील होण्याकरीता अतिरिक्त संसाधने उपलब्ध होणे गरजेचे आहे.

कृषि विज्ञान केंद्रातील फिरते माती परिक्षण प्रयोगशाळा वाहनांना गतीमान करण्याच्या दृष्टीने विद्यापीठाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यापासून ते कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्रापर्यंत प्रयत्नशील आहेत. तसेच फिरते माती

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | परिक्षण प्रयोगशाळा वाहने हि मानव विकास अभियानांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा नियोजन समिती व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी या सर्व शासकीय प्रणालीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना माती परिक्षण सुविधा तसेच रासायनीक खतावरील अवास्तव वापर कमी करण्याचे दृष्टीने कृषि विज्ञान केंद्रात फिरते माती परिक्षण प्रयोगशाळा स्थापन करण्यात आल्यात. तरी वरील सर्व शासकिय प्रणालीच्या माध्यमातून या वाहनांना गतीमान करण्याचे दृष्टीने कृषि विज्ञान केंद्राला आर्थिक पाठबळ प्राप्त झाल्यास हि वाहने क्रियाशील होऊन शेतकऱ्यांना याचा निश्चीतच फायदा होईल यात शंका नाही.<br><br>वरील नमुद सर्व बाबींचा विचार केल्यास तसेच सद्यस्थितीत कृषि विज्ञान केंद्रांकडे उपलब्ध मनुष्यबळाची स्थिती पाहता तसेच माती परिक्षणाच्या बाबींकरीता खर्च करण्याची आर्थिक तरतुद नसल्याकारणाने कृषि विज्ञान केंद्रातील फिरती वाहने अपेक्षेनेरुप क्रियाशील होऊ शकली नाहीत. परंतु या वाहनांमुळे शेतकऱ्यांना माती परिक्षण करून घेण्याबाबत निश्चितच जागरूकता निर्माण ली आहे. त्याच बरोबर हि वाहने संबंधीत जिल्हयांमध्ये आयोजीत सर्वच कृषि प्रदर्शनीमध्ये सहभागी होऊन विद्यापीठ निर्मित तंत्रज्ञान प्रसारामध्ये सुध्दा क्रियाशील झाल्यात. त्यामुळे या योजनेचा शेतकऱ्यांना नक्कीच लाभ मिळाला आहे. यामुळे या योजनेवर झालेला खर्च व्यर्थ झाला असे म्हणता येणार नाही. जर या फिरत्या माती परिक्षण प्रयोगशाळेतील विविध बाबींकरीता आर्थिक सहाय्य प्राप्त झाले असते तर उत्तम प्रकारे या फिरत्या मृद व जल परिक्षण वाहनांचा लाभ शेतकऱ्यांना देता आला असता.<br><br>सद्यस्थितीत २०१५-१६ या आर्थिक वर्षापासून राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत तंत्रज्ञान प्रसार या प्रकल्पाखाली माती परिक्षणाकरीता प्रति वाहन रू. ६ लक्ष मंजूर करण्यात आले असून माती परिक्षणाचे काम सुरु करण्यात आले आहे व आतापर्यंत विद्यापीठ स्तरावर एकूण ८४६४ मातीचे नमुने शेतकऱ्यांकडून संकलीत करण्यात आले असून त्यापैकी जून, २०१६ अखेरपर्यंत एकुण ७९१३ माती नमुन्याचे परिक्षण करून संबंधीत शेतकऱ्यांना जमीन आरोग्य पत्रिका वितरीत करण्यात आल्या आहेत. तथापी, उपलब्ध अनुदानातुन माती परिक्षणाचे उद्दिष्ट अंशतः साध्य करता येणे शक्य आहे. माती परिक्षण प्रयोगशाळा पुर्ण क्षमतेने कार्यान्वयीत होण्याकरीता व मानव विकास मिशनने नेमुन दिलेले प्रती वाहन माती परिक्षणाचे उद्दिष्टे साध्य होण्याकरीता या वाहनांकरीता स्वतंत्रपणे अनुदान, मनुष्यबळ मिळणे आवश्यक आहे.<br><br>उपरोक्त मुद्यांद्वारे खुलासा करण्यात येत असल्यामुळे आक्षेप लेखा परिक्षणामधुन वगळण्याची विनंती करण्यात येत आहे. | |

(सोबत, मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार दि.२५ मे, २०१५ रोजी दुपारी ४.०० व झालेल्या राज्यस्तरीय पिक विमा समन्वय समितीच्या बैठकीचे इतिवृत्त)

---

INWARD
Commissioner Agriculture Cell
No: 1747 Date: 11/6/15
By:

क्रमांकः-एनएआयएस-२०१५/ प्र.क्र.३९/ ११अे
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व
मत्स्यव्यवसाय विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- ३ जून, २०१५

प्रति,

१) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
२) प्रधान सचिव,(महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
३) प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
४) प्रधान सचिव (सहकार), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
५) आयुक्त, कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१
६) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१
७) मुख्य अधिकारी, रुरल प्लॅनींग अँड क्रेडिट डीपार्टमेंट, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, न्यू सेन्ट्रल ऑफीस मुंबई-४०० ००१
८) सरव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्यादित, ९ नगिनदास स्ट्रीट, मुंबई-४०० ०२३
९) सरव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्यादित, प्लॉट नं.८८, सेक्टर १७, वाशी, नवी मुंबई
१०) उप सरव्यवस्थापक, नाबार्ड, ५४ वेलस्ली रोड, शिवाजी नगर, पुणे-४११ ००५
११) उप सरव्यवस्थापक, एस.एल.बी.सी., बँक ऑफ महाराष्ट्र, १५०१, शिवाजीनगर, पुणे-४११ ००५
१२) विभागीय व्यवस्थापक, भारतीय कृषि विमा कंपनी मर्यादित, नवीन स्टॉक एक्सचेंज बिल्डींग, २० वा मजला दलाल स्ट्रीट, मुंबई-४०० ०२३.
१३) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचनालय, महाराष्ट्र शासन, बांद्रा, मुंबई
१४) संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१
१५) संचालक (फलोत्पादन), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१
१६) मुख्य सांख्यिक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१ (५ प्रती)
१७) निवड नस्ती, कार्यासन ११-अे

Chief Stat.

(शा. बा. पावसकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित :-
उप सचिव (फलोत्पादन), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

प्रत माहितीसाठी अग्रेषित :-
मा. मंत्री (कृषि ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
सह सचिव, भारत सरकार, कृषि व सहकार विभाग, कृषि भवन, नवी दिल्ली
अतिरिक्त महासंचालक, सांख्यिकी कार्यान्वयन मंत्रालय, एन एस एस ओ, नवी दिल्ली
—— सचिव (कृषि) यांचे स्वीय सहायक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

खरीप हंगाम २०१५ मध्ये राष्ट्रीय कृषि विमा योजना राबविण्यासाठी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य य अध्यक्षतेखाली सोमवार, दिनांक २५ मे, २०१५ रोजी झालेल्या राज्यस्तरीय पीक विमा समन्वय समितीच्या बैठव इतिवृत्त.

| अ. क्र. | बैठकीत घेतलेले निर्णय | निर्णय अंमलबजावणी करणारी यंत्रणा | अंमलबजावणी पुर्ण करण्याची तारीख |
| --- | --- | --- | --- |
| १ | दिनांक ३० सप्टेंबर, २०१४ रोजी झालेल्या राज्यस्तरीय पीक विमा समन्वय समितीच्या बैठकीचे इतिवृत्त कायम करण्यात आले. | कार्यवाही पुर्ण करण्यात आली. | निरंक |
| २ | राष्ट्रीय कृषि विमा योजनेअंतर्गत खरीप हंगाम २०१५ मध्ये १६ अधिसुचित पिकांचे १०५४५ पीक मंडळे व १७० पीक तालुके अधिसुचित करण्यास मान्यता देण्यात आली. यामध्ये यवतमाळ जिल्हयातील तुर पिकासाठी ७, अमरावती जिल्हयातील तुर पिकासाठी १, नागपूर जिल्हयातील कापूस पिकासाठी २, अहमदनगर जिल्हयातील सोयाबीन पिकासाठी ११ तसेच बीड जिल्हयातील सोयाबीन पिकासाठी २६ अशी एकुण ४७ महसूल मंडळे नव्याने अधिसूचित करण्यास मान्यता देण्यात आली.<br><br>त्याचप्रमाणे, लातुर जिल्हयातील कापूस पिकासाठी ७, सुर्यफुल पिकासाठी १०, तीळ पिकासाठी ८, कारळे पिकासाठी ८, बाजरी पिकासाठी १० व भात पिकासाठी १० असे एकुण ५३ तालुके व नांदेड जिल्हयातील भात पिकासाठी १६ तालुके, तीळ पिकासाठी १६ तालुके असे एकुण ३२ तालुके, नागपुर जिल्हयातील कापूस पिकासाठी १ तालुका आणि अहमदनगर जिल्हयातील मका पिकासाठी २ तालुके असे राज्यातील एकुण ८८ तालुके नव्याने अधिसूचित करण्यास मान्यता देण्यात आली.<br><br>जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, वाशिम यांच्या प्रस्तावानुसार खरीप २०१५ मध्ये मंगरुळपीर तालुक्या मधील भात, भुईमुग व तीळ या पिकाखालील अधिसुचित महसुल मंडळ वगळण्यास मान्यता देण्यात आली.<br><br>केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे राष्ट्रीय कृषि विमा योजनेअंतर्गत खरीप हंगाम २०१५ साठी भारतीय कृषि विमा कंपनी मार्फत दिनांक २२.०४.२०१५ रोजीच्या पत्रान्वये सादर करण्यात आलेल्या पिकनिहाय प्रतिहेक्टरी विमा संरक्षीत रक्कम व विमा हप्ता दरास मान्यता देण्यात आली. | कृषि व पदुम विभाग | तात्काळ |
| | राष्ट्रीय कृषि विमा योजनेअंतर्गत खरीप हंगाम २०१५ साठी विदर्भातील ६ जिल्हयांसाठी विदर्भ पॅकेज राबविणेबाबत सभेमध्ये चर्चा करण्यात आली.<br><br>विदर्भ पॅकेजमधील मागील समाविष्ट जिल्हयात मागील ३ वर्षाचा शेतकऱ्यांचा योजनेस मिळणारा प्रतिसाद पाहता ही योजना मागील वर्षाप्रमाणेच खरीप हंगाम २०१५ मध्येसुध्दा विदर्भातील ६ | कृषि व पदुम विभाग | तात्काळ |

| | | | |
|---|---|---|---|
| | जिल्हयांसाठी (बुलढाणा, अमरावती, अकोला, वाशिम, यवतमाळ व वर्धा) राज्य शासनाने घोषित केलेल्या विशेष पॅकेजनुसार केंद्र शासनाच्या ५ टक्के अनुदानासह कापूस पिकासाठी सर्वसाधारण जोखीमस्तरावर अल्प व अत्यल्प भूधारकांसाठी पीक विमा हप्ता रक्कमेत ७५ टक्के अनुदान, तर इतर शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदान तसेच इतर अधिसूचित पिकांसाठी सर्वसाधारण जोखीमस्तरावर अल्प व अत्यल्प भूधारकांसाठी पीक विमा हप्ता रक्कमेत ५० टक्के अनुदान देण्यास मान्यता देण्यात आली. | | |
| ४ | राष्ट्रीय कृषि विमा योजनेअंतर्गत खरीप हंगाम २०१५ साठी सन २०१४-१५ मध्ये ऊस पिका करीता ५८७ तालुके अधिसूचित करण्यात आले होते तेच तालुके सन २०१५-१६ साठी अधिसूचित करण्यासाठी मान्यता देण्यात आली. | कृषि व पदुम विभाग | तात्काळ |
| ५ | हवामान आधारित पीक विमा योजना खरीप हंगाम २०१४ मध्ये भात, ख.ज्वारी, बाजरी, मुग, उडिद, सोयाबीन, कापूस, या ७ पिकांसाठी ठाणे, रायगड, सातारा, सांगली, अहमदनगर, जळगाव, लातुर, नांदेड, अमरावती, यवतमाळ, नागपुर व वर्धा या १२ जिल्हयांमध्ये प्रत्येक महसूल विभागातील निवडक २ जिल्ह्यांमध्ये अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकासाठी भारतीय कृषि विमा कंपनी, बजाज अलायन्झ कं., एचडीएफसी इर्गो, रिलायंस लि., या ४ विमा कंपन्यांमार्फत शासनाने मान्यता दिलेल्या हवामान प्रमाणके, विमा संरक्षीत रक्कम, विमा हप्ता दराप्रमाणे राबविण्यात आली होती. त्याच धर्तीवर केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे खरीप हंगाम २०१४ प्रमाणेच खरीप हंगाम २०१५ मध्ये ही योजना राबविण्याबाबत मान्यता देण्यात आली. CCAFS यांनी भारतीय कृषि विमा कंपनी मार्फत शेतकऱ्यांच्या फायद्याकरीता ४ पिकांसाठी नवीन प्रमाणके प्रस्तावित केली आहेत. सुधारीत योजनेच्या दृष्टीने त्या प्रमाणकांचा वापर भारतीय कृषि विमा कंपनी व खाजगी विमा कंपन्यांनी करावा. केंद्र शासनाकडून खरीप हंगाम २०१४ मधील मार्गदर्शक सूचनेनुसार संदर्भ हवामान केंद्र त्रयस्थ यंत्रणेमार्फत उभारणेबाबत मान्यता मिळाल्यानंतर योजनेच्या पुढील अंमलबजावणीबाबत कार्यवाही करण्याचे निदेश देण्यात आले आहेत. | कृषि व पदुम विभाग | तात्काळ |
| ६ | राष्ट्रीय कृषि विमा योजनेअंतर्गत खरीप २०१४ मध्ये राज्यात ४४.७९ लाख शेतकऱ्यांनी रक्कम रु १७४.७५ कोटी विमा हप्ता भरुन २८.०५ लाख हे. क्षेत्र संरक्षित केले होते. खरीप २०१४ ची नुकसान भरपाई रक्कम रु १५९५.६५ कोटी भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत निश्चित करण्यात आली आहे. खरीप २०१४ मध्ये सहभागी झालेल्या लाभार्थींना नुकसान भरपाई रक्कमेतील केंद्र शासन हिस्सा रक्कम रु ६९०.७४ कोटी केंद्र शासनाकडुन उपलब्ध होणार असल्याचे मा. अपर मुख्य सचिव (कृषि व पणन) यांनी सांगीतले. तसेच, राज्य हिश्याची रक्कम | कृषि व पदुम विभाग | तात्काळ |

| | | | |
|---|---|---|---|
| | रु. ६९०.७४ कोटी देय असून सदरची रक्कम त्वरीत उपलब्ध करुन देणेबाबत मा. अपर मुख्य सचिव (कृषि व पणन) यांनी बैठकीमध्ये निदर्शनास आणून दिले. त्यानुसार सदर राज्य हिस्सा रक्कम लवकरच उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु असल्याचे मा. मुख्य सचिव यांनी सांगीतले. | | |
| ७ | हवामान आधारित फळपीक विमा योजनेअंतर्गत मृग बहारासाठी विविध विमा कंपन्यांकडून दर प्राप्त झालेले होते. सदरचे दर हे कॅप लेव्हल (१२ टक्के) पेक्षा जास्त असल्यामुळे आयुक्तालय स्तरावरुन दर कमी करण्याबाबत वाटाघाटी करण्यात आल्या होत्या. तथापि, विमा कंपन्यानी सादर करण्यात आलेले दर कमी करण्यास नकार दिल्यामुळे योजना राबविण्यासंदर्भात संभ्रम निर्माण झाला. मा.मुख्य सचिवांनी सदरची योजना १८ टक्क्यांपेक्षा जास्त दराने राबविता येणार नाही असे सूचित केले. तेंव्हा सर्व विमा कंपन्यांनी १८ टक्क्यांच्या आत किंवा १८ टक्के पर्यंत विमा दराने वाटप केलेल्या जिल्हयात सर्व अधिसूचित फळपीकांकरिता पीक विमा योजना राबविण्याचे आदेशीत केले. | कृषि व पदुम विभाग | तात्काळ |
| ८ | विमा कंपन्यांनी सन २०१४-१५ च्या अंबिया बहारामध्ये दिलेल्या अनुदानानुसार शेतकऱ्यांना दिलेल्या नुकसान भरपाईची व शेतकरी संख्येची आकडेवारी तात्काळ सादर करणे अपेक्षित आहे. | कृषि व पदुम विभाग | तात्काळ |
| ९ | ऐनवेळच्या विषयामध्ये पुढील विषयावर चर्चा करण्यात आली.<br>१) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे राष्ट्रीय कृषि विमा योजनेअंतर्गत नुकसान भरपाई निश्चित करण्यासाठी पीक कापणी प्रयोग हे अधिसुचित क्षेत्रातील अधिसुचित पिकांकरिता कृषि विभाग, महसुल विभाग व जिल्हा परिषद यांचेमार्फत घेण्यात येतात.<br>आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन पिक उत्पादनाचा अधिक अचुक अंदाज लावण्यासाठी मे. स्वीस रे, EEMausam, CCAFS ह्या कंपन्यांमार्फत उपग्रह प्रतिमांच्या व संगणकीय प्रणालीचा वापर करण्यात येतो. या बाबत उदाहरणादाखल मे. स्वीस रे कंपनीमार्फत बैठकीमध्ये माहितीचे सादरीकरण करण्यात आले. याबाबत ग्रामपंचायत स्तरावर राष्ट्रीय कृषि विमा योजना राबविण्याबाबत विस्ताराने चर्चा करण्यात आली. त्यामध्ये या प्रणालीचा वापर राज्यात विस्तृत प्रमाणावर करणेपुर्वी त्यावर सविस्तर संशोधन व अभ्यास होणे आवश्यक असल्याचे मा. मुख्य सचिव यांनी सांगीतले. त्यासाठी लहान क्षेत्रावर उदा.प्रत्येक तंत्रज्ञानासाठी प्रत्येक पिकाकरीता एक एक मंडळाचा वापर करण्यात यावा. सदर प्रणालीचा वापर पथदर्शक स्वरुपात करुन उत्पादनाचे निष्कर्ष काढावेत व त्याची तुलना प्रचलित राष्ट्रीय कृषि विमा योजनेअंतर्गत आयोजित करण्यात येत असलेल्या | भारतीय कृषि विमा कंपनी, मुंबई | तात्काळ |

| | | | |
|---|---|---|---|
| | पिक कापणी प्रयोगाशी करुन त्याच्या अचुकतेचा अभ्यास करण्यात यावा असे मा. मुख्य सचिव यांनी सांगीतले. त्याच प्रमाणे किमान मंडळातील गावांमध्ये सदर नवीन प्रणालिचा वापर करणेबाबतचा प्रस्ताव भारतीय कृषि विमा कंपनीने शासनास सादर करावा. त्याच प्रमाणे सदर प्रस्तावित किमान गावांमध्ये पीक नुकसान भरपाई निश्चित करण्यासाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार प्रचलित राष्ट्रीय कृषि विमा योजनेअंतर्गत घेण्यात येणाऱ्या पीक कापणी प्रयोगाद्वारे प्राप्त आकडेवारीएवढी ग्रामपातळीवरील आकडेवारी जास्त संयुक्तिक असल्यास तरच ती गृहित धरण्यात यावी असे मा. मुख्य सचिव यांनी सांगीतले. | | |

उपरोक्त विषयावर सविस्तर चर्चा होऊन बैठक संपन्न झाली.

-------ooooo-------

(सोबत, मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार दि.५ ऑक्टोबर, २०१५ रोजी दुपारी ३.३० वाजता झालेल्या राज्यस्तरीय पिक विमा समन्वय समितीच्या बैठकीचे इतिवृत्त)

कृषि आयुक्तालय
(म.रा.) पुणे-५.
आवक जावक नं.
15 OCT 2015
२८२६४

क्रमांक:-एनएआयएस-२०१५/ प्र.क्र.२२८/ ११अे
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व
मत्स्यव्यवसाय विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- १३ ऑक्टोबर, २०१५

प्रति,

१) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
२) प्रधान सचिव,(महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
३) प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
४) प्रधान सचिव (सहकार), सहकार व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
५) सचिव, कृषि मंत्रालय, भारत सरकार (कृषि व सहकार विभाग) कृषि भवन, नवी दिल्ली
६) सचिव, वित्त मंत्रालय, भारत सरकार (वित्त विभाग) (विमा), नवी दिल्ली
७) आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१
८) आयुक्त (सहकार) व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१
९) मुख्य अधिकारी, रुरल प्लॅनींग अँड क्रेडिट डीपार्टमेंट, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, न्यू सेन्ट्रल ऑफीस, फोर्ट मुंबई- ४०० ००१
१०) सरव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्यादित, ९ नगिनदास स्ट्रीट, मुंबई ४०० ०२३
११) सरव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्यादित, प्लॉट नं.८८, सेक्टर १७, वाशी, नवी मुंबई
१२) उप सरव्यवस्थापक, नाबार्ड, ५४ वेलस्ली रोड, शिवाजी नगर, पुणे-४११ ००५
१३) उप सरव्यवस्थापक, एस.एल.बी.सी., बँक ऑफ महाराष्ट्र, १५०१, शिवाजीनगर, पुणे-४११ ००५
१४) विभागीय व्यवस्थापक, भारतीय कृषि विमा कंपनी मर्यादित, नवीन स्टॉक एक्सचेंज बिल्डींग, २० वा मजला, दलाल स्ट्रीट, मुंबई-४०० ०२३.
१५) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचनालय, महाराष्ट्र शासन, बांद्रा, मुंबई
१६) संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१
१७) संचालक (फलोत्पादन), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१
१८) मुख्य सांख्यिक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१ (५ प्रती)
१९) पत विशेषज्ञ, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२

(श. बो. पावसकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित :-

उप सचिव (फलोत्पादन), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

प्रत माहितीसाठी अग्रेषित :-

मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
अपर मुख्य सचिव (कृषि), यांचे स्वीय सहाय्यक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
उप सचिव (११-अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

D:/ CR 228-2015/11a

कृषि संचालक (वि.प्र.कक्ष)
आवक क्रमांक : ९०२६

राष्ट्रीय कृषि विमा योजना -रब्बी हंगाम २०१५-१६

- इतिवृत्त -

रब्बी हंगाम २०१५-१६ मध्ये राष्ट्रीय कृषि विमा योजना राबविण्यासाठी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे अध्यक्षतेखाली सोमवार, दिनांक ५ ऑक्टोबर, २०१५ रोजी दुपारी ३.३० वा. झालेल्या राज्यस्तरीय पीक विमा समन्वय समितीच्या बैठकीचे इतिवृत्त.

बैठकीस उपस्थित असलेल्या अधिका-यांची यादी सोबत जोडली आहे.

अपर मुख्य सचिव (कृषि व पणन) यांनी बैठकीचे प्रयोजन विदीत केले. तसेच राष्ट्रीय कृषि विमा योजना व हवामान आधारित पिक विमा योजने संदर्भात सविस्तर सादरीकरण केले.

| अ. क्र. | बैठकीत घेतलेले निर्णय | निर्णय अंमलबजावणी करणारी यंत्रणा | अंमलबजावणी पूर्ण करण्याची तारीख |
|---|---|---|---|
| १ | दिनाक २५ मे, २०१५ रोजी झालेल्या राज्यस्तरीय पीक विमा समन्वय समितीच्या बैठकीचे इतिवृत्त कायम करण्यात आले. | कार्यवाही पूर्ण करण्यात आली. | निरंक |
| २ | राष्ट्रीय कृषि विमा योजनेअंतर्गत रब्बी हंगाम २०१५-१६ मध्ये ८ पीके अधिसुचित करण्यास व त्या पिकांसाठी ५५५१ पीक मंडळे व २९७ पीक तालुके अधिसुचित करण्यास मान्यता देण्यात आली.<br>अमरावती जिल्हयातील धामणगाव रे. तालुक्यातील (७ मंडळ), अचलपूर तालुका (६ मंडळ) व चिखलदरा तालुका (१ मंडळ) अशी एकुण १४ मंडळे, जळगाव जिल्हयातील जळगाव तालुका (६ मंडळ), भुसावळ तालुका (४ मंडळ), बोदवड तालुका (२ मंडळ), भडगाव तालुका (४ मंडळ), चोपडा तालुका (७ मंडळ), जामनेर तालुका (८ मंडळ) अशी एकुण ३२ मंडळे, जालना जिल्हयातील बदनापूर तालुका (५ मंडळ) व बुलडाणा जिल्हयातील मलकापूर तालुका (५ मंडळ) अशी ४ जिल्हयातील एकुण ११ तालुक्यातील ५६ महसुल मंडळे हरभरा पिकासाठी नव्याने अधिसुचित करणेस मान्यता देण्यात आली.<br>त्याचप्रमाणे बीड जिल्हयातील गेवराई तालुका रब्बी कांदा पिकासाठी नव्याने तालुका अधिसुचित करणेस मान्यता देण्यात आली. | कृषि व पदुम विभाग | तात्काळ |
| ३ | राष्ट्रीय कृषि विमा योजनेअंतर्गत रब्बी हंगाम २०१५-१६ साठी विदर्भ पॅकेजमधील समाविष्ट ६ जिल्हयातील अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना सर्वसाधारण | कृषि व पदुम विभाग | तात्काळ |

| | | | |
|---|---|---|---|
| | जोखीमस्तरासाठी अधिसुचित पिकांकरिता विमा हप्ता अनुदानापोटी राज्य शासनाचे ४५ टक्के अनुदान व केंद्र शासनाचे ५ टक्के अनुदान असे एकुण ५० टक्के अनुदान देण्यास मान्यता देण्यात आली. | | |
| ४ | हवामान आधारित पीक विमा योजना रब्बी हंगाम २०१५-१६ मध्ये राज्यातील ५ जिल्हयात निवडक पिकांसाठी राबविण्याबाबत सभेमध्ये चर्चा करण्यात आली. केंद्र शासनाचे पत्र क्र १२०१४/०२/२०१०/क्रेडीट २, दिनांक १७.२.२०१५ आणि समक्रमांकाचे दिनांक ४.६.२०१५ चे पत्रान्वये दिलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार त्रयस्थ संस्थेमार्फत स्थापन करण्यात आलेल्या संदर्भ हवामान केंद्रांद्वारे प्राप्त आकडेवारीचाच वापर करुन हवामान आधारित पिक विमा योजना रब्बी हंगाम २०१५-१६ मध्ये राबविण्यात यावी असे नमुद केले आहे. तथापि, विभागीय व्यवस्थापक, भारतीय कृषि विमा कंपनी यांनी त्रयस्थ संस्थाकडून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार संदर्भ हवामान केंद्रांची उभारणी करणे बाबत कार्यवाही झाली नसल्याचे सभेमध्ये सांगीतले. त्याच प्रमाणे हवामानावर आधारीत पिक विमा योजनेअंतर्गत हवामान धोकेकांचा कालावधी २० ऑक्टोंबर २०१५ पासून सुरु होत असल्याने अल्प कालावधी शिल्लक असल्याचे नमुद केले तसेच हवामान आधारित पीक विमा योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या ५ जिल्हयांतील गहू, र. ज्वारी व हरभरा ही पिके राष्ट्रीय कृषि विमा योजनेमध्ये अधिसुचित आहेत. त्यामुळे शेतकरी राष्ट्रीय कृषि विमा योजनेमध्ये सहभागी होऊ शकतात असेही विभागीय व्यवस्थापक, भारतीय कृषि विमा कंपनी यांनी स्पष्ट केले. त्रयस्थ संस्थेमार्फत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार संदर्भ हवामान केंद्र उभारणी झालेली नाही ही तांत्रिक अडचण विचारात घेऊन हवामान आधारित पीक विमा योजना रब्बी हंगाम २०१५-१६ मध्ये न राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. | कृषि व पदुम विभाग | तात्काळ |
| ५ | राष्ट्रीय कृषि विमा योजनेमधील योजनांतर्गत योजना (प्लॅन) (२४०१ ०९२२) या लेखाशिर्षाखाली पिक विमा हप्ता अनुदानापोटी रक्कम रु ८४.७५ कोटी ज्यादा अनुदान आवश्यक असल्याचे सभेमध्ये सांगण्यात आले. हा खर्च दायित्व स्वरुपातील असल्याने त्यास तत्वत: मान्यता | कृषि व पदुम विभाग<br>नियोजन विभाग<br>वित्त विभाग | तात्काळ |

| | | | |
|---|---|---|---|
| | दर्शवून त्या अनुषंगाने सदरचे अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव कृषि विभागाने संबंधीत विभागांना पाठविण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी अशा सूचना मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी दिल्या. | | |
| ६ | राष्ट्रीय कृषि विमा योजनेमधील योजनेत्तर योजना (नॉन प्लॅन) (२४०१ ३४११) या लेखाशिर्षाखाली नुकसान भरपाईसाठी रक्कम रु ९४.३१ कोटी ज्यादा अनुदान आवश्यक असल्याचे सभेमध्ये सांगण्यात आले. हा खर्च दायित्व स्वरुपातील असल्याने त्यास तत्वत: मान्यता दर्शवून त्या अनुषंगाने सदरचे अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव कृषि विभागाने संबंधीत विभागांना पाठविण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी अशा सूचना मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी दिल्या. | कृषि व पदुम विभाग<br>वित्त विभाग | तात्काळ |
| ७ | अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळेचे विषय<br>हवामान आधारित फळ पिक विमा योजना चालू वर्षाच्या आंबीया बहारामध्ये राबविण्याबाबत चर्चा करण्यात आली.<br>मागील वर्षी प्रमाणे यावर्षी हवामानावर आधारीत फळपिक विमा योजना आंबिया बहारात राबविण्यासाठी १८ % पर्यंत विमा हप्ता दर आलेल्या फळपिक व जिल्ह्यासाठी अधिसूचना निर्गमित करण्याबाबत बैठकीत निर्णय झाला. केंद्र शासनाच्या हवामान केंद्र विषयी मागील हंगामप्रमाणे निकषामधील सवलतबाबत मंजूरी घेऊन त्वरीत अधिसूचना निर्गमित करण्यात यावी.<br>ज्या फळपिकांसाठी व जिल्ह्यासाठी विमा हप्ता दर १८% पेक्षा जास्त आलेले आहे (केळी फळपिकांसाठी २४% पेक्षा जास्त) त्याबाबत संबंधित विमा कंपन्यांसमवेत आयुक्त (कृषी) यांनी पुन्हा वाटाघाटी कराव्यात व विमा हप्ता दर १८% ते २४% पर्यंत मान्य झाल्यास मा. अ.मु.स. (कृषी) यांची मान्यता घेऊन उर्वरित जिल्ह्यांसाठी २४% विमा हप्ता दरापर्यंत अधिसुचना निर्गमित करण्यात यावी.<br>विमा कंपनीसमवेत वाटाघाटीनंतर फळपिकाकरिता विमा कंपनीचा वाटाघाटीनंतर केळी फळपिक विमासाठी विमा हप्ता दर २४% मर्यादेपर्यंत मान्य न झाल्यास सदर पिकासाठी पर्यायी योजना सुचविण्याबाबत भारतीय कृषी विमा कंपनीस प्रस्ताव पाठविण्याबाबत सूचना देण्यात | कृषि व पदुम विभाग<br>नियोजन विभाग<br>वित्त विभाग | तात्काळ |

| | | | |
|---|---|---|---|
| | याव्यात आणि शक्य झाल्यास, सदर योजनेची चालू योजनेसोबत विमा दर व इतर बाबी विषयी तूलना करुन योग्य असल्यास जळगाव जिल्ह्यात केळी या फळपिकासाठी प्रायोगिक तत्त्वावर राबविण्याबाबत सूचित करण्यात आले. | | |
| | ब) सन २०१४-१५ मध्ये आंबिया बहार गारपीट या हवामान धोक्यासाठी ३६ टक्के दर देण्यात आला होता. या वर्षात देखिल त्याच दरापर्यंत अधिसूचना निर्गमित करण्याबाबत बैठकीत ठरले. | | |
| | क) हवामान आधारित फळपिक विमा योजनेसाठी या वर्षी १४.०० कोटी इतकी अर्थसंकल्पी तरतूद करण्यात आली आहे. सदर रकमेतून ७० टक्के च्या मर्यादेत एकूण रु.९ कोटी ८० लाख इतकी रक्कम अद्यापपर्यंत वितरीत करण्यात आली असून त्या विमा कंपन्यांना अदा करण्यात आली आहे. मात्र कृषि आयुक्तालयाकडून एकूण मागणी ३४.७३ कोटी इतकी केली होती. (३४.७३-१६.९२=१७.८१) तथापि सदर मागणीची पुर्तता करावयाची झाल्यास अर्थसंकल्पीय तरतूदीतील उर्वरित रक्कम रु ४.२० कोटी इतक्या रकमेची आवश्यकता आहे. त्यासाठी वित्त विभागाकडे प्रस्ताव पाठविण्यास बैठकीत ठरविण्यात आले. | | |
| | ड) हवामान आधारित फळपिक विमा योजनेकरिता दुसरी पर्यायी विमा योजना अस्तित्वात नाही. सदर योजना राबविण्यासाठी कार्यरतअसलेले स्वयंचलित हवामान केंद्र, केंद्र शासनाच्या नवीन मार्गदर्शक सूचनांनूसार बसविणे सद्य:स्थितीत शक्य नसल्यामुळे सद्या उपलब्ध असलेल्या हवामान केंद्राचा वापर करण्याबाबतची सवलत देण्याचा प्रस्ताव राज्य शासनामार्फत केंद्र शासनास पाठविण्यात यावा व त्याबाबतचा पाठपुरावा भारतीय कृषि विमा कंपनीने करावा. केंद्र शासनाची परवानगी प्राप्त झाल्यानंतर सदर योजना आंबिया बहारात राबविण्यासाठी शासन स्तरावर निर्गमित करण्यात बैठकीत निर्णय घेण्यात आला. | | |

उपरोक्त विषयावर सविस्तर चर्चा होऊन बैठक संपन्न झाली.

———ooooo———

Attendance Sheet

| Sr.No | Name/Designation |
|---|---|
| 1 | **Shri. Swadhin Kshatriya,**<br>Chief Secretary |
| 2 | **Dr. D.K.Jain ,**<br>Additional Chief Secretary (Agriculture) |
| 3 | **Shri. Sunil Porwal,**<br>Additional Chief Secretary (Planning) |
| 4 | **Shri. Sitaram Kunte,**<br>Principal Secretary ( Expenditure) |
| 5 | **Shri. Manukumar Shrivastav,**<br>Principal Secretary (Revenue) |
| 6 | **Shri. S.K.Sharma,**<br>Principal Secretary (Co-operation) |
| 7 | Shri. S.N.Sabbanwar,<br>Asst. Manager, Maharashtra State Co-Operative Bank Limited,Mumbai |
| 8 | Shri.R.B.Ghadge<br>Deputy Secretary (Agri.), Mantralaya, Mumbai |
| 9 | Shri.P.S.Shete<br>Deputy Secretary (Horticulture), Mantralaya, Mumbai |
| 10 | Shri. D.S.Salunkhe (Representative)<br>The Commissioner of Co-operation and Registrar of Co-operative Societies, Maharashtra State, Pune |
| 11 | Shri. D.D.Dange<br>The Regional Manager, Agriculture Insurance Company of India Ltd. Mumbai -23 |
| 12 | The Director of Agriculture (Extension & Training), Maharashtra State, Pun |
| 13 | Shri. Anil Bansode<br>The Chief Statistician, Commissionerate of Agriculture, Maharashtra State Pune |
| 14 | Shri.Prakash Adagale<br>Join Director (Horticulture), Commissionerate of Agriculture, Maharashtra State, Pune |
| 15 | Shri.G.S.Musmade<br>Agriculture Officer (Horticulture), Commissionerate of Agriculture, Maharashtra State, Pune |

(सोबत, मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार दि.३० सप्टेंबर,२०१४ रोजी दुपारी १.०० वाजता झालेल्या राज्यस्तरीय पीक विमा समन्वय समितीच्या बैठकीचे इतिवृत्त)

---

क्रमांकः एनएआयएस-२०१४/प्र.क्र.१४७/११-अे
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास
व मत्स्यव्यवसाय विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १३ ऑक्टोबर, २०१४.

प्रति,

अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, कृषि मंत्रालय, भारत सरकार (कृषि व सहकार विभाग), कृषि भवन, नवी दिल्ली.
सचिव, वित्त मंत्रालय, भारत सरकार ( वित्त विभाग) (विमा), नवी दिल्ली.
आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
आयुक्त (सहकार) व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
विभागीय संचालक (महाराष्ट्र व गोवा), भारतीय रिझर्व बँक, ग्रामीण नियोजन व पत विभाग, मुंबई विभागीय कार्यालय, पहिला मजला, मुख्य इमारत, शहिद भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१.
विभागीय व्यवस्थापक, भारतीय कृषि विमा कंपनी, स्टॉक एक्सचेंज टॉवर्स, २० वा मजला, फोर्ट, मुंबई-२३.
महाव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, ९, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स लेन, फोर्ट, मुंबई-४०० ००१
महाव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., प्लॉट नं.८८, सेक्टर नं.१७, वाशी, नवी मुंबई.
मुख्य महाव्यवस्थापक, नाबार्ड, ५४, वेलस्ली रोड, पोष्ट बॅग क्र.५, शिवाजीनगर, पुणे- ५
उप महाव्यवस्थापक, राज्यस्तरीय बँकांची समिती, लोकमंगल, १५०१, शिवाजीनगर, पुणे-५
कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
कृषि संचालक (फलोत्पादन), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, अर्थ व सांख्यिकी, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
मुख्य सांख्यिक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
पत विशेषज्ञ (credit specialist), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
निवड नस्ती, का.११-अे

(श.का.पावसकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित-
सह सचिव (फलोत्पादन), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

प्रत माहितीसाठी अग्रेषित:-
मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-३२
अपर मुख्य सचिव (कृषि) यांचे स्वीय सहाय्यक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
उप सचिव (कार्या.११-अे) यांचे स्वीय सहाय्यक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

RECEIVED
22 .. .. 2014
Inward No. 1738

## इतिवृत्त

रब्बी हंगाम-२०१४-१५ मध्ये राष्ट्रीय कृषि विमा योजना राबविण्यासाठी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार, दि. ३० सप्टेंबर, २०१४ रोजी दुपारी १.०० वा. झालेल्या राज्यस्तरीय पीक विमा समन्वय समितीच्या बैठकीचे इतिवृत्त :-

बैठकीस उपस्थित अधिकाऱ्यांची यादी सोबत जोडली आहे.

मा. अपर मुख्य सचिव (कृषि व पणन) यांनी बैठकीचे प्रयोजन विदीत केले तसेच राष्ट्रीय कृषि विमा योजने संदर्भात सविस्तर सादरीकरण केले. चर्चेअंती बैठकीत खालील निर्णय घेण्यात आले-

| अ क्र | बैठकीत घेतलेले निर्णय | निर्णय अंमलबजावणी करणारी यंत्रणा | अंमलबजावणी पूर्ण करण्याची तारीख | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | दिनांक २३ मे, २०१४ रोजी झालेल्या राज्यस्तरीय पीक विमा समन्वय समितीच्या बैठकीचे इतिवृत्त कायम करण्यात आले. | कार्यवाही पूर्ण करण्यात आली | निरंक | |
| २ | राष्ट्रीय कृषि विमा योजने अंतर्गत रब्बी हंगाम २०१४ मध्ये ८ अधिसूचित पिकांचे ५४९५ पीक मंडळे व २९६ पीक तालुके अधिसूचित करण्यास मान्यता देण्यात आली.<br>यामध्ये यवतमाळ जिल्ह्यातील ३२ पीक मंडळे, वर्धा जिल्ह्यातील १५ महसूल मंडळे, हरभरा पिकासाठी अमरावती जिल्ह्यातील ९ महसूल मंडळे गहू बागायत पिकासाठी अशी ५६ महसूल मंडळे नव्याने अधिसूचित करण्यात मान्यता देण्यात आली. | कृषी व पदुम विभाग | तात्काळ | |
| ३ | राष्ट्रीय कृषि विमा योजनेअंतर्गत रब्बी हंगाम २०१४-१५ साठी विदर्भ पॅकेजमधील समाविष्ट ६ जिल्ह्यातील अल्प व अत्यल्प शेतकऱ्यांना सर्व पिकांसाठी विमा हप्ता अनुदान राज्य शासनाचे ४५ टक्के अनुदान व केंद्र शासनाचे ५ टक्के अनुदान असे एकूण ५० टक्के अनुदान विमा हप्त्यात देण्यास मान्यता देण्यात आली. | कृषी व पदुम विभाग | तात्काळ | |
| ४ | राष्ट्रीय कृषि विमा योजना रब्बी हंगाम २०१४-१५ मध्ये गहू (जि), ज्वारी (जि), ज्वारी (बा) व हरभरा या पिकासाठी ८० टक्के या उच्च जोखीमस्तरावर राबविण्याबाबत समितीमध्ये चर्चा करण्यात आली. राष्ट्रीय कृषि विमा योजना रब्बी हंगाम २०१४-१५ मध्ये वर नमूद केलेल्या पिकासाठी ८० टक्के या उच्च जोखीमस्तरावर राबविण्याबाबत विभागीय व्यवस्थापक भारतीय कृषि विमा कंपनी, मुंबई यांनी सांगितले की सदरची योजना राज्यात कर्जदार शेतकऱ्यांनासुध्दा ऐच्छिक असल्याने सदर प्रस्तावासाठी आम्ही वास्तवदर्शी दराचा प्रस्ताव दिलेला नाही. त्यामुळे ८० टक्के या उच्च जोखीमस्तरावर योजना राबविण्यास त्यांनी असमर्थता व्यक्त केली .<br>तसेच ८० टक्के या उच्च जोखीमस्तरासाठी शेतकरी मर्यादित दराने विमा हप्ता भरत असून विमा हप्त्याची उर्वरित रक्कम राज्य शासनास राज्यातील सर्व शेतकऱ्यांना अनुदान स्वरुपात द्यावी लागत असल्याने राज्य शासनावर विमा हप्ता अनुदानाचा आर्थिक भार पडत आहे. वरील बाबींचा विचार करुन रब्बी हंगाम २०१४-१५ मध्ये राष्ट्रीय कृषि विमा योजना सर्व साधारण जोखीमस्तरानुसार राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. | कृषी व पदुम विभाग | तात्काळ | |

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>बैठकीत घेतलेले निर्णय</th><th>निर्णय अंमलबजावणी करणारी यंत्रणा</th><th>अंमलबजावणी पूर्ण करण्याची तारीख</th><th>शेरा</th></tr>
<tr><td>५</td><td>हयामान आधारित पिक विमा योजना रब्बी हंगाम २०१४-१५ मध्ये खालील नमूद केलेल्या ५ जिल्ह्यासाठी व पिकांसाठी राबविण्यास मान्यता देण्यात आली.
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>जिल्हा</th><th>पिके</th></tr>
<tr><td>१</td><td>सोलापूर</td><td>रब्बी ज्वारी, गहू</td></tr>
<tr><td>२</td><td>अहमदनगर</td><td>हरभरा, गहू</td></tr>
<tr><td>३</td><td>उस्मानाबाद</td><td>रब्बी ज्वारी, हरभरा</td></tr>
<tr><td>४</td><td>अमरावती</td><td>हरभरा, गहू</td></tr>
<tr><td>५</td><td>नागपूर</td><td>हरभरा, गहू</td></tr>
</table></td><td>कृषी व पदुम विभाग</td><td>तात्काळ</td><td></td></tr>
<tr><td>६</td><td>ऐनवेळच्या विषयामध्ये पुढील विषयावर चर्चा करण्यात आली.<br>हवामान आधारित पीक विमा योजना निवडक १२ जिल्ह्यात खरीप हंगाम २०१४ मध्ये राबविण्यास राज्य शासनाने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदर योजनेतील सहभागी झालेल्या शेतकऱ्यांना योजनेच्या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार केंद्र शासनाच्या हिश्श्याप्रमाणे विमा हप्ता अनुदानातील राज्य हिश्श्याची रक्कम द्यावी लागणार आहे. या योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार नुकसान भरपाईच्या रकमेत केंद्र व राज्य शासनावर कोणताही आर्थिक भार येणार नाही. निश्चित होणारी नुकसान भरपाईची रक्कम ही शेतकऱ्यांना संबंधित विमा कंपनीकडून देय राहणार आहे. यामुळे या योजनेसाठी सन २०१४-१५ मध्ये राज्य शासनाकडून २४०१ ३४११ (नॉन प्लॅन) या लेखाशिर्षकाखाली मंजूर असलेली रक्कम रु. ६०.०० कोटी या आर्थिक तरतूदीत बचत होणार असून २४०१ ०९२२ (प्लॅन) या लेखाशिर्षकाखाली मंजूर असलेल्या आर्थिक तरतूद रक्कम रु.४५.०० कोटी यामध्ये वाढ होणार आहे. याबाबत सविस्तर चर्चा होऊन नॉन प्लॅन च्या लेखाशिर्षकाखाली होणारी बचत विचारात घेऊन प्लॅनच्या लेखाशिर्षकाखाली होणारा वाढीव खर्च भागविण्यास समितीने मान्यता दिली व त्यानुसार कृषि विभागाने सविस्तर प्रस्ताव नियोजन विभागामार्फत वित्त विभागास पाठविण्याच्या सूचना मा.अध्यक्ष यांनी दिल्या.</td><td>कृषी व पदुम विभाग</td><td>तात्काळ</td><td></td></tr>
<tr><td>७</td><td>पिक विमा योजनेअंतर्गत मिळणारे फायदे महसूल (म.व पु.) व वन विभागामार्फत मिळणारी मदत असे दोन्ही फायदे शेतकरी घेत असतात यामध्ये काही Linkage ठेवता येईल काय? पिक विम्याची व्याप्ती वाढवून मदत निधीची व्याप्ती कमी करता येईल काय? याबाबत कृषि विभागाने तपासणी करावी</td><td>कृषि व पदुम विभाग</td><td>तात्काळ</td><td></td></tr>
<tr><td>८</td><td>ॲग्रो क्लायमेटीक झोन नुसार क्रॉपींग पॅटर्न निश्चीत करण्याबाबत कृषि विभागाने कार्यवाही करावी.</td><td>कृषि व पदुम विभाग</td><td>तात्काळ</td><td></td></tr>
<tr><td>९</td><td>इरिगेशनच्या (जलसंपदा विभागाच्या) योजना मंजूर करतांना क्रॉपींग पॅटर्न संदर्भात आयुक्त (कृषि) यांचा सल्ला घेण्यात यावा.</td><td>नियोजन विभाग<br>जलसंपदा विभाग<br>जलसंधारण<br>विभाग</td><td>तात्काळ</td><td></td></tr>
</table>

| अ क्र | बैठकीत घेतलेले निर्णय | निर्णय अंमलबजावणी करणारी यंत्रणा | अंमलबजावणी पूर्ण करण्याची तारीख | शेरा. |
|---|---|---|---|---|
| १० | सुदुर संवेदन केंद्र नागपूर यांचे उपकेंद्र पुणे येथे सुरु झालेले आहे. महसूल विभागाने जमिनीची मोजणी सॅटेलाईटच्या माध्यमातून करण्याबाबतचा पथदर्शी प्रकल्प पुणे जिल्ह्यांतील मुळशी तालुक्यात सुदुर संवेदन केंद्राच्या मदतीने राबविला .त्याची फलनिष्पत्ती समाधानकारक व बिनचूक आली त्याच धर्तीवर पिक विमा योजनेतील पिकांचे क्षेत्रे , पेरणीक्षेत्र ,नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित क्षेत्र यांची मोजणी सुदुर संवेदन केंद्राच्या मदतीने सॅटेलाईटच्या माध्यमातून करण्यासंदर्भात आयुक्त (कृषि) यांनी सुदुरसंवेदन केंद्राच्या पुणे उपकेंद्राशी संपर्क साधावा. | कृषि व पदुम विभाग | तात्काळ | |
| ११ | बदललेल्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर अॅग्रो क्लायमेटीक झोन नुसार कृषि विभागाने शिफारस केलेल्या क्रॉपींग पॅटर्न नुसार पिके घेणारे शेतकरी व त्यानुसार पिके न घेणारे शेतकरी यांना पिक विम्यासाठी अनुदान देतांना अनुदानाच्या दरात फरक ठेवता येईल काय?. काही Linkage ठेवता येईल काय? ते कृपया तपासावे. | कृषि व पदुम विभाग | तात्काळ | |

उपरोक्त विषयावर सविस्तर चर्चा होऊन बैठक संपन्न झाली.

---------ooooo---------

**साक्ष :-**

**परिच्छेद क्रमांक ३.१.२ 'शासकीय स्तरावर योजनांची अंमलबजावणी'**

**२.१** उपरोक्त परिच्छेदाच्या अनुषंगाने समितीने दिनांक १२ ऑक्टोबर,२०१७ रोजी कृषी विभागाच्या सचिवांची तसेच इतर विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने या परिच्छेदासंबंधात अधिक माहिती देण्यात यावी असे विभागास सूचित केले. तसेच या विषयामध्ये जे घटक आहेत त्यामधील मुख्य विषय म्हणजे वास्तववादी निर्धारण असले पाहिजे व त्यादृष्टीने ग्रामपंचायत स्तरावर पीक विमा योजनेची अंमलबजावणी करावी अशा प्रकारची भूमिका राज्य व केंद्र सरकारची असताना पूर्ण राज्यामध्ये ही योजना ग्रामपंचायत स्तरावर केव्हापासून लागू करण्यात येणार आहे? याबाबत थोडक्यात माहिती द्यावी असेही विभागास सांगितले असता, ही योजना प्रधानमंत्री कृषी विमा योजनेपूर्वीची असून सध्याच्या परिस्थितीमध्ये अजूनतरी महसूल मंडळ स्तरावर ही योजना राबविण्यात येते. डेटाची सर्व सांख्यिकी जतन करण्यासाठी फार मोठी यंत्रणा लागणार आहे. सध्या महसूल मंडळ स्तरावर जे पीक कापणी प्रयोग करण्यात येतात. त्यामध्ये कृषी, महसूल व ग्रामविकास खात्यांमधील क्षेत्रीय अधिका-यांच्या मदतीने करण्यात येते. याखाली गेल्यानंतर सध्या ते मॅनेज होणार नाही व ज्या पध्दतीने ते होईल त्याचा डेटा व्यवस्थित जतन करता आला नाही तर ते प्रयोग निष्फळ ठरतील. विभागाची २०६५ महसूल मंडळे असून प्रत्येक महसूल मंडळामध्ये १० ते १२ प्रयोग करायचे असतात १५ दिवसांमध्ये हे प्रयोग करायचे असतील तर ते पूर्ण होत नाहीत. २७ हजारांपेक्षा जास्त ग्रामपंचायती आहेत प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये एकच पीक असले तरी लाखो पीक कापणी प्रयोग करण्याची आवश्यकता भासते. कमी कालावधीमध्ये एवढे प्रयोग करणे शक्य नसल्यामुळे राज्य शासनाने असा निर्णय घेतला होता की, आपण महसूल मंडळ स्तरापर्यंत हे प्रयोग करण्यात यावेत. ज्या राज्यांनी याबाबत एक-दोन प्रयोग करून पाहिले त्यांचादेखील अनुभव चांगला आलेला नसल्याचे विभागीय सचिवांनी विदित केले.

ग्रामपंचायत स्तरावर पीक कापणी करण्याच्या भूमिकेबाबत विभागाचे काय म्हणणे आहे, की पुन्हा मंडळ स्तरावरच हे प्रयोग करण्याचा विचार आहे अशी पृच्छा समितीने केली असता सद्यःस्थितीत याबाबत निश्चित काही सांगू शकणार नाही. विभागाचे कर्मचारीदेखील कमी करायचे आहेत विभागाला ग्रामस्तर, क्षेत्रीय स्तर व मंडळ स्तरावरील स्टाफला वर्ग करुन जलसंधारण विभागाकडे द्यायचे आहे. ही जबाबदारी देण्याचा निर्णय झालेला नाही स्टाफ कमी केल्यानंतर याबाबत कार्यवाही करणे आणखी कठीण होणार असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

यापूर्वी विभागाने दिलेल्या उत्तरामध्ये सांगितले आहे की, केंद्र सरकारच्या सूचनेप्रमाणे हे प्रयोग ग्रामपंचायत स्तरावर करण्यासाठी दिल्लीस्थित संस्थेला प्रस्ताव पाठविला आहे. त्यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर याबाबत अंमलबजावणी करण्याबाबत विभागाने माहिती दिली होती. त्यावेळच्या आणि आजच्या विभागाकडून येत असलेल्या माहितीमध्ये पूर्ण विपर्यास असल्याचे समितीने नमूद केले असता कृषी भवन येथे जे पथदर्शी प्रयोग घेण्यात आले तेथे आम्ही डेटा पाठविला. त्यामध्ये त्यांनी गाव पातळीवर पीक कापणी करून पाहण्याबाबत सांगितले होते. हवामानाबाबतची माहिती व सॅटेलाईट पिक्चर्सदेखील पाठविण्याबाबत त्यांनी सांगितले होते. या डेटाचे विश्लेषण करून आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने आपण ग्रामपंचायत स्तरावर हे प्रयोग करू शकतो का याबाबत पाहणी करायची होती. याबाबतचा अहवाल त्यांनी दिला नाही परंतु असे समजले की, फारसा उत्साहवर्धक रिपोर्ट न आल्यामुळे त्यांनी पुढे पाठपुरावा केला नाही. नवीन योजनेमध्ये महसूल मंडळ स्तरावर जी अंमलबजावणी करीत आहोत याबाबत त्यांची कोणतीही नाराजी नसल्याचे विभागीय सचिवांनी अवगत केले.

पीक कापणी प्रयोग आपण मंडळ स्तरावरच करणे शक्य आहे, ग्रामपंचायत स्तरावर करू शकत नाही असे विभागाने सांगितले आहे. यावर समितीचा असा मुद्दा आहे की हे पीक कापणी प्रयोग खरोखर होतात का, की फक्त कागदावरच होतात? तसेच दिवसेंदिवस तापमान बदलाच्या परिणामामुळे एकाच ग्रामपंचायत हद्दीमध्ये दोन ते तीन प्रकारचा पाऊस पडत आहे. यावर्षी व मागील वर्षीचा पाऊस पाहिला तर दीड किलोमीटर असलेल्या शेतात ७० मिमी व गावाजवळील शेतामध्ये १० मिमी एवढा फरक आहे. ६५ मिमीच्या वर पाऊस झाल्यास आपण अतिवृष्टी झाली असे गृहीत धरतो. अशा परिस्थितीमुळे जोपर्यंत आपण ग्रामपंचायत स्तरावर पीक कापणी प्रयोग करून लोकांना पीक विम्याचा लाभ देणार नाहीत तोपर्यंत त्याचा योग्य लाभार्थ्यांना लाभ होणार नाही. मंडळांच्या बाबतीत देखील अशीच स्थिती आहे. एका मंडळामध्ये ६५ मिमी व तेथून फक्त ८ किमी अंतरावर असलेल्या चांदूर रेल्वे मंडळामध्ये १० मिमी एवढा पाऊस आहे. त्याचप्रमाणे ७५ मिमी पाऊस असलेल्या एका मंडळापासून केवळ ७ किमी अंतरावर असलेल्या दुस-या मंडळामध्ये ७ मिमी एवढा पाऊस आहे. म्हणजेच ८-१० किमीच्या अंतरामध्ये ६५ मिमीचा फरक असेल तर तेथील शेतक-यांवर हा अन्याय होत नाही का ? हे प्रयोग ग्रामपंचायत स्तरावर

घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर मुनष्यबळ लागेल असे विभागाकडून सांगण्यात येत आहे. परंतु ग्रामपंचायत किंवा मंडळ स्तरावर पीक कापणी प्रयोग होतात का हे विस्ताराने समितीस सांगण्यात यावे असे समितीने सांगितले असता पावसाचा पॅटर्न हा एखाद्या भौगोलिक किंवा मंडळ प्रदेशामध्ये होत नाही. तो थोड्या दूरवरदेखील होतो किंवा होत नाही ही नैसर्गिक वस्तुस्थिती आहे. विभागाचा प्रयत्न आहे की, हे प्रयोग जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचावेत प्रत्येक शेतक-याला संरक्षण देणे गरजेचे आहे. जवळ जवळच्या शेतांमध्येदेखील फरक असतो. आजदेखील अनेक लोक येवून सांगतात की, बाकी लोकांचे पीक चांगले होते परंतु माझी जमीन हलकी असल्यामुळे माझे पीक गेले आहे, परंतु आजच्या परिस्थितीत त्या शेतक-यांना आम्ही मदत देवू शकत नाहीत. दुसरा मुद्दा पीक कापणी प्रयोगाच्या बाबतीतील आहे. केंद्र शासनाने जेव्हा प्रधानमंत्री पीक विमा योजना लागू केली तेव्हा मोबाईल ॲप तयार केले. त्यामध्ये पीक कापणी करताना त्याचा अक्षांश-रेखांश देता येतात. त्यामुळे आपण फोटो कुठे घेतलेला आहे ते कळते. तसेच उपस्थित असलेल्या लोकांचेदेखील छायाचित्र घेतले जाते. साईटवर हे छायाचित्र काढलेलेच आहेत, परंतु वजन करताना जर लोकांनी मॅनिप्युलेट केले असेल तर त्यामध्ये कॅप्चर होणार नाही. परंतु साईटवर गेलेच नाही, कुठून तरी केले, पीक कापणी झालीच नाही असे होणार नाही. त्याबाबत व्यवस्था करण्यात आली आहे. हे खरे आहे की, काही लोक आणखी चांगल्या प्रकारे हे ॲप वापरत नाहीत. मुदतीत पीक कापणी प्रयोग करण्याकरीता आम्ही आग्रही आहोत. मूग-उडीद याच्या पीक कापणी प्रयोगाबाबत आम्ही या वर्षी वर्तमानपत्रातदेखील २८ सप्टेंबर ही शेवटची तारीख असल्याबाबत दिले होते. त्यामुळे तात्काळ सर्व पीक कापणी प्रयोग आमच्याकडे आले. अशा प्रकारे काही प्रशासकीय बाबी व तंत्रज्ञानाचा वापर करून ब-याच गोष्टी सुधारण्याचा प्रयत्न केलेला असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली.

चांदूर, धामणगाव, नांदगाव येथे मूग, उडीद, सोयाबीन यांचे पीक कापणी प्रयोग कुठे झाले याबाबत समितीला माहिती द्यावी. पीक कापणी प्रयोग केवळ रेकॉर्डवर घेतले जातात ते प्रत्यक्षात होतच नाहीत असा आक्षेप समितीने नोंदविला. केवळ कोणाच्या शेतात किती झाले याबाबत विचारणा करून आकडेवारी पाठवून दिली जात असल्याचे समितीने विभागास अवगत केले असता नमुना म्हणून समितीस काही माहिती दाखवू शकतो. तसेच पीक कापणी प्रयोग अहवालावर स्थानिकांची स्वाक्षरी घेतली जात असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

अनेक वेळा मंडळ अधिकारी व तलाठी हे तालुक्याच्या ठिकाणी बसूनच ही माहिती भरतात. एका मतदारसंघामधील गावात एकही गुंठा सोयाबीन नव्हते. तेथे भरपूर पाऊस पडत असल्यामुळे व डोंगर उतार असल्यामुळे कधीही सोयाबीनची शेती केली जात नाही. त्या गावामध्ये ५० टक्क्यांपेक्षा अधिक क्षेत्र सोयाबीनचे दाखवून लोकांना बँकेमध्ये नुकसानभरपाई जमा झाली. ज्या लोकांना पैसे मिळाले नाही त्यांनी याबाबत तक्रार केली. यामध्ये काही लोक असे होते की, त्यांच्या नावावर क्षेत्र नसताना त्यांना पैसे मिळाले. उर्वरित लोकांनी तक्रार केली की, माझ्या शेजारील व्यक्तीला मिळाले मग मला का नाही ? यावर तुमचेदेखील नाव घालतो अशी तडजोड केली गेली. लोकप्रतिनिधींनी तक्रार केल्यानंतर बँकेमध्ये ते पैसे रोखून ठेवण्यात आले, परंतु संबंधित मंडळ अधिकारी किंवा तलाठी यांच्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई झाली नाही. वाळवा प्रांताधिकारी यांच्याकडे याबाबत तक्रार करूनही त्यांनी केवळ पैसे रोखून ठेवले. हे सर्व बोगस रेकॉर्ड करण्यात आले होते असेदेखील प्रकार घडत आहेत. याबाबत संबंधित तहसीलदार किंवा प्रांताधिकारी कारवाई करीत नसतील तर हे बरोबर नाही. लोकांना दाखवून दिले पाहिजे की, चुकीची माहिती दिल्यानंतर संबंधित अधिका-यांवर कारवाई होते. आजदेखील ती रक्कम बँकेमध्ये पडून असल्याची माहिती समितीने विभागास दिली असता विभागाकरिता पीक कापणीपेक्षा जास्त गंभीर व अडचणीची बाब म्हणजे सद्यःस्थितीत क्षेत्र ही आहे. पीक कापणीचे प्रयोग व्यवस्थित होत नसतील, त्यामध्ये स्थानिक स्तरावर मॅनेज केले जात असेल किंवा इतर काही असेल, परंतु यापेक्षा जास्त मोठी अडचण क्षेत्राबाबत आहे. क्षेत्राची अचुकता काढणे आज फार अडचणीचे आहे. एकंदर जो विमा काढला जातो तो तलाठ्याच्या दाखल्यावरुन काढला जातो. जेव्हा पीक पेरणी झालेल्या क्षेत्राबाबत महसूल विभाग माहिती देतो त्यावेळी ब-याच वेळा असे दिसते की, विम्याचा हप्ता निघालेला आहे, कापणी प्रयोगदेखील झालेला आहे परंतु तलाठ्याच्या महसूल रिपोर्टमध्ये ते ना पेर क्षेत्र असते तेथे शेतक-यांची कुचंबणा होते. विम्याच्या कव्हरेज क्षेत्रामध्ये, पेरणी झालेल्या क्षेत्रापेक्षा जास्त क्षेत्र येते त्यामुळे आता तत्संदर्भात केंद्र सरकारने एक उपाय शोधला आहे. इतक्या पातळीवर जाऊन अचुकता आणण्यामध्ये वेळ लागणार आहे. १०० एकर क्षेत्रावर पेरणी दाखविली आहे आणि विमा १५० एकरवर आला असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

याअनुषंगाने समितीने हे योग्य नसल्याचे मत व्यक्त केले यावर विभागीय सचिवांनी असे विदित केले की, असे जर झाले तर त्याला रेश्योमध्ये कमी करून देतात. तशा पध्दतीने जवळपास १५० कोटी रुपयांची परतफेरीची प्रकरणे तयार झाली आहेत. अचुकतेच्या क्षेत्राच्या बाबतीत जास्त प्रश्न मांडले. आता तलाठ्याने असा निर्णय केला आहे की, पीक कापणीच करणार नाही.

आजची परिस्थिती अशी आहे की, महसूल खाते पीक कापणी करणार नाही. कृषी विभाग कर्जमाफीसाठी कृषी गणनेचे सन २०११ चे आकडे देतो. कृषी गणनेचे आकडे देणार नाही, विभागाची ती मर्यादा आहे. महसूल खाते तत्संदर्भात जास्त भाष्य करू शकेल. महसूल विभागाशी ब-याच वेळा बोलणे झाले आहे, आपण यामध्ये हस्तक्षेप करावा. कृषी विभागालाही त्यामध्ये मदत मिळू शकली नाही. केंद्र सरकारकडून विचारले जाते की, आपली कृषी गणना सन २०१५ पासून सन २०१७ पर्यंत फक्त या कारणाने झाली नाही, कारण खातेदारनिहाय माहिती मिळत नाही. आम्ही संगणकावर सर्व्हेनिहाय पाहतो. एका खातेदाराकडे एका तहसीलमध्ये वेगवेगळ्या गावांत जास्त जमीन असेल तर त्यांची बेरीज करून खातेदारांची संख्या काढली जाते. आम्ही सन २०११ ची आकडेवारी सांगतो की, १ कोटी ३६ लाख खातेदार आहेत. आम्हाला महसूल यंत्रणेची मर्यादा येते. महसूल विभागाचे सचिव या संदर्भात स्पष्ट सांगू शकतील. कृषी विभागाला सुधारणा करून मिळाली तर योजना योग्यरितीने राबविता येईल असेही विभागीय सचिवांनी अवगत केले.

पीक कापणी प्रयोग होत असल्याचेही विभागीय सचिवांनी अवगत केले. तसेच स्थानिक स्तरावर अचुकतेमध्ये कुठे अडचण असेल. पूर्वी तलाठी, शेतकरी, स्थानिक लोक या संदर्भात निर्णय घेत होते. आपले सर्वसाधारण पीक कापणी प्रयोगाचे अहवाल यायचे, ते नेहमीच कमी यायचे, केंद्र सरकारकडून जास्त पैसे मिळावेत, हाही हेतू होता. आपले सर्वसामान्य मतही तसेच होते. राज्यात त्या संदर्भात कोणाचाही विरोध नव्हता. आपली परिस्थिती अशी झाली की, आपले ॲव्हरेज उत्पन्न कमी झाले. विमा कंपनी यामध्ये को-विटनेस होऊ लागली आणि त्यांचा हस्तक्षेप होऊ लागला. ब-याच प्रकरणांत लोकांचा हाच विरोध होता की, मागची ॲव्हरेज पीक कापणी कमी केली आहे, त्यामुळे आम्हाला विमा मिळत नाही, आम्हा शेतक-यांना सक्ती करू नका. मागच्या वेळी उत्पन्न वाढले. पीक कापणीमध्ये ते रिफ्लेक्ट होते. शेतक-यांचा प्रश्न काही अंशी सुटला. त्यावरून हेही दिसते की, जेव्हा पीक परिस्थिती चांगली होती, तेव्हा को-विटनेसचा फायदा झाला आहे त्यावरून पीक कापणी प्रयोग होतात हे दिसते यासंदर्भात काही अपवादात्मक प्रकरणे असतील असेही विभागीय सचिवांनी सांगितले.

पीक कापणी प्रयोग होतात असे विभागीय सचिवांकडून सांगण्यात येते. तथापि पीक कापणी प्रयोग होत नसल्याचे समिती सदस्यांचे म्हणणे असल्याचे समितीने विदित केले. दि.२८ रोजी मूग, उडीद या पिकांचे पीक कापणी प्रयोग कर्मचा-यांनी केले. विभागाने मोबाईल ॲपवर, अमरावती जिल्ह्यातील पीक कापणी प्रयोग केले असतील तर, तसे दाखवावे. मूग, उडीद पीक कापणीचे प्रयोग केव्हा केले, अशी पृच्छा समितीने केली असता, विभागाकडून समितीस ऑनलाईन दाखविण्याची व्यवस्था करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

जालना जिल्ह्याची पीक आणेवारी किंवा नजरी आणेवारी किंवा नजर पाहणी आता आपल्या हातात आली आहे. प्रत्येक विभागात हा शब्द वेगळा असेल. नजर पाहणी प्रयोगात जालना जिल्ह्यातील ८००-९०० जेवढी गावे आहेत, तेवढ्या सर्व गावांत ५० टक्क्यांच्या वर उत्पादन आहे, असा अहवाल आलेला आहे. तत्संदर्भात वृत्तपत्रांत खूप मोठ्या हेडलाईन्स आल्या आहेत. आता खरीपचा ड्राय स्पेल गेला आहे. काही भागातील १५-२० गावांत सुरुवातीला अगदी थोडा पाऊस पडला, लोकांनी पेरणी केली, थोडे उगवले आणि नंतर पूर्ण ड्राय स्पेल गेल्यामुळे अर्धा फूटदेखील उगवले नाही, त्यानंतर ते गेले. लोकांनी पीक विमा काढला आहे. नजर आणेवारी ५० टक्क्यांच्या वर सांगत आहेत. काही भागात इतका जास्त ड्राय स्पेल होता की, जिल्हाधिका-यांनी विमा कंपनीला अहवाल दिला की, २०-२५ गावांत पाऊस सुरुवातीला पडला, मात्र नंतर काहीच उगवले नाही. त्यामुळे या सर्व गावांना सरसकट गट न लावता विम्यासाठी विचार केला पाहिजे. नजरी आणेवारी व पीक कापणी प्रयोग या संदर्भात तुमच्या अनुभवातून नक्की काय परिस्थिती असते, पीक कापणी प्रयोगातील येणारा अहवाल आणि नजर आणेवारी किंवा नजर पाहणी यातून आलेला आजचा अहवाल यामध्ये किती फरक पडेल ? ५० टक्क्यांच्या वर उत्पादन आहे, असे नजर आणेवारीतून सांगण्यात आले असल्याचे समितीने नमूद केले असता फरक पडण्याचा अनुभव एकत्रित आहे. विभागाने यावेळी मूग व उडीद यामध्ये पहिला प्रयोग केला. केंद्र सरकारला नजर आणेवारीचा अहवाल पाठविण्याची परिस्थिती होती. पीक कापणी प्रयोग त्यावेळी नव्हता. परिणाम होतात, त्यामुळे अशी काळजी घेतली. आम्ही अंदाज आणेवारीचे आकडे पाठविले. जास्त पाठविले किंवा कमी पाठविले, या दोघांचा परिणाम एमएसपीवर, खरेदीवर होतो. आम्ही जास्त आकडे दाखविले तर केंद्र सरकार आम्हाला २५ टक्क्यांपर्यंत मर्यादा देते की, याची खरेदी करावी, कमी आकडे दाखविले तर आमची मर्यादा कमी होते आणि राज्य शासनाला स्वतःचे पैसे घालून खरेदी करावे लागते. मागचा अनुभव तसा आहे. त्यामुळे यावेळी आम्ही पीक कापणी प्रयोग व अंदाज आणेवारी यांची तुलना केली. मूग व उडीद यांमध्ये यावेळी २५ ते ३० टक्के आणेवारी कमी आहे. अजून सोयाबीन पीक कापणी प्रयोगाचा कोणताही अहवाल आलेला नाही. परंतु याच्या उलट परिस्थिती मागच्यावेळी तुरीच्या बाबतीत झाली अंदाज आणेवारीची तीच आकडेवारी पाठविली ती फार कमी होती. प्रत्यक्ष पीक कापणी अहवाल येईपर्यंत इतके पीक आले की विभागाला खरेदी करणे

भाग पडले. सध्या २६ लाख क्विंटल तूर कुठे विकायची, असे सर्वात मोठे आव्हान विभागासमोर आहे. विभाग हे मान्य करते की, अंदाज आणेवारीमध्ये बरोबर आकडेवारी येत नाही. मात्र पीक कापणी प्रयोगामध्ये रिलेटिव्हली रिलायबल फिगर्स येत असल्याची माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

नजर आणेवारी करण्याची पध्दत कशामुळे असते, इतका प्रचंड फरक असेल तर ते बरोबर नाही असे मत समितीने व्यक्त केले असता २ मुद्दे आहेत पीक विम्याचे पूर्ण पे-आऊट पीक कापणीवर आधारित आहे किंवा हवामानावर आधारित आहे. आपल्या २ प्रकारच्या योजना आहेत. विभाग नजर अंदाज आणेवारी ही फक्त रिलिफ, मदत व पुनर्वसन यासाठी वापरण्यात येत होती. केंद्र सरकारने यावर्षी ड्रॉट मॅन्युअल, प्रशिक्षण स्तरावर केले आहे. दुष्काळाचे मॅन्युअल तयार केले आहे. त्यामध्ये पावसाचे, पावसाच्या फंडचे, सॅटेलाईट व्हेजिटेशनचा पर्सेप्टेज इंडेक्स काढायचे आहेत, सॉईल मॉयश्चरचे ६ इंडेक्स दिले आहेत, त्यावरुन दुष्काळ जाहीर केला जाईल नजर अंदाजचा प्रश्न पुढील वर्षापासून राहणार नसल्याचे विभागीय सचिवांनी अवगत केले.

नजर आणेवारी व अंतिम आणेवारी पाठवित असताना, केंद्र सरकारकडे या संदर्भातील माहिती पाठवित असताना, एमएसपीच्या बेस रेटने खरेदी करीत असताना, केंद्र सरकार २५ टक्के परवानगी देते, राहिलेला माल राज्य सरकारच्या पैशातून खरेदी करावा लागतो. गेल्या १०-१५ वर्षांत पहिल्यांदा तुरीच्या बाबतीत असे घडले आहे. कारण माननीय पंतप्रधानांनी आवाहन केले होते की, तुम्ही डाळीच्या बाबतीत देशाला आत्मनिर्भर करावे. विदर्भ व मराठवाडा येथेच तुरीचे उत्पादन झाले. बाकी ठिकाणी साखर पट्टा, द्राक्ष पट्टा, मोसंबी पट्टा, डाळींब पट्टा आहे. केंद्र सरकारने तुम्ही नजर अंदाज आणेवारी सादर करा किंवा अंतिम आणेवारी सादर करा आणि केंद्र सरकार त्याच्या २५ टक्केच खरेदीची परवानगी देईल, उर्वरित राज्य सरकारने तिजोरीतून खरेदी करावे. विभाग हे कशाच्या आधारे सांगत आहे याबाबत समितीने विचारणा केली असता देशात डाळीचे उत्पादन कधी जास्त नव्हते, अशी परिस्थिती नव्हती. विभागाचे डेलिगेशन देशात ब-याच ठिकाणी फिरत होते आणि सांगत होते की तुम्ही उत्पादन करा आम्ही खरेदी करू. तेव्हा अशी परिस्थिती होती त्यामुळे असा कधी प्रश्न आला नाही. सर्वांचा समज हाच होता की, किमान हमी भाव जाहीर केला म्हणजे एमएसपी सांगितला की होईल, केंद्र सरकारने भाताच्या, धानाच्या व गव्हाच्या बाबतीत १०० टक्के हमी दिली आहे, तशी हमी आहे. मागच्या वेळी जेव्हा उत्पादन वाढले, तेव्हा पहिल्यांदा असे दाखविले की, आमच्या प्राईज सपोर्ट स्किमच्या अंतर्गत आम्ही हा सपोर्ट देणार आहोत. एमएसपी वेगळे आहे त्यांनी पीएससी स्किम दाखविली. पीएससी म्हणजे प्राईज सपोर्ट स्किम आहे. ते म्हणतात की, बाजार हस्तक्षेप म्हणून आम्ही २५ टक्के मदत देतो. २५ टक्के वाढविण्याची परिस्थिती आली नसल्यामुळे आपणही इतकी मागणी केली नाही आणि त्यांच्याकडेही कन्फ्युजन राहिले की, आम्ही इतक्या उत्पादनासाठी सांगतो, पण पूर्ण खरेदी करणार नाही, अशी परिस्थिती झाली. नजर अंदाज आणेवारी, क्रॉप कटिंग, एमएसपी, खरेदी, निर्यात व आयात या संदर्भात चुकीची आकडेवारी दिली तर आयात होऊन जाते. जादा आकडेवारी दिली आणि शॉर्टेज निर्माण झाले तरी गडबड होते असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले. तसेच आता पुढच्या वर्षापासून आणेवारी हार्शमध्ये जाणार आहे. विम्याच्या बाबतीत क्रॉप कटिंग एक्सपेरिमेंट लागू झाले आहे. त्यामध्ये नजर अंदाज आणेवारीचा आकडा घेतला जात नाही. दुष्काळ जाहीर करणे किंवा मदत व पुनर्वसन योजनेमध्ये मदत देण्यासाठी याचा वापर होत होता. महसूल कोडमध्ये अजून तशीच व्यवस्था आहे. पण केंद्र सरकारने अभ्यास करून ड्रॉट मॅन्युअल तयार केले आहे. डिझास्टर मॅनेजमेंट करतात, त्यावेळी ड्रॉट मॅन्युअलचा संबंध येतो. दुष्काळ पडला तर काय करायचे, हे त्यामध्ये आहे. आता आणेवारी जाणार नाही. पावसाचे परिमाण किती आहे, पिकांची परिस्थिती लक्षात घेता, कोणते पीक केव्हा घ्यावे, हे समजेल. त्यांनी जून-जुलै सांगितले आहे. महाराष्ट्रात जूनच्या शेवटी म्हणजे २५ जूननंतर पाऊस येतो. पाहणी सांगते की, माहे जुलै व ऑगस्ट पकडावे. जूनमध्ये लावले तर अर्थ नाही. पावसाचा खंड किती आहे, पॅटर्न कसा आहे, हे पाहिले पाहिजे. ४ पॅरामीटर घेतले आहेत, त्यामध्ये सॉयल मॉयश्चर इंडेक्स आहे, व्हेजिटेशन इंडेक्स आहे. ४-५ मुद्दे घेतले आहेत. काही सॅटेलाईटचे मुद्दे घेणार आहेत. त्याच्याकडून आपोआप माहिती मिळते त्याच्या आकडेवारीवरून दुष्काळ जाहीर करायचा की नाही, हे ठरविले जाईल. आता आणेवारीचा प्रश्न राहणार नसून पहिले २ दिवसांचे प्रशिक्षण पुण्याला महसूल व कृषी यंत्रणेचे झाले असल्याची माहितीही समितीस दिली.

याची अंमलबजावणी या वर्षापासूनच करणार आहात का, या समितीच्या प्रश्नाला, आता उशीर झाला असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने मागच्या ५० वर्षांमध्ये न झालेल्या सर्वात मोठ्या दुष्काळात सुध्दा गोंदिया जिल्ह्याची नजर आणेवारी ५० टक्क्यांच्या वरच दाखविली असल्याचे समितीने नमूद केले असता त्याबाबत स्पष्ट माहीत नाही की, यावर्षी वापर करणार आहेत की पुढच्या वर्षी वापर करणार आहेत असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

गोंदिया जिल्ह्यात फक्त ६० टक्के पाऊस झाला आहे. पेरणीला पाऊस खूप लागतो. तुम्ही त्या दृष्टीने माहे जुलै व ऑगस्ट म्हटले आहे या दोन महिन्यांचा ॲव्हरेज घेतला तर खूप कमी पाऊस आहे. विभागाने त्या आधारे क्रॉप पकडले पाहिजे. विभाग हा आधार सांगत आहे तर हे केव्हापासून लागू करणार आहात ? मागच्या ५० वर्षांमध्ये कधीही न झालेला सर्वात मोठा दुष्काळ आहे. त्याची तुम्ही ५० टक्क्यांच्या वरची नजर अंदाज आणेवारी पाठविली. गोंदिया जिल्ह्यात पाण्याची अडचण कधीच झाली नाही. आता यावेळी टँकरची अडचण येणार आहे. ५० टक्के आणेवारी सांगत आहात यांची नजर अंदाज आणेवारी ५० टक्क्यांच्या वर नाही. गोंदिया जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याची अडचण कधीही भासली नाही. असे समितीने विभागास अवगत केले. तसेच विभागीय सचिव आता सांगत आहेत त्या गोष्टींची अंमलबजावणी करावी असेही समितीने नमूद केले असता विभागाचे या संदर्भात नियोजन असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

सदर विषयाच्या बाबतीत महसूल विभागाच्या सचिवांना किंवा मुख्य सचिवांना विचारले पाहिजे. शेतीची नुकसानभरपाई देत असताना, पहिल्यांदा ५० टक्के नुकसानभरपाईची केंद्र सरकारची अट होती. आता ती अट शिथिल करून ३३ टक्के नुकसान झाले तरी त्याला मदत अनुज्ञेय होईल, असे केंद्र सरकारने घोषित केले आहे. मात्र ती योजना महसूल, मदत व पुनर्वसन खात्यामार्फत राबविली जाते. पीक कापणी प्रयोग, विम्याची अंमलबजावणी कृषी खात्यामार्फत होते त्यामुळे या संदर्भात एकत्रीकरण करून यामध्ये समानता आली पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले. तसेच कोणत्याही गावाच्या नजर पाहणीमध्ये ५० टक्क्यांच्या आत आणेवारी दाखवायची नाही, असे इनडायरेक्ट आदेश असतात. मागच्या वेळी शिराळा तालुक्यातील एकही गाव जलयुक्त शिवार अभियानात बसले नाही कारण नजर पाहणीत ते सर्व वर गेले. जवळपासच्या तालुक्यांतील गावे मात्र त्यामध्ये बसली. आंदोलन केल्यानंतर शिराळा तालुक्यातील ४१ गावे त्या मध्ये बसली. प्रत्यक्षात क्रॉप कटिंग केल्यानंतर ज्या गावांना पिण्याच्या पाण्याची अडचण होती, पाण्याचा एकही थेंब नव्हता, ती गावे सुध्दा नजर पाहणीमध्ये वर गेली. जिल्हाधिका-यांच्या समोर लोकांनी आंदोलन केले. मग ती गावे जलयुक्त शिवार अभियानात खास बाब म्हणून उशिराने बसविण्यात आली. मग त्यासाठी पुन्हा निधी मिळण्यामध्येही अडचणी आल्या. नजर पाहणी संदर्भात मंडळ अधिकारी व त्यांच्या कनिष्ठ स्तरावरील लोकांचे प्रबोधन होत नाही. लोकांना बरोबर घेऊन जाऊन क्रॉप कटिंग करीत नाहीत. लोक जागरूक आहेत, तेथे ब-यापैकी क्रॉप कटिंग होत आहे. पण ज्या गावात लोकांना कल्पना नाही की, निरनिराळे क्रॉप कटिंग करायचे आहे, त्यांचे अंदाजित पीक लिहितात आणि ५० टक्क्यांच्या आत बसणार नाही, याची काळजी घेतात. सदर बाबतीत काळजी घेण्यात आली पाहिजे. असे मत समिती सदस्यांनी व्यक्त केले.

विभागाने नवीन सिस्टिम अंमलात आणली तर काही प्रमाणात न्याय मिळू शकतो. क्रॉप कटिंगची मंडळाच्या आधारावर १०० वर्षे जुनी पीक पाहणी आहे, ही ब्रिटिशकालीन पध्दत आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही तीच पध्दत राबविणार काय? विभागाने सांगितले की, ग्रामपंचायत स्तरावर मनुष्यबळ नाहीट मनुष्यबळ कोणासाठी आहे ? मनुष्यबळ शेतक-यांसाठी असले पाहिजे. लोकलेखा समितीची शिफारस राहणार आहे की, सर्व योजनांच्या संदर्भात ग्राम स्तरावर आणेवारी निघाली पाहिजे. क्रॉप कटिंग झाले पाहिजे. विभाग हे मंडळाच्या स्तरावर करीत आहे. विभागाने अडचणी सांगितल्या आहेत तर विभागानेच त्यासाठी काही तरी मार्ग काढावा. आधुनिक तंत्रज्ञान वापरावे. मात्र ग्रामपंचायत स्तरावरच आणेवारीची पध्दत झाली पाहिजे. लोकप्रतिनिधी मागच्या २५ ते ३० वर्षापासून सभागृहात हीच मागणी करीत आहेत व हीच मागणी राज्यातील सर्वसामान्य जनतेची आहे. ज्या गावांचा समावेश करायला हवा त्यांना घेतले नाही व ज्या गावांना आवश्यकता नाही त्यांचा समावेश केलेला आहे यामुळे लोकांचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. महसूल विभागाकडे कर्मचारी वर्ग नाही, अशी त्यांची अडचण आहे असे समितीने विभागास अवगत केले. कृषी विभागात जवळजवळ ६० टक्के पदे रिक्त आहेत. अनेक तालुक्यात तालुका कृषी अधिकारी उपलब्ध नाहीत, कृषी सहायक नाहीत. ६० टक्के जागा रिक्त असताना काम कसे होणार आहे ? घनसावंगी तालुक्याची माहिती आपण विभागाने घ्यावी तेथे किती पदे मंजूर आहेत व किती पदे रिक्त आहेत साधारणपणे हे प्रमाण ७०:३० असे असल्याचेही समितीने सांगितले असतानांदूर खंडेश्वर या तालुक्यात सोयाबीनचे क्रॉप कटींग सुरू आहे, ते अद्याप अंतिम झालेले नाही. त्याचे स्क्रीन शॉट पाठवण्यास सांगितले आहे. नजर आणेवारी महसूल विभागाकडून केली जाते, त्यामुळे ही माहिती माझ्याकडे सद्यःस्थितीत उपलब्धआ नाही. एका सोयाबीनच्या रोपाला किती शेंगा आल्या आहेत, प्लांट डेन्सिटी किती आहे, शेंगामध्ये सरासरी किती दाणे आहेत अशी माहिती ऑक्टोबरमध्ये गोळा करुन केंद्र शासनाला दिली जाईल. सध्या सहायक, मंडळ, तालुका अधिकारी यांच्या कडून रिपोर्ट मिळत नाही जनरल रिपोर्ट तयार केला जातो. क्रॉप कटींगची जबाबदारी महसूल, ग्रामसेवक व तलाठी यांच्यावर आहे कृषी विभाग एकटाच हे काम करीत नाही. एरियाबाबत कृषी विभागाला बरीच अडचण येते. तलाठ्यांनी दिलेले आकडे व ७/१२ मधील दाखले यांच्यामध्ये बराच फरक असतो. तालुका कृषी अधिका-याच्या ३५४

पदांपैकी १२२ पदे रिक्त आहेत. ही सर्व पदे एमपीएससीमार्फत सरळसेवेने भरावयाची आहेत. पदे भरलेली असूनही रिक्त पदे आहेत. नवीन योजना कृषी विभागाकडे देण्यात आलेली आहे. पदे मंजूर आहेत मात्र त्यावरील कर्मचारी वर्ग मंजूर केलेला नाही. यामुळे डेप्युटेशनवरून कर्मचारी भरुन घ्यावेत,असे सांगण्यात आले आहे. एमसीआरचे पद डेप्युटेशनचे आहे. एक डायरेक्टर, जॉईंट डायरेक्टर एका ठिकाणाहून काढून दुसरीकडे द्यावे लागते, नवीन पदे भरता येत नाही. डेप्युटी डायरेक्टरचे पद डेप्युटेशनने भरावे लागत आहे. तालुका कृषी अधिकारी या संवर्गातील १२२ पदांना पदोन्नती देऊन डेप्युटी डायरेक्टर केलेले आहे. १२२ जण जे अनेक वर्षाासून डेप्युटी डायरेक्टर आहेत त्यांना रिव्हर्ट करुन तालुका कृषी अधिकारी करावे असा एक पर्याय आहे. मात्र तसे केल्यास मोठ्या प्रमाणात विरोध होतो. शेवटी असा निर्णय झाला की जे कार्यालयात तंत्र अधिकारी आहेत, त्यांना भरुन घ्यावेत. अशी ८० पदे आहेत २०० विनंती अर्ज प्राप्त झाले आहेत अशा परिस्थितीत पदे भरणे विभागीय सचिवांच्या नियंत्रणाच्या बाहेर असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

रिक्त पदे भरणे नियंत्रणाबाहेर आहे असे विभागीय सचिवांना म्हणता येणार नाही. यावर तोडगा काढण्याची जबाबदारी विभागाचीच आहे. कृषि विभागाने वित्त विभागाला प्रस्ताव पाठवला काय ? समितीला देखील विभागाची अडचण समजत असून समितीमार्फत देखील याबाबत शिफारस करण्यात येईल. तसेच तालुका कृषी अधिकारी या पदाबाबत सांगितले तसे कृषी सहायकांची देखील तीच परिस्थिती असल्याचे समितीने नमूद केले असता कृषी सहायकांची १२०० पदे रिक्त आहेत. एकूण २ हजार पदे रिक्त होती, त्यापैकी ७३० पदे भरण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्याकरिता घेतलेल्या परीक्षेत अनेक प्रकारच्या अडचणी आल्यामुळे विभागाने ती परीक्षा रद्द केली संबंधित लोक मॅटमध्ये गेले मॅटने विभागाच्या विरुध्द निकाल दिला. काही संशयास्पद आहेत ते शोधून काढावेत व इतरांना ऑर्डर द्यावी, असे सांगण्यात आले. मात्र विभागाने हा शोध कसा करावा हा प्रश्न आहे. उच्च न्यायालयात जाण्यासाठी विधी व न्याय विभागाकडून परवानगी मिळाली. मात्र या करिता ८-९ महिने लागतील. आदिवासी, अनुसूचित जातीची पदे भरण्याची अनुमती मिळाली. तांत्रिक पदे भरण्याची परवानगी मिळावी अशी विभाग विनंती करीत आहे. त्यास मा.मुख्यमंत्री महोदयांनी मान्यता दिलेली आहे त्यानुसार पदे भरली जातील. पदे रिक्त असल्यामुळे शेतक-यांना मार्गदर्शन करण्यात अडचणी येत आहेत. १२०० पदे भरण्याची परवानगी आता देण्यात येईल. ७५० पदांना विभागाने मान्यता दिलेली असून १५० पदे जॉईंट डायरेक्टर या पदाची आहेत. सेंट्रलाईज नियुक्ती न करण्याचा प्रस्ताव मा.मंत्री महोदयांना मान्य असून १५० पदे एक महिन्यात भरण्यात येतील अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

ग्रामपंचायत पातळीवर करावे, महसूल विभागाला सांगून मदत करण्याकरिता आग्रह धरला जाईल असे समितीने नमूद केले तसेच क्रॉप कटींगचे योग्य रिझल्ट मिळत नाही, विम्याची रक्कम मिळत नाही. मोठे मंडल असल्यामुळे अडचण येते ते रिलोकेट केले पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता एरिया खूप मोठा आहे त्यामुळे अडचण येत असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

**परिच्छेद क्र. ३.१.२.२'शासन अधिसूचना निर्गमित करण्यात विलंब ':-**

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात चर्चा करताना समितीने अशी विचारणा केली की, अधिसूचना काढण्यास विलंब का झाला, त्यास कोण जबाबदार आहे ? १६, ६४ दिवस अशा प्रकारे मोठ्या प्रमाणात विलंब झालेला आहे. विभागाची डेडलाईन निश्चित आहे. वेळेवर केले असते तर लोकांची संख्या वाढू शकली असती या करिता कोणावर जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. यासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, दिनांक १७-११-२०१२ मध्ये शासन निर्णय निर्गमित झालेला आहे त्यावेळी १७ दिवसांचा विलंब झालेला आहे. त्याचे कारण असे आहे की, दिनांक ३० ऑक्टोबर रोजी राज्यस्तरीय समितीची बैठक निश्चित झाली होती. मात्र त्यावेळी इतर विषयाच्या संबंधी बैठक लागली व एक कार्यक्रम घेण्यात आला. यामुळे उक्त दिवशी अपर मुख्य सचिवांना तेथे जावे लागले त्यामुळे बैठकीची तारीख पुढे ढकलण्यात आली व ती बैठक दि. १७ नोव्हेंबर रोजी घेण्यात आली. त्याच दिवशी शासन निर्णय काढण्यात आला.

सन २०१४-१५ व सन २०१५-१६ मध्ये देखील असेच झाले आहे. ६४ दिवसांचा विलंब झालेला आहे. विलंब होऊ नये याकरिता यंत्रणा तयार केली पाहिजे योग्य वेळी व्यवस्थापन केले पाहिजे असे समितीने सूचित केले असता सन २०१६,२०१७ व २०१८ मध्ये वेळेवर झालेले असून आता मॅनेजेबल आहे. दर गैरवाजवी असतील किंवा प्रतिसाद आला नाही तर फेरनिविदा काढणे अपिहार्य होते यामुळे काही वेळा वेळ जातो, असा खुलासा विभागीय सचिवांनी केला. उशिर झाल्यामुळे लोकांनी कर्ज घेतले आहे त्याचा समावेश होतो. एक महिन्याची मुदत मिळाली पाहिजे मात्र तेथे अडचण येते. अर्जदार जास्त असतील व त्यांना ही माहिती मिळाली नाही तर अडचण निर्माण होते, असेही समितीस अवगत केले.

दिनांक ५ जुलै रोजी अधिसूचना जारी केली व दिनांक ३१ जुलै ही शेवटची तारीख होती भविष्यात उशिर होऊ नये म्हणून काय उपाययोजना केली आहे या समितीच्या प्रश्नाला दि. ३० जूनला केले असते तर एक महिना पूर्ण मिळाला असता ५ दिवस उशीर झालेला असून टाईम शेड्युल विभागाकडून तयार करण्यात येतात यामुळे फारसा विलंब होत नसल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

**परिच्छेद क्रमांक ३.१.२.३, विमा हप्ता व दावा देण्यास विलंब होणे :—**

उपरोक्त परच्छेदासंदर्भात समितीने अशी विचारणा केली की, क्लेम विमा कंपनीकडून दिला जात असल्यामुळे क्लेम सबसिडी कशी असते? याबाबत माहिती देताना नवीन पध्दतीनुसार विमा कंपन्यांना क्लेम द्यावयाचा असतो. शेतक-यांनी एक ठराविक रकमेनुसार प्रिमियमची रक्कम द्यावयाची होती. तसेच त्यापेक्षा क्लेमची रक्कम जास्त झाल्यास ती रक्कम केंद्र व राज्य शासनाने ५०:५० टक्क्यानुसार विमा कंपनीला क्लेम सबसिडीच्या माध्यमातून द्यावयाची होती. यामुळे विमा कंपन्या सिक्युअर होत्या विमा कंपनी फक्त एजन्सी होती. परंतु सदर योजनेत शेतक-यांना मिळणारे कव्हरेज कमी होते स्मॉल आणि मार्जीनल शेतक-यांकरिता ५०:५० टक्के रक्कम केंद्र व राज्य शासनाकडून विमा कंपनीला दिली जात असल्यामुळे त्यांना प्रिमियम देण्याची गरज नव्हती इतर लोक स्वतःचा प्रिमियम भरत होते असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

दोन्ही प्रक्रियेत जास्त विलंब होण्याची कारणे काय आहेत अशी विचारणा समितीने केली असता विमा सुरू होईपर्यंत किती क्षेत्र विम्यामध्ये येणार आहे व त्याकरिता किती रक्कम लागणार आहे याचा अंदाज प्रथम येत नसल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

अशा परिस्थितीत १० कोटी रुपयांची तरतूद केल्यानंतर ३०० कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्याद्वारे मागणी केली जाते. याचा अर्थ विभागाने काढलेला अंदाज बेसलेस आहे ही बाब माहिती असताना सुध्दा पुरवणी मागण्या होईपर्यंत निधीची वाट बघावी लागते असे समितीने सूचित केले असता, विभाग यासंबंधी प्रस्ताव सादर करतो परंतु जेव्हा बजेट मंजूर होते तेव्हा अशा योजनेकरिता निधी आवश्यक असल्यास सीएफ देऊन कार्यवाही केली जात असल्यामुळे त्यात गॅप निर्माण होतो अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली. तसेच सीएफ करुन घेत असतो परंतु विभागाला जेवढा निधी पाहिजे त्याकरिता विभागाकडे बजेट नसल्यामुळे थोडा विलंब लागत असल्याचे समितीस अवगत केले.

ही बाब आऊटले मध्ये नसते असे विभागाला म्हणायचे आहे का अशी पृच्छा समितीने केली असता, अनेक नवीन स्कीम येत आहेत त्यात पहिला आदेश असा असतो की, त्या प्रथम आऊटले मध्ये समाविष्ट करुन घ्याव्यात. तसेच विमा करीत असताना त्याकरिता नॉमिनल प्रोव्हीजन करावी लागते. तसेच कोणत्या बाबी कपात करायच्या त्याबाबत सेंट्रल लिस्ट स्पॉन्सर स्कीम असतात असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

बजेट तयार करीत असताना ३-४ महिन्यांपूर्वी किती खर्च होणार आहे पुढील वर्षात साधारणतः किती खर्च होणार आहे याबाबत विभागांकडे विचारणा केली जाते. त्यानुसार त्या विभागांचा आऊटले निघत असतो. तसेच विभागांकडून सुरुवातीस आलेल्या मागणीनुसार त्यांना त्यानुसार पुरवठा करावयास पाहिजे असे समितीने सूचित केले तसेच मागील वर्षीच्या आधारावर व त्यात १० टक्क्यांची वाढ करुन होणारी रक्कम असे आपले ऑब्जर्व्हेशन असले पाहिजे असेही समितीने अवगत केले असता, विभागाने आता त्यात सुधारणा केल्या असून यावर्षी १६०० कोटी रुपयांची तरतूद केली असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने यावर्षी १६०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे परंतु चर्चा करीत असताना मागील वर्षाची चर्चा करीत असतो. या सर्व योजना महत्वाच्या असल्यामुळे त्यात वित्त व नियोजन विभाग हस्तक्षेप करीत नसावा याचा अर्थ विभागाने निधीची मागणी केली नाही अशी विचारणा समितीने केली असता यावर्षी विभागाने १६०० कोटी रुपयांची मागणी केली असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

आता अनुदान देण्याची पध्दत बंद झाली असून सर्व रक्कम विमा कंपनीकडून दिली जाणार आहे याबाबत समितीने पृच्छा केली असता, विभाग प्रिमियम देत असतो २० टक्क्यांचा प्रिमियम दर निश्चित झाल्यास त्यात शेतक-यांनी २ टक्के व उर्वरित १८ टक्क्यांमध्ये केंद्र व राज्य शासन ५०-५० टक्के रक्कम द्यावयाची असते असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

हे अल्प आणि अत्यल्प शेतक-यांसाठी आहे का ? तसेच सदर स्कीममध्ये सर्वजण कव्हर होतात का अशी समितीने विचारणा केली असता, आता संपूर्ण स्कीममध्ये येणा-या डिफरन्सची रक्कम देत असल्यामुळे खूप व्याप वाढला आहे. सदर स्कीममध्ये सर्व पार्ट कव्हर होतात. उदाहरण म्हणजे सर्व जोखीम कव्हर करुन रक्कम निश्चित झाल्यानंतर त्याच्या २० टक्के प्रिमियमची रक्कम द्यावयाची असते. साधारणतः खरीप हंगामात ३ हजार कोटी रुपये प्रिमियम असून त्यात शेतक-यांचा हिस्सा ४०० ते ५०० कोटी रुपयांचा असतो. उर्वरित रक्कम केंद्र व राज्य शासनाकडून ५०-५० टक्के दिली जाते. मागील वर्षी केंद्र व राज्य शासनाने प्रत्येकी १८०० कोटी रुपये दिले होते आणि ४ हजार कोटी रुपयांचा खर्च झाला होता. उर्वरित ४०० कोटी रुपयांचा हिस्सा शेतक-यांना होता. मागील वर्षीच्या १८०० कोटी रुपयांच्या तरतुदीचा अंदाज घेऊन यावर्षी १६०० कोटी रुपयांची तरतूद केली असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली.

मागील वर्षीच्या तरतुदीपेक्षा यावर्षी तरतूद कमी करण्याचे कारण काय आहे याबाबत समितीने विचारणा केली असता तरतूद केल्यानंतर निधी खर्च झाला नाही तर तो ब्लॉक होतो परिणामी तो निधी दुस-याला मिळू शकत नाही असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

मागील वर्षी विमा कंपनीला किती फायदा झाला होता या समितीच्या प्रश्नाला, खरीप हंगामाच्या दरम्यान विमा कंपनीला ४ हजार कोटी रुपये दिले होते तसेच अंदाजे २ हजार कोटी रुपये पुन्हा शेतक-यांना द्यावे लागले असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

अशाप्रकारे २ हजार कोटी रुपये वाचल्यामुळे तो त्यांचा नफा झाला असल्याचे समितीने सांगितले असता, ही रक्कम वाचत नाही आपल्याला त्याचा रि-इन्शुरन्स करावा लागतो. आपल्या देशात अशाप्रकारे कोणतेही सुरक्षा कवच नसल्याचे विभागीय सचिवांनी अवगत केले.

हा नफा कोणत्या न कोणत्या कंपनीत बुक झाला असल्याचे मत समितीने व्यक्त केले असता समितीने उपस्थित केलेल्या मुद्याप्रमाणे विभागाने दोन सूचना केलेल्या आहेत. सदर योजनेसंबंधी जेव्हा अभिप्राय मागविण्यात आले होते तेव्हा विभागाने अशी सूचना केली होती की, कमी खर्च झाल्यामुळे विमा कंपनीकडे २० टक्क्यांपेक्षा जास्त रक्कम राहत असल्यास त्यांनी ती परत केली पाहिजे. तसेच विमा कंपनीला जास्त खर्च आल्यास तो शेअर केला जाईल ही केंद्र शासनाची योजना आहे. विमा कंपनीला १०० रुपये मिळत असल्यास त्यातून त्यांना प्रथम पेमेंट करावे. परंतु त्यांना स्वतःच्या निधीतून ३५० रुपयांपर्यंत खर्च सोसायचा आहे. यामुळे ३५० पट त्यांच्याकडून रेट जास्त येतो. मागील वेळी त्यांचा ५० टक्के खर्च झाला होता. यामुळे विभागाने त्यांना सूचना केली होती की, २०० टक्क्यापर्यंत त्यांनी कार्यवाही करुन बघावी. जेणेकरुन विम्याचे हफ्ते कमी होऊ शकतील परंतु अद्याप त्यावर निर्णय झालेला नाही. या संदर्भात ३-४ विमा कंपन्या असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले. तसेच शेतक-यांकडून खरीप, रब्बी आणि नगदी पिकांसाठी पीकनिहाय वेगवेगळी रक्कम घेतली जाते असेही समितीस अवगत केले.

मोठ्या (सधन) शेतक-यांकडून किती टक्के रक्कम घेतली जाते अशी पृच्छा समितीने केली असता, स्मॉल आणि मार्जिनल शेतक-यांकरिता संपूर्ण रक्कम १०० टक्के सबसिडाईज होती. सध्या सुरू असलेल्या योजनेनुसार शेतक-यांनी खरिप पिकासाठी २ टक्के, रब्बी पिकासाठी दीड टक्का आणि नगदी पिकांसाठी ५ टक्के रक्कम द्यावयाची आहे. तसेच विम्याचा जो काही रेट असेल त्यात उर्वरित रक्कम केंद्र व राज्य शासनाकडून ५०:५० टक्के भरली जाईल. हा नियम सर्व शेतक-यांसाठी आहे. प्रिमियम सम इन्शुअर्डच्या रेशोवर आधारित असतो. सम इन्शुअर्ड १०० रुपये असल्यास त्यापैकी १८ रुपये प्रिमियम द्यावयाचा असल्यास त्यापैकी २ रुपये शेतक-यांनी आणि उर्वरित १६ रुपये केंद्र व राज्य शासनाने विभागून घ्यावयाचे आहेत अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

शेतक-यांना प्रत्यक्षात पीक विमा संरक्षण कवच मिळण्याच्या संदर्भात मागील वर्षी दर्यापूर तालुक्यात शेतामध्ये उडीदाचे पीक कापून लहान लहान कळपात ठेवले होते. त्यानंतर परतीच्या पावसाला सुरुवात झाल्यामुळे ८-१० दिवसांच्या सततच्या पावसामुळे उडीदाचे सर्व पीक सडून गेले. परिणामी शेतक-यांचे मोठे नुकसान झाले. परंतु शासन निर्णयात प्री हार्व्हेस्टींग आणि पोस्ट हार्व्हेस्टींगचा उल्लेख आहे. सदर पीक शेतक-यांच्या घरी पोहचल्यानंतर हार्व्हेस्टींगची प्रक्रिया पूर्ण झाली असा त्यात उल्लेख असणे आवश्यक आहे. पीक कापल्यानंतर ते हार्व्हेस्टींग झाले असा त्याचा अर्थ होत नाही. प्रथम मळणी यंत्रातून धान्य काढून पोते भरले जातात व त्यानंतर ते घरी नेले जातात. दर्यापूर तालुक्यात अनेक गावांमध्ये पांदण रस्ते नाहीत. यामुळे थ्रेशर एकाच ठिकाणी राहिल्यामुळे ते घरी येऊ शकले नाही. तसेच उडीदाचे पोते सुध्दा घरी आणता आले नाहीत. अशी माहिती समितीने दिली.

पिकाला कापणी पूर्व विमा आहे, कापणी नंतर लागू नाही असे सांगून बगल दिली होती. यासाठी मोठा संघर्ष देखील झाला. तेव्हा यामध्ये शासन काही सुधारणा करणार आहे काय? कापणी नंतर पिकाचे नुकसान होते ही परिस्थिती सोयाबीनची नाही तर धानाची देखील आहे. अनेकदा तर पीक कापल्यानंतर संध्याकाळी पाऊस येतो. शेतामध्ये पीक काढून ठेवल्यानंतर अनेकदा शेतकरी घरी देखील जात नाही. पण अचानक पाऊस आला की पूर्णपणे धान किंवा सोयाबीनसारखे अन्य पीक सडून जाते. तेव्हा कापणी नंतरच्या पिकाला पीक विम्याचे संरक्षण मिळणार आहे काय या समितीच्या प्रश्नांना विभागीय सचिवांनी असे सांगितले की, कापणीच्या नंतर १५ दिवसांच्या कालावधीत पावसामुळे पिकाचे नुकसान झाले तर शेतक-यांला नुकसान भरपाई मिळू शकते. कापणी नंतर १५ दिवस माल शेतावर राहील असे गृहीत धरूनच टेंडर काढलेले असते तशा प्रकारच्या अटी व शर्ती टेंडरमध्ये नमूद केलेल्या असतात.

कापणीनंतरचा १५ दिवसांचा कालावधी कन्फर्म कोण करणार आहे अशी समितीने विचारणा केली असता यासाठी स्थानिक पातळीवर पंचनामा करावा लागतो हा पंचनामा स्थानिक पातळीवरील महसूल यंत्रणेच्या उपस्थितीत करावा लागतो असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

ही माहिती कोणालाही माहीत नसून ही माहिती कृषि विभागातील कोणत्याही अधिका-यांना माहीत नाही. विमा कंपनीचे एजंट त्याचाच फायदा घेतात आणि शेतक-यांना नुकसान भरपाईपासून वंचित ठेवतात. कापणी नंतर १५ दिवसांचा ग्रेस पिरिएड असतो हे आपल्या व महसूल विभागाच्या कोणत्याही व्यक्तीला माहीत नसल्याचे समितीने विभागास अवगत केले असता यात दोन-तीन विशेष बाबी आहेत. त्यासंबंधातील जाहिराती देण्यात येणार आहेत विभागाला देखील अनुभव आलेला आहे. उदा. शेतक-यांचे शेत नाल्याच्या जवळ आहे. नाल्याचे पाणी शेतामध्ये शिरल्यामुळे त्याचे पीक वाहून गेले ते नुकसान लोकलाईझ डॅमेजमध्ये गणले जाते. परंतु, त्याला हे माहीत नसल्यामुळे तो शेतकरी सतत पत्रव्यवहार करतो की, अतिवृष्टीमुळे शेतात पाणी घुसल्यामुळे शेतीचे नुकसान झाले. अतिवृष्टीमध्ये झालेले नुकसान हे लोकलाईझ डॅमेजमध्ये गणले जात नाही ते नुकसान पीक कापणीमध्ये गणले गेले. त्याच्या एरियामधील सर्व पिके चांगली होती परंतु, फक्त त्याचे एकट्याचेच पीक वाहून गेले होते. अशा केसेसमध्ये पाठपुरावा करून शेतक-यांना मदत मिळवून दिली आहे. या सर्व गोष्टींची लोकांना माहिती व्हावी म्हणून आम्ही टी.व्ही.वर जाहिराती देऊन प्रसिद्धी देत असतो असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

सोयाबीनची गंजी आगीने जळाली तर त्यास विम्याचे छत्र लागू होत नाही. तेव्हा आगीपासून नुकसान झालेल्या पिकाला विम्याचे छत्र मिळाले पाहिजे अशी समितीची सूचना आहे. कापणी नंतरच्या १५ दिवसांच्या कालावधीत आगीपासून नुकसान झालेल्या पिकाला विम्याचे छत्र लागू केले पाहिजे असे समितीने सूचित केले असता, सध्या कापणी नंतरच्या १५ दिवसांपर्यंतच्या कालावधीला फायर इन्श्युरन्स लागू नाही. समितीने म्हटल्याप्रमाणे ब-याच जणांना यासंबंधातील इम्प्लीकेशन माहीत नाही. उदा.गोंदिया जिल्ह्यामध्ये नर्सरी तयार करण्यात आली पण लागवड झाली नाही. रोपणी केली नाही हे प्रीव्हेंटेड सोईंगमध्ये कव्हर होते. परंतु, जिल्ह्यामधून प्रीव्हेंटेड सोईंगचे रिपोर्ट येत नव्हते. पीक कापणीमध्ये झिरो आले असते आणि पेरणी झाल्याच्या क्षेत्रामध्ये देखील झिरो आले असते असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

इन्श्युरन्सचा प्रीमियम आपण २० किंवा २५ टक्के घ्यावा पण त्यात आगीचा समावेश केलाच पाहिजे असे समितीने मत व्यक्त केले असता, समितीच्या सूचनेची विभागाकडून नोंद घेण्यात येईल. गोंदिया आणि भंडारा जिल्ह्यामध्ये जिल्हाधिकारी यांना सांगून जेथे नापेर राहिले आहे त्यासंबंधातील रिपोर्ट घेतलेला आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

ज्यांनी रोपणी केली त्यांचे हाल बेहाल झाले. त्यांनी रोपणीसाठी पैसे लावले जे रोपणी करू शकले नाहीत ते भाग्यशाली आहेत त्यांचे मजुरीचे पैसे वाचले. समितीची अशी सूचना आहे की, आगीपासून नुकसान झालेल्या पिकाला विम्याचे छत्र मिळवून देण्यासंबंधी पुढाकार घ्यावा असे समितीने सूचित केले असता, याबाबतची नोंद घेतली असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

विभागाने १५ दिवसांचा ग्रेस पिरिएड दिलेला आहे तो कालावधी ते वाढविणार नाहीत. त्यामुळे विभागाने पोस्ट हार्वेस्टींगची व्याख्या स्पष्ट करावी. तसेच फायर इन्श्युरन्स संबंधातदेखील शासनाने विचार करावा असे समितीने विभागास सूचित केले.

समितीने दिनांक ७ नोव्हेंबर,२०१७ रोजी कृषी विभागाशी संलग्न असलेल्या विषयाच्यासंदर्भात कृषी विभागाच्या सचिवांसमवेत महसूल, वन,मदत व पुनर्वसन विभागाच्या सचिवांची साक्ष घेतली.

कृषि विभागाकडे ग्रामपंचायत स्तरावर पीक आणेवारी करण्याकरिता आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध नाही. सदरहू कामकाजासाठी महसूल विभागाकडेदेखील कमी मनुष्यबळ आहे. केंद्र शासनाचे धोरण आहे की, ग्रामपंचायत स्तरावर पीक आणेवारी करण्यात यावी, त्याच्या अंमलबजावणी संबंधी खूप अडचणी आहेत. त्यासंदर्भातील प्रस्ताव केंद्र शासनास पाठविण्यात आला आहे. मदत व पुनर्वसन विभागाकडून वापरण्यात येणा-या निकषासंदर्भातही मागील साक्षीच्या वेळी खूप चर्चा झाली आहे. आणेवारी पध्दत ग्रामपंचायत स्तरावर सुरू करण्यासाठी महसूल विभागाच्या मदतीची आवश्यकता आहे. त्याकरिता आवश्यक मनुष्य बळ महसूल विभागाकडे उपलब्ध नाही, असे कृषि विभागाच्या सचिवांनी मागील साक्षीच्या वेळी नमूद केले होते यासंदर्भात महसूल विभागाचे काय म्हणणे आहे अशी विचारणा समितीने केली असता, महसूल, मदत व पुनर्वसन विभागाच्या पीक आणेवारीची आकडेवारी बरोबर येत नसल्याचे कृषी विभागाच्या सचिवांनी समितीस सांगितले.

ग्रामपंचायत स्तरावर पीक आणेवारी करण्यात यावी, अशी समितीची मूळ भूमिका असल्याने त्यासंदर्भात कृषि विभागाने अडचण सांगितल्यामुळे महसूल, मदत व पुनर्वसन विभागाच्या सचिवांना साक्षीसाठी बोलावण्यात आले असल्याचे समितीने नमूद केले असता पीक आणेवारी संदर्भात माहिती मदत व पुनर्वसन विभागाच्या अपर मुख्य सचिव विषद करतील. तसेच पीक कापणी प्रयोग ग्रामपंचायत स्तरावर शक्य नाही. सद्यःस्थिती मध्ये उक्त कार्यक्रम ग्रामसेवक, तलाठी व कृषि सहायक मिळून राबवतात, त्याबाबतची कार्यवाही १५ दिवसांत करणे त्यांना अवघड जाते. मागील बैठकीत सन्मा. समिती सदस्य म्हणाले होते की, पीकनिहाय क्षेत्रफळ अचूक नमूद करण्यात येत नाही. ज्या जमिनीमध्ये पीक घेतलेले नसते त्यांना प्रमाणपत्र देण्यात येते व ज्यांनी पीक घेतलेले आहे त्याचे क्षेत्रफळ अचूक नमूद करण्यात येत नाही. पीक आणेवारी क्षेत्रफळ व पीक कापणी प्रयोग या विषयांचा संबंध महसूल, मदत व पुनर्वसन या विभागांशी येतो असे कृषी विभागाच्या सचिवांनी समितीस अवगत केले.

लोकांना न्याय देण्याकरिता ग्रामपंचायत स्तरावरील ब्रिटीशकालीन पीक आणेवारीची पध्दत थांबविण्यात यावी, हा मूळ विषय होता. या कार्यक्रमामध्ये महसूल विभागाची भूमिका असते व उक्त कार्यक्रम राबविण्याकरिता मनुष्य बळ कमी असल्याने तो राबवण्याकरिता अनेक अडचणी येतात, असे कृषि विभागाच्या सचिवांनी साक्षीच्या वेळी सांगितले होते. आणेवारी पध्दती मंडळनिहाय न करता ग्रामपंचायत स्तरावर करण्याची मागणी सर्व स्तरातून वारंवार करण्यात येत आहे. त्यासंदर्भात कृषि विभागाच्या सचिवांनी विभागाची अडचण विषद केली होती. त्याअनुषंगाने मदत व पुनर्वसन विभागाच्या सचिवांची साक्ष बोलावण्यात आली असून ते त्यांच्या विभागाची भूमिका समितीसमोर विषद करतील.

सन २०१५ च्या शासन निर्णयानुसार ग्रामपंचायत स्तरावर आणेवारी करावयाची असल्याचे मदत व पुनर्वसन विभागाच्या सचिवांनी सांगितले असता त्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येत नाही, त्यासंदर्भात लेखा आक्षेप असल्याचे समितीने नमूद केले. सदरहू, प्रकरणी अंमलबजावणी करण्यात येत नाही, त्यासंदर्भात यापूर्वीच्या साक्षीच्या वेळी चर्चा झाली आहे. आणेवारी ग्रामपंचायत पातळीवर करण्यासंदर्भात कायदा करण्यात आला असून त्यासंदर्भातील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असल्याचे समितीने नमूद केले. तसेच मदत व पुनर्वसन विभागाकडून आणेवारी कमी आल्यानंतर मदत करण्यात येते. याप्रकरणी महसूल विभागाने कृषि विभागाला मदत करावयाची आहे. कृषि विभागाला पीक आणेवारी करण्याचा अधिकार नाही. ग्रामपातळीवर महसूल विभागाचे व कृषि विभागाचे ग्रामसेवक, तलाठी, कोतवाल, कृषी अधिकारी, बीडीओ हे अधिकारी कार्यरत असतात. त्यांच्यावर महसूल विभागाचे नियंत्रण असते. पीक आणेवारी देण्याचा अंतिम अधिकार कृषि, महसूल, मदत व पुनर्वसन या विभागांपैकी कोणत्या विभागाला आहे ? पीक आणेवारीचा अधिकार महसूल विभागाला असल्याचेही समितीने विदित केले. केंद्र शासनाच्या धोरणानुसार ग्रामपंचायतीनुसार युनिट गृहीत न धरता मंडळाला युनिट गृहीत धरण्यात येते. त्यामुळे शेतक-यांचे मोठे नुकसान होत आहे. मंडळाऐवजी ग्रामपंचायत युनिट धरण्यात यावे याकरिता त्यांनी आपल्या अडीअडचणी मांडलेल्या आहेत. ग्रामपातळीवर मोठ्या प्रमाणात पदे कार्यरत असताना ती मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत. कृषि सहायक पदापासून कृषि अधिकारी यांच्यापर्यंतची अनेक पदे मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत. त्यासंदर्भात मागील साक्षीच्या वेळी सखोल चर्चा झालेली आहे. त्यावेळी पीक आणेवारीचे धोरण राबविण्याकरिता महसूल विभागाच्या सहकार्याची आवश्यकता कृषि विभागाच्या सचिवांनी विषद केली होती. दुष्काळग्रस्त क्षेत्र जाहीर करण्यासंदर्भात नवीन निकष मदत व पुनर्वसन विभागाने लावले आहेत. त्यांनी गोंदिया जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त क्षेत्र वगळण्याचे काम केले आहे. एका जिल्ह्यामध्ये केवळ ३ तालुके मध्यम दुष्काळग्रस्त जाहीर करण्यात आले आहेत. दुष्काळग्रस्त क्षेत्र जाहीर करण्यासंबंधिचे निकष यावर्षीपासून लावण्यात येतील की पुढील वर्षापासून लागू होणार आहे, याबाबत आता सांगता येणार नाही, असे कृषि विभागाच्या सचिवांनी मागील साक्षीच्या वेळी नमूद केले आहे. उक्त निकषांची अंमलबजावणी यावर्षीपासून सुरु करण्यात आली आहे. भयंकर दुष्काळ असताना तीन तालुक्यांमध्ये मध्यम दुष्काळ

जाहीर करण्यात आला व इतर तालुक्यांना वगळण्यात आले. भात पिकासाठी, सोयाबीन व कापूस या पिकांसाठी वेगळे निकष लावले पाहिजे. सर्व पिकांना समान निकष लावल्याने शेतक-यांचे नुकसान होत आहे. ग्रामपंचायत स्तरावर पिकांची आणेवारी करण्यात यावी, हा मूळ मुद्दा आहे, त्याकरिता महसूल विभागाच्या सचिवांची साक्ष बोलावण्यात आली असल्याचेही समितीने विभागास अवगत केले.

उपरोक्त चर्चेच्या अनुषंगाने माहिती देताना महसूल विभागाच्या सचिवांनी असे सांगितले की, पीक पैसेवारी हा विषय मंत्रालय स्तरावर हाताळत नाही. क्षेत्रिय पातळीवर तलाठी व मंडळ अधिकारी यांच्या माध्यमातून पीक पाहणीचे प्रयोग होतात व त्यासंदर्भातील कार्यवाही करण्यात येते परंतु त्याचे पर्यवेक्षण मंत्रालयीन स्तरावर नाही. उक्त प्रकरणी क्षेत्रिय पातळीवर अंमलबजावणी का होत नाही, असा प्रश्न समितीने उपस्थित केला आहे.

महसूल विभागाच्या सचिवांनी जी माहिती दिली त्याबाबत आक्षेप असून महसूल विभागाची सर्व जबाबदारी विभागाचे सचिव यांचेकडेच आहे. पीक आणेवारी देण्याचा अधिकार महसूल मंत्री महोदय यांनाच आहे. तलाठी व क्षेत्रियस्तरावरील अधिकारी महसूल विभागाच्या सचिवांच्या अधिपत्याखाली काम करतात. महसूल विभागाच्या सचिवांना सर्व अधिकार आहेत. अंतिम निर्णय महसूल विभागाच्या सचिवांच्या अधिकारात घेण्यात येतात. विभागाचे सचिव समितीला माहिती देत आहेत की, खालील स्तरावरील सर्व अधिकार खालील स्तरावर देण्यात आहेत असे समितीने अवगत केले तसेच योजनांची अंमलबजावणी खालील स्तरावरुन होत असते. परंतु विभागाचे प्रमुख असल्याने ती जबाबदारी विभागाच्या सचिवांचीही आहे. सर्व काम विभागाचे सचिव पाहत नाही, ही बाब समितीला मान्य आहे असेही समितीने नमूद केले. पीक आणेवारी मंडळस्तरावर ठरविण्यात येत असून ती ग्रामपंचायत स्तरावर ठरविण्याकरिता ग्रामपंचायत किंवा तालुका स्तरावरील अधिकारी कोणत्या विभागाच्या अधिपत्याखाली काम करतात अशी विचारणा समितीने केली असता जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी हे जिल्हा प्रशासनाचे नेतृत्व करीत असतात. जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून अनेक विभागांच्या योजना राबविण्यात येतात. उक्त क्षेत्रिय यंत्रणा मंत्रालयातील अनेक विभागांच्या आदेशानुसार काम करते. उदाहणार्थ ; मंत्रालयामध्ये अन्न व नागरी पुरवठा हा स्वतंत्र विभाग आहे. सदरहू विभागाचे काम जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी व त्यांच्या अधिपत्याखालील अन्न व नागरी पुरवठा विभागाची यंत्रणा कामकाज करते. निवडणुकांच्या संदर्भात मंत्रालयीन स्तरावर स्वतंत्र विभाग आहे. क्षेत्रिय पातळीवर जिल्हाधिकारी व त्यांची टीम सदरहू विभागाचे काम करते. गृह विभागाच्या सूचनांच्या अनुषंगाने क्षेत्रिय स्तरावर जिल्हाधिकारी व त्यांच्या टीमच्या माध्यमातून काम करण्यात येते. सामाजिक न्याय विभागाच्या निर्देशानुसार जातीचे दाखले देण्याची कार्यवाही क्षेत्रिय पातळीवर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या माध्यमातून करण्यात येते. महसूल यंत्रणा मंत्रालयाच्या अनेक विभागाच्या निर्देशानुसार क्षेत्रिय पातळीवर काम करते. परंतु मंत्रालय स्तरावर विषयांचे संचलन व परिवेक्षण विषयनिहाय विविध विभागांच्या सचिवांकडे असते. पीक पैसेवारी हा विषय मदत व पुनर्वसन विभागाकडे असल्याचे महसूल विभागाच्या प्रधान सचिवांनी समितीस अवगत केले.

पीक आणेवारीचा ग्रामस्तरावर करण्याकरिता विभागाला कोणत्या अडचणी आहेत, त्यासाठी कोणती कार्यवाही करावी लागणार आहे ? कृषि, महसूल, मदत व पुनर्वसन विभागाच्या सचिवांनी समन्वयाने उक्त प्रश्नाचे उत्तर समितीला द्यावे. मंडळ स्तरावर झालेला पाऊस व त्या क्षेत्रामध्ये झालेले पीकाचे उत्पन्न यावरुन आणेवारी ठरविण्यात येते. मंडळाचे क्षेत्र मोठे असते. त्या मंडळाच्या एका भागात पाऊस होतो व दुस-या भागात येत नाही. एका भागात अतिवृष्टी होते तर दुस-या भागात होत नाही. त्यामुळे पीक आणेवारी ग्रामस्तरावर करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. सदरहू शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत अंमलबजावणी करण्यात येणार आहे, त्याचा उल्लेख विभागाच्या सचिवांनी आता केला आहे. सदरहू योजना राबविण्यासाठी यंत्रणेने कोणती तयारी केली आहे व ती कोणत्या विभागामार्फत राबविण्यात येणार आहे अशी विचारणा समितीने केली. तसेच ग्राम पंचायत स्तरावर सदरील सर्व्हेक्षण करण्याचा शासन निर्णय शासनाने काढलेला आहे. तो शासन निर्णय मदत आणि पुनर्वसन विभागाकडून काढण्यात आलेला आहे की महसूल विभागाकडून काढण्यात आलेला आहे अशी विचारणा समितीने केली असता विभाग एकच आहे, त्यामध्ये वेगवेगळे दोन सचिव आहेत. मदत व पुनर्वसन हा वेगळा विभाग नाही तर ती महसूल व वन विभागाची एक शाखा आहे, उपविभाग आहे. म-७ नावाचे जे कार्यासन आहे त्यांच्याकडून सदरील विषयाचा शासन निर्णय काढण्यात आलेला असल्याचा खुलासा महसूल विभागाच्या प्रधान सचिवांनी केला.

अंमलबजावणीसाठी काय अडचणी आहेत तसेच याबाबत मूळ प्रश्न असा होता की विभागाकडे ६०% पदे रिक्त आहेत. त्याचबरोबर जे सर्व मंडळ आहेत त्यांना विस्थापित करण्यामध्ये महसूल विभागाची अडचण आहे. याबाबतचा कार्य वृत्तांत समितीसमोर आहे. तसेच जे नवीन नियमावली केली आहे त्यामुळे खूप नुकसान होत आहे यासाठी समितीची अशी मागणी आहे की, सदरील बाबतीत जो शासन निर्णय आहे त्याची ग्राम पंचायत स्तरावर अंमलबजावणी करण्यासाठी ज्या काही गोष्टी आवश्यक आहेत त्या कराव्यात. त्यामध्ये असे सांगितले की मदत व पुनर्वसन आणि महसूल विभाग यांच्या सहकार्याशिवाय कृषी विभागाकडून सदरील काम होऊ शकणार नाही, ही कृषि विभागाची अडचण होती. सर्व लोकांकडून शासन निर्णयाच्या ग्रामपंचायत स्तरावरील अंमलबजावणीसाठी काय सहकार्य मिळावे अशी अपेक्षा आहे असे मत समितीने व्यक्त केले असता नियमाप्रमाणे महसूल विभागाने ग्राम पंचायत स्तरावर किमान सहा प्रमुख पीक कापणी प्रयोग करून आणेवारी जाहीर करावयाची असते तसेच पीक विमा योजनांसाठी सदरील बाबीचे परिपत्रकही आहे. पीक विमा योजनांसाठी आणेवारी जाहीर करावयाची असेल तर त्याचा कालावधी पंधरा दिवसांचा असतो. त्याबाबत पीक विमा कंपन्यांना आपण कळवू आणि त्यानंतर पुढील कालावधीच्या विम्याची गणना सुरू होईल. ही बाब होत नव्हती म्हणून असे ठरविण्यात आले की, सदरील कामासाठी तीनही यंत्रणांना गावे वाटून देण्यात यावीत. महसूल विभागाचे तलाठी १/३ गावांवर पीक कापणी प्रयोग करतात, ग्रामसेवक १/३ गावांवर पीक कापणी प्रयोग करतात आणि १/३ गावांवर कृषी सहाय्यकांकडून पीक कापणी प्रयोग करण्यात येतात. तरी पण पीक विमा योजनेच्या नियमाप्रमाणे प्रमुख पिकांसाठी चार पीक कापणी प्रयोग आणि इतर पिकांसाठी आठ पीक कापणी प्रयोग करणे आवश्यक आहे. तसेच सदरील पीक कापणी प्रयोग हे पीक विमा कंपनीच्या उपस्थितीत करणे आवश्यक आहे. सदरील काम हे मुदतीत होत नसल्यामुळे आपण तीन विभागांमध्ये विभागून कृषी विभागामार्फत राबविण्यात येते. सदरील काम ग्राम पंचायत स्तरावर करावयाचे म्हटल्यास २०६५ मंडळे आहेत. सदरील २०६५ मंडळांमध्ये प्रमुख पिके आणि इतर पिके धरून ८० हजार ते १ लाखच्या दरम्यान पीक कापणी प्रयोग येतात. शासन निर्णयात नमूद असल्याप्रमाणे सदरील काम मुदतीत झाले तर फारच चांगले पण तसे होत नाही म्हणून सदरील काम तीन विभागांच्या मार्फत विभागणी करून करावे लागते यासाठी बराच काळ लागतो. यासाठी व्यावहारिक मर्यादा येत आहेत, याबाबतचे निवेदनही केले होते. सहा प्रमुख पीक कापणी प्रयोग महसूल विभागाला अपेक्षित आहेत आणि कृषि विभागाच्या निकषाप्रमाणे चार प्रमुख पीक कापणी प्रयोग अपेक्षित आहेत तर इतर पिकांसाठी आठ पीक कापणी प्रयोग अपेक्षित असल्याची माहिती कृषी विभागाच्या सचिवांनी समितीस दिली.

सदरील बाबीविषयी विभागाचे म्हणणे असे आहे की, मंडळ स्तरावर त्यांना अडचणी येतात तर ग्राम पंचायत स्तरावर यापेक्षाही जास्त अडचणींचा सामना करावा लागेल अशी पृच्छा समितीने केली असता सदरील काम वेळेत पूर्ण होणार नाही किंवा त्यात अचूकता राहणार नाही अशा अडचणी येऊ शकतात. सद्यःस्थितीत मंडळ स्तरावर होणारे सदर काम वेळेत पूर्ण करू शकत नाहीत अशी परिस्थिती आहे. दिनांक २८ ऑगस्ट २०१७ ला पीक विम्यासाठी पीक कापणी प्रयोग अजूनही देणे शक्य झाले नाही. अद्यापही सोयाबिनचा सर्व्हे संकलित करता आला नाही. सोयाबिनची खरेदी सुरू झालेली आहे पण पीक कापणी प्रयोग संकलन पूर्ण झालेले नाही असे प्रश्न निर्माण होत आहेत. डायलूट करण्याच्या पूर्वी ज्या ठिकाणी सदरील काम चालू आहे त्याला व्यवस्थित करणे शक्य आहे असा खुलासा कृषी विभागाच्या सचिवांनी केला.

सदर बाबतीत एक विशिष्ट प्रश्न असा आहे की पीक विमा कंपनीचे काय नियम आहेत ,पीक विमा कंपनी विमा मंजूर करत असताना मंडळ स्तरावरील सर्व्हेक्षण मान्य करते की त्यांना ग्रामपंचायत स्तरावरील सर्व्हेक्षण अपेक्षित आहे याबाबत समितीने विचारणा केली असता, सध्या मंडळ स्तरावरील सर्व्हेक्षण मान्य करण्यात येते त्याप्रमाणे विभागाने मागील वर्षी व यावर्षी सदर योजना राबविली असल्याचे कृषी विभागाच्या सचिवांनी समितीस अवगत केले.

आजही विमा कंपन्यांकडून मंडळ स्तरावरील सर्व्हेक्षण मान्य करण्यात येते अशी विचारणा समितीने केली असता, कृषी विभागाच्या सचिवांनी होय, एका मंडळामध्ये एका पिकासाठी बारा पीक कापणी प्रयोग घ्यावे लागतात असे समितीस अवगत केले.

सर्व्हेक्षण कोणाच्या स्वाक्षरीने मंजूर करण्यात येते ? कृषी विभागाच्या की तलाठी यांच्या ? सदरील सर्व्हेक्षणावर अंतिम स्वाक्षरी ही कोणाची असली पाहिजे अशी विचारणा समितीने केली असता, तीन विभागांमध्ये ज्या पद्धतीने वाटप झालेले आहे त्याप्रमाणे असते तसेच तीनही विभागाच्या लोकांच्या स्वाक्षरी असणे गरजेचे आहे असा खुलासा कृषी विभागाच्या सचिवांनी केला.

तीन विभागांची मिळून समिती आहे. १/३ याप्रमाणात तीन विभागांमध्ये कामाची विभागणी करण्यात आलेली आहे. पीक आणेवारी ठरवावयाचा विषय आणि कृषी पीक विमा योजनेचा विषय याबाबत मंडळ स्तरावर ज्या कापण्या ठरल्या आहेत त्या होत नाहीत याचे कारण ग्रामपंचायतीचे क्षेत्र आणि मंडळाचे क्षेत्र यामध्ये फार फरक आहे. एका मंडळामध्ये दहा ते पंधरा

ग्रामपंचायती असून एका मंडळात दहा ग्राम पंचायती म्हणजे जवळ जवळ ७० ते १०० गावे येतात. पीक आणेवारी ठरवताना मंडळ स्तरावर ज्या पीक कापण्या ठरवण्यात येतात त्यामध्ये प्रत्येक मंडळात पावसाळ्याची सरासरी वेगळी असते. वातावरण वेगळे असते. त्यामुळे कापण्या त्या स्तरावर ठरवाव्या लागतात आपण जर ग्राम पंचायत स्तरावरील निकष ठरविला तर सर्व ग्राम पंचायतींकडून भरपूर प्रमाणात मागण्या येतील अशातला भाग नाही. असे जर केले तर कामाचा व्याप कमी होणार आहे. एका मंडळामध्ये आपल्याला निश्चितपणे पाच ते दहा ठिकाणाहून अशी मागणी येईल आमच्याकडे अतिवृष्टी झालेली आहे, अशा स्वरूपाच्या मागण्या ह्या ग्राम पंचायत स्तरावर येणार नाहीत कारण विभागाकडे त्यांचे अभिलेख असतात. ग्राम पंचायत स्तरावर पावसाळ्यातील पर्जन्यमान मोजणीची व्यवस्था करण्यात आलेली आहे. मंडळ स्तरावर सदरील काम होत असल्यामुळे विभागाचे नुकसान होत आहे. सदरील काम ग्राम पंचायत स्तरावर व्हावे यासाठी ब-याच दिवसापासून प्रयत्न करण्यात येत आहेत. ग्राम पंचायत स्तरावर सदरील आणेवारी ठरविण्यासाठी यंत्रणा उभी करावयाची आहे. त्यासाठी जे मनुष्यबळ लागेल त्यासाठी आणखी दोन वर्षाचा कालावधी वाढवून देण्यात येईल. सदरील काम ग्राम पंचायत स्तरावर करण्यासाठीची यंत्रणा किती दिवसात उभी करू शकणार ? सदरील यंत्रणा उभी करण्यासाठी शासन निर्णयही काढण्यात आलेला आहे असे समितीने विभागास अवगत केले असता, महसूल विभागाच्या नियमाप्रमाणे ग्राम पंचायत स्तरावर पीक कापणीचे सहा प्रयोग करावयाचे आहेत. हे जर केले असते तर आपल्याला कृषी विभाग आणि ग्रामसेवक या दोन विभागांची मदत मिळून सदरील काम होणे हे शक्य आहे त्याप्रमाणे होत नसल्याचे कृषी विभागाच्या सचिवांनी समितीस अवगत केले.

सदर कामासाठी मदत मिळत नाही. महसूल विभागाला या बैठकीला याकरिताच बोलावण्यात आलेले असून कृषी विभागास कशी मदत करता येईल हाच मुख्य उद्देश आहे. दुसरा मुद्दा असा आहे की शेवटी या सर्व यंत्रणेकडून सदरील काम करून घेण्याची जबाबदारी ही कृषी विभागाची आहे. रिमोट सेंसिंग सिस्टिम प्रमाणे सहा किंवा चार ठिकाणचे अहवाल कृषी विभागाने पाठविलेले आहेत. त्याबाबत विभागाने अहवालामध्ये काय पाठविले आहे ? सदर काम करणे शक्य आहे किंवा नाही याबाबत विभागाने काय शिफारस केलेली आहे अशी विचारणा समितीने केली असता, त्यामध्ये रिमोट सेंसिंग नव्हता जे पाच पीक कापणी प्रयोग करण्यात आले होते असा प्रयत्न करण्यात आला होता की हवामानावर आधारित अंदाज दिला जाऊ शकतो काय ? हवामानावर आधारित अंदाज हा फळ पिकांबाबत योग्य रीतीने जमलेला आहे. उदा. केळी पिकामध्ये १४ अंश सेल्सिअस पेक्षा खाली तापमान आले तर अमुक इतका परिणाम होण्याची शक्यता आहे. चिकू पिकामध्ये पाच दिवसापेक्षा जास्त अंतर आले तर अमुक होणार आहे परंतु शेती धान्य पिकांवर याचा योग्य परिणाम अजून आलेला नाही. हवामानावर आधारित परिणाम तंतोतंत मिळाला नाही. केंद्र सरकारने सदरील प्रयोग आमच्याकडून आणि इतर राज्याकडून करवून घेतला आहे पण त्याचे योग्य असे परिणाम न दिसल्यामुळे पुढे तो चालू ठेवण्यात आलेला नाही. हवामानावर आधारित स्वयंचलित यंत्रणा बसविण्यात आलेली आहे ती फळ पिकांसाठी फार चांगल्या प्रकारे काम करीत असल्याची माहिती कृषी विभागाच्या सचिवांनी समितीस दिली.

अधिक सुलभता येण्यासाठी एक शासन निर्णय काढण्यात आलेला आहे त्याचा शेतक-यांना लाभ व्हावा अशी समितीची अपेक्षा असून. त्यासाठी लागणारी आवश्यक ती यंत्रणा उभी करणे हे संबंधित विभागाचे काम आहे. संबंधित सचिवांनी समन्वय घडवून आणावा. त्यासाठी कायद्याची अंमलबजावणी न करता कारणे देणे ही बाब संयुक्तीक वाटत नाही. याबाबत समितीचे असे म्हणणे आहे की कृषी विभागास येणा-या अडचणी ज्या आहेत त्या आपसात बसून त्या दूर कराव्यात आणि सदरील काम हे मंडळ स्तरावरून ग्राम पंचायत स्तरावर जाणे आवश्यक आहे कारण पर्जन्यमान त्या काळातील आणि आताचे यामध्ये मोठ्या प्रमाणात फरक आहे. पर्जन्यमानात विविधता आढळून येते. एका गावात पाऊस पडतो तर दुसरीकडे पडत नाही. म्हणून आपण आता ग्राम पंचायत स्तरावर सदरील काम नेण्याचा जो निर्णय घेतला तो अतिशय चांगला निर्णय आहे. त्याच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने आपण सूचना कराव्यात पण हे होत नाही ते होत नाही हा येथे विषय नाही. कसा करता येईल त्यासाठी लागणारी यंत्रणा सांगण्यात यावी. सदर विषय हा मदत व पुनर्वसन विभागाचा आहे. त्यांच्याकडे या कामासाठी वेगळी अशी काही यंत्रणा नाही ती संबंधितांनी उभी करणे गरजेचे आहे. यंत्रणा ही आपणास राबवावयाची असून ते फक्त आणेवारी घेण्यासाठी आहेत. मदत व पुनर्वसन विभाग हा महसूल विभागाचा उपविभाग आहे. पण मनुष्यबळ आणि यंत्रणा उभी करण्याची जबाबदारी ही महसूल विभागाची असल्याचे समितीने विदित केले असता, महसूल विभागाची जी यंत्रणा जिल्हा स्तरावर आहे ती जिल्हा प्रशासनाचा एक भाग म्हणून आहे. जेव्हा कोणताही विभाग आपली योजना या यंत्रणेकडे देतो त्यावेळेस सदर कामाचा किती व्याप आहे याचा विचार करून त्यामध्ये सुयोग्य वाढ करणे आवश्यक असेल तर तशा प्रकारची तरतूद तो संबंधित विभाग करत असतो. उदा. संजय गांधी योजनेसाठी काही कर्मचारी वर्गाची आवश्यकता होती म्हणून सामाजिक न्याय विभागाने आवश्यक त्या कर्मचारी वर्गाची संरचना केली तशा प्रकारचा आकृतिबंध मंजूर केला. तो आकृतिबंध जिल्हा प्रशासनाकडे देण्यात आलेला आहे. त्याच

पद्धतीने अन्न व नागरी पुरवठा या विभागासाठी ज्या प्रकारच्या मनुष्यबळाची आवश्यकता होती त्या प्रकारचे मनुष्यबळ निर्माण करून आवश्यक ती पदे निर्माण करून तशा प्रकारचा आकृतिबंध उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. सदरील जो निर्णय आहे की प्रत्येक ग्राम पंचायत स्तरावर आणेवारी करावयाची आहे त्याची अंमलबजावणी करण्याकरिता किती मनुष्यबळ ग्राम विकास विभागाकडून मिळू शकेल किती मनुष्यबळ कृषी विभागाकडून मिळू शकेल आणि किती मनुष्यबळ महसूल विभागाने दिले पाहिजे याचा सारासार विचार होणे आवश्यक आहे. सदरील बाबीचा विचार झाल्यानंतर तशा प्रकारचा कर्मचारी वर्ग निर्मितीचा प्रस्ताव सादर करण्यात आला पाहिजे. त्या अनुषंगाने पदे निर्मितीची कार्यवाही होऊ शकेल आणि पुढील कार्यवाही करणे सोयीचे होईल अशी माहिती महसूल विभागाच्या सचिवांनी समितीस दिली.

सदर बाबीचा मदत व पुनर्वसन आणि महसूल विभागाने एकत्रितपणे सर्व आढावा घ्यावा. कारण सदरील काम मंडळ स्तरावर करण्यासाठी अडचणी येत आहेत तर ग्राम पंचायत स्तरावर सदरील काम करण्यासाठी आणखी किती मनुष्यबळ लागेल ? कुठून ते मिळू शकेल आणि या सर्व बाबींचा विचार करूनच हा आराखडा तयार करावा लागणार. ग्राम पंचायत स्तरावर सदरील काम करण्याचा शासन निर्णय झाल्यानंतर सुद्धा त्याची योग्य रीतीने अंमलबजावणी करता आलेली नाही. याबाबत आपण काहीही केलेले दिसत नाही. सदरील काम करण्यासाठी आपल्याकडे सद्यस्थितीत असणारी यंत्रणा पुरेशी नाही. शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी लागणारे मनुष्यबळ कुठून मिळेल याचा विचार करणे गरजेचे आहे कारण हे काम ठराविक कालावधीत होणारे आहे. कायमस्वरूपी मनुष्यबळ निर्माण करून काहीही उपयोग नाही कारण एका महिन्यासाठीचे हे काम आहे. त्यामुळे आवश्यक मनुष्यबळ कुठून मिळू शकते याचा एक प्रस्ताव कृषी महसूल,मदत व पुनर्वसन या तीनही विभागांनी मिळून तयार केला तर त्याची अंमलबजावणी करता येईल असे समितीने अवगत केले .तसेच पीक आणेवारी फक्त पीक विम्यासाठी करावयाची नाही तर प्रत्येक पिकाची आणेवारी करण्याची ब्रिटीश काळापासूनची पद्धत आहे. जिल्हाधिकारी हे महसूल विभागाचे प्रतिनिधी म्हणून हे काम करतात. सदरील कामासाठी तलाठी यांचीच स्वाक्षरी असते. आणेवारी पीक विम्यासाठी लागते म्हणून ठीक आहे पण आणेवारी ही शासनाला जाहीर करावी लागत असते. आणेवारी जाहीर करण्याचा अधिकार महसूल विभागाला आहे की कृषी विभागाला आहे की मदत व पुनर्वसन विभागाला आहे ? आणेवारी जाहीर करण्याचा अधिकार हा महसूल विभागाला असेल तर त्याबाबतची यंत्रणा उभी करण्याची जबाबदारी महसूल विभागाची आहे असे म्हणणे असल्याचे समितीने विभागास अवगत केले असता, आणेवारीची माहिती मदत व पुनर्वसन विभागाकडे आल्यानंतर ती विभागाकडून जाहीर करण्यात येते असा खुलासा मदत व पुनर्वसन विभागाच्या अपर मुख्य सचिवांनी केला.

कृषि विभागाला सदरील कामासाठी लागणारी अधिकची यंत्रणा किती हवी आहे हे दोन्ही विभागांनी मिळून ठरवावे आणि ती महसूल विभागाला कळवावे, सदरील काम करण्यासाठी विभाग काय करणार आहे सदर कामाबाबत समितीने असे सूचविले आहे की तीनही विभागांनी एकत्र येऊन सदर काम ग्राम पंचायत स्तरावर त्याची अंमलबजावणी कशी करता येईल यासाठी योग्य उपाययोजना करावी. त्याचबरोबर दुसरा एक मुद्दा असा होता की नवीन व्यवस्थेप्रमाणे जो दुष्काळ जाहीर करण्यात येतो तो सूचकांक, आर्द्रता, पर्जन्यमान पाहून जाहीर करण्यात येतो. सर्व प्रकारच्या पिकांसाठी विशेषतः भात पिकासाठी अन्यायकारक नियमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. याबाबत समितीची अशी सूचना आहे की भात पिकासाठी मोठ्या प्रमाणावर पाण्याची गरज असते. त्यासाठी आपल्याला वेगळा विचार करणे गरजेचे आहे. कृषी विभागाचे सुद्धा याबाबतीत असे म्हणणे आहे की it is not applicable for paddy. सतत पाणी आवश्यक आहे. पाणी कमी प्रमाणात मिळाले तर ते धान्य येणार नाही. तसेच वेळेवर पाणी मिळाले नाही तरी ते धान्य येणार नाही. असे असताना आपण सरसकट सर्व पिकांसाठी एकच नियम लावलेला आहे ही बाब चुकीची आहे. तसेच या वर्षी पडलेल्या दुष्काळाबाबत सुद्धा अन्याय होत आहे. याबाबत आपण जरूर तो विचार करावा, राज्य शासनाच्या धोरणाप्रमाणे ग्राम पंचायत स्तरावर सन २०१५ च्या नियमाप्रमाणे आणेवारी काढावयाची असेल तर मनुष्यबळाची व्यवस्था कोठून आणि कशी करता येईल याबाबत विचार करावा कारण कायमस्वरूपी कर्मचारी वर्ग घेण्याची काही आवश्यकता नाही हे पाहावे आणि ते सहजशक्य आहे त्याबाबतचे नियोजन करणे आवश्यक आहे. यासाठी महसूल विभागाची देखील मदत घ्यावी. मदत व पुनर्वसन विभागाने सुद्धा दोन सूचना केलेल्या आहेत realignment of staff to other, gram panchayat level आणेवारी दुसरी सूचना अशी आहे की सरसकट दुष्काळी आणेवारीचे जे नियम काढलेले आहेत त्यामध्ये भात पिकाला वेगळा न्याय दिला पाहिजे. ज्या ठिकाणी १०% धान्य आलेले नाही त्या ठिकाणी दुष्काळ जाहीर होत नाही अशी परिस्थिती सध्या झालेली आहे. या विषयाबाबत देवळी तालुक्यासारख्या ठिकाणी दुष्काळ जाहीर झालेला नाही. कारण सध्या अस्तित्वात असलेल्या नियमात ते बसत नाही असे मत समितीने व्यक्त केले. तसेच फळ पिकांच्या बाबतीत वेगवेगळे निकष आहेत. केळीबाबत वेगळा निकष आहे तर चिकूच्या बाबत वेगळा निकष आहे. क्रमशः ते आपल्याला नाही करता येणार कारण कोकणात

डोंगराळ भागातील नाचणी वेगळा विषय आहे, भात हा वेगळा विषय आहे. विशेषतः धान शेतीला वेगळा निकष लावता येईल काय असा विषय आहे असे समितीने नमूद केले असता, मनुष्यबळाची अडचण येणार नाही कारण महसूल विभागाच्या शासन निर्णयाप्रमाणे एका ग्राम पंचायतीला प्रत्येक प्रमुख पिकांसाठी सहा पीक कापणी प्रयोग करणे आवश्यक आहे. आणि कृषि विभागाची प्रमुख पिकांसाठी चार पीक कापणी प्रयोगांची अपेक्षा आहे. इतर छोट्या पिकांसाठी आठ पीक कापणी प्रयोगांची अपेक्षा आहे. कृषी विभाग आणि ग्रामसेवक मिळून सदरील काम करतात. सदर कामाची योग्य पद्धतीने वाटणी करून ते करण्यात आले तर अतिरिक्त मनुष्यबळाची गरज पडणार नाही. फक्त त्यांना चालना देण्याची गरज आहे. महसूल विभागाच्या शासन निर्णयाप्रमाणे काम करणे शक्य असल्याचा खुलासा कृषी विभागाच्या सचिवांनी केला. तसेच कोकणामध्ये जे दुष्काळाचे मॅन्युअल लागू केले आहे ते केवळ दुष्काळापुरते आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये महसूल मंत्री महोदयांनी हे स्पष्ट केले की, जेथे अतिपाऊस व इतर कारणांमुळे नुकसान झालेले आहे, तेथे जिल्हाधिका-यांमार्फत पूर्वीसारखे पंचनाम्याचे आदेश दिले गेले आहेत. दुष्काळ मॅन्युअल फाईन ट्यून करण्याची जरुर आवश्यकता आहे. कारण संपूर्ण देशासाठी एकच मॅन्युअल प्रत्येक वेळेस चालत नाही. पाऊस सुरु होण्याच्या कालावधीमध्ये फरक आहे, त्यामुळे तो फरक येतो. कृषी विभागाने याबाबत पहिला प्रयोग केला आहे त्याचे निकाल पाहून त्याला फाईन ट्यून करु किंवा जुनी पध्दत या वर्षी सुरु ठेवून प्रयोग करायचा हा विषय विभाग गंभीरतेने घेत असल्याचेही समितीस अवगत केले.

ड्राऊट मॅन्युअल केंद्र सरकारच्या सूचनेप्रमाणेच केलेले आहे. समितीने सांगितले त्या अनुषंगाने विभागाने वर्कशॉप्सही घेतले आहेत. जे काही फाईन ट्युनिंग आहे ते करण्यात येईल. परंतु, ते यावर्षीच लागू केलेले आहे असा खुलासा अपर मुख्य सचिव,मदत व पुनर्वसन यांनी केला.

या वर्षी लागू केलेले असले तरी, अन्याय होत आहे त्यामुळे समितीने सूचना केलेली आहे. आणेवारी ही दरवर्षी जाहीर करावीच लागते सर्वच विभागामध्ये आपण आणेवारी जाहीर करण्यात येते. केंद्र सरकार व राज्य सरकारने हे निर्णय घेतले असतील व प्रशासनाला जर याची अंमलबजावणी करता येत नसेल तर, प्रशासनाला केंद्र व राज्य शासनाने घेतलेला निर्णय मान्य आहे की नाही ? नसेल तर प्रशासन राज्य शासनाला तसे कळविणार आहे काय की, तुम्ही निर्णय घेतला तरी आम्ही याची अंमलबजावणी करु शकत नाही, अशी विचारणा समितीने केली असता, केंद्र शासनाने रिव्ह्यू घेऊन मंडळस्तरावर आम्हाला अलाऊ केलेले आहे. परंतु, एका मंडळस्तरावर एवढी गावे येतात की, एकरुपता येत नाही. याबाबतीत १० ते १२ प्रयोग करुनही ती रिप्रेझेंटेटिव्ह होत नाही. ते ग्रामपंचायत स्तरावर घेऊन जाण्याची आवश्यकता आहे. कृषी,महसूल व मदत आणि पुनर्वसन विभाग एकत्र बसून यावर वर्कआऊट करतो की, शक्यतो याला ग्रामपंचायत लेव्हलवर घेऊन येऊ. जर महसूल विभागाची शासन निर्णयाप्रमाणे सहाय्य करण्याची तयारी असेल तर, विभाग उर्वरित गॅप भरण्यासाठी माणसे देण्याच्या तयारीमध्ये असल्याचे कृषी विभागाच्या सचिवांनी समितीस अवगत केले.

**परिच्छेद क्रमांक ३.१.२.४.स्पर्धात्मक बोलीशिवाय विमा कंपन्यांना नियमबाह्यरित्या पुढे चालू ठेवणे :-**

उपरोक्त परिच्छेदाच्या अनुषंगाने विभागाने अधिक माहिती द्यावी असे समितीने विभागास सांगितले असता, त्यावेळेस केंद्र शासनाची पब्लिक सेक्टर मधील कंपनी ॲग्रिकल्चर इन्शुरन्स कार्पोरेशन यांना वेदरबेस क्रॉप इन्शुरन्स स्कीमच्या गाईडलाईन्स प्रमाणे म्हणजे दोन्ही सब स्कीम्स या एका स्कीमचा भाग आहेत. वेदरबेस क्रॉप इन्शुरन्स स्कीममध्ये असे नमूद केले होते की, एक वेळ यंत्रणा फिक्स केल्यानंतर ३ वर्षांपर्यंत त्यांना सुरु ठेवता येते. नॅशनल इन्शुरन्स स्कीममध्ये ए व बी मध्ये तसे स्पष्ट लिहिलेले नाहीत्यामुळे हा प्रश्न उद्‌भवलेला असल्याचे कृषी विभागाच्या सचिवांनी समितीस अवगत केले.

सन २०११ पासून MNAIS चे इम्प्लीमेंटेशन बंद झालेले आहे आणि विभागीय सचिव दोन्ही एकच असल्याचे सांगत आहेत याबाबत समितीने विचारणा केली असता MNAIS चे इम्प्लीमेंटेशन बंद झाले नव्हते असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

सन २०११ मध्ये MNAIS चे इम्प्लिमेंटेशन बंद केलेले आहे. MNAIS चे इम्प्लिमेंटेशन सन २०११ नंतर केलेले नाही आणि WCIS साठी सेपरेट प्रोव्हीजन आहे असे समितीने विभागास अवगत केले असता, वेदरबेस क्रॉप इन्शुरन्स स्कीममध्ये तर ही तरतूद होती की, एकवेळ यंत्रणा फिक्स केल्यानंतर ती ३ वर्षे वापरायची. मात्र मोडिफाईड नॅशनल इन्शुरन्स स्कीममध्ये तसे स्पष्ट लिहिले नव्हते. रब्बीमध्ये ५ जिल्हे व खरिपामध्ये १२ जिल्हे अशाप्रकारे काही जिल्ह्यामध्ये प्रयोग म्हणून वेदरबेस क्रॉप इन्शुरन्स स्कीम हाती घेतली होती. जेथे विभागाने मोडिफाईड नॅशनल इन्शुरन्स स्कीम हाती घेतली होती तेथेही ३ वर्षासाठी ॲग्रिकल्चर इन्शुरन्स कार्पोरेशन गर्व्हनमेंट ऑफ इंडियाचेच काम सुरु ठेवले आहे. त्यावेळेस रि-टेंडर केले असते परंतु, त्यांनी रि-टेंडर करण्याऐवजी ३ वर्षांपर्यंत देण्याची गाईडलाईन ही दोन्ही स्कीमना लागू आहे असे गृहीत धरुन कारवाई केली असल्याचा खुलासा कृषी विभागाच्या सचिवांनी केला

गृहीत धरुन कारवाई केली मात्र ती योग्य होती काय अशी विचारणा समितीने केली तसेच लेखा आक्षेपामध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे की, ‘ परिच्छेद ७.५.३. चा अवलंब करुन शासननिर्णय सन २०१५ मध्ये जारी केला ’ आणि यांनी असे ऑब्जेक्शन घेतले आहे की, MNAIS सन २०११ नंतर महाराष्ट्रात अंमलातच नव्हती तर २०१५ मध्ये शासननिर्णय जारी करण्याचे कारणच काय चिफ स्टॅटिकल कमिशनर ऑफ ॲग्रिकल्चर, महाराष्ट्र यांनी असे नमूद केले आहे की, MNIAS was not implimented during २०११-१२ to २०१५-१६ असे समितीने विभागास अवगत केले असता, सेंट्रल गर्व्हनमेंटने मोडिफाईड नॅशनल इन्शुरन्स स्कीमला नॅशनल क्रॉप इन्शुरन्स स्कीम मधून मोडिफाईड केले. त्याचे दोन भाग होते. ॲनेक्शचर इक्वेलंट स्कीम तेथे सुरु राहिली. वेदरबेस क्रॉप इन्शुरन्स स्कीम जोडून दोन भाग तेथे केले पहिले तेथे वेदरबेस इन्शुरन्स स्कीम नव्हती. वेदरबेस इन्शुरन्स स्कीम ऑप्शन म्हणून दिली गेली. काही एरियामध्ये फळ पिकाकरिता वेदरबेस इन्शुरन्स स्कीम होती मात्र फिल्ड क्रॉपमध्ये वेदरबेस इन्शुरन्स स्कीमचा समावेश ट्रायल म्हणून करण्यात आला. मूळ स्कीम डिसकंटिन्यू झालेली नाही तिचे नाव बदललेले आहे. त्याचे दोन भाग केले. फिल्ड क्रॉप म्हणून पूर्वीसारखी लावावी किंवा वेदरबेसची ट्रायल करावी. विभागाने रब्बीमध्ये ५ ठिकाणी ट्रायल केले आणि वेदरबेसचा डेटा पाठविला तो योग्य दिसला नाही, त्यामुळे जुनी स्कीम डिसकंटिन्यु झाली नाही मात्र नावामध्ये फरक आला व एक कंपोनंट वाढला. वेदरबेसमध्ये त्याच यंत्रणेला ३ वर्षे सुरु ठेवणे शक्य आहे. असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

वेदरबेस यंत्रणेला विभागाकडून राबविताच येत नाही कारण त्यांचे डिझाईन बरोबर नाही. या आधारावरच विभागाने त्या इन्शुरन्स कंपनीला रिन्युअल केले असे समितीने विभागास सांगितले असता, इन्शुरन्स कंपनीची दोन्हीसाठी निवड केली मात्र वेदरबेसच्या गाईडलाईन प्रमाणे जी ३ वर्षे मुदत देता येते त्याप्रमाणे पहिल्या स्कीमलाही ती दिलेली आहे. ती खाजगी नाही तर गर्व्हनमेंट ऑफ इंडियाची कंपनी होती असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

The Audit Para is based on 8.3.2 of the National Crop Insurance Programme guidelines. Where the State Governments have been asked to invite product specifications and specific quotes from the Insurance Companies. परिच्छेदामध्ये तेच नमूद केलेले असल्याचे प्रधान महालेखाकारांनी अवगत केले. एन.सी.आय.पी.च्या मार्गदर्शक सूचनांच्या परिच्छेद क्रमांक ८.३.२ मध्ये नमूद केलेले आहे की, “ The State Government may invite the empaneled Companies to discuss the product specification to be implemented during the ensuing season. Alternatively, the State Government may structure its own weather products for the notified crops area and may invite the empaneled Insurance Companies to submit proposal in enclosed sealed envelope. The State Government shall clarify, establish and communicate the product specifications in terms of risk period-trigger-1, trigger-2, pay-out rate-1, pay-out rate-2, phase-wise, sum-insured etc. to enable the Insurance Companies to submit the quotes with full clarity.” एन.सी.आय.पी.च्या मार्गदर्शक सूचनांच्या परिच्छेद क्रमांक ८.३.२ प्रमाणे विभागाने बोली मागविली पाहिजे होती. स्पर्धात्मक बोलीशिवाय कोणत्याही विशिष्ट कंपनीला लागोपाठ दोन वर्षे सहभागी करण्याबाबत योजनेत कोणतेही प्रावधान नाही, असे महालेखाकारांचे म्हणणे आहे, याबाबत समितीस सांगावे. असे समितीने विभागास सांगितले असता याचे कारण असे होते की, “The State Government stated that MNAIS is also a component of National Crop Insurance Scheme Programme. Therefore, the guidelines for MNAIS were followed for weather-based crop insurance scheme and same insurance companies were allowed to continue for two consecutive seasons in order to maintain stability and continue with the same premium rate and sum insured.” त्याप्रमाणे त्यांनी पालन केले. आता दरवर्षी प्रत्येक सिझनचे काढण्यात येते मात्र त्यावेळी त्यांनी ती सुरु ठेवली होती. अशी माहिती कृषी विभागाच्या सचिवांनी समितीस दिली.

मात्र हे चुकीचे आहे. त्यांनी त्याचा अर्थ तसा काढलेला आहे. मात्र परिच्छेद क्रमांक ८.३.२ प्रमाणे त्यांचे इंटरप्रिटेशन हे पूर्णपणे चुकीचे आहे. विभागाच्या चिफ स्टॅटिकल ऑफिसरनेही तसे काढत नाही असे सांगितले आहे या विषयावर चूक झालेली आहे. स्पर्धात्मक बोलीशिवाय विभागाने केले मात्र विभागाला कॉम्पिटिटिव्ह रेटही घेता आला असता, चांगली बिडिंगही घेता आली असती, त्याकरिता कमी-जास्त जे काही लागले असते ते लागले असते. या विषयावर त्यावेळेच्या अधिका-यांची कोठे तरी चूक झालेली आहे, हे मान्य करावेच लागेल. जर असे वाटत असेल की, हे योग्य केले असेल तर समितीला याचा खुलासा करावा असे समितीने विभागास अवगत केले असता आयडली त्यांनी फेरनिविदा काढली असती तर जास्त बरे झाले असते बरोबर आहे. मात्र विभागाचे निवेदन एवढेच आहे की, यामध्ये केंद्र शासनाच्या ॲग्रिकल्चर इन्शुरन्स कार्पोरेशनलाच एक्सटेन्शन दिलेले आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

विभागीय सचिवांनी आता हे मान्य केले आहे की, फेरनिविदा केली असती तर बरे झाले असते. बरे झाले असते याचा अर्थ चूक झाली आहे. या चुकीची जबाबदारी कोणावर निश्चित करणार अशी पृच्छा समितीने केली असता, एक्सटेन्शन दिले ती ॲग्रिकल्चर इन्शुरन्स कार्पोरेशन ही शासकीय यंत्रणाच आहे. त्यामुळे हे मान्य व्हावे, अशीच विनंती करु शकतो असे विभागीय सचिवांनी नमूद केले.

विभागाने ज्यांना दिले त्या सर्व केंद्र शासनाच्या कंपन्या आहेत की, खाजगी इन्शुरन्स कंपन्या देखील आहेत या समितीच्या प्रश्नाला गर्व्हनमेंट ऑफ इंडियाची कंपनी असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

ती केंद्र शासनाचीच कंपनी होती. मात्र असे असले तरी स्पर्धात्मक बिडिंगसाठी ४ कंपन्या आहेत असे महालेखाकारांनी विदित केले असता, त्यावेळेस केंद्र शासनाच्या ४ कंपन्या नव्हत्या. त्या आता आहेत असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

अशाप्रकारची कारवाई पुढे होणार नाही याबाबतची दक्षता घ्यावी व त्यादृष्टीने आवश्यक ते निर्देश त्वरित काढावेत. आज मार्केटमध्ये नवनवीन खाजगी कंपन्या आलेल्या आहेत. विभागाने असे केले तर त्यांनाही फायदा होऊ शकतो. आपण ज्यांना हे काम दिले ती केंद्र शासनाची कंपनी आहे तरीही महाराष्ट्र शासनाला अतिरीक्त पैसे द्यावे लागले ही देखील वस्तुस्थिती आहे. यामध्ये ५० टक्के शेअर राज्य शासन देते तर ५० टक्के शेअर केंद्र शासन देते व विभाग शेतक-यांकडून खूप कमी पैसे घेतो यामुळे पुढच्या वेळेस याबाबत पूर्ण चौकशी करुन नियमांचे काटेकोरपणे पालन झाले पाहिजे या प्रकारची कार्यवाही करावी असे निदेश समितीने विभागास दिले.

**परिच्छेद क्रमांक ३.१.२.५ शेतक-यांना विमा रक्कमची दुबार/अनेकदा अदायगी :-**

उपरोक्त परिच्छेदा संदर्भात समितीने अशी विचारणा केली की, विभाग क्रॉप इन्शुरन्स करतो मात्र नुकसानभरपाईचे पैसे काही मिळत नाहीत. समितीसमोर जो तक्ता आहे त्यानुसार सन २०१३-२०१४, सन २०१४-२०१५ मध्ये शेतक-यांना नुकसानभरपाईपोटी काहीच पैसे मिळालेले नाहीत. फक्त शेवटच्या दोन वर्षांत पीक विम्याचे पैसे मोठ्या प्रमाणात मिळालेले आहेत. इन्शुरन्सचे पैसे भरतो मात्र त्याचा शेतक-यांना काहीच फायदा होत नाही, हेच या आकडेवारी वरुन दिसून येत आहे. सन २०१४-२०१५ मध्ये नुकसानभरपाई २९१.२६९ कोटी रुपयांची मिळाली आहे. २६९ कोटी रुपयांची नुकसानभरपाई खरीप २०१५ मध्ये मिळाली. खरीप २०१४ मध्ये २७२ कोटी रुपयांची नुकसानभरपाई मिळाली. सन २०१३-२०१४ मध्ये १ रुपयाही मिळालेला नाही. सन २०१४-२०१५ मध्ये रब्बीमध्ये काहीच पैसे मिळाले नाहीत याबाबत समितीने विचारणा केली असता सन २०१३-२०१४ मध्ये विमा हप्ता होता २.८८ कोटी रुपये आणि नुकसानभरपाई झाली ती ३.९१ कोटी रुपये. खरीप २०१४ मध्ये विमा हप्ता झाला १९१.४६ कोटी रुपये असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

विभागाला १९१ कोटी रुपयांच्या अगेन्स्ट २७२ कोटी रुपये मिळत असतील तर विमा कंपन्यांचा उपयोग काय ? विभागानेच थेट देऊन टाकावेत असे समितीने मत व्यक्त केले असता त्यावेळेस स्कीमच तशी होती असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

आणेवारीच्या अडचणीमुळे ही सर्व आकडेवारी दिसते. विभाग १० रुपयांचा विमा काढतो व त्याचा प्रिमियम ५० पैसे इतका ठेवता. ५० पैसे प्रिमियम भरल्यानंतर नुकसानभरपाईपोटी ६० पैसे मिळाले तर, त्यावरच समाधानी राहायचे काय अशी विचारणा समितीने केली असता, याकरिताच ती स्कीम चेंज केली. यामध्ये विमा कंपन्यांना दिलेले नाही. तेथे विमा कंपनी फक्त एक यंत्रणा होती. शेतक-यांनी हप्ता भरल्यानंतर नुकसान झाले तर हप्ता वजा करुन जी रक्कम येईल ती केंद्र व राज्य शासन मिळून सम प्रमाणात भरुन शेतक-यांना पेमेंट दिले जात होते. विमा कंपनी स्वतःकडून काहीही देत नव्हती. त्यामुळे हप्त्याच्या रक्कमेपेक्षा जास्त नुकसान झाले तर ते सेंट्रल व स्टेट गर्व्हनमेंटने सम विभागून दिलेले आहे. आता स्कीम अशी आहे की, विम्याचा हप्ता हा दीड टक्के, दोन टक्के किंवा पाच टक्के असा फिक्स आहे तो शेतक-यांनी द्यायचा आहे. मात्र निविदेमध्ये जे दर येतील त्याचा फक्त फरक स्टेट व सेंट्रल गव्हर्नमेंट देणार. नुकसानभरपाई विमा कंपन्यांना द्यायची आहे. विमा कंपन्यांना जर १०० रुपये प्रिमियम मिळाला तर, ३५० रुपयांपर्यंतची नुकसानभरपाई विमा कंपन्यांना स्वतःच्या उत्पन्नातून द्यावी लागेल. आता बदल असा झालेला आहे की, विम्याचा प्रिमियम थोडा जास्त येतो. मात्र विमा कंपन्यांवर जास्त जबाबदारी आहे. मागच्या वेळेस पहिल्यांदा ही स्कीम होती व पाऊस व्यवस्थित पडला. इतके नुकसान झाले नाही. त्यांना एकूण हप्ता ४ हजार कोटी रुपयांचा मिळाला व परतफेड १८०० कोटी रुपयांची करावी लागली. लोकांनी यावर टीका केली की, विभागाने जास्त पैसे दिले व कमी पैसे परत आले. परंतु, त्यांना जरी ४ हजार कोटी रुपये मिळाले असले तरी, साडेतेरा हजार कोटी रुपयांपर्यंतच्या नुकसानभरपाईची जबाबदारी त्यांचीच आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

खरिप २०१४ मध्ये ११ लाख ४२ हजार हेक्टर एवढे क्षेत्र होते. खरिप २०१५ मध्ये ते ७ हजार हेक्टर एवढे म्हणजे जवळपास अर्धे होण्याचे कारण काय आहे ? त्यांची संख्या १२ होती, ती एकदम अर्ध्यावर आली. १२,८५,००० आणि ६,७६,००० रुपये यामध्ये जवळ जवळ निम्म्याचा फरक असल्याचे समितीने विदित केले असता पूर्वी हवामानावर आधारित पीक विमा योजनेंतर्गत रक्कम कमीच मिळत होती. म्हणून त्यावेळी ते सर्व रेग्यूलर स्कीम वर शिफ्ट झाले होते असे विभागीय सचिवांनी विदित केले.

त्यावेळी २०१६-२०१७ मध्ये नुकतीच विम्याची नवीन योजना ३.५ टक्क्याने सुरु केली होती अशी विचारणा समितीने केली तसेच नवीन पीक विमा योजना व जुनी पीक विमा योजना यांची वैशिष्ट्ये व फायद्यांमधील फरक दर्शविणारी एक टिप्पणी समितीला सादर करावी जेणे करुन या पीक विमा योजनांविषयी सविस्तर माहिती अवगत होईल. शासनाने आता जी प्रधानमंत्री कृषी विमा योजना लागू केलेली आहे, त्याची पूर्ण माहिती व जुनी स्कीम काय होती,नवीन स्कीम मध्ये कोणकोणते फायदे आहेत, याची सर्व माहिती समितीसमोर सादर करावी असे समितीने विभागास अवगत केले असता याबाबतची माहिती समितीस देण्याचे विभागीय सचिवांनी आश्वाासित केले, तसेच ७५-८० लाख लोकांनी नवीन पीक विमा योजनेंतर्गत अर्ज केलेले असल्याचेही समितीस सांगितले.

या संदर्भात समितीस माहिती देण्यात यावी असे समितीने विभागास सांगितले असता क्षेत्र जास्त कसे येते, तलाठ्याचा दाखला देऊन विमा होतो विम्यांतर्गत कव्हर केलेल्या क्षेत्राची बेरीज, प्रत्यक्ष क्षेत्रापेक्षा जास्त आहे अशा प्रकारच्या प्रकरणाच्या तक्रारी आलेल्या आहेत. १०० एकर सोयाबीन असेल तर शेतक-याच्या अकाऊंटला १५० एकराचा विमा जमा झालेला असतो, यामध्ये सुधारणा झाली पाहिजे. या संदर्भात केंद्र शासनाने तोडगा काढलेला आहे. या संदर्भातील जमीन महसूलाच्या आकड्यांमध्ये व सात-बाराच्या आकड्यांमध्ये विसंगती आहे, हे आकडे व्यवस्थित नाहीत. विमा कंपन्यांना या संदर्भातील प्रिमियम परत करावा लागणार असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली.

प्रत्यक्ष क्षेत्र १०० हेक्टर असतानाही विमा मात्र १५० हेक्टरचा घेतलेला आहे, हे अयोग्य असल्याचे समितीने विदित केले असता विमा हा ५० एकराचा जास्त घेतलेला आहे. चुकीची माहिती विमा कंपन्यांना मिळाल्यामुळे त्यांच्या अदा रकमेमध्ये घट लागते, या माहितीमध्येही सुधरणा करावी लागते. क्षेत्रफळात सुधारणा करण्याची योजना नसल्यामुळे यामध्ये सुधारणा कशी करावी, हा प्रश्न निर्माण झालेला आहे. मुख्य सचिवांनी या संदर्भात जिल्हा, तालुका, राज्य पातळीवर समन्वयक नेमण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. तलाठ्याकडून महसूलाविषयीचे योग्य कागदपत्रे प्रमाणपत्रे, सात-बाराचे उतारे मिळणे अपेक्षित आहेत. काही वेळा तर कापसाचे पीक लावून विमा मात्र सोयाबीनच्या पिकाचा घेतला जातो. याबाबतचा रेकॉर्ड सुधरणा समन्वयनचे काम चालू आहे. विम्याचे पैसे डायरेक्ट खात्यामध्ये जात असल्याकारणाने लागवडीचे क्षेत्र जास्त दाखविले जाते. संपूर्ण जमीन आणि लागवडीखालील क्षेत्रानुसार अर्ज केले जातात अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

बीडमध्ये २८ कोटी रुपये गेलेले आहेत. माहे जुलै,२०१६मध्ये ८,८७,००० रुपये विम्याची रक्कम अदा केली गेली होती, त्याची वसूली केली गेली का? अशी पृच्छा समितीने केली असता, सन २०१६ मध्ये अशा प्रकारच्या केसेस ब-याच झालेल्या आहेत. सन २०१७ मध्ये आधार कार्ड लिंक केल्याशिवाय व्यवहार करु शकणार नाही, अशी व्यवस्था करण्यात येण्याचे निश्चित केले होते. त्याचे काम सुरु आहे. आधार आणि सात-बारा लिंक केल्यानंतर क्षेत्रावर नियंत्रण येईल. अन्यथा वेगवेगळ्या बँकांना विम्याकरिता अर्ज केले जात होते असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

एक लाख रुपयांपर्यंत जमीन गहाण ठेवण्याचे काम केले जाते. एक शेतकरी एकाच जमिनीवर बँकातून कर्ज घेतो, विमा घेतो, लागवडीखालील क्षेत्र हे विम्याकरिता जास्त दाखविले जाते. शेतकरी एकाच वेळी एकाच जमिनीवर विविध बँकांमधून तीन वेळा कर्ज घेतांना दिसून येतो. कर्जमाफीचे अर्ज बोलाविले त्यावेळी असे निदर्शनास आले की, सरपंच व इतर काही जण मिळून यासंदर्भात अर्ज करतात, आधार कार्ड लिंक झाल्यामुळे हा कायदा त्याचे कारण होणार आहे, त्याला काही ईलाज नाही. आधार कार्डाशी संबंधित अशी बरीच प्रकरणे निदर्शनास आलेली आहेत. कधी कधी तर असे होते की, आधार कार्ड लिंक केल्यामुळे शेतक-याला माहिती नसते की, त्याच्या नावावर कर्ज घेतलेले आहे, हे कर्ज तिसराच कोणीतरी घेत असतो असे समितीने अवगत केले. सोयाबीनची आधारभूत किंमत ३०५० रुपये प्रती क्विंटल आहे. एखाद्या शेतक-याला जर एकरी ७-८ क्विंटल सोयाबीन झाले तर विमा कंपन्यांच्या लेखी संबंधित शेतक-याला विम्याची रक्कम देण्याची गरज नाही. परंतु जर शेवटच्या टप्प्यावर त्याच्या सोयाबीनच्या पिकाला पावसाचे पाणी लागले आणि दाण्यांची क्वालिटी घसरली तर त्याला एपीएमसी मार्केटमध्ये ते सोयाबीन केवळ १२००-१८०० रुपये प्रति क्विंटल या भावाने विकावे लागते, यामध्ये त्या शेतक-याचे परतीच्या पावसामुळे नुकसान होते, विमा योजनेमध्ये अशा प्रकारे परतीच्या पावसामुळे पीक विक्रीच्या शेवटच्या टप्प्यावर झालेले नुकसान कव्हर होत नाही का ? विम्यामध्ये हेही नुकसान कव्हर होणे आवश्यक असल्याचे मत समितीने व्यक्त केले असता, पीक

कापणीनंतर जर परतीचा पाऊस पिकांवर पडला तर त्याचा दर्जा घसरतो, याकरिता स्पॉट पंचनामे करुन मदत देता येते. पीक कापून विक्रीकरिता तयार केल्यानंतर जर पाऊस पडला तर दाण्याचा दर्जा घसरतो, ते दाणे चाळून त्या भागामधील सोयाबीनला विशिष्ट आधारभूत किंमत देणे किंवा या क्रिटीकल पॉईंटला सरकार व विमा कंपनी यांनी सोयाबीन उत्पादक शेतक-याच्या पाठीशी उभे राहणे, एवढे जनरलाईज नसल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

यामध्ये शेतक-याने पीक व्यवस्थित घेतले होते, परंतु तो पाऊस पडल्यामुळे पीक दर्जा घसरला, त्यामुळे शेतकरी सफर झालेला आहे, हे ही विम्याअंतर्गत कव्हर होणे आवश्यक आहे. अमरावती जिल्ह्यांमध्ये याकरिता प्रोक्यूरमेंट आहे अमरावती जिल्ह्यांमध्ये आधारभूत किमतीला त्याच क्वालिटीचा सोयाबीन उपलब्ध आहे. सद्यःस्थितीत तसेच काम झालेले आहे असे समितीने विदित केले. तसेच क्रिटीकल पॉईंटला विम्यामध्ये पीक नुकसान कव्हर करणे जनरलाईज झालेले नसल्यामुळे त्याचा फायदा होत नसल्याचे समितीने सांगितले असता, या स्कीममध्ये याकरिता कव्हरेज मिळण्यासाठी केंद्र शासनाच्या एफएक्यू मध्ये क्वांटिटी ३५ टक्के घेणार असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

डब्ल्यूबीसीआयएस करिता त्यामध्ये नुकसान झाले, तरीही यामध्ये मुख्य हेतू विमा व विम्यामध्ये येणा-या सर्वसमावेशक संरक्षणाचा आहे. In order to compensate farmers from loss in agriculture production due to various adverse situations such as excessive or inadequate rains, hailstorms or attack of pests, disease etc. Various Centrally sponsored agriculture crop insurance schemes were being implemented in the State. पाऊस कमी व जास्त आला तरीही पीकाची क्वांटिटी, त्यानुसार होणारा फायदा किंवा नुकसान या विम्याअंतर्गत कव्हर झाले पाहिजे. पावसामुळे होणारी नुकसान भरपाई विमा कंपन्यांकडून मिळावी, अशा प्रकारची अट घालता येईल का ? पुढील वर्षी विम्याअंतर्गत हे कव्हरेज समाविष्ट करता येईल का ? त्याकरिता आवश्यक ती कार्यवाही करावी असे समितीने विदित केले असता, निविदेमध्ये अटी व शर्ती टाकण्यात येतात, त्याप्रमाणे विमा कंपन्या दर भरतात. पुढील वर्षी हे करता येणार नाही. सर्वप्रथम केंद्र शासनाला या संदर्भात दोन प्रस्ताव पाठविण्यात यावे. केंद्र व राज्य शासन यांचा ५०:५०टक्के सहभाग असणारी नवीन एफएक्यू व क्वांटिफाय असणारी योजना आखून ती लागू करण्यात यावी, असे मत असल्याचे कृषी विभागाच्या सचिवांनी समितीस अवगत केले.

शासनाने ही सूचना या प्रस्तावाच्या प्रस्तावनेमध्ये दिलेली आहे का अशी विचारणा समितीने केली. तसेच We do not agree that it is not covered under the scheme.असे प्रधान महालेखाकारांनी सांगितले. It is written here, "Implementation of agriculture crop insurance scheme...." It is mentioned in the introduction. It is the fault of the department because it has not been incorporated in the scheme. २२०० च्या वर याकरिता भाव नाही, हे देखील प्रस्तावनमध्ये आले पाहिजे, असे समितीने नमूद केले असता, यामध्ये प्रॉडक्टिव्हिटी लिंकचा प्रश्न असल्याचे विभागीय सचिवांनी अवगत केले.

Hon. Member is speaking about the reduction in price due to destruction of crop because of excessive rains असे प्रधान महालेखाकारांनी विभागीय सचिवांना सांगितले. तसेच Here it is mentioned, "In order to compensate farmers from loss in agriculture production..."उत्पन्न म्हणजे पावसामुळे प्रती एकरी उत्पन्न कमी झालेले आहे. That does not address to the quality. याचाही अंतर्भाव यामध्ये केला पाहिजे. We have understood what you have said. Our suggestion is that henceforth it should be incorporated.असे समितीने विभागास अवगत केले असता केंद्र शासनाला याबाबत निवेदन केलेले आहे. यामध्ये क्वांटिटी व क्वालिटी लॉस, नापेर, नर्सरी खर्च या सर्वांचा समर्पक उल्लेख करण्यात आलेला असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली.

विमा कंपन्यांना मुदतीत शासनाने नुकसान भरपाईचे प्रस्ताव किंवा विमा संरक्षणाचे प्रस्ताव न पाठविल्यामुळे ही भरपाई संबंधित शेतक-यांना मिळालेली नाही. यवतमाळ बीसीसीने नुकसान भरपाईने दिलेली आहे. मोर्शी, लेहाजंग, पूसद येथील २८५ शेतक-यांना यामुळे नुकसान भरपाई मिळाली नाही. जर आपण हे पैसे दिले नाही तर केंद्र शासनाच्या माध्यमातून अशा केसेस फॉलो केल्या जातात का ,यामध्ये जिल्हा आणि राज्य पातळीमध्ये समन्वय असण्याची गरज आहे. २६८ कोऑर्डीनेटर सोबत बैठक घेतली पाहिजे, लोकांना पैसे मिळाले पाहिजे. ज्या शेतक-यांचा विमा होत नाही त्यांचा पीक कापणी कार्यक्रम सुरु असतो काय अशी पृच्छा समितीने केली असता विमा होत नसेल तरी देखील महसूल विभागामार्फत पीक कापणी प्रोग्राम सुरु असतो असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

हा विषय यवतमाळ व अमरावती या २ जिल्ह्यांचा आहे, मात्र अशा प्रकारच्या केसेस इतर ठिकाणी आढळून आल्या आहेत काय ? It is mentioned here, "The nature of omission by bank is wrong revenue circle indication." विभागाने ते मान्य केलेले आहे. ही रक्कम बँकेला भरावी लागणार आहे, तसा निर्णय आहे. शेतक-यांना निधी दिला पाहिजे या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी बँकेचे जे समन्वयक असतात त्यांच्याशी विभागाने चर्चा केली पाहिजे. ५-५ वर्षे झाली आहेत मात्र अद्याप अंमलबजावणी होत नाही. वाशिम येथील रिसोड तालुक्यात असेच घडले होते. तेथील जिल्हाधिका-यांनी जिल्हा पातळीवरील समन्वयकाला बोलावून भारतीय रिझर्व्ह बँकेला पत्र लिहिले व पाठपुरावा करुन ते पैसे प्राप्त करुन घेतले. अशा प्रकारे ज्या ज्या जिल्ह्यात असे झालेले आहे तेथील जिल्हाधिका-यांची ही जबाबदारी आहे. त्यांनाही विचारावे की, या गोष्टीचा काय पाठपुरावा केला, डीएलसीला बोलावले होते काय, भारतीय रिझर्व्ह बँकेला पत्र लिहिले काय ? संबंधित जिल्हाधिका-यांना विभागाने सूचना दिल्या पाहिजेत असे समितीने विभागास अवगत केले असता, होय, हे करुन घेतो असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले.

असे भविष्यात होऊ नये, या करिता सूचना दिल्या आहेत काय अशी विचारणा समितीने केली असता, दरवर्षी अशी प्रकरणे होत आहेत. त्याचा आढावा घेतला आहे. सध्या हवामानावर आधारीत विमा योजना सुरु असताना जालना जिल्ह्यात केस आली होती. तेथे माननीय पालक मंत्री यांनी जिल्हाधिका-यांच्या पातळीवर बैठक घेतली. पैसे जमा केलेले असून ते विमा कंपनीकडे पाठविले नाहीत अशी काही प्रकरणे मागील वर्षी होती. जे राहिले आहेत त्या बाबत सिव्हिअर ॲक्शन घेण्यात येईल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

दुहेरी प्रदान झाले असून आधार कार्डची अंमलबजावणी केली आहे काय? अशी पृच्छा समितीने केली असता होय, मात्र ७/१२ लिंक केलेले नाही यामुळे एकच व्यक्ती अनेक अर्ज करतात, तसेच मालकीपेक्षा जास्त क्षेत्रफळ आहे की नाही ते लवकर सापडू शकत नसल्याचे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

बँक एखाद्या शेतक-याला कर्ज देते त्यावेळी विमा काढला जातो. त्यांच्याखात्यातून रक्कम दिली जाते. त्यावेळी ७/१२ व इतर कागदपत्रे सादर करावी लागतात. आपोआप या गोष्टी होतात आता सिस्टीम अपडेट झालेली आहे असे समितीने निदर्शनास आणले असता चार वेळा विमा काढला तर सर्व्हे नंबर मधील बेरीज जास्त येत आहे. ७/१२ ची सॉफ्ट कॉपी व विमा यांची लिंक नसल्यामुळे किती क्षेत्र आहे हे समजत नाही. एकाच व्यक्तीने वेगवेगळ्या बँकेत विमा काढला असेल तरी त्याची माहिती येते. मात्र ७/१२ ची माहिती सर्व प्रकरणात येत नाही, काही प्रकरणात मिळते. आधार लिंक करण्यात आले असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले. तसेच यावेळी आधार लिंक केल्यामुळे फायदा झालेला आहे. मागील वेळी १ कोटी ६ लाख अर्ज आले होते. या वेळी ७५ लाख अर्ज आले आहेत कोणी ४ वेळा जरी अर्ज केला तरी तो एकच अर्ज धरला जात आहे असेही समितीस अवगत केले.

२६८ समन्वयकांशी विभागाने समन्वय करावा व समितीला ३ महिन्यांत कळवावे असे समितीने विभागास सूचित केले असता विभागीय सचिवांनी समितीस याबाबत सकारात्मक असल्याचे सांगितले.

**परिच्छेद क्रमांक ३.१.३.२—कर्जदार शेतक-यांचा अंतर्भाव नसणे :-**

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने ज्यांचे कर्ज होते ते बँकेने पूर्ण कव्हर केले की नाही याबाबत कोणतीही शहानिशा केली नसल्याचे विभागाच्या निदर्शनास आणले असता, सन २०१५-१६ मध्ये संमतीपत्र घेतले जात होते त्यावेळी उच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली होती. ज्यांनी संमती दिली नाही, कर्जदार असूनही त्यांच्या विम्याच्या रकमेची कपात केली नाही असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

आता मार्गदर्शक तत्वे तयार केलेली आहेत त्यानुसार ते सक्तीचे असल्याचे समितीने विदित केले तसेच विभागाने हप्ता दिला काय अशी विचारणा समितीने केली असता, शेतक-यांचा हप्ता आला नाही, तेथे विभागाने देखील हप्ता दिलेला नाही असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

शेतक-यांच्या खात्यात विम्याची रक्कम वेळेत जमा केली जात नाही. ७ दिवसाच्या आत रक्कम जमा करावी अशा सूचना आहेत या संबंधी शासनाने काय कार्यवाही केलेली आहे अशी विचारणा समितीने केली असता, पूर्वी ऑनलाईन अर्ज केले जात नव्हते त्यामुळे डेटाएन्ट्री होत नव्हती गठ्ठे बँकेमध्येच पडून असायचे. आता आधार व बँक खाते जोडल्यानंतर सर्व प्रकरणांची

ऑनलाईन एन्ट्री झालेली आहे. नुकसानभरपाईची रक्कम शेतक-यांच्या खात्यावर जमा केली जाते. तसेच सर्व रकमेची वाटप झालेले नसून भारतीय रिझर्व्ह बँकेच्या बैठकीत विभागाने सांगितले आहे काही बँकांमध्ये रक्कम जमा होणे प्रलंबित असून शेवटची रक्कम साधारणपणे १०० कोटी रुपये होती अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

१०० कोटी शेतक-यांच्या खात्यात जमा झालेली नाही अर्जामध्ये सर्व माहिती दिली जाते. अशा वेळी ७ दिवसात रक्कम न जमा करणा-यांच्या विरोधात कोणती कारवाई केली जाणार आहे ? अशी पृच्छा समितीने केली असता या वेळी बँकांना सक्ती करून ऑनलाईन डेटा एन्ट्री करून घेतली आहे. मुख्यमंत्री महोदयांनी सर्व बँकांची एक बैठक घेतली होती. पूर्वी ३५० कोटी रुपयांपर्यंतची रक्कम होती, आता ही रक्कम कमी झालेली असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

बँका १००-२०० कोटी रुपये त्यांच्याकडे आल्यानंतर महिना-दोन महिने देखील क्रेडीट करीत नाही, बिनव्याजी पैसे वापरतात. हे दुरूस्त करण्यासाठी काय उपाययोजना करणार ? ज्यावेळी विभाग समन्वयकाला बोलवेल त्यावेळी त्यांच्या निदर्शनास आणावे की, पैसे वेळेवर क्रेडीट केले जात नाहीत असे समितीने विभागास सूचित केले असता, ऑनलाईन अर्जाला विरोध असताना देखील ते करण्यामागे हेतू हाच होता. यामुळे यंदा ही अडचण येणार नाही सर्व अर्जदारांचे बँक अकाऊंट व आधार क्रमांक बँकांपर्यंत पोहचलेला असल्याचे विभागीय सचिवांनी विदित केले.

शेतक-यांना जे पैसे द्यावयाचे आहेत ते शासनाकडून जिल्हा बँकांना दिले जातात, किंवा राष्ट्रीयकृत बँकेला पाठवले जातात. अनुदानाची रक्कम शासनाने दिल्यानंतर ७ दिवसाच्या आत त्यांच्या खात्यात जमा झाली पाहिजे. एचएलसीच्या लोकांना हे अवगत करावे की, रक्कम मोठी असते, एक एक महिना ती बिनव्याजी वापरली जाते याकरिता मॅकेनिझम करावे. १०० कोटी रुपयांच्या संबंधी उपाययोजना करून किती दिवसात शेतक-यांच्या खात्यात ही रक्कम जमा होईल अशी विचारणा समितीने केली असता अनेक बँका व ब्रँचेसचा संबंध आहे, जेथे हा प्रश्न आहे. भारतीय रिझर्व्ह बँक, संबंधित बँकेचे चेअरमन व केंद्र शासन यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येत आहे असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

डीएलसी चांगल्या प्रकारे समन्वय साधतात जिल्हाधिका-यांना विभागाने परिपत्रक काढले पाहिजे की, अशा प्रकारची प्रकरणे आल्यानंतर डीएलसी यांच्याशी समन्वय साधून ते लवकरात लवकर सोडवण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी या मताशी सहमत असल्याचे सांगितले.

मागील परिच्छेदात विभागाने असे सांगितले होते की, “Non-coverage of Loanee Farmers:As per Para 21.2 of WIS and Para 19.2 of MNAIS guidelines, State Govt. may review the progress of the scheme periodically and undertake impact assessment after completion of each season and send their suggestions and recommendation to the Govt. of India, Ministry of Agriculture, for making further improvement in the scheme. Action taken in this regard may be communicated to the P.A.C.” याबाबत समितीने विचारणा केली असता, आधार लिंक केले व ऑनलाईन अर्ज केल्यानंतर अर्ज घेण्यासाठी बँका कमी पडतील त्यामुळे कॉमन सर्व्हिस सेंटर सुरू करण्याबाबत राज्याचा प्रस्ताव होता तेथून ही संकल्पना सुरु झालेली आहे. पहिले वर्ष असल्यामुळे ते प्रभावीपद्धतीने काम करू शकले नाही. अनेकदा पाठपुरावा करून यामध्ये बदल करून घेतला आहे. विमा हप्ता कमी करावयाचा असेल व त्यामध्ये समतोल साधावयाचा असल्यास ३५० टक्के रिस्क देण्याऐवजी २०० टक्के पर्यंत कमी करावी. प्रिमियमचे १ हजार रुपये जमा झाले तर २ हजार रुपये ते स्वतःचे देतील व उर्वरित आपण शेअर करू. ३५० टक्के केल्यामुळे प्रिमियमची रक्कम जास्त होते. हवामानावर आधारीत विमा योजना आयसीआर बेस्ड असून काही पॅरामिटर्स टयून करून घेतली जात आहेत. काही पिकांमध्ये बरीच सूट असल्यामुळे प्रिमियमची रक्कम ९० टक्के आहे. ९० टक्के द्यावयाचे असेल तर त्यापेक्षा नुकसान भरपाई दिलेली परवडते. प्रत्येक परिस्थितीत नुकसान भरपाई द्यावी लागते. यामध्ये या वर्षी आणखी सुधारणा करण्याचा प्रयत्न केला जात आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

सर्व्हर क्रॅश होतो अर्ज भरण्यासाठी शेतक-यांना ३-४ दिवस लाईन लावावी लागते. त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. या विषयी काही उपाययोजना केली जाणार आहे की नाही ? यंदा ५ दिवस वाढवल्यानंतर देखील सर्व्हर काम करीत नसल्यामुळे ऑफलाईन अर्ज घेण्यात आले असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणले असता, पहिल्यापासून लोकांनी अर्ज केले असते तर अशी परिस्थिती आली नसती असा खुलासा विभागीय सचिवांनी केले यावर विभागाकडून विलंबाने तारखा निश्चित केल्या जातात असे समितीने सांगितले असता मागील वेळी ३१ जुलै शेवटची तारीख होती त्यावेळी २० जुलै पर्यंत अर्जच आले नव्हते असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

गत वर्षी ५ जुलै रोजी विभागाने जाहीर केले होते असे समितीने नमूद केले असता यावर आपले नियंत्रण असू शकत नाही. तुरीच्या वेळी जे झाले ते पुन्हा होऊ नये या करिता नोंदणी सोपी केलेली आहे. संपूर्ण राज्यात तूर, मुग, उडीद, कापूस या सर्व पिकांचे मिळून ५७ हजार शेतक-यांनी नोंदणी केली आहे. शेवटच्या टप्प्यात ही यंत्रणा अयशस्वी होते अशा वेळी ती बंद केली तर व्यापारी त्याचा लाभ उठवतील. शेतकरी सुरूवातीला पैसे लावत नाहीत, अशी त्यांची मनोवृत्ती लक्षात आली आहे. त्यामुळे सर्व्हरची क्षमता वाढवून घेण्यात येईल, तसेच सर्व्हर अपग्रेड करण्यात येईल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

विमा घेण्याची सुरूवात दिनांक २३ जून रोजी केलेली आहे तर त्याऐवजी दिनांक १ जूनला केली पाहिजे कारण दिनांक १ जूनला सिझन सुरू होतो तसेच शेतक-यांची सर्व कामे सुरू होतात. विभाग २३ जूनला विम्याची सुरवात करून दिनांक १५ जुलैपर्यंत त्याची मुदत देतो मग त्यामुळे टाईम स्पॅन पण कमी असतो. दिनांक २३ जून नंतर शेतकरी पेरणीसाठी गेले असल्यामुळे विम्यासाठी बँकेत जाण्यासाठी त्यांना वेळ मिळत नाही. त्यामुळे विम्याची तारीख दिनांक १ जून ठेवली तर कमी अडचणी निर्माण होतील असे मत समितीने व्यक्त केले असता, यापूर्वी पण एक प्रश्न होता की, दिनांक १ नोव्हेंबर ला विम्याची तारीख का सुरू करण्यात आली नाही, तर रब्बी हंगामात हे दिनांक १ नोव्हेंबरला सुरू झाले पाहिजे असा विभागाचा प्रयत्न होता यासाठी बरीच तयारी केली असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

This is a lack of administration, agriculture is not responsible for this असे समितीने विभागास सांगितले असता मागच्यावेळी रब्बी हंगामात ५ टक्केची निविदा आली होती आणि आता १३ ते १८ टक्केची निविदा आलेली आहे. नंतर यापेक्षा जास्त जर आली तर फेर निविदा करावी लागेल. शेवटी लोकांनी निविदा देताना ५ टक्केच्या जवळ नाहीतर २ डिजिटमध्येच दिलेली आहे. तेव्हा वित्त विभागाने सांगितले की, दिनांक ७ नोव्हेंबर पर्यंत वाटाघाटी करण्यात येतात. या तारखेपर्यंत वाटाघाटी होऊ शकल्या नाही तर दिनांक ३० नोव्हेंबरच्या ज्वारीच्या कट ऑफ डेट असूनही आज जाहीर करू शकलो नाही. हा प्रश्न निर्माण होतो कारण रेट जास्त देतात असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

हे सर्व मान्य करुनच विभागाने लवकर निविदा काढल्या पाहिजेत. विमा कंपन्यांना शॉर्ट स्पॅन मिळेल तर त्यांना असे वाटेल की, बार्गेनींग करण्यासाठी वेळ नाही किंवा त्यांच्यावर प्रेशर आहे. तेव्हा वरिष्ठ पातळीवरुन जास्त प्रेशर देऊन ते क्रिएट करून त्या प्रेशरचा फायदा घेण्याचा प्रयत्न करतात. सर्व विषय वेळेत संपले पाहिजे याप्रमाणे प्रक्रिया सुरू करायला पाहिजे. ग्रामीण भागात शेतक-यांना स्वतःच्या गावात सुविधा नसते ब्रँच कुठेतरी बाहेर असल्यामुळे २ ते ५ गावे ओलांडून त्याला त्या ठिकणी जावे लागते. त्या ठिकाणी गेले तर तिथे सर्व्हर काम करीत नाही त्यामुळे २ ते ३ दिवस जातात आणि त्याला शेतात पेरणी करायची असते अशा काही अडचणी असतात. याचा रोष विभागावर येत नाही तर तो लोकप्रतिनिधीवर किंवा शासनावर येतो. आतापासून नियोजन करून यावर्षी तरी निदान अशा अडचणी येणार नाहीत याची काळजी घेण्यात यावी असे समितीने सूचित केले असता, माहे जून महिन्यापर्यंत हे अंतिम करण्याची व्यवस्था विभागातर्फे करण्यात येईल अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

दिनांक १ जून किंवा दिनांक २३ जूनला जरी केले तरी विभागाने सांगितल्याप्रमाणे विमा भरण्याचे प्रमाण शेवटी शेवटीच जास्त असते हे नैसर्गिकच आहे. हे विभागाच्या किंवा इतर कोणाच्या नियंत्रणाचे काम नाही. त्यावेळेला आपण मेकॅनिझम काय करु शकतो हा सुद्धा एक विचार करणे आवश्यक आहे. कारण नेमक त्यावेळेला सर्व्हरवर लोड येतो आणि ऑफलाईन घ्यावे लागते. तर यामुळे नंतरच्या या सर्व प्रक्रिया करण्यापेक्षा लवकर करणे हा एक मुद्दा महत्त्वाचा आहे कारण लोकांना मोठा अवधी आहे असे समितीने विदित केले असता याचा विचार करून कॅपिटल कॉस्ट कमी करावी लागेल. कारण सर्व्हर अपग्रेड करण्याऐवजी इन्सर्टींग स्कीम जास्त काम करेल असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

“Non-coverage of Loanee Farmers” हा जो परिच्छेद आहे यामध्ये फक्त ३ बँकांबद्दल ६९६.१० कोटी रुपयाचा मुद्दा घेतलेला आहे की, विमा न करता बँकांनी शेतक-यांना कर्ज दिलेले आहे. यात आणखी किती बँका आहेत आणि त्यात किती रक्कम गुंतली आहे हे माहित नाही. बँकांनी गाईडलाईन्सची अंमलबजावणी का नाही केली असे यात कुठेच म्हटलेले नाही की, विम्याशिवाय शेतक-यांना कर्ज का दिले. विभागाने उत्तरात म्हटले आहे की, बँकांनी हे स्विकारले पण याचे इम्प्लिकेशन काय आहे ? उद्या जर याचे डिफॉल्ट झाले तर त्याजचे इम्प्लिकेशन समजायला हवे. विभाग आधार मध्ये गेला तर याचा याच्याशी काहीही संबंध नाही. Because banks have not stated that आधार क्रमांक नव्हता म्हणून आम्ही विमा करून घेतला नाही. आधार कार्डमुळे विम्याशिवाय शेतक-यांना कर्ज दिले हे उत्तर असमाधानकारक असल्याचे मत प्रधान महालेखाकार यांनी व्यक्त केले असता, यामध्ये पैसे घेतले नाही असे प्रकरण येत नाही याची प्रोग्रामींगच असे आहे की यातून पैसे कपात होतात असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

पूर्वी हे ऐच्छिक होते आता बंधनकारक केले आहे. कारण ऊस शेतक-यांनी सांगितले की त्यांना हे कपात करायचे नाही त्यामुळे सरकारने ते बंधनकारक केले आहे असे समितीने विशद केले असता अजूनही ऊस शेतक-यांना विभागाने ऑप्शनच दिलेला आहे ते पूर्णतः लागू केलेले नाही. यासाठी कोकण विभागात अजूनही विरोध आहे की, त्यांच्याकडे कधीही पाऊस असतोच त्यामुळे फार कमी कधी नुकसान होते आणि तरी त्यांना इतकी रक्कम भरावी लागते. तसेच आता ऊस शेतक-यांशिवाय इतर सर्वांना लागू असल्याचेही विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

**परिच्छेद क्रमांक ३.१.३.३— शेतक-यांच्या खात्यात विमा देय रक्कम जमा न करणे / विलंबाने जमा करणे :-**

उपरोक्त परिच्छेदा संदर्भात समितीने दिनांक २७ नोव्हेंबर, २०१७ रोजी विभागीय सचिव तसेच इतर विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली साक्षीच्या वेळी या विषयासंदर्भात विभागीय सचिवांनी असे विदित केले की, पूर्वी ऑनलाईन अर्ज नसल्यामुळे विमा कंपन्याकडे कोणत्या शेतक-यांचा विमा काढण्यात आलेला आहे, त्याची माहिती मिळत नव्हती. सन २०१६ च्या नवीन योजनेमध्ये सुध्दा अशाच प्रकारची अडचण होती. परंतु ज्यावेळेस ऑनलाईन अर्ज घेतल्यामुळे प्रत्येक लाभार्थ्याचे नाव, खाते क्रमांकाची माहिती मिळत आहे. पूर्वी विमा कंपनी बँकेकडे ज्यांचे विम्याचे अर्ज आहेत त्यांना पैसे वाटप करण्यासाठी पाठवित होती त्यामुळे या विम्याचे पैसे वाटण्यासाठी विलंब होत होता.

विम्याचे पैसे देण्यासाठी लागलेल्या विलंबाचे व्याज आकारण्यात आलेले आहे काय ? शेतक-यांच्या कर्जाचे व्याज वसूल होत आहे, आणि पीक विमा योजनेचे पैसे न मिळल्यामुळे त्या पैशाचे व्याज त्यांना देणे आवश्यक आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, विमा कंपनीने बँकेला व्याज दिलेले आहे परंतु बँकेने व्याज भरलेले नसल्याचा खुलासा कृषी विभागाच्या प्रधान सचिवांनी केला.

बँकेने व्याजासह शेतक-यांना पैसे द्यावयास पाहिजेत कारण पीक विम्याचे पैसे देण्यासाठी एक ते दीड वर्षाचा विलंब लागलेला आहे असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणले असता यामध्ये काही लोकांनी अजून पैसे देखील भरलेले नाहीत. मागील बैठकीच्यावेळेस जिल्हाधिकारी यांना डी.एल.सी.सी. मध्ये समावेश करण्यात यावा,असे पत्र देखील देण्यात आलेले आहे. संबंधीत बँकचे चेअरमन आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाला देखील पत्र पाठविण्यात आलेले असल्याची माहिती प्रधान सचिव, कृषी विभाग यांनी समितीस दिली.

बँक खातेदारांना व्याजासह पैसे देईल, अशी भूमिका शासनाने स्वीकारली पाहिजे असे समितीने विदित केले असता बँक खातेदारांना व्याजासह पैसे देण्यात येतील. अशी भूमिका विभाग घेईल असे प्रधान सचिव, कृषी विभाग यांनी समितीस आश्वासित केले.

**परिच्छेद क्र. ३.१.४.१—पीक कापणी प्रयोगः-**

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीस माहिती देण्यात यावी असे समितीने सूचित केले असता पुसद आणि श्रीरामपूर येथील महसूल यंत्रणेने पीक कापणी चा प्रयोग केला होता. याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयास जबाबदारी निर्धारित करण्यासाठी माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये पत्र पाठविण्यात आलेले असल्याचा खुलासा प्रधान सचिव,कृषी विभाग यांनी केला.

**परिच्छेद क्र. ३.१.४.२— WBCIS साठी स्वयंचलित हवामान स्टेशन :-**

सदरहू परिच्छेदासंबंधी माहिती देण्यात यावी असे समितीने विभागास सांगितले असता, प्रत्येक महसूल विभागामध्ये स्वयंचलित हवामान केंद्र असावे, या दृष्टीने विभागाने कार्यवाही सुरू केलेली आहे. यामध्ये १९०० स्वयंचलित हवामान केंद्र स्थापन करण्यात आलेले असल्याची माहिती कृषी विभागाच्या प्रधान सचिवांनी दिली.

महालेखापालांच्या आक्षेपानुसार २२ केंद्रापैकी १० केंद्रे व्यवस्थित कार्यरत नव्हती याबाबत समितीने विचारणा केली असता पूर्वीचे हवामान केंद्र हे खाजगी होते. सदर केंद्र हे योग्य ठिकाणी उभारण्यात आलेले नव्हते अशा प्रकारचे केंद्र इमारतीपासून, ट्रान्समिशन लाईनपासून दूर पाहिजेत असा खुलासा कृषी विभागाच्या प्रधान सचिवांनी केला.

आता राज्य शासनाच्यावतीने महावेध प्रकल्प, २०१७ सुरू करण्यात येत आहे. त्याबाबत समितीला अवगत करावे असे समितीने सूचित केले असता, या प्रकल्पाअंतर्गत २०६५ केंद्र स्थापन करावयाचे आहेत. १९६० पेक्षा जास्त केंद्रांची स्थापना देखील करण्यात आलेली आहे. उर्वरित १०० केंद्रे हे पुढील १५ दिवसांमध्ये स्थापन करण्यात येतील. यासाठी पुणे येथे कंट्रोल रुमची स्थापना करण्यात येणार आहे. मंत्रालयामध्ये देखील सर्व केंद्राची माहिती पाठविण्यात येते. कोणत्या ठिकाणी किती वेळ

पाऊस पडला, यासाठी प्रत्येक १० मिनिटांनी ऑटोमॅटीक रेकॉर्डींग होत असते. तसेच, कोणते केंद्र बंद आहे, याची देखील माहिती मिळते. सदर प्रकल्प हा पीपीपी मॉडेलमध्ये करण्यात आलेले आहे. यासाठी १५० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली होती. यासाठी तीन ते चार वेळेस निविदा काढण्यात आलेली होती. पूर्वीच्या कंपनी चार हजार रुपये प्रति महिना प्रति केंद्र माहिती विकत होत्या. त्यानंतर शासनाने त्यांना असे सांगितले की, हवामान केंद्रासाठी शासन जागा देईल आणि त्या ठिकाणी हवामान केंद्र खासगी कंपनी उभारेल आणि राज्य शासनाच्या विमा कंपनी तेथील हवामान केंद्रातील माहिती खरेदी करतील. ज्यावेळेस हवामान केंद्राची माहिती राज्य शासन लोकहितासाठी वापरेल तेव्हा ती निःशुल्क असेल. परंतु व्यावसायिक वापरासाठी शासन योग्य ती किंमत त्यासाठी देईल. निवेदेमध्ये ३५५०/- रुपये दराने माहिती देण्यास एक कंपनी तयार होऊन त्यांना आता काम देण्यात आलेले आहे. विमा कंपन्या आता त्यांच्याकडून डेटा खरेदी करीत आहेत. या कंपनीस सात वर्षासाठी जागा देण्यात आलेली आहे. सात वर्षानंतर राईट ऑफ रिफ्युजल राहिल. दुसरी निविदा ज्या वेळेस काढण्यात येईल, त्यावेळेस पहिल्या कंपनीस प्राधान्य राहिल अशी माहिती कृषी विभागाच्या प्रधान सचिवांनी दिली.

जर हा डेटा शेतक-यांना पाहिजे असेल तर काय प्रक्रिया असते अशी विचारणा समितीने केली असता, शेतक-यांना विम्यासाठी मिळत असतो. यामध्ये ग्रामपंचायतीमध्ये कोणत्या भागात कसे तापमान आहे, आणि त्या तापमानाचा पिकावर कोणता परिणाम होणार आहे, याची माहिती देण्यात येणार आहे. यासाठी लागणारी जमीन कंपनीस देण्यात आलेली नाही. यासाठी ९ बाय ६ मिटरच्या जागेचा ताबा देण्यात आलेले असून ती जागा लिजवर देण्यात आलेली नाही. यामध्ये शासनाचा कोणताही निधी गुंतविलेला नाही. जवळपास १५० कोटी रुपयांच्या निधीची बचत या माध्यमातून करण्यात आलेली असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

श्रीरामपूर आणि पुसदच्या विषयामध्ये झालेल्या चुका इतर ठिकाणी होऊ नये, यासाठी विभागामार्फत काय कार्यवाही करण्यात येत आहे अशी पृच्छा समितीने केली असता समिती सदस्य श्री. जगताप, वि.स.स. यांच्या गावामध्ये ज्या प्रमाणे क्रॉप कटींगचे फोटो दाखविले होते तशाच पध्दतीने प्रत्येक क्रॉपचे पिक्चरायझेशन व्हावे असा खुलासा कृषी विभागाच्या प्रधान सचिवांनी केला.

यामध्ये एन.पी. अचूक झाले पाहिजे, अशी समितीची अपेक्षा आहे. तसेच क्रॉप कटींमध्ये घेण्यात येणारी नोंदणी व्यवस्थित झाली पाहिजे. ज्यावेळेस महालेखापालांनी याबाबत पडताळणी केलीतेव्हा प्रपत्र दोन वर नोंदणी नसून काही ठिकाणी सह्या नाहीत काही ठिकाणची आकडेवारी व्यवस्थित भरलेली नाही त्यामुळे अशा प्रकारच्या झालेल्या चुका तपासण्यासाठी काय उपाय करता येतील अशी विचारणा समितीने केली असता, पीकांची माहिती भरण्यासाठी भरपूर दिवसांची मुदत असल्यामुळे अशा प्रकारच्या चुका होतात. यामध्ये कट ऑफ डेटमध्ये माहिती मागविण्यात येते. जसे की, ऊस, सोयाबीन, उडीद या पीकांची कापणी करण्यात आली असून त्याबाबतची माहिती जाहिर करण्यात आलेली आहे. जर मुदतीमध्ये काम केले तर चुका होत नाहीत. जर मुदत वाढत गेली तर माहिती चुकण्याची शक्यता असते यामध्ये मोबाईल ॲप प्रणालीमध्ये ताबडतोब नोंदी घ्याव्या लागतात अशी माहिती कृषी विभागाच्या प्रधान सचिवांनी दिली.

विभागाकडे तक्रार निवारण करण्याची योग्य व्यवस्था नाही. मुख्यमंत्री पोर्टल व्यतिरिक्त विभागाने इतर दुसरे पोर्टल माहितीसाठी तयार केलेले आहे काय? या समितीच्या प्रश्नाला जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली आणि विभाग स्तरावर विभागीय अधिका-यांच्या स्तरावर तक्रार निवारण समिती तयार करण्यात आलेली आहे. या समितीमध्ये विभागाचे अधिकारी हे सदस्य सचिव आणि महसूल विभागाचे अधिकारी हे अध्यक्ष राहतील. ज्यावेळेस पोर्टलवर तक्रार येते त्यावेळेस त्या तक्रारींचे मॉनिटरींग होते. यामध्ये जवळपास ३३८ तक्रारींच्या संदर्भाची आलेली नसल्यामुळे या तक्रारींचे निकारण यादी प्राप्त झाल्यानंतर करण्यात येईल. विभागाकडे प्राप्त झालेल्या १९६ तक्रारींच्या यादीची चौकशीची कार्यवाही करण्यात आली आहे. याबाबतच्या तक्रारीचे उत्तरे देखील विमा कंपनीकडून प्राप्त झालेली असल्याचे प्रधान सचिव ,कृषी विभाग यांनी विदित केले.

तक्रारींची संख्या व तक्रारी या कृषी आयुक्त, पुणे यांच्याकडे आहेत. त्यांनीच ही सर्व आकडेवारी दिलेली आहे. विभागाने ही सर्व माहिती प्रधान महालेखाकार यांच्याकडून घ्यावी असे समितीने सूचित केले असता, विभागाकडे १९६ तक्रारींच्या निराकरणाचे पत्र असल्याचे प्रधान सचिव, कृषी विभाग यांनी समितीस अवगत केले.

विभागाच्या निदर्शनास आल्यानंतर विभागाने कार्यवाही केली. विभागाने दिलेल्या उत्तरामध्ये सांगितले आहे की, " नोंद घेण्यासाठी भारतीय कृषी विमा कंपनीच्या नियंत्रणाखाली डॉकेट सुविधेवर आधारित टोल फ्री नंबर उपलब्ध करुन देण्याबाबत सूचविलेले आहे." अशी पृच्छा समितीने केली असता, ते उत्तर अपूर्ण होते. त्यानंतर याबाबत माहिती घेतली व तक्रारी निराकरणाबाबतचे उत्तर प्राप्त झाले आहे असा खुलासा प्रधान सचिव, कृषी विभाग यांनी केला.

यापुढील तक्रारींबद्दल समितीने विचारणा केली असता यापुढे ज्या तक्रारी येतात त्या स्थानिक लेव्हलवर सॉर्ट आउट करण्याचा मुद्दा आहे. यासाठी समिती स्थापन करण्यात आली व तरीही तक्रारींचे निराकरण होत नसेल तर " आपली सरकार " पोर्टलवर तक्रार दाखल करून त्याचे मुदतीत निराकरण न झाल्यास माननीय मुख्यमंत्री स्तरावर त्याचा आढावा होतो. त्यामुळे तसे होणार नाही अशी विभागाची धारणा असल्याचे प्रधान सचिव, कृषी विभाग यांनी समितीस अवगत केले.

ग्रामपंचायत स्तरावर... गोंदिया येथे ऑर्डर केली का अशी विचारणा समितीने केली असता, महसूल विभागाने माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये आदेश काढले आहेत की तलाठ्यांमार्फत प्रमुख पिकांसाठी ग्रामपंचायत स्तरावर आठ पिक कापणी प्रयोग केले जातील. उर्वरित गौण पिकांच्या निकषांप्रमाणे विभागाकडून व्यवस्था करण्यात येते. असे वाटते की, त्यांच्या शासन निर्णयाचा सकारात्मक स्टेटस पाहून येत्या खरीप हंगामामध्ये पूर्ण राज्यामध्ये ग्रामपंचायत स्तरावर हे प्रयोग करणे शक्य आहे असा खुलासा प्रधान सचिव, कृषी विभाग यांनी केला.

याच वर्षी हे प्रयोग सुरू करण्यात येतील असे विभागाने सांगितले असल्याचे समितीने निदर्शनास आणले असता, यावर्षी आकडेवारी घेण्यात येईल, परंतु जे टेंडर नोटिफिकेशन केले आहे ते महसूल मंडळाप्रमाणे नोटिफाय केलेले आहे. टेंडर कंडीशन सध्या बदलता आल्या नाही तरी जेवढे जास्त पिक कापणी प्रयोग होतील त्या सर्वांची सरासरी केली जाईल त्याबाबत व्यवस्था केली असल्याची माहिती प्रधान सचिव, कृषी विभाग यांनी केली.

म्हणजे महसूल विभागाने ग्रामपंचायत स्तरावर सुरु केले, परंतु विभागाच्या टेंडरच्या अटीमध्ये राजस्व मंडळ आहे अशी पृच्छा समितीने केली असता राजस्व मंडळाला १० पिक कापणी प्रयोग करण्यात येणार होते, परंतु ग्रामपंचायत स्तरावर आल्यामुळे ते ३०-४० पर्यंत आले आहे. या सर्वांच्या सरासरी प्रयोग केले जातील असे प्रधान सचिव,कृषी विभाग यांनी विदित केले.

विमा कंपनीने ते मान्य केले का या समितीच्या प्रश्नाला, विभागीय सचिवांनी असे अवगत केले की, यामध्ये कमीत-कमी १० पीक कापणी प्रयोग आहेत. त्यामुळे जास्त घेतल्यास त्यांना मान्य करण्याचा प्रश्न नाही, त्यांना ते घ्यावेच लागतील.

याबाबत महसूल विभागाचा शासन निर्णय बदलणे आवश्यक असल्याचे मत समितीने व्यक्त केले असता, महसूल विभागाचा शासन निर्णय हा आठ प्रमुख पिकांसाठी पिक कापणी प्रयोग करण्याबाबतचा आहे. कृषि विभागाला नियमाप्रमाणे चारच पिके हवी आहेत तरीदेखील तो पर्याप्त आहे व त्याआधारे हे ग्रामपंचायत स्तरावर करणे शक्य होईल असे सांगण्यात येत आहे असे प्रधान सचिव, कृषी विभाग यांनी विदित केले.

कृषी विकास केंद्राचा अहवाल समितीस सादर करावा असे समितीने सांगितले असता विभागीय सचिवांनी याबाबत अहवाल देण्याचे मान्य केले.

विमा काढताना थेट कंपनीशी वाटाघाटी करुन कंपनीकडूनच विमा उतरवता की एजंटमार्फत विमा उतरवला जातो अशी विचारणा समितीने केली असता, यामध्ये एजंट नसून विमा कंपन्यांना टेंडरद्वारे प्रिमियमचा दर निश्चित करुन देण्यात येतो असा खुलासा प्रधान सचिव, कृषी विभाग यांनी केला तसेच निविदेमध्ये कंपन्या थेट भाग घेतात त्यामुळे वाटाघाटीला स्कोप राहत नाही. जी निविदा कमीत कमी असेल त्या कंपनीला टेंडर देण्यात येते. कमीत कमी दर जर खूप जास्त असेल. तर तो कमी करण्याबाबत संबंधित कंपनीला सांगण्यात येते. तसेच अर्जदार हे बँकेचे कर्जदार असतील तर ते बँकेमार्फत येतात व बिगर कर्जदार हे बँकेमार्फत व सेवा केंद्रामार्फतही येवू शकतात यासाठी मध्ये कुठेही एजंट लागत नाही असेही समितीस अवगत केले.

**परिच्छेद क्रमांक ३.९ 'निष्फळ खर्च**

**साक्ष :-**

**२.२** उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने दिनांक २७ नोव्हेंबर,२०१७ रोजी विभागीय सचिवांनी तसेच इतर विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने सदरहू परिच्छेदाचा विषय २ कोटी ८० लाख रुपयांचा असून याबाबत समितीला थोडक्यात माहिती द्यावी असे सांगितले असता, माती परिक्षण प्रयोगशाळा मानव विकास योजनेत देण्यात आली आहे. बैठकीला मानव विकास योजनेचे आयुक्त उपस्थित आहेत. सदर परिच्छेद माती परिक्षणाशी संबंधित असून २ विभागांच्या समन्वयाने हे कसे कार्यान्वित करता येते, त्या दृष्टीने कृषी विभागाचे सचिव, नियोजन विभागाचे सचिव, मानव विकास योजनेचे आयुक्त व विद्यापीठ यांचेशी चर्चा केली त्या दृष्टीने थोडे प्रयत्न केले आहेत. व्हॅन बंद आहेत, त्या व्हॅनपैकी २ व्हॅनच्या बाबतीत मानव विकास योजनेच्या आयुक्तांनी देखील माहिती घेतली आहे, त्याबद्दल ते विस्तृतपणे सांगतील की, त्यावरील उपकरणे डिसमेंटल केले होते. मा. कुलगुरु यांचेशी बोलणे झाले आहे की अमुक असे इनपूट आहे त्यांनी सुध्दा त्या संदर्भात खुलासा केला आहे असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले असता यासंबंधी समिती सहमत असल्याचे समितीने नमूद केले. .

व्हॅन वरील उपकरणे कसे डिसमेंटल केली आणि कशी सुरु करता येतील, याबाबत आयुक्त सांगतील. कृषी विभागातर्फे एकच बाब आहे की, राज्यात अशा ३३ प्रयोगशाळा मानव विकास योजनेतून मंजूर झाल्या आहेत. काही माती परिक्षण प्रयोगशाळा स्वतःच्या कुवतीवर चालविल्या जातात, लोकांकडून सेवा शुल्क घेऊन चालविल्या जातात. मात्र मुख्य स्वरुपात जेथे कॅश क्रॉप आहे, म्हणजे द्राक्ष बागा, केळी बागा आहेत, तेथे त्या चालतात. कारण शेतकरी स्वतःच्या शेतीपुरते हे सॅम्पल घेतात. भाताच्या क्षेत्रात या प्रयोगशाळा बंद आहेत. कारण भाताच्या ठिकाणी अडीच हेक्टरमध्ये एक सॅम्पल ओलिताखाली असेल तर आणि पावसावर अवलंबून भात शेती असेल तर, १० हेक्टरवर सॅम्पल आहे, ते शासनातर्फे घेतले जाते. त्या योजनेत जेथे सहभागी झाले आहेत, तेथे व्यवस्थित चालले आहे, ज्या भागात त्यांनी शेतक-यांकडून पैसे वसूल करुन त्यांचे माती परिक्षण करुन देऊ असे सांगितले आहे तेथे अजून भातामध्ये अशी काही शिफारस देणे शक्य झाले नाही की, शेतक-यांच्या उत्पादनाचा खर्च इतका कमी होईल की, ते स्वतःचे पैसे लावून सॅम्पल करुन घेतील. आता अशी वस्तुस्थिती आहे. नियोजन विभाग, आयुक्त, मानव विकास योजना, विद्यापीठ सहमत झाले आहेत की, आम्ही आपल्या रेग्यूलर प्रोग्राममध्ये सहभागी होतो, जसे बाकी ठिकाणी झाले आहे पुढे यांचे व्हाएबल होऊ शकेल. कोणाला असे वाटते की, आम्ही पूर्णतः व्हाएबल होणार नाही. आमची तयारी आहे की, त्यांना शासकीय उद्दिष्ट देऊ. ते दिल्यामुळे जे माती परिक्षण होईल त्यांच्या किंमती, मोबदला शासनाच्या योजनेत देऊ आणि या पध्दतीने ते आर्थिकदृष्ट्या सक्षम, निर्भर झाले पाहिजेत, जसे इतर जिल्ह्यांत आहेत, त्या दृष्टीने कृषी व नियोजन विभागामध्ये योजना जरी दोन असल्या तरी कोणतेही मतभेद नाहीत, आपण समन्वयाने त्या चालविण्यास तयार आहोत तथापि पहिल्यांदा ते बंद का केले, डिसमेंटल का केले, या संदर्भात विद्यापीठाचे मत ऐकून घ्यावे असे मत विभागीय सचिवांनी व्यक्त केले.

विभागाने आठही व्हॅन्स धान उत्पादक क्षेत्रामध्ये दिलेल्या आहेत. गोंदिया, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली येथे देण्यात आलेल्या प्रत्येक व्हॅनला ३५ लाख रुपये खर्च केले आहेत. गोंदिया येथील व्हॅन दोन वेळा जाऊन पाहिल्या असून काल तसेच १५ दिवसांपूर्वी देखील जाऊन व्हॅन पाहिली आहे. तेव्हा सर्व अधिकारी उपस्थित होते. विभागाने २ व्हॅन्ससाठी ७० लाख रुपये खर्च केले आहेत, मात्र त्या व्हॅन्स आता ७ लाख रुपयांमध्ये देखील कोणी घेणार नाहीत, अशी व्हॅन्सची परिस्थिती आहे व्हॅन पूर्ण भंगार झाली आहे एकही काम त्यातून झालेले नाही. माती परिक्षणाची फिगर झिरो आहे. या संदर्भात बाकीचे नियोजन केले नसून उपयोग केला नाही, हा वेगळाच भाग आहे. व्हॅनमध्ये काम केले नाही किमान व्हॅन तरी वाचली पाहिजे व्हॅन पूर्ण भंगार झाली आहे. एकही पाईपलाईन , मशिनरी नाही तसेच प्रयोगशाळा काढून टाकली आहे. व्हॅनची परिस्थिती भंगाराची आहे. विभागाने व्हॅन्स आज लिलावात काढल्या तरी २ व्हॅन्सची किंमत ७ लाख रुपये देखील येणार नाही. मुद्दा असा आहे की, माती परिक्षण काहीच केलेले नाही. व्हॅनची अतिशय दुरवस्था असल्याचे समितीने विदित केले असता एकूण ४ केव्हीकेमध्ये ८ व्हॅन्स कार्यरत आहेत. विशेष म्हणजे, आजच्या स्थितीत आठही व्हॅन्स कार्यरत आहेत. कोणतीही व्हॅन बंद अवस्थेत नाही. चारही जिल्हे भात पिकविणा-या क्षेत्रात येत असल्यामुळे, विशेषतः खरीप हंगामात मोठ्या प्रमाणात पाऊस पडतो. व्हॅन्स जाऊ शकतील, अशा पध्दतीचे ग्रामीण भागातील रस्ते नाहीत, रस्ते सुस्थितीत नाहीत. ऑडिओव्हिज्युअलची उपकरणे तेथे लावली आहेत, त्यांना दमट हवामानामुळे मॉयश्चर पकडल्याने त्यांवर विपरित परिणाम होऊ शकतो. काही ठिकाणी ही व्हॅन्स बाहेर राहत असल्यामुळे त्यातील सामानही चोरीला जाऊ शकते. खरीप हंगामात गोंदियाची गाडी ४ महिन्यांसाठी बंद होती, सामान काढून ठेवण्यात आले होते. विभागाकडे व्हॅनचे लॉगबूक आहे, लॉगबूकवरुन हे पाहता येऊ शकते. ४ महिन्यांसाठी व्हॅनमधील सामान काढून ठेवले होते. समिती म्हणत आहे ती सत्य परिस्थती आहे, मा. समिती प्रमुख आल्यानंतर व्हॅनमध्ये सामान लावण्यात आले आहे व मा.समिती प्रमुखांच्या हस्तेच त्याचे २४ तारखेला उद्घाटन करायचे असे ठरले होते. ९ तारखेला असलेल्या जागतिक मृद

दिनानिमित्त त्या व्हॅन्स व्यवस्थित करण्यात येत आहेत. ही परिस्थिती गोंदिया येथेच नाही तर शिंदेवाही, गडचिरोली येथेही आहे. खरीप हंगामात मोठ्या प्रमाणात पाऊस असल्यामुळे काही प्रमाणात ऑडिओव्हिज्युअलचे सामान काढण्यात येते आणि खरीप हंगाम संपल्यानंतर पुन्हा माती परिक्षणाला सुरुवात होते, त्यावेळी पुन्हा सामान व्हॅनमध्ये लावण्यात येते. आणि व्हॅन सुरु करतो असा खुलासा संचालक,विस्तारीत शिक्षण, डॉ.पंजाबराव कृषी विद्यापीठ,अकोला यांनी समितीस अवगत केले.

भंगार व्हॅन चालत नाही, हा मुद्दाच नसून व्हॅनची परिस्थिती भंगारची आहे. विभागाने त्या व्हॅनमधून काहीही निष्पन्न केलेले नाही. व्हॅनमधील टेस्टिंगच्या फिगर्स झिरो आहेत. गोंदियामध्ये ५ वर्षांत तपासणी केलेले नाही. समितीचा मुद्दा इतकाच आहे की, व्हॅन पूर्ण भंगार झाले आहे विभागीय प्रतिनिधी स्वतः उत्तरात सांगत आहेत की, व्हॅन फक्त प्रदर्शनासाठी, लोकांना प्रवृत्त करण्यासाठी, टीव्ही दाखविण्यासाठी वापरण्यात येते हे बरोबर नाही. त्यासाठी ५-१० लाख रुपयांची व्हॅन घेतली असती तरी चालू शकले असते. या व्हॅनसाठी ३५ लाख रुपये खर्च केले आहेत. आरकेव्हीवाय अंतर्गत तुम्ही दरवर्षी ५-१० लाख रुपये खर्च दाखविण्यात येत आहेत. पूर्ण लॅब बाहेर काढली आहे. विभागाच्या अधिका-यांनी सांगितले की, या व्हॅनमध्ये एसिटिनिल व ऑक्सिजन ठेवणे धोकादायक आहे, त्यामुळे येथे लॅब ठेवणार नाही, लॅबमध्ये माती आणू आणि तेथे टेस्टिंग करु. असे अधिका-यांचे म्हणणे आहे. विभाग कशीतरी लॅब सुरु करीत असेल तर त्यास समितीची हरकत नाही, लॅब विभाग सुरु करित असेल तर करावी, पण विभागाचेच अधिकारी म्हणत आहेत की, तेथे धोकादायक आहे. अशा परिस्थितीत ती व्हॅन बॅटरी टाकून, धक्का मारुन चालवित असाल तर चालवावी. पण त्या व्हॅनची परिस्थिती आज भंगारासारखी झाली आहे. त्या व्हॅनची डागडुजी करुन, रंग मारुन ती तयार करण्यात येत असेल तर योग्य नाही. ३५ लाख रुपये खर्च करुन विभागाकडून एकही टेस्टिंग झालेले नाही विभागानेच दिलेली माहिती आहे. तसेच महालेखाकारांची देखील आकडेवारी आहे. गोंदियाच्या मशिनरीसमोर झिरो वापर लिहिला आहे. आता या स्थितीत त्या व्हॅनची ७ लाख रुपये सुध्दा किंमत नाही. तशीच परिस्थिती बाकी ठिकाणी देखील उद्‌भवू शकते असे मत समितीने व्यक्त केले असता सन २०१३-१४ ला गोंदियाला व्हॅन घेतल्या, त्यामध्ये १५०० सॉईल सॅम्पल टेस्टिंग केले आहे, सन २०१७-१८ ला १००० सॉईल सॅम्पल टेस्टिंग केले आहे. गेल्या ३ वर्षांत सॉईल सॅम्पल झिरो होते. मात्र ज्यावर्षी व्हॅन्स खरेदी केल्या, त्यावर्षी सॉईल सॅम्पल टेस्टिंग केले आहे असा खुलासा संचालक,विस्तारीत शिक्षण, डॉ.पंजाबराव कृषी विद्यापीठ, अकोला यांनी केला.

माती नमूना तपासणीचे वार्षिक लक्ष्य सन २०१२-१३ ला सन २०१३-१४ आहे, सन २०१४-१५ , सन २०१५-१६ तसेच जून, २०१६ पर्यंतही शुन्य असल्याचे समितीने विदित केले असता सन २०१३-१४ ला १५०० तपासण्या केल्या असून सन २०१७-१८ ला १००० तपासण्या केल्या असल्याचे संचालक,विस्तारीत शिक्षण, डॉ.पंजाबराव कृषी विद्यापीठ,अकोला यांनी समितीस अवगत केले.

विभागाने व्हॅनमध्ये टेस्टिंग का केल्या नाहीत ? या टेस्टिंग विभागाच्या लॅबमध्ये केलेल्या आहेत. तुमच्या व्हॅनमधील टेस्टिंग नाहीत. आपण कृषी विकास केंद्राच्या वाटचालीबाबत चर्चा करीत नसून २ कोटी ८० लाख रुपये खर्च झाले आहेत त्याचा काय उपयोग झाला व किती तपासण्या केल्या इतक्या मर्यादेपर्यंतच हा परिच्छेद आहे. आपल्याला बाकीच्या ॲक्टिव्हिटीबाबत चर्चा करता येत नाही. विद्यापीठाने १४००- १५०० टेस्टिंग केल्या असल्याचे सांगण्यात येत आहे, मात्र त्या वद्यापीठाच्या केव्हीकेमध्ये असलेल्या लॅबमध्ये केलेल्या आहेत. समिती व्हॅनबाबत बोलत आहे तुम्ही व्हॅनमध्ये काय केले ? विभागाने व्हॅनमध्ये काहीच केले नाही. समितीचा मुद्दा एवढाच आहे की, व्हॅनमध्ये काहीही काम केले नाही तर मग व्हॅन कशासाठी घेतली ? व्हॅनमधील लॅबमध्ये टेस्टिंग केले नाही तर किमान ती व्हॅन तरी शाबूत असली पाहिजे व्हॅनची दूरावस्था झाली आहे तपासण्या असलेल्या टेस्टिंग व्हॅनच्या माध्यमातून झालेल्या नाहीत असे समितीने विदित केले असता या टेस्टिंग व्हॅनच्या माध्यमातूनच झालेल्या आहेत असा खुलासा संचालक,विस्तारीत शिक्षण, डॉ.पंजाबराव कृषी विद्यापीठ,अकोला यांनी केला. तसेच सांगितलेली आकडेवारी सन २०१३-१४ ची आहे मधल्या ३ वर्षांच्या काळात ती व्हॅन बंद होती हे बरोबर आहे. आता आपण सॉईल सॅम्पल टेस्टिंग लॅबमध्ये करीत असल्याचेही समितीस अवगत केले.

विभागाने उत्तरात सांगितले आहे की व्हॅन एक्झिबिशनसाठी फिरवण्यात येते. लोकांना टेस्टिंगसाठी फिरविण्यात येते अशी विचारणा समितीने केली असता संचालक,विस्तारीत शिक्षण, डॉ.पंजाबराव कृषी विद्यापीठ,अकोला यांनी होय असे उत्तर समितीस दिले.

विभागाकडून पोस्टर लावण्यात यावे की, आमच्या केंद्रामध्ये येऊन मत प्रदर्शन करावे की व्हॅनचा काय उपयोग आहे ? असे समितीने सूचित केले असता तेथे एक ऑडिओ व्हिज्युअल सिस्टिम ठेवली असून टीव्ही आहे असे संचालक,विस्तारीत शिक्षण, डॉ.पंजाबराव कृषी विद्यापीठ,अकोला यांनी समितीस अवगत केले.

टीव्हीची व्हॅन आहे लॅबची व्हॅन नाही समिती सहमत आहे की टीव्हीची व्हॅन आहे, लॅबच्या व्हॅनला ३५ लाख रुपये लागले आहेत आणि आता टीव्ही आहे म्हणून ती व्हॅन साडे तीन लाख रुपयांमध्ये विकतील, जी २ लाख रुपयांमध्ये विकली गेली असती. विभागाचे उत्तरात नमूद आहे की, व्हॅनच्या माध्यमातून शेतकरी वर्गात माती परिक्षण याबाबतचे महत्त्व व फायदे या संदर्भात जागरुकता निर्माण करणे - त्यासाठी लॅबची आवश्यकता आहे का ? ही व्हॅन केवळ फिरते मृद परिक्षण प्रयोगशाळा न राहता कृषी तंत्रज्ञान प्रसारकाचे उत्कृष्ट मॉडेल झाले आहे - त्याला लॅबची गरज आहे का ? माती परिक्षणाचे महत्त्व या विषयावर ५ हजारांहून अधिक शेतक-यांमध्ये घडीपत्रिकेचे वितरण करण्यात आले - हे लॅबचे काम आहे का ? संबंधित जिल्ह्यात आयोजित कृषी प्रदर्शनीमध्ये व्हॅन्स प्रदर्शित करुन माती परिक्षणाबाबत जागरुकता निर्माण करणे - याला लॅब कशाला पाहिजे? विद्यापीठाने असेही सांगितले आहे की, ४,५६६ शेतक-यांना माती आरोग्य विषयक मार्गदर्शन करण्यात आले. मार्गदर्शन करण्यासाठी लॅबची गरज काय ? समितीची भूमिका इतकीच आहे की, २ कोटी ८० लाख रुपये मानव विकास योजनेच्या कार्यक्रमांतर्गत पूर्ण योजनेला राबविण्याचा प्रयत्न केला आहे, मात्र हा संपूर्ण पैसा वाया गेलेला आहे, ५ वर्षे याचा काहीही उपयोग झालेला नाही, व्हॅन घेताना कोणतेही नियोजन केलेले नाही. मानव विकास योजना कार्यक्रमांतर्गत व्हॅन पाठविली आहे. मानव विकास मिशनने त्यासाठी पुढील कोणतीही तरतूद केलेली नाही, देखभाल केलेली नाही, हाही आक्षेप आहे. महालेखाकारांनी परिच्छेद काढला आहे की, मानव विकास योजनेकडून या संदर्भात काहीच कमेंट आलेली नाही हा तर वेगळाच मुद्दा आहे. व्हॅन आली आहे, काम केलेले नाही तर किमान ती व्हॅन चांगल्यारितीने जोपासून तरी ठेवावी असे मत समितीने व्यक्त केले असता, हे खरे आहे की, गोंदिया कृषी विज्ञान केंद्र येथील माती परीक्षण प्रयोगशाळा व्हॅन तीन वर्षे बंद होती. परंतु भंडारा, गडचिरोली व चंद्रपूर येथील कृषी विज्ञान केंद्रातील व्हॅन सुरु होत्या असा खुलासा संचालक,विस्तारीत शिक्षण, डॉ.पंजाबराव कृषी विद्यापीठ,अकोला यांनी केला.

समितीचे मत आहे की, या चारही जिल्ह्यातील माती परीक्षण प्रयोगशाळा व्हॅनचे ऑडिट करावे लागेल जेणेकरुन वस्तुस्थिती समोर येईल असे समितीने विदित केले असता, इतर सर्व जिल्ह्यातील माती परीक्षण प्रयोगशाळा व्हॅन सुरु असून, त्या ठिकाणी माती परीक्षणाचे काम सुरु आहे.

याचाच अर्थ गोंदिया जिल्ह्यातील माती परीक्षण प्रयोगशाळा व्हॅनकडे दुर्लक्ष झाले आणि उर्वरित जिल्ह्यातील व्हॅनकडे दुर्लक्ष न झाल्यामुळे त्या व्यवस्थित सुरु आहेत असे विभागाचे म्हणणे आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, गोंदिया येथील दोन्ही व्हॅन तीन वर्षे बंद असल्याचे संचालक,पंजाबराव कृषी विद्यापीठ,अकोला यांनी समितीस अवगत केले. यावर समितीने अशी विचारणा केली की, महालेखाकार यांच्या लेखा परीक्षणात गोंदियामध्ये माती परीक्षण झाले नसल्याचे नमूद केले आहे. विभाग सांगत आहे ती वस्तुस्थिती असेल तर विद्यापीठाने हा परिच्छेद महालेखाकार यांच्याकडून वेटींग करुन का घेतला नाही ? विभागीय प्रतिनिधी डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठातील वरिष्ठ आणि जबाबदार अधिकारी म्हणून काम करीत आहेत. महालेखाकार यांच्यासमोर आपली बाजू मांडली असती तर हा परिच्छेद त्यांच्याकडून वगळण्यात आला असता. परिणामी सदरहू परिच्छेद समितीसमोर चर्चेसाठी आलाच नसता असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणले यावर कृषी विद्यापीठाचे संचालक हे महालेखाकार यांच्या परिच्छेदाचे खंडन करीत नसल्याचे विभागीय सचिवांनी विदित केले.

समितीचे मत आहे की, कृषी विद्यापीठाचे संचालक हे महालेखाकार यांच्या आक्षेपाचे खंडन करीत आहेत. महालेखाकार सांगत आहेत की, सदरहू व्हॅनच्या माध्यमातून निरंक माती परीक्षण करण्यात आलेले आहे आणि संचालक मात्र कोणत्या वर्षी किती मातीच्या नमुन्यांचे परीक्षण करण्यात आले या बाबतची आकडेवारी नमूद करीत आहेत. समिती जे सांगत आहे ती स्थानिक पातळीवरील वस्तुस्थिती आहे. समितीचे मत आहे की, गडचिरोली, साकोली किंवा चंद्रपूर येथील प्रयोगशाळा व्हॅनचे ऑडिट विभाग अधिका-यांकडून करुन घ्यावे लागेल. समितीचे मत आहे की, विद्यापीठाला माती परीक्षणासंदर्भात जे उद्दिष्ट दिले होते त्यातील १०-२० टक्के उद्दिष्ट सुध्दा साध्य झालेले नाही. विद्यापीठाकडून व्हॅनच्या उपयोगितेसंदर्भात जे कारण सांगितले जात आहे ते मान्य करण्याजोगे नाही. गोंदिया येथील व्हॅनची कशी दूरवस्था झालेली आहे हे प्रत्यक्ष बघितलेले आहे. जी व्हॅन ३५ लाख रुपयाला खरेदी केलेली आहे ती व्हॅन आजच्या घडीला ५ लाख रुपयात सुध्दा कोणी विकत घेणार नाही, अशी स्थिती असल्याचे समितीने नमूद केले. Whether the Secretary is satisfied with this explanation अशी विचारणा समितीने केली असता, यह जो डेटा दिया गया है वह इन्हीं के द्वारा दिया गया है. यहाँ पर सभी जगहों पर जिरो जिरो ही लिखा हुआ है असा खुलासा वित्त विभागाच्या सचिवांनी केला.

व्हॅनच्या माध्यमातून करण्यात येणा-या माती परीक्षणाचे उद्दिष्ट प्रती वर्षी ५ हजार ठरविले होते. विदर्भातील पूर्वेकडे असलेल्या भात पिकविणा-या जिल्ह्यांचा विचार करता त्या भागात साधारणतः १८९० मातींच्या नमुन्यांचे परीक्षण व्हॅनच्या माध्यमातून होऊ शकते, असे कॅल्क्युलेशन केले आहे. प्रयोगशाळा व्हॅनच्या माध्यमातून साधारणतः जास्तीत जास्त २ हजार पर्यंत मातीच्या नमुन्यांचे परीक्षण होऊ शकते अशी माहिती संचालक, डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ यांनी दिली.

विभागाचे म्हणणे समिती मान्य करते. विभागाने प्रती वर्षी किमान २ हजार माती नमुन्यांचे परीक्षण करावे. या संदर्भातील उद्दिष्ट विभागीय सचिवांनीच निश्चित करुन द्यावयास पाहिजे. विभागाने किमान २ हजाराचे तरी उद्दिष्ट साध्य केले आहे काय अशी पृच्छा समितीने केली असता, गोंदिया जिल्ह्यातील भाग वगळला तर इतर जिल्ह्यांमध्ये २ हजार पर्यंत उद्दिष्ट साध्य झाले असल्याचा खुलासा संचालक, डॉ.पंजाबराव कृषी विद्यापीठ यांनी केला.

जर दुसरीकडे उद्दिष्ट साध्य झाले असेल तर गोंदिया जिल्ह्यात का साध्य झाले नाही ? साकोली तालुक्यात २०१२-१३ मध्ये माती परीक्षणाचे उद्दिष्ट १३२, २०१३-१४ चे उद्दिष्ट ४३५, २०१४-१५ चे उद्दिष्ट ०८, २०१५-१६ चे उद्दिष्ट ३६७ आणि २०१६-१७ चे उद्दिष्ट ७०९ इतके साध्य झाले आहे. याचाच अर्थ या पाच वर्षामध्ये २ हजार इतके उद्दिष्ट सुध्दा साध्य झाले नाही. पाच वर्षात गोंदियामध्ये ००, सिंदेवाही तालुक्यात केवळ २०० आणि सोनापूर तालुक्यात २ हजार इतके उद्दिष्ट साध्य झाले आहे. समितीला वाटते अशा प्रकारची आकडेवारी नमूद करुन एकप्रकारे अधिका-यांनी आपली मानसिकता दाखविली आहे. लोकांना एलईडीच्या माध्यमातून माहिती दाखविणे, त्यांना प्रवृत्त करणे या गोष्टी केल्या जात असल्याचे लेखी उत्तरात नमूद केले आहे. समिती जाणून घेऊ इच्छिते की, या चार जिल्ह्यात पाच वर्षामध्ये ८ व्हॅन वापरात असतील तर त्यांची डिप्रीसिएशन कॉस्ट किती आहे अशी पृच्छा समितीने केली . तसेच या परिच्छेदाच्या अनुषंगाने विद्यापीठाने जो लेखी खुलासा सादर केला आहे त्यावर शासनाच्या वतीने ‘ सदर प्रकरणी विद्यापीठ यांनी दिलेला खुलासा समर्पक असल्याचे दिसून येत नाही. ’ असे नमूद केले आहे. या बाबतीत विभागीय सचिवांचे नेमके काय म्हणणे अशी विचारणाही समितीने केली असता कृषी विभागाचा सचिव या नात्याने माझा अभिप्राय आहे की, ज्या कामासाठी व्हॅन वापरावयाची होती त्यासाठी त्या व्हॅनचा वापर केला गेला नाही. समितीचा अभिप्राय विद्यापीठाला दिलेल्या निधीच्या बाबतीत नाही. कारण विद्यापीठाला कृषी विभागाने निधी दिलेला नाही असे प्रतिपादन विभागीय सचिवांनी समितीसमोर केले.

माती परीक्षणासाठी वाहन खरेदी करण्याकरिता कोणत्याही यंत्रणेकडून निधी दिला गेला असला तरी त्या निधीचा योग्य वापर झालेला नाही. यामध्ये महाराष्ट्र शासनाचा निधी वाया गेला आहे, असे समितीचे मत आहे. कारण यातून ज्या उद्देशासाठी व्हॅन घेतल्या होत्या तो उद्देश साध्य झाला नाही. जर २.८० कोटी रुपये किंमतीच्या व्हॅनची डिप्रीसिएशन कॉस्ट काढली तर ती हिशेबानुसार १ कोटी रुपये सुध्दा येणार नाही. गेल्या पाच वर्षात उक्त व्हॅनची किंमत किमान १५ ते २० टक्क्यांनी कमीच झाली असावी. एकंदरीत या संपूर्ण प्रकरणी विद्यापीठाचे ढिसाळ नियोजन कारणीभूत असल्याचे दिसून येत आहे. ज्या उद्देशासाठी व्हॅन उपलब्ध करुन दिली तो उद्देश साध्य न करता अन्य कामे करण्यात आली आहेत. एवढेच नव्हे तर उद्दिष्टाव्यतिरिक्त जी कामे करण्यात आलेली आहे त्या बाबतीत विद्यापीठाकडून जस्टीफिकेशन दिले जात आहे. गत पाच वर्षात २ हजाराचे उद्दिष्ट देखील साध्य झालेले नाही, अशी परिस्थिती आहे. डॉ.पंजाबराव कृषी विद्यापीठाला माती परीक्षण करण्यासाठी व्हॅन उपलब्ध करुन दिली परंतु सदरहू व्हॅन चालविण्यासाठी ज्या बाबी आवश्यक असतात उदाहरणार्थ वाहन चालक, डिझेल, सपोर्टींग स्टाफ किंवा व्हॅनची देखभाल व दुरुस्ती इत्यादींची व्यवस्था केली नाही. मानव विकास मिशनने व्हॅनच्या अनुषंगाने आवश्यक असलेल्या बाबींवर खर्च करण्यासाठी गत पाच वर्षात आवश्यक ते नियोजन का केले नाही अशी विचारणा समितीने केली असता फिरत्या माती परीक्षण प्रयोगशाळा व्हॅन सुरु करण्यासाठी नियोजन विभागाच्या दिनांक १९ जुलै, २०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली होती. नियोजन विभागाने शासन निर्णय ज्या दिवशी निर्गमित केला त्याच दिवशी स्वतंत्र परिपत्रक काढून या अनुषंगाने मार्गदर्शक सुचना निर्गमित केल्या होत्या. कृषी विद्यापीठ आणि कृषी विज्ञान केंद्राच्या माध्यमातून सदरहू माती परिक्षण करावयाचे होते. त्यानुसार कृषी विद्यापीठ आणि कृषी विज्ञान केंद्र यांनी एकत्रितपणे काम सुरु केले. जर सदरहू कामाच्या बाबतची आपण आकडेवारी पाहिली तर इतर जिल्ह्यात या संदर्भात ब-यापैकी काम झाले आहे. केवळ हे चार जिल्हे वगळले तर अन्य जिल्ह्यांमध्ये चांगले काम झाले आहे. महालेखापाल यांनी उक्त चार जिल्ह्यातील व्हॅनच्या बाबतीत लेखा परीक्षणात निरीक्षण नोंदविलेले आहे. हे चारही जिल्हे भात शेतीचे जिल्हे आहेत. या मागे काही कारण असू शकते, यात दुमत नाही. मुळात शेवटी हा व्यवस्थापनाचाच भाग आहे. नियोजन विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार इतर जिल्ह्यात चांगल्याप्रकारे काम होऊ शकते मग या चार जिल्ह्यातच या अनुषंगाने चांगले काम का होत नाही हे पहावयास पाहिजे असे मत प्रधान सचिव,नियोजन विभाग यांनी व्यक्त केले.

नागपूरच्या धान्य बाजार समितीने ५० लाख रुपये खर्च करुन जिल्ह्यात सॅटेलाईटच्या माध्यमातून माती परीक्षण पूर्ण केले. कापूस, भात, सोयाबीन ही लाभप्रद पिके आहेत. विभागाला किती फर्टीलायझर वापरायचे, कोणते पीक लावायचे, कोणत्या ठिकाणी कशी भौगोलिक परिस्थिती आहे या बाबतीत शेतक-यांना प्रवृत्त न केल्यामुळे वा त्यांचे प्रबोधन न केल्यामुळे विभागाचा

उद्देश साध्य झाला नाही. परंतु या ठिकाणी तर कृषी विद्यापीठाच्या माध्यमातून माती परीक्षणाचा उद्देशच साध्य झाला नसल्याचे समितीने निदर्शनास आणले असता, माती परीक्षण करण्यासाठी वाहने चालविण्यात अडचणी येत असल्यास त्यावर पर्याय म्हणून नियोजन विभागाने या संदर्भात दि.१२ जुलै, २०१२ रोजी शासन निर्णय निर्गमित केला. त्यामध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे की, विद्यापीठाला माती परीक्षणासाठी पुरेसा प्रतिसाद मिळत नसेल तर साखर कारखाने, खत कारखाने, कंपन्या किंवा योग्य संस्थांकडे सदरहू काम देऊ शकता. कृषी विद्यापीठ आणि सर्व यंत्रणांना याबाबत त्या काळात कळविण्यात आले होते. धुळे, नाशिक येथे सहकारी संस्थांच्या माध्यमातून ही वाहने चालविण्यात येतात आणि त्या ठिकाणी या अनुषंगाने चांगले काम झालेले आहे. शेवटी हा व्यवस्थापनाचा भाग आहे या भागात चांगल्याप्रकारे व्यवस्थापन करुन आणि सर्व पर्यायांचा विचार करुन काम केले असते तर हा प्रश्न उपस्थित झाला नसता असा खुलासा नियोजन विभागाच्या प्रधान सचिवांनी केला.

या चार जिल्ह्यात कृषी विद्यापीठाने सदरहू काम सहकारी संस्थांकडे देण्याबाबतचा विचार केला होता का ? तसेच सन २०१२ च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने कृषी विज्ञान केंद्राच्या पलीकडे जाऊन इतर संस्थांनी सदरहू काम करण्याबाबतचा प्रस्ताव विद्यापीठाने विचारात घेतला होता काय अशी विचारणा समितीने केली असता, विद्यापीठाच्या माध्यमातून १४ वेगवेगळ्या संस्था आणि शासनाला वेळोवेळी पत्र पाठविले होते. वास्तविक पाहता असे वाटले होते की, मानव विकास मिशनच्या माध्यमातून पुरविण्यात आलेल्या व्हॅनसाठी आवश्यक असलेल्या बाबी त्यांच्याकडून पुरविण्यात येतील असे संचालक,विस्तारीत शिक्षण, पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ समितीस अवगत केले.

विद्यापीठाकडे वर्कींग कॅपिटल नसल्यामुळे उक्त व्हॅन सहकारी संस्थांना वापरासाठी देऊ शकतात, असा शासन निर्णय शासनाने एक वर्षानंतर निर्गमित केला. उक्त सहकारी संस्थांना व्हॅन वापरण्यास देऊ शकता असा शासनाने शासन निर्णय काढला होता. परंतु विभागीय प्रतिनिधीच्या म्हणण्यानुसार केवळ एका जिल्ह्यात माती परीक्षणाचे काम योग्यप्रकारे झालेले नाही. त्यामुळे किमान गोंदिया जिल्ह्याच्या अनुषंगाने विद्यापीठाने सदरहू काम सहकारी संस्थांना देण्याबाबतच्या प्रस्तावाचा विचार केला होता काय अशी विचारणा समितीने केली असता यासंदर्भात माहिती नसल्याचे संचालक,विस्तारीत शिक्षण, पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ समितीस अवगत केले.

केवळ एकाच जिल्ह्यात नव्हे तर चारही जिल्ह्यात माती परीक्षणाचे उद्दिष्ट साध्य झालेले नाही. महालेखापाल यांच्या रेकॉर्डनुसार कोणत्याही जिल्ह्यात काम झाले नसल्याचे समितीने अवगत केले. विभागाने लेखी माहितीमध्ये "मानव विकास मिशनच्या मार्गदर्शक तत्वानुसार राज्य कृषी विद्यापीठाअंतर्गत असलेल्या कृषी विज्ञान केंद्रांनी या व्हॅनचे कामकाज देखभाल व दुरुस्ती केवळ माती परीक्षणातून मिळालेल्या प्राप्तीतूनच करावयाचे आहे." असे नमूद केलेले आहे. जर माती परीक्षणच केले नसेल तर प्राप्ती होणार नाही आणि प्राप्तीच झाली नाही तर मेंटेनन्स सुध्दा होणार नाही या सर्व बाबींना कोण जबाबदार आहे अशी पृच्छा समितीने केली असता सुरुवातीच्या काळात माती परीक्षणाची किंमत केवळ १५ रुपये ठेवली होती असा खुलासा संचालक,विस्तारीत शिक्षण, पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ यांनी केला.

मुळात व्हॅन आल्यानंतर त्यासाठी पेट्रोल, ड्रायव्हर किंवा अन्य सपोर्टींग स्टाफ लागणार होता. परंतु या संदर्भातील विचार व्हॅन देणारा आणि व्हॅन स्वीकारणारा या दोघांनीही केला नसल्याचे समितीने विदित केले असता, विद्यापीठाला वाटले होते की, व्हॅन मिळाल्यानंतर काही प्रमाणात मानव विकास मिशनच्या माध्यमातून मदत करण्यात येईल परंतु तसे झाले नसल्याचा खुलासा संचालक,विस्तारीत शिक्षण, पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ यांनी केला.

सदरहू चार जिल्हे सोडून अन्य जिल्ह्यांमध्ये काय परिस्थिती आहे ? सदरहू व्हॅन चालविण्यासाठी विभागाची काय भूमिका आहे ? सदरहू व्हॅन कृषी विभाग चालविणार, डॉ.पंजाबराव कृषी विद्यापीठ चालविणार की मानव विकास मिशनमधून सर्व व्यवस्था उभी करुन त्या माध्यमातून चालविणार आहे अशी विचारणा समितीने केली असता, मुळात जी मालमत्ता उपलब्ध असते तिचा वापर झालाच पाहिजे. विद्यापीठाचे संचालक म्हणतात की, व्हॅन व्यवस्थित करुन दिली असून ती चालविण्यायोग्य आहे. शासनाने त्यांना सांगितले की, विद्यापीठाने माती परीक्षणाबाबत शासनाकडून उद्दिष्ट निश्चित करुन घ्यावे. केंद्र शासनाने दोन वर्षापासून शाश्वत शेती योजनेचा कार्यक्रम सुरु केला आहे. शेतक-यांच्या जमिनींचे माती परीक्षण करुन घेणे आणि त्यांना परीक्षण अहवाल देणे ही योजना सुरु केली आहे. त्यानुसार विद्यापीठाने चारही जिल्ह्याचे उद्दिष्ट घेऊन त्याचे पैसे शासनाकडून घ्यावेत. परंतु विद्यापीठाचे म्हणणे आहे की, हा पैसा कमी पडेल आणि या संदर्भातील खर्च त्यांना परवडणार नाही. वास्तविक पाहता विद्यापीठाचे वार्षिक उत्पन्न साधारणतः १० कोटी रुपये असते. विद्यापीठाचा कल असा आहे की, कोणतीही योजना आली

तर ती योजना राबविण्यासाठी स्टाफ उपलब्ध करुन घेऊ असे विद्यापीठाकडून सांगितले जाते. परंतु सदरहू योजना राबविण्यासाठी तदानुषंगिक खर्च केल्यानंतर सांगितले जाते की, आता योजना राबविण्यात निधीची अडचण आहे. प्रकल्प अहवाल व्हायबल आहे की नाही हे न पाहता, भांडवली गुंतवणूक करण्याकडे विद्यापीठाचा कल आहे अशी माहिती कृषी विभागाच्या सचिवांनी दिली.

विद्यापीठाने व्हॅन खरेदी करण्याचा प्रस्ताव मानव विकास मिशनकडे दिला आहे काय ? याबाबत सांगताना संचालक,विस्तारीत शिक्षण, पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ यांनी समितीस असे अवगत केले की, मानव विकास मिशनकडून याबाबत विचारणा करण्यात आली होती. विद्यापीठाचा मानस होता की, माती परीक्षणामुळे शेतक-यांचे कल्याण होईल आणि विद्यापीठाला मानव विकास मिशनकडून इतरही मदत मिळेल. या माध्यमातून विद्यापीठाला एक प्रकारे चांगले काम करण्याची संधी मिळणार होती.

मुळात नियोजनाअभावी निर्णय घेणे चुकीचे वाटत नाही काय ? प्रत्येकी ३५ लाख रुपये किंमतीची व्हॅन घेतली म्हणजे विषय संपला असे होत नाही. जर व्हॅन पाच-पाच वर्षे फिरत असेल तर त्याची डिप्रीसिएशन कॉस्ट किती होईल ? गोंदिया इथल्या व्हॅन सारखी परिस्थिती अन्य तीन-चार जिल्ह्यातील व्हॅनची असेल, असे समितीला वाटते. शिवाय विभागाने जे स्पष्टीकरण केले आहे ते केवळ गोंदिया जिल्ह्यापुरते न देता चारही जिल्ह्यांच्या बाबतीत दिलेले आहे. सदरहू व्हॅन कृषी प्रदर्शनात दाखविली जाते असे नमूद केले. जर विद्यापीठाकडून माती परीक्षण विनामूल्य करण्यात येत असेल तर कोणताही शेतकरी त्यास नकार देणार नाही असे मत समितीने व्यक्त केले असता, व्हॅन चालविण्याचा खर्च विद्यापीठाकडून केला जात आहे तसेच वाहन चालकाचा सुध्दा खर्च केला जात आहे. परंतु हा खर्च ज्या योजनेतून करतात ती योजना आणि माती परीक्षण या दोन्ही बाबींची सांगड घातली असती तर ही परिस्थिती उद्भवली नसती असा खुलासा कृषी विभागाच्या प्रधान सचिवांनी केला.

संपूर्ण कामात ढिसाळ नियोजन झालेले असल्याचे मत समितीने व्यक्त केले.यासंदर्भात विभागाचे मत काय आहे अशी विचारणा समितीने केली असता, नियोजन विभागाच्या मानव विकास अहवालावर विद्यापीठाची एम.सी.ए.आर. ही एक संस्था आहे. त्या संस्थेच्या कृषी परिषदेमध्ये सदर विषय घेण्यात येईल. या विषयाबाबत जाबाबदारी निश्चिती आणि ही योजना पुढे चालू ठेवण्यासाठी काय उपाय योजना करता येतील, त्याचा अभ्यास करण्यात येईल असा खुलासा कृषी विभागाच्या प्रधान सचिवांनी केला. तसेच सदर व्हॅनमध्ये माती परिक्षण करण्यासाठी खूप मोठया प्रमाणावर अडचणी येत आहेत. विशेषतः ग्रामीण भागामध्ये एन.पी.के. करु शकतो परंतु इतर मायक्रोन्युट्रीयन्स करावयाचे झाले तर ते व्हॅनच्या माध्यमातून करणे शक्य होत नाही त्या मातीचे नमुने प्रयोगशाळेमध्ये आणून तपासावे लागतात अशी माहिती संचालक,विस्तारीत शिक्षण, पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ यांनी समितीस अवगत केले.

सदर व्हॅन जर इतर जिल्ह्यामध्ये पाठविली असतील तर त्या जिल्ह्यांना त्या व्हॅनचा उपयोग झाला असता.जर व्हॅनमध्ये मातीचे नमुने तपासता येणे शक्य नसेल तर Why we are having this laboratory? You should collect the samples from the places and test it in laboratory. माती परीक्षण व्हॅन घेऊन माती पुन्हा प्रयोगशाळेमध्ये आणून तपासण्याची काय आवश्यकता आहे? जर मातीचे नमुने प्रयोगशाळेमध्येच तपासावयाचे असतील तर फिरत्या व मोबाईल लॅबोरेटरी व्हॅनची आवश्यकता काय आहे अशी विचारणा समितीने केली असता, भात पिकविणा-या क्षेत्रामध्ये मोठया प्रमाणात एन.पी.के. करण्यात येते. परंतु मातीमधील इतर मायक्रोन्युट्रीयन तपासावयाचे असतील तर मोबाईल टेस्टींग व्हॅनचा फारसा उपयोग होत नसल्याचे संचालक, विस्तारीत शिक्षण, पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ यांनी समितीस सांगितले.

जर मोबाईल टेस्टींग व्हॅनचा उपयोग होत नसेल तर सदर व्हॅन खरेदी करण्याची आवश्यकता काय होती ? व्हॅनची अवस्थादेखील पाच वर्षाच्या काळामध्ये खराब झालेली आहे. व्हॅनसाठी दोन कोटी ८० लाख रुपये खर्च झालेला आहे. या दोन कोटी ८० लाख रुपयांची जबाबदारी निर्धरित करण्यात यावी. त्याचबरोबर व्हॅन खरेदी करतेवेळी आवृत्ती खर्च आणि अनावृत्ती खर्चाचे नियोजन का करण्यात आलेले नाही ? किंवा पी.के.व्ही.ने व्हॅनचा संपूर्ण खर्च करण्यासाठी संमती दिली होती का ? जर पी.के.व्ही. ने व्हॅनची जबाबदारी घेतली असेल तर पी.के.व्ही. व्हॅन स्क्रॅप करण्यासाठी जबाबदार आहे. परंतु पी.के.व्ही. आता सांगत आहे की, लॅबोरेटरी व्हॅनचा उपयोग करीत नाही याबाबत समितीला माहिती देण्यात यावी असे समितीने सूचित केले असता, ज्या वेळेस सदर योजना सुरु झाली, त्यावेळेस ही योजना जिल्हाधिकारी यांच्या अधिपत्याखालील जिल्हा मानव विकास समितीमार्फत चालविण्याचे ठरले होते. त्यावेळेस या व्हॅनला तांत्रिक मंजूरी देऊन सदर व्हॅनचा प्रस्ताव जिल्हाधिकारी

कार्यालयाकडे पाठविण्यात आला होता. जिल्हाधिका-यांनी त्या प्रस्तावाला तांत्रिक मान्यता देऊन निधी वितरीत केलेला आहे. त्यामुळे त्यांनी पी.के.व्ही. सदर योजना चालवेल असे सांगितले असल्याचे आयुक्त, मानव विकास मिशन यांनी समितीस सांगितले.

असे असेल तर जिल्हाधिकारी यांनी निर्णय घ्यावयास पाहिजे होता. जर पी.के.व्ही. ने व्हॅन चालविण्यास सहमती दिली आणि जिल्हाधिकारी कार्यालयाने पी.के.व्ही.ला व्हॅन हस्तांतरीत केली तर जिल्हाधिकारी कार्यालयसुध्दा यासाठी जबाबदार आहे. या विषयाबाबत विभागाकडून समितीला समर्पक उत्तर देण्यात यावे. जर विभागाकडे या विषयाबाबत समर्पक उत्तर नसेल तर समितीला विभागावर ताशेरे ओढावे लागतील. तसेच विभागाकडील असलेल्या आठही गाडयांचे ऑडीट करण्यात यावे. सदर गाड्यांची सध्याची किंमत काढावी आणि महालेखापालांनी जी आकडेवारी सांगितलेली आहे ती जर विभागाला पुन्हा तपासावयाची असेल तर त्या आकडेवारीची पडताळणी करावी आणि त्यानंतर महालेखापालांकडून या विषयाबाबत पुन्हा व्हेटींग करण्यात यावी. तसेच, चारही जिल्ह्यामध्ये या योजनेसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाने खर्चाची व्यवस्था केलेली आहे काय ? हे पहावे. तसेच, ज्या जिल्ह्यामध्ये अशा प्रकारची व्हॅनद्वारे माती तपासणी सुरु आहे, त्या ठिकाणी खर्चाची काय व्यवस्था आहे याबाबत समितीने विचारणा केली असता, इतर जिल्ह्यामध्ये अशा प्रकारची व्हॅन सुरु असून त्याठिकाणी असलेल्या वाहनचालकांच्या माध्यमातून सदर व्हॅन फिरविण्यात येत असून एन.पी.के.च्या सहाय्याने माती परीक्षण करण्यात येत आहे. तसेच गोंदिया जिल्ह्यामध्ये १००० च्या जवळपास माती परीक्षण करण्यात आलेले आहे. मागील तीन वर्षापासून सदर व्हॅन बंद होत्या परंतु इतर ठिकाणी व्हॅन सुरु असून माती परीक्षणाचे काम सुरु असल्याचा खुलासा संचालक, विस्तारीत शिक्षण, पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ यांनी केला. तसेच सदर व्हॅन चालविण्यासाठी पेट्रोल व डिझेलचा खर्च विद्यापीठाच्या कृषी विज्ञान केंद्राच्या निधीमधून करण्यात येत असल्याचे समितीस अवगत केले.

या सर्व व्हॅनचे ऑडीट करण्यात यावे महालेखापालांनी काढलेल्या आक्षेपांवर पुढील पंधरा दिवसाच्या आत समितीला अहवाल सादर करण्यात यावा. या विषयाबाबत मानव विकास विभागाची भूमिका ही व्हॅन खरेदीपर्यंत होती. यापुढील भूमिका जिल्हाधिकारी कार्यालय किंवा पी.के.व्ही. यांनी बजावली नाही, ही वस्तुस्थिती आहे. तरीसुध्दा सदर व्हॅनची आजची किंमत काय आहे, हे पाहावे. पी.के.व्ही. यांनी सांगितल्याप्रमाणे प्रयोगशाळेमध्ये माती परीक्षण करण्यात येते त्याप्रमाणे या सर्व गोष्टींचा आढावा घेऊन महालेखापालासोबत व्हेटींग करण्यात यावी आणि त्याबाबतचा अहवाल समितीला पंधरा दिवसाच्या आत सादर करण्यात यावा असे समितीने विभागास सांगितले असता, मानव विकास विभागामध्ये जे प्रकल्प मंजूर होतात त्या मंजूरीच्या कार्यपध्दतीचा पुनर्विचार होण्याची आवश्यकता आहे. कारण ज्या विभागाशी संबंधीत प्रकल्प मंजूर होतात, जसे की, मुल्यांकन कशा प्रकारे करण्यात येते, व्हायबिलीटी कशा प्रकारे तपासण्यात येते, त्यांची अंमलबजावणी कशी करण्यात येते, याबाबत कोणत्याही प्रकारची कल्पना नसते. जिल्हाधिकारी स्तरावर मंजूर करण्यात आलेल्या प्रकल्पाची पुनर्मुल्यांकन करण्याची पात्रता आहे किंवा नाही, हे पाहण्याची आवश्यकता असल्याचे कृषी विभागाच्या प्रधान सचिवांनी समितीस अवगत केले.

मानव विकास विभागाने कोणत्याही योजनेचा जिल्हाधिकारी स्तरावर निर्णय घेत असताना संबंधीत विभागाची मान्यता घेणे आवश्यक आहे आणि याबाबतची आवश्यक दक्षता नियोजन विभागाने घ्यावयास पाहिजे असे समितीने सूचित केले असता, नियोजन विभागाने या संदर्भात स्पष्ट मार्गदर्शक सूचना प्रसारित केल्या होत्या. सदर सूचनांची अंमलबजावणी करीत असताना कृषी विद्यापीठ किंवा जिल्हाधिकारी स्तरावर जर काही कमतरता राहिली असेल तर त्याबाबतची पडताळणी करण्यात येऊन, त्याबाबतचा अहवाल समितीला सादर करण्यात येईल. परंतु मार्गदर्शक सूचनामध्ये किंवा कृषी विभागाशी केलेल्या चर्चेमध्ये कमतरता राहिली असेल, असे वाटत नाही याचे कारण असे की, विभागाने या विषयाबाबत स्वयंस्पष्ट सूचना प्रसिध्द केलेल्या आहेत असा खुलासा नियोजन विभागाच्या प्रधान सचिवांनी केला.

जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्रस्ताव परस्पर विभागाला प्राप्त झाला आणि तो विभागाच्या सहमतीशिवाय मंजूर करुन घेण्यात आला, त्यानुषंगाने खर्चाची उपयोगिता, अंमलबजावणी या सर्व बाबींचा विचार करीत असताना संबंधीत विभागाची सहमती घेऊन कार्यवाही केली पाहिजे, अशी समितीची अपेक्षा असल्याचे विदित केले असता मुल्यमापनाबाबत आवश्यक असलेली कार्यवाही करण्यात येईल असे कृषी विभागाच्या प्रधान सचिवांनी समितीस आश्वासित केले.

**अभिप्राय व शिफारशी :-**

**परिच्देक क्र. ३.१ 'महाराष्ट्रात कृषि पिक विमा योजनेची अंमलबजावणी'**

**परिच्छेद क्र. ३.१.२ 'शासकीय स्तरावर योजनांची अंमलबजावणी'**

**परिच्छेद क्र. ३.१.२.१ 'विमाक्षेत्र घटक म्हणून ग्रामपंचायतींचा अवलंब न करणे'**

**अभिप्राय**

**२.३** महाराष्ट्रात कृषि क्षेत्र नेहमीच अर्थव्यवस्थेचा एक केंद्रबिंदू असून विविध प्रतिकूल परिस्थितीत जसे अपूरा पाऊस, अतिवृष्टी, गारपीट, कीटकांचा उद्रेक, रोगराई इत्यादीमुळे होणा-या कृषि उत्पादनाच्या नाशाची शेतक-यांना नुकसान भरपाई करण्याच्या उद्देशाने राज्यात विविध केंद्र पुरस्कृत कृषि पिक विमा योजना राबविण्यात येतात. ज्यात सुधारीत राष्ट्रीय कृषि पिक विमा योजना व हवामानावर आधारीत पिक विमा योजना हे दोन घटक समाविष्ट आहेत. महाराष्ट्रात सुधारीत राष्ट्रीय कृषि पिक विमा योजनेची अंमलबजावणी झाली नाही. तसेच हवामानावर आधारीत पिक विमा योजनेची अंमलबजावणी झाली, जी कर्जदार शेतक-यांसाठी अनिवार्य होती आणि बिगर कर्जदार शेतक-यांसाठी ऐच्छिक होती. या योजनेची अंमलबजावणी शासकीय स्तरावरुन करताना विमाक्षेत्र घटक म्हणून ग्रामपंचायतीचा अवलंब करण्याबाबत मार्गदर्शक सूचना असताना त्याचा अवलंब न केल्यामुळे दाव्यांचे निर्धारण, प्रदान हे चुकीचे, दोषपुर्ण व वास्तववादी नव्हते. परिणामी राज्यात योजनांच्या अंमलबजावणीनंतर १५ वर्षाचा कालावधी लोटल्यानंतरही महाराष्ट्र शासन अजूनही ग्रामपंचायत स्तरापर्यंत पोहचले नाही. महाराष्ट्रात ग्रामपंचायती ऐवजी मंडळास क्षेत्र घटक म्हणून गणले जात असून मंडळात अनेक गावे समाविष्ट आहेत. ज्यापैकी इच्छेप्रमाणे/यादृच्छिकपणे (randomly) निवडलेल्या काही गावांत पीक कापणी प्रयोग करण्यात आले आणि नंतर हे वास्तविक उत्पन्न मंडळातील सर्व गावांसाठी अवलंबिण्यात आली. या पध्दतीमुळे एक तर योग्य गावे वगळण्यात आली अथवा मंडळातील ती गावे जी कोणत्याही दाव्यांमध्ये बसत नाहीत त्यांचा अंतर्भाव होतो. यासंदर्भात महालेखाकारांसमवेत झालेल्या निर्गमन परिषदेत राज्य शासनाने ही वस्तुस्थिती मान्य केली. तसेच महाराष्ट्रात अनेक प्रकारची पिके घेण्यात येत असल्यामुळे या योजनेची अंमलबजावणी ग्रामपंचायत स्तरावर केली तर पिक कापणी प्रयोगांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढू शकते. तथापि, या बाबींचे निराकरण करण्यासाठी चार पथदर्शक प्रकल्प राबविण्यात येत असून रिमोट सेंन्सींग टेक्नॉलॉजी आणि सॅटेलाईट प्रतिमेचा संभाव्य उपयोग या बाबींचा अवलंब करण्यात येत आहे व याची अनुकूलता साध्य झाली की ग्रामपंचायतीना अधिसूचीत करण्याबाबतची कार्यवाही विभागामार्फत करण्यात येईल असेही विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले. राष्ट्रीय कृषि पिक विमा योजनेंतर्गत सरासरी उत्पन्न आणि उंबरठा उत्पन्न परिगणित करताना पिक कापणी प्रयोगांप्रमाणे निर्धारीत केलेले प्रतिहेक्टर पिक उत्पन्न उपयोगात आणले जाते. चालू असलेल्या हंगामाचे प्रत्यक्ष उत्पन्न जर मंडळातील उंबरठा उत्पन्नापेक्षा कमी असेल तर त्या मंडळातील गावांतील शेतक-यांना नुकसान भरपाईची रक्कम देय राहते. त्याचप्रमाणे हवामानावर आधारीत पिक विमा योजना अंतर्गत देय रकमेचे निर्धारण आणि निपटारा स्वयंचलित हवामान स्टेशनवर उपलब्ध हवामानाच्या माहितीनुसार करण्यात येते. हवामान सूचकांक मुल्य जर अधिसूचित ट्रीगर उत्पन्न मुल्यापेक्षा जास्त किंवा कमी असेल तर हे दावे राज्य शासनाद्वारे संदर्भ घटक क्षेत्रासाठी अधिसूचित टर्मशिटनुसार परिगणित करुन शेतक-यांना प्रदान करणे आवश्यक ठरते. अशाप्रकारे अस्तित्वात असलेल्या कार्यपध्दतीनुसार शेतक-यांना नुकसान भरपाई होत असून त्याचआधारे त्यांचे पिक विम्याचे दावे निकाली काढण्यात येतात. अशा परिस्थतीत दाव्यांचे निर्धारण हे अचूक व वास्तववादी असण्याची नितांत आवश्यकता आहे. तरच या योजनेचा लाभ गुणवत्तेनुसार गरजू शेतक-यांना जास्तीत जास्त प्रमाणात देता येणे शक्य आहे. परंतु पिकांच्या नुकसानीचे निर्धारण करताना ही योजना ग्रामपंचायत स्तरावर न राबविता महसूल मंडळ स्तरावर राबविण्यात येते. यासाठी आवश्यक असणारी महसूली यंत्रणा देखील या कामासाठी अपूरी पडते व अपू-या महसूली यंत्रणेमुळेच ही योजना महसूल मंडळ स्तरापर्यंतच राबविण्यात येते. परिणामी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेचे उल्लंघन तर होतेच शिवाय शेतक-यांच्या पिकाच्या नुकसानीनुसार विम्याचे निर्धारण अचूकरित्या झाल्याची शाश्वती नसते, ज्यामुळे अंतिमतः नुकसान शेतक-यांचेच होते. सद्यःस्थितीत आधुनिक तंत्रज्ञानाच्या या युगात नुकसान निर्धारणाच्या कामासाठी अधिकाधिक अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करणे विभागाला शक्य असताना त्याचा देखील अभाव या योजनेच्या अंमलबजावणीत निश्चितच दिसून येतो. मुळातच तापमानातील बदलामुळे एकाच ग्रामपंचायत हद्दीमध्ये देखील वेगवेगळ्या शेतक-यांच्या पिकांच्या नुकसानीमध्ये मोठ्या प्रमाणात तफावत असताना हे नुकसानीचे निर्धारण महसूल मंडळ स्तरावरुन सरसकट केल्यास हे निर्धारण अचूक होण्याची शाश्वती नसते. परिणामी योग्य लाभार्थ्यांपर्यंत या

योजनेचा लाभ निश्चितच पोहोचू शकणार नाही. हे प्रयोग ग्रामपंचायत स्तरावर केल्यास मोठ्या प्रमाणात मनुष्यबळ लागणार ही वस्तुस्थिती आहे. तरीही या योजनेचे लाभ जास्तीत जास्त शेतक-यांपर्यंत गुणवत्तेनुसार पोहोचावेत व त्या माध्यमातून शेतक-याला जास्तीत जास्त संरक्षण मिळण्यासाठी या अत्यावश्यक उपाययोजना करणे अत्यावश्यक असून कोणत्याही परिस्थितीत ते ऐच्छिक असू शकत नाही. त्यासाठी कमीत कमी मनुष्यबळाचा वापर करुन जास्तीत जास्त आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन हे काम अधिक गुणवत्तेनुसार करण्याचे नियोजन विभागानेच करणे आवश्यक आहे व शेतक-यांना या योजनेचा जास्तीत जास्त अचूक लाभ व संरक्षण देण्याच्या उद्दीष्टामध्ये कोणतीही तडजोड होता कामा नये असे समितीचे स्पष्ट मत आहे. मनुष्यबळ व प्रशासकीय यंत्रणेच्या अभावामुळे सद्यःस्थितीत पिक कापणी प्रयोगासाठी अवलंबिण्यात येत असलेली कार्यपध्दती ही त्रुटीपुर्ण व दोषपुर्ण असून नुकसानीचे निर्धारण अचूक होत नाही. शिवाय यामुळे पात्र शेतकरी या योजनेतून वगळला जातो व सरसकट निर्धारणामुळे पात्र नसलेला अथवा नुकसान न झालेला शेतकरी देखील त्यात समाविष्ट होतो. पिकांच्या नुकसानीचे निर्धारण करतेवेळी कित्येकदा प्रत्येक शेतात जाऊन हे निर्धारण करणे शक्य नसल्यामुळे तालुक्याच्या ठिकाणी बसूनच अंदाजित निर्धारण करण्यात येते. त्यातही विभागाकरीता पिक कापणीपेक्षा जास्त गंभीर व अडचणीची बाब म्हणजे क्षेत्र निर्धारण ही आहे. सद्यःस्थितीत क्षेत्राची अचूकता काढणे हे फार अवघड व अडचणीचे आहे. पिकांचा विमा हा तलाठ्याच्या दाखल्यावरुन काढला जातो, ज्यावर विम्याचा हप्ता भरण्यात येतो व कापणी प्रयोग देखील झालेला असतो. परंतु अनेकदा महसूली दस्तावेजामध्ये ते क्षेत्र ना-पेर म्हणून नमूद असल्यामुळे शेतक-यांची अडचण होते व ते लाभापासून वंचित राहतात. विमा संरक्षित केलेले क्षेत्र व सात-बाराध्ये नमूद क्षेत्रामध्ये तफावत असल्यामुळे नुकसान भरपाईचे निर्धारण अचूकरित्या होण्यास अडचणी येतात. अशा परिस्थितीत क्षेत्राच्या अचूकतेचे निर्धारण प्राधान्याने व अचूकपणे करणे आवश्यक आहे. कित्येकदा पिक कापणी प्रयोगानुसार येणारा अहवाल आणि नजर आणेवारीतून आलेला अहवाल यामध्ये तफावत असते. आणेवारी कमी जास्त दाखविल्यामुळे शेतक-यांना द्यावयाच्या लाभाची व सुविधांची जबाबदारी ही थेट शासनावर पडत असल्यामुळे देखील ही आणेवारी गुणवत्तेवर व वस्तुस्थितीदर्शक निघेलच याची शाश्वती नसते. मुळात पिक कापणी प्रयोग व पिक विम्याची अंमलबजावणी ही कृषि खात्यामार्फत करण्यात येते. परंतु आणेवारीचे निर्धारण व द्यावयाची मदत हे महसूल तसेच मदत व पुनर्वसन खात्यामार्फत निश्चित करण्यात येते. या अस्तित्वात असलेल्या कार्यपध्दतीमुळे देखील योजनेच्या अंमलबजावणीत निश्चितच अडचणी निर्माण होत असून समन्वयाचा अभाव राहतो व अचूकतेचे प्रमाण देखील कमी राहते. या सर्व बाबींचे शासनाने नियोजन करुन शेतक-यांना अधिकाधिक या योजनेचा लाभ मिळण्यासाठी प्रयत्न करण्याची निश्चितच आवश्यकता असल्याचे समितीचे स्पष्ट मत आहे.

**शिफारस**

**२.४ महाराष्ट्रात कृषि पिक विमा योजनेची अंमलबजावणी करताना साधन सामुग्रीच्या व्यवस्थापनातील त्रुटी आणि अनियमितता, औचित्य व मितव्ययिता यासंबंधी असलेल्या मापदंडांचे पालन न करणे तसेच कृषि पिक विमा योजनेची शासकीयस्तरावर अंमलबजावणी करताना केंद्र शासनाद्वारे विहित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार ही अंमलबजावणी करणे आवश्यक होते. त्याअनुषंगाने राष्ट्रीय कृषि पिक विमा योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार योजनेच्या अंमलबजावणीच्या तारखेपासून जास्तीत जास्त ३ वर्षाच्या आत या योजनेत सहभागी होणा-या प्रत्येक राज्याने योजनेचे विमाक्षेत्र घटक म्हणून ग्रामपंचायत स्तरापर्यंत पोहोचणे आवश्यक होते. विमाक्षेत्र घटक जर ग्रामपंचायत असेल तर राज्यांतर्गत काढण्यात आलेले वास्तविक उत्पन्न, सरासरी उत्पन्न व उंबरठा उत्पन्न जास्त अचूक असू शकते. ज्यात हानीचे निर्धारण अधिक वास्तववादी राहून शेतक-यांचे दावे गुणवत्तेवर निकाली काढणे शक्य होवू शकते. राष्ट्रीय कृषि विमा योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार विमाक्षेत्र घटक म्हणून ग्रामपंचायतीचा अवलंब करणे हे राज्यांवर ऐच्छिक नसून बंधनकारकच आहे.त्याआधारे राज्य शासनाने शासन निर्णय देखील निर्गमित केलेला असताना त्याची अंमलबजावणी मात्र राज्यात होत नाही ही वस्तुस्थिती आहे. पिकांची आणेवारी दरवर्षी काढणे आवश्यकच आहे परंतु ती मंडळनिहाय काढल्यामुळे नुकसानीचे निर्धारण सरसकट करण्यात येते. मंडळाचे क्षेत्र हे मोठे असून त्याच्या एका भागात पाऊस पडतो तर दुस-या भागात पाऊस पडत नाही. त्यामुळे झालेल्या नुकसानीमध्ये मंडळांतर्गत देखील मोठ्या प्रमाणात तफावत दिसून येत असून नुकसानीचे निर्धारण सरसकट समानरित्या काढण्यात येते. त्याचप्रमाणे सर्वच प्रकारच्या पीकांसाठी आणेवारी ठरविण्याचे नियम व निकष समानच असल्यामुळे पीकनिहाय क्षेत्रफळ व आणेवारीची निश्चिती अचूकरित्या होत नाही. परिणामी शेतक-यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. वेगवेगळ्या पिकांसाठी आणेवारीचे नियम व निकष वेगवेगळे असले पाहिजेत व आणेवारीची निश्चिती ही ग्रामस्तरावरुन करण्यासंदर्भातील निर्णयाची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. त्यासाठी आवश्यक असणा-या सर्व बाबींचे नियोजन विभागाने करावे. सदरहु निर्णयाची**

**अंमलबजावणी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात मनुष्यबळाची आवश्यकता निश्चितच आहे. अशाच प्रकारच्या कामांची व्यापक व्याप्ती असलेल्या कामांसाठी शासनाने सामाजिक न्याय विभाग, अन्न व नागरी पुरवठा विभागांना वेळोवेळी मनुष्यबळ उपलब्ध करुन दिलेले आहे. त्याचप्रमाणे शासनाने ग्रामस्तरावरुन या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा उपलब्ध करुन द्यावी. हे काम वर्षभर चालणारे काम नसून काही ठराविक कालावधीमध्येच होत असल्यामुळे कायमस्वरुपी मनुष्यबळ व पदांची आवश्यकता या कामांसाठी नाही. अतः अन्य विभागांमधून तात्पुरत्या स्वरुपात विशिष्ट कालावधीसाठी हे मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याच्या पर्यायांचा शासनाने विचार करावा. पिकांची आणेवारी व नुकसानीचे निर्धारण या कामांची राज्यभर असलेली व्याप्ती व तातडी लक्षात घेता तसेच हा विषय तीन वेगवेगळ्या विभागांमार्फत हाताळण्यात येत असल्यामुळे प्रभागांची व कामांची विभागणी करुन हे काम कालबध्द पध्दतीने करणेबाबत तीनही विभागांनी एकत्रितपणे आढावा घेवून योग्य तो समन्वय साधून निश्चित आराखडा तयार करुन त्याची तंतोतंत अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे. नविन व्यवस्थेप्रमाणे दुष्काळ जाहीर करण्यासाठी सूचकांक, आर्द्रता, पर्जन्यमान इ. बाबींच्या आधारावर तो जाहीर करण्यात येतो. सर्व प्रकारच्या पिकांसाठी हे निकष सरसकट लावल्यामुळे शेतक-यांसाठी हे नियम व निकष अन्यायकारक ठरत असून त्यात शेतक-यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. अतः शासनाने आणेवारी ठरविण्याची पध्दत, निकष व नियम हे पीकनिहाय करणेबाबत देखील योग्य तो निर्णय शासनस्तरावरुन घेण्यात यावा.कृषि पिक विमा योजनेची अंमलबजावणी केंद्र शासनाने विहित केलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणेच करण्यात यावी. राज्य शासनाने ग्रामपंचायतींना विमाक्षेत्र घटक म्हणून अंमलात आणण्यासाठी योग्य ते पाऊल उचलावे, जेणेकरुन उंबरठा उत्पन्नाचे निर्धारण जास्त अचूकरित्या होऊ शकेल आणि विमा दाव्यांचे निर्धारण व अदायगी वास्तववादी असेल. विमाक्षेत्र घटक म्हणून ग्रामपंचायतीचा अनिवार्यरित्या अवलंब करण्यात यावा. जेणेकरुन हानीचे निर्धारण अधिक अचूक व वास्तववादी होऊन शेतक-यांचे दावे गुणवत्तेनुसार व वस्तुतः झालेल्या नुकसानीवर निकाली काढण्यात यावेत. अनेकदा पिक शेतात तयार झाल्यानंतर झालेल्या पाऊसामुळे पिकाचा दर्जा घसरतो किंवा पिक कापून शेतात ठेवल्यानंतर अतिवृष्टीमुळे पिकाचे नुकसान होते. जास्तीत जास्त शेतक-यांच्या बाबतीत याच बाबी घडलेल्या असताना नुकसानीचे मुल्यांकन व नुकसानीची भरपाई करतेवेळी अशा बाबींचा समावेश नसल्यामुळे त्याची भरपाई मिळत नाही. विम्यांतर्गत कव्हरेज करताना निश्चित करावयाच्या बाबींसंदर्भात अधिक वास्तववादी व वस्तुतः येणा-या अडचणींच्या अनुषंगाने अनेक बाबी संरक्षणामध्ये समाविष्ट करणे आवश्यक असताना त्यापध्दतीने त्याचे नियोजन होत नसल्यामुळे झालेल्या नुकसानीची गणना करताना मोठ्या प्रमाणात अडचणी येतात. अशावेळी नुकसानीचे स्वरुप, प्रमाण, नापेर क्षेत्र, नर्सरी खर्च या सर्व बाबींचा गांभीर्याने विचार करुनच विम्याच्या संरक्षणामध्ये त्याचा समावेश करण्याची आवश्यकता आहे. यासाठी आवश्यक असणारे मनुष्यबळ शासनाने उपलब्ध करुन द्यावे.या कामासाठी अधिकाधिक आधुनिक व अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करुन हे विमाक्षेत्र व आणेवारी निश्चित करावी. विमा संरक्षित क्षेत्र, सातबारा उता-यावरील नोंदी व अन्य महत्वाचे महसूली दस्ताऐवजांमधील तफावती दूर करुन ते ऑनलाईन पध्दतीने या योजनेशी व प्रक्रियेशी जोडण्यात यावे. यासाठी महसूल विभाग, मदत व पुनर्वसन विभाग, कृषि विभाग या विभागांतर्गत योग्य ते समन्वय साधण्यात यावेत अन्यथा या संपुर्ण योजनेच्या अंमलबजावणीची व आणेवारी निश्चितीची जबाबदारी एकच विभागाकडे ठेवण्यात यावी व विविध प्रतिकूल परिस्थितीशी झुंज देवून शेतकरी शेतात अव्याहतपणे काम करुन उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न करीत असताना नैसर्गिक आपत्तीमुळे शेतक-यांच्या झालेल्या नुकसानीमुळे कृषि पिक विमा योजनेच्या माध्यमातून शेतक-यांना अधिकाधिक नुकसान भरपाई, लाभ व संरक्षण मिळण्यासाठी विभागाने आवश्यक ते सर्व प्रयत्न करावेत व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्र. ३.१.२.२ "शासन अधिसूचना निर्गमित करण्यास विलंब"**

**अभिप्राय**

**२.४** जुलै,१९९९ च्या राष्ट्रीय कृषि विमा योजनेच्या मार्गदर्शक सूचना आणि हवामानावर आधारीत पिक विमा योजनेतील (WBCIS) घटकासाठी राष्ट्रीय पिक विमा कार्यक्रमाच्या(NCIP)मार्गदर्शक सूचनांनूसार राज्य शासनाने, प्रत्येक पीक हंगामाच्या सुरुवातीला, पिक विम्यासाठी असलेल्या राज्यस्तरीय समितीच्या (SLCCCI) बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार हंगामातील पिके आणि विमा क्षेत्र घटक अधिसूचित करणे आवश्यक आहे. परंतु राष्ट्रीय कृषि विमा योजनेसंबंधी पिके आणि विमा क्षेत्र घटक अधिसूचित करणारे रब्बी हंगाम आणि खरीप हंगामाचे शासन निर्णय पाच ते सतरा दिवसांच्या विलंबाने जारी करण्यात आले. तसेच WBCIS (फलोत्पादन) संदर्भात अंबीयाबहारचे शासन निर्णय १६ ते ६४ दिवसांच्या विलंबाने जारी करण्यात आले. पीक

विमा चक्र यामध्ये अधिसूचना जारी करणे ही पहिली पायरी असल्याने या संदर्भातील विलंबामुळे शेतक-यांना विमा योजनांमध्ये सहभागी होण्यासाठी कमी वेळ मिळाला असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांच्या परिच्छेदात नोंदविलेले आहेत. विभागाने झालेल्या विलंबाबाबतची वस्तुस्थिती देखील मान्य केली. पिक विमा योजनेच्या अंमलबजावणीसाठी अधिसूचित करावयाच्या बाबींसाठी विलंब झाल्यामुळे निश्चितच शेतक-यांना विमा योजनांमध्ये सहभागी होण्यास कमी कमी कालावधी उपलब्ध झाला. परिणामी तुलनेने बाधित शेतक-यांची संख्या देखील कमी झाली. विभागाच्यास्तरावर राबवावयाच्या प्रशासकीय बाबींसाठी अशाप्रकारे विलंब लावल्यास शेतक-यांना अनुज्ञेय असणारा कालावधी कमी प्राप्त होतो जे कोणत्याही परिस्थितीत समर्थनीय नाही. समितीने यासंदर्भात साक्षीदरम्यान विचारणा केली असता सांगण्यात आलेली कारणे ही पुर्णतः प्रशासकीय स्वरुपाची असून केवळ यासाठी आवश्यक असणा-या बैठका नियोजित वेळेत न होता पुढे ढकलण्यात आल्यामुळे हा विलंब झाल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. या बाबी आक्षेपार्ह असून निश्चितच समर्थनीय नाहीत. योजनेची अंमलबजावणी करताना त्याचे अचूक नियोजन व कालमर्यादा पाळण्याची प्राथमिक जबाबदारी ही विभागाचीच आहे व त्याचे व्यवस्थापन योग्यरित्या व योग्य वेळी विभागाने केलेच पाहिजे. काही अपरिहार्य कारणास्तव अपवादात्मक परिस्थितीत अशा बाबी तूरळक प्रमाणात निदर्शनास येत असतील तर त्याची छाननी गुणवत्तेनुसार करणे योग्य राहील, परंतु कोणत्याही परिस्थितीत शेतक-यांच्या पिकांचे संरक्षण हे केंद्रबिंदू ठेवून भविष्यात हा विलंब होवू नये याची काळजी विभागाने घेतली पाहिजे असे समितीचे स्पष्ट मत आहे.

**शिफारस**

**२.५ प्रत्येक पिक हंगाम सुरु होण्यापुर्वी समाविष्ट करण्यात येणारे पिक, विमा क्षेत्र घटक, हप्त्याची रक्कम, विमा संरक्षित रक्कम, विमा हप्त्यावरील अनुदान आणि अधिसूचित पिकांसाठी मंडळ किंवा तालुका स्तरावर करावयाच्या पिक कापणी प्रयोगांची संख्या राज्य शासनाद्वारे अधिसूचित करणे आवश्यक असते. याशिवाय हितसंबंध धारकांनी योजनेच्या अंमलबजावणीसाठी पाळावयाच्या विविध निर्धारीत तारखादेखील अधिसूचित करणे आवश्यक असते. परंतु यास विलंब झाल्यामुळे शेतक-यांना विमा योजनेमध्ये समाविष्ट होण्यास कमी कालावधी मिळतो. झालेल्या विलंबाची कारणे ही पुर्णतः प्रशासकीय स्वरुपाची असून कोणत्याही परिस्थितीत समर्थनीय नाहीत. कोणत्याही वेळेस आलेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतक-यांच्या पिकांचे नुकसान होऊ नये यासाठी केंद्र व राज्य शासनाने अतिशय उदात्त हेतूने व शेतक-यांच्या पिकांना संरक्षण देण्यासाठी ही व्यापक योजना राबविली आहे. शेतकरी देखील अतिशय प्रतिकूल परिस्थितीशी झुंज देऊन शेतीविषयक कामे हाताळीत असताना केवळ बैठका विहित वेळेत न होऊ शकल्यामुळे अधिसूचना निर्गमित होण्यास विलंब होणे ही बाब गंभीर असून समिती याबाबत तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. कोणत्याही परिस्थितीत प्रशासकीय बाबी कमीत कमी वेळेत पुर्ण करुन शेतक-यांना विमा संरक्षण योजनेत सहभागी होण्यास जास्तीत जास्त कालावधी उपलब्ध करुन देण्यात यावा. त्यासाठी आवश्यक असणारी यंत्रणा तयार करुन सर्व बाबींचे कालबध्दरित्या नियोजन व व्यवस्थापन विभागाने करावे. तसेच विलंबासाठी जबाबदार असणा-या अधिकारी/कर्मचा-यांवर योग्य ती कारवाई करण्यात यावी व अशा आक्षेपांची पुनरावृत्ती भविष्यात टाळावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्र. ३.१.२.३ "विमा हप्ता आणि दावा अनुदान देण्यात विलंब "**

**अभिप्राय**

२.६ कृषि पिक विमा योजनेच्या मार्गदर्शक सूचना आणि केंद्र शासनाच्या कृषि मंत्रालयाच्या पत्रानुसार विमा हप्ता रक्कम आणि विमा दावा अनुदानासंबंधी सर्व आर्थिक दायित्व केंद्र आणि राज्य शासनाद्वारे १:१ या गुणोत्तरानुसार भागावयास पाहिजे. शेतक-यांना विमा दावा रकमेची अदायगी वेळेवर करण्यासाठी विमा हप्ता/दावा अनुदानाचा राज्याचा हिस्सा विमा कंपन्यांना देण्यात विलंब व्हावयास नको. असे असताना राज्य शासनाने विमा कंपन्यांना विमा हप्ता रक्कम अनुदान देण्यात विलंब केला. विमा हप्ता रक्कम/दावा अनुदान देण्यातील विलंबामुळे शेतक-यांच्या विमा दाव्याचा निपटारा करण्यात उशिर झाला व त्यामुळे शेतक-यांना वेळेवर आर्थिक सहाय्य पुरविण्यात येऊ शकले नाही ही वस्तुस्थिती असून ती विभागीय प्रतिनिधींनी मान्य देखील केली व विमा हप्ता रक्कम/दावा अनुदान पुरवून दाव्यांचा वेळेवर निपटारा करण्यासाठी पुरेशी आर्थिक तरतूद करण्यात येत असल्याचे देखील समितीसमोर सांगण्यात आले. ही बाब निश्चितच समर्थनीय नसून शेतक-यांना त्यांच्या न्याय्य लाभापासून वंचित ठेवणारी बाब आहे.

**शिफारस**

**२.७ शेतक-यांना विमा दावा रकमेची अदायगी वेळेवर करण्यासाठी विमा हप्ता/दावा अनुदानाचा दाव्याचा हिस्सा विमा कंपन्यांना विहित मुदतीत देणे आवश्यक असताना हा हप्ता देण्यास विलंब झालेला असून त्यामुळे शेतक-यांच्या विमा दाव्यांचा निपटारा विहित मुदतीत न होता त्यास अमर्याद विलंब लागला. परिणामी शेतक-यांना वेळेवर आर्थिक सहाय्य प्राप्त होऊ शकले**

**नाही ही बाब गंभीर स्वरुपाची आहे. विमा हप्ता आणि दावा अनुदान विमा कंपन्यांना देण्यास कोणत्याही परिस्थितीत विलंब होवू नये व शेतक-यांना विमा दावा रक्कमेची अदायगी वेळेवर करण्यासाठी विभागाने आवश्यक ती उपाययोजना तात्काळ करावी व त्यासाठी आवश्यक असलेली आर्थिक तरतूद देखील करण्यात येवून व यासंदर्भातील आक्षेपांची भविष्यात पुनरावृत्ती टाळावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्र. ३.१.२.४ " स्पर्धात्मक बोलीशिवाय विमा कंपन्यांना नियमबाह्यरित्या पुढे चालू ठेवणे "**

**अभिप्राय**

२.८ हवामानावर आधारीत पिक विमा योजनेतील घटकांसाठी राष्ट्रीय पिक विमा कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्य शासनाने भारत सरकारद्वारे नामित केलेल्या विमा कंपन्यांकडून प्रत्येक पीक हंगामासाठी बोली मागविल्या पाहिजेत. स्पर्धात्मक बोलीशिवाय कोणत्याही विशिष्ट विमा कंपनीला लागोपाठ दोन वर्षे सहभागी करण्याबाबत योजनेत कोणतेही प्रावधान नाही. परंतु महाराष्ट्र शासनाने चार विमा कंपन्यांना सामिल करण्यासाठी सुधारीत राष्ट्रीय पिक विमा योजनेच्या (MNAIS) परिच्छेद ७.५.३ चा अवलंब करुन शासन निर्णय जारी केला जेव्हा की,MNAIS सन २०११ नंतर महाराष्ट्रात अंमलात नव्हती. तसेच खरीप हंगाम २०१४ साठी अधिसूचित टर्म शीट्स आणि ट्रिगर खरीप हंगाम २०१५ साठी सुध्दा वापरल्या गेले. यामुळे विमा कंपनीमधील स्पर्धा बाधित होऊन शेतक-यांचीही जास्त चांगली जोखिम संरक्षण मिळण्याची संधी मुकली. याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत असून विभागाने नियमानुसार अधिक पारदर्शक व स्पर्धात्मक प्रक्रिया राबविणे अभिप्रेत व आवश्यक आहे.

**शिफारस :**

**२.९ वास्तविकतः राज्य शासनाने केंद्र शासनाद्वारे नामित केलेल्या विमा कंपन्यांकडून प्रत्येक पीक हंगामासाठी बोली मागविणे आवश्यक असून स्पर्धात्मक बोलीशिवाय कोणत्याही विशिष्ट विमा कंपनीला लागोपाठ दोन वर्षे सहभागी करण्याबाबत योजनेत कोणतेही प्रावधान नसताना स्पर्धात्मक बोलीशिवाय विमा कंपन्यांना नियमबाह्यरित्या पुढे सुरु ठेवण्यात आले. स्थिरता आणि निरंतरता राखण्यासाठी एकाच विमा कंपनीला लागोपाठ दोन वर्षे एकाच विमा हप्ता दराने आणि विमा संरक्षित रकमेवर सहभागी करण्यात आले. विभागाने हवामानावर आधारित पिक विमा योजनेतील घटकांतील असलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन न करता सुधारित राष्ट्रीय पिक विमा योजनेतील तरतुदीनुसार हे काम त्याच विमा कंपन्यांना दिले. जेव्हा की, सन २०११ नंतर सुधारित राष्ट्रीय पिक विमा योजना राज्यात अंमलात नव्हती. तरीही सुधारित राष्ट्रीय कृषि पिक विमा योजना व हवामानावर आधारित पिक विमा योजना या दोन्ही योजनांमध्ये पुनर्निविदा न काढता ३ वर्षापर्यंत त्यांना सुरु ठेवता येते असे गृहित धरुनच ही कारवाई करण्यात आल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले. तसेच ही खाजगी कंपनी नसून केंद्र शासन पुरस्कृत कंपनी असल्याचा खुलासा देखील विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर करताना घेतलेल्या निर्णयाचे समर्थन केले. विभागाच्या या भूमिकेवर समितीने असहमती दर्शवित विभागाने काढलेला अर्थ हा मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन करणारा आहे व तो शासनाच्या निर्णयांना अभिप्रेत नाही. या प्रकरणांमध्ये स्पर्धात्मक बोली करुनच कमीत कमी दराच्या निविदेस निवड करण्याच्या पध्दतीचा विभागाने अवलंब करणे आवश्यक होते असे समितीचे स्पष्ट मत आहे. विभागाने या परिच्छेदासंदर्भात घेतलेली भूमिका व केलेली कृती राज्यात सुधारित राष्ट्रीय कृषि विमा योजना अस्तित्वात नसून हवामानावर आधारित पिक विमा योजनेतील घटकांच्या कार्यान्वयनासाठी स्वतंत्र प्रावधानाची तरतूद आहे. त्यामुळे त्याची अंमलबजावणी त्याच पध्दतीने व त्यासाठी अस्तित्वात असलेल्या तरतुदीनुसारच होणे आवश्यक आहे. अधिक स्पर्धात्मक निविदा, कमीत कमी दरांसाठी वाटाघाटी व पारदर्शक निविदा प्रक्रिया या बाबींचा विभागाने निश्चितच अवलंब करणे आवश्यक आहे याची विभागाने दखल घ्यावी व या कार्यपध्दतीचा अवलंब भविष्यात टाळावा व त्याअनुषंगाने आवश्यक ते निर्देश त्वरीत निर्गमित करण्यात यावेत व या क्षेत्रामध्ये स्पर्धेचा लाभ विभागाला कमीत कमी दराची निविदा घेऊन कसा करता येईल याचा विभागाने विचार करुनच निर्णय घ्यावा व भविष्यात अशा आक्षेपांची पुनरावृत्ती टाळावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्र. ३.१.२.५ 'शेतक-यांना विमा दावा रक्कमेची दुबार/अनेकदा अदायगी'**

**अभिप्राय :**

**२.१०** एका हंगामात विमा खालील क्षेत्र हे लागवडीखाली असलेल्या क्षेत्रापेक्षा जास्त असावयास नको असे असताना परंतु विभागाकडे उपलब्ध असलेल्या दोन अहवालांचा उलट मेळ घातला असता आणि दस्तावेजांची पडताळणी केली असता विमा घेतलेले क्षेत्र आणि लागवडीखालील क्षेत्र यांत तफावती आढळल्या. राज्य शासनाद्वारे लागवडीखालील क्षेत्राची माहिती आणि विमा कंपन्यांजवळ विमा घेतलेल्या क्षेत्राबाबत असलेली माहिती यांची उलट-तपासणी करुन मेळ घालण्यासाठी कोणतीही

पध्दत अस्तित्वात नाही. परिणामी, शेतक-यांना विमा देय रक्कमेची दुबार/अनेकदा अदायगी करण्यात आली. तसेच तीन बँकांच्या दस्तावेजांच्या उलट-तपासणीत परळी-वैजनाथ तालुक्यातील सरडगाव आणि धर्मापूरी गावांतील १२९ शेतक-यांना एकाच पीक/हंगाम/क्षेत्रासाठी दोनदा किंवा तीनदा अदायगी करण्यात आली. त्यामुळे रु.२८.८७ लक्ष जादा विमा दावा रक्कमेची अदायगी झाली. तसेच स्टेट बँक ऑफ हैदराबाद, परळी-वैजनाथ शाखेकडे रु.७७.४४ लक्ष रक्कमेचे २९३ शेतक-यांचे दावे प्राप्त झाले. ज्यापैकी ८८ शेतक-यांना विमा दावा रक्कम म्हणून रु.२७.५८ लक्ष बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेद्वारे आधीच अदा केले होते.

**२.११** महालेखाकारांसमवेत झालेल्या निर्गमन परिषदेत विभागीय सचिवांनी सदरहू वस्तुस्थिती मान्य केली आणि लागवडीखालील क्षेत्राचे निर्धारण दृष्टी अंदाजानुसार करण्यात आले असल्यामुळे ते विश्वसनीय नसल्याचे देखील सांगितले. तसेच बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेद्वारे अदा करावयाचे रु.५७.६७ कोटीचे शेतक-यांचे दावे भारतीय कृषि विमा कंपनी लिमिटेडला परत पाठविण्यात आल्याचे देखील सांगण्यात आले.

**२.१२** महालेखाकारांनी नोंदविलेले सदरहू आक्षेप हे अत्यंत गंभीर असून या संपुर्ण योजनेसंदर्भातील मूलभूत बाबींशी व योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीतील त्रुटींशी निगडीत तर आहेच परंतु योजनेचा लाभ हा योग्य व गुणवत्ताधारक शेतक-यांपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने व अपात्र शेतक-यांनी याचा गैरफायदा घेवू नये अथवा दुबार फायदा घेऊ नये यासाठी बाधा आणणारे आहेत. या संपुर्ण योजनेच्या अंमलबजावणीमध्ये विमा कंपनी फक्त एक यंत्रणा म्हणून कार्यरत आहे. या यंत्रणेकडून शेतक-यांच्या हितासाठी जास्तीत जास्त मदत घेण्याची जबाबदारी विभागाचीच आहे. परंतु शासकीय स्तरावरुन देखील ही कामे नियोजनबध्द पध्दतीने व पारदर्शकरित्या झाल्याचे समितीला दिसून आले नाही. शेतक-यांचा पिक विमा उतरविताना विम्यामध्ये समाविष्ट करावयाच्या बाबी, घेण्यात येणारी पिके, नैसर्गिक आपत्तीचे स्वरुप, नुकसानीचे प्रमाण, भरावयाच्या हप्त्याची रक्कम व त्याअनुषंगाने मिळणारी नुकसान भरपाई व यासाठी अवलंबिण्यात येणारी कार्यपध्दती या सर्व बाबींसंदर्भात शेतक-यांच्या व राज्य शासनाच्या हिताचे निर्णय घेवून, वाटाघाटी करुन व त्यासाठी शास्त्रोक्त कार्यपध्दती तयार करण्याची पुर्णतः जबाबदारी विभागाच्या अधिका-यांचीच असताना त्यामध्ये देखील मोठ्या प्रमाणात अनियोजनबध्दता, त्रुटी व उणिवा राहिल्याचे दिसून येते. शेतक-यांना विमा दावा रकमेची दुबार अदायगी रोखण्यासाठी कोणतीही कार्यपध्दती अस्तित्वात नव्हती. तसेच नुकसानीचे व लागवडीखालील क्षेत्राचे निर्धारण करण्यासाठी उपलब्ध असलेल्या माहितीमध्ये व महसूली दस्तावेजांमध्ये व सातबा-यांच्या आकड्यांमध्ये देखील विसंगती व तफावत दिसून येते. प्रत्यक्ष क्षेत्र कमी असताना विमा मात्र जास्त क्षेत्राचा काढण्यात येणे अशा बाबी देखील घडलेल्या आहेत. अशाप्रकारच्या झालेल्या चुकांमध्ये विमा काढल्यानंतर क्षेत्रफळामध्ये बदल करण्यासंदर्भात कार्यवाही करता येत नसल्यामुळे अनेक पात्र शेतकरी लाभापासून वंचित राहतात, तर अनेक शेतक-यांना विमा रक्कमेची दुबार किंवा अनेकदा अदायगी करण्यात येते. पिक विमा योजनेची अंमलबजावणी, सर्व नोंदणी व यंत्रणा आतापर्यंत ऑफलाईन पध्दतीने कार्यरत असल्यामुळे या सर्व बाबी घडल्या ही वस्तुस्थिती असून विभागाने ती समितीसमोर मान्य देखील केली. त्यामुळे आता शासनाने ही नोंदणी ऑनलाईन करुन ती आधार कार्डशी लिंक केल्यामुळे हे प्रमाण कमी होण्याची शक्यता आहे व यामुळे शेतक-यांनी दुबार नोंदणी अथवा वेगवेगळ्या बँकांमधून वेगवेगळे अर्ज करण्याच्या कार्यपध्दतीवर निश्चितच आळा बसू शकतो. या योजनेचा मुख्य हेतू हा शेतक-यांच्या पिकांना संरक्षण देणे हा असून याअनुषंगाने विमा कंपन्यांशी योग्य त्या वाटाघाटी करुन सर्वसमावेशक संरक्षणाबाबत विभागाने आग्रही राहून प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. परंतु यात नियोजन नसल्यामुळे विमा कंपन्यांना या सर्व बाबींचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष लाभ मिळतो ही वस्तुस्थिती आहे. हे सर्व आक्षेप अतिशय गंभीर स्वरुपाचे असून अतिशय उदात्त हेतूने व शेतक-यांच्या हितासाठी अंमलात आणण्यात येणा-या योजनेचा दुरुपयोग व गैरवापर करणा-या आहेत व यावर शासनाचे कोणतेही नियंत्रण समितीला दिसून आले नाही. विभागाने योजनेचा लाभ पात्र लाभार्थ्यांना संरक्षित क्षेत्राकरिता मिळण्यासाठी व त्याचा दुरुपयोग टाळण्यासाठी अधिक नियोजनबध्द पध्दतीने व पारदर्शकरित्या योजनेची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे.

**शिफारस :**

**२.१३ महालेखाकारांनी सदरहु परिच्छेदांतर्गत नोंदविलेले आक्षेप हे वस्तुस्थितीदर्शक असून अतिशय गंभीर स्वरुपाचे आहेत. एका हंगामात विम्याखालील क्षेत्र हे लागवडीखाली असलेल्या क्षेत्रापेक्षा जास्त असावयास नको, असे असताना विमा घेतलेले क्षेत्र व लागवडीखालील क्षेत्रात मोठ्या प्रमाणात तफावत दिसून आली. राज्ये शासनाद्वारे लागवडीखालील क्षेत्राची माहिती आणि विमा कंपन्यांजवळ विमा घेतलेल्या क्षेत्राची माहिती याची उलट तपासणी करुन मेळ घालण्यासाठी कोणतीही**

पध्दत अस्तित्वात नसल्यामुळे शेतक-यांना विमा देय रकमेची दुबार किंवा अनेकदा अदायगी झाली ही वस्तुस्थिती आहे व अशा बाबींची पुनरावृत्ती रोखण्यास निश्चितच विभाग अपयशी ठरला व योजनेचा गैरवापर झाला. या संपुर्ण पिक विमा योजनेची अंमलबजावणी करताना शेतक-यांचा पिक विमा उतरविताना विम्यामध्ये समाविष्ट करावयाच्या बाबी, घेण्यात येणारी पिके, नैसर्गिक आपत्तीचे स्वरुप, नुकसानीचे प्रमाण, भरावयाच्या हप्त्याची रक्कम व त्याअनुषंगाने मिळणारी नुकसान भरपाई व यासाठी अवलंबिण्यात येणारी कार्यपध्दती या सर्व बाबींसंदर्भात शेतक-यांच्या व राज्य शासनाच्या हिताचे निर्णय घेवून त्यासाठी शास्त्रोक्त कार्यपध्दती तयार करण्याची पुर्णतः जबाबदारी विभागाच्या अधिका-यांचीच असताना त्यामध्ये देखील मोठ्या प्रमाणात अनियोजनबध्दता, त्रुटी व उणिवा राहिल्याचे समितीचे स्पष्ट मत आहे. परिणामी याचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष लाभ हा विमा कंपन्यांनाच झाला. तसेच नुकसानी संदर्भात विम्याच्या अटी शर्तीमध्ये समाविष्ट करावयाच्या शेतक-यांच्या हिताच्या अनेक बाबी स्पष्टपणे नमूद न केल्यामुळे विमा कंपन्यांना त्याचा फायदा झाला. लागवडीखालील क्षेत्र व विमा घेतलेल्या क्षेत्रामध्ये तफावत असल्यास झालेल्या नुकसानीचे स्वरुप व प्रमाण निश्चित करण्यात मोठ्या प्रमाणात अडचणी येतात व त्याचा लाभ देखील विमा कंपन्यांनाच होतो. अशावेळी अटी व शर्ती निश्चित करताना अधिक वस्तुस्थितीदर्शक व अभ्यासपूर्ण पध्दतीने याची निश्चिती विभागाकडून होत नाही ही वस्तुस्थिती आहे. शेतक-यांना विमा दावा रकमेची दुबार अदायगी होण्याचे मुख्य कारण हे ऑफलाईन अर्ज स्विकारणे हेच आहे. त्यामुळे अनेक बँकांमध्ये एकाच जमिनीसाठी व एकाच शेतक-याकडून एकापेक्षा जास्त अर्ज केले जायचे व या योजनेचा निश्चितच गैरवापर झाला आहे. परंतु आता शासनाने यात सुधारणा करुन पिक विमा योजनेचे सर्व अर्ज हे ऑनलाईन पध्दतीने घ्यायचा निर्णय घेतल्यामुळे या बाबींवर निश्चितच आळा बसेल. परंतु त्यात देखील मोठ्या प्रमाणात अडचणी आलेल्या आहेत. शेतक-यांना या अद्ययावत कार्यपध्दतीचा अवलंब करुन ऑनलाईन पध्दतीने हा अर्ज करणे तितके सोपे नाही. त्यातच या ऑनलाईन पध्दतीची संपुर्ण माहिती देखील शेतक-यांना असेलच याची शक्यता नाही. अनेकदा ही नोंदणी करताना सर्व्हरवर मोठ्या प्रमाणात भार येऊन ते बंद पडतात, त्यामुळे वारंवार नोंदणी केंद्रात जाऊन अशाप्रकारची नोंदणी करणे दुरगामी क्षेत्रात राहणा-या शेतक-यांना शक्य होत नाही. सन २०१७-२०१८ मध्ये ऑनलाईन पध्दत सुरळीत नसल्यामुळे शेवटच्या टप्प्यात ऑफलाईन अर्ज देखील घेण्याची परवानगी देण्यात आली. त्यामुळे या सर्व ऑफलाईन अर्जाचा बोजा राज्य सरकारवर पडला त्यामुळे ऑनलाईन पध्दत सुरळीत चालू कशी राहील याचे नियोजन विभागाने करावे. या प्रक्रियेमुळे शेतीची कामे देखील बाधीत होत असल्यामुळे त्याचा निश्चितच परिणाम शेतक-यांच्या नोंदणीवर होतो. विभागाने यासंबंधी सर्व महसूली माहिती, शेतक-यांचे आधार कार्ड, सातबारा, जमिनीचे क्षेत्र, लागवडीखालील क्षेत्र व विमा संरक्षित क्षेत्र या सर्व बाबी एकमेकांशी लिंक करुन ही कार्यपध्दती ऑनलाईन राबवावी. तसेच शेतक-यांच्या मदतीसाठी त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी व या सर्व बाबींवर नियंत्रण ठेवण्यासाठी महसूली यंत्रणेमधून समन्वयकाची नेमणूक करण्यात यावी व अवलंबावयाच्या कार्यपध्दतीस व्यापक प्रसिध्दी द्यावी. ज्यामुळे या योजनेमध्ये जास्तीत जास्त शेतक-यांचा समावेश होवू शकतो व त्याचा जास्तीत जास्त लाभ शेतक-यांना मिळू शकतो. तसेच लागवडीखालील क्षेत्राची माहिती व विमा संरक्षित क्षेत्राच्या माहितीची उलट तपासणी करुन त्याचा योग्य तो मेळ घालण्यासाठी शास्त्रशुध्द, अद्ययावत व पारदर्शक पध्दतीचा अवलंब करण्यात यावा व कोणत्याही परिस्थितीत शेतक-यांना विमा दाव्याच्या रकमेची दुबार अदायगी टाळण्यात यावी. तसेच बीड येथील दुबार अदायगीसंदर्भात चौकशी करुन योग्य ती कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

**परिच्छेद क्र. ३.१.३ 'बँक स्तरावर योजनांची अंमलबजावणी'**

**परिच्छेद क्र. ३.१.३.१ 'शेतक-यांना लाभांपासून वंचित करणे'**

**अभिप्राय :**

२.१४ राष्ट्रीय कृषि विमा योजना (NAIS) आणि राष्ट्रीय पिक विमा कार्यक्रमाच्या (NAIS) मार्गदर्शक सूचनांनुसार प्रस्ताव प्रपत्रे आणि विमा हप्ता अनुदान स्विकार करतेवेळी संबंधित बँक/वित्तीय संस्थांची जबाबदारी असते की त्यांनी शेतक-यांबाबत भूमि अभिलेख, एकरी क्षेत्रफळ/झाडांची संख्या, संरक्षित रक्कम इत्यादी माहिती पडताळली पाहिजे. बँकेच्या शाखेने/वित्तीय संस्थेने नंतर ही माहिती घोषणापत्राच्या स्वरुपात एकत्रीकृत करुन प्रत्येक पिक हंगाम सुरु होण्यापूर्वी राज्य शासनाद्वारे अधिसूचित करण्यात आलेल्या निर्धारित तारखेच्या सात दिवसांच्या आत संबंधित नोडल बँकेस पाठवावयास पाहिजे. परंतु तीन तालुक्यांतील (दोन जिल्हे) ४८८ शेतकरी विमा लाभांपासून वंचित राहिले कारण बँकांनी/वित्तीय संस्थांनी प्रस्ताव प्रपत्रांची काळजीपुर्वक पडताळणी केली नाही व त्यांच्या पडताळणीत अनेक त्रुटी/चुका/उणीवा राहिल्या असे आक्षेप महालेखाकारांनी

त्यांचे अहवालात नोंदविलेले आहेत. महालेखाकारांनी नोंदविलेले सदरहू आक्षेप हे वस्तुस्थितीदर्शक असून बँकांनी व वित्तीय संस्थांनी हे आक्षेप मान्य देखील केले. त्यामुळे योजनेच्या अंमलबजावणीतील अशा प्रकारच्या निष्काळजीपणासाठी संबंधित बँका/वित्तीय संस्था निश्चितच जबाबदार आहेत हे ही विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर मान्य केले.

**शिफारस :**

**२.२५ बँकेच्या स्तरावरुन या योजनांची अंमलबजावणी करताना त्यात बँका/वित्तीय संस्थांची भूमिका अत्यंत महत्वाची असते शेतकरी व विमा कंपन्या या दोघांमधील बँका हा महत्वचा दुवा व माध्यम आहे. बँका विमा प्रस्ताव प्रपत्रांची पडताळणी करुन हे प्रस्ताव त्यांच्या संबंधित नोडल बँकेमार्फत विमा कंपन्यांना विमा हप्ता रकमेसह पाठवितात. नोडल बँकेद्वारे प्राप्त दाव्याची रक्कम लाभार्थी शेतक-यांच्या खात्यात जमा करण्यासाठी प्रत्येक बँकेच्या शाखेत परत पाठविण्यात येते. अशाप्रकारे या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये बँकांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. असे असताना काही बँकांनी प्रस्ताव प्रपत्रांची काळजीपूर्वक पडताळणी न केल्यामुळे राहिलेल्या त्रुटींबाबत अनेक शेतकरी लाभापासून वंचित राहिले ही बाब निश्चितच गंभीर आहे. अशा सर्व प्रकरणांचा तपास करुन त्या बँकांवर वा वित्तीय संस्थांवर कारवाई करण्यात यावी व अशा बाबी आढळल्यास बँकांवर करावयाची कारवाई वा शास्ती याची देखील निश्चिती करण्यात यावी व भविष्यात अशा बाबींची पुनरावृत्ती टाळावी व कोणत्याही परिस्थितीत बँकांच्या त्रुटीमुळे शेतकरी लाभापासून वंचित राहू नये याअनुषंगाने बँका व वित्तीय संस्थांच्या जबाबदा-या निश्चित करण्यात याव्यात. तरीही बँकांच्या त्रुटीमुळे, दिरंगाईमुळे किंवा हलगर्जीपणामुळे काही कर्जदार शेतक-यांना संरक्षण न मिळाल्यास अशा शेतक-यांना मंजूर नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी सर्वस्वी त्या बँकेची किंवा वित्तीय संस्थेची राहील अशी अट त्या बँकेवर घालण्यात यावी व त्याची अंमलबजावणी करण्यात यावी. याअनुषंगाने सद्य:स्थितीत नोंदणीसाठी अवलंबिण्यात आलेल्या ऑनलाईन पध्दतीची अंमलबजावणी अधिक नियोजनबध्द पध्दतीने करण्यात यावी व त्यासाठी येणा-या अडचणी तात्काळ दूर करण्यात याव्यात. मुळात शेतक-यांना अर्ज करण्यास अनेक अडचणी येत असतात. विभागाकडून अर्ज करण्याच्या तारखा या विलंबाने निश्चित होतात. दरम्यानच्या काळात शेतकरी त्यांच्या शेतीविषयक कामांमध्ये प्राधान्याने व्यस्त राहिल्यामुळे तसेच विमा भरण्याची मुदत देण्याची तारीख जाहीर करण्यास विभागाकडून विलंब होत असल्यामुळे हे अर्ज शक्यतोवर अंतिम टप्प्यात भरण्यात येतात. त्यामुळे शेवटच्या टप्प्यात सर्व्हरवर भार येऊन ही यंत्रणा अपयशी ठरते. त्यासाठी सर्व्हरची क्षमता वाढवून ते अधिक अद्ययावत करण्यात यावेत. तसेच विमा घेण्याचा कालावधी निश्चित करतेवेळी शेतक-यांच्या हंगाम व पेरणीच्या कालावधीचा देखील विचार करुन तारखांची निश्चिती करुन जास्तीत जास्त कालावधी शेतक-यांना देण्यात यावा व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्र. ३.१.३.२** 'कर्जदार शेतक-यांचा अंतर्भाव नसणे'

**अभिप्राय :**

**२.१६** हवामानावर आधारीत पिक विमा योजनेतील घटकासाठी असलेल्या राष्ट्रीय पिक विमा कार्यक्रमांतर्गत मार्गदर्शक सूचनांनुसार सर्व शेतकरी ज्यांनी बँक/वित्तीय संस्थांकडून अधिसूचित पिकांसाठी हंगामी शेती कार्यक्रमांतर्गत (Seasonal Agricultural Operations-SAO)/किसान क्रेडिट कार्ड (KCC) कर्जे घेतली होती, त्यांचे योजनेंतर्गत अनिवार्यपणे विमा संरक्षण झाले आहे, याबाबत बँकेने/वित्तीय संस्थेने खात्री करावी. परंतु तीन बँका/वित्तीय संस्थांनी ८७,४३६ शेतक-यांना रु. ६९७.१० कोटी कर्जे, त्यांचे या योजनेंतर्गत पूर्णतः विमा संरक्षण झाले आहे याबाबतची खात्री न करता प्रदान केले. यामुळे न केवळ योजनेच्या मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन झाले तर अधिसूचित पिके ज्यासाठी कर्ज देण्यात आले, त्यासाठी असलेल्या पीक विमा संरक्षण लाभांपासूनदेखील शेतक-यांना वंचित ठेवण्यात आले असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

**२.१७** यासंदर्भात समितीने विस्तृत चर्चा करतेवेळी याअगोदर अस्तित्वात असलेली कार्यपध्दती ही वेळखाऊ व दोषपूर्ण असल्यामुळे या बाबी घडल्याचे विभागीय सचिवांनी समितीसमोर मान्यच केले. आता सुधारित मार्गदर्शक तत्वांनुसार शेतक-यांची नोंदणी ही सक्तीची करण्यात आली असल्यामुळे या बाबींची पुनरावृत्ती होण्याची शक्यता कमी आहे. तसेच याअगोदर हे अर्ज ऑफलाईन पध्दतीने घेण्यात येत असल्यामुळे बँकांकडून ही कागदपत्रे प्रलंबित राहायची व शेतक-यांना नुकसान भरपाईची रक्कम त्याच्या खात्यावर जमा केली जात नव्हती. अशाप्रकारे बँकांकडून प्रलंबित असलेली शेवटची रक्कम ही साधारणतः रु. १०० कोटी इतकी होती. नुकसान भरपाईची रक्कम शेतक-यांच्या खात्यात सात दिवसाच्या आत जमा करण्याच्या मार्गदर्शक तत्वांची देखील अंमलबजावणी झाली नाही. अशा बँकांवर जबाबदारी निश्चित करुन कोणतीही कारवाई विभागाने केली नाही,

यासर्व बँकांचा आढावा शासन स्तरावरुन घेताना झालेल्या बैठकीमध्ये अशाप्रकारे रु. ३५० कोटीपर्यंतची रक्कम प्रलंबित होती जी आता रु. १०० कोटीपर्यंत आलेली आहे. बँकांकडे नुकसान भरपाईची आलेली रक्कम अमर्याद कालावधीसाठी प्रलंबित राहिल्यामुळे त्याचा बँकांना निश्चितच लाभ होतो. तसेच शेतक-यांना ही रक्कम विलंबाने देतेवेळी बँकेकडून व्याजाचे देखील प्रदान होत नाही व अशाप्रकारे जमा रकमेचा फायदा बँकेला होतो. अशा बाबी टाळण्याची आवश्यकता आहे व अशाप्रकारे झालेल्या विलंबासंदर्भात बँकेकडून शेतक-यांना त्यावरील व्याजाचे देखील प्रदान करण्याची तरतूद करण्यात येवून त्याची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे.

**शिफारस :**

**२.२८ सदरहू परिच्छेदांतर्गत कर्जदार शेतक-यांचा राष्ट्रीय पिक विमा योजनेत अंतर्भाव नसतानाही त्याची कोणतीही खात्री न करता कर्जाच्या रकमेचे प्रदान करण्यात आल्यामुळे योजनेच्या मार्गदर्शक सूचनांचे निश्चितच उल्लंघन झालेले आहे असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केलेले आहेत. तसेच अधिसूचित पिके, ज्यासाठी कर्ज देण्यात आले आहे त्या लाभापासून देखील शेतकरी वंचित राहिले. ही वस्तुस्थिती असून बँकांनी हे आक्षेप मान्य केले. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे पिक विमा योजनेत कर्जदार शेतक-यांचा सहभाग करुन घेण्याची जबाबदारी ही संबंधित बँक व वित्तीय संस्थेची आहे. सर्व बँकांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी घेतलेली सर्व कर्जे व कर्जदार शेतकरी या योजनेंतर्गत विमा संरक्षित केले जातील व एकही कर्जदार शेतकरी विमा संरक्षणापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी व बँकांकडून या संदर्भात उपयोगिता प्रमाणपत्र मागविण्यात यावे व याचे उल्लंघन झाल्यास बँकांवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्यात यावी. तसेच विभागाने प्रत्येक हंगामानंतर योजनेच्या अंमलबजावणीच्या प्रगतीचा आढावा कालबध्द पध्दतीने नियमितरित्या घेवून त्याअनुषंगाने येणा-या अडचणी दूर कराव्यात. तसेच ज्या बँकांनी कर्जदार शेतक-यांचा अंतर्भाव नसताना याची कोणतीही खातरजमा न करता शेतक-यांना नुकसान भरपाईचे प्रदान केले त्या बँकांवर कारवाई करण्यात यावी व अशा बाबींची पुनरावृत्ती भविष्यात टाळावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्र. ३.१.३.३ 'शेतक-यांच्या खात्यात विमा देय रक्कम जमा न करणे/विलंबाने जमा करणे'**

**अभिप्राय**

**२.१९** नऊ बँका/वित्तीय संस्थांनी या योजनांतर्गत रु. ७२.४९ कोटीचे पीक विमा दावा रक्कम नियत तारखेनंतर ४३ ते ४५६ दिवस लोटल्यानंतरही अनेक कारणांमुळे जसे माग लागत नसलेले लेखे, शेतक-यांच्या नावातील चूका, बँकेमधील मनुष्यबळाची कमतरता, कामाचा बोझा इ. कारणांमुळे ऑगस्ट, २०१६ पर्यंत शेतक-यांच्या खात्यात जमा केली नाही. जर संबंधित बँकेने/वित्तीय संस्थेने शेतक-यांनी प्रस्ताव प्रपत्रांत भरलेल्या माहितीची (नाव, खाते क्रमांक, बँक शाखेचे नाव, पत्ता इ.) सुरुवातीलाच उलट-तपासणी केली असती तर ही परिस्थिती टाळता आली असती. तीन जिल्ह्यांत या योजनांतर्गत रु. ११.६० कोटी रक्कम ३ ते १४७० दिवसांच्या विलंबाने शेतक-यांच्या खात्यात जमा करण्यात आली. तसेच दोन जिल्ह्यांत (बीड आणि यवतमाळ) चार बँकांनी/वित्तीय संस्थांनी रु. ४१.७१ कोटीची संपूर्ण विमा दावा रक्कम लाभार्थी शेतक-यांना वाटप केल्याचे प्रमाणित करुन त्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र विमा कंपन्यांना सादर केले. तथापि, बँकेच्या अभिलेख्यांच्या लेखापरीक्षा पडताळणीत संवितरीत केली आहे असे प्रमाणित केल्या असलेल्या दावा रक्कमेपैकी रु. १.१० कोटी रक्कम (रु. ४१.७१ कोटीपैकी) बँक/वित्तीय संस्थांकडेच होती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांच्या परिच्छेदात नमूद केले आहेत.

**२.२०** पूर्वी या योजनेंतर्गत घ्यावयाचे सर्व अर्ज हे ऑफलाईन घेण्यात येत असल्यामुळे या अडचणी मोठ्या प्रमाणात येत होत्या. परंतु आता हे अर्ज ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात येत असल्यामुळे यावर ब-याच प्रमाणात आळा बसलेला असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. परंतु असे झाले असेल तरी ऑफलाईन कार्यपध्दती राबवितांना असे गैरप्रकार टाळण्यासाठी अस्तित्वात असलेली यंत्रणा निश्चितच कमकुवत होती.

**शिफारस**

**२.२१ राष्ट्रीय कृषि विमा योजना व राष्ट्रीय पिक विमा कार्यक्रमांतर्गत मार्गदर्शक सूचनांनुसार नोडल बँकेद्वारे प्राप्त दावे सर्व माहितीनिशी प्रत्येक बँक शाखेत/वित्तीय संस्थांमध्ये सात दिवसांत पाठवावयास पाहिजे आणि बँकेनेही दाव्याची रक्कम लाभार्थी शेतक-यांच्या खात्यात सात दिवसांच्या आत जमा करावयास पाहिजे. तसेच विमा कंपन्यांद्वारे नोडल बँकेस जारी**

**करण्यात आलेल्या संवितरण आदेशानुसार प्रत्येक बँक/वित्तीय संस्थेने त्यांच्याद्वारे देण्यात आलेली दावा रक्कम लाभार्थी शेतक-यांना संवितरीत केली गेली आहे याची खात्री करण्यासाठी स्वाक्षरीत उपयोगिता प्रमाणपत्र (UC) विमा कंपन्यांना पाठवावयास पाहिजे.**

**२.२२ अतः प्रधानमंत्री पिक विमा योजनेच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे सर्व बँकांनी योजनेंतर्गत संबंधित विमा कंपनीमार्फत मंजूर झालेली नुकसान भरपाई रक्कम प्राप्त झाल्यानंतर संबंधित लाभार्थी शेतक-यांच्या बँक खात्यावर सात दिवसाच्या आत जमा करावी व एखाद्या बँकेने नुकसान भरपाईची रक्कम विहित वेळेत शेतक-यांच्या बँक खात्यात जमा केली नाही तर संबंधित बँकेने बचत खात्यावर देय असलेल्या प्रचलित व्याज दरानुसार नुकसान भरपाईची रक्कम व्याजासह शेतक-यांच्या खात्यावर जमा करावी. तसेच यासंदर्भात आवश्यक योग्य कारवाई करण्याच्या सूचना बँकांना देण्यात याव्यात व विमा कंपन्यांनाही बँकेकडून उपयोगिता प्रमाणपत्र घेण्याच्या सूचना देण्यात याव्यात व शेतक-यांच्या खात्यात दावा रक्कम जमा न करण्याची किंवा विलंबाने जमा करण्याची प्रकरणे घडण्याची पुनरावृत्ती न होणेबाबत खात्री करावी तसे निर्बंध बँकांवर वित्तीय संस्थावर घालण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्र. ३.१.४** 'उत्पन्न माहितीची विश्वसनीयता'

**परिच्छेद क्र. ३.१.४.१** 'पिक कापणी प्रयोग'

**अभिप्राय**

**२.२३** राष्ट्रीय कृषि विमा योजनेंतर्गत मार्गदर्शक सूचनांनुसार राज्य शासनाला पीक उत्पन्नाचे निर्धारण करण्यासाठी अधिसूचित विमा क्षेत्र घटकातील सर्व अधिसूचित पिकांकरीता आवश्यक असलेल्या पिक कापणी प्रयोगाच्या संख्येचे नियोजन करण्यासाठी राज्य शासनाने प्रपत्र-१ व प्रपत्र-२ विहित केले आहेत. त्यावरील माहितीच्या आधारावर प्रत्यक्ष उत्पन्न आणि उंबरठा उत्पन्न ठरविण्यात येत असून ज्याच्या आधारे मंडळातील शेतक-यांना प्रदान करावयाच्या विमा दावा रकमेची परिगणना करण्यात येते. परंतु पुसद (जि. यवतमाळ) या तालुक्यामध्ये कापूस तसेच श्रीरामपूर (जि. अहमदनगर) या तालुक्यामध्ये कांदा या पिकाकरीता हे प्रपत्र अपूर्णरित्या वा चुकीचे भरल्याचे निदर्शनास आले. तसेच पिक कापणी प्रयोगाचे कार्यान्वयन सनियंत्रित करण्याच्या दृष्टीने पिक हंगामापूर्वी संबंधित अधिका-यांद्वारे त्याचे पर्यवेक्षण करणे आवश्यक असते. परंतु अशाप्रकारे केलेल्या पर्यवेक्षणात मोठ्या प्रमाणात तूट आढळून आल्याचे आक्षेप महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात नमूद केले आहेत.

**२.२४** सदरहू आक्षेप विभागाने मान्य करुन प्रपत्र-१ आणि प्रपत्र-२ मध्ये राहिलेल्या त्रुटी व उणिवा मान्य केल्या व या बाबी नजरचूकीने झाल्या असून त्या अधिक अचूक आणि प्रभावी करण्याकरिता प्रयत्न करण्यात येत असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. तसेच पूसद व श्रीरामपूर तालुक्यातील अनुक्रमे कापूस व कांदा पिकाच्या पिक कापणी प्रयोगाच्या नोंदणीबाबत योग्य ती पुढील कार्यवाही करणेबाबत कळविण्यात आले असून याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयास जबाबदारी निर्धारीत करण्यासाठी पत्र पाठविण्यात आल्यासंदर्भात विभागीय सचिवांनी समितीसमोर सांगितले.

**शिफारस**

**२.२५ राष्ट्रीय कृषि विमा योजनेसाठी करण्यात आलेल्या पीक कापणी प्रयोगानुसार काढण्यात आलेले प्रत्यक्ष उत्पन्न आणि उंबरठा उत्पन्न तसेच हवामानावर आधारीत पिक विमा योजनेच्या स्वयंचलित हवामान स्टेशनद्वारे प्राप्त हवामान माहितीच्या आधारावर विमा दावे परिगणित करण्यात येतात. परंतु राज्य शासन यंत्रणा आणि तृतीय पक्ष हवामान माहिती पुरवठादार यांच्याद्वारे काढण्यात आलेल्या उत्पन्न माहितीची विश्वसनीयता विश्वास ठेवण्याजोगी नव्हती. राष्ट्रीय कृषि विमा योजनेच्या मार्गदर्शक सूचनांच्या परिच्छेद ११ मध्ये अभिप्रेत असल्याप्रमाणे राज्य शासनाला पीक उत्पन्नाचे निर्धारण करण्यासाठी अधिसूचित विमा क्षेत्र घटकातील (मंडळ) सर्व अधिसूचित पीकांकरिता आवश्यक असलेल्या पीक कापणी प्रयोगाच्या संख्येचे नियोजन आणि आयोजन करावे लागेल. याकरिता राज्य शासनाने प्रपत्र-१ आणि प्रपत्र-२ विहित केले आहे. ही प्रपत्रे अत्यंत महत्वाची आहेत कारण प्रपत्र-१ आणि प्रपत्र-२ मध्ये नोंद केलेल्या माहितीच्या आधारावर प्रत्यक्ष उत्पन्न आणि उंबरठा उत्पन्न ठरविण्यात येते, जी मंडळातील शेतक-यांना प्रदान करावयाच्या असलेल्या विमा दावा रक्कमेच्या परिगणनेकरिता आधारभूत माहिती असते. परंतु त्याची पूर्ती केली गेल्यामुळे शेतक-यांच्या विमा दावा रकमेची परिगणना अचूकरित्या होऊ शकली नाही. अशा सर्व प्रकरणांची तपासणी करण्यात यावी व दोषींवर कारवाई करण्यात यावी.**

**तसेच सदरहू परिच्छेदांतर्गत पूसद (जि.यवतमाळ) तालुक्यातील कापूस व श्रीरामपूर (जि.अहमदनगर) तालुक्यातील कांदा पिकासंदर्भात प्रपत्र-१ व प्रपत्र-२ भरण्यासंदर्भातील, उणिवांसंदर्भात जबाबदारी निश्चित करुन संबंधितांवर कारवाई करण्यात यावी. तसेच प्रधानमंत्री पिक विमा योजनेंतर्गत हंगामनिहाय पिक कापणी प्रयोगाची सरासरी उत्पादकतेची आकडेवारी अधिक बिनचूक व पारदर्शक होणेसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन त्याची अंमलबजावणी करुन भविष्यात अशा आक्षेपांची पुनरावृत्ती टाळावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्र. ३.१.४.२** 'हवामानावर आधारीत पिक विमा योजनेसाठी स्वयंचलित हवामान स्टेशन'

**अभिप्राय**

२.२६ हवामानावर आधारीत पिक विमा योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार भारतीय हवामानशास्त्र विभाग, राज्य शासन, कृषी विद्यापीठ/स्वतंत्र तृतीय पक्ष यांचेच स्वयंचलित हवामान स्टेशन आणि स्वयंचलित पर्जन्य मापक संदर्भीय हवामान स्टेशन म्हणून अधिसूचित करावयास पाहिजे. महाराष्ट्र राज्य शासनाने दोन स्वतंत्र तृतीय पक्षांच्या स्वयंचलीत हवामान स्टेशना संदर्भ हवामान स्टेशन असे अधिसूचित केले आहे. स्वयंचलीत हवामान स्टेशनची सर्व साधनसामग्री, हवामान संवेदक इ. हे जागतिक हवामान शास्त्र संघटनेच्या विनिर्देशांप्रमाणे किंवा IMD द्वारे निर्गमित मार्गदर्शक सूचनांनुसार प्रमाणभूत, व्यवस्थित उभारलेले आणि नियमितपणे कॅलिब्रेटेड केले आहे याबाबत स्वतंत्र तृतीय पक्षांनी (जे विमा कंपन्यांना माहिती पुरवितात) खात्री करावयास हवी.

२.२७ DSAO औरंगाबादद्वारे संचालक फलोत्पादन, पुणे यांना सादर केलेल्या हवामान स्टेशनच्या निरीक्षण अहवालाच्या पडताळणीत आढळून आले की, दोन जिल्ह्यांतील २२ पैकी १० स्वयंचलित हवामान केंद्र व्यवस्थितपणे काम करत नव्हते (प्रदर्शन-Display करणारे घटक कार्य करत नव्हते आणि सोलार पॅनेल्स AWS सोबत उभारण्यात आले नव्हते). तसेच DSAO धुळे यांनी सादर केलेल्या निरीक्षण अहवालावरुन असे निदर्शनास आले की, ३९ पैकी २५ AWS योग्य जागी उभारण्यात आले नव्हेत (DSAO ना विद्युत लाईन्स, मोबाईल टॉवर्स, अति उंच इमारती, झाडे इ. मुळे अडथळा झालेला आढळला).

२.२८ AWS मध्ये संकलित केलेली माहिती विश्वसनीय प्रतीत होत नव्हती कारण AWS विनिर्दिष्ट मार्गदर्शक सूचनांनुसार उभारण्यात आले नव्हते. परंतु तरीही त्या माहितीचा उपयोग WBCIS अंतर्गत दाव्यांचा निपटारा करण्यासाठी करण्यात आला. या वस्तुस्थितीला भारत सरकारच्या कृषी मंत्रालयाने सर्व राज्यांच्या प्रधान सचिवांना पाठविलेल्या फेब्रुवारी, २०१४ च्या पत्राचा आधार होता, ज्यात असे नोंदविले होते की, तृतीय पक्ष हवामान माहिती पुरवठादारांनी AWS ची उभारणी आणि रखरखाव विहित मार्गदर्शक सूचनांनुसार केली नव्हती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले असून राज्य शासनाने ही वस्तुस्थिती असल्याचे मान्य केले व प्रत्येक महसूल विभागामध्ये स्वयंचलित हवामान केंद्र असावे यादृष्टीने विभागाने कार्यवाही सुरु केली असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले.

२.२९ यावर समितीने आक्षेप नोंदवत विभागाने भविष्यकाळासाठी करावयाच्या उपाययोजने व्यतिरिक्त महालेखाकारांनी नोंदविलेल्या गंभीर आक्षेपाबाबत खुलासा करणे अभिप्रेत आहे. २२ केंद्रांपैकी १० केंद्रे व्यवस्थित कार्यरत नव्हती असे आक्षेप महालेखाकारांनी नोंदविले असून याबाबत समितीने विचारणा केली असता पूर्वीचे हवामान केंद्र हे खाजगी असून ते योग्य ठिकाणी उभारण्यात आले नसल्याचे, परंतु, आता राज्य शासनाच्यावतीने महावेध प्रकल्प सुरु करण्यात येत असून त्या माध्यमातून जास्तीत जास्त केंद्र स्थापित करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. त्याअनुषंगाने कोणत्या ठिकाणी कोणत्या वेळी किती पाऊस पडला याची अचूक नोंद ठेवण्यास मदत होईल व त्याअनुषंगाने निविदा मागवून अटी व शर्ती निश्चित करुन कंपनीस काम देण्यात आले आहे. या माध्यमातून कोणत्या ठिकाणी किती पाऊस पडला अथवा त्या ठिकाणी किती तापमान आहे व त्या तापमानाचा पिकावर कोणता परिणाम झाला याची अचूक नोंद घेणे विभागाला शक्य आहे. हवामानावर आधारित पिक विमा योजनेतील घटकाकरीता असलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या अनुसार भारतीय हवामान शास्त्र विभाग, राज्य शासन, कृषि विद्यापीठ/स्वतंत्र तृतीय पक्ष यांचेच स्वयंचलित हवामान स्टेशन आणि स्वयंचलित पर्जन्यमापक संदर्भीय हवामान स्टेशन म्हणून अधिसूचित करणे आवश्यक असताना त्याची अंमलबजावणी योग्यप्रकारे झाली नाही. तसेच ते योग्य जागी उभारण्यात आले नसल्यामुळे नुकसानीच्या गणनेमध्ये अडथळा निर्माण झाला असे समितीचे स्पष्ट मत आहे.

**शिफारस**

**२.३० संदर्भ हवामान केंद्र हे केंद्र शासनाने प्राधिकृत केलेल्या (नोंदणीकृत) त्रयस्थ यंत्रणेमार्फत स्थापित केलेले हवामान केंद्र असून सहभागी विमा कंपनी देय विमा रक्कम ठरविण्यासाठी अधिसूचित केलेल्या फळ पिकासाठी व त्यासाठी निवडलेला जिल्हा व तालुक्यातील महसूल मंडळात नोंदणीकृत त्रयस्थ यंत्रणेमार्फत स्थापित केलेल्या संदर्भ हवामान केंद्रामध्ये नोंद झालेल्या आकडेवारीचा वापर करुन त्यावर आधारीत योजनेच्या तरतूदीनुसार निश्चित करण्यात आलेली नुकसान भरपाई अदा करते. अशा परिस्थतीत ही स्वयंचलित हवामान स्टेशने ही योग्य ठिकाणी व मोठ्या प्रमाणात बसविणे आवश्यक असून त्या माध्यमातून प्राप्त होणा-या अचूक व वस्तुस्थितीदर्शक माहितीच्या आधारेच या नुकसान भरपाईची निश्चिती होणे अभिप्रेत असताना ही यंत्रेच व्यवस्थित काम करीत नसल्याचे आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेले आहेत. परिणामी गुणवत्ताधारक अथवा पात्र शेतकरी योग्य नुकसान भरपाईपासून वंचित राहिला. अतः विभागाने जास्तीत जास्त ठिकाणी व जास्तीत जास्त संख्येने ही स्वयंचलित हवामान स्टेशने बसवावित व त्यांच्या माध्यमातून अधिक अचूक व विश्वसनीय माहिती संकलित करुन दाव्यांचा निपटारा गुणवत्तेवर करावा व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्र. ३.१.५** ‘तक्रार निवारण पध्दतीचा अभाव’

**अभिप्राय**

**२.३१** मंत्रालय/आयुक्तालय/जिल्हा स्तरीय अभिलेख आणि त्यांचेद्वारे लेखापरीक्षेस उपलब्ध करुन दिलेल्या माहितीच्या पडताळणीत असे निदर्शनास आले की, पीडित शेतक-यांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी असलेली यंत्रणा किंवा कार्यप्रणाली अपर्याप्त होती. जसे पुणे येथे पीडित शेतक-यांपासून प्राप्त झालेल्या ३३८ तक्रारी फक्त विमा कंपन्यांना पुढील कारवाईकरिता अग्रेषित केल्या. तथापि, तक्रारी त्यांच्या अंतिम परिणामापर्यंत संनियंत्रितही करण्यात आल्या नाहीत. शेतकरी किंवा स्थानिक प्रतिनिधींद्वारे मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयात करण्यात आलेल्या तक्रारीही विना कार्यवाही पडून राहिल्या असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नोंदविलेले आहेत.

**शिफारस**

**२.३२ कृषि पिक विमा योजनेसंदर्भात शासनस्तरावरुन अवलंबिण्यात येणारी कार्यपध्दती व अद्ययावत तंत्रज्ञानाचा उपयोग करुन नुकसान भरपाई मिळविण्यासाठी अवलंबावयाच्या कार्यपध्दतीबाबत सर्वच शेतकरी अवगत असण्याची शक्यता नाही. दुरगामी क्षेत्रात केवळ शेती हाच व्यवसाय करणारे व शासकीय यंत्रणेशी अनभिज्ञ असणा-या शेतक-यांना या सर्व उपलब्ध सुविधांचा व पर्यांयाचा यथोचित लाभ घेणे अवघड जाते. त्यातच आता ऑनलाईन पध्दतीने ही नोंदणी शासनाने सुरु केल्यामुळे राहत्या घरापासून नोंदणी केंद्रापर्यत जावून ही नोंदणी करणे सर्वच शेतक-यांना अडचणीचे होते. त्यातही सर्व्हरवर अधिक भार आल्यामुळे नोंदणी केंद्राचे सर्व्हर डाऊन होतात. त्यामुळे शेतक-यांची कामे एका खेपेत होतीलच याची शाश्वती नसते. वारंवार जवळच्या सेवाकेंद्राच्या ठिकाणी जाऊन ही कामे करुन घेणे व त्यामुळे शेतीच्या कामाकडे दुर्लक्ष करणे शेतक-यांना परवडणारे नसते. या सर्व अडचणींमुळेच या योजनेचा व उपलब्ध सुविधांचा लाभ पात्र शेतक-यांना मिळत नाही व त्यांना पिकाची नुकसान भरपाई मिळू शकत नाही. अशा सर्व बाबींचे निराकरण शासनस्तरावरुन करण्यासाठी योग्य त्या कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा. तसेच सर्व्हरची क्षमता वाढवून ऑनलाईन पध्दत अधिक बळकट करावी आणि या योजनांची व कार्यपध्दतीची माहिती दुरगामी क्षेत्रातील शेतक-यांपर्यंत पोहोचण्यासाठी त्यास जास्तीत जास्त प्रसिध्दी द्यावी. तसेच कमकुवत असलेली तक्रार निवारण पध्दती अधिक सक्षम करण्यात यावी व जास्तीत जास्त शेतक-यांना याचा लाभ मिळण्याच्यादृष्टीने शासनस्तरावरुन कारवाई करण्यात यावी. अद्ययावत यंत्रणेचा वापर करतेवेळी शेतक-यांना त्याचा वापर करणे सहज शक्य होईल याची देखील विभागाने दखल घ्यावी व याअनुषंगाने प्राप्त तक्रारींची योग्य ती दखल घेवून त्याचे निराकरण तात्काळ करण्यात यावे व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

## ३.९ 'निष्फळ खर्च'

**अभिप्राय**

**२.३३** महाराष्ट्र शासनाने सुरु केलेल्या मानव विकास मिशन अंतर्गत शेतक-यांचे उत्पन्न वाढवून त्यांच्या सशक्तीकरणासाठी आणि मानव विकास सूचकांक उंचावण्यासाठी राज्याच्या नियोजन विभागाने मार्गदर्शक तत्वे निर्गमित केली होती. ह्या मिशन अंतर्गत शेतक-यांना मातीच्या स्थितीबाबत महत्वाची माहिती पुरविणे आणि शेती उत्पन्नाच्या वाढीसाठी योग्य रासायनिक खताचा वापर शिकविणे याबाबत फिरते माती परिक्षण प्रयोगशाळा वाहनांची सुविधा पुरवित होती. मिशनच्या मार्गदर्शक तत्वानुसार राज्य कृषि विद्यापीठांतर्गत असलेल्या कृषि विज्ञान केंद्रांनी या वाहनांचे कामकाज, देखभाल व दुरुस्ती केवळ माती परिक्षणातून मिळालेल्या प्राप्तीतूनच करणे आवश्यक होते. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, अकोला यांनी सन २०११-१२ मध्ये डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांना त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असलेल्या चार कृषि विज्ञान केंद्रासाठी आठ फिरत्या वाहनांच्या खरेदीसाठी रु.२.८० कोटी वितरीत केले. या आठही फिरत्या वाहनांची खरेदी, सुसज्जता आणि कार्यान्वयन करण्यात आले. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, अकोला हे या योजनेचे नोडल अधिकारी होते व योजनेच्या संपूर्ण संनियंत्रणासाठी जबाबदार होते. परंतु ही वाहने कार्यान्वित झाल्यापासून ते नमून्याच्या तपासणीचे वार्षिक लक्ष्य (विद्यापीठाने ठरविलेले) साध्य करण्यात विद्यापीठ असमर्थ राहिले. विज्ञान केंद्र, सोनापूरमध्ये सर्वात जास्त म्हणजेच २० टक्के लक्ष्य साध्य झाले, जेव्हा की विज्ञान केंद्र, हिवरामध्ये योजनेची सुरुवात झाली नव्हती. मिशन मार्गदर्शक तत्वांमध्ये असे विनिर्दिष्ट केले आहे की, फिरत्या वाहनाचे कामकाज, देखभाल व दुरुस्ती यासाठी केवळ विज्ञान केंद्रेच जबाबदार असतील आणि राज्य शासनाद्वारे या संदर्भात निधी देण्यात येणार नाही. तथापि, मार्गदर्शक तत्वांमध्ये विज्ञान केंद्रांद्वारे सुरुवातीच्या काळात या फिरत्या वाहनांचे व्यवस्थापन कसे करावयाचे आहे हे विनिर्दिष्ट केलेले नाही. या व्हॅन्स कुशल तंत्रज्ञ (मातीचे नमुने तपासण्यासाठी) वाहनचालक, वाहनांच्या दैनिक गतिविधींसाठी आणि देखभाल/दुरुस्तीसाठी निधी यांची तरतूद न करता विज्ञान केंद्रांच्या सुपूर्द करण्यात आल्या. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, अकोला हे नोडल अधिकारी होते तथा योजनेच्या संनियंत्रणाची संपुर्ण जबाबदारी त्यांची होती आणि विज्ञान केंद्रांसोबत मासिक कार्यशाळा घेण्यात येत असल्याचे ही त्यांनी नमूद केले होते. परंतु तरीही माती नमून्यांच्या परिक्षणाचे निश्चित लक्ष्य साध्यतेचे अतिशय कमी प्रमाण यावर ते मार्ग काढू शकले नाही. अशाप्रकारे योजनेचे त्रुटीपुर्ण नियोजन व कमकुवत कार्यान्वयन यामुळे रु. २.८० कोटीचा निष्फळ खर्च झाला आणि योजनेचे वांछित उद्दिष्ट पुर्ण झाले नाही असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांच्या परिच्छेदात नमूद केले आहेत.

**२.३४** महालेखाकारांनी नोंदविलेले सदरहू आक्षेप हे अत्यंत गंभीर असून ज्या प्रयोजन व उद्देशासाठी शासनाने फिरत्या माती परिक्षण प्रयोगशाळा व्हॅनसाठी निधी दिला ते उद्दिष्ट त्रुटीपुर्ण नियोजनामुळे व कमकुवत कार्यान्वयनामुळे साध्य होवू शकले नाही. समितीने यासंदर्भात विस्तृत साक्ष घेतली असता समितीसमोर सांगण्यात आले की, या वाहनांसाठी वाहन चालक, कुशल तज्ञ तसेच सहाय्यक हे मनुष्यबळ उपलब्ध नसल्यामुळे व अनेक तांत्रिक पदे रिक्त असल्यामुळे ही वाहने कार्यान्वित करण्यास अडचणी निर्माण झाल्या. तसेच इंधन, रसायने व वाहन दुरुस्तीकरिता निधीची देखील तरतूद नव्हती. आदिवासी बहूल क्षेत्रामध्ये अशा माती परिक्षणाबाबत शेतक-यांमध्ये जागरुकता नसून शेतकरी यासाठी लागणारा खर्च देखील करण्यास तयार नव्हते. तसेच मानवविकास मिशन अंतर्गत एका प्रयोगशाळेकरिता प्रतिवर्ष ५४०० नमुने तपासून देणे शक्य नव्हते, कारण खरीप हंगामाच्यापुर्वी ५ महिन्यामध्ये आदर्श माती नमुने घेणे शक्य झाले नाही. अशा अनेक अडचणींमुळे या वाहनांचा उपयोग विहित प्रयोजनासाठी होवू शकला नाही. तरीही सदर वाहनांमुळे शेतक-यांमध्ये माती परिक्षणाचे महत्व व फायदे याबाबत जागरुकता निर्माण होण्यास निश्चितच मदत झाली. तसेच कृषि तंत्रज्ञान प्रसाराचे हे उत्कृष्ट मॉडेल ठरले. या माध्यमातून माती परिक्षणाचे महत्व या विषयावर शेतक-यांमध्ये घडीपत्रिकेचे वितरण करण्यात आले. वाहनामध्ये बसविलेल्या दुरचित्रवाणी संचाच्या सहाय्याने तंत्रज्ञानाच्या चित्रफिती दाखविण्यात आल्या. तसेच कृषि प्रदर्शनामध्ये देखील ही वाहन प्रदर्शित करुन शेतक-यांमध्ये जागरुकता निर्माण करण्यात आली. त्यामुळे या फिरत्या प्रयोगशाळेचा पुरेपूर उपयोग झाला असून झालेला खर्च निष्फळ ठरला नाही असे समितीसमोर विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

**२.३५** महालेखाकारांनी नोंदविलेले आक्षेप हे अत्यंत गंभीर असून शेतक-यांच्या शेतातील मातीचे परिक्षण करुन मातीच्या स्थितीबाबत महत्वाची माहिती पुरविणे आणि शेती उत्पन्नाच्या वाढीसाठी योग्य रासायनिक खताचा वापर शेतक-यांना शिकविणे या व्यापक उद्देशार्थ ही फिरती माती परिक्षण प्रयोगशाळा वाहने घेण्यात आली असून या वाहनांनी शेतातील मातीचे परिक्षण वाहनातील प्रयोगशाळेच्या माध्यमातून करुन देणे अभिप्रेत असताना तसे न करता त्या मातीचे नमुने प्रयोगशाळेत आणून त्याची तपासणी करण्यात येत होती व या वाहनांचा वापर फक्त प्रदर्शनासाठी करण्यात आला. हेच जर विभागाला करायचे होते तर

लाखो रुपये खर्च करुन प्रयोगशाळा असलेल्या वाहनांची खरेदी करण्याची आवश्यकता काय होती. ज्या प्रयोजनार्थ ही वाहने घेण्यात आली त्यासाठी त्याचा पुरेपूर वापर न करता अन्य कामांसाठी ती वापरण्यात येत असल्याचे समितीसमोर सांगून केलेल्या कामांचे समर्थन विभाग करीत असून समिती ते कदापि मान्य करु शकत नाही. या योजनेचा उद्देश हा शेतक-यांना मातीच्या स्थितीबाबत अवगत करुन त्यात कमीत कमी उत्पादन खर्चात कोणते पिक जास्तीत जास्त प्रमाणात घेता येईल याबाबतची माहिती पुरविणे अपेक्षित होते. ज्यामुळे शेतीच्या माध्यमातून जास्तीत जास्त पिक घेवून शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम व निर्भर करण्यासाठी ही योजना राबविण्यात आली. प्रत्येकी रु. ३५ लक्ष एवढ्या किंमतीस एक वाहन खरेदी करण्यात आले परंतु त्याचा उपयोग जर शेतक-यांमध्ये केवळ जागरुकता निर्माण करण्यासाठी होत असेल तर प्रयोगशाळायुक्त वाहन खरेदी करण्याची कोणतीही आवश्यकता नव्हती. या वाहनांची सद्यःस्थितीतील अवस्था पाहता अतिशय खराब परिस्थितीत ती वाहने असून त्याला परतावा मुल्यदेखील शिल्लक राहिलेले नाही. इतक्या वर्षात या वाहनांच्या माध्यमातून किती मातींचे नमुने परिक्षण केले याबाबत देखील माहिती डॉ. पंजाबराव कृषी विद्यापीठ, अकोला यांच्याकडे उपलब्ध नव्हती. खरेदी केलेल्या या वाहनांची नेमकी निष्पत्ती काय, याबाबत अद्यापही साशंकता असून महालेखाकारांनी नोंदविलेल्या या आक्षेपासंदर्भात विद्यापीठाने दिलेल्या अभिप्रायावर शासनाने स्वतः विद्यापीठाने दिलेला खुलासा समर्पक नसल्याचे लेखी अभिप्राय समितीला सादर केले आहेत, ही तर अधिकच गंभीर बाब आहे.

**शिफारस**

**२.३६ मानव विकास मिशन अंतर्गत सन २०१२-१३ मध्ये खरेदी केलेल्या आठ फिरत्या माती परिक्षण प्रयोगशाळा व्हॅन त्रुटीपुर्ण नियोजनामुळे आणि कमकुवत कार्यान्वयनामुळे उद्दिष्ट साध्य करण्यात विफल ठरल्या. परिणामी रु. २.८० कोटी खर्च निष्फळ ठरला. विहित प्रयोजनासाठी या वाहनांचा वापर न केल्यास्तव अपरिहार्य कारणांस्तव अन्यत्र त्याचा केलेल्या वापराचे विभागाने केलेले समर्थन समिती मान्य करु शकत नाही. ३ ते ४ वर्षे ही वाहने बंद होती. या सर्व वाहनांच्या विभागाने केलेल्या उपयुक्ततेबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. विभागाने या सर्व वाहनांचे लेखापरिक्षण करुन त्याचा किती वापर झाला, त्यातून किती शेतक-यांच्या मातीचे परिक्षण करण्यात आले, त्याचा शेतक-यांना कितपत लाभ झाला या सर्व बाबींचा आढावा घेवून त्याचे मुल्यांकन करण्यात यावे. ही वाहने वापरण्यासाठी कर्मचारी वर्ग व देखभाल दुरुस्तीसाठी निधीची आवश्यकता होती ही वस्तुस्थिती आहे. परंतु त्यातून विद्यापीठाने मार्ग काढून या वाहनांचा विहित प्रयोजनासाठी उपयोग करुन घेणे आवश्यक होते. या सर्व बाबींसाठी विद्यापीठाचे ढिसाळ नियोजन कारणीभूत आहे. झालेल्या प्रकारचे कोणत्याही परिस्थितीत विद्यापीठाकडून समर्थन करणे योग्य होणार नाही. मानव विकास मिशनने या वाहनांच्या अनुषंगाने आवश्यक असलेल्या बाबींचे योग्य नियोजन करणे अभिप्रेत होते. मातीचे परिक्षण न झाल्यामुळे त्या जागेवर कोणते पिक घ्यायचे, कोणत्या खताचा वापर करायचा व त्या भागाची भौगोलिक परिस्थती काय, याचे शेतक-यांना प्रबोधन न केल्यामुळे या वाहनांचा उद्देश साध्य होवू शकला नाही. त्यातच ही वाहने चालविण्यात अडचणी येत असल्यास तसेच विद्यापीठाला माती परिक्षणासाठी पुरेसा प्रतिसाद मिळत नसेल तर साखर कारखाने, खत कारखाने, कंपन्या किंवा योग्य संस्थांना ही वाहने वापरासाठी देवू शकतात असा शासन निर्णय नियोजन विभागाने सन २०१२ मध्ये निर्गमित केला. याचाच अर्थ कमकुवत व्यवस्थापन या सर्व बाबींसाठी कारणीभूत आहे. मानव विकास मिशनच्या मार्गदर्शक तत्वानुसार राज्य कृषी विद्यापीठांतर्गत असलेल्या कृषी विज्ञान केंद्रांनी या वाहनाचे कामकाज, देखभाल दुरुस्ती केवळ माती परिक्षणाच्या मिळालेल्या प्राप्तीतूनच करावे असे नमूद केले आहे. जर माती परिक्षणच केले नाही तर प्राप्ती होणार नाही. त्यामुळे देखभाल दुरुस्ती देखील होवू शकली नाही व ही सर्व वाहने निकामी ठरली. या सर्व कार्यपध्दतीवर समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. त्यातच विभाग ग्रामीण भागामध्ये मातीचे मायाक्रोन्युट्रीयन्स करावयाचे झाले तर ते वाहनाच्या माध्यमातून करणे शक्य होत नसून त्या मातीचे नमुने प्रयोगशाळेमध्येच आणून तपासावे लागतात असे विभागाकडून समितीसमोर सांगण्यात आले. ही जर वस्तुस्थिती असेल तर फिरत्या माती परिक्षण प्रयोगशाळा वाहनांची खरेदी करण्याचा निर्णय का घेण्यात आला, हा देखील प्रश्न उद्‌भवतो. या सर्व बाबींसंदर्भात संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्यात यावी. सदर वाहनांचे लेखापरिक्षण करण्यात यावे व त्या आकडेवारीची तपासणी महालेखापालांकडून करण्यात यावी व ती माहिती समितीस १ महिन्यात सादर करण्यात यावी. तसेच या फिरत्या प्रयोगशाळांच्या संचलनासाठी आतापर्यंत विद्यापीठाने आवश्यक ती पदनिर्मिती व जिल्हा नियोजन समितीकडून वाहनांसाठी आवश्यक इंधन व वाहन दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन घेतला पाहिजे होता, परंतु त्याअनुषंगाने कोणतेही प्रयत्न विभागाने केले नाहीत. परंतु आता अशाप्रकारे या फिरत्या प्रयोगशाळांसाठी आवश्यक ते मनुष्यबळ व इंधन व देखभाल दुरुस्तीसाठी आवश्यक तो निधी प्राप्त करुन घेण्यासाठी पुर्ण प्रयत्न करण्यात यावेत. त्याचप्रमाणे मानव विकास मिशन अंतर्गत प्रकल्प मंजूर करताना मंजूरीच्या कार्यपध्दतीचा पुनर्विचार करुन ज्या विभागाशी प्रकल्प मंजूर होतात त्यांच्या सहमतीने व मान्यतेने हा निर्णय घेणे आवश्यक आहे व याबाबतची आवश्यक ती दक्षता नियोजन विभागाने घ्यावी व त्याअनुषंगाने आवश्यक त्या सूचना निर्गमित करण्यात याव्यात व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

## सार्वजनिक बांधकाम विभाग

३. भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१५-१६ या वर्षाच्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.२ " निवडक सार्वजनिक बांधकाम विभागातील वाहनांचे प्रापण, उपयोग आणि देखभाल " परिच्छेद क्र. ३.७ " कंत्राटदारास गैरवाजवी लाभ " व परिच्छे क्र. ३.८ " नियमबाह्य प्रदान " यासंदर्भात महालेखापरिक्षकांनी खालील अभिप्राय दिले आहेत.

| अ. क्र. | अहवालाचे वर्ष व परिच्छेद क्रमांक | परिच्छेद | सविस्तर स्पष्टीकरण |
|---|---|---|---|
| | परिच्छेद क्र.३.२.१ | लेखापरीक्षा निष्कर्ष<br>वाहनाच्या व्यवस्थापनेतील अपर्याप्तता<br>वाहनांच्या खरेदीसाठी विभागाद्वारे केंद्रीकृत खरेदी प्रक्रियेचा अवलंब करण्यात येतो. वाहनांची मागणी प्रक्रिया प्रत्येक सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे सुरु करण्यात येते आणि संपूर्ण राज्यासाठी निधीच्या आवश्यकतेचे निर्धारण करण्यासाठी सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग स्तरावर या मागण्यांना एकत्रिकृत करण्यात येते. निधी प्राप्त करण्यासाठी प्रस्ताव वित्त विभाग (FD),महाराष्ट्र शासनास पाठविले जातात. निधी मिळाल्यावर आंतरिक वित्तीय सल्लागार, अधीक्षक अभियंता (विशेष प्रकल्प) आणि अधीक्षक अभियंता (यांत्रिकी)हे सदस्य असलेल्या राज्य स्तरीय खरेदी समिती द्वारे खरेदी करण्यात येते. | लेखा परीक्षकांनी नमूद केलेल्या बाबीनुसारच शासकीय वाहने खरेदी करण्यात येतात. |
| | | साधारणपणे रास्त झीजतूट आणि लुप्तप्राय झाल्यामुळे ज्या वाहनांना निर्लेखित करुन त्यांची विल्हेवाट लावायची आहे अशा वाहनांची संख्या, ही जेवढी वाहने खरेदी करावयाची आहेत त्यांची संख्या निर्धारीत करावयासाठी एक महत्वाचे घटक आहे. खरेदी प्रक्रिया आणि विल्हेवाट लावायची प्रक्रिया यांत वेळेचा मेळ घालण्यात आला पाहिजे. | खरेदी प्रक्रिया आणि विल्हेवाट लावायची प्रक्रिया वेळेत करण्याचा प्रयत्न करण्यात येतो, परंतु राज्याची भौगोलिक परिस्थिती, खात्याकडील अपूरे तांत्रिक मनुष्यबळ व ई-लिलाव प्रक्रियेचा पुरेसा अनुभव नसल्याने व ई-लिलाव प्रक्रियेस अपु-या प्रतिसादामुळे निर्लेखित वाहनांच्या विल्हेवाट लावण्याच्या कार्यवाहीस विलंब होतो. |

२०११-१६ दरम्यान रु.९.५१ कोटी किमतीचे १८७ IV (६७ कार आणि १२० जीप) यांची खरेदी महासंचालक, पुरवठा आणि विल्हेवाट यांच्या दर कराराप्रमाणे करण्यात आली . या कालावधीत CM ची खरेदी करण्यात आली नाही.

वाहनांची खरेदी आणि विल्हेवाट यांची २०११-१६ या कालावधीसाठीची राज्य स्तरीय संपूर्ण स्थिती खाली

तक्ता ३.२.१ मध्ये दर्शविला आहे.

| विवरण | IV ची संख्या | CM ची संख्या | एकूण |
|---|---|---|---|
| एप्रिल २०११ ला वाहनांची सुरुवातीची शिल्लक | ८५१ | १००७ | १८५८ |
| २०११-१६ या कालावधीत निर्लेखीत झालेली वाहने | ३९१ | १३७ | ५२८ |
| २०११-१६ या कालावधीत लिलाव करण्यात आलेली वाहने | १२४ | १०३ | २२७ |
| २०११-१६ या कालावधीत खरेदी केलेली नवीन वाहने | १८७ | १७ * | २०४ |
| मार्च-२०१६ ला क्रियाशील असलेल्या वाहनांची अखेरची शिल्लक | ६४७ | ९६७ | १६१४ |
| स्त्रोत : विभागाने सादर केलेली माहिती | | | |

*जिल्हाधिकाऱ्यांनी १७ पाणी टँकर्स पाण्याची कमतरता पूर्ण करण्यासाठी खरेदी केले आणि त्यांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी त्यांना सार्वजनिक बांधकाम विभागांना सोपविण्यात आले.

भाष्य नाही.

| | | |
|---|---|---|
| | अधीक्षक अभियंता (यांत्रिकी) आणि चाचणी तपासणी केलेल्या ११ सार्वजनिक बांधकाम विभागांच्या अभिलेखांच्या पडताळणीत खालील प्रमाणे आढळले.<br>• वाहनांची अधिक अवनति होणे आणि त्यांना मिळणारी किमंत आणखी कमी होणे टाळण्यासाठी तसेच त्यांनी व्यापलेली जागा मोकळी व्हावी यासाठी कोणत्याही वाहनांची/यंत्राची ते निर्लेखित होण्याच्या तारखेपासून तीन महिन्याच्या कालावधीत त्याची विल्हेवाट लावणेबाबत महाराष्ट्र शासनाने (जुलै १९९६) विनिर्दिष्ट केले आहे. तक्ता ३.२.१ वरुन असे निदर्शना येते की, २०११-१६ दरम्यान निर्लेखित झालेल्या ५२८ वाहनांपैकी फक्त २२७ वाहनांचे (४३ टक्के) मार्च २०१६ पर्यंत लिलाव करण्यात आले. याशिवाय लिलाव करण्यात आलेल्या २२७ वाहनांपैकी १९९९ ते २०११ दरम्यान निर्लेखित करण्यात आलेल्या ५३ वाहनांचे (IV) लिलाव २०१५-१६ मध्ये, म्हणजेच चार ते १५ वर्षाच्या विलंबाने करण्यसात आले. | अधीक्षक अभियंता (यांत्रिकी) यांचे पत्र क्र. सा.बां.यां.१०/१०१९/२००९ दिनांक १६/०९/२००९ (परिशिष्ट क्र.१ )अन्वये दि.१६/०९/२००९ ते १५/०९/२०११ या कालावधीकरीता शासकीय लिलावदाराची नेमणूक करण्यात आली होती. अधीक्षक अभियंता (यांत्रिकी) यांचे कार्यालयीन पत्र क्र.सा.बां.यां./१०/१०४४/२०११ दिनांक २४/११/२०११ अन्वये नविन शासकीय लिलावदाराची नेमणूक करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. (परिशिष्ट क्र. २ ) शेवटी उच्च स्तरावरुन शासनाचे पत्र क्र. एमसीएन २०११/ प्र. क्र.१३४/यं.बा.सा. दिनांक ०१/०८/२०१७ अन्वये NIC (परिशिष्ट क्र. ३ ) कडील संगणक कार्यप्रणालीच्या सहाय्याने ई-ऑक्शन पद्धत राबविण्याचे निर्देशित केले. या बाबत लिलाव प्रक्रियेस विलंब होणेस कारणीभूत मुद्दे खालीलप्रमाणे आहेत.<br>१) सन २०११-२०१४ मध्ये शासकीय लिलावदार नव्हता.<br>२) अपूरे तांत्रिक मनुष्यबळ.<br>३) ई-ऑक्शन प्रक्रियेबाबतचा अपुरा अनुभव.<br>४) ई-ऑक्शन प्रक्रियेस पहिल्या वर्षी सन २०१४-१५ मध्ये मिळालेला अल्प प्रतिसाद.<br>यानंतर आजपर्यंत ५२८ वाहनांपैकी ४७० वाहनांचा लिलाव करण्यात आला. ई-लिलाव विक्रितून रु.२३६ लक्ष इतका महसूल प्राप्त करण्यात आला. नविन वाहन खरेदीचा पर्याय निश्चित करण्याची प्रक्रीया सुरु आहे. त्यामुळे वर नमुद ५८ वाहनांचा लिलाव करणे शक्य झाले नाही. |
| | २०११-१६ दरम्यान १८७ नविन IV खरेदी करतांना नविन खरेदी पूर्वी अथवा नविन खरेदीच्या तारखेपासून दोन महिन्याच्या आत निर्लेखित करण्यात आलेल्या १२६ IV ची विल्हेवाट लावण्याबाबतच्या वित्त विभाग, महाराष्ट्र शासनाद्वारे विनिर्दिष्ट अटीचे पालन सुध्दा विभागाने केले नाही. जुलै २०१६ पर्यंत १२६ पैकी केवळ १७७ निर्लेखित IV चा लिलाव झाला / विल्हेवाट लावली. | वर नमुद केलेल्या कारणास्तव निर्लेखित वाहनांची विल्हेवाट लावण्याच्या कार्यवाहीस विलंब झाला. दि.३१/८/२०१७ पर्यंत १२६ निर्लेखित IV चा लिलाव करण्यात आला व त्यापोटी प्राप्त रक्कम संबंधित लेखा शिर्षाखाली जमा करण्यात आली आहे<br>स्पष्टीकरण मान्य करण्यात यावे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | राज्य शासनाने नमूद केले (सप्टेंबर २०१६)की शासकीय लिलाव करण्या-याने सप्टेंबर २०११ पर्यंत निर्लेखित वाहनांचे लिलाव केले. तथापि, लिलाव झालेली अनेक वाहने/यंत्रसामग्री बोलीदाराद्वारे नेमण्यात आली नव्हती. ज्या वाहनाना/यंत्रसामग्रीला धारणा किंमत (Upset price) सुध्दा मिळू शकली नाही त्यांचा पुन: लिलाव करण्यात आला, ज्यामुळे वाहने/यंत्रसामग्रीच्या निपटा-याला विलंब झाला. ऑगस्ट २०१४ पासून सुरु करण्यात आलेल्या ई- लिलाव पध्दतीनेही वस्तुस्थितीत सुधारणा झाली नाही, कारण विभागाकरीता ही संकल्पना नविन होती आणि ती समजून घेण्यास त्यांना जास्त वेळेची गरज होती. तांत्रिक मनुष्यबळाची कमतरता आणि काही सुदूर क्षेत्रातील बोलीदारांचा प्रतिकूल प्रतिसाद सुध्दा विलंबास कारणीभूत आहे. | या बाबत शासन परिपत्रक क्र.संकिर्ण/२०१६/ प्र.क्र.३६/यं.बा.सा. दि.१ १९/११/२०१६ अन्वये सूचना निर्गमित केल्या आहेत. (परिशिष्ट क्र.४ ) |
| | परिच्छेद क्र.३.२.२ | बांधकाम यंत्रसामुग्री आणि तपासणी वाहनांचे व्यवस्थापन<br><br>३.२.२.१ बांधकाम कार्य यंत्रसामग्री आणि तपासणी वाहनांच्या दुरुस्ती व देखभालीवर झालेला अतिरिक्त खर्च .<br>बांधकाम कार्य यंत्रसामुग्री<br>अधीक्षक अभियंता (यांत्रिकी) दरवर्षी सर्व सार्वजनिक बांधकाम विभागांना काटेकोरपणे पालन करण्यासाठी CM च्या (प्रति तास किंवा प्रति कि.मी., प्रकरणानुसार) देखभाल व दुरुस्तीसाठी आर्थिक मापदंड निर्गमित करतात. चाचणी तपासणी केलेल्या ११ पैकी नऊ सार्वजनिक बांधकाम विभागांनी २०११-१६ दरम्यान, SE (यांत्रिकी )यांनी CM च्या देखभाल व दुरुस्तीसाठी ठरवून दिलेल्या | निर्लेखन मंजूर यंत्रसामुग्रीच्या बदली नविन बांधकाम यंत्रसामुग्री खरेदी करण्यात आली नसल्याने विभागाकडील बांधकाम यंत्रसामुग्री सा. बां. विभागातील रस्त्यांच्या देखभालीकरीता त्यांचे मागणीनुसार आणि उन्हाळ्यात ग्रामिण भागात पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मागणीनुसार तात्काळ सेवेच्या उद्देशाने यंत्रसामुग्री ठेवण्यात आलेली आहे.त्यामुळे सुरक्षित वाहतूकीसाठी वाहने सुस्थितीत ठेवणे आवश्यक असते. मुख्यत्वे या यंत्रसामुग्रीचा वापर उत्पादन उद्देशाने न करता विशेष उद्देशाने करावयाचा असतो. त्यामुळे या यंत्रसामुग्रीचा वापर |

वित्तीय मापदंडापेक्षा तक्ता ३.२.२ मध्ये दर्शविल्याप्रमाणे रु.४.३८ कोटी अतिरिक्त खर्च केला.

तक्ता ३.२.२ : CM च्या देखभाल व दुरुस्तीवर झालेला अतिरिक्त खर्च

(रुपये कोटीत)

| वर्ष | अंतर्भूत केलेल्या CM ची संख्या | देखभाल व दुरुस्ती करीता S.E. यांत्रिकी द्वारे निर्गमित वित्तीय मापदंड | देखभाल व दुरुस्तीवर झालेला वास्तविक खर्च | अतिरिक्त खर्च |
|---|---|---|---|---|
| २०११-१२ | ९३ | ०.५३ | १.६८ | १.१५ |
| २०१२-१३ | ८४ | ०.६३ | १.८३ | १.२० |
| २०१३-१४ | ८४ | ०.६४ | १.५३ | ०.८९ |
| २०१४-१५ | ६९ | ०.४६ | १.१५ | ०.६९ |
| २०१५-१६ | ५० | ०.४३ | ०.८८ | ०.४५ |
| एकूण | ३८० | २.६८ | ७.०६ | ४.३८ |

स्रोत : सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे सादर केलेली माहिती.

वर नमूद केलेल्या ३८० CM व्यतिरिक्त नऊ पैकी चार सार्वजनिक बांधकाम विभागांनी ४० CM जे २०११-१६ दरम्यान कोणत्याही उपयोगात आणल्या गेले नाही, त्यांच्यावर रु.४१.८७ लक्ष खर्च केले. तसेच विभागाने निर्गमित केलेल्या (जुलै १९८२) सूचनेप्रमाणे, सर्व सार्वजनिक बांधकाम विभागांनी त्यांच्या द्वारे वापरण्यात येणा-या CM च्या नफा-तोट्याचा हिशेब ठेवणे आवश्यक होते.लेखा परीक्षेच्या असे निदर्शनास आले की, नऊ पैकी एकाही सार्वजनिक बांधकाम विभागाने २०११-१६ दरम्यान नफा-तोट्याचा हिशेब तयार केला नाही. परिणामी, विभाग CM च्या कार्यचालनाबाबत त्यांच्या आर्थिक वर्धनक्षमतेचे निर्धारण करू

सा. बां. विभागाच्या तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मागणीच्या गरजेनुसार केला जातो. नविन बांधकाम यंत्रसामुग्री खरेदी केली नसल्यामुळे तसेच यंत्रसामुग्रीच्या कमी वापरामुळे काही बाबतीत वाढीव खर्च प्रतिबिंबित होऊ शकतो.

अतिरिक्त खर्चाबाबत सादर करण्यात येते की, लेखा परिक्षकांनी अनुज्ञेय खर्चाबाबत (OM&R Master) रकाना नं.७ मधील दर्शविलेल्या दुरुस्ती दर "B" प्रमाणे गणना केली आहे. तथापि, प्रत्यक्षात केलेला खर्च हा (OM&R Master) च्या रकाना नं.९ मध्ये दर्शविलेल्या "दुरुस्ती खर्च + दुरुस्तीवरील मजूरी" प्रमाणे करण्यात आलेला आहे. लेखा परिक्षकांनी नोंदविलेला सा.बां.विभाग नाशिक अंतर्गत झालेल्या खर्चाचा तपशील सोबत सादर करण्यात येत आहे. (परिशिष्ट क्र.५ ) त्याचबरोबर सन २०११-१६ या वर्षांच्या (OM&R Master) च्या प्रती सोबत सादर करण्यात येत आहेत. (परिशिष्ट क्र.६ ) जर आपण अनुज्ञेय खर्चाची गणना रकाना क्र. ९ प्रमाणे केली तर अतिरिक्त खर्चाची रक्कम कमी होऊ शकते.

उदा:

| अ.क्र. | यंत्रसामुग्रीचा प्रकार | वर्ष | लेखापरिक्षकाने मोजणी केलेली अनुज्ञेय दुरुस्त खर्च दर प्रति कि.मि./तास | अनुज्ञेय खर्च व OM&R प्रमाणे प्रति कि.मि./तास |
|---|---|---|---|---|
| १ | ट्रक | २०१२-१३ | ९.०० | १.५७ |
| २ | डंपर | २०१२-१३ | ८.०० | १५.७९ |
| ३ | रस्ता रुळ | २०१२-१३ | ८४.०० | १८०.०० |

वर नमूद ३८० बांधकाम यंत्रसामुग्रीपैकी सन २०११-१६ मध्ये ४० बांधकाम यंत्रसामुग्रीचा वापर झाला नसल्याचे लेखापरीक्षा पथकाने नोंद केलेली आहे. परंतु प्रत्यक्षात सन २०११-१६ मध्ये सदर यंत्र सामुग्रीचा वापर झालेला आहे. मात्र लेखापरिक्षणाच्या वेळेस संबंधीत वाहनांच्या अद्ययावत रोजवह्या (Log Books) काही कारणांने उपलब्ध करण्यात आलेल्या नकत्या त्यामुळे लेखापरिक्षकानी वापराची नोंद घेतली नाही. परंतु वर नमूद ४० बांधकाम यंत्रसामग्रीचा सन २०११-१६ मध्ये वापर झालेला आहे. वापर दर्शविणाऱ्या रोजवहीच्या छायांकीत प्रती सोबत जोडल्या आहेत. काही सा. बां. विभागांनी कार्य गोषवारा नोंदवही ठेवलेली नाही. तथापी शासन परिपत्रक क्र.संकिर्ण -२०१६/प्र.क्र.३६/यंधासा/दि.१९/११/२०१६ अन्वये सर्व सा.बां.

| | | | |
|---|---|---|---|
| | | शकणार नाही. राज्य शासनाने नमूद केले की नफा-तोट्याचा हिशेब ठेवण्याकरिता सर्व सार्वजनिक बांधकाम विभागांना परिपत्रक जारी करण्यात येत आहे. | विभागांना गोषवारा नोंदवही (Work Abstract Register) व कार्य लेखा नोंदवही (Works Account) ठेवण्याच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत. (परिशिष्ट क्र.४ ) |
| | | **निरीक्षण वाहने** (see below) | या मुद्यांमध्ये लेखापरिक्षकांनी मे २००९ आणि एप्रिल २०१५ चा शासन निर्णय ज्यामध्ये दुरुस्तीवरील खर्चाच्या विभाग प्रमुखांना दिलेली वित्तिय मर्यादा नमूद आहे. मंजूरी देण्याच्या वित्तिय मर्यादा दिलेल्या आहेत ही एखादया विशिष्ट प्रकारच्या वाहनांच्या दुरुस्ती खर्चाची वार्षिक मर्यादा नाही. वाहन दुरुस्तीच्या वाढिव खर्चाच्या मार्यदा परिशिष्ट क्र.७,८ नमूद केले आहे. तथापी लेखापरिक्षकांनी दुरुस्तीवरील खर्चासाठीच्या वित्तिय मर्यादा या जास्तीत जास्त खर्चाची वार्षिक मर्यादा गृहीत धरुन अतिरिक्त खर्चाची गणना केलेली आहे.वरील बाबिचा विचार करता निरिक्षण वाहनांवर अतिरिक्त खर्च झालेला नाही. कार्यकारी अभियंता हे दुरुस्तीवरील खर्च सक्षम यांत्रिकी अधिकाऱ्यांकडून तांत्रिक मंजूरी घेऊन करतात.<br><br>स्पष्टीकरण मान्य करण्यात यावे. |

**निरीक्षण वाहने**

वित्त विभाग, महाराष्ट्र शासनाने (मे २००९ आणि एप्रिल २०१५) IV च्या दुरुस्ती व देखभालीवर (प्रति वाहन प्रति वर्ष) कार्यालय प्रमुखांद्वारे पालन करावयाची असलेली खर्चाची मर्यादा खालील प्रमाणे नेमून दिली आहे.

- डिझेल IV साठी रु. १२,५०० (२०११-१५) आणि रु.१३,५०० (२०१५-१६) आणि
- पेट्रोल IV साठी रु. १०,००० (२०११-१५) आणि रु.१५,००० (२०१५-१६)

लेखापरीक्षेस असे निदर्शनास आले की, चाचणी तपासणी केलेल्या ११ सार्वजनिक बांधकाम विभागांनी २०११-१६ दरम्यान वित्त विभागाद्वारे निश्चित केलेल्या अनुज्ञेय मर्यादेपेक्षा देखभाल व दुरुस्तीच्या कामांवर तक्ता ३.२.३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे रु. ८२७.२३ लक्ष जादा खर्च केला आहे.

तक्ता ३.२.३ : IV च्या देखभाल व दुरुस्तीवर झालेला अतिरिक्त खर्च

(रुपये लाखांत)

| वर्ष | IV ची संख्या | मापदंडानुसार अनुज्ञेय खर्च | वास्तविकतः झालेला खर्च | जादा झालेला खर्च |
|---|---|---|---|---|
| २०११-१२ | १२७ | १४.६० | १८५.४० | १७०.८० |
| २०१२-१३ | ११७ | १३.३८ | १७९.८० | १६६.४२ |
| २०१३-१४ | १२३ | १४.१५ | १९९.०९ | १८४.९४ |
| २०१४-१५ | १२५ | १४.४० | १९०.२९ | १७५.८९ |
| २०१५-१६ | १११ | १५.६९ | १४४.८७ | १२९.१८ |
| एकूण | | ७२.२२ | ८९९.४५ | ८२७.२३ |

स्त्रोत : निवडलेल्या विभागांनी सादर केलेली माहिती.

मागील पाच वर्षात IV च्या दुरुस्ती व देखभालीवर झालेला रु.८२७.२३ लक्ष जादा खर्च अद्याप सक्षम प्राधिकाऱ्याकडून नियमित व्हायचा आहे.

पुढे लेखापरीक्षा पडताळणीत असे आढळले की विभागांनी २०११-१२ मध्ये १२७ पैकी ६६ IV वर, २०१२-१३ मध्ये ११७ पैकी ६५ IV वर ,२०१३-१४ मध्ये १२३ पैकी ५४ IV

| | | | |
|---|---|---|---|
| | | वर. २०१४-१५ मध्ये १२५ पैकी ५२ IV वर. आणि २०१५-१६ मध्ये १११ पैकी ७१ IV च्या देखभाल दुरुस्तीवर एक लक्ष रुपयापेक्षा जास्त प्रमाणात खर्च केला.<br><br>राज्य शासनाने नमूद केले की वित्त विभागाद्वारे निश्चित केलेली मर्यादा ही पेट्रोल आणि डिझलेवर चालणाऱ्या IV च्या वार्षिक देखभाल दुरुस्ती खर्चासाठी नसून कार्यालय प्रमुखास प्रदान केलेल्या खर्चाच्या मंजुरीची मर्यादा होती.<br><br>उत्तर योग्य नाही कारण वित्त विभागाने एका वर्षात एका वाहनाच्या देखभाल व दुरुस्तीवर करता येऊ शकणाऱ्या खर्चाची कमाल मर्यादा स्पष्टपणे विहित केली आहे. | क्षेत्रिय अधिकाऱ्यांना निरिक्षण वाहनांच्या वापराच्या जुन्या मर्यादा व सुधारीत मर्यादा शासनचे परिपत्रक क्र.व्हीसीएल/१५९५/३४४/ यंत्रसामुग्री/ दि.१४/६/१९९६ आणि परिपत्रक क्र. संकिर्ण-२०१६/प्र.क्र.३६/यंबांसा/दि.१९/११/२०१६ (परिशीष्ट क्र.९,१०)<br><br>वापराची जुनी मानके<br>१) कार्यकारी अभियंता (कार) २,५०० कि.मी/महिना ३०,००० कि.मी /वर्ष<br>२) उप अभियंता (जिप) १,८०० कि.मी/महिना २१,६०० कि.मी /वर्ष<br>वापराची सुधारीत मानके<br>१) कार्यकारी अभियंता (कार) ३,८५० कि.मी/महिना ४६,२०० कि.मी /वर्ष<br>२) उप अभियंता (जिप) २,७०० कि.मी/महिना ३२,४०० कि.मी /वर्ष |
| | | ३.२.२.२ इंधनावर झालेला जादा खर्च आणि तपासणी वाहनांच्या दुरुस्ती व देखभालीसाठी असलेला निधी दुसऱ्या कारणांसाठी वळविणे.<br><br>वित्त विभाग, महाराष्ट्र शासनाने IV करिता इंधन वापराची मर्यादा २००० लिटर प्रति वाहन प्रति वर्ष निर्धारीत (२००९ आणि २०१५) केली आहे. लेखापरीक्षेच्या असे निदर्शनास आले की चाचणी तपासणी केलेल्या ११ पैकी १० सार्वजनिक बांधकाम विभागांनी २०११-१६ दरम्यान इंधन वापरावर रु. १६४ .०६ लक्ष जादा खर्च केला.<br><br>राज्य शासनाने सांगितले की पूर, दुष्काळ, भूमिस्खलन इत्यादी नैसर्गिक आपत्ती दरम्यान आणि सार्वजनिक बांधकाम विभाग अभियंत्याद्वारे महसून अधिकारी, स्थानिक नगराध्यक्ष आणि आमदार तसेच इतर शासकीय विभागांसोबत जिल्हा आणि गट स्तरावर घेण्यात येणाऱ्या बैठकीची संख्या वाढल्यामुळे IV चा वापर वाढला, त्यामुळे इंधन वापर मर्यादेपेक्षा जास्त झाला. तथापि विनिर्दिमानदंडानुसार IV च्या नियंत्रित | कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांना कार व जीपच्या वापराबाबतच्या मर्यादा शासन सा.बां.विभाग परिपत्रक क्र.व्ही.सी.एन.१५९५/३४४/यंत्रसामुग्री दिनांक १४ जून १९९६ नुसार ठरवून दिलेल्या आहेत. (परिशिष्ठ क्र.९ ) तथापि काही अपरिहार्य कारणास्तव या मर्यादेचे उल्लंघन होवू शकते.वापराच्या मर्यादेचे उल्लंघन होण्याची काही कारणे खाली नमूद करण्यात आली आहेत. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | वापराकरिता मार्गदर्शक तत्वे निर्गमित करण्यातयेत आहेत. | |
| | | इंधनावरील जादा खर्च सक्षम अधिकाऱ्यांच्या मंजुरी शिवाय करण्यात आला ही वस्तुस्थिती विभागातील कमकुवत आंतरिक नियंत्रण दर्शविते. | कार्यकारी अभियंतापेक्षा वरच्या दर्जाच्या अधिकाऱ्याना वाहन वापर मर्यादा निश्चित केलेली नाही.वरिष्ठ दर्जाच्या अधिका-यांचा निरीक्षण वाहनांना, संबंधीत विभागाकडुन इंधन दिले जाते. तरी सदर वाहनांचा इंधन खपाचा अंतर्भाव त्या विभागाच्या एकुण इंधन खर्चात करण्यात येतो. याबाबत शासन सा.बां.विभाग परिपत्रक क्र. संकिर्ण-२०१६/प्र.क्र.३६/यं.बा.सा. दि. १९/११/२०१६ (परिशिष्ट क्र. १० ) च्या परिपत्रकानुसार कार्यवाही करण्यात येते तसेच जादा वापरासाठी कार्योत्तर मंजूरी सक्षम अधिका-यांकडुन घेण्यात येते. या बाबत शासनाने वेळोवेळी सूचना निर्गमित केलेल्या आहेत. त्याप्रमाणे संबंधीत अधिकाऱ्यांकडुन संनियंत्रण केले जात. |
| | | याशिवाय प्रेसिडेंसी (Presidency) विभाग, मुंबई यांच्या दस्तावेजांच्या तपासणीत असे आढळले की २०१३-१६ दरम्यान रु.५१.१४ लक्षाचा दुरुस्ती व देखभाल निधी निरनिराळ्या कारणांसाठी जसे खाजगी ट्रॅव्हेल एजेन्सीला भुगतान, न्यायालीयन शुल्क (कोर्ट फी) भुगतान अशोक स्तंभाची रंगरंगोटी आणि मंत्रालय इमारतीमध्ये पदधारक बोर्ड बसविणे, दवाखाना उप-विभाग ,एम.एल.ए हॉस्टेल उप-विभाग आणि केंद्रीय उप-विभाग मुंबई यांना अग्रिम/हस्तांतरण देण्यासाठी वळविण्यात आला. | इलाखा शहर विभाग, मुंबई (Presidency) या विभागाकडुन प्राप्त झालेले स्पष्टीकरण सोबत सादर (परिशिष्ट क्र. ११ )<br>अ) अनुदान वाटप ओ.एम.आर. ५१.४१ लक्ष वरील अनुदान यंत्रसामुग्रीवर खर्ची पडले<br>१) वरिष्ठ अधिका-यांना शासकीय कामाकरिता खाजगी वाहने सक्षम अधिका-यांच्या परवानगीने देण्यात आली. (परिशिष्ट क्र. १२ )<br>२) न्यायालय फी निरीक्षण वाहनावरील वाहन चालकांचे मानधन असून सदर मानधन न्यायालयीन आदेशानुसार जमा केले जातात.<br>३) स्थापत्य कामाच्या शिर्षातून देयक अदा- माहे फेब्रु-२०१६ मध्ये इंधन देयक नियमित अनुदानातून देण्यात आलेली आहे. सदर रक्कम वळती करण्यात आलेली आहे.<br>४) आगाऊ रक्कम उपविभागास देणे- सदर रक्कम किरकोळ दुरुस्ती व इंधन खर्चाकरिता मध्य उपविभाग व यांत्रिकी उपविभागास देण्यात आली. याबाबतचा |

| | | |
|---|---|---|
| परिच्छेद क्र.३.२.३ | विभागीय कार्यशाळांचे कामकाज<br>सार्वजनिक बांधकाम विभागाच्या यांत्रिकी शाखे अंतर्गत वाहनांच्या / यंत्रसामग्रीच्या दुरुस्ती आणि देखभाली साठी एकूण २७ कार्यशाळा आहेत. जुलै १९८२ च्या शासन निर्णयानुसार सर्व कार्यशाळा आणि हॉट मिक्स प्लांट्स ह्या वाणिज्यिक तत्वावर जॉब कार्ड पध्दतिने चालविण्यात यावयास पाहिजे २७ पैकी सहा कार्यशाळांच्या अभिलेख्यांच्या चाचणी-तपासणीत खालील प्रमाणे आढळले.<br>• २०११-१६ दरम्यान चार कार्यशाळांमध्ये दुरुस्ती व देखभालीची कामे करण्यात आली नाहीत, परंतु या कालावधीत कार्यशाळांमध्ये २९ ते ३७ तांत्रिक आणि अ - तांत्रिक (Non Technical) कर्मचारी वर्ग कार्यरत असल्याचे आढळले. या कर्मचारी वर्गाच्या वेतन आणि भत्यांवर या निष्क्रीय कालावधीत रु.३.७२ कोटी खर्च झाला. जेव्हा की २०११-१६ मध्ये दुरुस्ती देखभालीची रु.१४.०३ कोटीची एकूण ४.४२५ कामे बाह्यस्त्रोतीकरण करुन खाजगी अभिकरणाला देण्यात आली. | कार्यशाळांसाठी पायाभूत सुविधा हत्यारे, उपकरणे इत्यादीचा अभाव आणि अपूरे कुशल मनुष्यबळ त्यामुळे दुरुस्तीची कामे बाह्ययंत्रणेद्वारे केली गेली. उपलब्ध तांत्रिक मनुष्यबळ इतरत्र वापरले जाते उदा.यांत्रिकी संदर्भात यंत्रसामुग्रीची किरकोळ कामे. शासकीय कार्यालयातून वर्षानुवर्षे केली जाणारी, पण सद्याच्या बदललेल्या स्थितीत जी सहजपणे बाहेरुन करुन घेता येतील, अशी कामे शासकीय कर्मचाऱ्यांकडून करुन घेण्याऐवजी ती शक्यतो बाह्य यंत्रणेकरुन (Outsourcing द्वारे ) करण्याचे पर्याय अवलंबण्याच्या सूचना शासन वित्त विभागाचे परिपत्रक पदनि,२०१०/८४/९०/विसु-२ दि.२७/९/२०१० अन्वये देण्यात आल्या आहेत. (परिशिष्ट क्र. १९ ) |
| | • उर्वरीत दोन कार्यशाळामध्ये (नागपूर आणि नाशिक) २०११-१६ दरम्यान रु. ८५ .०७ लक्ष किमतीची ८६६ दुरुस्ती व देखभालीची कामे निष्पादित केल्या गेली. त्याच कालावधीत रु.५.९० कोटी किमतीची ९७१ कामे बाह्यस्त्रोतांद्वारे निष्पादित केल्या गेली. तथापी जुलै १९८२ च्या शासन निर्णयाच्या विरुध्द ह्या दोन कार्यशाळामध्ये निष्पादित झालेल्या ८६६ कामांसाठी जॉब कार्डस तयार केल्याचे आढळले नाही. | यांत्रिकी अभियंत्यांना सहाय्यक म्हणून काम करणारा लेखनिक कर्मचारी वर्ग नाही, म्हणूनच अपूऱ्या कर्मचारी वर्गामुळे जरी दुरुस्तीची कामे उपलब्ध जोडारी, मदतनीस यांचेकडून करुन घेतली असली तरी त्यांच्या नोंदी ठेवण्यात आलेल्या नाहीत. |
| | • सार्वजनिक बांधकाम लेखा संहिता १९८४ नुसार प्रत्येक कार्यशाळेचे भांडवले लेखे, उत्पादन लेखे (Outturn Account) आणि नफा - तोटा लेखे असलेले प्रपत्र लेखे (Performa Account) दर वर्षी तयार करावयास पाहिजे चाचणी तपासणी केलेल्या सहा कार्यशाळांत २०११-१६ मध्ये प्रपत्र लेखे तयार केले नव्हते. परिणामी मालमत्ता जसे इमारती, संयंत्रे,यंत्रसामग्री, भांडार, साहित्य | क्षेत्रिय स्तरावर कार्यशाळेचा प्रपत्र लेखा ठेवलेला नाही. सा.बां.विभागाअंतर्गत कार्यशाळा छोटया स्वरुपाच्या असून त्यात छोटी दुरुस्ती कामे व नियमित देखभाल दुरुस्ती केली जाते. तसेच वर्कशॉप सस्पेन्स या शिर्षाखाली कार्यशाळा चालन करिता अंदाजपत्रक तयार केले नसून सदर शिर्षाखाली अनुदान उपलब्ध झालेले नाही. या कार्यालयाच्या धारणेनुसार प्रोफार्मा अकाउंट मोठया कार्यशाळेसाठी असून |

| | | | |
|---|---|---|---|
| | | इत्यादिंच्या वर्तमान मूल्याबाबत तसेच या कार्यशाळांत उपयोगात आणलेले मजूर आणि या कार्यशाळापासून मिळणाऱ्या नफ्याची स्थिती याबाबत विभागाजवळ माहिती नव्हती. | ज्यात निर्मिती कामे केली जातात.<br><br>स्पष्टीकरण मान्य करण्यात यावे. |
| | | राज्य शासनाने वस्तुस्थिती मान्य केली आणि नमूद केले की विभागीय कार्यशाळांपैकी बहुतेक कार्यशाळा ५० वर्षांपूर्वी स्थापित करण्यात आल्या होत्या. जेव्हा जास्तीत जास्त विभागीय संयंत्रे मूलभूत सुविधा जसे रस्ते, इमारती इत्यादिंच्या बांधकामासाठी उपयोगात आणल्या जात होते. आस्थापना खर्चावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर सप्टेंबर २०१० मध्ये विभागीय दुरुस्ती व देखभाल कामे बाह्य स्त्रोताद्वारे करविण्याचा निर्णय घेण्यात आला. कार्यशाळेच्या कर्मचारी वर्गाचा उपयोग वाहनांची आणि यंत्रसामग्रीची निगा राखण्यासाठी करण्यात येतो, परंतू राज्य शासनाने स्विकृत केल्या प्रमाणे कार्यशाळांद्वारे कोणतेही दस्ताऐवज ठेवण्यात आले नव्हते. तथापी विभागीय कार्यशाळा बंद करुन या कार्यशाळांची जागा सार्वजनिक खासगी भागीदारीने महसूल उत्पन्न करण्याच्या दृष्टीने विकसित करण्यात येईल. | खाजगी कार्यशाळा, जिल्हास्तरावर उपलब्ध असल्याने शासनाचे विभागीय कार्यशाळा टप्पाटप्याने बंद करण्याचे नियोजन आहे. महसूल वाढीकरिता या कार्यशाळेची जमीन सार्वजनिक खाजगी भागीदारीतून विकसित करण्याचे नियोजन आहे. |
| | परिच्छेद क्र.३.२.४ | आंतरिक नियंत्रण<br>वाहने/यंत्रसामुग्रीची खरेदी, उपयोग आणि देखभाल या संबंधी आढावा घेण्यासाठी अधीक्षक अभियंता (यांत्रिकी) यांच्या अध्यक्षतेखाली २०११-१६ दरम्यान २३ बैठकी आयोजित करण्यात आल्या. तथापी फक्त सहा बैठकीचे कार्यवृत्त तयार करण्यात आले. वाहनांच्या/यंत्रसामुग्रीच्या स्थितीच्या आढाव्याबद्दल दुसरे कोणतीही केंद्रीकृत संनियंत्रण कार्यप्रणाली नव्हती. त्यामुळे वाहने/यंत्रसामुग्रीची खरेदी उपयोग आणि देखभाली साठी असलेल्या आंतरिक कार्यप्रणालीच्या पर्याप्ततेचे परीक्षण लेखापरिक्षण करता आले नाही.<br><br>राज्य शासनाने नमूद केले की भविष्यात घेण्यात येणाऱ्या बैठकींचे कार्यवृत्त तयार करण्यात येतील. याशिवाय, वाहन यंत्रसामग्रीवरील खर्चाच्या संनियंत्रणेसाठी प्रत्येक विभागाने दुरुस्ती व देखभालीवर झालेला मासिक खर्च दर्शविणारी कार्य गोषवारा नोंदवही (Works Abstract Register) तयार करावयास पाहिजे. ११ सार्वजनिक बांधकाम विभागांच्या दस्तावेजांच्या चाचणी तपासणीत असे आढळले की, १० | सन २०११-१६ दरम्यान अधीक्षक अभियंता (यांत्रिकी) कार्यालयात तांत्रिक मनुष्यबळ अतिशय कमी असल्याने, घेण्यात आलेल्या काही आढावा बैठकींचे कार्य इतिवृत्त निर्गमित करता आलेले नाही. आज स्थितीमध्ये अधीक्षक अभियंता (यांत्रिकी) कार्यालयात कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता यांची पाचही पदे रिक्त आहेत. तथापी यंत्रसामुग्री वरिल खर्च, वापर, निर्लेखन प्रस्ताव, ई-ऑक्शन ईत्यादीवर सनियंत्रण ठेवण्यासाठी परिश्रम घेतले जात आहेत. तसेच लेखापरिक्षणामध्ये निदर्शनास आणल्याप्रमाणे नंतरच्या घेण्यात आलेल्या ७ आढावा बैठका घेण्यात आल्या व त्याची इतिवृत्त निर्गमित करण्यात आली आहेत.<br><br>शासन परिपत्रक क्र.संकिर्ण- २०१६/प्र.क्र.३६/यं.बा.सा. दि.१९/१४/२०१६ अन्वये सर्व सा. बां. विभागांना कार्यगोषवारा नोंदवही ( Work Abstract Register ), इतिहास नोंद वही ( History Sheets ), ठेवण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. (परिशिष्ट क्र. ४) |

| | | | |
|---|---|---|---|
| | | विभागांनी (अचलपूर वगळून) कोणतीही कार्य गोषवारा नोंदवही तयार केली नाही. असे दस्तावेज नसल्यामुळे वाहनाच्या आणि यंत्रसामग्रीच्या दुरुस्ती व देखभाली वरील खर्चावर नियंत्रण ठेवण्यात आले नाही. | |
| | परिच्छेद क्र.३.२.५ | निष्कर्ष आणि शिफारशी<br>नविन वाहने/बांधकाम कार्य यंत्रसामग्रीची खरेदी, जुने आणि दुरुस्ती करणे शक्य होणार नाही अशी वाहने/यंत्रे आणि त्याची विल्हेवाट याबाबतची पध्दती त्रुटीपूर्ण होती.<br>बांधकाम कार्य यंत्रे आणि तपासणी वाहनाची दुरुस्ती व देखभाल आणि जुन्या तपासणी वाहनांना लागणारे इंधन यावरील खर्च विहित मापदंडापेक्षा खुप जास्त असल्याचे आढळले. विभागीय कार्यशाळांची उपयुक्ता आणि वाहने यंत्रे यांच्या देखभाल-दुरुस्तीवर लागणाऱ्या खर्चावर संनियंत्रण ठेवण्यासाठी मुलभत दस्तावेज राखण्यात आले नाही. वाहने/यंत्रे यांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी असलेल्या कार्यशाळांची देखील योग्य प्रकार उपयोग करण्यात येत नव्हता आणि बहुतेक कामे बाह्यस्त्रोताद्वारे खाजगी एजेन्सींना सोपविण्यात आले. | सन २०११ नंतर शासकीय वाहनांच्या लिलावाची कोणती प्रणाली अवलंबित करावी "Open Auction" किंवा "e- Auction" याबाबत e- Auction अमलात आणण्याबाबतचे शासन पत्र दि.१/८/२०१४ (परिशिष्ट क्र.३ ) नुसार निश्चित करण्यात आले. खात्याकडील अपूरे तांत्रिक मनुष्यबळ व ई- लिलाव प्रक्रियेचा पुरेसा अनुभव नसल्याने व ई-लिलाव प्रक्रियेस अपु-या प्रतिसादामुळे निर्लेखित वाहने/बांधकाम कार्य यंत्रसामग्रीची विल्हेवाट लावण्याच्या कार्यवाहीस विलंब झाला. सा.बां.विभागांतर्गत बांधकाम यंत्रसामुग्रीचा आढावा घेण्याकरिता आवश्यक सुचना परिपत्रक नं/संकीर्ण/-२०१६/प्र.क्र.३६/यं.बां.सा.दि. १९/११/२०१६ (परिशिष्ट क्र.१४) दिलेल्या आहे. त्यानुसार दि. १/८/२०१६ पासून दि.३१/८/२०१७ पर्यंत निर्लेखित ६२ IV व ३७ CM ची ई-लिलावाद्वारे विक्री करुन विल्हेवाट लावण्यात आली असून ई-लिलाव विक्रितून अंदाजे रु. ३५.०० लक्ष इतकी रक्कम प्राप्त झाली आहे.<br>शासन परिपत्रक क्र.संकिर्ण- २०१६/प्र.क्र.३६/यं.बा.सा. दि.१९/११/२०१६ अन्वये वाहने,यंत्रे यांच्या देखभाल-दुरुस्तीवर लागणाऱ्या खर्चावर संनियंत्रण ठेवण्यासाठी मूलभत दस्तावेज ठेवण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. (परिशिष्ट क्र. ४ ) |

| | | | |
|---|---|---|---|
| | | शासनाने सार्वजनिक बांधकाम व त्यांची देखभाल योग्य प्रकारे कार्यक्षमतापूर्वक व्हावी या दृष्टीने वाहने व यंत्रांच्या खरेदीसाठी आणि जुन्या /दुरुस्ती करणे शक्य होणार नाही अशा वाहनांना उचित समयी बदलण्यासाठी एक व्यापक योजना आखावी. कार्यशाळांचा सतत कमी वापर होणे आणि परिणामस्वरुप आस्थापनांवर मोठा खर्च होणे विचारात घेऊन कार्यशाळा दीर्घकाळ सुरु ठेवण्याचा शासनाने आढावा घ्यावा. | शासनाने सार्वजनिक बांधकाम व त्यांची देखभाल योग्य प्रकारे कार्यक्षमतापूर्वक व्हावी या दृष्टीने वाहने व यंत्रांच्या खरेदीसाठी आणि जुन्या / दुरुस्ती करणे शक्य नसल्याने त्याबाबत आढावा घेऊन शासन परिपत्रक (एकूण-२) दिनांक १९/११/२०१६ अन्वये सूचना निर्गमित केलेल्या आहेत. (परिशिष्ट क्र. ४,१४,१५) त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे. कार्यशाळा दिर्घकाळ सुरु ठेवण्याबाबत शासन स्तरावर आढावा घेण्यात येत आहे. |

(Annexure-I)

No S.E.(M.)/10/ 1111/2009
E- Mail :- mechanical.se@mahapwd.com

Office of the Superintending Engineer (Mech.)
Public Works Department, 7 th floor,
Konkan Bhavan, Navi Mumbai- 400 614.
Date :- 16/9/2009

To,

M/s. Shankar Ramchandra Auctioneers,
212, Poornima Towers,
31 A/31B, Shankarsheth Road,
Pune-411037.

Sub :- Appointment of Auctioneer to conduct Auction on behalf of Government of Maharashtra, Public Works Department.

Ref :-1) This office Tender Notice issued vide letter no. SE (M)/ PW/10/ 736 Dated 17/6/2009
2) This office letter No.SE(M)/PW/10/ 984 Dated 5/9/2009
3) This office letter No.SE(M)/PW/10/ 1001 Dated 9/9/2009

As you have accepted the terms and conditions of tender and remitted the security deposit. You are hereby appointed as " Auctioneer " to conduct the public auction sales of unserviceable Heavy/Light machinery such as Tractors, Trucks, Tippers, Tankers, Rollers, Car, Jeeps, Compressor, Pumps, Vibrator etc, unserviceable spare parts of such machinery, other unserviceable material and equipment including dismantled materials, tyres, tubes, batteries, burnt oil, steel or metal scrap and surplus machinery in working conditions etc. belonging to P.W. Department on "As is where is basis" any where in State of Maharashtra, as per the tender submitted by you and as per the rates quoted by you, terms and conditions mentioned therein the tender and signed the agreement made between yourself and the undersigned on 14/9/2009 in token of acceptance of Tender.

(A certified Xerox copy of an agreement is enclosed herewith for your information and necessary action.)

You are requested to start the work of conducting the public auction sale whenever and wherever required by the P.W. Department in State of Maharashtra as above, your special attention is invited to clause No.4.8 and 4.14 in this regard.

This work order will remain enforce upto15/9/2011. You are requested to abide by the terms and condition mentioned in agreement. All other terms and conditions not specifically mentioned here is applicable as per terms and conditions, as per the tender notice and subsequent agreement signed by you in token of your acceptance. This order and letters mentioned under reference are part and parcel of the said tender document issued vide letter No. 736 Dated 17/6/2009 and subsequent agreement. Please acknowledge the receipt of this letter.

Thanking you,

Your's Faithfully,

( S. T. Pandit )
Superintending Engineer (Mech.)
Public Works Department,
Konkan Bhavan , Navi Mumbai.

Enclosed - As Above
( Certified Copy of Agreement )

Copy with copy of tender document is submitted to the Chief Engineer and Joint Secretary, Public Works Department, Mantralaya, Mumbai for favour of information please.
This has reference to Govt. letter No. MCN-2009/400/P.K.45/Machinery dated 31/8/2009
Copy with copy of Tender document is submitted to the Accountant General Mumbai for favour of information.
Copy with copy of Terms and Condition of contract document is submitted to Chief Engineer, P.W. Region Mumbai/Pune/Nasik/Aurangabad/Amravati/Nagpur/N.H. Konkan Bhavan/ Electrical, Mumbai/Special Project, Mumbai for favour information.

(Annexure-2)

जा.क्र. सा.बां.(यां.)/१०/७०४७/२०११.
ई-मेल:- mechanical.se@mahapwd.com

अधीक्षक अभियंता (यांत्रिकी),
सार्वजनिक बांधकाम विभाग, ७ वा मजला,
कोकण भवन, नवी मुंबई - ४०० ६१४.
यांचे कार्यालय.
दिनांक :- 24 NOV 2011

प्रति,

मा. मुख्य अभियंता व सहसचिव,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.

विषय :- निर्लेखित वाहने, यंत्रसामुग्री इत्यादीची लिलावाद्वारे विक्री करण्याकरीता शासकीय लिलावदाराची नियुक्ती करणेबाबत.

संदर्भ :- १) शासन पत्र क्र.एमसीएन-२००९/४००/प्र.क्र.४५/यंत्रसामुग्री-बां.सा. दि.३१/८/२००९
२) या कार्यालयाचे पत्र क्र.सा.बां.(यां.)/१०/१०१९ दि.२६/११/२००९

सादर करण्यात येते की, उपरोक्त संदर्भानुसार मे. शंकर रामचंद्र ऑक्शनिअर्स, पुणे यांची दि.१८/९/२००९ ते १५/९/२०११ या कालावधीसाठी सा.बां. विभागाकरीता शासकीय लिलावदार म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्यांचे नेमणुकीचा कालावधी संपुष्टात आल्या कारणाने सध्या सार्वजनिक बांधकाम विभागाकरीता शासकीय लिलावदार म्हणून कोणीही कार्यरत नाही.

सार्वजनिक बांधकाम विभागाकडे असणा-या जुन्या निर्लेखित यंत्रसामुग्री व वाहनांची लिलावाद्वारे विक्रि करण्याकरीता लिलावदाराची नियुक्ती करणे गरजेचे आहे. लिलावदाराचे नियुक्तीकरिता पूर्व अर्हता निश्चित करण्यासाठी प्रारुप निविदा संच मान्यतेसाठी सोबत सादर करण्यात येत आहे. प्रारुप निविदा संचास मान्यता मिळाल्यानंतर लिलावदाराचे नियुक्तीबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

सध्या शासकीय लिलावदार नसल्याने निर्लेखित वाहने यंत्रसामुग्री व भंगार इत्यादी साहित्याची लिलावाद्वारे विक्री करता येऊ शकत नाही. निर्लेखित यंत्रसामुग्री वाहने जास्त दिवस पडून राहिल्यास त्याची किंमत कमी होण्याची शक्यता विचारात घेता वर नमूद प्रारुप निविदा संचास मान्यता मिळावी. हि विनंती.

सोबत :- वरिलप्रमाणे.

( अ. बा. शिरभाते )
अधीक्षक अभियंता (यांत्रिकी),
सार्वजनिक बांधकाम विभाग,
कोकण भवन, नवी मुंबई.

(Annexure-3)

महाराष्ट्र शासन

क्रमांक : एमसीएन-२०११/प्र.क्र.१२४/यं.बां.सा

सार्वजनिक बांधकाम विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२,
दिनांक - ०१/०८/२०१४.

कार्यालयीन आदेश

अधीक्षक अभियंता (यांत्रिकी), सार्वजनिक बांधकाम विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांना त्यांचे पत्र क्रमांक जा.क्र.सा.बां.(यां.)/तां-१/५२०/२०१४, दि.०२/०६/२०१४ च्या अनुषंगाने कळविण्यात येते की, त्यांनी शिफारस केल्याप्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभाग व अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयातील निर्लेखित वाहने व यंत्रसामग्री इत्यादींची लिलावाद्वारे विक्री करण्याकरीता NIC कडील संगणक कार्यप्रणालीच्या सहाय्याने ई-ऑक्शन पध्दत राबविण्याबाबत त्वरीत कार्यवाही करावी.

(वि.लि.बेंद्रे)
कार्यासन अधिकारी

प्रति,
अधीक्षक अभियंता (यांत्रिकी), सार्वजनिक बांधकाम विभाग, कोकण भवन, नवी मुंबई

प्रत माहितीसाठी अग्रेषित,
१) सर्व मुख्य अभियंते, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, महाराष्ट्र राज्य.
२) सर्व अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, महाराष्ट्र राज्य.
३) सर्व कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र राज्य.
४) मा. सचिव (बांधकामे), यांचे स्विय सहायक, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) मा. सचिव (रस्ते), यांचे स्विय सहायक, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.

अधीक्षक अभियंता (यांत्रिकी), सा. बां. विभाग कोकण भवन न. मुंबई
| | |
|---|---|
| [illegible] | |
| [illegible] | |
| [illegible] | |
| [illegible] | [illegible] |
| [illegible] | Email 93 |
| दिनांक | 9/8/14 |

पुढील कार्यवाही [illegible]

(Annexure-4)

सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत असलेल्या निरिक्षण वाहने व यंत्रसामग्री यांचे व्यवस्थापन व लेखा पध्दती.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग
शासन परिपत्रक क्रमांक- संकिर्ण -२०१६/प्र.क्र.३६/यं.बा.सा.
मंत्रालय, मुंबई ४००० ०३२
दिनांक- १९ नोव्हेंबर, २०१६.

वाचा :- १) शासन परिपत्रक क्र. एसटीडी १०९४/२६८/का.यंत्रसामुग्री, दि. १६/७/१९९६.
२) शासन परिपत्रक क्र.संकिर्ण-२०१५/प्र.क्र.२६/१५, विनियम, दि.१३/८/२०१५.

प्रस्तावना :-

शासन सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत निरीक्षण वाहने व यंत्र सामग्री वापरात आहे. सदरील वाहने व बांधकाम यंत्रसामग्रीचा वापर व लेखे या बाबतच्या अभिलेख क्षेत्रिय स्तरावर अद्ययावत ठेवणे अभिप्रेत आहे. तथापि सर्वसाधारणपणे अशा स्वरुपाची कार्यवाही होत नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे शासकीय वाहने तसेच यंत्रसामग्रीचा वापर व त्यावर होणारा खर्च याचा ताळमेळ घालणे ब-याचदा शक्य होत नाही. तसेच लेखा न ठेवल्याने निर्लेखित वाहनांची लिलावाद्वारे विक्री होण्यास विलंब होतो. पर्यायाने सदर वाहनांचे विल्हेवाट किंमतीत घट झाल्याने शासनास मिळणा-या महसूलामध्ये देखील घट होते. या संदर्भात महालेखाकार कार्यालयाकडून आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत.या बाबी विचारात घेऊन या संदर्भात पुढीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

परिपत्रक :-

१) यंत्रसामुग्री लेखा :-

सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत असलेल्या निरिक्षण वाहने व बांधकाम यंत्रसामग्रीच्या वापराचा विविध गटवार खर्च नोंदवून कार्य गोषवारा नोंदवही (Works Abstract Register) विभागीय कार्यालयात ठेवण्यात यावी . सदर नोंदवहीची मासिक पूर्तता करण्यात यावी. यंत्रसामग्रीच्या वापरानुसार प्राप्त झालेल्या उत्पन्नाचे खाते नोंद बदल आदेश (Transfer Entry Order) विभागीय स्तरावर करुन आवश्यक त्या नोंदी कार्य गोषवारा नोंदवहीत घेण्यात याव्यात.

क्षेत्रिय उप अभियंता यांनी त्यांचे अधिनस्त यंत्र सामग्री वापराचा कार्य गोषवारा (Works Abstract) व कार्य लेखा (Works Account) यांचे मासिक विवरण तयार करुन त्याची प्रत उप अभियंता (यांत्रिकी) व संबंधीत विभागीय कार्यालयास ताळमेळ घालण्यासाठी द्यावी. यंत्र सामग्री वापरासाठी दुहेरी नोंदवहीची पध्दत वापरण्यात यावी.

विभागाकडील प्रत्येक निरीक्षण वाहन/बांधकाम यंत्रसामग्रीच्या दुरुस्तीची नोंद घेण्यासाठी स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात यावी. तसेच दुरुस्ती कामांची नोंदवही (Estimate Register) यांत्रिकी उप विभाग स्तरावर अद्ययावत ठेवण्यात यावी. वाहन/ यंत्र सामग्री दुरुस्तीच्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यापूर्वी सक्षम प्राधिकारी यांनी सुटे भाग बदलण्याची वारंवारता तसेच दुरुस्तीवरील होणारा खर्च ह्या दोन्ही बाबी अनुज्ञेय मर्यादेत होत असल्याची तसेच यंत्र सामग्रीचा क्षेत्रिय स्तरावर समयोचित वापर होत असल्याची वैयक्तिक दक्षता घ्यावी. सर्व वाहन/यंत्र सामग्रीच्या दुरुस्तीच्या तांत्रिक मान्यता आदेशांची नोंदवही (Technical Sanction Register) सहाय्यक मुख्य अभियंता (यांत्रिकी) यांचेस्तरावर ठेवण्यात यावी.

वरील प्रकरणी सहाय्यक मुख्य अभियंता (यांत्रिकी) यांनी आपले कार्यक्षेत्रातील सर्व निरिक्षण वाहने व यंत्र सामग्रीचा वापर व त्यावरील खर्च याबाबत सहामाही आढावा घेवून अधीक्षक अभियंता (यांत्रिकी) यांचे मार्फत शासनास वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करावा.

२) निर्लेखित यंत्रसामुग्री/वाहने यांच्या लिलावाबाबतची कार्यवाही :-

निरुपयोगी / दुरुस्ती न होण्याजोग्या / अतिरिक्त अथवा आयुर्मान संपलेल्या शासकिय भांडार वस्तु, यंत्रसामुग्री, वाहनांची लिलावाद्वारे विक्री करण्याबाबत संदर्भ क्र. २ च्या परिपत्रकान्वये मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदरील परिपत्रकातील सुचनांचे काटेकोरपणे पालन होईल, याची दक्षता क्षेत्रिय अधिका-यांनी घ्यावी. सद्यस्थितीत प्रलंबित असलेली निर्लेखित वाहने/ यंत्र सामग्रीची विक्री करुन विल्हेवाट लावण्याची कार्यवाही प्राधान्याने हाती घेऊन दोन महिन्यात पूर्ण करण्यात यावी.तसेच यापुढे वाहनाच्या निर्लेखन अहवाल मंजुरीपासून तीन महिन्याच्या कालमर्यादेत निर्लेखित वाहनाची विहीत कार्यपध्दतीचे अनुपालन करुन ई लिलावाद्वारे प्राधान्याने विक्री करुन विल्हेवाट लावण्याची जबाबदारी संबंधित वाहनधारक क्षेत्रिय अधिकाऱ्याची राहील. प्रादेशिक विभागांमध्ये तशा स्वरुपाची कार्यवाही होत असल्याबाबतची शहानिशा करण्याची जबाबदारी संबंधित सहा.मुख्य अभियंता (यांत्रिकी) यांची राहील.

वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. वरील प्रमाणे कार्यवाही न करणा-या अधिका-यांवर शिस्तभंगविषयक कारवाई करण्याचा प्रस्ताव नियंत्रक अधिका-यांनी सक्षम प्राधिका-याकडे सादर करण्याची कार्यवाही करावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक २०१६१११९१५५१५३९६१८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Pradeep E Dalvi
Digitally signed by Pradeep E Dalvi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=PWD Department, postalCode=400032, st=Maharashtra, [illegible], cn=Pradeep E Dalvi
Date: 2016.11.18 15:54:12 +05'30'

(प्रदीप दळवी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

१. प्रधान सचिव , सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
२. सचिव (बांधकामे)/ सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
३. मुख्य अभियंता व सह सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
४. आंतरवित्तीय सल्लागार तथा उप सचिव ,सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
५. सर्व मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग .
६. मुख्य अभियंता (विद्युत), बांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१.
७. मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, मुंबई.
८. सर्व उप सचिव ,सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
९. सर्व अधिक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम मंडळ.
१०. अधिक्षक अभियंता (यांत्रिकी), नवी मुंबई.

११. अधिक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, नवी मुंबई /पुणे/नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर.
१२. प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्या., मुंबई.
१३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरिक्षा) महाराष्ट्र-१ मुंबई
१४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता /लेखापरिक्षा) महाराष्ट्र-२, नागपूर.
१५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (दोन प्रती).
१६. निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
१७. कार्यासन बांधकाम साहित्य (निवडनस्ती).

(Annexure-5)

Expenditrue incurred on M & R excess than norms

| Year | Name of construction machinery | Registration number of construction machinery | Total run in km/hour in the year | Expenditure on component "B" Spare (Rs.) | Expenditure on component "B" labour (Rs.) | Total expenditrue on B Rs. | Rate per km/hr as per norms Rs. | Actual expenditrde per km/hr Rs. | Excess expenditrue per km/hr | Excess expenditrue than norms Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2011-12 | TRUCK | MTS-5874 | 29754 | 389000 | 0 | 389000 | 8.20 | 13.07 | 4.87 | 145017.20 |
| 2011-12 | TRUCK | MTG-9927 | 7908 | 244000 | 109000 | 353000 | 8.20 | 44.64 | 36.44 | 288154.40 |
| 2011-12 | TRUCK | MWN-1496 | 2522 | 349000 | 143000 | 492000 | 8.20 | 195.08 | 186.88 | 471319.60 |
| 2011-12 | TRUCK | MWN-2407 | 5899 | 278000 | 62000 | 340000 | 8.20 | 57.64 | 49.44 | 291626.20 |
| 2011-12 | TIPPER | MTD-2153 | 10484 | 563000 | 8000 | 571000 | 7.00 | 54.46 | 47.46 | 497612.00 |
| 2011-12 | TIPPER | MWN-1768 | 3400 | 328000 | 82000 | 410000 | 7.00 | 120.59 | 113.59 | 386200.00 |
| 2012 - 2013 | DRR | 9025 | 121 | 182000 | 25000 | 207000 | 84.00 | 1710.74 | 1626.74 | 196836.00 |
| 2012 - 2013 | DRR | 8536 | 449 | 176000 | 31000 | 207000 | 84.00 | 461.02 | 377.02 | 169284.00 |
| 2012 - 2013 | TRUCK | MTG-9927 | 8653 | 228000 | 81000 | 309000 | 9.00 | 35.71 | 26.71 | 231123.00 |
| 2012 - 2013 | TRUCK- | MWN-1496 | 1649 | 158000 | 101000 | 259000 | 9.00 | 157.06 | 148.06 | 244159.00 |
| 2012 - 2013 | TIPPER | MTD-2153 | 26825 | 380000 | 53000 | 433000 | 8.00 | 16.14 | 8.14 | 218400.00 |
| 2012 - 2013 | TIPPER | MWN-1768 | 5974 | 87000 | 45000 | 132000 | 8.00 | 22.10 | 14.10 | 84208.00 |
| 2013 - 2014 | DRR | 9025 | 352 | 356000 | 64000 | 420000 | 134.00 | 1193.18 | 1059.18 | 372832.00 |
| 2013 - 2014 | DRR | 8536 | 191 | 278000 | 24000 | 302000 | 134.00 | 1581.15 | 1447.15 | 276406.00 |
| 2013 - 2014 | TRUCK | MTS-5874 | 19468 | 351000 | 16000 | 367000 | 10.00 | 18.85 | 8.85 | 172320.00 |
| 2013 - 2014 | TRUCK | MTG-9927 | 6231 | 338000 | 38000 | 376000 | 10.00 | 60.34 | 50.34 | 313690.00 |
| 2013 - 2014 | TRUCK | MWN-1496 | 1461 | 409000 | 15000 | 424000 | 10.00 | 290.21 | 280.21 | 409390.00 |
| 2013 - 2014 | TIPPER | MWN-1768 | 5682 | 248000 | 71000 | 319000 | 12.00 | 56.14 | 44.14 | 250816.00 |
| 2014 - 2015 | DRR | 9025 | 138 | 78000 | 6000 | 84000 | 138.00 | 608.70 | 470.70 | 64956.00 |
| 2014 - 2015 | DRR | 8536 | 740 | 212000 | 40000 | 252000 | 138.00 | 340.54 | 202.54 | 149880.00 |
| 2014 - 2015 | TRUCK | MWD-1542 | 3[illegible]234 | 364000 | 101000 | 465000 | 10.30 | 14.43 | 4.13 | 132989.80 |

Deputy Engineer
M... [illegible]

**O.M.&R. ESTIMATE MASTER**
( PERIOD : 1/4/2011 TO 31/3/2012)

| Sr.No. | Type of Equipment | Make | Capacity | Utilisation as per norms | Depreciation (A) Hr/Kms | Repairs Charges (B) Hr/Kms | Running & Maintenance Charges (C) Hr/ Kms | Repairs Charges including labour (B+C5) (D) Hr/Kms | Maintenance Crew (C4) (E) Hr/Kms | Operating Crew and Sundries (C3+C6) (F) Hr/Kms | Fuel & Lubricants (C1+C2a+C2 b (G) Hr/Kms | Total (B+C) Hr/Kms | Total (A+B+C) Hr/Kms |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 1 | Car | All Models | – | 30000 Kms. | – | – | – | 4.38 | 0.70 | 6.67 | 7.81 | 19.36 | 19.36 |
| 2 | Diesel Road Roller | All Models | 8To10 Ton | 1000Hrs. | 14.00 | 80.00 | 372.00 | 166.00 | 48.00 | 105.00 | 133.00 | 452.00 | 466.00 |
| 3 | Jeep | All Models | – | 21600Kms. | – | – | – | 4.38 | 0.70 | 9.12 | 5.12 | 19.32 | 19.32 |
| 4 | M.B.I.UNIT | All Models | – | 1000Hrs. | 428.00 | 662.00 | 1131.00 | 903.00 | 59.00 | 563.00 | 268.00 | 1793.00 | 2221.00 |
| 5 | Mobile Van | All Models | 3.5Ton | 21600Kms. | 1.00 | 2.40 | 18.60 | 4.40 | 1.00 | 12.00 | 3.60 | 21.00 | 22.00 |
| 6 | Water Tanker | All Models | 7.5Ton | 1000Hrs. | 10.00 | 79.00 | 381.20 | 138.00 | 38.00 | 174.00 | 110.20 | 460.20 | 470.20 |
| 7 | Water Tanker | All Models | 5Ton | 1000Hrs. | 7.00 | 63.00 | 387.20 | 122.00 | 33.00 | 174.00 | 121.20 | 450.20 | 457.20 |
| 8 | Tipper | All Models | 5Ton. | 20000Kms. | 1.00 | 7.00 | 40.10 | 14.00 | 3.00 | 13.00 | 17.10 | 47.10 | 48.10 |
| 9 | Tipper (Tata) | All Models | 7.5Ton | 20000Kms. | 1.00 | 9.50 | 41.10 | 16.50 | 3.00 | 14.00 | 17.10 | 50.60 | 51.60 |
| 10 | Truck | All Models | 5Ton. | 20000Kms. | 1.00 | 6.50 | 32.30 | 9.50 | 3.00 | 13.00 | 13.30 | 38.80 | 39.80 |
| 11 | Truck | All Models | 7.5Ton | 20000Kms. | 1.00 | 8.20 | 38.40 | 13.20 | 5.00 | 15.00 | 13.40 | 46.60 | 47.60 |
| 12 | Wheeled Tractor | All Models | 25To45HP | 500hRS. | 6.00 | 58.00 | 266.00 | 111.00 | 52.00 | 65.00 | 97.00 | 325.00 | 331.00 |

s/d
Superintending Engineer (Mech.)
Public Works Department,
Konkan Bhavan, Navi Mumbai.

(Annexure- 6)

## O.M.&R. ESTIMATE MASTER
(PERIOD : 1/4/2012 TO 31/3/2013)

| Sr.No. | Type of Equipment | Make | Capacity | Utilisation as per norms | Depreciation (A) Hr/Kms | Repairs Charges (B) Hr/Kms | Running & Maintenance Charges (C) Hr/Kms | Repairs Charges Including labour (B+C5) (D) Hr/Kms | Maintenance Crew (C4) (E) Hr/Kms | Operating Crew and Sundries (C3+C6) (F) Hr/Kms | Fuel & Lubricants (C1+C2a+C2b (G) Hr/Kms | Total (B+C) Hr/Kms | Total (A+B+C) Hr/Kms |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 1 | Car | All Models | – | 30000 Kms. | – | – | – | 4.92 | 0.74 | 6.69 | 8.47 | 20.82 | 20.82 |
| 2 | Jeep | All Models | – | 21600Kms. | – | – | – | 4.37 | 0.71 | 9.13 | 5.47 | 19.68 | 19.68 |
| 3 | Mobile Van | All Models | 3.5Ton | 21600Kms. | 1.00 | 4.00 | 22.00 | 6.23 | 1.11 | 14.06 | 4.46 | 26.00 | 27.00 |
| 4 | Diesel Road Roller | All Models | 8To10 Ton | 1000Hrs. | 14.00 | 84.00 | 414.00 | 180.00 | 53.00 | 117.00 | 148.00 | 498.00 | 512.00 |
| 5 | M.B.I.UNIT | All Models | – | 1000Hrs. | 428.00 | 704.00 | 1263.00 | 972.00 | 66.00 | 626.00 | 303.00 | 1967.00 | 2395.00 |
| 6 | Water Tanker | All Models | 5Ton | 1000Hrs. | 7.00 | 68.00 | 430.00 | 133.67 | 36.73 | 193.58 | 133.68 | 498.00 | 505.00 |
| 7 | Water Tanker | All Models | 7.5Ton | 1000Hrs. | 10.00 | 86.00 | 435.00 | 151.67 | 42.29 | 193.58 | 133.68 | 521.00 | 531.00 |
| 8 | Tipper | All Models | 5Ton. | 20000Kms. | 1.00 | 8.00 | 45.00 | 15.79 | 3.34 | 14.45 | 18.96 | 53.00 | 54.00 |
| 9 | Tipper (Tata) | All Models | 7.5Ton | 20000Kms. | 1.00 | 10.00 | 46.00 | 17.79 | 3.34 | 15.56 | 18.96 | 56.00 | 57.00 |
| 10 | Truck | All Models | 5Ton. | 20000Kms. | 1.00 | 7.00 | 36.00 | 10.34 | 3.34 | 14.45 | 14.73 | 43.00 | 44.00 |
| 11 | Truck | All Models | 7.5Ton | 20000Kms. | 1.00 | 9.00 | 43.00 | 14.57 | 5.57 | 16.67 | 14.85 | 52.00 | 53.00 |
| 12 | Wheeled Tractor | All Models | 25To45HP | 500Hrs. | 6.00 | 58.00 | 342.00 | 119.00 | 52.00 | 73.09 | 156.00 | 400.00 | 406.00 |

s/d
Superintending Engineer (Mech.)
Public Works Department,
Konkan Bhavan, Navi Mumbai.

**O.M.&R. ESTIMATE MASTER**
( PERIOD : 1/4/2013 TO 31/3/2014 )

| Sr.No. | Type of Equipment | Make | Capacity | Utilisation as per norms | Depreciation (A) Hr/Kms | Repairs Charges (B) Hr/Kms | Running & Manitenance Charges (C) Hr/Kms | Repairs Charges including labour (B+C5) (D) Hr/Kms | Maintenance Crew (C4) (E) Hr/Kms | Operating Crew and Sundries (C3+C6) (F) Hr/Kms | Fuel & Lubricants (C1+C2a+C2b (G) Hr/Kms | Total (B+C) Hr/Kms | Total (A+B+C) Hr/Kms |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 1 | Car | All Models | | 30000 Kms. | | | | 5.47 | 0.76 | 6.58 | 9.18 | 21.99 | |
| 2 | Jeep | All Models | | 21600Kms. | | | | 4.92 | 0.77 | 8.99 | 6.89 | 21.57 | |
| 3 | Mobile Van | All Models | 3.5Ton | 21600Kms. | 3.00 | 3.00 | 14.00 | 5.00 | 1.00 | 5.40 | 5.60 | 17.00 | 20.00 |
| 4 | Water Tanker | All Models | 7.5Ton | 1000Hrs. | 5.00 | 108.00 | 460.00 | 167.00 | 40.00 | 211.00 | 150.00 | 568.00 | 573.00 |
| 5 | Tipper | All Models | 7.5Ton | 20000Kms. | 2.50 | 12.00 | 38.50 | 18.00 | 4.00 | 13.50 | 15.00 | 50.50 | 53.00 |
| 6 | Truck | All Models | 7.5Ton | 20000Kms. | 1.00 | 10.00 | 38.00 | 15.00 | 4.00 | 13.00 | 16.00 | 48.00 | 49.00 |
| 7 | Diesel Road Roller | All Models | 8To10 Ton | 1000Hrs. | 11.00 | 134.00 | 445.00 | 223.00 | 58.00 | 102.00 | 195.00 | 579.00 | 590.00 |
| 8 | M.B.I.UNIT | All Models | | 1000Hrs. | 360.00 | 751.00 | 1842.00 | 1044.00 | 72.00 | 685.00 | 592.00 | 2393.00 | 2753.00 |
| 9 | JCB Loader | JS 140 | 1.2CuMtr. | 500Hrs. | 172.00 | 194.00 | 1017.00 | 333.00 | 92.00 | 175.00 | 611.00 | 1211.00 | 1383.00 |
| 10 | CAT Dozer | D4E | | 500Hrs. | 10.00 | 389.00 | 1013.00 | 587.00 | 132.00 | 224.00 | 459.00 | 1402.00 | 1412.00 |

s/d
Superintending Engineer (Mech.)
Public Works Department,
Konkan Bhavan, Navi Mumbai.

## O.M.&R. ESTIMATE MASTER
( PERIOD : 1/4/2014 TO 31/3/2015)

| Sr.No. | Type of Equipment | Make | Capacity | Utilisation as per norms | Depreciation (A) Hr/Kms | Repairs Charges (B) Hr/Kms | Running & Manitenance Charges (C) Hr/Kms | Repairs Charges Including labour (B+C5) (D) Hr/Kms | Maintenance Crew (C4) (E) Hr/Kms | Operating Crew and Sundries (C3+C6) (F) Hr/Kms | Fuel & Lubricants (C1+C2a+C2b (G) Hr/Kms | Total (B+C) Hr/Kms | Total (A+B+C) Hr/Kms |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 1 | Car | All Models | | 30000 Kms. | | | | 5.47 | 0.77 | 6.58 | 9.26 | 22.08 | |
| 2 | Jeep | All Models | | 21600Kms. | | | | 5.46 | 0.83 | 9.02 | 8.03 | 23.34 | |
| 3 | Mobile Van | All Models | 3.5Ton | 21600Kms. | | | | 8.75 | 0.91 | 9.06 | 9.70 | 28.42 | |
| 4 | Water Tanker | All Models | 7.5Ton | 1000Hrs. | 5.00 | 111.00 | 509.00 | 175.00 | 44.00 | 230.00 | 171.00 | 620.00 | 625.00 |
| 5 | Tipper | All Models | 7.5Ton | 20000Kms. | 2.50 | 12.20 | 42.90 | 19.20 | 4.00 | 14.70 | 17.20 | 55.10 | 57.60 |
| 6 | Truck | All Models | 7.5Ton | 20000Kms. | 1.00 | 10.30 | 41.70 | 15.80 | 4.00 | 14.00 | 18.20 | 52.00 | 53.00 |
| 7 | Diesel Road Roller | All Models | 8To10 Ton | 1000Hrs. | 11.00 | 138.00 | 494.00 | 235.00 | 64.00 | 111.00 | 222.00 | 632.00 | 643.00 |
| 8 | M.B.I.UNIT | All Models | | 1000Hrs. | 360.00 | 772.00 | 1818.00 | 1091.00 | 78.00 | 747.00 | 674.00 | 2590.00 | 2950.00 |
| 9 | JCB Loader | JS 140 | 1.2CuMtr. | 500Hrs. | 172.00 | 199.00 | 1142.00 | 351.00 | 100.00 | 191.00 | 699.00 | 1341.00 | 1513.00 |
| 10 | CAT Dozer | D4E | | 500Hrs. | 10.00 | 401.00 | 1131.00 | 617.00 | 144.00 | 244.00 | 527.00 | 1532.00 | 1542.00 |

IMPORTANT NOTE: Above rates are only for Departmental Machineries and to be used for all types of Departmental Work.

s/d Superintending Engineer (Mech.) Public Works Department, Konkan Bhavan, Navi Mumbai.

## O.M.&R. ESTIMATE MASTER

( PERIOD : 1/4/2015 TO 31/3/2016)

(कार्यालयीन पत्र क्र. सा.बां.(यां.)/तां.-३/ ५३२/२०१५ दि.२४/०४/२०१५ चे सहपत्र)

| Sr.No. | Type of Equipment | Make | Capacity | Annual Utilisation expected as per norms | Depreciation Rs. per Hr/Kms (A) | Repairs Charges Rs. per Hr/Kms (B) | Running & Manitenance Charges Rs. per Hr/ Kms (C) | Repairs Charges including labour (B+C5) Rs. per Hr/Kms (D) | Maintenance Crew (C4) Rs. per Hr/Kms (E) | Operating Crew and Sundries (C3+C6) Rs. per Hr/Kms (F) | Fuel & Lubricants (C1+C2a+C2b) Rs. per Hr/Kms (G) | Total (B+C) Rs. Per Hr/Kms (H) | Total (A+B+C) Rs. per Hr/Kms (I) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 1 | Car | All Models | | 30000 Kms. | | | | 6.01 | 0.69 | 6.55 | 7.70 | 20.95 | 20.95 |
| 2 | Jeep | All Models | | 21600Kms. | | | | 5.48 | 0.77 | 8.99 | 6.85 | 22.07 | 22.07 |
| 3 | Mobile Van | All Models | 3.5Ton | 21600Kms. | | | | 8.75 | 0.92 | 9.76 | 9.25 | 28.68 | 28.68 |
| 4 | Water Tanker | All Models | 7.5Ton | 1000Hrs. | 5.00 | 115.00 | 551.00 | 183.00 | 47.00 | 246.00 | 190.00 | 666.00 | 671.00 |
| 5 | Tipper | All Models | 7.5Ton | 20000Kms. | 2.50 | 12.60 | 46.60 | 20.10 | 4.30 | 15.80 | 19.20 | 59.40 | 61.90 |
| 6 | Truck | All Models | 7.5Ton | 20000Kms. | 1.00 | 10.70 | 45.50 | 16.60 | 4.30 | 15.00 | 20.30 | 56.20 | 57.20 |
| 7 | Diesel Road Roller | All Models | 8To10 Ton | 1000Hrs. | 11.00 | 142.00 | 537.00 | 248.00 | 68.00 | 119.00 | 246.00 | 679.00 | 690.00 |
| 8 | M.B.I.UNIT | All Models | | 1000Hrs. | 360.00 | 795.00 | 1971.00 | 1136.00 | 83.00 | 799.00 | 748.00 | 2766.00 | 3126.00 |
| 9 | JCB Loader | JS 140 | 1.2CuMtr. | 500Hrs. | 172.00 | 204.00 | 1252.00 | 367.00 | 107.00 | 205.00 | 777.00 | 1456.00 | 1628.00 |
| 10 | CAT Dozer | D4E | | 500Hrs. | 10.00 | 414.00 | 1233.00 | 645.00 | 154.00 | 261.00 | 587.00 | 1647.00 | 1657.00 |

<u>IMPORTANT NOTE</u>: Above rates are only for Departmental Machineries and to be used for all types of Departmental Work.

s/d
Superintending Engineer (Mech.)
Public Works Department,
Konkan Bhavan, Navi Mumbai.

(Annexure-7)

वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८,
भाग - पहिला, उप विभाग - एक ते पाच
प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय
अधिकारांमध्ये सुधारणा करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन
## वित्त विभाग

शासन निर्णय क्रमांक-विअप्र-१०.०८/प्र.क्र.७०/२००८/विनियम,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२, दिनांक: १५ मे, २००९

पहावे.— (१) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-डीसीएन-१०७५/ओ ॲण्ड एम, दिनांक ९ एप्रिल, १९७५ (प्रत सोबत जोडली आहे.)

(२) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक-डीएफपी-१०७६/१३९२/८९६/जीईएन-५, दिनांक १४ फेब्रुवारी, १९७७ (प्रत सोबत जोडली आहे.)

## निर्णय

शासनाने वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८, भाग-पहिला, उपविभाग- १ ते ५ अन्वये शासनाच्या मंत्रालयीन प्रशासनिक विभाग व त्यांच्या नियंत्रणाखालील विभाग प्रमुख, प्रादेशिक कार्यालय प्रमुख व कार्यालय प्रमुख या प्राधिका-यांना वित्तीय शक्तीचे विहित मर्यादेच्या, अटींच्या व शर्तींच्या अधीन राहून मुंबई वित्तीय नियम १९५९, महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम १९६५, महाराष्ट्र अर्थसंकल्पिय नियमपुस्तिका, खर्चाच्या संकीर्ण बाबी तसेच महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली यामधील तरतूदींनुसार अधिकार प्रदान केलेले आहेत. तथापि, प्रदान करण्यात आलेल्या काही वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत व त्या अनुषंगाने अटी इत्यादी मध्ये सुधारणा करुन जास्तीत जास्त प्रकरणे विविध स्तरावर लवकरात लवकर निकाली निघतील या उद्देशाने संबंधित प्राधिका-यांना व्यापक अधिकार प्रदान करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार सोबत जोडलेल्या परिशिष्टामध्ये दर्शविलेल्या काही वित्तीय शक्तींच्या वित्तीय मर्यादेत आणि त्या अनुषंगाने अटी व शर्तींमध्ये सुधारणा करण्यात आली आहे. या निर्णयाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय शक्तींचा वापर हा विविध वित्तीय प्रकाशनामध्ये अंतर्भूत असलेल्या नियम आणि विनियम यामधील अटींच्या आणि शर्तींच्या अधीन तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या या विषयींच्या कार्यकारी आदेशांच्या अनुपालनांच्या अधीन, त्याचप्रमाणे खालील अटींच्या अधीन राहून करण्यात यावा.

२. या वित्तीय अधिकारांचा वापर करुन मंजूरी प्रदान करताना ज्या प्रकरणी विशिष्ट मानके (स्टॅण्डर्ड) विहित केलेली असतील अशा प्रकरणी विहित मानकांचे अनुसरण करण्यात यावे. तसेच कोणत्याही बाबीकरिता वित्त विभागाची " विशेष बाब " म्हणून मंजूरी घेण्यात आली असेल अशा बाबींच्या संदर्भात दुरुस्ती, सेवासंविदा करार किंवा अन्य प्रश्न उद्भवल्यास वित्त विभागाचा सल्ला घेण्यात यावा.

३. प्रदत्त शक्तींचा वापर करुन दिल्या जाणाऱ्या मंजूरीबाबतचा प्रत्येक आदेश संबंधित सक्षम अधिकाऱ्यांच्या मान्यतेने निर्गमित करावा.

(अ) या संबंधात "महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीमधील नियम ७ व नियम १० (१) कडे लक्ष वेधण्यात येत असून सदर नियमांच्या अनुषंगाने प्रभारी मंत्र्यांच्या मान्यतेने कोणकोणत्या अधिकारांच्या बाबतीत शासन सचिव सक्षम असतील हे लेखी स्वरुपात ठरवून घेण्यात यावे.

(ब) संबंधित सक्षम अधिकाऱ्यांच्या मान्यतेने आदेश निर्गमित केले आहेत, असा स्पष्ट उल्लेख प्रत्येक मंजूरी आदेशात करण्यात यावा.

(क) मंत्रालयीन प्रशासनिक विभागांनी ह्या अधिकार प्रदान शक्तींचा वापर करतांना ज्या विभागात सह सचिव व वित्तीय सल्लागार / उप सचिव व वित्तीय सल्लागार उपलब्ध आहेत त्यांनी वित्तीय सल्लागारांचा सल्ला आणि इतर विभागात अर्थसंकल्प अधिकारी म्हणून विनिर्दिष्ट केलेल्या अधिकाऱ्यांचा सल्ला घ्यावा.

४. या वित्तीय अधिकारांचा वापर करुन मंजूरी आदेश निर्गमित करताना सदर मंजूरी आदेशांची प्रत, इतर सर्व संबंधित अधिकाऱ्यांप्रमाणेच, संबंधित लेखा परीक्षा अधिकाऱ्यांना व वित्त विभागाला (संचालक व्यय व विनियम कार्यासनाला) पाठवावी व अशा मंजूरी आदेशांमध्ये " वित्तीय अधिकार नियमपुस्तिका, १९७८, भाग पहिला, उप विभाग एक, दोन, तीन, चार किंवा पाच " मधील संबंधित वित्तीय शक्तींचा अनुक्रमांक किंवा या शासन निर्णयाचा क्रमांक, दिनांक व त्या सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय शक्तींचा अनुक्रमांक यांचा न चुकता स्पष्ट उल्लेख करावा.

५. वित्तीय अधिकार नियमपुस्तिका, १९७८, भाग पहिला, " वित्तीय प्रकाशन क्रमांक चार " यथावकाश छापून घेण्यात येईल.

६. या शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्टांतील वित्तीय शक्ती या वित्तीय अधिकार नियमपुस्तिका, १९७८, भाग पहिला, उप विभाग एक, दोन, तीन, चार व पाच मध्ये अंतर्भूत असलेल्या सुधारित वित्तीय शक्ती मानण्यात याव्यात. त्यावेळी वित्तीय प्रकाशन क्रमांक चार छापण्यात येईल, त्यावेळी त्यात या सुधारित शक्तींचा अंतर्भाव करण्यात येईल.

७. सर्व प्राधिकाऱ्यांनी त्यांना प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारांच्या संबंधित नियम, अटी व शर्ती विचारात घेऊन वित्तीय मंजूरीचे प्रस्ताव त्यांच्या स्तरावर निकालात काढावेत.

८. प्राधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय शक्तींचा वापर करताना, त्यावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने, संबंधित वित्तीय शक्तींच्या समोर विहित करण्यात आलेल्या वित्तीय मर्यादेचे सक्षम अधिकाऱ्यांकडून उल्लंघन होणार नाही याबाबत दक्षता घेण्यात यावी.

९. ज्या बाबतीत वित्तीय अधिकार प्रदान करण्यात आलेले नाहीत तसेच अधिकार प्रदान काही अटींच्या अधीन केले असेल व त्या अटी किंवा त्यातील एखादी अट पूर्ण होत नसेल तर त्या बाबतीत प्रशासकीय किंवा वित्तीय मंजूरी वित्त विभागाच्या पूर्व सम्मतीशिवाय देता येणार नाही.

१०. प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय शक्तींचा वापर करून आपल्या नियंत्रणाखालील विविध प्राधिकाऱ्यांनी व प्रशासनिक विभागांनी स्वत: काढलेल्या मंजूरी आदेशांचा नियतकालिक आढावा, संबंधित प्रशासनिक विभागांनी नियमितपणे घ्यावा आणि संबंधित प्राधिकारी प्रदत्त वित्तीय अधिकारांचा पुरेपूर आणि विवेकशीलतेने वापर करतात की नाही ते पहावे व आवश्यक तेथे योग्य ती कार्यवाही करावी.

११. वित्तीय अधिकार नियमपुस्तिके अन्वये विविध प्राधिकाऱ्यांना विहित केलेल्या वित्तीय मर्यादा ह्या विशेषरित्या नमूद केलेल्या नसल्यास त्यांना, तसेच त्यांच्या नियंत्रणाखालील विभागीय कार्यालय, प्रादेशिक कार्यालय किंवा कार्यालय यांना लागू असतील. उदा.,विभाग प्रमुखांना विहित केलेल्या मर्यादा ह्या विभाग प्रमुख यांना स्वत:साठी तसेच त्यांच्या नियंत्रणाखाली संपूर्ण विभागासाठी लागू असतील.

१२. सोबत जोडलेल्या परिशिष्टांमध्ये प्रदान करण्यात आलेल्या विविध शक्तींच्या वर्णनामध्ये प्रशासकीय मंजूरी देणे, वित्तीय मंजूरी देणे व खर्चास मंजूरी देणे असे शब्दप्रयोग वापरण्यात आलेले आहेत. यापैकी जेथे खर्चास मंजूरी देणे असे नमूद केलेले आहे तेथेच संबंधित प्राधिकारी प्रत्यक्ष खर्च करू शकतील.

१३. यापूर्वी निर्गमित करण्यात आलेल्या वित्तीय अधिकार प्रदानाचे आदेश <u>निष्प्रभावित</u> करून सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

१४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २००९०५१५१८३६५२३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(स्वाक्षरी)

विद्याधर कानडे
शासनाचे प्रधान सचिव.

<u>सहपत्र</u>:-
१. परिशिष्ट
२. मुंबई वित्तीय नियम १९५९ चे परिशिष्ट- १०
३. यापूर्वी निर्गमित शासन निर्णय दिनांक ९.४.२००५ व १४.३.१९७७
४. कार्यालयीन आकस्मिक खर्चाची (मर्यादांची) यादी.

प्रति,
*१. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई ४०० ०२०
*२. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई ४०० ०२०
*३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर
*४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, (W. M. III), महाराष्ट्र, नागपूर
*५. महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
६. राज्यपालांचे सचिव
७. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
८. उप मुख्य मंत्र्यांचे प्रधान सचिव
९. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक

51

309

| अनु क्रमांक | नियम क्रमांक | वित्तीय शक्तींचे वर्णन | अधिकाराचा वापर करण्यास सक्षम असलेले प्राधिकारी | प्रदान केलेल्या वित्तीय अधिकारांची मर्यादा | अटी |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | | | | | (४) विभाग प्रमुख त्यांच्या स्वतःच्या कार्यालयातील प्रशासन/ लेखा विषयक कार्यभार सांभाळणाऱ्या प्रभारी राजपत्रित अधिकाऱ्याला ह्या शक्ती पुनःप्रदान करु शकतील. |
| ६ | ७ | यंत्र, यंत्रसामग्री आणि साधन सामग्री इत्यादींच्या दुरुस्तीस मंजूरी देणे. | (१) विभाग प्रमुख<br>(२) प्रादेशिक कार्यालय प्रमुख<br>(३) कार्यालय प्रमुख | (१) व (२) पूर्ण अधिकार<br>(३) वार्षिक रु. २,००० पर्यंत. | (१) अर्थसंकल्पात तरतूद केलेली असली पाहिजे.<br>(२) दुरुस्तीचा वार्षिक खर्च, यंत्रसामग्रीच्या पुस्तकी किमतीच्या २५ टक्क्यांहून अधिक होता कामा नये.<br>(३) कार्यपध्दती आणि सर्वसाधारण निर्देशांचे पालन केले पाहिजे.<br>(४) विभाग प्रमुख त्यांच्या स्वतःच्या कार्यालयातील प्रशासन/ लेखाविषयक कार्यभार सांभाळणाऱ्या प्रभारी राजपत्रित अधिकाऱ्याला ह्या शक्ती पुनःप्रदान करु शकतील.<br>(५) ज्या प्रशासनिक विभागांना वित्तीय अधिकार "भाग-२" मध्ये ह्या शक्ति प्रदान करण्यात आल्या आहेत त्यांना सदर शक्तींचा वापर करता येणार नाही. |
| ७ | ७ | विलंब आकार व तत्सम आकारणी यासंबंधीच्या खर्चास मंजूरी देणे. | (१) प्रशासनिक विभाग<br>(२) विभाग प्रमुख<br>(३) प्रादेशिक कार्यालय प्रमुख<br>(४) कार्यालय प्रमुख | (१) पूर्ण अधिकार<br>(२) व (३) एका प्रकरणी वस्तुच्या किमतीच्या मर्यादेपर्यंत किंवा रु.२०,००० यापैकी जी कमी असेल त्या मर्यादेपर्यंत.<br>(४) एका प्रकरणी वस्तुच्या किमतीच्या मर्यादेपर्यंत किंवा रु.१,००० यापैकी जी कमी असेल त्या मर्यादेपर्यंत. | (१) अर्थसंकल्पात तरतूद असली पाहिजे.<br>(२) भरावयाचा विलंब आकार (ताब्यात घ्यावयाच्या) वस्तुच्या किमतीपेक्षा अधिक नसावा.<br>(३) माल ताबडतोब आणून घेतलेला असावा आणि कोणत्याही प्रकारे टाळता येण्याजोगा विलंब किंवा निष्काळजीपणा झालेला नसावा.<br>(४) रु.५,००० वरील खर्चाच्या प्रत्येक प्रकरणामध्ये त्याबाबतचा अहवाल विभाग प्रमुख किंवा प्रादेशिक कार्यालय प्रमुख यांनी संबंधित प्रशासनिक विभागाकडे पाठविणे आवश्यक राहील.<br>(५) विभाग प्रमुखांना त्यांच्या स्वतःच्या कार्यालयातील प्रशासन/ लेखाविषयक कार्यभार सांभाळणाऱ्या राजपत्रित अधिकाऱ्याला हे अधिकार पुनःप्रदान करता येतील. |

| अनु क्रमांक | नियम क्रमांक | वित्तीय शक्तींचे वर्णन | अधिकारांचा वापर करण्यास सक्षम असलेले प्राधिकारी | प्रदान केलेल्या वित्तीय अधिकारांची मर्यादा | अटी |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १६ | ६४ | किरकोळ बांधकाम, अधिकाऱ्यांसाठी किंवा कार्यालयाच्या गरजेसाठी लाकडी दालने बनविण्याच्या आणि दुरुस्तीच्या खर्चास मंजुरी देणे व त्या प्रयोजनासाठी रकमांचे नियत वाटप करणे. | (१) प्रशासनिक विभाग | (१) प्रत्येक प्रकरणी रु. २,००,००० पर्यंत | विभाग प्रमुखांना त्यांच्या स्वतःच्या कार्यालयातील प्रशासन/ लेखाविषयक कार्यभार सांभाळणाऱ्या राजपत्रित अधिकाऱ्याला हे अधिकार पुनःप्रदान करता येतील. |
| | | | (२) विभाग प्रमुख | (२) प्रत्येक वर्षासाठी रु. १,००,००० पर्यंत | |
| | | | (३) प्रादेशिक कार्यालय प्रमुख | (३) प्रत्येक वर्षासाठी रु. ५०,००० पर्यंत | |
| | | | (४) कार्यालय प्रमुख | (४) प्रत्येक वर्षासाठी रु. २०,००० पर्यंत | |
| १७ | ६५ | मंजुरीप्राप्त खर्चाच्या अंदाजातील आकस्मिक खर्चासाठी केलेली तरतूद, अंदाजपत्रकात त्यासाठी तरतूद केलेली नाही अशा नवीन किरकोळ बांधकाम, अधिकाऱ्यांसाठी किंवा कार्यालयाच्या गरजेसाठी लाकडी दालने बनविण्याच्या किंवा दुरुस्तीकरिता वर्ळविणे. | (१) विभाग प्रमुख | (१) प्रत्येक प्रकरणी रु. ५०,००० पर्यंत | विभाग, प्रमुखांना त्यांच्या स्वतःच्या कार्यालयातील प्रशासन/ लेखाविषयक कार्यभार सांभाळणाऱ्या राजपत्रित अधिकाऱ्यास हे अधिकार पुनःप्रदान करता येतील. |
| | | | (२) प्रादेशिक कार्यालय प्रमुख | (२) प्रत्येक प्रकरणी रु. ३०,००० पर्यंत | |
| १८ | ६८ | (अ) त्यांच्या स्वतःच्या कार्यालयातील आणि त्यांच्या दुय्यम कार्यालयातील उष्मानिवारक साधनसामग्रीसाठी (वातानुकूलित संयंत्र नव्हे) खर्च मंजूर करणे. | (१) प्रशासनिक विभाग | (१) पूर्ण अधिकार | (१) "कार्यालयीन खर्च" या शीर्षाखाली मंजूर केलेल्या अनुदानातून खर्च भागविण्यात यावा.<br>(२) विभाग प्रमुख त्यांच्या स्वतःच्या कार्यालयातील प्रशासन/ लेखाविषयक कार्यभार सांभाळणाऱ्या राजपत्रित अधिकाऱ्याला ह्या शक्ती पुनःप्रदान करु शकतील. |
| | | | (२) विभाग प्रमुख | (२) व (३) प्रतिवर्षी प्रतिकार्यालय रु.१०,००० पर्यंत. | |
| | | | (३) प्रादेशिक कार्यालय प्रमुख | | |
| | | | (४) कार्यालय प्रमुख | (४) प्रतिवर्षी प्रतिकार्यालय रु.३,००० पर्यंत. | |
| | | (ब) वातानुकूलित यंत्रे खरेदी करणे व त्या खर्चाला मंजुरी देणे. | प्रशासनिक विभाग | पूर्ण अधिकार | (१)वरिष्ठ समयश्रेणीतील [रु.१८,४००-२२,४०० (विद्यापीठ अनुदान आयोगाची वेतनश्रेणी सोडून) अधिकाऱ्यांसाठीच खरेदी करता येईल.]<br>(२) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेणी वरिष्ठ समयश्रेणीतील वेतनाशी तुलनेसाठी वापरता येणार नाही. |
| १९ | ६९ | शासकीय वाहनांच्या देखभालीवरील, ती सुस्थितीत ठेवण्यासाठी आणि त्यांच्या दुरुस्तीसाठीच्या खर्चास मंजुरी देणे [पेट्रोल, | (१) प्रशासनिक विभाग | (१) पूर्ण अधिकार | (१) खर्च मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.<br>(२) जर वाहन शासकीय कार्यशाळेत दुरुस्त करण्यात आले नसेल तर प्रादेशिक परिवहन अधिकारी, |
| | | | (२) विभाग प्रमुख | (२) व (३) (अ)पेट्रोलवर चालणाऱ्या | |
| | | | (३) प्रादेशिक कार्यालय प्रमुख | | |

भाग-पहिला, उप-विभाग—दोन

| अनु क्रमांक | नियम क्रमांक | वित्तीय शक्तीचे वर्णन | अधिकाराचा वापर करण्यास सक्षम असलेले प्राधिकारी | प्रदान केलेल्या वित्तीय अधिकारांची मर्यादा | अटी |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | | डिझेल, इंजिन ऑईल यांवरील खर्चाचा (या शक्तीच्या वर्णनात) अंतर्भाव राहणार नाही ]. | | प्रत्येक वाहनासाठी प्रतिवर्षी रु.४०,००० पर्यंत<br>(ब) डिझेलवर चालणाऱ्या प्रत्येक वाहनासाठी प्रतिवर्षी रु.५०,००० पर्यंत | औद्योगिक प्रशिक्षण संस्था, तंत्रनिकेतन संस्था, जलसंपदा, सार्वजनिक बांधकाम विभागाचे यांत्रिक विभागातील कार्यकारी अभियंता आणि कृषि व पदुम विभागातील प्रादेशिक दुग्ध शाळा अभियंता, कृषि अभियंता, अधीक्षक, शासकीय परिवहन सेवा यांनी (या विषयीचा) खर्च वाजवी असल्याबद्दल प्रमाणित केलेले असले पाहिजे. सदर अधिकाऱ्यांनी त्यांच्या स्वत:च्या कार्यालयाप्रमाणे अन्य शासकीय कार्यालयाच्या गरजेप्रमाणे त्यानुसर्णाअंती मार्गदर्शने असे प्रमाणपत्र द्यावे.<br>(३)कार्यपद्धतीविषयक नियमांचे आणि इतर सर्वसाधारण निर्देशांचे अनुपालन करण्यात यावे.<br>(४)खर्चात काटकसर करण्यासंबंधी वेळोवेळी काढलेल्या आदेशांचे अनुपालन करण्यात यावे.<br>(५) टायर, ट्यूब, बॅटरी इत्यादि बदली करण्यासाठी येणाऱ्या खर्चाचा या शक्तीच्या वर्णनामध्ये अंतर्भाव राहील.<br>(६) विभाग प्रमुख त्यांच्या स्वत:च्या कार्यालयातील प्रशासन / लेखा विषयक कार्यभार सांभाळणाऱ्या राजपत्रित अधिकाऱ्याला या शक्ती पुर्नप्रदान करु शकतील. |
| | | | (४) कार्यालय प्रमुख | (४)<br>(अ)पेट्रोलवर चालणाऱ्या प्रत्येक वाहनासाठी प्रतिवर्षी रु.१०,००० पर्यंत<br>(ब)डिझेलवर चालणाऱ्या प्रत्येक वाहनासाठी प्रतिवर्षी रु.१२,५०० पर्यंत | |
| १९-अ | ६१ | कार्यालयीन वाहने (स्टाफ कार) व शासकीय वाहनांसाठी पेट्रोल/ डिझेल/वंगण तेल/ इंजिन ऑईल/ सी.एन.जी. खरेदी करण्यासाठी खर्च मंजूर करणे. | (१) प्रशासनिक विभाग | (१) पूर्ण अधिकार | (१) आवश्यक निधी उपलब्ध असला पाहिजे. |
| | | | (२) विभाग प्रमुख<br>(३) प्रादेशिक कार्यालय प्रमुख | (२) व (३)<br>(अ) त्यांच्या स्वाधीन असलेल्या "स्टाफ कार" करिता प्रतिवर्षी ३,००० लिटर/ ३,००० किलोग्रॅमपर्यंत.<br>(ब) त्यांच्या दुय्यम अधिकाऱ्यांच्या स्वाधीन असलेल्या "स्टाफ कार" करिता, वर त्यांच्या संदर्भात विहित केलेल्या मर्यादेबाहेर जास्त खर्च होणार असेल तर | (२) सर्वसाधारण निर्देशांचे, खर्चामध्ये काटकसर करण्यासंबंधीच्या आदेशांचे आणि संबंधित नियमांचे अनुपालन करण्यात यावे.<br>(३) विभाग प्रमुख त्यांच्या स्वत:च्या कार्यालयातील प्रशासन / लेखाविषयक कार्यभार सांभाळणाऱ्या राजपत्रित अधिकाऱ्याला या शक्ती पुर्नप्रदान करु शकतील. |

(Annexure- 8)

वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८, भाग-पहिला , उप विभाग - एक ते पाच प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारांमध्ये सुधारणा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांकः विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम ,भाग-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
दिनांक:१७ एप्रिल, २०१५

पाहावे. -

१) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-डीसीएन-१०७५/ओ ॲण्ड एम, दिनांक ९ एप्रिल, १९७५ (प्रत सोबत जोडली आहे.)

२) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक-डीएफपी-१०७६/१३९२/८९६/जीईएन-५, दिनांक १४ फेब्रुवारी, १९७७ (प्रत सोबत जोडली आहे.)

३) शासन निर्णय क्र.विअप्र-१०.०८/प्र.क्र.७०/२००८/विनियम, दि.१५ मे, २००९.

शासन निर्णय-

शासनाने संदर्भीय क्र.३ च्या शासन निर्णयान्वये वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग - पहिला, उपविभाग - १ ते ५ मध्ये शासनाच्या मंत्रालयीन प्रशासनिक विभाग व त्यांच्या नियंत्रणाखालील विभाग प्रमुख, प्रादेशिक कार्यालय प्रमुख व कार्यालय प्रमुख या प्रधिकाऱ्यांना वित्तीय शक्तींचे विहित मर्यादेच्या, अटींच्या व शर्तींच्या अधीन राहून मुंबई वित्तीय नियम १९५९, महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम १९६५, महाराष्ट्र अर्थसंकल्पिय नियमपुस्तिका, खर्चाच्या संकीर्ण बाबी तसेच महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली यामधील तरतूदींनुसार अधिकार प्रदान केलेले आहेत. तथापि, प्रदान करण्यात आलेल्या काही वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत व त्या अनुषंगाने अटी इत्यादी मध्ये सुधारणा करुन जास्तीत जास्त प्रकरणे विविध स्तरावर लवकरात लवकर निकाली निघतील या उद्देशाने संबंधित प्राधिकाऱ्यांना व्यापक अधिकार प्रदान करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार सोबत जोडलेल्या परिशिष्टांमध्ये दर्शविलेल्या काही वित्तीय शक्तींच्या वित्तीय मर्यादेत आणि त्या अनुषंगाने अटी व शर्तीमध्ये सुधारणा करण्यात आली आहे. तसेच, काही कालबाह्य वित्तीय शक्ती वगळण्यात आल्या आहेत व काही वित्तीय शक्ती नव्याने समाविष्ट करण्यात आल्या आहेत. या निर्णयाव्दारे प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय शक्तींचा वापर हा विविध वित्तीय प्रकाशनामध्ये अंतर्भूत असलेल्या नियम व विनियम यामधील अटींच्या आणि शर्तींच्या अधीन तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या या विषयींच्या कार्यकारी आदेशांच्या अनुपालनांच्या अधीन, त्याचप्रमाणे पुढील अटींच्या अधीन राहून करण्यात यावा.

२. या वित्तीय अधिकारांचा वापर करुन मंजूरी प्रदान करताना ज्या प्रकरणी विशिष्ट मानके (स्टॅण्डर्ड) विहित केलेली असतील अशा प्रकरणी विहित मानकांचे अनुसरण करण्यात यावे. तसेच

कोणत्याही बाबीकरिता वित्त विभागाची "विशेष बाब" म्हणून मंजूरी घेण्यात आली असेल अशा बाबींच्या संदर्भात दुरुस्ती, सेवासंविदा करार किंवा अन्य प्रश्न उद्भवल्यास वित्त विभागाचा सल्ला घेण्यात यावा.

३. प्रदत्त शक्तींचा वापर करुन दिल्या जाणाऱ्या मंजूरीबाबतचा प्रत्येक आदेश संबंधित सक्षम अधिकाऱ्यांच्या मान्यतेने निर्गमित करावा.

(अ) या संबंधात महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीमधील नियम ७ व नियम १०(१) कडे लक्ष वेधण्यात येत असून सदर नियमांच्या अनुषंगाने प्रभारी मंत्र्यांच्या मान्यतेने कोणकोणत्या अधिकारांच्या बाबतीत शासन सचिव सक्षम असतील ते लेखी स्वरुपात ठरवून घेण्यात यावे.

(ब) संबंधित सक्षम अधिका-यांच्या मान्यतेने आदेश निर्गमित केले आहेत, असा स्पष्ट उल्लेख प्रत्येक मंजूरी आदेशात करण्यात यावा.

(क) मंत्रालयीन प्रशासनिक विभागांनी ह्या अधिकार प्रदान शक्तीचा वापर करतांना ज्या विभागात सह सचिव व वित्तीय सल्लागार / उप सचिव व वित्तीय सल्लागार उपलब्ध आहेत त्यांनी वित्तीय सल्लागारांचा सल्ला आणि इतर विभागात अर्थसंकल्प अधिकारी म्हणून विर्निदिष्ट केलेल्या अधिकाऱ्यांचा सल्ला घ्यावा.

४. या वित्तीय अधिकारांचा वापर करुन मंजूरी आदेश निर्गमित करताना सदर मंजूरी आदेशांची प्रत, इतर सर्व संबंधित अधिकाऱ्यांप्रमाणेच, संबंधित लेखा परीक्षा अधिकाऱ्यांना व वित्त विभागाला (संबंधित व्यय व विनियम कार्यासनाला) पाठवावी व अशा मंजूरी आदेशांमध्ये "वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८, भाग-पहिला , उप विभाग - एक, दोन, तीन, चार किंवा पाच" मधील संबंधीत वित्तीय शक्तींचा अनुक्रमांक किंवा या शासन निर्णयाचा क्रमांक, दिनांक व त्या सोबतच्या परिशिष्टांतील वित्तीय शक्तींचा अनुक्रमांक याचा न चुकता स्पष्ट उल्लेख करावा.

५. या शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्टांतील वित्तीय शक्ती या वित्तीय अधिकार नियमपुस्तिका, १९७८ भाग पहिला, उप विभाग एक, दोन, तीन, चार व पाच मध्ये अंतर्भूत असलेल्या सुधारित वित्तीय शक्ती मानण्यात याव्यात. वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८, भाग-पहिला , "वित्तीय प्रकाशन क्रमांक चार" यथावकाश छापून घेण्यात येईल.

६. सर्व प्राधिकाऱ्यांना त्यांना प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारांच्या संबंधित नियम, अटी व शर्ती विचारात घेऊन वित्तीय मंजूरीचे प्रस्ताव त्यांच्या स्तरावर निकालात काढावेत.

७. प्राधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय शक्तींचा वापर करताना, त्यावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने, संबंधित वित्तीय शक्तींच्या समोर विहित करण्यात आलेल्या वित्तीय मर्यादेचे सक्षम अधिकाऱ्यांकडून उल्लंघन होणार नाही याबाबत दक्षता घेण्यात यावी.

८. ज्या बाबतीत वित्तीय अधिकार प्रदान करण्यात आलेले नाहीत तसेच अधिकार प्रदान काही अटींच्या अधीन केले असतील व त्या अटी किंवा त्यातील एखादी अट पूर्ण होत नसेल तर त्या बाबतीत प्रशासकीय किंवा वित्तीय मंजूरी वित्त विभागाच्या (संबंधित व्यय शाखेच्या) पूर्व संमतीशिवाय देता येणार नाही.

९. प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय शक्तींचा वापर करुन आपल्या नियंत्रणाखालील विविध प्राधिकाऱ्यांनी व प्रशासनिक विभागांनी स्वत: काढलेल्या मंजूरी आदेशांचा नियतकालिक आढावा, संबंधित प्रशासकीय विभागांनी नियमितपणे घ्यावा आणि संबंधित प्राधिकारी प्रदत्त वित्तीय अधिकारांचा पुरेपूर आणि विवेकशीलतेने वापर करतात की नाही ते पहावे व आवश्यक तेथे योग्य ती कार्यवाही करावी.

* * *

१०. वित्तीय अधिकार नियमपुस्तिके अन्वये विविध प्राधिकाऱ्यांना विहित केलेल्या वित्तीय मर्यादा ह्या विशेषरीत्या नमूद केलेल्या नसल्यास त्यांना, तसेच त्यांच्या नियंत्रणाखालील विभागीय कार्यालय, प्रादेशिक कार्यालय किंवा कार्यालय यांना लागू असतील. उदा. विभाग प्रमुखांना विहित केलेल्या मर्यादा ह्या विभाग प्रमुख यांना स्वत:साठी तसेच त्यांच्या नियंत्रणाखालील संपूर्ण विभागासाठी लागू असतील.

११. एखादा प्रशासनिक विभाग / विभाग प्रमुख/ प्रादेशिक कार्यालय प्रमुख व कार्यालय प्रमुख यांना वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग-दुसरा अन्वये ज्या वित्तीय शक्तींकरीता विशेष अधिकार प्रदान करण्यात आले असतील त्या वित्तीय शक्तींकरीता या पुस्तिकेतील वित्तीय अधिकारांचा वापर करता येणार नाही.

१२. सोबत जोडलेल्या परिशिष्टांमध्ये प्रदान करण्यात आलेल्या विविध शक्तींच्या वर्णनामध्ये प्रशासकीय मंजूरी देणे, वित्तीय मंजूरी देणे व खर्चास मंजूरी देणे असे शब्दप्रयोग वापरण्यात आलेले आहेत. यापैकी जेथे खर्चास मंजूरी देणे असे नमूद केलेले आहे तेथेच संबंधित प्राधिकारी प्रत्यक्ष खर्च करु शकतील.

१३. यापूर्वी निर्गमित करण्यात आलेल्या वित्तीय अधिकार प्रदानांचे आदेश निष्प्रभावित करुन सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

१४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१५०४१७१५१८३६८१०५ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Narayan Bhaskar Ringane

Digitally signed by Narayan Bhaskar Ringane DN: CN = Narayan Bhaskar Ringane, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Deputy Secretary

(ना. भा. रिंगणे)
उपसचिव, वित्त विभाग

सहपत्र :-

१. अनुक्रमणिका
२. परिशिष्ट
३. मुंबई वित्तीय नियम १९५९ चे परिशिष्ट- २०
४. पहावे येथील शासन निर्णय दिनांक ९.०४.१९७५ व १४.०२.१९७७
५. कार्यालयीन आकस्मिक खर्चाची (वरखर्चाची) यादी.

प्रत,

१. * प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)-(१, महाराष्ट्र,मुंबई ४०० ०२०
२. * महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई ४०० ०२०
३. * महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर
४. * महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
५. * राज्यपालांचे सचिव
६. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
७. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक

| अ.क्र. | नियम क्रमांक | वित्तीय शक्तीचे वर्णन | अधिकाराचा वापर करण्यास सक्षम असलेले प्राधिकारी | प्रदान केलेल्या वित्तीय अधिकारांची मर्यादा | अटी |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | | | | | प्रशासन/लेखाविषयक कार्यभार सांभाळणाऱ्या राजपत्रित अधिकाऱ्याला हे अधिकार पुन: प्रदान करता येतील. |
| ३ | ७ | त्यांच्या नियंत्रणाखालील संस्थेतील उद्योगधंद्यासाठी लागणारी नवीन संयंत्रे, सामग्री किंवा फर्निचर धरुन इतर साधनसामग्री इत्यादी विकत घेण्यास मंजुरी देणे. | (१) प्रशासनिक विभाग<br>(२) विभाग प्रमुख<br>(३) प्रादेशिक कार्यालय प्रमुख | (१) पूर्ण अधिकार.<br>(२) व (३) प्रत्येक बाबीवरील खर्च ₹ १.०० लक्ष पेक्षा अधिक नसेल तर वार्षिक ₹ ४.०० लक्षच्या मर्यादेपर्यंत. | (१) अर्थसंकल्पात तरतूद केलेली असली पाहिजे.<br>(२) खरेदीसाठी नियमानुसार आखून दिलेल्या कार्यपध्दतीचे व सर्वसाधारण निर्देशांचे पालन केले पाहीजे. |
| ३-अ | ७ | अस्तित्वात असलेल्या यंत्र सामुग्रीचे रुपांतरण/उन्नती(upgradation) करण्यास व त्यासाठीच्या खर्चास मंजुरी देणे. | प्रशासनिक विभाग | पूर्ण अधिकार. | (१) रुपांतरणाचा खर्च घसाऱ्यानंतरच्या किंमतीच्या २५% हून जास्त नसावा.<br>(२) रुपांतरणानंतर किमान ५ वर्ष यंत्रसामुग्री सेवेत राहायला हवी.<br>(३) अर्थसंकल्पित तरतूद असावी. |
| ४ | ७ | अवजारे, किरकोळ साधनसामुग्री आणि उपकरण संच विकत घेण्यास मंजुरी देणे. | (१)प्रशासनिक विभाग<br>(२) विभाग प्रमुख<br>(३) प्रादेशिक कार्यालय प्रमुख | (१) पूर्ण अधिकार.<br>(२) वार्षिक ₹ २.०० लक्षच्या मर्यादेपर्यंत.<br>(३) वार्षिक ₹ १.०० लक्षच्या मर्यादेपर्यंत. | (१) अर्थसंकल्पात तरतूद केलेली असली पाहिजे.<br>(२) खरेदीसाठी नियमानुसार आखून दिलेल्या कार्यपध्दतीचे व सर्वसाधारण निर्देशांचे पालन केले पाहिजे.<br>(३) यंत्रसामग्री खरेदी ही मूळ मंजूर योजनेचा अविभाज्य भाग असावयास हवी. |
| ५ | ७ | यंत्राच्या (विभागाच्या वाहतुकीची वाहने वगळता) कार्यसज्जतेसाठी लागणारे सुटे भाग, उपसाधने व इतर वस्तू, साधनसामग्री विकत घेण्यासाठी मंजुरी देणे. | (१) प्रशासनिक विभाग<br>(२) विभाग प्रमुख<br>(३) प्रादेशिक कार्यालय प्रमुख<br>(४)कार्यालय प्रमुख | (१),(२) व (३)<br>(अ) पूर्ण अधिकार (दर संविदा असल्यास)<br>(ब) दरसंविदा नसल्यास यंत्रसामग्रीच्या पुस्तकी किंमतीच्या २० टक्के मर्यादेपर्यंत (अट क्रमांक ३ प्रमाणे).<br>(४) वार्षिक ₹ ५,०००/- पर्यंत | (१) अर्थसंकल्पात तरतूद केलेली असली पाहिजे.<br>(२) दर संविदेप्रमाणे किंवा मध्यवर्ती भांडार वस्तू संघटना/ DGS.&D मार्फत विकत घेतलेल्या बाबींच्या संबंधात पूर्ण अधिकार.<br>(३) ज्या सुट्ट्या भागांसाठी दरसंविदा नसतील किंवा दरसंविदा यादीवरील विक्रेत्यांकडे माल नसेल आणि खरेदी नवीन दरपत्रक मागवून करावयाची असेल अशा सुट्ट्या भागांच्या बाबतीत.<br>(४) विभाग प्रमुख त्यांच्या स्वत:च्या कार्यालयातील प्रशासन/लेखा विषयक कार्यभार सांभाळणाऱ्या प्रभारी राजपत्रित अधिकाऱ्याला या शक्ती पुन: प्रदान करु शकतील. |
| ६ | ७ | संयंत्रे, यंत्रसामग्री आणि साधन सामग्री इत्यादींच्या दुरुस्तीस मंजुरी देणे. | (१) प्रशासनिक विभाग<br>(२) विभाग प्रमुख<br>(३) प्रादेशिक कार्यालय प्रमुख<br>(४) कार्यालय प्रमुख | (१), (२) व (३) पूर्ण अधिकार.<br>(४) वार्षिक ₹ ५,०००/- पर्यंत. | (१) अर्थसंकल्पात तरतूद केलेली असली पाहिजे.<br>(२) दुरुस्तीचा वार्षिक खर्च, यंत्रसामुग्रीच्या पुस्तकी किंमतीच्या २५ टक्क्यांहून अधिक होता कामा नये.<br>(३) कार्यपध्दती आणि सर्वसाधारण निर्देशांचे पालन केले पाहिजे.<br>(४) प्रशासनिक विभाग/विभाग प्रमुख त्यांच्या स्वत:च्या |

| अ.क्र. | नियम क्रमांक | वित्तीय शक्तीचे वर्णन | अधिकारचा वापर करण्यास सक्षम असलेले प्राधिकारी | प्रदान केलेल्या वित्तीय अधिकारांची मर्यादा | अटी |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | | | | | सांभाळणाऱ्या राजपत्रित अधिकाऱ्याला हे अधिकार पुन: प्रदान करता येतील. |
| १५ | ६२ | दूरध्वनीच्या स्थानांतरासाठीच्या अनावर्ती खर्चास मंजुरी देणे. | (१) प्रशासनिक विभाग<br>(२) विभाग प्रमुख<br>(३) प्रादेशिक कार्यालय प्रमुख<br>(४)कार्यालय प्रमुख | (१), (२), (३) व (४) पूर्ण अधिकार | (१) स्थानांतराचा खर्च हा दूरध्वनी विभागाने आकारलेल्या खर्चाइतका मर्यादित असला पाहीजे.<br>(२) प्रशासनिक विभाग/विभाग प्रमुखांना त्यांच्या स्वत:च्या कार्यालयातील प्रशासन/लेखाविषयक कार्यभार सांभाळणाऱ्या राजपत्रित अधिकाऱ्याला हे अधिकार पुन: प्रदान करता येतील. |
| १६ | ६४ | किरकोळ बांधकाम, अधिकाऱ्यांसाठी किंवा कार्यालयाच्या गरजेसाठी लाकडी दालने बनविण्याच्या आणि दुरुस्तीच्या खर्चास मंजुरी देणे व त्या प्रयोजनासाठी रकमांचे नियत वाटप करणे. | (१)प्रशासनिक विभाग<br>(२) विभाग प्रमुख<br>(३) प्रादेशिक कार्यालय प्रमुख<br>(४)कार्यालय प्रमुख | (१) प्रत्येक प्रकरणी ₹४.०० लक्ष पर्यंत<br>(२) प्रत्येक वर्षासाठी ₹२.०० लक्ष पर्यंत<br>(३) प्रत्येक वर्षासाठी ₹१.०० लक्ष पर्यंत<br>(४) प्रत्येक वर्षासाठी ₹४०,०००/- पर्यंत | विभाग प्रमुखांना त्यांच्या स्वत:च्या कार्यालयातील प्रशासन/लेखाविषयक कार्यभार सांभाळणाऱ्या राजपत्रित अधिकाऱ्याला हे अधिकार पुन: प्रदान करता येतील. |
| १७ | ६४ | मंजूरीप्राप्त खर्चाच्या अंदाजातील आकस्मिक खर्चासाठी केलेली तरतूद, अंदाजपत्रकात ज्यासाठी तरतूद केलेली नाही अशा नवीन किरकोळ बांधकाम, अधिकाऱ्यांसाठी किंवा कार्यालयाच्या गरजेसाठी लाकडी दालने बनविण्याच्या किंवा दुरुस्तीकरीता वळविणे. | (१) विभाग प्रमुख<br>(२) प्रादेशिक कार्यालय प्रमुख | (१) प्रत्येक प्रकरणी ₹१.०० लक्ष पर्यंत<br>(२) प्रत्येक प्रकरणी ₹६०,०००/- पर्यंत | विभाग प्रमुखांना त्यांच्या स्वत:च्या कार्यालयातील प्रशासन/लेखाविषयक कार्यभार सांभाळणाऱ्या राजपत्रित अधिकाऱ्यास हे अधिकार पुन: प्रदान करता येतील. |
| १८ | ६८ | (अ) त्यांच्या स्वत:च्या कार्यालयातील आणि त्यांच्या दुय्यम कार्यालयातील उपभोग्य साधनसामग्रीसाठी (वातानुकुलित संयंत्र नव्हे, कुलर यंत्र, वाळ्याचे पडदे इत्यादी) खर्च मंजूर करणे. | (१)प्रशासनिक विभाग<br>(२) विभाग प्रमुख<br>(३) प्रादेशिक कार्यालय प्रमुख<br>(४)कार्यालय प्रमुख | (१) पूर्ण अधिकार<br>(२) व (३) प्रतिवर्षी प्रति कार्यालय ₹२५,०००/- पर्यंत<br>(४) प्रतिवर्षी प्रति कार्यालय ₹७,५००/- पर्यंत | (१)"कार्यालयीन खर्च" या शिर्षाखाली मंजूर केलेल्या अनुदानातून खर्च भागविण्यात यावा.<br>(२) विभाग प्रमुख त्यांच्या स्वत:च्या कार्यालयातील प्रशासन/लेखाविषयक कार्यभार सांभाळणाऱ्या राजपत्रित अधिकाऱ्याला ह्या शक्ती पुन: प्रदान करु शकतील. |
| | | (ब) वातानुकुलित यंत्रे खरेदी करणे व त्या खर्चाला मंजुरी देणे. | प्रशासनिक विभाग | पूर्ण अधिकार | (१) वरिष्ठ वेतन संरचनेतील वेतनबंड ₹३७,४००-६७,००० व ग्रेड वेतन ₹१०,०००/- (विद्यापीठ अनुदान आयोगाची वेतनश्रेणी सोडून) अधिकाऱ्यांसाठीच खरेदी करता येईल.<br>(२) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेणी वरिष्ठ समयश्रेणीतील वेतनाशी तुलनेसाठी वापरता येणार नाही. |
| १९ | ६९ | शासकीय वाहनांच्या देखभालीवरील, ती सुस्थितीत ठेवण्यासाठी आणि त्यांच्या | (१)प्रशासनिक विभाग<br>(२) विभाग प्रमुख | (१) पूर्ण अधिकार<br>(२) व (३) | १) खर्च मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.<br>(२) जर वाहन शासकीय कार्यशाळेत दुरुस्त करण्यात आले |

| अ.क्र. | नियम क्रमांक | वित्तीय शक्तीचे वर्णन | अधिकारचा वापर करण्यास सक्षम असलेले प्राधिकारी | प्रदान केलेल्या वित्तीय अधिकारांची मर्यादा | अटी |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | | दुरुस्तीसाठीच्या खर्चास मंजुरी देणे [पेट्रोल, डिझेल, इंजिन ऑईल यांवरील खर्चाचा (या शक्तीच्या वर्णनात) अंतर्भाव राहणार नाही.] | (३) प्रादेशिक कार्यालय प्रमुख | (अ) पेट्रोलवर चालणाऱ्या प्रत्येक वाहनासाठी प्रतिवर्षी ₹५०,०००/- पर्यंत<br>(ब) डिझेलवर चालणाऱ्या प्रत्येक वाहनासाठी प्रतिवर्षी ₹६०,०००/- पर्यंत | नसेल तर प्रादेशिक परिवहन अधिकारी, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, तंत्रनिकेतन संस्था, जलसंपदा, सार्वजनिक बांधकाम विभागाचे यांत्रिक विभागातील कार्यकारी अभियंता आणि कृषि व पदुम विभागातील प्रादेशिक दुग्ध शाळा अभियंता, कृषि अभियंता, अधीक्षक, शासकीय परिवहन सेवा यांनी (या विषयीचा) खर्च वाजवी असल्याबद्दल प्रमाणित केलेले असले पाहिजे. सदर अधिकाऱ्यांनी त्यांच्या स्वतःच्या कार्यालयाप्रमाणे अन्य शासकीय कार्यालयाच्या गरजेप्रमाणे तपासणीअंती तातडीने असे प्रमाणपत्र द्यावे.<br>(३) कार्यपध्दती विषयक नियमांचे आणि इतर सर्वसाधारण निर्देशांचे अनुपालन करण्यात यावे.<br>(४) खर्चात काटकसर करण्यासंबंधी वेळोवेळी काढलेल्या आदेशांचे अनुपालन करण्यात यावे.<br>(५)टायर,ट्यूब,बॅटरी इत्यादी बदली करण्यासाठी येणाऱ्या खर्चाचा या शक्तीच्या वर्णनामध्ये अंतर्भाव राहील.<br>(६)विभाग प्रमुख त्यांच्या स्वतःच्या कार्यालयातील प्रशासन/लेखाविषयक कार्यभार सांभाळणाऱ्या राजपत्रित अधिकाऱ्याला ह्या शक्ती पुन: प्रदान करु शकतील. |
| | | | (४)कार्यालय प्रमुख | (४)<br>(अ) पेट्रोलवर चालणाऱ्या प्रत्येक वाहनासाठी प्रतिवर्षी ₹१५,०००/- पर्यंत<br>(ब) डिझेलवर चालणाऱ्या प्रत्येक वाहनासाठी प्रतिवर्षी ₹१३,५००/- पर्यंत | |
| १९-अ | ६९ | कार्यालयीन वाहने (स्टाफ कार) व शासकीय वाहनांसाठी पेट्रोल/ डिझेल/वंगण तेल, /इंजिनऑईल/ सी.एन.जी. खरेदी करण्यासाठी खर्च मंजुर करणे. | (१) प्रशासनिक विभाग | (१) पूर्ण अधिकार | (१) आवश्यक निधी उपलब्ध असला पाहीजे.<br>(२)सर्वसाधारण निर्देशांचे, खर्चामध्ये काटकसर करण्यासंबंधीच्या आदेशांचे आणि संबंधित नियमांचे अनुपालन करण्यात यावे.<br>(३) विभाग प्रमुख त्यांच्या स्वतःच्या कार्यालयातील प्रशासन/लेखाविषयक कार्यभार सांभाळणाऱ्या राजपत्रित अधिकाऱ्याला ह्या शक्ती पुन: प्रदान करु शकतील. |
| | | | (२) विभाग प्रमुख<br>(३) प्रादेशिक कार्यालय प्रमुख | (२) व (३)<br>(अ) त्यांच्या स्वाधीन असलेल्या "स्टाफ कार" करीता प्रतिवर्षी ३००० लिटर/३००० किलोग्रॅम पर्यंत.<br>(ब) त्यांच्या दुय्यम अधिकाऱ्यांच्या स्वाधीन असलेल्या "स्टाफ कार" करीता, जर त्यांच्या संदर्भात विहित केलेल्या मर्यादेबाहेर जास्त खर्च होणार असेल तर प्रतिवर्षी १००० लिटर / १००० किलोग्रॅम पर्यंत. | |
| | | | (४)कार्यालय प्रमुख | (४) प्रतिवर्षी २००० लिटर / २००० किलोग्रॅमपर्यंत. | |

(Annexure - 9)

शासकीय कामासाठी वाहन वापराचे प्रमाणाबाबत.

---

महाराष्ट्र शासन,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक :- व्हीसीएल-१५९५/२४४/यंत्रसामुग्री,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक १४ जून १९९६

वाचा :- शासन, सार्वजनिक बांधकाम व गृहनिर्माण विभाग, परिपत्रक क्रमांक सीएसडी-१०७४/कार्यासन-१६, दिनांक २२ जानेवारी, १९७६.

परिपत्रक:

१. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या क्षेत्रीय आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांच्या जबाबदाऱ्या व कर्तव्ये यात मोठ्या प्रमाणात संख्यात्मक आणि गुणात्मक वाढ झालेली आहे. अशा परिस्थितीत पूर्वीच्या वाहन वापराबाबतच्या निश्चित केलेल्या मर्यादा सद्यःपरिस्थितीत अत्यंत अपुऱ्या पडत आहेत. क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या या रास्त अडचणी लक्षात घेऊन शासनाने आता खाली नमूद केल्याप्रमाणे वाहन वापराबाबतच्या मर्यादेत वाढ करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

सर्वसाधारण वाहन वापराची मर्यादा.

| | |
|---|---|
| १. कार्यकारी अभियंता | प्रतिमाह ३५०० कि.मी. |
| २. उप अभियंता | प्रतिमाह १८०० कि.मी. |

२. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिपत्याखालील सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना असे निर्देशित करण्यात येते की, वरील वाहन वापराच्या प्रमाणकामध्ये अधिग्रहण कालावधीत केलेला वाहनाचा वापर तसेच कार्यक्षेत्राबाहेर करण्यात आलेला वाहनांचा वापर विचारात धरू नये. पर दिलेली मासिक मर्यादा वर्षाच्या सरासरीने राखावी. काही अपरिहार्य व आकस्मिक घटनांमुळे एखाद्या महिन्यात थोडा बहुत जादा वापर होऊ शकतो. उपरोक्त शासन आदेशाचे सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी काटेकोरपणे पालन करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sd/-
( श. वि. सोनटक्के)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) सर्व मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद, नाशिक/अमरावती.
मुख्य अभियंता (विशेष प्रकल्प) सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई

(Annexure-10)

शासकीय कामासाठी निरीक्षण वाहन
वापराच्या प्रमाणकाबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग
शासन परिपत्रक क्रमांक- संकिर्ण -२०१६/प्र.क्र.३६/यं.बा.सा.
मंत्रालय मुंबई ४००० ०३२
दिनांक- १९ नोव्हेंबर, २०१६.

वाचा :- शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, परिपत्रक क्रमांक व्हीसीएल-१५९५/३४४/यंत्रसामुग्री, दिनांक १४ जून १९९६.

प्रस्तावना :

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या क्षेत्रीय आस्थापनेवरील कर्मचा-यांच्या जबाबदा-या व कर्तव्ये विचारात घेऊन संदर्भाधीन परिपत्रकान्वये निरीक्षण वाहन वापरासंबंधीच्या मर्यादा खालीलप्रमाणे निश्चित केलेल्या आहेत.

सर्वसाधारण वाहन वापराची मर्यादा.

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता | प्रतिमाह २५०० कि.मी. |
| २) उप अभियंता | प्रतिमाह १८०० कि.मी. |

तथापि काही प्रकरणांमध्ये निरीक्षण वाहनांचा वापर उपरोक्त मर्यादेपेक्षा जास्त होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले असून याबाबतीत महालेखाकार कार्यालयाकडून आक्षेपसुध्दा घेण्यात आलेले आहेत.

तसेच गेल्या २० वर्षात सार्वजनिक बांधकाम विभागाकडे असलेल्या विविध कामांची संख्या वाढली असल्याने वाहन वापराबाबतची मर्यादा वाढविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. ह्या बाबी विचारात घेऊन निरीक्षण वाहनांच्या वापराबाबत पुढीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

परिपत्रक :-

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या क्षेत्रीय आस्थापनेवरील कर्मचा-यांच्या जबाबदा-या व कर्तव्ये विचारात घेऊन निरीक्षण वाहन वापरासंबंधीच्या मर्यादा आत्ता खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहेत.

वाहन वापराची सुधारीत मर्यादा.

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता | प्रतिमाह ३८५० कि.मी. |
| २) उप अभियंता | प्रतिमाह २७०० कि.मी. |

तसेच निरीक्षण वाहनांचा वापर विहीत मर्यादेत ठेवण्यासाठी खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

(१) प्रत्येक अधिका-याने त्याच्या ताब्यात असलेल्या शासकीय निरीक्षण वाहनाच्या वापराचा तिमाही आढावा त्यांचे नियंत्रक अधिका-यांना सादर करावा.

(२) अधीक्षक अभियंता यांनी त्यांचे अधिनस्त कार्यकारी अभियंता यांचे ताब्यात असलेल्या आणि कार्यकारी अभियंता यांनी त्यांचे अधिनस्त उपअभियंता यांचे ताब्यात असलेल्या शासकीय निरीक्षण वाहनाच्या पहिल्या सहामाहीमध्ये (एप्रिल ते सप्टेंबर दरम्यान) झालेल्या वापराचा आढावा आक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात घ्यावा.

(३) ज्या अधिका-यांच्या शासकीय निरीक्षण वाहनांचा वापर मर्यादेपेक्षा जास्त होत असल्याचे निदर्शनास येईल, त्या अधिका-याला वाहनाचा वार्षिक सरासरी वापर विहीत मर्यादेत येण्याच्या दृष्टीने पुढील सहामाहीमध्ये वाहनाचा वापर कमी करण्याबाबत नियंत्रक अधिका-यांनी सूचना द्याव्यात.

(४) वर्षाच्या अखेरीस वाहनांचा वापर विहीत मर्यादेपेक्षा जास्त आढळून आल्यास संबंधित अधिका-याकडून वस्तुनिष्ठ खुलासा मागविण्यात यावा, तसेच सदरील खुलासा संयुक्तिक नसल्यास अशा प्रकरणी संबंधित अधिका-याकडून आर्थिक वसुली करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा.

(५) वाहनाचा वापर कमी होण्याच्या दृष्टीने आढावा बैठकींसाठी क्षेत्रिय अधिका-यांनी सामुहिकपणे एकाच वाहनाचा वापर आलटून पालटून करावा.

(६) अधीक्षक अभियंता /कार्यकारी अभियंता यांनी त्यांचे कार्यक्षेत्रा बाहेर शासकीय निरिक्षण वाहनांचा वापर प्रादेशिक मुख्य अभियंता यांचे पूर्वपरवानगीने करावा.

(७) उप अभियंता यांनी त्यांचे मंडळ कार्यालयाच्या कार्यक्षेत्राबाहेर शासकीय निरीक्षण वाहनाचा वापर अधीक्षक अभियंता यांचे पुर्वपरवानगीने करावा.

वरील सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. वरील प्रमाणे कार्यवाही न झाल्यास सदर बाबीची गंभीर दखल घेऊन क्षेत्रिय स्तरावर जबाबदार अधिका-यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६१११९१५५७३६५५१८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Pradeep E Dalvi

Digitally signed by Pradeep E Dalvi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=PWD Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=[illegible], cn=Pradeep E Dalvi
Date: 2016.11.19 [illegible]

(प्रदिप दळवी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

१.प्रधान सचिव , सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
२.सचिव (बांधकामे)/ सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
३.मुख्य अभियंता व सह सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
४.आंतरवित्तीय सल्लागार तथा उप सचिव ,सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
५.सर्व मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग .
६.मुख्य अभियंता (विद्युत), बांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१.
७.मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, मुंबई.
८.सर्व उप सचिव ,सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
९.सर्व अधिक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम मंडळ.
१०.अधिक्षक अभियंता (यांत्रिकी), नवी मुंबई.

११.अधिक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, नवी मुंबई /पुणे/नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर.

१२.प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्या., मुंबई.

१३.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरिक्षा) महाराष्ट्र-१ मुंबई

१४.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता /लेखापरिक्षा) महाराष्ट्र-२, नागपूर.

१५.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (दोन प्रती).

१६.निवासी लेखा अधिकारी, मुंबई.

१७.कार्यासन बांधकाम साहित्य (निवडनस्ती).

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, (सा.बां.वि.) यांचे कार्यालय, २२०१६९७५/७३
... मजला, बांधकाम भवन इमारत, २५ मर्झबान रोड,फोर्ट, मुंबई-४०० ००१. ☎ २२०१६९७३

जा.क्र. काइश/इशवि/यांत्रिकी/ ७८९४ दिनांक : 3१/८/१६

(Annexure-11)

प्रति,

अधीक्षक अभियंता (यांत्रिकी)
सा.बां.विभाग,७ वा मजला,
कोकण भवन,नवी मुंबई.

विषय : Procurement operation and maintenance of Vehicle under PWD बाबतचा Audit memo.

संदर्भ : १) शासन सा.बां.विभागाचे पत्र क्र.पीव्हीएस-२०१५/प्र.क्र.३६/यंबांसा,दि.१०/८/२०१६

२) महालेखाकार (लेखापरीक्षा) — II महाराष्ट्र नागपूर या कार्यालयाचे हिंदी पत्र क्र.अ.शा.स./प्रतिवेदन/ले.प्र.२०१५-१६/ Thematic Audit/I २८२

३) आपले पत्र क्र. सा.बां.(यां.)/तां-३/१११३/२०१६,दि.११/८/२०१६.

महालेखाकार (लेखापरिक्षा) - II महाराष्ट्र नागपूर या कार्यालयाने सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ... प्रभागाचा Thematic Audit २८२ मध्ये आढळलेल्या समिक्षकाची प्रत संदर्भिय पत्र क्र. १ अन्वये अनुपालन ... प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र | मुद्दा | अनुपालन |
|---|---|---|
| १) | प्राप्त समिक्षतील मुद्दा क्र. २.४ (Allocation of IVs) मध्ये आपले विभागांतर्गत मंत्रालयीन कामाकरीता वापरण्यात येणारे वाहने कुठल्याही मंत्रालयाच्या अधिकाऱ्याच्या नावे वाटप करण्यात आली नसून,सदर वाहने मंत्रालयातील अधिकारी व कर्मचारी यांचे गरजेनुसार वापरासाठी Staff Car म्हणून पुरवण्यात आल्याचे या कार्यालयाने नमूद केले होते. मात्र मुद्दा संदर्भात आपले कार्यालयाची तपासणी करतेवेळी सदर वाहने आपण मंत्रालयातील अधिकाऱ्यांच्या नावे वाहन वाटप केल्याचे नमुद आहे. तरी सदर प्रकरणी आपले स्पष्टीकरण या कार्यालयास सादर करावे. | उप अभियंता (यां.),यांत्रिकी (सा.बां.) उप विभाग, मुंबई यांचे पत्र क्र. ४३, दि.१८/८/२०१६ ची छायांकित प्रत सोबत जोडत आहे. |
| २) | 3.4 Deversion of funds ; Grants released for OMR should be spent only OMR of the IV/CMVs for which demand is placed. It was obsered in Presidency Division,Mumbai that OMR funds worth Rs.51.14 lakh were diverted during 2013-16 for various purposes viz payment to private travel agency, court fee payment, coloring of Ashok Stambh and fixing incumbency boards, advance / transfer to Hospital,MLA Hostel and Central Sub-division. The records related to expenditure incured on OMR of vehicles for 2011-12 to 2012-13 were not made available to audit by the division. | <u>Grants release for OMR 51.41</u><br>3.4 The private vehicle are fixed for higher officers use for Govt. purposes with the permision of compitant authority.<br><u>Court Fee Payment:</u><br>Court fee was the payment of driver tobe diposited in court against Govt.case.<br><u>Payment of Civil works.</u><br>As fuel payment was made inthe month of Feb - 2014 from reguler funds. The equal amount was debited to this funds.<br><u>Advance to sub division :</u><br>(MLA Hostel ) This was the payment of misc repairs and fuel charges same is for the central sub division and mechanical sub division.<br>The records is available in sub division office for varification.<br><u>Record for financial yera 2011-13</u><br>record for the financial year 2012-13 was show the audit the office records (2011-12) are tranfered to old records the search is in progress. |

कार्यकारी अभियंता
इलाखा शहर विभाग,मुंबई

(Annexure-12)

शासकीय परिवहन सेवेमार्फत खाजगी वाहतुकदारांकडून
भाडे तत्वावर घेण्यात येणा-या वाहनांचे दर करार
निश्चित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक : शापसे १००८/प्र.क्र.४४/२००८/२८-अ,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १ एप्रिल २००९

संदर्भ : १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : शापसे १००८/
प्र.क्र.४४/२००८/२८-अ, दि.४ जून २००८
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : शापसे १००६/
प्र.क्र.११९/२००६/२८-अ, दि.१ ऑगस्ट २००७

प्रस्तावना :

अति महत्वाच्या तसेच अति अति महत्वाच्या राज्य अतिथी यांच्या मुंबई भेटीच्या कालावधीमध्ये त्यांच्या परिवहनासाठी नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा, वरळी , मुंबई यांना बऱ्याच वेळा खाजगी पुरवठादारांकडून भाड्याने वाहने उपलब्ध करुन पुरवावी लागतात, अशा वाहनांचे दर करार करण्यासाठी उपरोक्त संदर्भाधीन दि. ४ जुन, २००८ अन्वये निविदा समिती गठीत करण्यात आली होती. सदर निविदा समितीने शिफारस केलेल्या अटी व शर्तीनुसार खाजगी पुरवठादारांकडून एक वर्षाच्या कालावधीकरीता निविदा मागविण्यात आल्या. निविदा समितीने अर्हताप्राप्त निविदाकारांचे कमीतकमी दर मान्य केले. जे खाजगी पुरवठादार निविदा समितीने मान्य केलेल्या दराने वाहन पुरविण्यास तयार असेल, त्या वाहतूकदारास शासन मान्यताप्राप्त वाहतूक कंत्राटदार म्हणून शासनाच्या पॅनेलवर घेण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

निविदा समितीने दि.१६ फेब्रुवारी,२००९ रोजीच्या बैठकीमध्ये मान्य केल्यानुसार तुलनात्मक तक्त्यातील दरांच्या आधारे सर्वात कमी दर सोबत जोडलेल्या विवरणपत्र अ व ब मध्ये देण्यात आले आहेत. त्यास निविदेतील अटी व शर्तींच्या अधीन राहून खालील खाजगी पुरवठादारांकडून वाहने उपलब्ध करण्यास नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा यांना या शासन निर्णयान्वये शासनाची मान्यता देण्यांत येत आहे.

१) पी.के.मखारिया ट्रॅव्हल्स (दुरध्वनी क्रमांक २३६७९१५१/५२/२३६७१६४१)
२) सुलभा ट्रॅव्हल्स (दुरध्वनी क्रमांक २३८९००६२/२३८५०७८०)
३) संजय ट्रॅव्हल्स (दुरध्वनी क्रमांक २२९०२३९९/२३५३०२९१)
४) मे. संत साहेब ट्रॅव्हल्स (दुरध्वनी क्रमांक २६७३६५२७/२६७३६५२८)

त्यानुसार नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा, वरळी, मुंबई यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी. :-

१) नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा यांनी उपरोक्त खाजगी पुरवठादारांबरोबर निविदांमधील अटी व शर्तींच्या अधीन राहून करारनामा करावा.

२) सदर दर करार या आदेशाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीपर्यन्त अंमलात राहील.

३) सदर दर करारामध्ये कोणताही बदल करण्याचे अधिकार शासनाकडे राहतील.

४) भाड्याने वाहने उपलब्ध करावयाची झाल्यास नियंत्रकांनी उपरोक्त पुरवठादारांकडूनच वाहने उपलब्ध करावीत.

५) उपरोक्त पुरवठादारांनी वाहने पुरविण्यास विवक्षित परिस्थितीत/ अपरिहार्य कारणास्तव असमर्थता दर्शविल्यास, उपवादात्मक परिस्थितीत शासन मान्य दराने अन्य पुरवठादारांकडून वाहने उपलब्ध करुन घेण्यास नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा यांना या शासन निर्णयाव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

६) शासन मान्य दराने वाहने पुरविण्यास तयार असलेल्या अन्य पुरवठादारांचीही नावे शासनाचे पॅनेलवर घेण्याबाबत नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा यांनी कार्यवाही करावी.

७) राज्य शासनाच्या अन्य विभागांनी घोषित केलेल्या राज्य अतिथींच्या व इतर मान्यवरांच्या परिवहनासाठी वाहने भाड्याने घेण्याची आवश्यकता भासल्यास संबंधित विभागांनी परस्पर उपरोक्त खाजगी पुरवठादारांकडुन विवरणपत्र अ व ब मधील दराने वाहने उपलब्ध करुन घ्यावीत आणि संबंधित विभागाने त्यांच्या निधीमधून याबाबतचा खर्च भागवावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब साईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक : २००१०४०६१६०३०६००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सही/-
(सी.एन.मंडलेकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. पदसिध्द संचालक, शासकीय परिवहन सेवा व विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य, बाडी गट लाईन, औंध , पुणे-७
२. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र शासन, मुंबई
३. सहसचिव / उप सचिव, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
४. उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग/का.क्र.२८-अ, मंत्रालय, मुंबई
५.प्रधान सचिव व मुख्य राजशिष्टाचार अधिकारी यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
६ नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ४०० ०२५
७. अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर १/२८
९. महालेखापाल (लेखा व परीक्षा) , मुंबई / नागपूर १/२
१०. मंत्रालयीन सर्व प्रशासकीय विभाग
११. अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग (का.क्र.३१), मंत्रालय, मुंबई
१२ वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१३. अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई
१४. निवड नस्ती

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : शापसे १००८/प्र.क्र.४४/०८/२८-अ,
दिनांक १ एप्रिल, २००१ चे सहपत्र

<u>विवरणपत्र अ</u>

भाडोत्री वाहन पुरविण्याचे दर दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | ४ तास ४० कि.मी. | ६ तास ६० कि.मी. | ८ तास ८० कि.मी. | १० तास १०० कि.मी. | १२ तास १२० कि.मी. | त्यापुढील प्रत्येक तास | प्रत्येक कि.मी. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | मारुती एस्टीम | ५५० | ८०० | ९०० | १,१०० | १,३०० | २५ | १० |
| २ | टाटा इंडिगो | ५५० | ८०० | ९०० | १,१०० | १,३०० | २५ | १० |
| ३ | ॲम्बॅसेडर | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ४ | आयकॉन | ६५० | ९५० | १,३५० | १,६७० | २,००० | ५० | १२ |
| ५ | लान्सर | ९७० | १,२७० | १,८७० | २,११५ | २,४७० | ७० | १८ |
| ६ | टोयोटा क्वालिस | १,१०० | १,३०० | १,६०० | १,८०० | २,००० | ६० | १० |
| ७ | मर्सिडीज-एस क्लास | ५,००० | ८,००० | १३०,००० | १६,००० | १९,००० | १,००० | ६० |
| ८ | मर्सिडीज-सी क्लास | ४,००० | ५,००० | ६,००० | ९,००० | १२,००० | ५०० | ५५ |
| ९ | मर्सिडीज-इ क्लास | ५,००० | ६,००० | ७,००० | १०,००० | १३,००० | ६५० | ७५ |
| १० | व्होल्वो बस | १५,००० | १९,००० | २४,००० | २६,००० | २८,००० | १,००० | ७० |
| ११ | टोयोटा करोला | १,४७० | १,९७० | २,४७० | २,७७० | ३,१७० | १४० | २८ |
| १२ | स्कॉर्पियो | ८७० | १,१७० | १,५७० | १,०७० | २,००० | ५० | १० |
| १३ | होंडा सिटी | ९६० | १,२५० | १,७७५ | १,८५० | १,९०० | ७० | १६ |
| १४ | तवेरा | ८७० | १,१७० | १,४७० | १,८७० | २,१७० | ५५ | १० |
| १५ | ह्युंदाई ॲसेंट | ६५० | ९५० | १,३५० | १,६७० | २,१०० | ७० | १३ |
| १६ | होंडा ॲकॉर्ड | १,९७० | २,९५० | ३,९५० | ४,९५० | ५,९५० | ५० | ४० |
| १७ | इनोव्हा (डिझेल) | ९०० | १,००० | १,१०० | १,५०० | २,००० | ६० | ११ |
| १८ | मिनी बस १५ आसने | ५,००० | ६,००० | १०,०००* | १००००* | १२०००* | ५०० | ६० |
| १९ | मिनी बस २० आसने | ५,००० | ६,००० | १०,००० | १२,००० | १५,००० | ५०० | ६० |

(सी.एन. मंडलेकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : शापसे १००८/प्र.क्र.४४/०८/२८-अ,
दिनांक १ एप्रिल, २००९ चे सहपत्र

विवरणपत्र ब

भाडोत्री वाहन पुरविण्याचे दर व त्याचा तुलनात्मक तक्ता

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | २४ तास सलग १ दिवस २५०कि.मी./ त्यानंतर प्रति कि.मी. दर | २४ तास सलग ५ दिवस १२००कि.मी./ त्यानंतर प्रति कि.मी. दर |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | मारुती एस्टीम | २६००/१० | १३०००/१० |
| २ | टाटा इंडिगो | २६००/१० | १३०००/१० |
| ३ | ॲम्बॅसेडर | --- | -- |
| ४ | आयकॉन | ३५००/१५ | १८०००/१५ |
| ५ | लान्सर | ४५२०/१८ | २२६००/१८ |
| ६ | टोयोटा क्वालिस | २५००/१० | १३०००/१० |
| ७ | मर्सिडीज-एस क्लास | ३८००/१२५ | १८०००/१२० |
| ८ | मर्सिडीज-सी क्लास | २४००/५० | ११०००/४५ |
| ९ | मर्सिडीज-इ क्लास | २६००/७० | १२०००/६५ |
| १० | व्होल्वो बस | ४८०००/८० | २२५०००/८५ |
| ११ | टोयोटा करोला | ६०००/२८ | २९०००/२६ |
| १२ | स्कॉर्पियो | २५००/१० | १३०००/१० |
| १३ | होंडा सिटी | ४२८०/१७ | २१४००/१७ |
| १४ | तवेरा | २५००/१० | १४०००/१० |
| १५ | हुंदाई ॲसेंट | ३५००/१५ | १८०००/१५ |
| १६ | होंडा ॲकॉर्ड | १००००/-- | ४३०००/३३ |
| १७ | इनोव्हा (डिझेल) | ३३२०/१३ | १६६००/१३ |
| १८ | मिनी बस १५ आसने | २५०००/६५ | १२००००/६५ |
| १९ | मिनी बस २० आसने | ३००००/७५ | १५००००/७५ |

(सी.एन. मंडलेकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

(Annexure-13)

पदनिर्मितीचे प्रस्ताव सादर करतांना
प्रशासकीय विभागांनी विचारात घ्यावयाचे मुद्दे

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन परिपत्रक क्र. पदनि २०१०/८४/१०/विसु-१
मंत्रालय, मुंबई — ४०० ०३२.
दिनांक : २७ सप्टेंबर, २०१०.

-: प रि प त्र क :-

राज्याच्या अर्थसंकल्पिय तरतुदीतील आस्थापना खर्च नियंत्रणात ठेवणे आवश्यक असून, त्यामुळे विकासात्मक कामांसाठी / कार्यक्रमांसाठी अधिक निधी उपलब्ध करुन देणे शक्य होते. विविध विभागाकडून सादर होणारे पद निर्मितीचे प्रस्ताव पाहता प्रस्तावाचा वाढीव आर्थिक भार कृत्रिमरित्या कमी दाखविला जातो. कंत्राटी पद्धतीने अत्यंत कमी मानधन सुरुवातीच्या काही वर्षांसाठी दाखविले जाते. सदर कंत्राटी पध्दतीचे कर्मचारी कालांतराने न्यायाधिकरण / न्यायालयातून आदेश मिळवून शासन सेवेत कायम होतात व त्यांना नियमित वेतनश्रेणीवर घ्यावे लागते व त्यामुळे आवर्ती खर्चात मोठी वाढ होते. केंद्र शासनही त्यांच्या विविध योजना राबविण्यासाठी ठराविक वर्षांसाठी निधी उपलब्ध करुन देते, मात्र कायमस्वरुपी आस्थापना खर्चाची जबाबदारी घेत नाही. केंद्रिय अनुदान बंद झाल्यानंतर अशा कर्मचाऱ्यांच्या वेतनावरील बोजा कायमस्वरुपी राज्य शासनावर पडतो.

वरील पार्श्वभूमीवर प्रशासनावरील खर्च आटोक्यात ठेऊन विकासासाठी पुरेसा निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहे

१) शासनासमोर / मंत्रीमंडळासमोर प्रस्ताव आणताना विभागांनी कृत्रिमरित्या वेतनावरील खर्च कमी दाखवू नये. कंत्राटी पध्दतीने मानधनावर नेमणूका करणे प्रारंभी अपेक्षित असले, तरी मानधनावरील खर्च, त्यात भविष्यात होणारी वाढ व कालांतराने असे कर्मचारी शासन सेवेत घ्यावे लागल्यास वेतनश्रेणीनुसार त्यांच्या वेतनावरील संभाव्य खर्च स्पष्टपणे नमूद करावा

२) अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत / अत्यावश्यक असल्याशिवाय, पदनिर्मितीचे प्रस्ताव विभागांनी आणु नयेत. अधिकारी स्तरावरची पदनिर्मिती प्रस्तावित करणे अपरिहार्य असल्यास त्यासाठी आवश्यक पुरक कर्मचारी वर्ग शक्यतो Outsourcing ने देण्याचा प्रयत्न असावा

३) एखादया विशिष्ट कार्यक्रमांतर्गत अपरिहार्यपणे वाढीव पदे आवश्यक असल्यास पदनिर्मिती सुचविण्याऐवजी त्या कार्यक्रमाच्या कालावधीपुरतीच मानधनावर कामे करुन घ्यावीत, व त्यासाठी शासनाने स्वत: कंत्राटी पध्दतीने नेमणूका करण्याऐवजी, बाह्य यंत्रणेकडून (Outsourcing द्वारे) कामे प्रस्तावित करावीत.

[कृ.मा.प.

४) उपलब्ध / मर्यादित मनुष्यबळांच्या आधारे प्रभावी कामकाजासाठी विभागांनी माहिती तंत्रज्ञानाचा वापर करावा.

५) तसेच विभागांनी त्यांचेमार्फत दिल्या जाणाऱ्या सेवा / सुविधांच्या कार्यपध्दतीचा आढावा (Business Process Reengineering) घेऊन कार्यपध्दती सुटसुटीत करावी.

६) शासकीय कार्यालयातून वर्षानुवर्षे केली जाणारी, पण सध्याच्या बदललेल्या स्थितीत जी सहजपणे बाहेरुन करुन घेता येतील, अशी कामे शासकीय कर्मचाऱ्याकडून करुन घेण्याऐवजी ती शक्यतो बाह्य यंत्रणेकडून (Outsourcing द्वारे) करण्याचे पर्याय अवलंबावेत.

७) सदरहू शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in. या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१००९२२११९१९४४००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(शं.ग. सातपुते)
उपसचिव

प्रत :. सर्व विधानसभा / विधानपरिषद सदस्य,
मा.राज्यपालांचे सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक
मा.मुख्य सचिव यांचे सचिव.
सर्व मंत्रालयीन विभाग,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.
सर्व उपसचिव / सहसचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
विभागातील सर्व कार्यासने.
वित्तीय सुधारणा कार्यासन संग्रहार्थ.

(Annexure-14)

सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत
असलेल्या बांधकाम यंत्रसामग्रीचा
आढावा घेणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग
शासन परिपत्रक क्रमांक- संकिर्ण -२०१६/प्र.क्र.३६/यं.बा.सा.
मंत्रालय मुंबई ४००० ०३२
दिनांक- १९ नोव्हेंबर, २०१६.

प्रस्तावना :-

सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत रस्ते व इमारती बांधकाम व दुरुस्ती प्रयोजनासाठी ट्रक टिप्पर, पाण्याचे टँकर, रोड रोलर इत्यादी "बांधकाम यंत्रसामग्री" वापरात आहे. सध्या विभागाकडे असलेली बांधकाम यंत्रसामग्री ही बहुतांशी कालबाह्य झालेली असल्याने यंत्रसामग्रीच्या दुरुस्ती देखभालीवर जास्तीचा खर्च होतो. त्याचबरोबर सुटेभाग सहजासहजी उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे यंत्रसामग्री ब-याच कालावधीसाठी दुरुस्ती अभावी बंद राहिल्याने दुरुस्तीच्या खर्चाच्या प्रमाणात उत्पादक काम होत नाही. तसेच स्थापत्य कामकाजावर परिणाम होतो. या संदर्भात महालेखाकार कार्यालयाकडून आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत. उपरोक्त बाबी विचारात घेता सार्वजनिक बांधकाम विभागातून कालबाह्य तसेच वापराविना पडून असलेल्या यंत्रसामग्रीची ई लिलावाद्वारे विल्हेवाट लावण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यास अनुसरुन पुढीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

परिपत्रक :-

मुख्य अभियंता यांचे स्तरावर प्रादेशिक विभागांतर्गत उपलब्ध बांधकाम यंत्रसामग्रीचा खालीलप्रमाणे आढावा घ्यावा.

१) सन १९९१ पूर्वी खरेदी केलेल्या बांधकाम यंत्रसामग्रीपैकी ज्या बांधकाम यंत्रसामग्रीची बनावट कालबाह्य झालेली आहे.(उदा. प्रिमिअर रोड मास्टर बेडफोर्ड इत्यादी ) अथवा ज्यांचे सुटेभाग सहजासहजी उपलब्ध होत नाहीत .अशी यंत्रसामग्री पुढील तीन महिन्यात निर्लेखित करुन ३१ मार्च २०१७ पूर्वी त्यांची विहित कार्यप्रणालीनुसार ई लिलावाद्वारे विक्री करुन विल्हेवाट लावावी.

२) तसेच सन २००० पूर्वी खरेदी केलेल्या प्रत्येक बांधकाम यंत्रसामग्रीचा वापर करुन मागील तीन वर्षात केलेल्या कामाची किंमत आणि यंत्र सामग्रीच्या वापरासाठी इंधन, दुरुस्ती तसेच आस्थापनेवर झालेला खर्च यांचा तुलनात्मक आढावा घेऊन जी यंत्रसामग्री वापरणे शासनाच्या आर्थिक हिताचे नाही. अशी यंत्रसामग्री निर्लेखित करण्याबाबत पुढील कार्यवाही हाती घ्यावी. यंत्रसामग्रीच्या निर्लेखन अहवाल (नमुना-३२) मंजुरीनंतर तीन महिन्याच्या कालमर्यादेत "ई" लिलावाद्वारे विक्री करुन निर्लेखित यंत्रसामग्रीची प्राधान्याने विल्हेवाट लावावी.

३) सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई पत्र क्रमांक एमसीएन/१६९७/प्र.क्र.३५/यंत्रकक्ष दि.२०/२/२००४ नुसार प्रत्येक सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये अत्यावश्यक असलेल्या किमान यंत्रसामग्रीची निश्चिती तीन महिन्याच्या कालावधीत करावी. त्या अनुषंगाने आवश्यकता असल्यास अद्यावत बनावटीच्या बांधकाम यंत्रसामग्रीची खरेदी करण्याच्या दृष्टीने ३१ मार्च २०१७ पूर्वी शासनास प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करावा.

४) मुख्य अभियंता कार्यालयामार्फत करण्यात येणा-या क्षेत्रिय विभाग/ मंडळ कार्यालयांच्या वार्षिक तपासणीमध्ये निरीक्षण वाहने तसेच यंत्र सामग्री यांच्या वापराबाबतचा मुद्दा समाविष्ट करावा.

वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.वरीलप्रमाणे कार्यवाही न झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधित मुख्य अभियंता कार्यालयाची राहील.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१६१११९१६०३४०५४१८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Pradeep E Dalvi Digitally signed by Pradeep E Dalvi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=PWD Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=718e0951332516 0a8ae457438bdb1168a0014 db1fec141f11bc8876781bd338, cn=Pradeep E Dalvi
Date: 2016.11.19 16:05:59 +05'30'

(प्रदिप दळवी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

१.प्रधान सचिव , सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
२.सचिव (बांधकामे)/ सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
३.मुख्य अभियंता व सह सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
४.आंतरवित्तीय सल्लागार तथा उप सचिव ,सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
५.सर्व मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग .
६.मुख्य अभियंता (विद्युत), बांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१.
७.मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, मुंबई.
८.सर्व उप सचिव ,सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
९.सर्व अधिक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम मंडळ.
१०.अधिक्षक अभियंता (यांत्रिकी), नवी मुंबई.
११.अधिक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, नवी मुंबई /पुणे/नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर.
१२.प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्या., मुंबई.
१३.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरिक्षा) महाराष्ट्र-१ मुंबई
१४.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता /लेखापरिक्षा) महाराष्ट्र-२, नागपूर.
१५.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (दोन प्रती).
१६.निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
१७.कार्यासन बांधकाम साहित्य (निवडनस्ती).

(Annexure-15)

शासकीय वाहने/यंत्रसामुग्रीच्या रोजवही
(लॉग बुक) ठेवण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग
शासन परिपत्रक क्रमांक- संकिर्ण -२०१६/प्र.क्र.३६/यं.बा.सा.
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक- १९ नोव्हेंबर, २०१६.

वाचा : १) सार्वजनिक बांधकाम विभाग, परिपत्रक क्र. एमसीएन-१०७०/एल (२) दि.२४.०७.१९७०.
२) सार्वजनिक बांधकाम विभाग, परिपत्रक क्र.एमसीएन- १०९०/१४०/यंत्रकक्ष दि.३.०३.१९९२

प्रस्तावना :-

शासकीय वाहने/ यंत्रसामुग्री यांची रोजवही ठेवणेबाबत संदर्भांकित परिपत्रकान्वये मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेल्या आहेत. परंतू शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, वरील परिपत्रकांत नमूद केलेल्या नियमांचे आणि सूचनांचे काटेकोरपणे पालन केले जात नाही. त्यामुळे शासकीय वाहने / यंत्रसामुग्री यांच्या वापराबाबतचा लेखाजोखा तपासणे शक्य होत नाही. याबाबत महालेखाकार कार्यालयाकडूनसुध्दा आक्षेप प्राप्त झालेले आहेत.

वरील सर्व बाबींचा सांगोपांग विचार करुन शासकीय वाहने/यंत्रसामुग्रीच्या रोजवही (लॉग बुक) ठेवण्याबाबत पुढीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहे.

परिपत्रक :-

१) वाहन/यंत्राची रोजवही ही नेहमी वाहन/यंत्रासोबत ठेवण्यात यावी व वाहनधारक अधिका-याने दिवसभराच्या रोजवहीतील सर्व नोंदी उदा. दिनांक, वेळ , इंधन/वंगण, मीटर रीडींग (कि.मी.), झालेला वापर (कि.मी.), प्रवासाचे प्रयोजन, वाहनचालक तपशील, वापरणारा अधिकारी / त्यांचे पदनाम या सर्व नोंदी अचूकपणे घेऊन रोजवहीत स्वाक्षरी करावी.

२) वाहनधारक अधिकाऱ्याच्या ऐवजी दुसऱ्या अधिका-याने वाहन वापरले असल्यास त्याच्या कामाचे प्रयोजन व स्वाक्षरी तसेच वाहन धारक अधिकाऱ्याची प्रतिस्वाक्षरी रोजवहीवर असणे अनिवार्य आहे.

३) वाहनाची रोजवही दोन प्रतीत ठेवण्यात यावी व त्याचा वापर आलटून पालटून करण्यात यावा. महिन्याअंती व कमाल दुस-या महिन्याच्या ५ तारखेपर्यंत मासिक गोषवा-यासह सर्व नोंदी अद्यावत असलेली रोजवही विभागीय कार्यालयाच्या लेखा शाखेकडे पाठविण्यात यावी.

४) शाखा अभियंता (यां.) यांनी सर्व यंत्र तसेच निरीक्षण वाहनांच्या रोजवह्यांचे अवलोकन करुन काही त्रुटी आढळल्यास अथवा मर्यादेपेक्षा जास्त वापर झाला असल्यास संबंधितांना कार्यकारी अभियंता यांचेमार्फत वापरामध्ये सुधारणा करण्याच्या सूचना द्याव्यात. तसेच कार्यकरी अभियंता (यां.) / सहा. मुख्य अभियंता (यांत्रिकी) यांनी आलटून पालटून १० % नमूना तपासणी करावयाची असून त्याप्रमाणे आढळलेल्या त्रुटींची पूर्तता वाहनधारक अधिकारी यांचेकडून प्राप्त करुन घ्यावी.

या व्यतिरिक्त या संदर्भात शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. शासकीय वाहन यंत्रसामुग्री यांच्या देखभाल व सुरक्षेसाठी जबाबदार असलेल्या सर्व विभाग

प्रमुखांनी सदर सुचना संबंधीतांच्या निदर्शनास आणाव्यात व त्याचे काटेकोरपणे पालन होईल याबाबत दक्षता घ्यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६१११९१६०९२५१९१८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Pradeep E Dalvi

(प्रदीप दळवी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

१. प्रधान सचिव , सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
२. सचिव (बांधकामे)/ सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
३. मुख्य अभियंता व सह सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
४. आंतरवित्तीय सल्लागार तथा उप सचिव ,सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
५. सर्व मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग .
६. मुख्य अभियंता (विद्युत), बांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१.
७. मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, मुंबई.
८. सर्व उप सचिव ,सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
९. सर्व अधिक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम मंडळ.
१०.अधिक्षक अभियंता (यांत्रिकी), नवी मुंबई.
११.अधिक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, नवी मुंबई /पुणे/नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर.
१२.प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्या., मुंबई.
१३.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरिक्षा) महाराष्ट्र-१ मुंबई
१४.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता /लेखापरिक्षा) महाराष्ट्र-२, नागपूर.
१५.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (दोन प्रती).
१६.निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
१७.कार्यासन बांधकाम साहित्य (निवडनस्ती).

महालेखापाल यांच्याकडून इंग्रजी पत्र क्र. NGP/PAC cell/UOR/3.7/2015-16, दिनांक २९.०९.२०१७ अन्वये प्राप्त झालेली अधिसंमती व त्यावर शासनाचे स्पष्टीकरण.

<table>
<tr><th>परि.क्र.</th><th>विषय</th><th>महालेखापाल कार्यालयाचा शेरा</th><th>शासनाचे स्पष्टीकरण</th></tr>
<tr>
<td>३.७<br>२०१५-१६</td>
<td>जकात दराची चुकीची गणाना केल्याने कंत्राटदारास रु. २.१२ कोटी गैरवाजवी लाभ</td>
<td>पथकर धोरणानुसार, मुळ पथकराच्या दराच्या दशांशावर सहा टक्के प्रति वर्ष या दराने प्रत्येक तीन वर्षांनी १ एप्रिल रोजी पथकर दर वाढवावयास होते. अशाप्रकारे तिस-या वर्षाच्या शेवटी ठरविण्यात आलेले दर वर्ष २०२५ पर्यंत जवळच्या रु.पाच व वर्ष २०२५ नंतर रु.१० पर्यंत पुर्णांकित करावयास पाहिजे. अशाप्रकारे सहा टक्के प्रति वर्षी वाढ करुन तिस-या वर्षाची पथकर दराची रक्कम पुर्णांकित करावयाची आहे.<br>खालील उदाहरणाप्रमाणे गणना केली आहे.
<table>
<tr><td>१ ले वर्ष</td><td>१०१x१.०६= १०७.०६</td></tr>
<tr><td>२ रे वर्ष</td><td>१०७.०६x१.०६=११३.४८</td></tr>
<tr><td>३ रे वर्ष</td><td>११३.४८x१.०६=१२०.२८</td></tr>
</table>
जी जवळील रु.५ च्या पटित पुर्णांकित केली आहे. रु.१२०/-<br>विभागाने त्यांच्या दिनांक २.०५.२०१६ च्या पत्रान्वये खालीलप्रमाणे पथकराच्या दरांची गणना केली असलेबाबत कळविले आहे.
<table>
<tr><td>१ ले वर्ष</td><td>१०१x१.०६= १०७.०६</td><td>पुर्णांकित रु.११०.००</td></tr>
<tr><td>२ रे वर्ष</td><td>११०x१.०६=११६.०६</td><td>पुर्णांकित रु.१२०.००</td></tr>
<tr><td>३ रे वर्ष</td><td>१२०x१.०६=१२७.२०</td><td>पुर्णांकित रु.१३०.००</td></tr>
</table>
विभागाने त्यांच्या दि.२२.०९.२०१७ च्या पत्रान्वये कळविले आहे की, पथकराचे दर ३ वर्षाच्या दरांची सरासरी घेऊन वाढविले आहेत.<br>विभागाचा युक्तिवाद/स्पष्टीकरण हे निराधार असून पथकर धोरणामध्ये ३ वर्षाची सरासरी घेण्याबाबत तरतूद नाही. त्यामुळे</td>
<td>महाराष्ट्र शासनाचा शासन निर्णय क्र.खाक्षेस-२००२ / प्र.क्र.२८९ (II)/ रस्ते-९ दिनांक ९ जाने,२००३ चे पथकर धोरण रू.७५ कोटी पर्यंतच्या कामाकरीता आहे.<br>सदर प्रकल्पाची किमत रू.७५ कोटीपेक्षा जास्त असल्यामुळे शासनाने २००३ च्या पथकर धोरणानुसार सदर प्रकल्पाकरीता स्वतंत्र पथकराचे दर निश्चित करण्यात आले असून तेच दर सविस्तर प्रकल्प अहवाल व प्रकल्पाची किमंत तयार करताना विचारात घेतलेले आहेत.<br>दिनांक ०२.०५.२०१६ रोजी प्रथम अनुपालन अहवाल सादर करतेवेळी तत्कालिन कार्यकारी अभियंता यांची चुक झाल्याचे निर्दशनास आले असून त्याबाबत त्यांना ताकीद देण्यात आली आहे.<br>सदर प्रकल्पाकरीता घेण्यात आलेले दर हे शासनाने ठरविलेल्या पथकर धोरणानुसार आहेत. याआधी अनुपालन अहवाल सादर करतेवेळी कार्यकारी अभियंता यांच्या नजर चुकीमुळे अचुक अनुपालन अहवाल सादर करता आला नाही.<br>शासनाच्या २००३ च्या पथकर धोरणातील परिशिष्ट —अ मधील मुद्दा क्र.२ खालीलप्रमाणे आहे.<br>१. पथकराचे दर प्रत्येक वर्षी ६ टक्के याप्रमाणे ३ वर्षातून एकदा १ एप्रिल रोजी वाढ करण्यात यावी.<br>२. अपूर्णांकातील पथकराचे दर सन २०२५ पर्यंत नजिकच्या ५ रुपयामध्ये आणि सन २०२५ नंतर नजिकच्या १० रु. मध्ये परावर्तित करावे. तथापि प्रतिवर्षी वाढ परिगणित करण्यासाठी मूळ अपूर्ण रुपयातील दर विचारात घेण्यात यावा.</td>
</tr>
</table>

| | | | |
|---|---|---|---|
| | | शासनाच्या स्पष्टीकरणातील परिशिष्ट-अ मध्ये दिलेल्या पथकराच्या दराची गणना चुकीची आहे. | पथकर धोरणानुसारच पध्दत वापरुन पथकराचे दर प... केले असून परिशिष्ट-अ मध्ये दिलेले आहेत. यावरुन स्पष्ट होते ६ टक्के वाढ करतेवेळी अपूर्ण रुपयातील दर विचारात घेतलेले असू... पुर्ण रूपयातील नाही. म्हणून लेखापरिक्षणात उपस्थित केलेला प्रत्येक... वेळी पुर्णांकातील दर घेऊन त्यानंतर प्रतीवर्षी ६ टक्के वाढ करावयाचा मुद्दा योग्य नाही.<br>मा.महालेखापाल यांनी वरील स्पष्टीकरण तपासून सा.बां. विभागाने दिलेल्या खुलाशास सहमती दर्शवावी, ही विनंती. |

हाराष्ट्राचे महालेखापाल (लेखापरिक्षण)-II नागपूर यांचे कार्यालयीन पत्र क्र.एनजीपी./पीऐसी सेल/युओआर/३.७/२०१५-१६, दिनांक ११ ऑक्टोंबर, २०१७ अन्वये प्राप्त प्राप्त झालेली अधिसंमती व त्यावर शासनाचे स्पष्टीकरण.

| परि.क्र. | विषय | महालेखापाल कार्यालयाचा शेरा | शासनाचे स्पष्टीकरण |
|---|---|---|---|
| ३.७<br>२०१५-१६ | जकात दराची चुकीची गणाना केल्याने कंत्राटदारास रु. २.१२ कोटी गैरवाजवी लाभ | कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, क्र.१ चंद्रपूर यांना लेखा परिक्षणाचा मुद्दा एप्रिल २०१६ मध्ये कळविला होता. त्यांनी दिलेल्या २ मे,२०१६ रोजीच्या प्राप्त उत्तरावर आधारीत वस्तुस्थितीजन्य निवेदन मुख्य अभियंता, सा.बां.प्रा.वि., नागपूर यांना ६ मे, २०१६ रोजी दिले गेले व त्यांना त्याचे अभिप्राय सादर करण्यास सांगितले. तथापि त्यांचेकडून विहित मुदतीत उत्तर प्राप्त न झाल्याने संबधीत परिच्छेद शासनास दि. २५ मे, २०१६ रोजी अभिप्रायासाठी सादर करण्यात आले. तथापि शासनाकडून ही ६ आठवड्याच्या विहीत वेळेत उत्तर प्राप्त न झाल्याने हा लेखापरिच्छेद लेखापरिक्षण अहवालात समाविष्ट करण्यात आला.<br>तथापि शासनाचे उत्तर दिनांक ०९.१०.२०१७ रोजी प्राप्त झाले व ते मान्य करण्यात आले आहे.<br>शासनाच्या दिनांक ०९.१०.२०१७ रोजीच्या सुधारीत उत्तरावर लेखा विभागाचे पुढे काहीही म्हणने नाही. | नोंद घेण्यात आली आहे. |

Desk Officer
Public Works Department
Mantralaya, Mumbai 400 032

सा.बां.विभाग/रस्ते-९

विषय :- बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा या तत्वावर आधारीत वरोरा – चंद्रपूर-बल्लारपूर-बामणी मार्गाच्या बांधकामासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग क्रं.1, चंद्रपूर व्दारे जकात (Toll) दराची चूकीची गणना केल्याने कंत्राटदारास ₹ 2.12 कोटी गैरवाजवी लाभ झाला.

| परिच्छेद क्र. | मुद्दा | शासनाचे स्पष्टीकरण |
|---|---|---|
| परिच्छेद ३.७. | कार्यकारी अभियंता (EE), सार्वजनिक बांधकाम विभाग क्रं.1, चंद्रपूर यांनी राज्य महामार्ग क्रं.264 वर वरोरा-चंद्रपूर-बल्लारपूर-बामणी मार्ग आणि पूल बांधकामाकरीता वरोरा-चंद्रपूर-बल्लारपूर - बामणी टोल मार्ग लिमीटेड, नागपूर (कंत्राटदार) यांचे सोबत बांधा,वापरा आणि हस्तांतरीत करा (BOT) या तत्वावर रू ४५६.५१ कोटी किमंतीचा सवलत करार निष्पादित केला (मार्च 2010). कंत्राटदारास काम सुरू झाल्यापासुन (जानेवारी 2011 ते जानेवारी 2041) 30 वर्षाचा सवलत कालावधी बहाल करण्यात आला आहे. ज्यात मार्ग बांधणे वापरणे आणि त्यांची देखभाल करणे यासाठी तीन वर्षाचा बांधकाम कालावधी अतर्भूत आहे. हा प्रकल्प ऑगष्ट 2014 मध्ये पूर्ण झाला आणि कंत्राटदाराणे 26 डिसेंबर 2014 पासून जकात (Toll) वसूल करणे सुरू झाले.<br>सार्वजनिक बांधकाम विभागाने (विभाग) जारी केलेल्या अधिसूचने (24 डिसेंबर 2014) नुसार या प्रकल्पांतर्गत विविध प्रकारच्या मोटार वाहनांच्या प्रत्येक फेरी (trip) चा जकात दर, महाराष्ट्र शासनाव्दारे जाहीर (जानेवारी 2003) जकात धोरणाप्रमाणे नियमीत करावयास पाहिजे होते. जकात धोरणाप्रमाणे मुळ जकात दराच्या दशांशावर सहा टक्के प्रति वर्ष या दराने प्रत्येक तिन वर्षानी, 1 एप्रिल रोजी जकात दर वाढवावयास पाहीजे अशाप्रकारे तिसऱ्या वर्षाच्या शेवटी ठरविण्यात आलेले जकात दर वर्ष 2025 पर्यंत जवळच्या ₹ पाच आणि 2025 नंतर ₹ 10 मध्ये पूर्णांकित करावयास पाहिजे. जकात आकारण्यासाठीचे दर, 2010-13 (मूळ दर दर्शविणारे) पासून सुरू होवून 2037-40 पर्यंत लागु राहिल आणि तीन- तीन वर्षाने टप्प्या- टप्प्या नुसार वाढेल असे जकात धोरणात विनिर्दिष्ट केले आहे.(ज्यात दर | वरोरा-चंद्रपूर-बल्लारपूर-बामणी रस्ता (रा.मा.२६४) चौपदरीकरण करणे तसेच चंद्रपूर बाह्यवळण रस्ता करणे हे संकल्पन, बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर रु.४५६.५१ कोटी इतक्या रक्कमेचे काम ३० वर्षे निश्चित सवलत कालावधीसह (३ वर्षे बांधकाम कालावधीसह) मे. व्ही.आय.एल.-आय.टी.एन.एल.-डि.आय.व्ही.ए. (संयुक्त उपक्रम) यांना रु.१७६.३१ कोटी इतक्या शासन सहभागासह देण्यात आली. सदर कामाचे कार्यारंभ आदेश दिनांक ०३.०१.२०११ देण्यात आले.<br>सदर प्रकल्प हा शासन सहभागावर आधारित होता. या प्रकल्पाच्या निविदा प्रस्तावास मंत्रीमंडळ पायाभूत सुविधा समितीने दिनांक १८.०८.२००९ रोजी मान्यता दिलेली आहे ज्यामध्ये पथकर दर हे परिशिष्ट - अ मध्ये दर्शविल्याप्रमाणे आहेत. मंत्रीमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आलेल्या टिप्पणीची प्रत परिशिष्ट-ब नुसार आहे. शासन सहभागाचा मान्यतेचा प्रस्ताव भारत सरकारकडे पाठवितांना हेच पथकर दर घेण्यात आले होते. सदर कामाच्या पुर्व अर्हता निविदेमध्ये व केंद्र शासनाने शासन सहभाग मंजूरी प्रदान केलेल्या प्रस्तावात हेच पथकर दर घेतले आहे. कृपया परिशिष्ट-क पहावे.<br>सदर प्रकल्प महाराष्ट्र शासनाच्या दिनांक ०९.०१.२००३ रोजीच्या पथकर धोरणानुसार राबविला आहे. या धोरणानुसार रु.७५ कोटी पेक्षा जास्त प्रकल्प किमत असलेल्या प्रकल्पांसाठी स्वतंत्र पथकराचे दर घ्यावयाचे आहेत. प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल, निविदा तसेच |

| परिच्छेद क्र. | मुद्दा | शासनाचे स्पष्टीकरण |
|---|---|---|

**मुद्दा:**

तिन वर्षानंतर वाढवावयाचे असलेले वाढीव दर दर्शविले आहेत).

EE, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग क्रं.1, चंद्रपूर यांच्या दस्तावेजांच्या पडताळणीत असे आढळले (मार्च 2016) कि विभागाने दर वर्षी जकात दरात सहा सहा टक्क्यांची वाढ देतांना हे दर जकात धोरणानुसार तिसऱ्या वर्षाअखेर एकदाच जवळच्या ₹ पाच वर पूर्णांकित करण्याऐवजी दरवर्षी पुढील ₹ पाच वर पूर्णांकित केले. परीणामीत, जकात धोरणाच्या तुलनेत विभागाने दोन प्रकारच्या वाहनाचे (जड मोटार वाहन आणि अनेक चाक असलेल वाहन) जकात दर चूकिचे आखले, जे खाली **तक्ता 3.7.1** मध्ये दर्शविले आहे:

**तक्ता 3.7.1 विभागाव्दारे जकात दराचे चुकीची परिगणना**

(प्रत्येक फेरीचे जकात दर)

| टप्पा | जड मोटार वाहन | | | अनेक चाक असलेले वाहन | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | जकात धोरणा प्रमाणे जकात दर | विभागाप्रमाणे जकात दर | विचारात घेतलेले अतिरिक्त दर | जकात धोरणा प्रमाणे जकात दर | विभागाप्रमाणे जकात दर | विचारात घेतलेले अतिरिक्त जकात दर |
| 2010-13 (मुळदर) | 101 | 101 | निरंक | 174 | 174 | निरंक |
| 2013-16 (सुधारित दर) | 120 | 130 | 10 | 205 | 220 | 15 |

अशा प्रकारे जड मोटार वाहन आणि अनेक चाक असलेल्या वाहनांसाठी विभागाव्दारे आखलेले 01 एप्रिल 2013 पासुन (2013-16 करिता लागू असलेले) प्रभावी असलेले दर जकात धोरणात विहित असलेल्या दरापेक्षा क्रमशः ₹ 10 आणि ₹ 15 प्रति वाहन प्रति फेरीने जास्त होते. परिणामी बांधा,वापरा आणि हस्तांतरीत करा या प्रकल्पांतर्गत कंत्राटदाराव्दारे उभारण्यात आलेल्या दोन जकात नाक्यावरून

**शासनाचे स्पष्टीकरण:**

पथकर अधिसूचना तयार करतेवेळी सोबत परिशिष्ट-अ मध्ये दिल्याप्रमाणे पथकराचे दर घेतले आहेत.

सदर प्रकल्पासाठी घेण्यात आलेले पथकराचे दर हे दिनांक ०१.०४.२०१० पासुन घेण्यात आले आहेत. ज्यात परिशिष्ट-अ मध्ये दिल्याप्रमाणे वाहन प्रकार २अ साठी रु.३७.००, वाहन प्रकार २ब साठी रु.५३.००, वाहन प्रकार ३ साठी रु.१०१ व वाहन प्रकार ४ साठी रु.१७४ इतके आहे. सदर मुळ दर हे दरवर्षी ६ टक्के दराने वाढतात आणि सोबतच्या परिशिष्ट-अ मधील स्तंभ क्र.(2), (4), (6) व (8) मध्ये दिल्याप्रमाणे अपूर्णांकात दर्शविले आहेत. सदर अपूर्णांकातील दर हे दिनांक ०९.०१.२००३ च्या पथकर धोरणानुसार ३ वर्षाच्या सरासरीतील म्हणजेच दुसऱ्या वर्षाचे दर हे जवळील रू ५.०० च्या पटीत पूर्ण घेण्यात आले आहेत.

उदा.-

१ एप्रिल २०१३ ते ३१ मार्च २०१६ या कालावधीत स्तंभ क्र.२ मधील अपूर्णांकातील पथकर दर खालीलप्रमाणे आहेत-

१) १ एप्रिल २०१३ — ३१ मार्च २०१४ = रू ४४.०६७

२) १ एप्रिल २०१४ — ३१ मार्च २०१५ = रू ४४.०६७x१.०६= रू ४६.७११

३) १ एप्रिल २०१५ — ३१ मार्च २०१६ = रू ४६.७११x१.०६= रू ४९.५१४

उपरोक्त पथकर दरातील सरासरी दर हा ४६.७११ इतका असून तो जवळील रु.५ च्या पटीत रु ४५.०० इतका येतो. याच पध्दतीने २०२५ पर्यंत पथकराचे दर काढण्यात आले असून, २०२५ नंतरचे पथकर दर रु १० च्या पटीत पूर्ण करण्यात आले आहे.

प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल, सुसाध्यता तसेच निविदा तयार करतेवेळी जे पथकर दर घेतले होते तेच पथकर दर निविदा स्विकृत

| परिच्छेद क्र. | मुद्दा | शासनाचे स्पष्टीकरण |
| --- | --- | --- |
| | (एकल किंवा परत फेरी) 01 जानेवारी 2015 ते 31 मार्च 2016 (15 महिने) दरम्यान जाणाऱ्या वाहणांच्या प्रत्यक्ष संख्येच्या आधारावर कंत्राटदारास ₹ 2.12 कोटीचा गैरवाजवी लाभ झाला.<br>EE, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रं.1, चंद्रपूर यांनी नमूद केले (मे 2016) कि जर जकात दर दशांशामध्ये घेतले असते तर ते दर स्वस्त राहिले असते व त्यामुळे सवलत कालावधी 30 वर्षापेक्षा जास्त वाढवावा लागला असता.<br>उत्तर समर्थनीय नाही कारण अपेक्षीत रहदारीपेक्षा वास्तविक रहदारी कमी असणाऱ्या प्रकरणां व्यतिरिक्त कोणत्याही प्रकरणात सवलत कालावधी 30 वर्षापेक्षा जास्त वाढवावयाची तरतूद करारात नाही. या प्रकरणी, जकात दराची चुकीची परिगणना करण्यात आली, जी राज्य शासनाव्दारे घोषीत जकात धोरणानुसार नव्हती व त्यामुळे कंत्राटदारास गैरवाजवी लाभ झाला.<br>ही बाब शासनास कळविण्यात आली (मे 2016) डिसेंबर 2016 पर्यंत त्यांचे उत्तर प्रतीक्षीत होते. | करतेवेळी घेतले असल्याने व सर्व निविदाकारांना हेच पथकर दर माहित असल्याने उद्योजकास कोणत्याही प्रकारचा गैरवाजवी फायदा देण्यात आलेला नाही. हेच पथकर दर पथकर अधिसूचना निर्गमित करतांना घेण्यात आले आहेत.<br>वरील खुलासा विचारात घेता सदर परिच्छेद संपुष्टात आणावा, ही विनंती. |

वरील माहिती अचूक व सत्य आहे.

(र.घा.जावळकोटी)
अवर सचिव

## ३.८ नियमबाहय प्रदान

| अ.क्र. | मुद्दा | अनुपालन |
|---|---|---|
| 1 | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१, ठाणे यांनी मुख्य अभियंत्याची पूर्व परवानगी न घेता कुंपण भिंतीचे काम विभागल्यामुळे, महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिकेतील तरतुदींचे उल्लंघन झाले. तसेच, बनावट तपासणी अहवालाच्या आधारावर कंत्राटदाराला त्यांनी केलेले रु.८५.२१ लक्षाचे प्रदानही नियमबाहय होते.<br><br>महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका, १९८४ च्या परिच्छेद २१९ नुसार, जेव्हा एखादे काम हे निविदा मागविण्यासाठी विभागावयाचे असते तेंव्हा संबंधित अधिकाऱ्याने संपूर्ण कामासाठी निविदेची मंजूरी देण्यासाठी सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्याकडून पूर्व परवानगी घेणे आवश्यक असते. जिल्हाधिकारी, ठाणे यांनी कोलशेत ठाणे येथे एकूण रु.१.६२ कोटी खर्चात, शासकीय जमिनीवर कुंपण भिंत बांधण्यास प्रशासकीय मान्यता दिली (डिसेंबर २०१३). कार्यकारी अभियंता (EE) सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१, ठाणे यांच्या दस्तऐवजांची तपासणी करता (डिसेंबर २०१५) असे आढळून आले की, मुख्य अभियंता, सा.बां.विभाग, मुंबई (CE) यांची पुर्व परवानगी न घेता EE ने कुंपण भिंतीचे काम १७ कामात विभागून, १७ स्वतंत्र निविदा मागविल्या (जानेवारी २०१४), जे नियम पुस्तिकेतील तरतुदींच्या विरुध्द होते. एकूण रु.१.३५ कोटी खर्चाची ही १७ कामे चार कंत्राटदारांना दिली होती (फेब्रुवारी २०१४). ही सगळी कामे मार्च २०१५ मध्ये पूर्ण झाली आणि कंत्राटदारांना रु.१.६८ कोटींचे प्रदान केले गेले. तसेच, निविदेच्या अटींनुसार कंत्राटदाराने चाचणी आणि विश्लेषणासाठी आवश्यक संख्येत | प्रस्तुत प्रकरणात सर्व्हे क्र.२८५ कोलशेत ही जमीन शासकीय मालकीची असुन ती जिल्हाधिकारी ठाणे यांचे नांवे आहे. सदर सर्व्हे क्र.२८५ जमीनीवर झोपडपट्टी अतिक्रमण झाले होते.<br>सदरची जागा मोक्याच्या ठिकाणी व मौल्यवान असल्याने या जागेवरील अतिक्रमणे जिल्हाधिकाऱ्यांनी पोलीस बंदोबस्तात हटवली व भविष्यात या जागेवर पुन:श्च अतिक्रमण होऊ नये यासाठी तातडीने प्रस्ताव मागवून या संरक्षक भिंतीच्या कामास प्रशासकीय मान्यता दिली.<br>शासकीय जागा संरक्षित करण्याची बाब अत्यंत तातडीची असल्याने तत्कालीन जिल्हाधिकारी ठाणे यांनी क्षेत्रिय अधिकाऱ्यांबरोबर वेळोवेळी केलेल्या चर्चेनुसार सदर काम एकाच कंत्राटदाराकडून पूर्ण करण्यास व निविदा निश्चिती करण्यास जास्त वेळ लागणार असल्यामुळे त्याऐवजी स्वतंत्र अंदाजपत्रके तयार करुन जास्त मक्तेदारांची नियुक्ती करुन कमी कालावधीत कामे करणे सोयीचे होईल, असे ठरले. तहसिलदार, ठाणे यांनी त्यांचे पत्र दि.१०.१.२०१४ अन्वये पूर्वी झालेले अतिक्रमण हटवून सुध्दा सदर जागेवर पुन्हा अतिक्रमण करण्यात आली आहेत. त्यामुळे सदर जागेभोवती भिंत बांधून मार्च २०१४ पर्यंत सुरक्षित ठेवणे गरजेचे होते.<br>त्यानुसार कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, ठाणे (सध्याचे सा.बां.विभाग क्र.१ ठाणे) यांनी १७ स्वतंत्र कामाची अंदाजपत्रके सादर केली. परंतु ३ घटक भाग अंतर्भूत असलेली व समप्रकारच्या प्रस्तावित बाबाची प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.<br>वरील अत्यंत तातडीची बाब विचारात घेता एकूण १७ कामे ४ कंत्राटदारांकडून कार्यान्वित झाली आहेत. नियमाप्रमाणे स्वतंत्र अंदाजपत्रके व स्वतंत्र निविदा बोलाविण्यात आल्या आहेत. १७ कामे ४ कंत्राटदारांना स्वतंत्ररित्या देण्यात आली आहेत. काढलेली अतिक्रमणे पुन्हा होऊ नये यासाठी एकाचवेळी जास्तीत जास्त लांबीत कंपाऊंड वॉल सुरु व्हावी ही तत्कालीन परिस्थिती विचारात घेता व स्वतंत्र कामाचे उद्दिष्ट विचारात घेता मूळ अंदाजपत्रके स्वतंत्र असल्याने सदरची कामे स्वतंत्ररित्या केली असल्याने कामांच्या विभागणीचा प्रश्न उदभवत नाही. अत्यंत तातडीची कामे करतांना कंत्राटदारांना क्षेत्रीय प्रयोगशाळा उभारणे शक्य झाले नाही. सदर |

| अ.क्रं. | मुद्दा | अनुपालन |
|---|---|---|
| | नमूना संकलनासाठी सर्व सुविधा पुरवावयाच्या होत्या आणि त्यासाठी होणारा खर्चही सोसायचा होता. करावयाच्या एकुण चाचण्यांपैकी ७० टक्के चाचण्या या कार्यस्थळी (साईट) असलेल्या प्रयोगशाळेत आणि ३० टक्के चाचण्या या दक्षता आणि गुणवत्ता नियंत्रण प्रयोगशाळेत (विभागीय प्रयोगशाळा) करावयाच्या होत्या. कंत्राटदारांच्या दाव्यांची पूर्तता करण्यासाठी चालू लेखा देयकाबरोबर चाचणी तपासणी अहवाल संलग्न करायचे होते.<br>लेखापरीक्षेत पुढे असे आढळून आले की, चारपैकी दोन कंत्राटदारांनी स्टील, सिमेंट, फाईन ॲग्रीगेट, क्राँक्रीट क्युब इत्यादींवरील १६ चाचणी अहवालांच्या नरी छायाप्रती चालू लेखा देयकाबरोबर जोडल्या होत्या तरी, EE नी या दोन्ही कंत्राटदारांना रु.८५.२१ लक्ष रक्कमेचे पूर्ण आणि अंतिम प्रदान केले होते. त्यानंतर लेखापरीक्षेकडून करण्यात आलेल्या प्रति पडताळणीत (जून आणि सप्टेंबर २०१६) असे आढळून आले की, १६ पैकी एकही चाचणी अहवाल हा खाजगी आणि विभागीय प्रयोगशाळेकडून जारी केला नव्हता त्यामुळे या दोन कंत्राटदारांनी कुंपण भिंतीच्या बांधकामात कुठल्या दर्जाचे साहित्य वापरले याबद्दल शंका उपस्थित झाली.<br>शासनाने सांगितले (सप्टेंबर २०१६) की, शासनाच्या या जमिनीवर झोपड्यांचे अतिक्रमण होण्याची भि ती होती. काम लवकर पुर्ण करण्यासाठी आणि अतिक्रमण टाळण्यासाठी, कुंपणाच्या भिंतीचे काम १७ कामांमध्ये विभागून चार कंत्राटदारांना दिले गेले. तातडीची गरज लक्षात घेऊन एकच संयुक्त निविदा मागविली गेली नव्हती. शासनाने पुढे असेही नमूद केले की, लेखापरीक्षेने गुणवत्तेबाबत शंका घेतल्यानंतर (flagged), SE दक्षता आणि गुणवत्ता नियंत्रण प्रयोगशाळा, नवी मुंबई यांचेकडून तपास करण्यात आला (जुलै २०१६). सर्व चारही कंत्राटदारांनी बांधकामाचे साहित्य एकाच ठिकाणाहून घेतले होते आणि खाजगी व विभागीय प्रयोगशाळांतून जारी केलेले तपासणी अहवाल समाधानकारक असल्याचे आढळून आले अशी SE नी त्यांच्या ऑगस्ट २०१६ च्या अहवालात पुष्टी दिली.<br>हे उत्तर स्वीकारणीय नाही. लेखापरीक्षा पुरावे स्पष्टपणे निर्देशित करतात की, हा दोन कंत्राटदारांना खाजगी प्रयोगशाळेद्वारे जारी केलेल्या तपासणी अहवालात अनाधिकृत फेरफार करुन दोन्ही कंत्राटदारांना (बी.के. आणि कंपनी, मुंबई आणि सोनल एंटरप्रायजेस, (ठाणे) | बाब लक्षात घेऊन क्षेत्रीय अभियंत्यांनी कामाची गुणवत्ता राखणेसाठी पुरेश्या प्रमाणात चाचणी नमुने घेऊन त्याची चाचणी मे. एस.के.जी. प्रकल्प आणि इंजिनिअरींग प्रा.लि. यांचे मान्यताप्राप्त प्रयोगशाळेत केली असून त्याचे अहवाल समाधानकारक प्राप्त झाले होते.<br>या चारही कंत्राटदारांनी आणलेले बांधकाम साहित्य वाळू, रेडीमिक्स कॉंक्रिट, स्टील इ. बाबी या एकाच स्त्रोतातुन आणल्या असल्याने तसेच त्यांच्या चाचण्या शासकीय दक्षता व गुणनियंत्रण प्रयोगशाळा तुर्भे घेऊन घेतल्या असून त्यांचेही निष्कर्ष समाधानकारक होते.<br>तत्कालीन तणावपूर्ण परिस्थिती लक्षात घेता असे निदर्शनास आले की, या कामांचे स्वतंत्र चाचणी निष्कर्ष घेणे कंत्राटदारांना शक्य झाले नाही.<br>वरील सर्व बाबींचा विचार करता सर्व कामांना आवश्यक असणारे बांधकाम साहित्य हे एकाच ठिकाणाहून आणण्यांत आले होते. तसेच या बांधकाम साहित्याची चाचणी मे. एस.के.जी. प्रकल्प आणि इंजिनिअरींग प्रा.लि. व शासकीय दक्षता व गुणनियंत्रण प्रयोगशाळा तुर्भे या ठिकाणी घेण्यांत आली व या चाचण्यांमधुन केलेले काम समाधानकारक आहेत असे निष्कर्ष प्राप्त झाले होते. सरतेशेवटी शासकीय प्रयोगशाळेतून आवश्यक असणाऱ्या चाचण्यांची कमी पडणारी संख्या व यातून होणारे शासनाचे आर्थिक नुकसान होऊ नये यासाठी सदर मक्तेदारांच्या सुरक्षा अनामत रक्कमेतून दंडासह वसुली रु.१,९९,८००/- करुन दि. २७.०५.२०१६ चा धनाकर्ष दक्षता व गुणनियंत्रण मंडळाकडे सुपुर्द करण्यात आला आहे.<br>वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेला मुद्याची तातडी विचारात घेता, फक्त रु.१.६२ कोटीची एकच निविदा बोलाविण्यात आली असती तर सदर कामाचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करुन त्यानुसार तांत्रिक मान्यता प्राप्त करुन घेऊन प्रारुप निविदा पत्रक मंजूर करणे व तद्नंतर निविदा सूचना प्रसिध्द करणे, निविदा प्राप्ती आणि निविदा मंजूरी इत्यादी सर्व प्रक्रियेमुळे सदर कामाचे कार्यादेश माहे मार्च २०१४ मध्ये द्यावे लागले असते. तसेच तहसिलदार ठाणे यांच्या दि.१०.१.२०१४ च्या पत्रान्वये निदर्शनास येते की, पोलीस संरक्षणात |

| अ.क्र. | मुद्दा | अनुपालन |
|---|---|---|
| | १५ तपासणी अहवालाच्या बनावट प्रति सादर केल्या होत्या तर विभागीय प्रयोगशाळेने, बी.के. आणि कंपनी, मुंबई यांना कुठलाही तपासणी अहवाल जारी केला नसल्याचे लेखापरीक्षेला निश्चितपणे सांगितले (जुन २०१६). म्हणुन खाजगी आणि विभागीय प्रयोगशाळांनी जारी केलेले चाचणी अहवाल समाधानकारक असल्याचा शासनाचा दावा स्विकारार्ह नाही.<br><br>अशाप्रकारे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१ ठाणे यांनी मुख्य अभियंत्यांची पूर्व परवानगी न घेता कुंपण भिंतीचे काम विभागणे हे, महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिकेतील तरतुदींच्या विरुध्द होते. तसेच कंत्राटदारांनी सादर केलेल्या तपासणी अहवालाची सत्यता पडताळल्याशिवाय केलेले रु.८५.२१ लक्षाचे प्रदानही नियमबाह्य होते. | कामाच्या जागेवर अतिक्रमणे काढून टाकली असली तरी पुन्हा माहे मार्च २०१४ पर्यंत संपूर्ण कामांची जागा अतिक्रमणामुळे वेढली गेली आहे. त्यामुळे पुन्हा पुन्हा अतिक्रमणे काढण्यात बराचसा वेळ वाया गेला. तत्कालीन कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, ठाणे यांनी १७ वेगवेगळया घटक भागाच्या निविदा मागविल्या व सदरची कामे वेगवेगळया ४ कंत्राटदारांना देण्यात आली.<br>शासनाने अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, नवी मुंबई यांना महालेखापाल (लेखापरिक्षा-१) महाराष्ट्र यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांवरुन सदर कामाची तपासणी करुन गुणवत्तेबाबतचा अहवाल सादर करण्याबाबत निर्देश दिले होते. त्यानुसार कार्यकारी अभियंता (दक्षता) यांनी दि.२९.७.२०१६ रोजी प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी भेट देऊन विवरांकित संरक्षक भिंतीची पाहणी करुन त्यासंबंधीच्या दस्तऐवजाची तपासणी केली. सदरच्या तपासणीमध्ये क्षेत्रिय अभियंता यांनी सदर कामासाठी वापरण्यात आलेल्या विभिन्न साहित्यांच्या चाचणी निष्कर्षाची पडताळणी केली असता सदरचे साहित्य हे विहित मानकाप्रमाणे आढळून आले. सदर कामामध्ये रेडिमिक्स कॉंक्रीटचा वापर करण्यात आलेला असून रेडिमिक्स कॉंक्रीट हे प्लँट वरुन मागवून प्रत्यक्ष कामाच्या जागेवर वापरण्यात आलेले आहे. सदर रेडिमिक्स कॉंक्रीटच्या क्युबची चाचणी तुर्भे येथील शासकीय प्रयोगशाळा येथे सोनल एंटरप्रायझेस या कंत्राटदाराद्वारा क्युब सादर करुन घेण्यात आलेली आहे व ते विहीत मानकाप्रमाणे आढळून आले आहेत.<br><br>तथापि, मानकाप्रमाणे घ्यावयाच्या चाचण्यांच्या संख्येप्रमाणे चाचण्या न केल्याने अशा चाचण्यांच्या शुल्काच्या दुप्पट दराने (दंडनीय दराने) कंत्राटदाराच्या देयकातून अंतिमत: वसुली केली आहे. अधिक्षक अभियंता, सा.बां. मंडळ, ठाणे यांनी दि.२५/०९/२०१७ च्या अहवालान्वये SKG Project & Engineering Pvt. Ltd. यांच्याकडुन प्राप्त केलेले तपासणी तथा चाचणी |

| अ.क्रं. | मुद्दा | अनुपालन |
|---|---|---|
| | | अहवाल हे अधिकृत असून संबंधीत कंपनीनेच Issue केलेले आहेत, असे प्रमाणित केलेले आहे. (चाचणी अहवाल सोबत सादर करण्यात येत आहेत.) त्यामुळे बनावट तपासणी अहवाल सादर करुन शासनाची फसवणूक केली हा मुद्दा निकाली निघत आहे. चारही ठेकेदारांच्या (एकुण १५ निविदा) देय बिलातून टेस्ट रिझल्ट जोडलेले नाहीत. असे समजून भरीव रक्कम (Substancial aaccount) राखून ठेवण्यात आली होती. महालेखापाल पाहणी अहवालानंतर सदर कामांचे (सर्व १५ निविदा) दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, मुंबई कडून तपासणी करुन घेण्यात आली त्यामध्ये सदर काम समाधानकारक आढळले.<br>सदर काम चालू असताना जर बारंवारीतेप्रमाणे चाचण्या घेतल्या असत्या तर जेवढी रक्कम दक्षता व गुण नियंत्रण मंडळास देय राहिली असती त्याच्या दुप्पट दराने राखुन ठेवलेल्या रकमेतून दक्षता व गुण नियंत्रण मंडळास वर्ग केलेले आहेत. त्यामुळे संबंधीत अधिकाऱ्याने कोणतीही चुक केलेली नाही.<br>सदर बी.के. कंपनीची भरीव रक्कम दिर्घकाळ पर्यंत राखून ठेवण्यात आली व त्या रकमेतून दंडनीय दराने (दुप्पट) देय रकमेची वसूली झालेली असल्यामुळे दोन कंत्राटदारांवर संबंधीत अधिकाऱ्याने दंडात्मक कार्यवाही पूर्ण केलेली आहे. त्यामुळे सदरील 2 कंत्राटदार व स्वीकृत करणारे संबंधीत अधिकारी यांचेविरुध्द वेगळी दंडात्मक कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.<br><br>उपरोक्त बाबींचे अवलोकन केल्यावर खालील बाबी स्पष्ट होतात.<br>१. सदर कामे अत्यंत तातडीची असल्याने अतिक्रमणे हटवून पोलीस बंदोबस्तात केलेली होती.<br>२. सदर कामांच्या ४ कंत्राटदारांनी आणलेले बांधकाम साहित्य हे एकाच |

| अ.क्र | मुद्दा | अनुपालन |
|---|---|---|
| | | स्त्रोतातून आणलेले होते.<br>३. या बांधकाम साहित्याची चाचणी खाजगी आणि शासकीय दक्षता व गुणनियंत्रण मंडळ तुर्भे या प्रयोगशाळेत करण्यांत आली. व प्राप्त चाचणी निष्कर्ष समाधानकारक आहेत.४. शासनाचे झालेले भांडवली नुकसान वसुली ही मक्तेदारांच्या सुरक्षा अनामत रक्कमेतून करण्यांत आलेली आहे.<br>५. उपभोक्ता खात्याच्या आवश्यकतेनुसार काम समाधानकारक पूर्ण झाले आहे.<br>६. बनावट सादर केलेल्या तपासणी अहवालासंदर्भात फेरतपासणी केली असता अधिक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, ठाणे यांनी सदर तपासणी अहवाल अधिकृत असल्याचे प्रमाणित केल्यामुळे संबंधीतांवर कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.<br><br>उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेऊन सदरचा परिच्छेद बंद होण्यास विनंती आहे. |

**साक्ष :-**

**परिच्छेद क्र. ३.२ 'निवडक सार्वजनिक बांधकाम विभागातील वाहनांचे प्रापण, उपयोग आणि देखभाल' :-**

**३.१** निर्लेखित वाहनांच्या ई-लिलाव करण्याच्या प्रक्रियेस मोठ्या प्रमाणावर विलंब झालेला आहे. विभागाने दिलेल्या नवीनतम माहितीनुसार आतापर्यंत एकुण ४८० गाड्यांचे लिलाव करण्यात आलेले आहेत. या विषयाच्या संदर्भातील माहिती देण्यास समितीने सांगितले असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, आतापर्यंत एकूण ५२८ पैकी ४७० गाड्यांचा लिलाव झालेला आहे. उर्वरित ५८ गाड्यांचा लिलाव येत्या तीन महिन्यांमध्ये करणार आहोत. या ५८ गाड्यांपैकी ४६ गाड्या शासन सेवेत कार्यरत आहेत. त्यामुळे या गाड्यांचा लिलाव करण्यासाठी वेळ लागलेला आहे. अशा प्रकाराच्या गाड्यांच्या विक्रिसाठी पूर्वी शासनाकडून शासकीय लिलावदार नियुक्त केले जात होते. याबाबतीत ई-लिलाव प्रक्रिया सन २०१२ मध्ये शासनाने सुरु केली व त्यानंतर शासनाने निर्णय घेतला की, निर्लेखित करावयाच्या गाड्यांचा लिलाव ई-लिलावाद्वारेच करावा. त्याबाबतचे सॉफ्टवेअर एन.आय.सी. या कंपनीने दिले होते. या प्रक्रियेमुळे वाहनांचा लिलाव करण्यास विलंब झालेला आहे. तसेच उर्वरित ५८ वाहनांच्या लिलावांची कार्यवाही येत्या तीन महिन्यात पूर्ण करण्यात येणार असल्याचे समितीस सांगण्यात आले.

सन २०११ मध्ये जुन्या गाड्यांचा लिलाव करण्याबाबतचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आलेला आहे. या संदर्भातील कार्यवाही सन २०१४ पासून सुरु केली आहे. सन २०११ ते सन २०१४ पर्यंत या निर्लेखित वाहनांचा लिलाव करता आला नाही. कारण निर्लेखित वाहनांच्या लिलावासंदर्भात शासनाने कोणताही निर्णय घेतलेला नाही. सन २०११ ते सन २०१४ पर्यंत या निरुपयोगी गाड्यांना आणखी निरुपयोगी करण्याचे काम विभागाने केलेले आहे. सरासरी प्रत्येक गाडीस फक्त ५० हजार रुपयांची किंमत मिळालेली आहे. अशा प्रकारच्या ढिसाळ नियोजनामुळे शासनाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे असे मत व्यक्त करुन या वाहनांमध्ये कोणकोणत्या वाहनांचा समावेश आहे? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, या वाहनांमध्ये जीप व कार या वाहनांचा समावेश आहे.

वापरात असलेली गाडी विकली तर त्या गाडीची किंमत चांगली येते पण तीच गाडी काही दिवस बंद ठेवली व त्यानंतर ती गाडी विक्रीस काढल्यानंतर ती गाडी भंगाराच्या किंमतीमध्ये द्यावी लागते. सदर गाड्यांच्या लिलावांची जबाबदारी ज्या अधिका-यांवर होती त्या अधिका-याने लिलावाचे काम वेळीच पूर्ण न केल्यामुळे शासनाचे जे नुकसान झाले आहे, त्याबाबत शासन संबंधित अधिका-यावर जबाबदारी निश्चित करणार आहे का ? निर्लेखित करावयाची जी वाहने ती कार्यालयामध्ये ठेवली जातात, त्या वाहनांचे पार्ट काढून विभागाचेच कर्मचारी विकतात असे मत समितीने व्यक्त केले.

महालेखाकार यांचा आक्षेप आहे की, विभागाने त्यांच्या नस्तीत असे स्पष्ट नमूद केले आहे की, "Delay in auctioning these vehicles will result in further detoriation and deduction of their realisable value." सदर वाहनांचा लिलाव योग्य वेळी केला नाही तर त्या वाहनांची किंमत मोठ्या प्रमाणावर कमी होते. सन २०११ ते २०१४ या तीन वर्षात लिलावासंदर्भात कोणताही निर्णय झालेला नाही. त्यामुळे जे शासनाचे नुकसान झाले आहे. याची जबाबदारी कोणत्या अधिका-यावर निश्चित करण्यात येणार आहे? अशी विचारणा समितीने केली असता ज्यावेळी शासनाचा लिलाव करण्याचा कालावधी होता त्याच कालावधीमध्ये ई-लिलाव ही नवीन पध्दत आल्यामुळे या नवीन पध्दतीची अंमलबजावणी करण्यास विलंब झालेला आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

ई-लिलाव पध्दतीने कार्यवाही करण्यासाठी चार ते सहा महिन्यांचा विलंब झाला तर ते समितीस मान्य आहे. परंतु या कामासाठी आपणास पाच वर्षांचा कालावधी लागलेला आहे. जर एखाद्या नवीन पध्दतीची अंमलबजावणी करण्यास पाच वर्षांचा कालावधी लागत असेल तर, तोपर्यंत जुन्या पध्दतीचा अवलंब करणे आवश्यक होते असे समितीचे मत आहे. यावर सचिवांनी खुलासा केला की, जुन्या पध्दतीने कार्यवाही करणे बंद झाल्यामुळे सदर कामास विलंब झालेला आहे. मागील काही महिन्यांपासून देशात वस्तू व सेवा कर लागू करण्यात आल्यामुळे लिलाव करण्याच्या प्रक्रियेत अडचणी निर्माण झालेल्या आहेत. नवीन ऑनलाईन पध्दत सर्वांना समजून घेण्यास वेळ लागत आहे.

ई- लिलावाची पध्दत सन २०१३-१४ पासून सुरु झालेली आहे. सन २०११ ते सन २०१४ पर्यंत विभागाने यासंदर्भात कोणतीही कार्यवाही का केली नाही? निर्लेखित वाहनांच्या लिलावांच्या प्रक्रियेस विलंब झाल्यामुळे शासनाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. ४७० वाहनांची किंमत २ कोटी ७६ लाख रुपये म्हणजे सरासरी एका वाहनाची किंमत ५० हजार रुपये होत आहे. शासकीय अधिका-यांच्या ढिसाळ नियोजनामुळे लाखो रुपयांच्या गाड्यांची किंमत फक्त ५० हजार रुपयापर्यंत खाली आली

आहे. या नुकसानीस कोण जबाबदार आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, सन १९६० पूर्वीच्या गाड्या असल्यामुळे या गाड्यांची किंमत ५० हजार रुपये झालेली आहे. सन २०१३ नंतरच्या गाड्यांमध्ये टँकरचा समावेश आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

सदर गाड्या सन १९६० पूर्वीच्या असल्यामुळे त्यांची किंमत कमी झालेली असली तरी, निर्लेखित केलेल्या सर्व गाड्या सन २००० पूर्वीच्या आहेत. तसेच ज्या ४७० गाड्यांचा लिलाव केलेला आहे त्या गाड्यांची खरेदी केव्हा झाली आहे, या संदर्भातील माहिती समितीस देण्यास सांगितले असता, निर्लेखित केलेल्या सर्व गाड्यांची खरेदी सन १९९५ पूर्वी केलेली आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले

सन १९९५ पूर्वीच्या गाड्या भंगारात विकल्या तरी त्या गाड्यांची किंमत ५० हजार रुपयापेक्षा जास्त होते. या कामी विलंब झाल्यामुळे शासनाचे लाखो रुपये नुकसान झाले आहे, असे समितीचे मत आहे. तसेच गाडयांची किंमत किती रुपये झाली यापेक्षा निर्लेखित गाड्यांचा लिलाव योग्य वेळी करु शकले नाहीत, ही विभागाची चूक आहे. टेंडर काढणे व त्या वाहनांची किती किंमत घ्यायची हा विभागाचा अधिकार आहे. या गाड्यांची खरेदी केव्हा केली आहे त्यासंदर्भातील सर्व माहिती समितीस सादर करण्याचे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित करुनही अद्याप माहिती प्राप्त झाली नाही.

दोन वर्ष विभागाने लिलावदार नियुक्त केले नाही, ही विभागाची चूक असून ती विभागाने मान्य केली पाहिजे. ई- लिलावाचे कारण पुढे करुन विभाग सदर चुका बाजूला करु शकत नाहीत. सदर प्रकरणी संबंधित अधिका-यांवर जबाबदारी निश्चित केली पाहिजे. जर सन २०११ च्या नस्तीवर सदर गाड्यांचा लिलाव ई- लिलाव प्रमाणेच करावा, असे नमूद केले असते तर समितीस सचिवांचा खुलासा मान्य होता. परंतु नस्तीमध्ये असे नमूद केले होते की, सदर वाहनांचा लिलाव करण्यासाठी सन २०११ ते सन २०१४ मध्ये शासकीय लिलावदार नव्हता. शासकीय लिलावदार नियुक्त करण्याची जबाबदारी कोणाची आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, सदर प्रकरणी सन २०११ मध्ये प्रस्ताव सादर केलेला होता.

प्रस्तावावर कार्यवाही करण्यासाठी पावणे तीन वर्षाचा कालावधी गेलेला आहे. ई-लिलाव पध्दत येण्यापूर्वी जी मॅन्युअल पध्दत होती त्यानुसार प्री-क्वॉलिफिकेशनच्या स्टेपपर्यंत कार्यवाही पूर्ण झालेली होती. त्यानंतर सन २०१२ साली ई- ऑक्शन पध्दतीने लिलाव करण्याच्या सूचना प्राप्त झालेल्या आहेत.

सन २०११ ते सन २०१४ पर्यंत शासकीय लिलावदार नव्हता असे विभागाचे उत्तर आहे. शासकीय लिलावदार नियुक्ती करण्याची जबाबदारी कोणाची आहे ? जर विभागाने शासकीय लिलावदार नियुक्त केला नसेल तर या पुढील कार्यवाही कशी होणार ? अशी विचारणा समितीने केली असता प्री-क्वॉलिफिकेशनची प्रक्रिया सुरु होती ही प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत ई- लिलाव ही नवीन पध्दत आल्यामुळे लिलाव प्रक्रियेस विलंब झालेला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सन २०११ मध्ये लिलावासाठी टेंडर काढण्यात आले होते. ही प्रक्रिया पूर्ण सुरु असतानाच ई- लिलावाची नवीन पध्दत आली या पध्दतीनुसार शासकीय लिलावदारची आवश्यकता नाही. त्यामुळे पूर्वीची पध्दत बंद करुन नवीन पध्दतीप्रमाणे काम सुरु केले आहे. अशा प्रकारच्या कामामुळे सदर वाहनांच्या लिलावास उशीर झालेला आहे. तसेच ई- लिलाव पध्दत केव्हा पासून सुरु झाली आहे ? तसेच The Government of Maharashtra prescribed in July, 1996 a time limit of three months for the disposal of vehicles, machinery from the date of rightoff order. खरे पाहता ही प्रक्रिया तीन महिन्यांच्या आत करणे आवश्यक होते. त्या प्रक्रियेस एक ते दीड वर्षाचा कालावधी लागलेला आहे. ही प्रक्रिया झाल्यानंतर ई- लिलाव पध्दत आल्यामुळे परत या प्रक्रियेस तीन वर्षाचा कालावधी लागला आहे. यामुळे सदर वाहनांची किंमत मोठ्या प्रमाणावर कमी झाली आहे. समितीचे म्हणणे असे आहे की, हा निर्णय कोणत्या स्तरावर घेणे अपेक्षित होते ? जर अशा प्रकारचा निर्णय त्या स्तरावर झाला नसेल तर त्याची कारणे काय आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता सन २०१२ पासून ई- लिलावाची पध्दत सुरु झाली आहे. असे सचिवांनी सांगितले.

लिलावदार नेमण्याच्या पध्दतीबाबत समितीस सांगण्यात आले की, पूर्वी सदर प्रकरणी खालच्या स्तरावरुन प्रस्ताव येत होते, त्यानंतर विभागाकडून शासकीय लिलावदार नियुक्त केले जात होते. आता ई-लिलाव ही नवीन पध्दत असल्यामुळे, आता अशा प्रकारचे लिलावदार नेमण्याची आवश्यकता नाही. लिलावदार नियुक्त करण्याची एक कार्यपध्दत आहे. प्री-क्वॉलिफिकेशन नंतर टेंडर काढावे लागते. त्यानंतर जे चांगले काम करतात त्या व्यक्तीस लिलावादार म्हणून नियुक्त केले जात होते. अशा

प्रकारची प्रक्रिया सुरु असतानाच ई-लिलावाची नवीन पध्दत आल्यामुळे या कामास विलंब झालेला आहे अन्यथा हे काम एक ते दीड वर्षात पूर्ण झाले असते.

सदर प्रकरणी कार्यवाही करण्यात विलंब झाला असल्याचे विभागाने मान्य केले आहे. परंतु या प्रकरणी कोणत्याही अधिका-यांची विशेष जबाबदारी नव्हती व त्यांनी या कामी विलंब मुद्दाम केलेला आहे असे काही झालेले नाही. असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

सदर विलंबामुळे शासनाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे असे समितीचे मत आहे. तसेच निर्लेखित वाहनांच्या लिलावास विलंब झाल्यामुळे वाहनांची किंमत कमी झाली आहे.वाहने निर्लेखित झाल्यानंतर तीन महिन्यांच्या आत सदर वाहनांचा लिलाव करणे आवश्यक आहे. तीन महिन्याऐवजी गेली १५ वर्ष झाली वाहनांचा लिलाव केलेला नाही. हा कालावधी वाढल्यामुळे सदर वाहने जास्तीच निकामी झाली आहे. त्यामुळे त्या वाहनांची किंमत मोठ्या प्रमाणात कमी झालेली आहे. जर विभागानी एका वर्षाच्या आत ही प्रक्रिया पूर्ण केली असती तर या वाहनांची किंमत जास्त प्रमाणात आली असती. या पुढील काळामध्ये अशा प्रकारचा विलंब न होण्यासाठी विभाग यावर काय उपाययोजना करणार आहे? तसेच निर्लेखित वाहनांची विल्हेवाट ६ महिन्यांच्या आत करावी. अशा प्रकारचा शासन निर्णय विभाग काढणार आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली व समितीच्या निर्देशानुसार निर्लेखित वाहनांची विल्हेवाट ६ महिन्यांच्या आत करण्यासाठी अशा पध्दतीचा शासन निर्णय करण्यात येईल असे समितीला आश्वस्त केले.

**परिच्छेद क्र. ३.२.२ 'बांधकाम यंत्रसामुग्री आणि तपासणी वाहनांचे व्यवस्थापन' :-**

**परिच्छेद क्र. ३.२.२.१ 'बांधकाम कार्य यंत्रसामुग्री आणि तपासणी वाहनांच्या दुरुस्ती व देखभालीवर झालेला अतिरिक्त खर्च :-** बांधकाम खर्च यंत्रसामुग्री आणि तपासणी वाहनांच्या दुरुस्ती व देखभालीवर झालेला अतिरिक्त खर्च यात देखभाल दुरुस्तीमध्ये नियमानुसार बरीच विसंगती आहे. नियमानुसार २ कोटी ६८ लाख रुपये खर्च अपेक्षित होता ४ कोटी ३८ लाख रुपये जास्तीचा खर्च झालेला आहे. यासंदर्भात विवरण क्र.— मध्ये सविस्तर माहिती दिलेली आहे. परिशिष्ट क्र. ५ व ६ यामध्ये या संबंधीचा उल्लेख उत्तरामध्ये केलेला आहे. मात्र ती मॅच होत नाही. अशी विचारणा समितीने केली असता सचिवांनी खुलासा केला की, बांधकाम यंत्रसामग्रीकरिता २ कोटी ५५ लाख रुपयांचा जास्तीचा खर्च झालेला आहे. ही यंत्रसामग्री जुनी होती, त्यामुळे अधिकचा खर्च झालेला आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

विभाग भाड्याने यंत्रसामग्री देतो, त्यांच्याकडून भाड्याचे पैसे वसूल करते. त्यानुसार किती खर्च झाला व किती वसुली झाली, एकुण फायदा तोटा किती झाला? विभागाकडे किती ट्रक, टँकर व रोडरोलर आहेत, त्यांच्यापासून किती उत्पन्न होते? जिल्हाधिकारी कार्यालयाला टँकर पुरवल्यानंतर त्यांच्याकडून विभागाला भाड्याची किती रक्कम प्राप्त होत असते. रोडरोलरपासून किती उत्पन्न झाले, व किती खर्च झाला याची समितीला सविस्तर माहिती द्यावी तसेच लॉगबुक का भरलेले नाही. अशी विचारणा समितीने केली असता, याबाबत आकडेवारी काढलेली नाही. विभागाकडे दोन प्रकारची यंत्रसामग्री असते. विभागाकडील रोडरोलर भाड्याने दिले जातात. मात्र ते अधिकाधिक विभागातच वापरले जातात. सर्वात अधिक टँकर असून ते जिल्हाधिकारी कार्यालयाला पुरवले जातात.जिल्हाधिकारी कार्यालयाला जे टँकर पुरवले जातात, त्यांच्याद्वारे काहीही उत्पन्न होत नाही. विभागाकडे एकूण १८० पाण्याचे टँकर असून ३७३ रोडरोलर आहेत. लॉगबुक भरलेले आहे. मात्र वर्क ॲब्स्ट्रॅक्ट विभागाकडे नाही. साक्षीच्या वेळी लॉगबुक समितीला दाखविणे शक्य आहे असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

विकल्प बंद होता म्हणून लॉगबुक केले नाही असे सांगितले जाते. तसेच नंतर असे सांगितले की, विकल्प वापरात नव्हते म्हणून लॉगबुक केले नाही असे मत समितीने व्यक्त केले असता, या दोन्ही कारणामुळे लॉगबुक केलेले नाहीत. अद्याप ५८ वाहनांचे लिलाव करावयाचे असून त्यापैकी ४६ वाहने वापरात आहेत व त्यांचे लॉगबुक भरलेले आहे. तसेच विभागाकडून स्वतः जी कामे करण्यात येतात त्याचे अकाऊंट ठेवले जाते. मात्र तसे अकाऊंट विभागाकडे नाही. जिल्हाधिकारी व इतर विभागांना मागणीप्रमाणे यंत्रसामग्री दिली जाते. यामध्ये जिल्हाधिकारी कार्यालय सांगतील तेथेच पाण्याचे टँकर पाठविण्यात येतात. विभागाचा अधिकचा खर्च २ कोटी ५५ लाख रुपये आहे. रोडरोलर किंवा पाण्याचे टँकर असो, हे सर्व बरेच जुने झालेले आहे. त्यामुळे त्यासाठी अधिक खर्च होतो. असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

सर्व टँकर जिल्हाधिकारी कार्यालयाला दिले जात नाही. त्यापैकी निम्मे टँकर्स व रोडरोलर कंत्राटदाराकडे पाठवले जातात. ३ शिफ्टमध्ये ही वाहने चालवली जातात, त्यापैकी एक शिफ्टचे पैसे विभागाला मिळतात. किती गाड्यांचे कि.मी चालू आहेत?

एकूण ट्रक्स व टँकरपैकी किती गाड्याची सिस्टीम सुरु असते ? मार्च महिन्यात डी.ई,ई.ई. दुकानदाराकडे जाऊन बिल आणतात, मेकॅनिक्सचे बिल लावतात व एक-दोन कोटी रुपये काढून घेतात. विभागाने अकोला सबडिव्हिजनचा रेकॉर्ड तपासून बघावा विभागाला सविस्तर माहिती मिळेल. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियमाच्या बाहेर जाऊन कोणत्या विभागात जादा खर्च झालेला आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, जिल्हानिहाय माहिती घ्यावी लागेल. सदर माहिती नंतर सादर करण्याचे आश्वासित करण्यात आले.

प्रत्येक जिल्ह्यात मेकॅनिकल डिव्हिजन नाही. अकोल्याला सबडिव्हिजन आहे. लॉगबुक व मेजरमेंटबुक दुकानदाराकडे असते. हस्ताक्षर पाहिल्यास दिसून येईल की, दुकानदारच बिल बनवतो, तोच रेकॉर्ड करतो. हे केवळ पैसे घेऊन सही करुन जातात. मशिनरीवरीललल एकूण उत्पन्न किती व खर्च किती ही माहिती देखील समितीला द्यावी असे समितीने सुचित केले.

गाडीचे पाट्‌र्सची विक्री का झाली नाही, लिलाव का झाला नाही. गाडीच्या जुन्या भागांचा लिलाव केला जातो काय? गाड्यांवर किती खर्च झाला व त्या पासून किती उत्पन्न मिळाले तसेच याची माहिती विभागाकडे नाही. डिझेल किती वापरले व त्या पासून किती उत्पन्न मिळाले, याची माहिती विभागाकडे नाही. याची माहिती समितीला द्यावी असेही समितीने सुचित केले.

स्पेअर पाट्‌र्सचा लिलाव होत नाही. लॉगबुकमध्ये मिटर रिडींग केले जात नाही. जे काम केले जाते त्याचे पैसे मिळत नाही. रोडरोलर कंत्राटदाराकडून २४ तास चालवले जातात मात्र केवळ ८ तासाचे पैसे मिळतात. आता सर्व काम आऊटसोर्स केले जाते. यामुळे या यंत्रसामग्रीचा फारसा उपयोग होत नसून केवळ त्यावर खर्च होतो. या करिता लेखापरीक्षण झाले पाहिजे. किती नफा-तोटा होत आहे, यावर लक्ष द्यावे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, विभाग आता ही सर्व वाहने निर्लेखित करणार आहे.

नफा-तोटयाचा हिशोब ठेवणे आवश्यक असताना विभागाने तो ठेवलेला नाही, असा आक्षेप आहे. विभागाने उत्तर दिले आहे की, विभाग कोणालाही देत नाही केवळ जिल्हाधिका-यांना यंत्रसामग्री देतो. कंत्राटदाराला यंत्रसामग्री देतात असे कोठेही विभागाने मान्य केलेले नाही. याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, कंत्राटदारांना इरिगेशनची यंत्रसामग्री जास्त दिली जाते.

पीडब्ल्यूडीचे रोडरोलर कंत्राटदारालाच भाड्याने दिले जातात त्यांचा कोठे वापर होतो ? कोणतेही काम विभाग करीत नाही, सर्व काम कंत्राटदारामार्फतच केले जाते. त्यामुळे त्यांनाच यंत्रसामुग्री भाड्याने दिली जातात असे मत समितीने व्यक्त केले असता समितीचे म्हणणे योग्य असल्याचे सचिवांनी मान्य केले. मात्र मोठया कंत्राटदाराकडे स्वतःची यंत्रसामग्री आहे. काही प्रमाणात यंत्रसामग्री दिली जाते. मात्र ते प्रमाण अत्यल्प आहे असा खुलासा सचिवांनी केला.

सन २०११ -२०१६ या कालावधीत एकही वाहन कंत्राटदारांना दिलेले नाही. शासकीय कामासाठी किंवा जिल्हाधिकारी कार्यालय सोडून इतर कोणाला दिले नाही असे सचिव ठामपणे सांगू शकता काय ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी ठामपणे सांगू शकत नसल्याचे सांगितले. कारण या संबंधी महालेखापालांच्या परिच्छेदा मध्ये उल्लेख आलेला नव्हता. या संबंधी तपासून पुन्हा लेखी उत्तर देण्याचे सचिवांनी मान्य केले.

जर कंत्राटदाराला यंत्रसामग्री दिली नसेल तर त्याचा वापर कोठे झालेला आहे ? विभाग स्वतः काम करीत नाही. मग अशा वेळी खर्च कोठे झाला, देखभाल दुरुस्तीकरिता रक्कम कशी खर्च झाली ? तसेच एवढी रक्कम खर्च केली जाते, मात्र त्याचा काहीही उपयोग होत नाही. मग ड्रायव्हर, मेकॅनिक्स हे कशासाठी आहेत ? स्वतः काम करीत नाही व कंत्राटदारांना देखील देत नाही मग हे सर्व पांढरा हत्ती पोसण्यासारखे आहे असे मत समितीने व्यक्त केले असता पूर्वी सर्व काम विभागामार्फत केले जात असे. सन १९६० पासून विभागाकडे यंत्रसामग्री आहे. त्यावेळी १०० टक्के काम विभागाकडून केले जात होते, विभागाकडे यंत्रणा होती. आता मागील २० वर्षात असे झाले आहे की, कंत्राटदाराला काम दिले जाते. खड्डे भरण्यासाठी जेथे कंत्राटदार मिळत नाही तेथे विभाग डांबर खरेदी करुन खड्डे भरतो. मेकॅनिकची भरती झालेली नाही मात्र हेल्पर विभागाकडे आहेत. काही यंत्रसामग्री आहे, मात्र ड्रायव्हर नाही तर काही ठिकाणी ड्रायव्हर आहे मात्र यंत्रसामग्री नाही. यामुळे विसंगती निर्माण झालेली आहे असे विभागीय सचिवांनी अगवत केले.

विभागाने ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की, The state government stated that, the fuel consumption exceeds the limit. याचे कारण जे अधिकारी मुख्यालयाच्या ठिकाणी राहत नाहीत, त्यांना आपल्या गावी जायचे असेल तर गाड्या घेऊन जातात आणि रविवारी, सोमवारी राहतात यामुळे अशी परिस्थिती उद्‌भवली आहे. याचे उदाहरण म्हणजे बुलढाण्याचा माणूस नागपूरला जातो आणि सोमवारी परत येतो असे यावरुन असे दिसून येते की, लॉगबुक मध्ये योग्य नोंद घेतली नाही. आणि किलोमीटर नुसार

लॉगबुक मेन्टेन केले जात नाही. सर्व लॉगबुक नियमित मेन्टेन करुन ते लॉगबुक वरिष्ठ अधिका-यांनी तपासले पाहिजे. त्यांनी ३ महिन्याच्या आत त्याचे प्रमाण वाढीव झाले असेल तर दुरुस्त करायला पाहिजे. सदर खर्च नियमानुसार झाला आहे की नाही हे तपासले पाहिजे. सचिवांचे म्हणणे आहे की, महालेखाकारांचा आक्षेप आहे ते योग्य आहे. परंतु लॉगबुकबद्दल सचिवांनी सुध्दा संबंधितांना वारंवार सूचना दिल्या आहेत आणि शासन निर्णय पण काढलेले आहेत. सचिवांच्या मतानुसार लॉगबुक अप टु डेट डेली मेन्टेन झाले पाहिजे. परंतु तसे होत नाही असे मत समितीने व्यक्त केले.

लॉगबुक नियमित मेन्टेन केले की सर्व नियंत्रणामध्ये येते. पण लॉगबुकच लिहिले जात नाही. त्यामुळे उप अभियंता मुख्यालय सोडून जिल्ह्याच्या बाहेर जाऊ शकतात. लॉगबुक लिहित नसल्यामुळे गैरव्यवहाराला खतपाणी मिळत असते. विभागाचे प्रमुख म्हणून सचिवांनी या बाबतीत इनसिस्ट करणे आवश्यक आहे की, सर्व लॉगबुक लिहून त्यांच्या सिनियारिटीनुसार तपासायचे आणि त्यामध्ये काही अडचण असेल तर पुढे करायचे. ही सर्व प्रक्रिया व्हायला पाहिजे असे समितीचे मत आहे. यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, हे सर्व ऑनलाईन करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

समितीने सूचना केली की, शासनाने सर्व डिजिटलायझेशन केले आहे. त्यामुळे लॉगबुक ऐवजी गाड्यांना जी.पी.एस. सिस्टिम लावावी आणि हे सर्व रेकॉर्ड लेखापरीक्षणासाठी जतन करावे. गाड्यांचे कुठे येणे जाणे आहे हे रॅन्डमली तपासण्यात यावे व हे सर्व सरळच काम आहे यामध्ये कुठलाही खर्च नाही. आता तर गाड्या बाहेरुन आणण्यात येतात ही जी संख्या सांगत आहेत ती सन २०११-१२ ची आहे. त्यामुळे ज्या नवीन गाड्या येतील त्यामध्ये जी.पी.एस. यंत्रणा लावण्यात यावी आणि त्याचे निरीक्षण करण्यात यावे. यासंदर्भात सचिवांनी खुलासा केला की, नवीन गाडी घेण्याचा प्रश्न नाही. विभागाचा उद्देश आहे की, सर्व वाहने भाडयाने घ्यावी कारण त्यामुळे भाडे जास्त का होत आहे हे आपोआप कळून येईल.

**परिच्छेद क्र. ३.२.३– विभागीय कार्यशाळांचे कामकाज**

या परिच्छेदामधील विषय खूप गंभीर आहे म्हणजे काहीही काम न करता वेतन देणे. तांत्रिक कर्मचारी वर्गाकडून कोणतेही काम करवून घेतले नाही. कर्मचा-यांना काम न देता बाहेर काम देवून १४.०३ कोटी रुपये खर्च केले आहेत. शिवाय खड्डे भरण्यासाठी वापरलेल्यांची बिलेच ठेकेदारांच्या नावाने आहेत अशी काही माहिती आहे की, हे काम विभागाच्या कार्यशाळेत झाले असते तर शासनाचे किती पैसे वाचले असते. अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, ह्या कार्यशाळा काही ठराविक जागेवरच आहेत आणि गाड्या वेगवेगळ्या ठिकाणांवरच आहेत.

जॉबकार्ड नसल्यामुळे मॅकनिकल विभागाला कर्मचा-यांनी काय काम केले हे माहीत नाही. शिवाय ते अधिकारी/कर्मचारी डिव्हिजन व सब डिव्हिजनला आहे किंवा नाही हे ही माहिती नाही.

सदर सर्व्हे हा अचलपूर, अमरावती, औरंगाबाद आणि पुणे या ठिकाणचे आहेत. महालेखाकारांच्या अभिप्रायानुसार या ४ कार्यशाळांमधील अधिकारी/कर्मचा-यांना काही केलेले नाही असे मत समितीने व्यक्त केले असता यावर सचिवांनी खुलासा केला की, कार्यशाळांचे प्रत्येक जिल्हानिहाय विभागणी पाहिले तर प्रत्येक जिल्ह्यात एक मेकॅनिक सुद्धा येत नाही. पण प्रत्येक जिल्ह्यात एक-एक हेल्पर येतो.

असे असले तरी समितीच्या मते विभागाने काही लोकांना कामावर ठेवले आहे आणि अचलपूर, अमरावती, औरंगाबाद आणि पुणे या ४ ठिकाणी ३७ लोक कामावर आहेत आणि त्यांना वेतन देण्यात येते. तर त्यांना इस्टॅब्लिश करण्यासाठी कुठेतरी सेंट्रल वर्कशॉप केला पाहिजे. ज्याप्रमाणे एस.टी.चा असतो. एक सेंट्रल वर्कशॉप नागपूरला आहे. गाडी बिघडली तर आपण तिकडे जातो. पण सार्वजनिक बांधकाम विभागाकडे काहीच यंत्रणा नाही. फक्त रोजगार हमी योजनेप्रमाणे वेतन देण्यात येते. रोजगार हमी योजनेमध्ये कमीत कमी काम करुन घेतले जाते पण इथे तर काम ही होत नाही. विभागाकडे कामच नसेल तर व्ही.आर.एस. द्या किंवा त्यांना कुठेतरी समाविष्ट करुन घ्यावे. कोणतेही उत्पादन (प्रोडक्शन) नसताना विभागाने एवढा खर्च करण्याचे कारण काय आहे? एका बाजुला १४.०३ कोटी रुपये मेंटेनन्स व खर्च केले आहे आणि दुस-या बाजुला वेतन घेऊन कर्मचारी बसुन राहिले. परंतु सचिवांनी सांगितले त्यांना इतर कामासाठी वापरुन घेतले. सचिवांचे उत्तर पहाता त्यांना कुठे वापरले आणि काय काम करुन घेतले ? अशी विचारणा समितीने केली असता याबाबत सचिवांनी सांगितले की, विभागाकडे एस.टी. प्रमाणे गाडया नाहीत व कर्मचारीवर्ग इतरत्र वापरण्याच्याबाबत खुलासा केला की,जी परिस्थिती आहे ती समितीच्या समोरच आहे.

उप सचिवांच्या उत्तरावर समितीने नाराजी व्यक्त केली व अतिरिक्त कर्मचा-यांना कुठे वापरले. याबाबत सचिवांनी समितीस सांगितले की, काही लोकांना ड्रायव्हर म्हणून तर काही लोकांना शिपाई म्हणून वापरले आहे. जे हेल्पर आहेत किंवा ज्यांच्याकडे ड्रायव्हींग लायसन्स आहे त्यांना ड्रायव्हर म्हणून वापरले आहे. पण या २९ जणांपैकी किती हेल्पर होते किंवा किती ड्रायव्हर झाले आहेत याबाबत समितीस सांगण्यात आले नाही.

नवीन आकृतीबंध तयार करीत असताना ही पदे निरस्थ करण्यात आली आहेत काय ? याबाबत, नवीन आकृतीबंध आणखी तयार झालेला नाही. जेव्हा कार्यशाळा बंद होतील तेव्हाच तो सुरु होईल. ३१ मार्चपर्यंत ह्या चारही कार्यशाळा बंद करण्याचा विभागाचा प्रयत्न आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला. ही पदे जर रद्द केली नाही तर वित्त विभाग व नियोजन विभाग सार्वजनिक बांधकाम विभागाच्या या पदाला तेवढ्या वेतनाचा पैसा दिला जाईल जो पर्यंत विभाग ही पदे निर्लेखीत करणार नाही तो पर्यंत वेतन खात्यामध्ये तेवढा पैसा जमा होईल. या समितीच्या मताबाबत सचिवांनी खुलासा केला की, जो पर्यंत ही लोक निवृत्त होणार नाहीत तो पर्यंत शासनाला त्यांना वेतन द्यावेच लागणार आहे. नवीन आकृतीबंधामध्ये जेव्हा ही पदे काढुन टाकणार तेव्हा नवीन भरती होणार नाही.

मागचे परिच्छेद क्र. ३.२.३ असेल यांचे विषय संलग्न आहेत. भरपूर प्रश्न विचारले पण याची उत्तरे काही येत नाहीत. सचिवांकडून जास्त अपेक्षा आहे म्हणून ते चौकशी करतील आणि या खात्यामध्ये पुन्हा अशा प्रकारचे काही होणार नाही याची काळजी घेतील असे मत समितीने व्यक्त केले.

समितीने अशी सूचना केली की, अकोल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे जे मेकॅनिकल सबडिव्हिजन आहेत त्याची जागा कोट्यावधी रुपयाची आहे. आता ते सबडिव्हिजन बंद होत आहे तर त्या जागेचे विभागाने संरक्षण करावे. कारण त्याचे ५० ते १०० कोटी रुपये विभागास मिळतील. त्या जागेवर अतिक्रमण होणार नाही याची विभागाने काळजी घ्यावी व संबधितांना तशा सूचना द्याव्यात.

पी.पी.पी. मॉडेलवर सर्व ठिकाणचे डेव्हलपमेंट करणार असे उत्तर विभागाने ज्ञापनात दिलेले आहे. तसेच उत्तरामध्ये विभागाने असेही म्हटलेले आहे की, खाजगी कार्यशाळा जिल्हा स्तरावर उपलब्ध असल्याने शासनाने विभागीय कार्यशाळा टप्याटप्याने बंद करण्याचे नियोजन आहे. महसूल वाढीकरीता या कार्यशाळांची जमीन सार्वजनिक-खाजगी भागीदारीतून विकसित करण्याचे नियोजन आहे. नेमके हे नियोजन काय आहे ? याची माहिती समितीस देताना सचिवांनी सांगितले की, जेव्हा कार्यशाळा बंद होतील तेव्हाच खाजगीकरणाचे नियोजन करता येईल. यामध्ये शासनाने धोरण ठरविणे आवश्यक आहे.

कार्यशाळा बंद करण्याचा फेसआऊट कार्यक्रम विभागाने निश्चित केला आहे काय? आणि त्या जागेचा उपयोग कमर्शियल व्हायबिलीटी बघून पी.पी.पी. मॉडेल वर करण्याचे काय नियोजन आहे याबाबत समितीस सविस्तर सांगावे. तसेच त्या ठिकाणी काम करणा-या कर्मचा-यांचे काय करणार याबाबत माहिती द्यावी असे समितीने सुचित केले असता, सचिवांनी खुलासा केला की, सन २०१७-१८ या आर्थिक वर्षापर्यंत फेसआऊट करण्याचा विभागाचा प्रयत्न आहे. फेसआऊट झाल्यानंतर त्याला विकसित करण्याचे दोन प्रस्ताव आहेत. एक म्हणजे तिथे शासनाचा कोणताही उपक्रम असेल तर तो उभा करु शकतो नाहीतर पी.पी.पी. पद्धतीने त्यावर काम करण्यात येईल. कार्यशाळेत काम करणा-या कर्मचा-यांची संख्या खूप कमी होत चालली आहे. त्यामुळे त्यांच्याकडून काम करुन घेणे शक्यच नाही. त्यामध्ये हेल्परची संख्या जास्त आहे, मेकॅनिकची संख्या खूप कमी आहे. कारण मेकॅनिकच नसेल तर त्याला हेल्पींगची गरज नाही. तर त्याला रिडिप्लॉय करावे लागेल.

या कामाचे मॉनिटरींग अधिक्षक अभियंत्याच्या पातळीवरचे अधिकारी जे मेकॅनिकल विभागाचे प्रभारी असतात, ते करतात. पूर्ण राज्यामध्ये मेकॅनिकल अधिक्षकाची संख्या एक आहे म्हणून समितीने मॉनिटरींग ह्या विषयाबाबत चिंता व्यक्त केली.

सन १९८२ साली शासनाने जो निर्णय काढलेला आहे त्यामध्ये जॉबकार्ड तयार करण्याचा अंतर्भाव आहे. ८६६ कामांसाठी जॉबकार्डची माहिती नाही काही रेकॉर्ड पण नाही. यासाठी कोण जबाबदार आहे ? यामध्ये आपण जबाबदारी निश्चित करायला पाहिजे. ८६६ जॉबकार्ड न बनवता काम केले गेले. याची जबाबदारी कोणाची आहे ? त्यांच्यावर विभाग कारवाई करणार काय? अशी विचारणा समितीने केली असता, त्यांनी जॉबकार्ड केलेले नाहीत हे खरे आहे. महालेखाकारांनी जी किंमत काढून दिली त्यानुसार एकूण मेंटेनन्समध्ये किती खर्च झालेला आहे हे पाहिले तर तो गाडीनिहाय काढला तर एक्सेस एक्सपेंडिचर मॅनेजेबल लिमिटच्या आत आहे. परंतु जॉबकार्ड ठेवणे हे आवश्यक आहे असा खुलासा सचिवांनी केला. यावर समितीने पुन्हा विचारणा

केली की, जॉबकार्डच नसतील तर त्या जागेमध्ये काय काम होते हे कसे ठरविणार आणि कोण ठरविणार आहे ? यामध्ये कारवाई करणे अपेक्षित आहे. तसेच महाराष्ट्रात चारच कार्यशाळा आहेत तर त्यांना जॉबकार्ड आहेत की नाही हे सचिवांनी भेट देऊन पाहणे आवश्यक होते.

या परिच्छेदामध्ये समितीला दोनच मुद्दे अपेक्षित आहेत. एक म्हणजे जॉबकार्ड नसताना सुद्धा त्यांचे वेतन काढलेले आहे. ही बाब आक्षेपार्ह आहे. यासाठी जबाबदार व्यक्तींवर सचिवांनी कारवाई केलीच पाहिजे आणि केलेल्या कारवाईची माहिती एक महिन्याच्या आत समितीला द्यावी. दुसरे म्हणजे सन २०१७-१८या वित्तीय वर्षात विभागाच्या सर्व कार्यशाळा बंद करुन तिथे काम करणा-या लोकांचे रिअल लोकेशन करणार आणि पी.पी.पी. मॉडेलचा वापर करणार. ज्या कामासाठी ती जागा उपयोगी आणता येईल ते करुन त्याला संरक्षित करण्यात यावे अशी समितीची भूमिका आहे. त्याबद्दल सचिवांनी समितीला आश्वास्त केलेले आहे असे गृहीत धरण्यात आले.

**परिच्छेद क्र. ३.२.४ : आंतरिक नियंत्रण :-**

**वाहने/यंत्रसामुग्रीची खरेदी, उपयोग आणि देखभाल यासंबंधी आढावा घेण्यासाठी अधिक्षक अभियंता (यांत्रिकी) यांच्या अध्यक्षतेखाली २०११-१६ दरम्यान २३ बैठकी आयोजित करण्यात आल्या. तथापि, फक्त सहा बैठकीचे कार्यवृत्त तयार करण्यात आले. वाहनांच्या/यंत्रसामुग्रीच्या स्थितीच्या आढाव्याबद्दल दुसरे कोणतेही केंद्रीकृत संनियंत्रण कार्यप्रणाली नव्हती. त्यामुळे वाहने/यंत्रसामुग्रीची खरेदी उपयोग आणि देखभालीसाठी असलेल्या आंतरिक कार्यप्रणालीच्या पर्याप्तचे परीक्षण लेखापरीक्षण करता आले नाही.**

विभागाने ज्ञापनात नमूद केले आहे की, आतापासून दुरुस्त केले आहे. समितीचे असे मत आहे की, अगोदरच्या लोकांनी फक्त बैठका घेतल्या पण रेकॉर्डच ठेवले नाही त्याबाबत काय कार्यवाही करणार ? विभागाने कार्यवाही करायला पाहिजे असे मान्य करतात. परंतु संबधितांवर कारवाई करत नाहीत. या अनुषंगाने सचिवांनी खुलासा केला की, २३ बैठका झाल्या असतील तर त्याचे रेकॉर्ड ठेवायला पाहिजे होते. विभागाकडून सर्व इंटरनल कंट्रोल आणखी स्ट्रीक्ट करण्यात येत आहे. जास्तीत जास्त कंट्रोल होण्यासाठी विभाग प्रयत्न करीत आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाबद्दल महालेखाकारांनी जो निष्कर्ष काढलेला आहे त्यामध्ये समितीच्या सदस्यांची भावना पूर्णपणे पर्यवेक्षित होत आहे. नवीन वाहने/यंत्रसामुग्रीची खरेदी जुने वाहने दुरुस्ती करणे होणार नाही अशा वाहनांची विल्हेवाट याबाबतीची त्रुटीपूर्ण पद्धत या विभागामध्ये आहे. तसेच वाहनांची तपासणी, दुरुस्ती, देखभाल, जुन्या वाहनांना लागणारे इंधन या वरील खर्च विहित मापदंडापेक्षा जास्त असल्याचे आढळले. विभागीय कार्यशाळांची उपयुक्तता, वाहन यंत्रे यांच्या देखभाल दुरुस्तीवर लागणा-या खर्चावर संनियंत्रण ठेवण्यासाठी मूलभूत दस्तावेज सुद्धा ठेवण्यात आले नाहीत. याप्रकारचे गंभीर निष्कर्ष महालेखाकारांनी काढलेले आहेत. त्याबद्दल समिती आपली नाराजी व्यक्त करते. यावर विभागाने योग्य ती कारवाई करावी, अशी अपेक्षा समितीने व्यक्त केली.

**परिच्छेद क्र. ३.७ 'जकात दराची चुकीची गणना केल्याने कंत्राटदारास रु. २.१२ कोटी गैरवाजवी काम' :-**

हा बांधा, वापरा, हस्तांतरित करा (BOT). रस्त्यांवरच्या परिगणनेचा विषय आहे. यामध्ये टोल रेटचा एक मुद्दा आहे. महालेखाकारांचे म्हणणे आहे की, तो १२० दराने लावला पाहिजे तर विभागाने १३० रुपये दराने लावलेला आहे त्यामुळे त्यात चूक आहे असे महालेखाकारांचे म्हणणे आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, याबाबत सचिवांनी खुलासा केला की, शासनाची पॉलिसी किंवा धोरण आहे त्यानुसारच तो टोलरेट ठरविण्यात आला होता. त्यानुसारच टेंडर काढले होते. यामध्ये दोन गोष्टी आहेत. एक म्हणजे यात महालेखाकारांनी म्हटले आहे की, परिगणना चुकली आहे. त्यामध्ये विभागाने असे केले आहे की, तीन-तीन वर्षाची सरासरी काढून त्याप्रमाणे शासनाने पद्धत ठरविलेली आहे ,त्यानुसार हे ठरविण्यात आले होते. दुसरे असे आहे की, ही सरासरी काढल्यानंतरच टेंडर काढले आहे. यामुळे कुठल्याही एका कंसेसनरीला फायदा झाला असे नाही. कारण टोलरेट काय असणार हे प्रत्येकाला माहिती होते.

महालेखाकारांचे जे आक्षेप आहे ते विशिष्ट रस्त्यांच्या संदर्भात आहे की त्यामध्ये इतरही रस्ते आहेत. या समितीच्या मताबाबत सचिवांनी खुलासा केला की, शासनाच्या धोरणानुसार दर तीन वर्षानी टोल रेट वाढविले जातात. पहिल्या वर्षी, दुस-या वर्षी व तिस-या वर्षी जो टोल रेट ठेवला जातो, त्यातील दुस-या वर्षीच्या रेटला राऊंड अप करतो. या नियमामुळे कोणालाही फायदा किंवा तोटा झालेला नाही.

दुस-या वर्षाच्या टोल रेटची किंमत ११३ रुपये ४८ पैसे होती. या वर्षीची सरासरी किंमत दर वर्षी १२० रुपये होते तर विभागाने याची किंमत १३० रुपये घेतलेली आहे असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता, याबाबत सचिवांनी सांगितले की, सन २०१०-११, २०११-१२, २०१२-१३ या तीन वर्षाचा टोल रेट पाहिला तर १०१, १०७ व ११३ असा होता. या तीन वर्षासाठी १०१ रुपये ही किंमत धरलेली होती. महालेखाकारांचे वर्ष चुकलेले आहे. १२०,१२७ व १३५ असे टोल रेट होते. महालेखापाल यांनी १२७.५ रुपयांस १३० रुपये केलेले आहे. त्या पुढील तीन वर्षाचे टोल रेट १४३,१५१ व १६० असे होते.

महालेखापाल यांच्या मते तीन वर्षातील सरासरी टोल रेट घेण्याची तरतूद टोल पॉलिसीमध्ये कोठेही आढळून येत नाही असे समितीने निदर्शनास आणले असता यावर सचिवांनी खुलासा केला की, टोल पॉलिसीनुसार किमान तीन वर्ष टोल रेट बदलता येत नाहीत. अशा प्रकारची तरतूद टेंडरमध्ये केलेली आहे. प्रथम वर्षाचा टोल रेट १०१ रुपये द्वितीय वर्षाचा टोल रेट १०७ व तृतिय वर्षाचा टोल रेट ११३ रुपये आहे. तर विभागाने सरासरी १०१ रुपये टोल रेट धरला होता.

महालेखापाल यांनी टोल परिगणने संदर्भातील सविस्तर माहिती समितीस द्यावी असे समितीने सुचित केले.

विभागाने टोल रेटची कोणत्या पध्दतीने परिगणना केलेली आहे. शासन निर्णयानुसार ६ टक्के वार्षिक दर आहे. तो तिस-या वर्षीच राऊंड अप करावयाचा आहे. दर वर्षी राऊंड अप केल्यामुळे टोल रेटचे परिगणना जास्त झालेली आहे अशी विचारणा महालेखापालांनी केली असता यावर सचिवांनी खुलासा केला की, दर वर्षी राऊंड अप केले जात नाही. टोल पॉलिसीनुसार तीन वर्षाशिवाय टोल रेट बदलता येत नाही. सन २०१०-११,२०११-१२,२०१२-१३ या वर्षांच्या टोल रेटची सरासरी किंमत १०१ रुपये आहे. या तीन वर्षातील सर्वात प्रथम जो दर ठरवला होता तोच टोल रेट कमी आहे. प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष आणि तृतीय वर्षासाठी टोल रेट १०१ रुपये आहे. Although second year it should have been 107, third year it should have been 113. त्या पुढील २०१३-१४,२०१४-१५ व २०१५-१६ या तीन वर्षासाठी अनुक्रमे १२०,१२७ आणि १३५ रुपये टोल रेट निश्चित केलेला आहे. या तीन वर्षातील सरासरी टोल रेट १३० रुपये आहे. यामध्ये कोणाचाही फायदा अथवा नुकसान होऊ शकत नाही. कारण निविदेमध्ये हा जो दर ठरलेला आहे त्या प्रमाणेच निविदा भरत असताना संबंधित व्यक्ती या दराप्रमाणेच निविदा भरत असते. त्यामुळे या व्यवहारामध्ये कोणत्या तरी व्यक्तीचा फायदा झाला किंवा यातील परिगणना चुकली आहे असे काही होत नाही.

Toll rate should be Rs. 6 per cent per year once in three years. Toll rate shall be rounded to near Rs. 5 upto the year 2025 and Rs. 10 after 2025 असे मत समितीने व्यक्त केले असता, सन २००३ च्या धोरणामध्ये असे नमूद केले आहे की, पथकराच्या दरामध्ये प्रत्येक वर्षी ६ टक्के याप्रमाणे तीन वर्षातून एकदा एक एप्रिल रोजी वाढ करण्यात यावी असा खुलासा सचिवांनी केला.

टोल रेटच्या संदर्भात विभागाने महालेखाकार यांच्या बरोबर सविस्तर चर्चा केली. सदर माहिती समितीस सादर केली. याबाबत दिनांक १२/१०/२०१७ रोजीच्या बैठकीत सचिवांनी सांगितले की, सार्वजनिक बांधकाम विभागाने महालेखापाल यांना त्यांनी काढलेल्या परिच्छेद क्रमांक ३.७ संदर्भात आपले स्पष्टीकरण दिले आहे व ते त्यांनी मान्य केले आहे. त्यासंदर्भातील कागदपत्रे समितीला सादर करण्यात यावीत अशी सूचना समितीने केली असता समितीला ३० प्रतीमध्ये माहिती सादर करण्यात आली आहे त्यास समितीने सहमती दर्शविली. कारण महालेखापाल यांच्या म्हणण्यानुसार या वर्षाचा टोल रेट १२० रुपये आहे. सदरील बाबी संदर्भात मंत्रिमंडळाच्या बैठकीत जो प्रस्ताव दिला त्यामध्ये सुद्धा १३० चा प्रस्ताव आहे. याबाबत नियम काय आहे आणि प्रस्ताव काय आहे याबाबत विभागाने सखोल चौकशी करावी असे समितीने सुचित केले असता सचिवांनी टोलबाबत असलेले नियम समितीस सांगितले की, पथकराच्या दरामध्ये प्रत्येक वर्षी सहा टक्के याप्रमाणे तीन वर्षातून एकदा एक एप्रिल रोजी वाढ करण्यात यावी.

टोल रेट पॉलिसीमध्ये सरासरी टोल रेट घेण्याची तरतूद नाही. असे महालेखापाल यांचे म्हणणे आहे असे समितीने निदर्शनास आणले असता महालेखाकारांनी अभिप्राय दिले की, कार्यकारी अभियंता चंद्रपूर, सार्वजनिक बांधकाम विभागाने कसे वर्क आऊट केलेले आहे, या संदर्भात त्यांनी असे स्पष्टीकरण दिले की, बस आणि ट्रकचे टोल रेट for the period 2010-13: 101. Therefore, toll rates for the next year 2013-16 is worked out as per first year. 101 X 1.06 =107. He has rounded it upto 110. For the next second year he has rounded it upto 121. It was only 116. For the next third year 120 X 1.06 = 127.20, which has been rounded upto 130. Actually, at the end of the third year it should have been rounded upto 120. Whereas, the proposal which was sent to the Government was for 130. This is the reply of your E.E., Chandrapur.

याबाबत सचिवांनी In the reply which we have submitted, we have given year-wise calculation to committee असे सांगितले. तसेच याबाबत सचिवांनी असेही सांगितले की, यामध्ये जरी विभागाची चूक झाली असेल तरी कोणाचाही फायदा किंवा नुकसान झालेले नाही.

**कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१, ठाणे यांनी मुख्य अभियंत्याची पूर्व परवानगी न घेता कुंपण भिंतीचे काम विभागल्यामुळे, महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिकेतील तरतूदींचे उल्लंघन झाले. तसेच, बनावट तपासणी अहवालाच्या आधारावर कंत्राटदाराला त्यांनी केलेले रु. ८५.२१ लक्षाचे प्रदानही नियमबाह्य होते.**

यामध्ये संरक्षक भिंतीचे १७ भाग करून चार ठेकेदारांना काम दिले, सदर काम करण्यासाठी मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक १ ठाणे यांची मान्यता घेतली नाही आणि हे काम त्वरीत करून घेणे गरजेचे होते तसेच हे काम पूर्ण करण्यासाठी एक वर्ष का लागले. अशी विचारणा समितीने केली असता, सचिवांनी खुलासा केला की, सदरील बाबी संदर्भात जी काही चौकशी केलेली आहे त्यामध्ये महालेखापाल यांचा अहवाल आल्यानंतर सचिवांनी परत विभागाच्या अधिका-यांशी संपर्क केला होता. त्यांना असे सांगितले की, Quality control प्रमाणे गुणवत्तेची तपासणी करुन सदर अहवाल विभागाकडे सादर करावा त्याप्रमाणे त्यांनी सदर अहवाल विभागाकडे सादर केलेला आहे. तो अहवाल असा आहे की ज्याप्रमाणे गुणवत्ता अपेक्षित होती, त्याप्रमाणे काम करण्यात आलेले आहे. याबाबत ए.सी. यांच्याकडून माहिती घेतली असता त्यावेळी जिल्हाधिकारी अतिक्रमण हटवत होते आणि त्यांचे असे निर्देश होते की, अतिक्रमण काढत असतानाच संरक्षक भिंत बांधली नाही तर लोक परत अतिक्रमण करतील. ठाणे येथील कामासंदर्भात माहिती देताना असे सांगण्यात आले की, तेथील वस्तूंची किंमत खूप जास्त आहे, म्हणून वेगवेगळ्या चार ठेकेदारांकडून हे काम पूर्ण करून घेतलेले आहे. जेणेकरून हे काम लवकर पूर्ण होऊ शकेल. शिवाय यामध्ये अशी शंका होती की कदाचित हे काम बरोबर झालेले नाही त्यामुळे Quality control कडून तपासणी सुद्धा करून घेतली आहे.

या संरक्षक भिंतीचे चार ठेकेदारांसाठी १७ भाग कशासाठी केले ? अशा प्रकारचे काम करण्यासाठी मुख्य अभियंता यांची पूर्व परवानगी घ्यावी लागते. जिल्हाधिका-यांना काम लवकर पूर्ण करावयाचे होते तर ह्या कामाची निविदा प्रक्रिया मार्च २०१४ मध्ये पूर्ण केलेली आहे आणि मार्च २०१५ पर्यंत हे काम पूर्ण झालेले आहे. मग १ वर्षाचा कालावधी का लागला व एक कोटी सत्तर लाख रुपयांच्या संरक्षक भिंतीला किती काळ लागतो ? यासाठी इतके त्या संरक्षक भिंतीचे भाग करायचे आणि वाटप करायचे गरज होती का ? तसेच सदरील कामाच्या गुणवत्तेबद्दल सचिव जे सांगत आहे त्याबाबत सुद्धा बनावट कागदपत्रे दाखल करण्यात आलेली आहेत. असे समितीचे मत आहे. तेथे कायम झोपड्या घालून अतिक्रमण व्हायचे याबाबत याचिका दाखल झाल्यानंतर माननीय न्यायालयाने सदर आदेश दिले होते असे समितीने निदर्शनास आणले असता, याबाबत माहिती देताना सचिवांनी खुलासा केला की, १७ कामाच्या भागांचा जो संदर्भ आहे त्यासाठी तांत्रिक मान्यता एकत्र दिली आणि नंतर त्याचे भाग केले असे नसून, यामध्ये या जागेची अडचण अशी होती की, जशी ही जागा मोकळी होईल तसे आपण काम करू. या कामासाठी कंपोनंट इस्टीमेट मुळात १७ भागांसाठी वेगवेगळे दाखल करण्यात आलेले आहेत.

विभागाचे जे कोडल प्रोव्हिजन्स आहेत, त्याप्रमाणे या एका कामाला अनेक ठेकेदार लावता येत नाही. मग या कामासाठी चार ठेकेदार लावण्याचे कारण काय आहे ? या कामासाठी मुख्य अभियंता यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक होती ती का घेण्यात आली नाही. असे अभिप्राय महालेखापालांनी व्यक्त केले असता यावर सचिवांनी खुलासा केला की, मुख्य अभियंता यांनी या कामासाठी मान्यता देणे अपेक्षित होते. त्यावेळी मुळातच १७ वेगवेगळे इस्टीमेट केलेले असल्यामुळे मान्यता घेतली नसेल. पण समितीचे व महालेखाकारांचे म्हणणे बरोबर आहे. प्रशासकीय मान्यतेची जर तुलना केली तर त्याला १७ भाग असे म्हणावे लागेल. सचिवांनी वस्तुस्थिती मान्य केली की, या कार्यप्रणालीमध्ये उणिवा आहेत.

Another thing is regarding the quality issue. परिच्छेद आला आणि त्यावर सचिव या नात्याने कार्यवाही केली. It is very commendable. यामध्ये मुद्दा असा आहे की, विभाग ठेकेदारांचे पेमेंट कसे देतो? Quality control चे प्रमाणपत्र आणि ज्या काही निविदा अटी आहेत त्यामध्ये ६० टक्के खाजगी तपासणी केंद्राकडून तपासणी करायची आहे आणि ४० टक्के शासकीय तपासणी केंद्राकडून तपासणी करायची आहे. तपासणीचे अहवाल आल्याशिवाय पेमेंट अदा केले नाही पाहिजे असा महालेखाकारांचा आक्षेप आहे. हा परिच्छेद आल्यानंतर एस.ई अपॉईंट करुन चेक केले असले तरी महालेखाकार कार्यालयाचे म्हणणे आहे की, बोगस प्रमाणपत्र सादर केले. विभागाने लेखी उत्तरात नमूद केले आहे की, ते प्रमाणपत्र बोगस नसून मूळ प्रमाणपत्र आहे. महालेखाकारांकडे चारही कंत्राटदारांच्या प्रमाणपत्राची प्रत आहे. या कंत्राटदाराने प्रमाणपत्राचे केवळ नाव बदलून एकाच

क्रमांकाचे प्रमाणपत्र दिलेले आहे. डोळे झाकून काम सुरु आहे काय ? एकाच प्रयोगशाळेमधून एकाच क्रमांकाचे प्रमाणपत्र दोघांना कसे देता येऊ शकते ? हे बोगस प्रमाणपत्र आहे. असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता, याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी असे नमूद केले की, ८५.२१ लाख रुपयांचे पेमेंट झालेले नाही. ही रक्कम क्रॉस पेमेंटची होती. हे रिझल्टस लक्षात न घेता ४०.६४ लाख रुपये राखून ठेवले होते. ज्या टेस्ट करावयाच्या होत्या, त्या त्यांनी केल्या नाहीत. हे लक्षात आल्यानंतर क्वालिटी कंट्रोल कडून वेगळे टेस्टींग करुन घेतले. त्यांच्याकडून रक्कम वसूल केलेली आहे.

प्रमाणपत्र बोगस असल्याचा आक्षेप महालेखाकारांकडून घेण्यात आला होता. मात्र विभागाकडून असे सांगण्यात आले आहे की, प्रमाणपत्र योग्य आहे. त्यांना दंड लावला असेल मात्र तो महालेखापालांचा आक्षेप नाही. बोगस प्रमाणपत्र सादर करणा-या कंत्राटदारावर कारवाई काय करणार ?सादर केलेले तपासणी अहवाल न बघता बिल देणा-या अधिका-यांवर कारवाई केली जाणार काय ? एस.ई यांनी तपासून प्रमाणपत्र बोगस असल्याचे निष्पन्न झाले काय ? क्षेत्रीय अभियंता व मुख्य अभियंता यांनी मान्यताप्राप्त लॅबमधून चाचणी करुन घेतली आहे. मात्र दिलेले प्रमाणपत्र बोगस आहे. या समितीच्या मुद्यांबाबत खुलासा करताना सचिवांनी सांगितले की, अधिक्षक अभियंता पातळीवर ते प्रमाणपत्र मूळ आहे की, नाही हे तपासून त्यांनी तसा अहवाल दिलेला आहे. त्याच्या प्रती आहेत. तपासणी अहवाल न बघता बिलाची पूर्ण रक्कम दिलेली नाही. ८५ लाख रुपयांपैकी पैकी ४० लाख रुपये कापून रक्कम दिलेली आहे. तसेच सचिवांनी नमूद केले की, हे दोन्ही विषय वेगवेगळे आहेत. शासकीय यंत्रणेकडून चाचणी करुन घेतली आहे. प्रमाणपत्र योग्य दिलेले नाही, हे खरे आहे. महालेखाकार कार्यालयाचा अहवाल आल्यानंतर क्वालिटी कंट्रोलचे एस.ई यांच्याकडून तपासणी करुन घेतली. कंत्राटदाराने खोटे प्रमाणपत्र दिलेले असल्यास त्याच्या विरुध्द कारवाई केली पाहिजे व त्यांचा समावेश काळ्या यादीत केला जाईल असे सचिवांनी सांगितले.

तपासणी अहवालाचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून एक वेगळे रेकॉर्ड ठेवले जाते. ज्यांनी हे रेकॉर्ड स्वीकारले त्या अधिका-यांच्या हे लक्षात यायला हवे होते की, एकाच क्रमांकाचे तपासणी अहवाल आलेले आहेत. या समितीच्या मुद्यांबाबत, हे त्यांच्या लक्षात आले होते. त्यामुळेच त्यांचे पैसे कापून घेण्यात आले. त्यांनी खोटे प्रमाणपत्र सादर करणे अपेक्षित नव्हते असा खुलासा सचिवांनी केला.

सचिव सांगत आहेत की, त्यांच्या लक्षात आल्यामुळे पैसे कापून घेण्यात आले. मात्र तशी परिस्थिती नाही. उत्तरामध्ये असे नमूद केले आहे की, शासकीय प्रयोगशाळेतून चाचणी केलेली नाही म्हणून पैसे थांबवले. त्यांनी बाहेरच्या प्रयोगशाळेकडून तपासणी केली व औपचारिकता पूर्ण केली. शासकीय प्रयोगशाळेमधून तपासणी न केल्याने पैसे कापून घेतले व नंतर दंड आकारला गेला. एकाच क्रमांकाचे दोन प्रमाणपत्र कसे देण्यात आले ? या जागेवर भिंत तयार करण्यात आली होती. तेथे आता अतिक्रमण झालेले नाही, सर्व ठिकाणी बांधकाम झालेले आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता सचिवांनी त्यास सहमती दर्शविली.

**अभिप्राय व शिफारशी :-**

**परिच्छेद क्रमांक ३.२ निवडक सार्वजनिक बांधकाम विभागातील वाहनांचे प्रापण, उपयोग आणि देखभाल.**

**परिच्छेद क्रमांक ३.२.१ वाहनांच्या व्यवस्थापनेतील अपर्याप्तता.**

**अभिप्राय :**

**३.२** सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे करण्यात येणा-या बांधकाम आणि देखभाल कार्यात वाहनांची महत्वाची भूमिका असते. बांधकाम कार्य यंत्रसामग्री जसे डिझेल रोड रोलर्स, टीप्पर्स, ट्रक्स आणि टँकर्स इत्यादींचा बांधकाम कार्यात प्रत्यक्ष उपयोग असतो तर तपासणी वाहने जसे कार आणि जीप यांचा विभागीय अधिका-यांद्वारा कामाच्या प्रगतीवर लक्ष ठेवण्यात उपयोग होतो. वाहनांची खरेदी, देखरेख ठेवणे, दुरुस्ती व देखभाल यांची एकूण जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या तांत्रिक शाखेची असते. सन २०११-१६ दरम्यान रु.९.५१ कोटी किंमतीचे १८७ तपासणी वाहने (६७ कार आणि १२० जीप) यांची खरेदी दर कराराप्रमाणे करण्यात आली.

**३.३** वाहनांची अधिक अवनति होणे आणि त्यांना मिळणारी किंमत आणखी कमी होणे टाळण्यासाठी तसेच त्यांनी व्यापलेली जागा मोकळी व्हावी यासाठी कोणत्याही वाहनांची/यंत्राची, ते निर्लेखित होण्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या कालावधीत विल्हेवाट लावण्याबाबत महाराष्ट्र शासनाने जुलै,१९९६मध्ये विनिर्दिष्ट केले. परंतु सन २०११-१६ दरम्यान निर्लेखित झालेल्या ५२८ वाहनांपैकी २२७ वाहनांचे मार्च,२०१६ पर्यंत लिलाव करण्यात आले. याशिवाय, लिलाव करण्यात आलेल्या २२७ वाहनांपैकी सन १९९९ ते २०११ दरम्यान निर्लेखित करण्यात आलेल्या ५३ तपासणी वाहनांचे लिलाव सन २०१५-१६ मध्ये म्हणजेच ४ ते १५ वर्षाच्या विलंबाने करण्यात आले.

**३.३** सन २०११-१६ दरम्यान १८७ नविन तपासणी वाहनेखरेदी करताना नविन खरेदी पूर्वी अथवा नविन खरेदीच्या तारखेपासून दोन महिन्यांच्या आत, निर्लेखित करण्यात आलेल्या २२६ तपासणी वाहनांची विल्हेवाट लावण्याबाबतच्या वित्त विभागाच्या विनिर्दीष्ट अटीचे पालन सुध्दा विभागाने केले नाही. जुलै २०१६ पर्यंत २२६ पैकी केवळ १७७ निर्लेखित तपासणी वाहनांचा लिलाव झाला/विल्हेवाट लावली असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांच्या परिच्छेदात नोंदविलेले आहेत.

**३.४** सदरहू परिच्छेदांतर्गत निर्लेखित वाहनांची विल्हेवाट लावण्यास अमर्याद विलंब झालेला असून सद्यःस्थितीत ५२८ पैकी ४७० गाड्यांचा लिलाव झालेला आहे व ५८ गाड्यांचा लिलाव लवकरच करण्यात येणार असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. या गाड्यांचा लिलाव करण्यास विलंब लागण्याची कारणमिमांसा समितीने विचारली असता यातील काही गाड्या शासन सेवेत कार्यरत असल्यामुळे लिलाव करण्यास विलंब लागलेला आहे. तसेच यापुर्वी शासनाकडून शासकीय लिलावदार नियुक्त करुन या गाड्यांचा लिलाव करण्याची कार्यपध्दती अस्तित्वात होती. परंतु सन २०१२ मध्ये शासनाने गाड्यांचा लिलाव ई-लिलाव पध्दतीनेच करण्याचे बंधन घातल्याने व ही नविन कार्यपध्दती अवलंबिण्यास विलंब झाल्यामुळे मध्यंतरीच्या ३ वर्षाच्या कालावधीत असा लिलाव करता येवू शकला नाही. परिणामी वाहनांची अधिक अवनती होवून त्यांना मिळणारी अपेक्षित किंमत आणखी कमी झाली. वित्त विभागाने विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे वाहन निर्लेखित होण्याच्या तारखेपासून ३ महिन्यांच्या कालावधीत त्याची विल्हेवाट लावण्याबाबत अस्तित्वात असलेल्या निर्णयाची अंमलबजावणी विभागाने केली नाही. ही वाहने विहित मुदतीत निर्लेखित केली असती तर निश्चितच या गाड्यांना अधिक किंमत प्राप्त होवू शकली असती. परिणामी शासनाच्या महसूलाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले ही वस्तुस्थिती आहे. शासनाने नव्याने ई-लिलाव पध्दतीचा केलेला अवलंब व ही संकल्पना विभागासाठी नविन असल्यामुळे ती समजून घेण्यास लागणारा विलंब, त्यातच तांत्रिक मनुष्यबळाची कमतरता व बोलीदारांचा प्रतिकूल प्रतिसाद ही विलंबासाठी विभागाने नमूद केलेली कारणे निश्चितच समर्थनीय नाहीत. यासाठी काही महिन्यांचा विलंब नव्हे तर तब्बल ४ ते ५ वर्षाचा विलंब झालेला आहे. परिणामी या गाड्यांची किंमत कमी होऊन केवळ रु.५०,०००/- इतक्या कमी किमतीने या गाड्यांची विक्री करण्यात आली. त्यामुळे निश्चितच शासनाच्या महसूलाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असल्यामुळे हा अमर्याद विलंब निश्चितच असमर्थनीय आहे.

**शिफारस**

**३.५ वाहनांच्या खरेदीसाठी विभागाद्वारे केंद्रीकृत खरेदी प्रक्रियेचा अवलंब करुन वाहनांची मागणी प्रक्रिया प्रत्येक विभागाद्वारे सुरु करुन संपूर्ण राज्यासाठी निधीच्या आवश्यकतेचे निर्धारण करण्यासाठी या मागण्यांना एकत्रीकृत करण्यात येते व निधी प्राप्त करण्यासाठी प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविले जातात. निधी मिळाल्यावर, आंतरिक वित्तीय सल्लागार, अधीक्षक अभियंता (विशेष प्रकल्प) आणि अधीक्षक अभियंता (यांत्रिकी) हे सदस्य असलेल्या राज्यस्तरीय खरेदी समितीद्वारे वाहनांची**

**खरेदी करण्यात येते. साधारणपणे रास्त झीजतूट आणि लुप्तप्राय झाल्यामुळे ज्या वाहनांना निर्लेखित करुन त्यांची विल्हेवाट लावायची आहे अशा वाहनांची संख्या ही जेवढी वाहने खरेदी करावयाची आहेत त्यांची संख्या निर्धारित करावयासाठी एक महत्वाचा घटक आहे. यासाठीच खरेदी प्रक्रिया आणि विल्हेवाट लावायची प्रक्रिया यात वेळेचा मेळ घालणे अत्यावश्यक असते. परंतु या वाहनांची विल्हेवाट विहित मुदतीत न लावता अमर्याद विलंबाने लावण्यात आली. एकीकडे विभाग निर्लेखित वाहनांची विल्हेवाट लावण्याच्या कार्यवाहीत विलंब झाला हे मान्य करतो व दुसरीकडे मात्र या प्रकरणी संबंधित अधिका-यांवर कोणतीही कारवाई समितीची साक्ष लागेपर्यंत करण्यात आली नाही ही देखील गंभीर बाब आहे. निर्लेखित वाहनांची विल्हेवाट लावण्यास झालेल्या विलंबामुळे निश्चितच वाहनांच्या किमतीमध्ये घट झाली. परिणामी शासनाच्या महसूलाचे निश्चित मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून निर्लेखित वाहनांची ३ महिन्यांच्या आत विल्हेवाट लावण्याच्या तरतूदीचे देखील उल्लंघन झालेले आहे. विभागाने या वाहनांची विल्हेवाट विहित मुदतीत लावली असती तर या वाहनांची जास्त किंमत विभागास प्राप्त होवू शकली असती ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. अतः या प्रकरणी या विलंबास जबाबदार असणा-या दोषी अधिका-यांवर विभागाने कारवाई करावी. तसेच वाहनांची अधिक अवनती होणे आणि त्यांना मिळणारी किंमत आणखी कमी होणे टाळण्यासाठी वाहनांचे निर्लेखन व विल्हेवाट विहित मुदतीत लावण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही विभागाने करावी व अशा बाबींची पुनरावृत्ती टाळून विभागाने शासनास प्राप्त होणा-या महसूलाबाबत कायम सजग राहावे व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक ३.२.२ बांधकाम कार्य यंत्रसामग्रीचे आणि तपासणी वाहनांचे व्यवस्थापन**

**परिच्छेद क्रमांक ३.२.२.१ बांधकाम कार्य यंत्रसामग्री आणि तपासणी वाहनांच्या दुरुस्ती व देखभालीवर झालेला अतिरिक्त खर्च**

**बांधकाम कार्य यंत्रसामग्री/निरीक्षण वाहने**

**अभिप्राय**

**३.६** अधीक्षक अभियंता (यांत्रिकी) दरवर्षी सर्व सार्वजनिक बांधकाम विभागांना काटेकोरपणे पालन करण्यासाठी बांधकाम यंत्रसामग्रीच्या (प्रति तास किंवा प्रति कि.मी. प्रकरणानुसार) देखभाल व दुरुस्तीसाठी आर्थिक मापदंड निर्गमित करतात. परंतु सन २०११-१६ दरम्यान शाखा अभियंता (यांत्रिकी) यांनी बांधकाम यंत्रसामग्रीच्या देखभाल व दुरुस्तीसाठी ठरवून दिलेल्या वित्तीय मापदंडापेक्षा रु.४.३८ कोटी अतिरिक्त खर्च केला. त्यात ३८० यंत्रसामग्रीव्यतिरिक्त ४० बांधकाम यंत्रसामग्री जे सन २०११-१६ दरम्यान कोणत्याही उपयोगात आणल्या गेले नाही त्यांच्यावर रु.४१.८७ लक्ष खर्च केले. तसेच सर्व सार्वजनिक बांधकाम विभागांनी त्यांच्याद्वारे वापरण्यात येणा-या बांधकाम यंत्रसामग्रीच्या नफा-तोट्याचा हिशेब ठेवणे आवश्यक होते. परंतु विभागाने सन २०११-१६ दरम्यान नफा-तोट्याचा हिशेब तयार केला नाही. परिणामी विभाग बांधकाम यंत्रसामग्रीच्या कार्यचलनाबाबत त्यांच्या आर्थिक वर्धनक्षमतेचे निर्धारण करु शकले नाही असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांच्या परिच्छेदात नोंदविलेले आहेत.

**३.७** त्याचप्रमाणे वित्त विभागाने तपासणी वाहनांच्या दुरुस्ती व देखभालीवर (प्रति वाहन प्रति वर्ष) कार्यालय प्रमुखांद्वारे पालन करावयाची असलेली खर्चाची मर्यादा डिझेल तपासणी वाहनांसाठी व पेट्रोल तपासणी वाहनांसाठी विहित केली होती. परंतु वित्त विभागाद्वारे निश्चित केलेल्या अनुज्ञेय मर्यादेपेक्षा देखभाल व दुरुस्तीच्या कामांवर रु.८२७.२३ लक्ष जादा खर्च केला.तसेच मागील पाच वर्षात तपासणी वाहनांच्या दुरुस्ती आणि देखभालीवर झालेला रु.८२७.२३ लक्ष जादा खर्च अद्याप सक्षम प्राधिका-याकडून नियमित व्हायचा आहे असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

**३.८** वित्त विभागाने एका वर्षात एका वाहनाच्या देखभाल दुरुस्तीवर करता येवू शकणा-या खर्चाची कमाल मर्यादा स्पष्टपणे विहित केलेली असताना त्याचे उल्लंघन करीत हा अतिरिक्त खर्च होण्याची कारणे काय ? याबाबत समितीने विचारणा केली असता लेखापरिक्षकांनी मे, २००९ आणि एप्रिल, २०१५ चा शासन निर्णय ज्यामध्ये दुरुस्तीवरील खर्चाची विभाग प्रमुखांना दिलेली वित्तीय मर्यादा नमूद आहे. मंजूरी देण्याच्या वित्तीय मर्यादा दिलेल्या आहेत ही एखाद्या विशिष्ट प्रकारच्या वाहनांच्या दुरुस्ती खर्चाची वार्षिक मर्यादा नाही. तथापि, लेखापरिक्षकांनी दुरुस्तीवरील खर्चासाठीच्या वित्तीय मर्यादा या जास्तीत जास्त खर्चाची वार्षिक मर्यादा गृहीत धरुन अतिरिक्त खर्चाची गणना केलेली आहे व या बाबींचा विचार करता निरीक्षण वाहनांवर अतिरिक्त खर्च झालेला नाही. कार्यकारी अभियंता हे दुरुस्तीवरील खर्च सक्षम यांत्रिकी अधिका-यांकडून तांत्रिक मंजूरी घेवून करतात असे विभागाने त्यांच्या लेखी उत्तरात नमूद केले आहे.

**३.९** या वाहनांच्या देखभाल दुरुस्तीच्या तपशिलात मोठ्या प्रमाणात विसंगती दिसून येत असून नियमानुसार निर्धारीत वित्तीय मापदंडापेक्षा जवळजवळ दुपटीने अतिरिक्त खर्च झाल्याचे दिसून येते. इतक्या मोठ्या प्रमाणात अतिरिक्त खर्च होण्याची कारणमिमांसा समितीने विचारली असता ही मशिनरी जुनी होती त्यामुळे हा अधिकचा खर्च झाल्याचे सांगण्यात आले. या वाहनांमध्ये ट्रक, टँकर, टिप्पर, रोड रोलर यांचा समावेश असून सन २०११ ते २०१६ या कालावधीत बांधकाम यंत्रसामग्रीचा वापर झाला नसल्याचे आक्षेप लेखापरिक्षा पथकाने नोंदविलेले आहेत. परंतु प्रत्यक्षात या यंत्रसामग्रीचा वापर झाला असून लेखापरिक्षणाच्यावेळी संबंधित वाहनांच्या अद्ययावत रोजवह्या (log book) काही कारणास्तव उपलब्ध करण्यात आलेल्या नसल्याने हे आक्षेप नोंदविले असल्याचे विभागीय सचिवांनी समितीसमोर सांगितले.यावर समितीने आक्षेप नोंदवित जर वाहनांच्या रोजवह्या त्या त्या वेळी भरलेल्या नाहीत तर त्या वाहनांद्वारे काय काम करुन घेण्यात आले, त्या यंत्रसामग्रीचा वापर कसा झाला, त्यातून विभागास किती उत्पन्न झाले व किती खर्च झाला या संदर्भातील कोणतीही शाश्वत आकडेवारी समोर नसताना विभागाने याबाबीचे व अतिरिक्त खर्चाचे समर्थन करणे योग्य नाही. यावर विभागीय सचिवांनी रोजवह्या भरलेल्या आहेत परंतु केलेल्या कामांचा तपशिल उपलब्ध नसल्यामुळे ते लेखापरिक्षणाच्यावेळी दाखविण्यात आले नाहीत असे समितीसमोर सांगण्यात आले. तसेच बांधकाम यंत्रसामग्रीचा वापर जिल्हाधिकारी अथवा अन्य शासकीय विभागांकडून करण्यात येतो. त्यामुळे यातून विभागास कोणतेही उत्पन्न होत नाही. तरीही विभाग या वाहन व यंत्रांच्या माध्यमातून जी कामे करुन घेतो त्याचे उत्पन्न व खर्च आणि केलेल्या कामाचे लेखे अद्ययावत ठेवणे आवश्यक होते असे विभागीय सचिवांनी समितीसमोर मान्य केले. हा अतिरिक्त खर्च कोणत्या जिल्ह्यात जास्त आहे, तसेच कोणत्या मशिनरीवरील उत्पन्न व खर्च किती आहे याची माहिती समितीने विचारली असता ही माहिती समितीला सादर करण्याबाबत आश्वासित करण्यात आले. परंतु अद्यापही सदरहु माहिती समितीला प्राप्त झाली नाही. वास्तविकतः विभागाकडून ही यंत्रसामग्री कंत्राटदारांना देखील दिली जाते. परंतु लॉगबुक अद्ययावत न केल्यामुळे व केलेल्या कामांचा तपशिल त्यात नमूद नसल्यामुळे कंत्राटदाराकडून या मशिनरीचा उपयोग किती तास करण्यात आला व किती तासांचे पैसे कंत्राटदाराकडून घेण्यात आले याबाबत शंका घेण्यास पुर्ण वाव शिल्लक राहतो.

**शिफारस**

**३.१० बांधकाम कार्य यंत्रसामग्रीचे आणि तपासणी वाहनांचे व्यवस्थापन अंतर्गत या वाहनांच्या देखभाल व दुरुस्तीवर अतिरिक्त खर्च झाल्याचे आक्षेप नोंदविण्यात आले आहेत. या सर्व बाबींवर नियंत्रण ठेवण्याची आवश्यकता असून त्यासाठी या वाहनांचे लेखे, रोजवह्या, उत्पन्न व खर्चाचे विवरणपत्र नियमितरित्या तयार करुन अद्ययावत ठेवण्याची नितांत आवश्यकता आहे. या मशिनरीच्या माध्यमातून कोणती कामे करुन घेतली यासंदर्भातील रोजवह्या व एमबी रेकॉर्ड उपलब्ध नसल्यामुळे या सर्व बाबींची छाननी करता येवू शकत नाही व या यंत्रसामग्रीचा वापर गुणवत्तेनुसार झालेला असून यासाठी आलेला अतिरिक्त खर्च हा नियमानुकूल ठरतो किंवा कसे ? याची निश्चिती करणे शक्य नाही. किंबहूना यात अनियमितता झाली असल्याची पुर्ण शक्यता आहे. यापुर्वी ही सर्व कामे विभागाकडून केली जात होती. परंतु आता विभाग कोणतीही कामे स्वतः न करता ती कंत्राटदारामार्फत करुन घेण्यात येतात. अशा परिस्थितीत अशा वाहनांची उपयोगिता निश्चितच प्रश्नास्पद ठरते व या सर्व बाबींचा दुरुपयोग टाळण्यासाठी विभागाने तातडीने योग्य ती कार्यवाही करण्याची नितांत आवश्यकता आहे. अतः विभागाने या परिच्छेदाअंतर्गत आक्षेपित झालेल्या अतिरिक्त खर्चाची व वित्तीय मर्यादेच्या उल्लंघनाची संपुर्ण तपासणी करावी. सर्व लॉगबुक, केलेल्या कामांचा तपशिल व एमबी रेकॉर्ड यांची तपासणी करावी. त्याअनुषंगाने यात गैरव्यवहार व अनियमितता आढळल्यास संबंधितांवर तात्काळ कारवाई करावी. तसेच विभागाने त्यांच्या अंतर्गत कार्यरत वाहनांवर जीपीएस प्रणाली बसविण्याची कार्यवाही करावी जेणेकरुन त्या माध्यमातून वाहनांच्या वापराचा अधिकृत व निश्चित तपशिल उपलब्ध होऊ शकतो व या वाहनांचा दुरुपयोग निश्चितच टाळता येईल. तसेच नियमितरित्या वाहनांचे लेखे, रोजवह्या, उत्पन्न व खर्चाचे विवरणपत्र तयार करुन ते अद्ययावत ठेवण्यात यावे. लॉगबुक, एमबी रेकॉर्ड व केलेल्या कामांचा तपशिल यात नियमितरित्या नमूद करावा व त्याचे नियमित निरिक्षण व नियंत्रण करावे. तसेच या परिच्छेदांतर्गत आश्वासित माहिती समितीस तात्काळ सादर करण्यात यावी व या सर्व बाबींसंदर्भात आवश्यक ती कार्यवाही करुन समितीस ३ महिन्यात कळविण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक ३.२.२.२ इंधनावर झालेला जादा खर्च आणि तपासणी वाहनांच्या दुरुस्ती व देखभालीसाठी असलेला निधी दुस-या कारणांसाठी वळविणे**

**अभिप्राय :**

**३.११** वित्त विभाग, महाराष्ट्र शासनाने तपासणी वाहनांकरिता इंधन वापराची मर्यादा २००० लिटर प्रति वाहन प्रति वर्ष निर्धारित केली. परंतु इंधन वापरावर रु.१६४.०६ लक्ष इतका जादा खर्च केला. याशिवाय प्रेसिडेंसी (Presidency) विभाग, मुंबई येथे रु.५१.१४ लक्षाचा दुरुस्ती व देखभाल निधी निरनिराळ्या कारणांसाठी जसे खाजगी ट्रॅव्हेल एजेन्सीला भुगतान, न्यायालयीन शुल्क (कोर्ट फी) भुगतान, अशोक स्तंभाची रंगरंगोटी आणि मंत्रालय इमारतीमध्ये पदधारक बोर्ड बसविणे, दवाखाना उप-विभाग, एम.एल.ए. हॉस्टेल उप-विभाग आणि केंद्रीय उप-विभाग, मुंबई यांना अग्रिम/हस्तांतरण देण्यासाठी वळविण्यात आला असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

**३.१२** महालेखाकारांनी नोंदविलेल्या आक्षेपावर विभागाने निर्गमन परिषदेत दिलेल्या उत्तरात जादा खर्चाची कारणे नमूद करताना पूर, दुष्काळ, भूमिस्खलन इ. नैसर्गिक आपत्ती दरम्यान आणि सार्वजनिक बांधकाम विभाग अभियंत्यांद्वारे महसूल अधिकारी, स्थानिक नगराध्यक्ष आणि आमदार तसेच इतर शासकीय विभागांसोबत जिल्हा आणि गट स्तरावर घेण्यात येणा-या बैठकींची संख्या वाढल्यामुळे तपासणी वाहनांचा वापर वाढला त्यामुळे इंधन वापर मर्यादेपेक्षा जास्त झाला असे नमूद केले. मात्र कित्येक प्रभागांमध्ये अधिकारी हे नियुक्त केलेल्या ठिकाणी न राहता जिल्ह्याच्या ठिकाणी वास्तव्यास राहून तेथून शासकीय वाहनाने जाणे येणे करतात. ही बाब विभागाने उत्तरात नमूद केली नाही.तसेच अशाप्रकारे महत्वाच्या बैठकीसाठी व दौ-यासाठी अपरिहार्यरित्या हा खर्च करणे आवश्यक, अभिप्रेत व अपेक्षित होते तर इंधनावरील जादा खर्चास सक्षम अधिका-यांच्या मंजूरी न मिळविता हा खर्च करण्याची आवश्यकता नव्हती व या सर्व बाबी विभागातील कमकुवत अंतर्गत नियंत्रण दर्शविणा-या आहेत. वास्तविकतः वाहनांचे लॉग बुक व्यवस्थित तयार व अद्ययावत केलेले नसताना तसेच केलेल्या कामांचा तपशिल त्यात नमूद नसताना या खर्चाची व कामांची निश्चिती व त्याची गुणवत्ता कशाच्या आधारावर करण्यात आली हा देखील प्रश्न उद्‌भवतो. वाहन चालकाने लॉगबुक तयार केले नाही तसेच यावर वरिष्ठ अधिका-यांनी देखील तपासणी वा नियंत्रण ठेवले नाही. तसेच भरलेले लॉग बुक योग्य आहे किंवा कसे ? तसेच लॉग बुक न भरण्याची कारणे काय ? याची कोणतीही तपासणी वरिष्ठ अधिका-यांनी देखील वेळोवेळी केली नाही. ही देखील अत्यंत गंभीर बाब असून यामध्ये अनियमितता झालेली असल्याची शक्यता नाकारता येणार नाही. आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात यासाठी अद्यापही कोणतीही अद्ययावत तंत्रज्ञान वा यंत्रणा विभागाने अवलंबिली नाही यावरुनच या सर्व बाबींवर विभागांतर्गत नियंत्रणाचा अभाव दिसून येतो.

**शिफारस :**

**३.१३ इंधनावर झालेला जादा खर्च आणि तपासणी वाहनांच्या दुरुस्ती व देखभालीसाठी असलेला निधी दुस-या कारणांसाठी वळविणे असे गंभीर आक्षेप महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात नमूद केले. एवढेच नव्हेतर हा जादा खर्च सक्षम अधिका-यांच्या मंजूरीशिवाय करण्यात आला. एकीकडे विभाग विविध अत्यावश्यक बाबींमुळे बैठकांची संख्या वाढल्यामुळे हा अतिरिक्त खर्च झाला असून या खर्चाचे समर्थन करतो, तर दुसरीकडे हा खर्च सक्षम प्राधिका-यांच्या मान्यतेशिवाय करुन त्यास मान्यता देखील घेण्यात आली नाही या बाबी देखील गंभीर आहेत. वाहनांच्या माध्यमातून केलेल्या कामांचा तपशिलच तयार व अद्ययावत ठेवण्यात न आल्यामुळे केलेल्या कामांच्या गुणवत्तेची निश्चिती कशाच्या आधारे करण्यात आली हा देखील प्रश्न उपस्थित होतो. डिजिटलायझेशनच्या या युगात गाड्यांवर जीपीएस सारखे आधुनिक व अद्ययावत तंत्रज्ञान वापरुन हा सर्व तपशिल ऑनलाईन उपलब्ध करता येणे शक्य असताना विभाग या बाबी प्राधान्याने करण्यास अपयशी ठरला. परिणामी या सर्व बाबींमुळे अनियमितता वा गैरव्यवहार करण्यास अधिकच वाव मिळाला. या सर्व बाबी अतिशय गंभीर असून विभागांतर्गत नियंत्रणाचा अभाव दर्शविणा-या तर आहेतच, परंतु गैरव्यवहार वा अनियमिततेस निश्चितच पोषक ठरणा-या आहेत. तसेच या सर्व बाबींवर कोणत्याही अधिका-यांचे नियंत्रण नव्हते. अतः या सर्व प्रकरणी जबाबदार अधिकारी व कर्मचा-यांवर कारवाई करण्यात यावी तसेच या गाड्यांवर जीपीएस प्रणाली बसविण्यात यावी. ज्याच्या माध्यमातून वाहनांची माहिती व केलेल्या कामांची माहिती सहज उपलब्ध होऊ शकेल व हा सर्व तपशिल ऑनलाईन करण्यात यावा व केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक ३.२.२.३ विभागीय कार्यशाळांचे कामकाज —**

**अभिप्राय :**

**३.१४** सार्वजनिक बांधकाम विभागाच्या यांत्रिकी शाखेअंतर्गत वाहनांच्या/यंत्रसामग्रीच्या दुरुस्ती आणि देखभालीसाठी एकूण २७ कार्यशाळा आहेत. जुलै, १९८२ च्या शासन निर्णयानुसार सर्व कार्यशाळा आणि हॉट मिक्स प्लांट्स ह्या वाणिज्यिक तत्वावर जॉब कार्ड पध्दतीने चालविण्यात यावयास पाहिजे. परंतु सन २०११-१६ दरम्यान चार कार्यशाळांमध्ये दुरुस्ती व देखभालीची कामे करण्यात आली नाहीत तसेच दुरुस्ती व देखभालीची रु.१४.०३ कोटीची एकूण ४४२५ कामे बाह्यस्त्रोतीकरण करुन खाजगी अभिकरणाला देण्यात आली. परंतु या कालावधीत कार्यशाळांमध्ये २९ ते ३७ तांत्रिक आणि अ-तांत्रिक कर्मचारी वर्ग कार्यरत होते व या कर्मचारी वर्गाच्या वेतन आणि भत्त्यांवर या निष्क्रीय कालावधीत रु.३.७३ कोटी खर्च झाला. उर्वरित दोन कार्यशाळांमध्ये (नागपूर आणि नाशिक) रु.८५.०७ लक्ष किमतीची ८६६ दुरुस्ती व देखभालीची कामे निष्पादित केल्या गेली. त्याच कालावधीत रु.५.९० कोटी किमतीची ९७९ कामे बाह्य स्त्रोतांद्वारे निष्पादित केल्या गेली. तथापि, जुलै १९८२ च्या शासन निर्णयाच्या विरुध्द ह्या दोन कार्यशाळांमध्ये निष्पादित झालेल्या ८६६ कामांसाठी जॉब कार्डस् तयार केल्याचे आढळले नाही. तसेच सार्वजनिक बांधकाम लेखा संहिता, १९८४ नुसार प्रत्येक कार्यशाळेचे भांडवल लेखे, उत्पादन लेखे आणि नफा-तोटा लेखे असलेले प्रपत्र लेखे दरवर्षी तयार करावयास पाहिजे. परंतु असे प्रपत्र लेखे तयार केले नव्हते. परिणामी मालमत्ता जसे इमारती, संयंत्रे आणि यंत्रसामग्री, भांडार, साहित्या इत्यादिंच्या वर्तमान मूल्याबाबत तसेच या कार्यशाळांत उपयोगात आणलेले मजूर आणि या कार्यशाळांपासून मिळणा-या नफ्याची स्थिती याबाबत विभागाजवळ माहिती नव्हती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

**शिफारस :**

**३.१५ महालेखाकारांनी सदरहु परिच्छेदामध्ये नोंदविलेले आक्षेप अतिशय गंभीर स्वरुपाचे असून एकूणच शासकीय यंत्रणा व व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उभे करणारे आहेत. विभागीय कार्यशाळांमध्ये वाहनांच्या दुरुस्ती व देखभालीची खुप कमी प्रमाणात कामे केलेली असताना त्याठिकाणी कर्मचारी वर्ग कार्यरत राहिल्यामुळे त्यांच्या वेतन व भत्त्यावर कोट्यावधी रुपयांचा खर्च निष्फळ झालेला आहे. विभाग जर ही कामे बाह्यस्त्रोतीकरणाच्या माध्यमातून खाजगी अभिकरणाकडून करुन घेते तर या विभागीय कार्यशाळांमध्ये कर्मचारी वर्ग ठेवण्याची कोणतीही आवश्यकता नव्हती. तसेच कार्यशाळांच्या जागेचा देखील कोणताही उपयोग न केल्यामुळे त्या विनावापर पडून राहिल्या. परिणामी मोठ्या प्रमाणात शासनाचे नुकसान झाले व हा खर्च निष्फळ ठरला ही वस्तुस्थिती आहे. या तांत्रिक कर्मचारी वर्गाकडून कोणतेही अन्य काम देखील विभागाने करुन घेतले नाही व त्यांना या निष्क्रीय कालावधीसाठी वेतन व भत्ते देण्यात आले ही देखील अतिशय गंभीर बाब आहे. सद्यःस्थितीत एकूण ३७ लोक एकीकडे कोणतेही काम न करता वेतन घेत आहेत तर दुसरीकडे विभाग त्यांच्याकडून इतर काम करुन घेत असल्याचे सांगते. परंतु नेमके कोणते काम करुन घेतले याचा कोणताही तपशिल विभागाकडे उपलब्ध नाही. जर या कार्यशाळांचा कोणताही उपयोग नाही तर त्या बंद करुन त्याच्या जागेचा अन्यथा व्यावसायिक वापर करुन शासनाच्या महसूलात वाढ करण्याचा प्रयत्न देखील विभागाने करण्याची आवश्यकता आहे. हा कर्मचारी वर्ग सेवानिवृत्त होत नाही तोपर्यंत त्यांना वेतन द्यावेच लागणार आहे. असे असताना विभागाने हा कर्मचारी वर्ग अन्यत्र वर्ग करुन त्यांच्याकडून विभागांतर्गत अन्य कामे करुन घेण्याची आवश्यकता असताना विभागाने हा विषय गांभीर्याने हाताळला नाही. खाजगी कार्यशाळा जिल्हास्तरावर उपलब्ध असल्याने शासनाने विभागीय कार्यशाळा टप्प्याटप्प्याने बंद करण्याचे तसेच महसूल वाढीकरिता या कार्यशाळांची जमिन सार्वजनिक खाजगी भागीदारीतून विकसित करण्याचे नियोजन असल्याचे समितीसमोर विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. पण यासाठी विभागाने नेमके काय नियोजन केले व ते नियोजन करेपर्यंत तेथील कर्मचा-यांकडून कोणती कामे करुन घेतली याचा तपशिल समितीसमोर येवू शकला नाही. या कर्मचा-यांना कोणतेही काम न देता त्यांच्या सेवानिवृत्तीची वाट पाहत बसणे ही बाब निश्चितच समर्थनीय नाही. त्याचप्रमाणे शासनाने सन १९८२ च्या काढलेल्या शासन निर्णयामध्ये जॉब कार्ड तयार करण्याचा अंतर्भाव असताना ८६६ कामांसाठी जॉब कार्डस् तयार करण्यात आले नसून याचा कोणताही रेकॉर्ड देखील उपलब्ध नाही. तसेच कार्यशाळेचे भांडवल लेखे, उत्पादन लेखे आणि नफा-तोटा असलेले प्रपत्र लेखे देखील दरवर्षी तयार केले नव्हते. ही देखील अत्यंत गंभीर बाब आहे. जॉब कार्ड ठेवणे आवश्यक होते परंतु जॉब कार्ड तयार केलेले नाही ही वस्तुस्थिती विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर मान्यच केली. अतः या संपुर्ण प्रकरणी जबाबदार अधिका-यांवर कारवाई करुन केलेल्या कारवाईची माहिती समितीस १ महिन्याच्या आत देण्याबाबत समितीने निर्देशित केले असतानाही अद्यापही ही माहिती समितीस अप्राप्त आहे. ही देखील बाब निश्चितच गंभीर असून समितीचा अवमान करणारी ठरते. अतः या प्रकरणी संबंधित अधिका-यांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी. तसेच विभागाने विभागीय कार्यशाळांमधील कर्मचा-यांचा अन्यत्र उपयोग करुन कामे करुन घ्यावीत व टप्प्याटप्प्याने या कार्यशाळा बंद करुन त्या जागांचा उपयोग अन्य शासकीय कामांसाठी अथवा व्यावसायिक प्रयोजनासाठी करुन कार्यशाळांची जागा सार्वजनिक खाजगी भागीदारीने महसूल उत्पन्न करण्याच्या दृष्टीने विकसित करण्यात यावी तसेच कार्यशाळांचे प्रलंबित लेखे तयार करुन ते अद्ययावत करण्यात यावे व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक ३.२.२.४ आंतरीक नियंत्रण —**

**अभिप्राय :**

**३.१६** वाहने/यंत्रसामग्रीची खरेदी, उपयोग आणि देखभाल या संबंधी आढावा घेण्यासाठी अधीक्षक (यांत्रिकी) यांच्या अध्यक्षतेखाली २०११-१६ दरम्यान २३ बैठका आयोजित करण्यात आल्या. तथापि, फक्त सहा बैठकींचे कार्यवृत्त तयार करण्यात आले. वाहनांच्या/यंत्रसामग्रीच्या स्थितीच्या आढाव्याबद्दल दुसरी कोणतीही केंद्रीकृत संनियंत्रण कार्यप्रणाली नव्हती. त्यामुळे वाहने/यंत्रसामग्रीची खरेदी, उपयोग आणि देखभालीसाठी असलेल्या आंतरिक कार्यप्रणालीच्या पर्याप्ततेचे परीक्षण लेखापरिक्षेस करता आले नाही.

**३.१७** याशिवाय वाहन/यंत्रसामग्रीवरील खर्चाच्या संनियंत्रणासाठी प्रत्येक विभागाने दुरुस्ती व देखभालीवर झालेला मासिक खर्च दर्शविणारी कार्य गोषवारा नोंदवही (works abstract register) तयार करावयास पाहिजे. परंतु अचलपूर वगळता कोणतीही कार्य गोषवारा नोंदवही तयार केली नाही. असे दस्तावेज नसल्यामुळे वाहनांच्या आणि यंत्रसामग्रीच्या दुरुस्ती व देखभालीवरील खर्चावर नियंत्रण ठेवण्यात आले नाही असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

**शिफारस :**

**३.१८ वाहने/यंत्रसामग्री खरेदी, उपयोग व देखभाल यासंबंधी आढावा घेणेसाठी आयोजित करण्यात आलेल्या २३ बैठकांपैकी केवळ ६ बैठकांचे कार्यवृत्त तयार झाले व अन्य बैठकांचे अद्याप कार्यवृत्त देखील तयार न होणे यावरुनच विभागांतर्गत अस्तित्वात असलेल्या कार्यपध्दती मधील त्रुटी व उणिवा दिसून येते. विभागीय प्रतिनिधींनी यासंबंधी उत्तर देताना यापुढे घेण्यात येणा-या बैठकींचे कार्यवृत्त तयार करण्यात येतील असे समितीला आश्वासित केले. परंतु आतापर्यंत हे कार्यवृत्त का तयार झाले नाही याबाबत कोणावरही जबाबदारी निश्चित केली नाही. ज्या कर्मचारी/अधिका-यांचे हे काम होते त्यांनी ते पार पाडले नाही. तरीही विभाग त्यांचेविरुध्द कोणतीही कारवाई करण्यास तयार नाही. अतः या प्रकरणी जबाबदार असणा-या अधिका-यांवर कारवाई करण्यात यावी व भविष्यात या कार्यपध्दतीचा अवलंब टाळून अंतर्गत नियंत्रण अधिक मजबूत व प्रभावी करावे व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**३.१९ महालेखाकारांनी या अहवालात सार्वजनिक बांधकाम विभागातील वाहनांचे प्रापण, उपयोग आणि देखभाल यासंदर्भात नोंदविलेले आक्षेप हे अत्यंत गंभीर व महत्वाचे असून यात नवीन वाहने/बांधकाम कार्य यंत्रसामग्रीची खरेदी, जुने आणि दुरुस्ती करणे शक्य होणार नाही अशी वाहने/यंत्रे आणि त्यांची विल्हेवाट याबाबतची पध्दती त्रुटीपुर्ण होती. बांधकाम कार्य यंत्र आणि तपासणी वाहनांची दुरुस्ती व देखभाल आणि जुन्या तपासणी वाहनांना लागणारे इंधन यावरील खर्च विहित मापदंडापेक्षा खूप जास्त होते.विभागीय कार्यशाळांची उपयुक्तता आणि वाहने/यंत्रे यांच्या देखभाल-दुरुस्तीवर लागणा-या खर्चावर संनियंत्रण ठेवण्यासाठी मूलभूत दस्तावेज राखण्यात आले नव्हते. वाहने/यंत्रे यांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी असलेल्या कार्यशाळांचा देखील योग्यप्रकारे उपयोग करण्यात येत नव्हता आणि बहुतेक कामे बाह्यस्त्रोताद्वारे खाजगी एजन्सींना सोपविण्यात आली असे अनेक आक्षेप सदरहु परिच्छेदांच्या अनुषंगाने समितीसमोर आले. अतः शासनाने सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत बांधकाम यंत्रे/वाहने आणि निरीक्षण वाहने यांची देखभालयोग्य प्रकारे कार्यक्षमतापूर्वक व्हावी या दृष्टीने वाहने व यंत्रांच्या खरेदीसाठी आणि जुन्या/दुरुस्ती करणे शक्य होणार नाही अशा वाहनांना उचित समयी बदलण्यासाठी एक व्यापक योजना आखावी. कार्यशाळांचा सतत कमी वापर होणे आणि परिणामस्वरुप बाह्यस्त्रोतांवर मोठा खर्च होणे विचारात घेता या कार्यशाळा सुरु ठेवण्याच्या दृष्टीने केलेल्या निर्णयाचा शासनाने फेरआढावा घ्यावा व यासंदर्भात केलेल्या कार्यवाही माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक ३.७ कंत्राटदारास गैरवाजवी लाभ**

**अभिप्राय :**

**३.२०** सार्वजनिक बांधकाम विभागाने राज्य महामार्ग क्र.२६४ वर वरोरा-चंद्रपूर-बल्लारपूर-बाम्हणी मार्ग आणि पूल बांधकामाकरिता वरोरा-चंद्रपूर-बल्लारपूर टोल मार्ग लिमिटेड, नागपूर (कंत्राटदार) यांचे सोबत बांधा, वापरा आणि हस्तांतरीत करा या तत्वावर रु.४५६.५१ कोटी किंमतीचा सवलत करार निष्पादित केला. कंत्राटदारास काम सुरु झाल्यापासून ३० वर्षाचा सवलत कालावधी बहाल करण्यात आला, ज्यात मार्ग बांधणे, वापरणे आणि त्याची देखभाल करणे यासाठी तीन वर्षाचा बांधकाम कालावधी अंतर्भूत आहे. हा प्रकल्प ऑगस्ट,२०१४ मध्ये पूर्ण झाला आणि कंत्राटदाराने दि.२६ डिसेंबर, २०१४ पासून जकात वसूल करणे सुरु केले.

**३.२१** सार्वजनिक बांधकाम विभागाने जारी केलेल्या अधिसूचनेनुसार (दि.२४ डिसेंबर,२०१४) या प्रकल्पांतर्गत विविध प्रकारच्या मोटार वाहनांच्या प्रत्येक फेरीचा जकात दर, महाराष्ट्र शासनाद्वारे जाहीर जकात धोरणाप्रमाणे नियमित करावयास पाहिजे. जकात धोरणाप्रमाणे मूळ जकात दराच्या दशांशावर सहा टक्के प्रति वर्ष या दराने प्रत्येक तीन वर्षांनी, १ एप्रिल रोजी जकात दर वाढवावयास पाहिजे. अशाप्रकारे तिस-या वर्षाच्या शेवटी ठरविण्यात आलेले जकात दर वर्ष २०२५ पर्यंत जवळच्या रु.५ आणि २०२५ नंतर रु.१० मध्ये पूर्णांकित करावयास पाहिजे. जकात आकारण्यासाठी चे दर २०१०-१३ (मूळ दर दर्शविणारे) पासून सुरु होऊन २०३७-४० पर्यंत लागू राहिल आणि तीन-तीन वर्षाने टप्प्या-टप्प्यानुसार वाढेल असे जकात धोरणात विनिर्दिष्ट केले आहे. परंतु विभागाने दरवर्षी जकात दरात सहा टक्क्यांची वाढ देताना हे दर जकात धोरणानुसार तिस-या वर्षाखेर एकदाच जवळच्या रु.५ वर पूर्णांकित करण्याऐवजी दरवर्षी पुढील रु.५ वर पूर्णांकित केले. परिणामी, जकात धोरणाच्या तुलनेत विभागाने दोन प्रकारच्या वाहनाचे (जड मोटार वाहन आणि अनेक चाक असलेले वाहन) जकात दर चुकीचे आखले गेले व अशाप्रकारे जड मोटार वाहन आणि अनेक चाक असलेल्या वाहनांसाठी विभागाद्वारे आखलेले दि.१ एप्रिल,२०१३ पासून प्रभावी असलेले दर जकात धोरणात विहित असलेल्या दरापेक्षा क्रमशः रु.१० आणि रु.१५ प्रति वाहन प्रति फेरीने जास्त होते. परिणामी बांधा, वापरा आणि हस्तांतरीत करा या प्रकल्पांतर्गत कंत्राटदाराद्वारे उभारण्यात आलेल्या दोन जकात नाक्यांवरुन (एकल किंवा परत फेरी) दरम्यान जाणा-या वाहनांच्या प्रत्यक्ष संख्येच्या आधारावर कंत्राटदारास रु.२.१२ कोटींचा गैरवाजवी लाभ झाला असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहे.

**३.२२** बीओटी तत्वावरील रस्त्यांच्या जकात दराच्या गणने संदर्भातील हा विषय असून विभाग ३-३ वर्षाची सरासरी काढतो व त्याअनुषंगाने शासनाने जी पध्दत निश्चित केली आहे त्यानुसारच ही गणना केलेली असून ही सरासरी गणना केल्यानंतरच निविदा काढण्यात आलेली असल्यामुळे कुठल्याही कंत्राटदारास त्याचा गैरवाजवी फायदा झाला नसल्याचे विभागीय सचिवांनी साक्षीदरम्यान समितीसमोर सांगितले.

**शिफारस :**

**३.२३ बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर आधारीत वरोरा-चंद्रपूर-बल्लारपूर ब्राह्मणी मार्गाच्या बांधकामासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१ चंद्रपूर द्वारे जकात दराची चुकीची गणना केल्याने कंत्राटदारास रु.२.१२ कोटी गैरवाजवी लाभ झाला असे आक्षेप नोंदविण्यात आले आहेत. महालेखाकारांनी यासंदर्भात केलेली जकात दराची गणना व विभागाने केलेल्या गणनेच्या पध्दतीमध्ये तफावत दिसून येते. महालेखाकार यांच्या मते ३ वर्षातील सरासरी जकात दर घेण्याची तरतूद जकात धोरणात कुठेही आढळून येत नाही. तथापि, जकात धोरणानुसार किमान ३ वर्षे जकात दर बदलण्यात येत नाहीत अशाप्रकारची तरतूद निविदा दस्तावेजामध्ये केलेली असल्यामुळे त्याप्रमाणेच गणना केल्याचे विभागीय सचिवांनी समितीसमोर सांगितले. यात प्रथम वर्षाचा जकात दर रु.१०१/-, द्वितीय वर्षाचा जकात दर रु.१०७/- व तृतीय वर्षाचा जकात दर रु.११३/- इतका असून विभागाने यातील सरासरी रु.१०१/- चा दर ग्राह्य धरला. यावर महालेखाकारांनी आक्षेप नोंदवत शासन निर्णयानुसार ६ टक्के वार्षिक दर असून तो तिस-या वर्षी राऊंडअप करावयाचा आहे. परंतु विभागाने तो दरवर्षी राऊंडअप केल्यामुळे जकात दराची गणना जास्त झालेली असल्याचे महालेखाकारांनी समितीसमोर सांगितले. सन २००३ च्या धोरणामध्ये पथकराच्या दरामध्ये प्रत्येक वर्षी ६ टक्के याप्रमाणे वर्षातून एकदा १ एप्रिल रोजी वाढ करण्यात यावी अशी तरतूद आहे. या सर्व बाबींची समितीने तपासणी केली असता महालेखाकारांनी केलेली गणना व विभागाने केलेली गणना यामध्ये तफावत दिसून येते. अतः विभागाने महालेखाकार यांचे समवेत बसून सदरहु आक्षेपांतर्गत परिच्छेदात केलेली जकात दराची गणना नियमानुसार व गुणवत्तेवर तपासून घ्यावी व त्याअनुषंगाने जकात दराची निश्चिती करुन आवश्यक ती पुढील कार्यवाही करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात कळविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक ३.८ नियमबाह्य प्रदान**

**अभिप्राय :**

**३.२४** महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका, १९८४ च्या परिच्छेद २१९ नुसार जेव्हा एखादे काम हे निविदा मागविण्यासाठी विभागावयाचे असते तेव्हा संबंधित अधिका-याने संपूर्ण कामासाठी निविदेची मंजूरी देण्यासाठी सक्षम असलेल्या प्राधिका-याकडून पूर्व परवानगी घेणे आवश्यक असते. कोलशेत, ठाणे येथे एकूण रु.१.६२ कोटी खर्चात, शासकीय जमिनीवर कुंपण भिंत बांधण्यास प्रशासकीय मान्यता जिल्हाधिकारी यांनी दिली. परंतु मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांची पूर्वपरवानगी न घेता कार्यकारी अभियंता यांनी कुंपण भिंतीचे काम १७ कामात विभागून १७ स्वतंत्र निविदा मागविल्या जे नियमपुस्तिकेतील तरतूदींच्या विरुध्द होते. एकूण रु.१.३५ कोटी खर्चाची ही १७ कामे चार कंत्राटदारांना दिली होती. ही

सगळी कामे मार्च,२०१५ मध्ये पूर्ण झाली आणि कंत्राटदारांना र.१.६८ कोटीचे प्रदान केले गेले. तसेच निविदेच्या अटींनुसार कंत्राटदाराने चाचणी आणि विश्लेषणासाठी आवश्यक संख्येत नमूना संकलनासाठी सर्व सुविधा पुरवावयाच्या होत्या आणि त्यासाठी होणारा खर्चही सोसायचा होता. करावयाच्या एकूण चाचण्यांपैकी ७० टक्के चाचण्या या कार्यस्थळी असलेल्या प्रयोगशाळेत आणि ३० टक्के चाचण्या या दक्षता आणि गुणवत्ता नियंत्रण प्रयोगशाळेत (विभागीय प्रयोगशाळा) करावयाच्या होत्या. कंत्राटदारांच्या दाव्यांची पूर्तता करण्यासाठी चालू लेखा देयकाबरोबर चाचणी तपासणी अहवाल संलग्न करायचे होते. यासंदर्भात केलेल्या तपासणीत एकही चाचणी अहवाल हा खाजगी आणि विभागीय प्रयोगशाळेकडून जारी केला नव्हता, त्यामुळे या दोन कंत्राटदारांनी कुंपण भिंतीच्या बांधकामात कुठल्या दर्जाचे साहित्य वापरले याबद्दल शंका उपस्थित झाली.

**३.२५** अशाप्रकारे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१ ठाणे यांनी मुख्य अभियंत्यांची पूर्वपरवानगी न घेता कुंपण भिंतीचे काम विभागणे हे महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम पुस्तिकेतील तरतूदींच्या विरुध्द होते. तसेच कंत्राटदारांनी सादर केलेल्या तपासणी अहवालाची सत्यता पडताळल्याशिवाय केलेले रु.८५.२१ लक्षाचे प्रदानही नियमबाह्य होते असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

**शिफारस :**

**३.२६ सदरहू परिच्छेदांतर्गत महालेखाकारांनी नोंदविलेले आक्षेप हे अतिशय गंभीर असून विभागाने संरक्षक भिंतीचे १७ भाग करुन ४ ठेकेदारांना हे काम देणे, तसेच काम त्वरीत करुन घेणे गरजेचे असल्याचे कारण सांगून त्यास मुख्य अभियंता यांची मान्यताही न घेणे, या बाबी निश्चितच नियमबाह्य असून कदापि समर्थनीय नाहीत. याबाबत समितीने अधिक खुलासा मागितला असता यावर विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, या जमिनीवर जिल्हाधिकारी झोपड्यांचे अतिक्रमण हटवित होते व यावर पुन्हा झोपड्यांचे अतिक्रमण होण्याची भिती होती. त्यामुळे अतिक्रमण काढत असतानाच जर संरक्षक भिंत बांधली नाही तर लोक परत अतिक्रमण करतील. त्यामुळे हे काम लवकर पुर्ण करुन घेण्यासाठी ४ वेगवेगळ्या कंत्राटदारांकडून ते करुन घेतले. काम लवकर पूर्ण करण्यासाठी आणि अतिक्रमण टाळण्यासाठी, कुंपणाच्या भिंतीचे काम १७ कामांमध्ये विभागून चार कंत्राटदारांना दिले गेले. तातडीची गरज लक्षात घेऊन एकच संयुक्त निविदा मागविली गेली नव्हती. तसेच यात काम बरोबर झाले की नाही अशी शंका आल्यामुळे त्याची शासकीय दक्षता व गुणनियंत्रण प्रयोगशाळा याद्वारे तपासणी देखील करुन घेतली असून ज्याप्रमाणे या कामात गुणवत्ता अपेक्षित होती त्याप्रमाणे काम झालेले असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. यावर समितीने आक्षेप नोंदवित कामाची तातडी व महत्व याबाबत समितीचे काहीही म्हणणे नाही. परंतु संरक्षक भिंत बांधण्याच्या कामाची मान्यता न घेता त्याचे १७ भाग करणे निश्चितच समर्थनीय नाही. तसेच कंत्राटदाराने बनावट कागदपत्रे देखील सादर केल्याचे महालेखाकारांनी निदर्शनास आणले. कामाची तातडी लक्षात घेता कामाचे विभाजन करणे आवश्यक होते तर त्यास नियमाप्रमाणे मुख्य अभियंत्यांची पूर्वपरवानगी का घेतली नाही ? हा मुळ प्रश्न व आक्षेप याठिकाणी आहे व ही प्रशासकीय स्वरुपाची त्रुटी असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर मान्य केले. तसेच यातील दुसरा मुद्दा हा गुणवत्ता नियंत्रण प्रमाणपत्राबाबत असून कामाची ६० टक्के तपासणी खाजगी केंद्राकडून व ४० टक्के तपासणी शासकीय केंद्राकडून करुन त्यानंतरच कंत्राटदारास रकमेचे प्रदान करणे अपेक्षित आहे. परंतु कंत्राटदाराने केवळ प्रमाणपत्राचे नाव बदलून एकाच क्रमांकाचे प्रमाणपत्र दिलेले आहे. अशा परिस्थितीत या प्रमाणपत्राची वैधता निश्चितच संशयास्पद ठरते व कंत्राटदारास रकमेचे केलेले प्रदान हे नियमबाह्य व आक्षेपार्ह ठरते. या बाबी लक्षात आल्यानंतर गुणवत्ता नियंत्रण प्रयोग शाळेकडून वेगळी चाचणी व तपासणी करुन घेण्यात आल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले व त्याअनुषंगाने रक्कम कापून घेण्यात आली. मात्र या संपुर्ण प्रकरणात जबाबदार असणा-या कोणत्याही अधिका-यांवर विभागाने कारवाई केली नाही. अतः त्या सर्व जबाबदार अधिका-यांवर आणि कंत्राटदारावर देखील कारवाई करण्यात यावी तसेच कंत्राटदारांचा समावेश काळ्या यादीत करण्यात यावा व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

# परिशिष्ट “अ”

## विवरण क्रमांक-१

विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रमातंर्गत पुर्ण झालेल्या व अपुर्णावस्थेत असलेल्या प्रकल्पांना विभागाच्या अन्य योजनांमधून निधी उपलब्ध करुन देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंधारण विभाग
ग्राम विकास व जलसंधारण विभाग
शासन निर्णय क्रमांक:विविका -२०१७ /प्र.क्र.१११/ जल-१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १३ सप्टेंबर, २०१७

वाचा :

१) शासन निर्णय क्रमांकः विविका २०१२/प्र.क्र.०३/जल-१, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, दिनांक १० डिसेंबर २०१२.

२) शासन शुद्धीपत्रक क्रमांक : विविका २०१२/प्र.क्र.०३/जल-१ ग्राम विकास व जलसंधारण विभाग, दिनांक ९ जुलै, २०१३.

३) अधीक्षक अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ, नागपूर यांचे पत्र क्र.१६९१/ताशां-५/२०१७, दि. २३ जून, २०१७.

४) अधीक्षक अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ, अमरावती यांचे पत्र क्र. ताशां-२/१९७१/ VIIDP/२०१७, दि. २३ जून, २०१७.

प्रस्तावना :

केंद्र शासनाच्या राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम हा विदर्भातील ११ जिल्ह्यांसाठी विशेष संरक्षित सिंचन सुविधा पुरविण्याचा व पीक उत्पादकता वाढविण्याचा कार्यक्रम होता. हा पाच वर्षाचा कार्यक्रम सन २०१२ ते २०१७ या कालावधीत राबविण्यात आला असून दि. ३१ मार्च, २०१७ ला संपुष्टात आला आहे. या कार्यक्रमांतर्गत कृषि व मृदसंधारणासाठी रु.१७९१.०० कोटी आणि लघु सिंचन (जलसंधारण) साठी रु.१४५९.०० कोटी असा एकूण रु. ३२५०.०० कोटी इतक्या रक्कमेचा आराखडा तयार करण्यात आला होता. त्यानुसार या कार्यक्रमांतर्गत मार्च २०१७ अखेर पर्यंत रु. ८७४.६७ कोटी एवढा निधी प्राप्त झाला असून तो पुर्ण खर्च झाला आहे.

उपरोक्त प्राप्त निधीव्दारे लघु सिंचन (जलसंधारण) यंत्रणेच्या कार्यक्रमांतर्गत १८७० योजना पूर्ण झाल्या असून काही योजना प्रगतीपथावर आहेत. कार्यक्रमांतर्गत जी कामे प्रगतीपथावर आहेत तसेच जी कामे पुर्ण झालेली आहेत मात्र निधी अभावी देयके प्रलंबित आहेत अशा योजनांबाबत अधीक्षक अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ, अमरावती व नागपूर यांनी संदर्भिय पत्रान्वये प्रस्ताव शासनास सादर केले आहेत. मात्र

विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम संपुष्टात आल्यामुळे सदरचे प्रलंबित दायित्व अन्य योजनांमधून पूर्ण करण्याची बाब शासनाचे विचाराधीन होती. याबाबत शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**निर्णय**

विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रमांतर्गत अधीक्षक अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ, अमरावती व नागपूर यांनी सादर केलेल्या प्रस्तावांतील ज्या योजना निवीदा कार्यवाहीत आहेत, ज्या योजनांच्या प्रशासकीय मान्यता प्रलंबित आहेत, जी कामे भुसंपादना अभावी सुरु झालेली नाहीत अशी कामे वगळून सोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्टानुसार लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ अमरावती व नागपूर यांचे एकूण रु.१७०.३७ कोटी शिल्लक दायित्वाचे ६९८ प्रकल्प सोबतच्या परिशिष्टामधील स्तंभ क्र. ९ नुसार विभागाच्या १) (२७०२ ४७५४) २) (४७०२ ३८१३) ३) (२७०२ १४७९) ४) (२७०२ ४२४४) ५) (४४०२ १२२८) ६) (४४०२ २६८१) व आदिवासी उप योजना, जिल्हा नियोजन योजना या योजना/मागणी शिर्षाखाली वर्ग करण्यास शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रस्तुत आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७०९१४१३४०२५६१२६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षंकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vinod S Wakhare

Digitally signed by Vinod S Wakhare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development And Water Conservation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2c4ed7503121d5b275ec2c70be938333731cf94fc8d02a44009760242dc07e56, cn=Vinod S Wakhare
Date: 2017.09.14 13:29:43 +05'30'

(वि. सि. वखारे)
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

सोबत: परिशिष्ट

**प्रत,**

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल,मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव
३. मा. विरोधी पक्ष नेता,विधानपरिषद/विधानसभा, विधानमंडळ सचिवालय,विधानभवन, मुंबई.
४. सर्व मा.संसद सदस्य, विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य.
५. सर्व मा.मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
६. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.
७. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव.
८. मा.सचिव (मृद व जलसंधारण) यांचे स्वीय सहाय्यक.
९. आयुक्त (कृषि) कृषि आयुक्तालय, पुणे.
१०.विभागीय आयुक्त, अमरावती/नागपूर.
११.मुख्य अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण), महाराष्ट्र राज्य, पुणे

१२.अधीक्षक अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ, नागपूर.

१३.अधीक्षक अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ, अमरावती.

१४.संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.

१५.सह सचिव (जलसंधारण) मंत्रालय, मुंबई.

१६.उप सचिव (राकृवियो कक्ष), कृषि विभाग,मंत्रालय, मुंबई

१७.महालेखापाल (लेखा व परीक्षा) मुंबई व नागपूर.

१८. जिल्हाधिकारी,अमरावती/अकोला/वाशिम/यवतमाळ/बुलढाणा/नागपूर/वर्धा/चंद्रपूर/गडचिरोली/ भंडारा/गोंदिया.

१९.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती/अकोला/वाशिम/यवतमाळ/बुलढाणा/ नागपूर/वर्धा/चंद्रपूर/गडचिरोली/भंडारा/गोंदिया.

२०.कार्यकारी अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) विभाग, अमरावती/अकोला/वाशिम/यवतमाळ/ बुलढाणा/नागपूर /चंद्रपूर/गोंदिया.

२१.कार्यकारी अभियंता, लघु सिंचन जिल्हा परिषद विभाग, अमरावती/अकोला/वाशिम/यवतमाळ/ बुलढाणा/नागपूर/वर्धा/चंद्रपूर/गडचिरोली/भंडारा /गोंदिया.

२२.जनसंपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिद्धी करीता).

२३.अवर सचिव ( जल-७), ग्रामविकास व जलसंधारण विभाग मंत्रालय, मुंबई.

२४.कक्ष अधिकारी (जल-३), ग्रामविकास व जलसंधारण विभाग मंत्रालय, मुंबई.

२५.कक्ष अधिकारी (जल-४), ग्रामविकास व जलसंधारण विभाग मंत्रालय, मुंबई

२६.कक्ष अधिकारी (जल-११), ग्रामविकास व जलसंधारण विभाग मंत्रालय, मुंबई.

२७.निवड नस्ती जल-१.

# ग्राम विकास व जलसंधारण विभाग
## शासन निर्णय, क्र. विविका -२०१७ /प्र.क्र.१११/ जल-१
## मंत्रालय, मुंबई-३२. दि. १३ सप्टेंबर, २०१७ सोबतचे
## परिशिष्ट
### विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम अंतर्गत असलेल्या योजनांचा तपशील

(रु.लक्ष)

| अ.क्र | योजनेचे नाव | जिल्हा | योजनेची प्र.मा. किंमत | योजनेवर झालेला खर्च | योजनेचे शिल्लक दायित्व | ज्या लेखा शिर्षाखाली वर्ग करण्यात येत आहे ते लेखाशिर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ६ | ७ | ९ |
| | लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ अमरावती | | | | | |
| लघु सिंचन (जलसंधारण)विभाग,अमरावती | | | | | | |
| १ | साठवण तलाव, दहिगांव पूर्णा ता.चांदूर बाजार | अमरावती | १७८.६२ | ९०.४४ | ८८.१८ | लेखाशिर्ष २७०२-४७५४ |
| २ | साठवण तलाव,दाभाडा ता.धामणगांव रेल्वे | अमरावती | १३८.०० | ८५.७६ | ५०.०० | लेखाशिर्ष २७०२-४७५४ |
| ३ | को.प.बंधारा,मार्डी १ ता.तिवसा | अमरावती | ९७.६० | १०.०० | ८०.०० | लेखाशिर्ष २७०२-४७५४ |
| ४ | को.प.बंधारा,मार्डी २ ता.तिवसा | अमरावती | ९८.१९ | १२.०० | ९०.०० | लेखाशिर्ष २७०२-४७५४ |
| ५ | को.प.बंधारा,मार्डी ३ ता.तिवसा | अमरावती | ९८.२६ | १२.४४ | ८९.६१ | लेखाशिर्ष २७०२-४७५४ |
| ६ | को.प.बंधारा,भंडोरा ता.चिखलदरा | अमरावती | २९.५६ | ०.२२ | २९.३४ | लेखाशिर्ष २७०२-४७५४ |
| ७ | को.प.बंधारा,नांदगांव पेठ ता.'अमरावती | अमरावती | ६४.२२ | ४१.८१ | १०.०० | लेखाशिर्ष २७०२-४७५४ |
| ८ | को.प.बंधारा,पवनी ता.वरूड | अमरावती | ९७.३३ | ०.०५ | ९७.२८ | लेखाशिर्ष २७०२-४७५४ |
| ९ | पाझर तलाव,माहूली चोर ता.नांदगांव खंडेश्वर | अमरावती | ११८.४९ | ७४.७८ | १६.०५ | ४४०२-१२२८ महामंडळ |
| १० | पाझर तलाव,सार्सी ता.नांदगांव खंडेश्वर | अमरावती | ६८.८६ | ६८.६४ | २९.१६ | ४४०२-१२२८ महामंडळ |
| ११ | को.प.बंधारा,पोरगव्हाण ता.वरूड | अमरावती | २०४.११ | ०.०० | ११८.०६ | लेखाशिर्ष २७०२-४७५४ |
| १२ | को.प.बंधारा,फुबगाव ता.नांदगांव खंडेश्वर | अमरावती | ७.६७ | ७.१४ | ०.५३ | लेखाशिर्ष २७०२-१४७९ |
| १३ | को.प.बंधारा,सांवगीसंगम ता.चांदूर रेल्वे | अमरावती | ८.२२ | ०.०० | ८.२२ | लेखाशिर्ष २७०२-१४७९ |

| अ.क्र | योजनेचे नाव | जिल्हा | योजनेची प्र.मा. किंमत | योजनेवर झालेला खर्च | योजनेचे शिल्लक दायित्व | ज्या लेखा शिर्षाखाली वर्ग करण्यात येत आहे ते लेखाशिर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १४ | को.प.बंधारा,पळसखेड ता.चांदूर रेल्वे | अमरावती | १०.५० | ९.९३ | ०.५७ | लेखाशिर्ष २७०२-१४७९ |
| १५ | को.प.बंधारा,शिवणी रसुलपुर ता.नांदगांव खंडेश्वर | अमरावती | २३.६४ | ०.०० | २३.६४ | लेखाशिर्ष २७०२-१४७९ |
| १६ | को.प.बंधारा,देगाव वाळकी ता.अमरावती | अमरावती | १५.५९ | ४.७४ | १०.८५ | लेखाशिर्ष २७०२-१४७९ |
| १७ | को.प.बंधारा,देगाव बारेगाव ता.अमरावती | अमरावती | १७.५३ | ६.६० | १०.९३ | लेखाशिर्ष २७०२-१४७९ |
| १८ | को.प.बं. कुहा १ ता. तिवसा | अमरावती | १.९५ | ०.०० | १.९५ | ४४०२-१२२८ महामंडळ |
| १९ | को.प.बं. खेड २/ उदखेड २ ता.'मोर्शी | अमरावती | १.९३ | ०.०० | १.९३ | ४४०२-१२२८ महामंडळ |
| २० | रजणीकुंड/गंगारखेडा को.प.बंधारा ता.चिखलदरा | अमरावती | १.९४ | ०.०० | १.९४ | ४४०२-१२२८ महामंडळ |
| २१ | को.प.बं. आमनेर / पाळा १ ता.वरूड / 'मोर्शी | अमरावती | १.९८ | ०.०० | १.९८ | ४४०२-१२२८ महामंडळ |
| २२ | को.प.बं. सालबर्डी / पाळा २ ता.'मोर्शी | अमरावती | १.९६ | ०.०० | १.९६ | ४४०२-१२२८ महामंडळ |
| २३ | को.प.बं. कारा १ / कारा २ / नारदू ता.धारणी | अमरावती | १.९८ | ०.०० | १.९८ | ४४०२-१२२८ महामंडळ |
| २४ | को.प.बं. देगांव बोर/देगांव वा / मासोद' ता.अमरावती | अमरावती | १.९५ | ०.०० | १.९५ | ४४०२-१२२८ महामंडळ |
| २५ | को.प.बं. गोपाळपूर ता.अमरावती | अमरावती | १.९५ | ०.०० | १.९५ | ४४०२-१२२८ महामंडळ |
| २६ | टेकडा नागझिरा/ अंबापाटी को.प.बंधारा ता.चिखलदरा | अमरावती | १.९३ | ०.०० | १.९३ | ४४०२-१२२८ महामंडळ |
| २७ | टेंब्रुसोंडा को.प.बंधारा ता. चिखलदरा | अमरावती | १.९२ | ०.०० | १.९२ | ४४०२-१२२८ महामंडळ |
| २८ | शहादापुर ल.सिं त. दुरुस्ती मोर्शी | अमरावती | ४६.२९ | ०.०० | ४६.२९ | लेखाशिर्ष २७०२-१४७९ |
| २९ | को.प.बंधारा,कुहा २ ता.तिवसा | अमरावती | ११२.४२ | १९.७६ | ९२.६६ | लेखाशिर्ष ४७०२ - ३८१३ |
| ३० | को.प.बंधारा,निरूळ गंगामाई ता.भातकुली | अमरावती | ४५५.२३ | ५.९४ | ४४९.२९ | लेखाशिर्ष ४७०२ - ३८१३ |
| ३१ | साठवण तलाव,चांदपूर ता.चिखलदरा | अमरावती | २८६.२७ | १.०० | २८५.२७ | आदिवासी उप योजना |

| अ.क्र | योजनेचे नाव | जिल्हा | योजनेची प्र.मा. किंमत | योजनेवर झालेला खर्च | योजनेचे शिल्लक दायित्व | ज्या लेखा शिर्षाखाली वर्ग करण्यात येत आहे ते लेखाशिर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| ३२ | साठवण तलाव,कार्ला-१ ता.तिवसा | अमरावती | ३६३.८२ | ७४.०७ | २८९.७५ | लेखाशिर्ष ४७०२ - ३८१३ |
| ३३ | सिंचन तलाव,डिगरगव्हाण ता.अमरावती | अमरावती | २६.२३ | १०.७४ | १५.४९ | लेखाशिर्ष २७०२ - ४२४४ |
| ३४ | सिंचन तलाव,शेवती ता.अमरावती | अमरावती | ३५.२९ | ७.०० | २८.२९ | लेखाशिर्ष २७०२ - ४२४४ |
| ३५ | सिंचन तलाव,राजुरा ता.अमरावती | अमरावती | १८.४८ | ०.०० | १८.४८ | लेखाशिर्ष २७०२ - ४२४४ |
| ३६ | वाघोली सिंचन तलाव ता.अमरावती | अमरावती | १.९५ | ० | १.९५ | ४४०२-१२२८ महामंडळ |
| ३७ | राजूरा सिंचन तलाव ता.अमरावती | अमरावती | १.९५ | ० | १.९५ | ४४०२-१२२८ महामंडळ |
| ३८ | महिमापूर साठवण तलाव ता. नांदगांव खंडे. | अमरावती | १.९८ | ० | १.९८ | ४४०२-१२२८ महामंडळ |
| ३९ | गणेशपूर वाढोणा सिंचन तलाव ता.नांदगांव खंडे. | अमरावती | १.९९ | ० | १.९९ | ४४०२-१२२८ महामंडळ |
| ४० | घोडदेव सिंचन तलाव ता.'मोर्शी | अमरावती | १.९४ | ० | १.९४ | ४४०२-१२२८ महामंडळ |
| | | ४० | २६४९.७२ | ५४३.०६ | २००७.२४ | |
| लघु सिंचन (जलसंधारण)विभाग,अकोला | | | | | | |
| १ | सि.एन.बी.बिडगाव-१ ता.मुर्तिजापूर | अकोला | १७.२३ | ९.९३ | ७.३० | ४४०२-१२२८ महामंडळ |
| २ | को.प.बंधारा,कालवाडी ता.अकोट | अकोला | ४६.६४ | २३.०५ | २३.५९ | ४४०२-१२२८ महामंडळ |
| ३ | को.प.बंधारा,सोनबर्डी ता.अकोट | अकोला | ५७.६८ | ३३.६८ | २४.०० | ४४०२-१२२८ महामंडळ |
| ४ | को.प.बंधारा,वणीवरुळा ' ता.अकोट | अकोला | ४५.४३ | २९.५५ | १५.८८ | ४४०२-१२२८ महामंडळ |
| ५ | को.प.बंधारा,देवरी-२ ' ता.अकोट | अकोला | ६४.२४ | २२.९१ | ४१.३३ | ४४०२ २६८१ जलयुक्त शिवार |
| ६ | सि.एन.बी.वाईमाना-१ ता.मुर्तिजापूर | अकोला | १५.३८ | २९.६८ | १४.५५ | ४४०२ २६८१ जलयुक्त शिवार |
| ७ | सि.एन.बी.वाईमाना-२ ता.मुर्तिजापूर | अकोला | १२.२५ | | | ४४०२ २६८१ जलयुक्त शिवार |
| ८ | सि.एन.बी.वाईमाना-३ ता.मुर्तिजापूर | अकोला | १६.६० | | | ४४०२ २६८१ जलयुक्त शिवार |

| अ.क्र | योजनेचे नाव | जिल्हा | योजनेची प्र.मा. किंमत | योजनेवर झालेला खर्च | योजनेचे शिल्लक दायित्व | ज्या लेखा शिर्षाखाली वर्ग करण्यात येत आहे ते लेखाशिर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| ९ | सि.एन.बी.बोरगावनिघोट ता.मुर्तिजापूर | अकोला | १५.७४ | ९.२३ | ६.५१ | ४४०२ २६८१ जलयुक्त शिवार |
| १० | सि.एन.बी.कंझारा ता.मुर्तिजापूर | अकोला | १८.७१ | ९.१२ | ९.५९ | ४४०२ २६८१ जलयुक्त शिवार |
| ११ | को.प.बंधारा,गौलखेडी ता.मुर्तिजापूर | अकोला | ५.९३ | ४.६० | १.३३ | ४४०२ २६८१ जलयुक्त शिवार |
| १२ | को.प.बंधारा,चिखली ता.मुर्तिजापूर | अकोला | ३.३५ | १.५० | १.८५ | ४४०२ २६८१ जलयुक्त शिवार |
| १३ | को.प.बं.खरपढोरे ता. मुर्तिजापूर | अकोला | १.०९ | ० | १.०९ | लेखाशिर्ष २७०२-१४७९ |
| १४ | को.प.बं.उमईजांभा ता. मुर्तिजापूर | अकोला | १३.७० | ० | १३.७० | लेखाशिर्ष २७०२-१४७९ |
| १५ | को.प.बं.शेलुबाजार ता. मुर्तिजापूर | अकोला | ४.१२ | ० | ४.१२ | लेखाशिर्ष २७०२-१४७९ |
| १६ | को.प.बं.चिखली ता. मुर्तिजापूर | अकोला | १.८६ | ० | १.८६ | ४४०२-१२२८ महामंडळ |
| १७ | को.प.बं.तुलंगा-१ ता.पातूर | अकोला | १.८८ | ० | १.८८ | ४४०२-१२२८ महामंडळ |
| १८ | को.प.बं.मुरंबा-१ ता. मुर्तिजापूर | अकोला | १.८६ | ० | १.८६ | ४४०२-१२२८ महामंडळ |
| १९ | को.प.बं.उमईजांभा ता. मुर्तिजापूर | अकोला | १.८७ | ० | १.८७ | ४४०२-१२२८ महामंडळ |
| २० | को.प.बं.शेलुबाजार ता. मुर्तिजापूर | अकोला | १.८६ | ० | १.८६ | ४४०२-१२२८ महामंडळ |
| २१ | को.प.बं.लसनापुर ता. मुर्तिजापूर | अकोला | १.८६ | ० | १.८६ | ४४०२-१२२८ महामंडळ |
| २२ | को.प.बं.तांदळी ता.पातूर | अकोला | १.८७ | ० | १.८७ | ४४०२-१२२८ महामंडळ |
| २३ | को.प.बं.कोठारी ता.पातूर | अकोला | १.८६ | ० | १.८६ | ४४०२-१२२८ महामंडळ |
| २४ | को.प.बं.तामसी ता.मुर्तिजापूर | अकोला | ५.०२ | ० | ५.०२ | लेखाशिर्ष २७०२-४२४४ |
| | | २४ | ३५८.०३ | १७३.२५ | १८४.७८ | |
| लघु सिंचन (जलसंधारण) विभाग,वाशिम | | | | | | |
| १ | पाझर तलाव,कुंभी ता.मगरुळपीर | वाशिम | १४२.०५ | ३५.०० | १०७.०५ | ४४०२-१२२८ महामंडळ |

| अ.क्र | योजनेचे नाव | जिल्हा | योजनेची प्र.मा. किंमत | योजनेवर झालेला खर्च | योजनेचे शिल्लक दायित्व | ज्या लेखा शिर्षाखाली वर्ग करण्यात येत आहे ते लेखाशिर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | को.प.ब.कोलार ता.मानोरा | वाशिम | १३.९८ | १३.११ | ०.८७ | ४४०२-१२२८ महामंडळ |
| ३ | को.प.ब.मसालापेन ता. रिसोड | वाशिम | ३०.८१ | १७.०० | १३.८१ | ४४०२-१२२८ महामंडळ |
| | | ३ | १८६.८४ | ६५.११ | १२१.७३ | |
| लघु सिंचन (जलसंधारण)विभाग,बुलढाणा | | | | | | |
